म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८५१

REFBK-0008185

# विष्णु कृष्ण चिपळूणकर

# काल आणि कर्तृत्व

अनुक्रम ... 
विभाग ...
क्रमांक ...
नों. दि. ...
वाचनालय ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ...

REFBK-0008185

ग. त्र्यं. माडखोलकर

जुलै

१९५४

मूल्य चार रुपये

मुद्रक व प्रकाशक
**द. ना. ठाकूर**
मॅनेजिंग एजंट
ठाकूर आणि कं. लि.
**अमरावती**

**चतुर्थ संस्करण**
२०००

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, अनुवादाचे, उतारे घेण्याचे वगैरे कॉपीराईटचे संपूर्ण हक्क सौ. **उमा चंद्रशेखर माडखोलकर**, बी. ए., 'प्रसाद', अभ्यंकर रस्ता, धंतोली, नागपूर १, यांच्याकडे आहेत.

❖

मुद्रणस्थळ :
महेश्वर मुद्रणालय,
अमरावती

गुरुवर्य

कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

यांच्या चरणीं सविनय

समर्पण

❖

# माडखोलकर - वाङ्मय

★

## प्रबंध

१. आधुनिक कविपंचक
२. चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व
३. विलापिका
४. वाङ्मय-विलास
५. स्वैर विचार
६. माझे आवडते लेखक
७. अवशेष
८. आव्हान
९. माझी नभोवाणी
१०. परामर्ष
११. जीवनसाहित्य
१२. व्यक्तिरेखा
१३. दोन तपें
१४. हांक
१५. एका निर्वासिताची कहाणी

●

## कादंबऱ्या

१. मुक्तात्मा
२. भंगलेलें देऊळ
३. शाप
४. कांता
५. दुहेरी जीवन
६. मुखवटे
७. नवे संसार
८. डाक बंगला
९. नागकन्या
१०. चंदनवाडी
११. प्रमद्वरा
१२. अनघा
१३. स्वप्नांतरिता

## कथासंग्रह

१. शुक्राचें चांदणें
२. रातराणीचीं फुलें

●

२८३३५
२७.१०
२९
२०/७/५

# निवेदन

माझ्या ' विष्णु कृष्ण चिपळूणकर ' या प्रबंधाची ही चौथी आवृत्ति आहे. केवळ पुनरावृत्तीच नव्हे, तर अंशतः पुनर्लेखनहि.

या प्रबंधाच्या प्रथम लेखनाला मुंबई येथे ता. २७ नोव्हेंबर १९२१ रोजीं प्रारंभ होऊन ता. १६ मे १९२२ रोजीं तो पूर्ण झाला. तो लिहिला जात असतांनाच मुंबईच्या ' विविधज्ञानविस्तार ' मासिकाच्या १९२१-२२ सालच्या अंकांतून क्रमशः प्रसिद्ध होत होता. त्याची स्वतंत्र परिष्कृत आवृत्ति पुण्याच्या आर्यभूषण संस्थेने १९२३ सालच्या जूनमध्ये प्रकाशित केली.

तिसऱ्या आवृत्तीच्या पुनर्लेखनाला ता. ५ जून १९३३ रोजीं नागपूर येथें प्रारंभ होऊन ता. १० जानेवारी १९३४ रोजीं तें पूर्ण झालें. ही आवृत्ति माझे मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेतील वर्गबंधु, नागपूरचे विद्वान् ग्रंथकार, प्रो. श्री. ना. बनहट्टी यांच्या ' चिपळूणकर व त्यांचे आधुनिक आक्षेपक ' या प्रबंधासह १९३४ सालच्या जुलैमध्ये ' विष्णु कृष्ण चिपळूणकरः द्विविध दर्शन ' या नांवाने मुंबईच्या बॉम्बे बुकडेपोने प्रसिद्ध केली.

या चवथ्या आवृत्तीचें पुनर्लेखन शनिवार ता. १७ आक्टोबर १९५३ रोजीं विजयादशमीच्या दिवशीं नागपूर येथे सुरू झालें; व तें अमरावती येथे गुरुवार ता. १५ जुलै १९५४ रोजीं गुरुपौर्णिमेच्या दिवशीं पूर्ण झालें.

गेल्या तीस वर्षांत निरनिराळ्या विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमांत या प्रबंधाचा समावेश केल्यामुळेच खरोखरी, प्रत्येक खेपेस नव्या माहितीचा उपयोग करून, या प्रबंधांत सुधारणा करणें शक्य झालें, हें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें अवश्य आहे.

चिपळूणकरांच्या जन्माला आता एक शतक पूर्ण होऊन गेलेलें असून मृत्यूलाहि पाऊण शतक होत आलेलें आहे. त्यांचा जन्म एकोणिसाव्या

शतकाच्या अर्धरेषेवर झाला. त्यानंतर सात वर्षांनी, १८५७ सालचें बंड होऊन, या देशाचा राज्यकारभार ब्रिटिश सरकारने आपल्या हातीं घेतला. चिपळूणकरांच्या वांट्याला आलेल्या बत्तीस वर्षांच्या आयुर्मानांत ज्या घडामोडी झाल्या, त्यामुळे महाराष्ट्राचें आणि भारताचें संपूर्ण जीवन बदलून जाऊन त्याला अगदी निराळें वळण लागलें. त्यांच्या निधनानंतर तीन वर्षांनी १८८५ सालीं झालेली राष्ट्रीय सभेची स्थापना ही या परिवर्तनाची निदर्शक होय.

या प्रबंधाची तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाल्यापासून गेल्या तीस वर्षांत पारतंत्र्याच्या पहिल्या कालखंडांत होऊन गेलेले बाळशास्त्री जांभेकर प्रभृति अनेक थोर कार्यकर्ते आणि लेखक यांचें आणि यांच्यासंबंधींचें महत्त्वाचें वाङ्मय प्रकाशांत आलेलें असून, त्यामुळे महाराष्ट्राचा एकोणिसाव्या शतकाचा इतिहास नव्याने लिहिण्याची आवश्यकता उत्पन्न झालेली आहे. शिवाय, आता हा देश स्वतंत्र होऊन गेलेला असल्यामुळे, पारतंत्र्याच्या काळांतील पूर्वग्रह, पक्षभेद, जात्यभिमान, वाद वगैरे सर्व तात्कालिक अभिनिवेश किंवा हितसंबंध बाजूला ठेऊन, निराग्रह बुद्धीने, प्रांजल वृत्तीने आणि तुलनात्मक दृष्टीने गेल्या सवाशें वर्षांतील व्यक्ति, विचारप्रणालि आणि चळवळी यांचें योग्य आकलन आणि मूल्यन करावयाला अनुकूल अशी परिस्थितीहि उत्पन्न झालेली आहे.

या सगळ्या गोष्टी लक्षांत घेऊन प्रस्तुत निबंधाला या नव्या आवृत्तीच्या वेळीं माहितीच्या आणि विवेचनाच्या दृष्टीने जितकी पूर्णता आणतां येईल, तितकी आणण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. तसा प्रयत्न जर मी केला नसता आणि हा प्रबंध जसाच्या तसाच छापून काढला असता, तर त्यामुळे केवळ चिपळूणकरांना आणि त्यांच्या कालालाच नव्हे, तर वाचकवर्गालाहि मोठाच अन्याय झाला असता. माझ्या या प्रयत्नामुळे या प्रबंधाची पृष्ठसंख्या वाढली आहे, ही गोष्ट खरी. पण तिला उपाय नव्हता. व्यक्ति, विचारप्रणालि आणि

चळवळी यांच्यासंबंधीं माझीं स्वतःचीं मतें कांहींहि असलीं, तरी वाचकांना त्यांच्याविषयी स्वतंत्र रीतीने मत बनवितां यावें, म्हणून मी जरूर तितके उतारे मुद्दामच दिलेले आहेत. हेतु असा की, त्या त्या व्यक्तींचें हृद्गत आणि विचार हीं शक्य तोंवर त्यांच्या स्वतःच्या शब्दांतच वाचकांना वाचावयाला मिळावीत. हे विस्तृत उतारे देण्यांत आणखीहि एक उद्देश आहे. तो हा की, एकोणिसाव्या शतकांतील हें जुनें वाङ्मय आता पुनर्मुद्रित होण्याची शक्यता अगदीं कमी असल्यामुळे, तत्कालीन भाषा, लेखनशैली आणि विचारप्रणालि यांचे अस्सल नमुने वाचकांच्या अवलोकनांत येऊन त्यांना त्या शतकांत मराठी भाषेचा आणि मराठी मनाचाहि विकास कसकसा होत गेला, याची प्रत्यक्ष ओळख व्हावी. अर्थात् नवी माहिती आणि तिला पूरक असे उतारे दिल्यामुळे जी ही वाढ पृष्ठसंख्येंत झालेली आहे, ती माझ्याप्रमाणे वाचकांनाहि योग्य वाटेल, अशी मला आशा आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत जन्मलेल्या जांभेकर, दादोबा पांडुरंग, फुले, भांडारकर, रानडे आणि चिपळूणकर या सहा महापुरुषांनी आपल्या विचारांनी आणि कृतींनी परतंत्र महाराष्ट्राच्या जीवनावर जे संस्कार केले, त्या संस्कारांनी आजचें त्याचें जीवन बनलेलें आहे, हें आपण प्रत्यक्ष पाहतच आहोंत. जांभेकर हे या महापुरुषांत वयाने वडील पण अल्पायुषी, तर चिपळूणकर हे वयाने लहान पण अल्पायुषी. त्यांच्या जीवनावर आणि वाङ्मयावरहि त्यांच्या पूर्वीं होऊन गेलेल्या या पांच महापुरुषांच्या विचारांचा आणि कृतींचा परिणाम झालेला स्पष्ट दिसतो. इतकेंच नव्हे, तर ज्यांच्या विचारांवर आणि कृतींवर त्यांनी प्रतिकूल टीका केली, त्यांच्याहि विचारांतील आणि कृतींतील स्वतःला पटलेला ग्राह्यांश घ्यावयाला ते चुकलेले नाहीत. किंबहुना, आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या कार्यकर्त्यांच्या विचारांतील आणि कृतींतील जेवढें कांहीं म्हणून त्यांना इष्ट आणि ग्राह्य वाटलें तेवढें सगळें आत्मसात करून, तें त्यांनी आपल्या विशिष्ट शैलीने 'निबंधमाला' आणि 'केसरी'

यांच्या रूपाने जनतेला सादर केलें. ही गोष्ट लक्षांत घेऊन—म्हणजे चिपळूणकर हे एकोणिसाव्या शतकांतील मराठी जीवनाचे प्रसव, प्रतिनिधि आणि प्रवक्ते होते ही गोष्ट लक्षांत घेऊन—एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील समाजजीवनावर परिणाम करणाऱ्या प्रमुख व्यक्ति आणि घटना यांचा परिचय विस्तारानें करून देण्याचा प्रयत्न मी या प्रबंधांत केलेला आहे. त्यामुळें नवीन पिढीला एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या तीन चरणांतील चळवळींची पुरेशी माहिती मिळून चिपळूणकरांचा काल आणि त्यांचें कर्तृत्व या दोहोंविषयी स्वतःचें मत स्वतंत्र रीतीने बनविणें सोपें जाईल, अशी उमेद वाटते.

ही आवृत्ति तयार करितांना मला इतक्या मित्रांची इतक्या प्रकारची मदत झालेली आहे की, तिच्याबद्दल शाब्दिक आभार मानणें हा केवळ एक उपचार होईल. यांपैकी पहिली महत्त्वाची मदत अर्थातच पुस्तकांची. नागपूरचे सुप्रसिद्ध कवि श्री. आनंदराव टेकाडे व मुंबईचे प्रो. वि. ह. कुळकर्णी आणि श्री. गं. दे. खानोलकर यांनी आपल्या संग्रहांतलीं अनेक दुर्मिळ बहुमोल पुस्तकें मला बेमुदत वापरावयाला दिली, हें त्याचें स्नेहसौजन्य केवळ अवर्णनीय होय. प्रो. डॉ. वि. भि. कोलते आणि श्री.वसंतराव चुके यांच्या मदतीमुळें मला म. जोतीराव फुले यांचें आणि यांच्यासंबंधीचें संपूर्ण वाङ्मय वाचावयाला मिळालें, हा लाभहि उल्लेखनीय होय. मुंबईचे प्रो. अ. का. प्रियोळकर यांनी आपल्या संग्रहांतील अनेक दुर्मिळ पुस्तकें मला दाखविलीं, ‘निबंधमाले’चीहि पहिली आवृत्ति आपल्या मित्रांकडून मुद्दाम आणवून तिचें अवलोकन करण्याची संधि मला दिली आणि पुस्तकांतून उतारेहि घेऊं दिले, हाहि लाभ तितकाच महत्त्वाचा होय. या मित्रांच्या कृपेमुळे फुले आणि लोकहितवादी यांचे बहुतेक व विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे ‘ वेदोक्त धर्मप्रकाश ’ आणि ‘सुखदायक राज्यप्रकरणी निबंध’ हे मुख्य ग्रंथ मी वाचूं शकलों. या शिवाय श्री. ग. नी. मत्राळकर, श्री. ह. ना. नेने, श्री. रा. पु. सगदेव, श्री. दे. गो.

लांडगे, प्रो. राम शिंदे, प्रो. भ. श्री. पंडित, प्रो. सुरेश डोळके, श्री. मा. कृ. पारधी, श्री. म. स. टेकाडे, श्री. श्री. पु. हिर्लेकर, प्रो. ग. त्र्यं. देशपांडे, श्री. वा. रा. लघाटे, श्री. ना. रा. शेंडे, श्री. बाबासाहेब भोंसुले प्रभृति मित्रांची पुस्तकांच्या आणि इतरहि बाबतींत जी मदत झाली, तिचाहि निर्देश करणें अवश्य आहे. श्री. गं. दे. खानोलकर यांनी मला वेळोवेळीं लागलेली माहिती मुंबईहून पत्ररूपानें ज्या अगत्याने पुरविली, तिच्यामुळे माझें काम कांही बाबतींत सुकर झालें.

या प्रबंधाला आधारभूत असलेल्या ग्रंथांची सूचि मी दिलेली आहे. पण, वस्तुस्थिति अशी आहे की, हा प्रबंध लिहित असतांना मला इतकी पुस्तकें आणि नियतकालिकें वाचावीं लागलीं व त्या वाचनाचा इतका उपयोग या प्रबंधाला झाला की, खरोखरी त्या प्रत्येक पुस्तकाचा आणि नियत-कालिकाचा नामोल्लेख या सूचीत व्हावयाला हवा होता. त्या दृष्टीने ही सूचि अपूर्ण आहे, असेंच म्हटलें पाहिजे.

या पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करण्याचें काम मुख्यतः श्री. मधुकर वैद्य आणि श्री. दिवाकर जोशी या माझ्या अंतेवासी मित्रांनीं केलेलें आहे. या बाबतींत आणि मुद्रितें वगैरे तपासण्याच्या बाबतींत चि. मीनाक्षी माडखोलकर आणि चि. सौ. सुधा माडखोलकर यांचेंहि हुकमी सहाय्य झालें.

हें पुस्तक अतिशय घाईने लिहिलें आणि छापलें गेलेलें असल्यामुळे त्यांत अनेक मुद्रणदोष राहिले असण्याचा संभव आहे. त्या दृष्टीने शुद्धिपत्र देणें अवश्य होतें, याची मला जाणीव आहे. पण माझ्या अडचणींमुळे मला तें देणें शक्य झालें नाही. तथापि, पान २०९ वर विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्या मृत्यूचें वर्ष चुकून १८७३ पडलें आहे, तें वस्तुतः १८७१ आहे, ही महत्त्वाची चूक दुरुस्त करणें जरूर वाटतें. या पुस्तकाला व्यक्तिसूचि देणेंहि अवश्य होतें. पण तेंहि माझ्या अडचणींमुळे शक्य झालें नाही.

पुस्तकाच्या लेखनासाठीं म्हणा किंवा मुद्रणासाठीं म्हणा मी गेल्या छत्तीस वर्षांच्या माझ्या लेखनायुष्यांत कधींहि स्वतःच्या घरून उठून दुसरीकडे जाऊन राहिलों नव्हतों. पण तो प्रसंग, अनेक कारणांमुळे, या वेळीं आला; व मला अमरावतीस सुमारें पाऊण महिना येऊन राहावें लागलें. माझे बंधु, ठाकूर आणि कंपनीचे हिशेबनीस, श्री. गजानन लक्ष्मण पराडकर आणि त्यांच्या पत्नी सौ. सुशीला पराडकर यांनी आपल्या ' उदय ' बंगल्यांत माझी रहाण्याची जी उत्कृष्ट व्यवस्था केली, तिच्यामुळे मला जर पुन्हा अशाच कामासाठीं किंवा केवळ विश्रांतिसाठींहि त्यांच्या ' उदय ' मध्यें येऊन रहाण्याचा मोह पडला, तर नवल नाहीं. अमरावतीच्या या मुक्कामांत 'महेश्वर मुद्रणालया'चे संचालक श्री. बाळासाहेब ठाकूर, व्यवस्थापक श्री. मनोहरराव खांडेकर, श्री. वसंतराव सुळे आणि श्री. अण्णासाहेब बेनोडेकर यांचें हर एक बाबतींत इतक्या अगत्याचें सहाय्य झालें कीं, त्यामुळेच खरोखरी ठरलेल्या मुदतींत लेखनाचा आणि मुद्रणाचा कार्यक्रम पार पडला. त्याचप्रमाणे, माझा हा मुक्काम सुखकर करण्याच्या कामीं माझे तरुण मित्र श्री. वसंतराव चुके आणि श्री. सुळे बंधु यांनी आपुलकीनें जे परिश्रम घेतले, ते माझ्या सदैव स्मरणांत राहतील.

शेवटीं, या प्रबंधाचें लेखन आणि मुद्रण चालू असतांना मला जो आनंददायक अनुभव प्रथमच आला, त्याचाहि निर्देश करावासा वाटतो. हा अनुभव म्हणजे चि. मीनाक्षी माडखोलकर हिचें सतत लाभलेलें सुजाण आणि तत्पर सहकार्य. सौ. शांताबाईंचे व्यासंगाचे, रसिकतेचे आणि दक्षतेचे गुण तिच्या ठिकाणीं विकसित होत असल्याचा जो प्रत्यय हें काम करीत असतांना मला आला, तो मी माझ्या श्रमशील जीवनांतील नवा मधुर लाभ समजतों.

' उदय ', बुटी प्लॉटस्, अमरावती
गुरुपूर्णिमा १९५४

ग. त्र्यं. माडखोलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८९८५

# विष्णु कृष्ण चिपळूणकर

## काल आणि कर्तृत्व

### १

विष्णु कृष्ण चिपळूणकर यांचा जन्म ता. २० मे १८५० रोजीं पुणें येथे झाला आणि ता. १७ मार्च १८८२ रोजीं त्यांची जीवितयात्रा समाप्त झाली. मानवी आयुष्याच्या शंभर वर्षांपैकी अवघीं बत्तीस वर्षें त्यांच्या वांट्याला आलीं. पण या बत्तीस वर्षांच्या काळांत त्यांनी किती विविध उपक्रम केले आणि महाराष्ट्रांत केवढी महनीय विचारक्रांति घडवून आणली! १८६५ सालीं प्रवेशपरीक्षा, १८६८ सालीं 'शालापत्रका'चें संपादन, १८६९ सालीं 'संस्कृत कविपंचक', १८७२ सालीं मुंबई विद्यापीठाची पदवी, १८७४ सालीं निबंधमाला, १८७७ सालीं 'चित्रशाळा', १८७८ सालीं 'काव्येतिहाससंग्रह', १८७९ सालीं सरकारी नोकरीचा राजीनामा, १८८० सालीं न्यू इंग्लिश हायस्कूल आणि १८८२ सालीं 'केसरी–मराठा'! –वयाच्या पंधराव्या वर्षापासून आपल्या आयुष्याचें प्रत्येक वर्ष जणुं चिपळूणकरांनी एक एका योजनेच्या सांगतेला समर्पण केलें. कांहीं अलौकिक व्यक्तींच्या जीवनांत शैशव हें मुळी नसतेंच. त्या व्यक्ति, हैमवती उमेप्रमाणे, प्राक्तन विद्यांचे संस्कार घेऊनच जणुं जन्माला येतात

आणि पूर्वजन्मींचे अपूर्ण राहिलेले संकल्प सफल होतांच निघून जातात. चिपळूणकरांचें जीवनकार्य हें, अशाच रीतीने, त्याची दीप्ति आणि दर्प हीं समकालीन लोकांना तीव्रतेने जाणवतात न जाणवतात, तोंच 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः' या न्यायाने, अचानक होऊन गेलें. 'निबंधमाला' चालू असतांनाच मुळी त्यांनी आरंभिलेल्या विचारप्रवर्तनाच्या इष्टानिष्टतेसंबंधीं जे वाद सुरू झाले, ते त्यांच्या निधनानंतर विराम न पावतां उलट उत्तरोत्तर विकोपाला गेले; व पुढे राजकीय पक्षभेदांची धार त्या वादांना चढून त्यांच्या मतांचा आणि कृतीचा विपर्यास करण्यापर्यंत त्यांच्या दूषकांची मजल येऊन ठेपली. चिपळूणकरांनी प्रतिपादन केलेल्या विचारांत आणि त्यांच्या शैलींतहि कांही वैगुण्यें होतीं, हें निस्संशय. पण, आज पाऊणशें वर्षांनी, त्यांना अत्यंत प्रिय असलेला हा पुरातन देश पुन्हा स्वतंत्र झाल्यानंतर, त्यांचा काल आणि कर्तृत्व यांचें समालोचन, अगदी भिन्न परिस्थितींत, करित असतांना, एक सत्य मनावर अतिशयच उज्ज्वलतेने बिबतें. तें सत्य हें की, चिपळूणकरांनी 'निबंधमाला', 'न्यू इंग्लिश हायस्कूल' आणि 'केसरी–मराठा' यांच्या रूपाने स्वातंत्र्योन्मुख युयुत्सु जीवनाच्या नव्या प्रणालि निर्माण करून पारतंत्र्यामुळे हतबुद्ध झालेल्या महाराष्ट्रांत स्वावलंबनाचा उद्दाम आत्मप्रत्यय आणि प्रतिकाराची अदम्य ईर्ष्या उत्पन्न करण्यांत संपादन केलेलें यश केवळ अनन्य होय.

चिपळूणकरांच्या जन्मकालीं त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे आपल्या विद्वत्तेने, वक्तृत्वाने आणि वाङ्मयसेवेने पुण्यांतील नवशिक्षितांच्या पहिल्या पिढींत अग्रगण्य होऊन बसले होते. पेशवाईचा अस्त झाल्यावर संपुष्टांत आलेली आपल्या घराण्याची प्रतिष्ठा त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने पुन्हा संपादन केली होती. चिपळूणकर हे मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील पावस या गांवीं राहणारे. सतराव्या शतकाच्या प्रारंभीं स्वराज्यांत आपलें नशीब काढण्याच्या उद्देशाने चित्पावनांचीं जीं अनेक घराणीं कोकणांतून देशावर आलीं, त्यांपैकीच हें एक घराणें असून, शास्त्रीबुवांचे पणजे महादजीपंत हे पेशवाईंत त्र्यंबकेश्वराजवळील श्रीहर्ष या किल्ल्याचे फडणवीस होते. सवाई माधवरावाच्या अपमृत्यूनंतर मराठशाहीचीं सत्तासूत्रें दुसऱ्या बाजीरावा-

सारख्या नादान पेशव्याच्या हातीं जाऊन महाराष्ट्रांत लवकरच जें अराजक माजलें, त्याची झळ चिपळूणकरांनाहि लागल्याविना राहिली नाही. १८०१ सालच्या एप्रिलमध्ये होळकरांचा सूड घेण्याच्या आसुरी लालसेनें बाजीरावाने विठोजी होळकराला आपल्या डोळ्यांसमोर, शनिवारवाड्याच्या पुढल्या चौकांत, हत्तीच्या पायीं देऊन ठार मारला; त्याचें प्रेत चोवीस तास उचलूं दिलें नाही; व सहगमन करावयास निघालेल्या त्याच्या बायकोला अल्पवयी पोरक्या मुलासह कैदेंत डांबलें. या त्याच्या अमानुष कृत्यामुळें चवताळलेला विठोजीचा धाकटा भाऊ यशवंतराव होळकर याने १८०२ सालच्या सप्टेंबरमध्ये दक्षिणेवर धाड घालून जो प्रळय केला, त्यांत चिपळूणकरांच्या फडणविशीचा फडशा उडाला; व शास्त्रीबुवांचे वडील हरिपंत हे पुण्यास येऊन बाजीरावाचा कनिष्ठ बंधु चिमाजी आप्पा याच्या आश्रयाला, दर महा चार रुपये पगारावर, शागीर्द म्हणून राहिले. पण ही शागीर्दीहि फार दिवस टिकली नाही. खडकीच्या पराभवानंतर, बाजीरावाला, आपल्या कुटुंबपरिवारासह, पुणें कायमचें सोडून १८१८ सालच्या जूनमध्यें ब्रम्हावर्तास जावें लागल्यामुळे, पेशव्यांचे पुण्यांतील अनेक आश्रित अन्नाला मोताद झाले. त्या विप्लवांत चिमाजी आप्पाचा आधार तुटून बिचाऱ्या हरिपंतांवरहि निर्वाहासाठी अफूचें दुकान काढण्याचा दुष्प्रसंग ओढवला. त्या काळीं तान्ह्या मुलांना अफू देण्याची पद्धत सार्वत्रिक होती; व एकंदर समाजांतहि अफूचें व्यसन, निरनिराळ्या स्वरूपांत, प्रचलित होतें. त्यामुळे हरिपंतांचें हें दुकान बरें चालत असे. शिवाय त्याच्या जोडीला ते सराफीचाहि धंदा करीत असत. वस्तुतः पुण्यास त्या वेळीं अनेक सरदार, जहागिरदार, सावकार वगैरे जुन्या राजवटींतील सरंजामदारांचीं मातबर घराणीं मोठ्या इतमामाने राहत होतीं. तथापि, पेशव्यांच्या आश्रयाला मुकल्यावर त्यांच्या या आश्रितांचा आसरा मिळविण्याच्या मोहांत न सापडतां, हरिपंतांनी निर्वाहाचा स्वतंत्र मार्ग काढला आणि त्या हलाखीच्या परिस्थितींतहि स्वतःचें सत्त्व सांभाळलें, हें विशेष होय.

अशा या राज्यक्रांतीच्या चक्रांत सांपडून खालावलेल्या जुन्या नामांकित घराण्यांत कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म १८२४ सालीं झाला.

# २

महाराष्ट्रांत पांच वर्षांपूर्वीं झालेल्या राज्यक्रांतीचा हा संधिकाल होता. अराजकाची अवकळा आलेलें स्वातंत्र्य या वेळीं नुकतेंच नष्ट झालेलें होतें आणि सुराज्याचें गोंडस रूप घेऊन आलेलें पारतंत्र्य अद्याप दृढमूल झालेलें नव्हतें. ब्रिटिश राज्यसत्तेची शिस्त आणि सुव्यवस्था पाहून दिपलेल्या मराठी जनतेला, जुने मोडीत आणि नवे लादीत असल्याचा सुगावा लागूं न देतां, "न खरो न च भूयसा मृदुः" अशा प्रकारच्या मध्यम धोरणाने, मुंबई प्रांताचा तत्कालीन राज्यपाल मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा या वेळीं आपल्या राज्यकारभाराची घडी हळुहळू बसवीत होता. १८१९ नोव्हेंबर ते १८२७ नोव्हेंबर पर्यंतच्या आपल्या आठ वर्षांच्या कारकीर्दींत त्याने नव्या राजवटीचा पाया, सर्वच बाबतींत, खरोखरी अतिशय मजबूत असा घातला. एल्फिन्स्टन हा मराठशाहीचा अधःपात प्रत्यक्ष पाहिलेला, तो घडवून आणण्यासाठी नाना प्रकारचे डावपेंच खेळलेला आणि पुण्यासारख्या मराठी राज्याच्या केंद्रस्थानीं नऊ वर्षें राहिलेला अत्यंत दूरदर्शी मुत्सद्दी होता. आपली दमछाक करणाऱ्या पट्टेदार वाघाला दगाफटक्याने गारद केल्यावर एकाद्या शिकाऱ्याला जसें त्याच्या शौर्याविषयी सादर कौतुक वाटावें, तशी एल्फिन्स्टनची वृत्ति पराभूत पण पराक्रमी मराठे आणि त्यांचा दरिद्री पण डोंगराळ मायदेश यांच्याविषयी होती. मुंबई प्रांताच्या राज्यपाल-पदावर नेमणूक झाल्यावर पुण्याहून मुंबईस जावयाला निघतांना त्याने महाराष्ट्राबद्दल असे उद्‌गार काढलेले आढळतात की, "या निसर्गरम्य प्रदेशाविषयी मला एक प्रकारची आसक्ति आणि आदरहि वाटतो. आता हा रमणीय प्रदेश सोडून मी मुंबईच्या सपाट गजबजलेल्या रस्त्यांना लागलों आहे. दख्खनचे मर्दानी खेळ आणि रोमांचकारी दृश्यें यांचा निरोप घेतांना मला विषाद वाटल्याविना रहात नाही."

एल्फिन्स्टन हा १७९६ सालच्या फेब्रुवारींत ईस्ट इंडिया कंपनीच्या कलकत्ता येथील कचेरींतील एक कारकून म्हणून प्रथम भारतांत आला. ह्या वेळीं त्याचें वय अवघें सतरा वर्षांचें होतें. कंपनीच्या सनदी नोकरांना

भारतांतील भाषा, चालीरीति, इतिहास आणि एकंदर परिस्थिति यांचें ज्ञान करून देण्यासाठी १८०० सालच्या जुलैमध्ये त्या वेळचा गव्हर्नर-जनरल रिचर्ड वेलस्ली याने मुद्दाम जें कॉलेज, डायरेक्टरांच्या विरोधाला न जुमानतां, कलकत्त्यास फोर्ट विल्यम येथे काढलें, त्याच्या पहिल्या होतकरू विद्यार्थ्यांपैकी तो एक होता. पण, या कॉलेजांत तो दाखल होतो न होतो, तोंच १८०१ सालच्या जानेवारींत पुणें दरबारीं रेसिडेंटचा दुय्यम सेक्रेटरी म्हणून त्याची नेमणूक झाली; व तो लगेच कलकत्त्याहून पुण्यास जावयाला निघाला. या वर्षभराच्या प्रवासांत ओरिसा, मद्रास, म्हैसूर आणि हैद्राबाद या त्या सुमारास ब्रिटिश अमलाखाली नुकत्याच आलेल्या मुलुखांतून मजल दर मजल करीत हिंडत असतां, दक्षिण भारतांतील लोकजीवनाचें जें अवलोकन त्याने केलें आणि राजकीय संक्रमणाचा जो साक्षात्कार त्याच्या विजिगीषु मनाला झाला, त्याचा उपयोग त्याने पुढे मराठी साम्राज्याचा विध्वंस करण्याच्या आणि नंतर पेशव्यांच्या ताब्यांतून घेतलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावण्याच्या कामीं मोठ्या साक्षेपाने केला. मद्रासहून निघतांना त्याने आपल्या रोजनिशींत असा निर्धार व्यक्त केलेला दृष्टीस पडतो की, "सृष्टिसौंदर्याबद्दल, इमारतींबद्दल किंवा कांही संस्मरणीय घटनांबद्दल जर एकादें स्थळ प्रसिद्ध असलें, तर तें स्थळ माझ्या मार्गापासून जरी पन्नास मैल दूर असलें, तरी तें पाहण्यासाठी मी आपला रस्ता सोडावयाला कचरणार नाही. या देशांत कुठे काय पिकतें, कुठे कोणतीं झाडें होतात, वगैरे गोष्टींचें निरीक्षण करण्याचा प्रयत्न मी करीन. सारावसुलीच्या आणि न्यायदानाच्या पद्धति व आमच्या सरकारच्या कृतींचा जनतेवर होत असलेला परिणाम यांची माहिती करून घेण्यासाठी मी त्या त्या ठिकाणच्या प्रमुख लोकांशीं शक्य तितकें बोलेन." या प्रवासांत पुरी येथे जगन्नाथाच्या मंदिराजवळ त्याला एक फकीर भेटला. त्याने एल्फिन्स्टनला विचारलें, "हा देश तुम्ही केव्हा घेणार ? या देशाला तुमची गरज आहे. येथील हिंदु लोक दुष्ट आहेत. पण तुम्ही सच्चे लोक आहांत. हा देश तुम्ही केव्हा घेणार ?"–"केव्हाच नाही !" एल्फिन्स्टनने उत्तर दिलें. त्यावर तो फकीर उद्गारला, "छे ! तुम्ही खात्रीने घेणार !" हें त्या फकिराचें भाकित दोन वर्षांच्या आंतच खरें ठरलें.

१८०२ ते १८०३ मधील पुणें दरबारांतल्या या पहिल्या वास्तव्यांत एल्फिन्स्टनला मराठमंडळांतील विकोपास गेलेले हेवेदावे आणि मराठ्यांच्या राज्यनीतींतील सारीं वैगुण्यें प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहण्याची संधी मिळाली. कारण, " इंग्रजांपासीं लेखांत वगैरे थोडेंहि गुंतूं नये. कारण त्यांची चाल थोडेंसें सांपडलें म्हणजे दाबीत दाबीत व गुंतवीत गुंतवीत साऱ्यावर हात घालितात. याजकरितां प्रथमच त्यासी संसर्ग ठेवूं नये, " असा इषारा सर्वांना देणारा आणि तदनुसार स्वतः राजकारणें खेळणारा मराठशाहींतील शेवटला धुरंधर मुत्सद्दी नाना फडणीस हा या वेळीं मरून गेलेला होता; व " मागील सर्व मोडावें, " या एकाच दुर्मंत्राने पछाडलेल्या दुसऱ्या बाजीरावाच्या मुठींत राज्यसूत्रें गेलेलीं होतीं. " इंग्रजांचा कदम दौलतींत पोंचला असतां कोणाचेंच माहात्म्य राहत नाही, " या विदारक सत्याची जाणीव आता साऱ्याच मराठी सरदारांना झालेली होती, हें खरें. तथापि, " राज्य वुडतें खरें, पण श्रीमंतांचें दैवच तसें आहे, " या अवसानघातकी भावनेची अवकळा तमाम मराठमंडळावर पसरल्यामुळे, इंग्रजांना एकजुटीने प्रतिकार करण्याचा प्रयत्न मात्र त्यांच्याकडून झाला नाही. त्यामुळे, या पुण्यापुऱ्या एक वर्षाच्या अवधींत शिंदे–होळकरांची आत्मघातकी यादवी, विठोजी होळकराचा अमानुष वध, यशवंतराव होळकराची पुण्यावर स्वारी, त्याच्या समेटाच्या बोलण्यावर विश्वास न ठेवतां बाजीरावाने काढलेला पळ, या अंत:कलहाचें अखेर १८०२ सालच्या डिसेंबरमध्ये वसईच्या तहांत झालेलें पर्यवसान आणि त्यानंतर १८०३ सालच्या मे मध्ये स्वतः वेलस्लीने बाजीरावाला आपल्या फौजेच्या पहाऱ्यांत पुण्यास आणून त्याची पेशवेपदावर पुनश्च केलेली स्थापना हे सर्व प्रसंग एल्फिन्स्टनच्या नजरेसमोर घडले; व १८०३ सालच्या सप्टेंबरपासून डिसेंबरपर्यन्त आसई ते सुर्जी–अंजनगांव शिंदे–भोसले यांच्या संयुक्त सैन्याची जी ससेहोलपट इंग्रजांनी सतत चार महिने केली, तींतहि तो सामील झालेला होता. मराठमंडळाच्या उच्छेदाला कारण झालेल्या वेलस्ली बंधूंच्या या निरनिराळ्या मसलतींत, पुढे 'ड्यूक ऑफ वेलिंग्टन ' या नांवाने जगभर गाजलेला इंग्रज सेनानी ऑर्थर वेलस्ली याच्या खांद्याला खांदा भिडवून, त्याने जो प्रामुख्याने भाग घेतला, त्यामुळे मराठ्यांचें राज्ययंत्र आणि युद्धतंत्र या दोहोंतीलहि गंजलेल्या कच्च्या

दुव्यांची जशी त्याला यथार्थ कल्पना आली, तसेंच त्याचें स्वतःचें दुहेरी कर्तृत्वहि ऑर्थर वेलस्लीच्या दृष्टींत भरलें. म्हणून, सुर्जी-अंजनगांवच्या तहानंतर आपल्या वडील भावाला पाठविलेल्या खलित्यांत ऑर्थर वेलस्ली याने त्याची अशी शिफारस केली की, "एलिफन्स्टनला मराठी भाषा चांगली अवगत असून, मराठे सरदार, त्यांची आपसांतलीं राजकारणें व ब्रिटिश सरकार आणि त्यांचे दोस्त यांच्याशीं असलेले त्यांचे संबंध यांची त्याला माहिती आणि अनुभवहि आहे. या भागांत झालेल्या लढाईंतील आणि सर्व वेढ्यांतील हालचालींत तो जातीने हजर होता." या शिफारशीनुसार गव्हर्नर-जनरलने त्याची नेमणूक अडगांवच्या लढाईंत पराभूत होऊन इंग्रजांना शरण आलेल्या नागपूरकर भोसल्यांच्या दरबारीं रेसिडेंट म्हणून केली. या वेळीं त्याचें वय अवघें चौवीस वर्षांचें होतें. १८०४ सालच्या जानेवारीपासून तों १८०८ सालच्या एप्रिलपर्यन्त नागपूर दरबारीं असतांना इंग्रजांच्या वाढत्या वर्चस्वाविरुद्ध या वेळीं संघटित उठाव करण्याच्या विवंचनेंत असलेल्या मराठ्यांच्या कुटीर राजकारणांतील जे अंतर्गत संघर्ष त्याच्या अनुभवाला आले, त्यांचें मर्म लक्षांत घेऊन त्याने पुढे बाजीरावाच्या विनाशाचा व्यूह रचला. १८०८ सालच्या एप्रिलमध्ये त्याची नेमणूक दौलतराव शिंद्याच्या दरबारीं झाली. त्याच्या छावणीबरोबर तो हिंडत असतांनाच लॉर्ड मिंटो याने त्याला अफगाणिस्तानच्या अमीराशीं शिष्टाई करण्यासाठी काबूलला पाठविलें. या शिष्टाईच्या दोन वर्षांच्या काळांत आशिया खंडाच्या राजकारणामध्ये भारताला असलेलें अनन्य महत्त्व आणि रशियाच्या विजिगीषेपासून त्याला असलेला धोका एलिफन्स्टनच्या ध्यानांत येऊन, पूर्वेकडील आपलें वर्धिष्णु साम्राज्य दृढमूल करण्यासाठी ब्रिटनला भारताचा संपूर्ण ताबा घेणें प्राप्त आहे, अशी त्याची खात्री होऊन चुकली.

काबूलच्या रुधिरप्रदिग्ध राजकारणांतून एलिफन्स्टन मोकळा होतो न होतो, तोंच मिंटोने त्याची नेमणूक पुन्हा पुणें दरबारीं केली. १८११ सालच्या मे मध्ये तो पुण्यास येऊन दाखल झाला. तेव्हापासून १८१८ सालच्या एप्रिलमध्ये प्रतापसिंहाची छत्रपति म्हणून साताऱ्च्या गादीवर स्थापना करीपर्यंत त्याने जीं नाना प्रकारचीं कारस्थानें केलीं, त्यांत ब्रिटिश

भेदनीतीच्या विदारक अंगोपांगाची उत्कृष्ट प्रतीति येते. पेशवे, भोसले आणि शिंदे यांच्या दरबारीं राहिल्यामुळे, ज्या मराठशाहीची छत्रछाया अखिल भरतखंडावर पसरल्यासारखी त्या काळीं दिसत होती, तिचा तो भव्य डोलारा आंतून किती पोकळ आणि पोखरलेला आहे, याची त्याला आता पूर्ण कल्पना आलेली होती. छत्रपति हा मराठशाहीचा संस्थापक आणि स्वामी; पेशवा हा त्याचा सेनापति आणि प्रधान; भोसले, गायकवाड, शिंदे, होळकर, बुंदेले आणि पवार हे तिचे आधारस्तंभ; व भानु, रास्ते, पेठे, फडके, गोखले, पटवर्धन प्रभृति दक्षिणेंतील शेकडो सरदार ही पेशव्यांची स्वतःची खास प्रभावळ!—मराठमंडळाची ही रचना, त्यांतील अंतर्गत संबंध आणि संघर्ष यांचें एल्फिन्स्टनला प्रत्यक्ष ज्ञान झालेलें होतें. त्यामुळे, छत्रपति हा निर्माल्य झालेला असला, तरी त्याचें सिंहासन हें मराठ्यांचें स्वराज्य आणि साम्राज्य या दोहोंचेंहि आदिपीठ असल्यामुळे त्याला पाय लावण्याची कोणाचीहि प्राज्ञा नाही, हें तो जाणून होता. इतकेंच नव्हे, तर श्रीशिवछत्रपतीच्या सिंहासनावरला हा निर्माल्य स्वतःच्या शिरीं धारण केल्याचा आभास जो मनुष्य निर्माण करील, त्याच्यापुढे मराठशाहींतील झाडून सारे मुत्सद्दी आणि मानकरी, सेनानी आणि सरदार हे मस्तक नमवून मुकाट्याने मुजरा करतील, हेंहि त्याने ओळखलें होतें. म्हणून, बाजीराव आपल्या आश्रयाला येतांच वेलस्लीने ज्याप्रमाणे त्याला पुण्याच्या गादीवर बसवून मराठमंडळांतील सर्व सरदारांना ब्रिटिश सार्वभौम सत्तेच्या कक्षेंत एकामागून एक खेंचून आणलें, त्याप्रमाणे एल्फिन्स्टननेहि, छत्रपति प्रतापसिंह हा आपल्या स्वाधीन होतांच, त्याला सिंहासनारूढ करून पेशवाई समूळ बुडविण्याच्या त्या आपल्या कुटिल कृत्यावर छत्रपतींच्या सत्तेचा जीर्णोद्धार केल्याची झिलई चढविली. रेसिडेंट म्हणून पुण्यास आल्याबरोबर सदाशिव माणकेश्वर, मोरदीक्षित मराठे यांच्यासारख्या खुद्द बाजीरावाच्या कारभाऱ्यांशीं संधानें बांधून आणि बाळाजीपंत नातू, यशवंतराव घोरपडे यांच्यासारखे हजारो घरभेदे हाताशीं धरून मराठी राज्याचें पुण्यांतील मध्यवर्ती केंद्र त्याने पोखरून काढलें. तें इतकें की, १८१७ सालच्या नोव्हेंबरमध्ये आश्विन वद्य एकादशीला सायंकाळीं बापू गोखले याच्या नेतृत्वाखाली जेव्हा मराठी सैन्याने खडकीवर चाल करून रेसिडेन्सीला

वेढा घातला, तेव्हा पेशव्यांच्या खुद्द राजधानींतच मुळी इंग्रजांना जय मिळावा म्हणून अनुष्ठानें बसलीं होतीं ! पेशव्यांचा आप्त सरदार गोपाळराव रास्ते याचा एक आश्रित बापूजी भिकाजी भाटचे याने खडकीच्या लढाईनंतर एल्फिन्स्टनला केलेल्या अर्जांत असें म्हटलें होतें की, "आश्विन वद्य ११ साईंकालीं फौजेचा घेरा पडला. त्या वेलेस श्रीनिवासराव येऊन बोलिले की, कैसें करून वडे साहेब वाचून शतृपराभव व्हावा. तेव्हा आम्ही श्रीगणपतीस व श्रीमाहलक्षुमीस नवस केला की, वडे साहेव यांस येश येऊन राज्याचें कामकाज व्हावें. साहेब लोक जिवानिसी खुशाल राहावे. ब्राम्हण तपश्वी जागोजागा अनुष्ठानास वसले आहेत. ब्राम्हण भोज्यन पाच लक्ष व्हावयाचे आहे. येणेंप्रमाणें वहुत प्रयत्न केला आहे. साहेव कृपावंत होऊन आज्ञा व्हावी व बक्षिसाबद्दल दोन लक्ष रुपये कराराप्रमाणें द्यावें." खुद्द बाळाजीपंत नातूनेहि १८१८ सालच्या मे मध्ये एल्फिन्स्टनला लिहिलेल्या पत्रांत असे उद्गार काढले होते की, "लोखंड परसास लागल्यावर सोनें होईल की नाही ही काळजी लोखंडास राहत नाही !" एल्फिन्स्टनच्या फितुरीचा हा परिस पुण्यांतील किती लोखंडाचें सोनें करावयाला कारण झाला, हें त्याचें त्यालाच माहित ! !

१८१८ सालच्या फेब्रुवारींतील आष्टीच्या अंतिम सामन्यांत पेशव्यांचा शेवटला स्वामिभक्त झुंजार सेनानी बापू गोखले कामास येऊन छत्रपति प्रतापसिंह हा स्वेच्छेने इंग्रजी सैन्याच्या स्वाधीन झाला. या निर्णायक विजयानंतर एल्फिन्स्टन मुद्दाम सडाच वाईला गेला; व तेथे शास्त्री-पंडितांची मोठी सभा भरवून त्याने त्या भिक्षुकांना महावस्त्रें आणि दक्षिणा वाटली. आष्टीच्या लढाईनंतर झालेल्या पळापळींत प्रतापसिंह जेव्हा, पूर्व-संकेतानुसार, बाजीरावाची साथ सोडून ज. स्मिथ याला शरण गेला, तेव्हा पेशव्याला पदच्युत केल्यावर सारें मराठी राज्य इंग्रज आपल्याला देऊन टाकतील, अशीच त्याची भावना होती. इतकेंच नव्हे, तर १८१८ सालच्या एप्रिलमध्ये फक्त सातारा शहराभोवतालचा थोडासा प्रदेश देऊन एल्फिन्स्टनने त्याला इंग्रजांचा मांडलिक बनविल्यानंतरहि, त्याने कॅप्टन ग्रँट डफ याला अशी विनंती केलेली आढळते की, "आमचें राज्य दिवसोदिवस वाढे असें

तुम्ही व इलपिस्तन यांनी करून देणें!" पण, एल्फिन्स्टनने कृपावंत होऊन बिचाऱ्या छत्रपतीला केवळ छत्रचामरांपुरताच जो शिल्लक ठेवला, तो तरी कोणत्या उद्देशानें? १८१८ सालच्या एप्रिलमध्ये साताऱ्यास पोलिटिकल एजंट म्हणून ग्रँट डफ याची नेमणूक करतांना त्याला पाठविलेल्या सूचनापत्रांत सातारा संस्थान निर्माण करण्यांतील आपलें इंगित त्याने अगदी स्पष्ट शब्दांत प्रकट केलेलें दृष्टीस पडतें. या पत्रांत त्याने असें लिहिलें होतें की, "साताऱच्या राजासाठी हें छोटें संस्थान अस्तित्वांत आणण्यांत गव्हर्नर-जनरलचा हेतु, या देशांतील प्राचीन राजवंशाच्या प्रतिनिधीला प्रतिष्ठेने जगतां यावें आणि पूर्वीच्या ब्राह्मणी राज्याचें जें वजन उरलेलें असेल त्याला मराठ्यांकडून शह देण्याची योजना करावी, एवढाच आहे." पण एल्फिन्स्टन एवढ्यावरच थांबला नाही. त्याने बाजीरावाचा भेद काढणाऱ्या बाळाजीपंत नातूला ग्रँट डफ याचा मदतनीस म्हणून, प्रतापसिंहाच्या इच्छेविरुद्ध, त्याला सल्ला देण्यासाठी त्याच्या दरबारीं नेमला. बाळाजीपंत कोणत्या प्रकारचा सल्ला आपल्याला देत असे, हें प्रतापसिंहाने आपल्या रोजनिशींत नमूद केलेलें आहे. ता. २ आक्टोबर १८१८ रोजीं केलेल्या नोंदींत प्रतापसिंहाने असें लिहिलेलें आहे की, "बालाजीपंत बोलिले किले सारे पाडावे. आम्ही उतर केले की, प्रतापगड देवीची जागा व परली गुरूची जागा हे दोनी न पाडावे. आथवा इलपिस्तन यांचे विच्यारास येईल तैसें करावे." एल्फिन्स्टनची भेदनीति किती सर्वंकष आणि सर्वग्रासी, किती घस्मर आणि घातुक होती, याची कल्पना या सगळ्या प्रकारावरून येईल. म्हणूनच, पेशवाई नष्ट केल्यावर मराठी साम्राज्याची वासलात त्याने कोणत्या धोरणाने लावली याचें वर्णन करतांना त्याचा चरित्रकार जे. एस्. कॉटन याने असे यथार्थ उद्गार काढले आहेत की, "तिसऱ्या मराठा युद्धानंतर एल्फिन्स्टनने मराठी राज्याची जी व्यवस्था लावली, ती बव्हंशीं आजतागायत तशीच अबाधित चालू आहे. दक्षिणेंतील मराठा संस्थानें सोडलीं, तर शिंदे, होळकर आणि गायकवाड हे तीन बडे मराठा संस्थानिक ४६,००० चौरस मैलांच्या, ७०,००,००० लोकसंख्येच्या आणि ३०,००,००० पौंड उत्पन्नाच्या प्रदेशावर अजूनहि राज्य करीत आहेत. पण त्यांच्या या विस्तीर्ण राज्याचा टीचभर देखील तुकडा मराठी भाषा बोलणाऱ्या देशांत नाही!"

## पुण्यावर आलेली अवकळा

अनुक्रम 95.33

मराठ्यांच्या राजकारणांत मुरलेल्या अशा या पाताळयंत्री ब्रिटिश मुत्सद्याच्या मुठींत १८१७ डिसेंबर ते १८१९ ऑक्टोबरपर्यंत दक्षिणचा कमिशनर आणि १८१९ नोव्हेंबर ते १८२७ नोव्हेंबरपर्यंत मुंबईचा राज्यपाल अशा दोन्ही नात्यांनी सतत नऊ वर्षं महाराष्ट्राचीं राज्यसूत्रें होतीं. या कालावधींत त्याने राज्यकारभाराची व्यवस्था ज्या तत्त्वांनुसार लावून दिली, त्यांत, स्वातंत्र्योत्तर कालांतहि, अजून तरी विशेष फरक पडल्यासारखा दिसत नाही. १८१८ सालच्या मार्चमध्ये दक्षिणचा कमिशनर या नात्याने ज्या वेळीं त्याने पुण्यांत प्रवेश केला, त्या वेळीं पुण्यावर जी अवकळा आलेली त्याच्या दृष्टीस पडली, तिचें वर्णन त्याने स्वतःच असें केलेलें आहे की, "माझा मुक्काम पेशव्यांच्या वाड्यांत असून, मी आता त्यांच्या खलबतखान्यांत बसलेलों आहे. पुढील कार्यक्रमासंबंधींचा विचार आम्ही येथे बसूनच केला. बाह्यतः पुण्यांत कांही फरक झालेला दिसत नाही. पण, हिंदु राज्याच्या अभावामुळे जी शून्यता निर्माण झालेली आहे, तिचा परिणाम मात्र सर्वत्र झालेला जाणवतो. पुण्याविषयीचा आमचा आदर गेला आणि हा बदलहि अगदी भयाण वाटतो. आम्हांलासुद्धा जर हा फरक इतका जाणवतो, तर इथल्या लोकांना तो किती जाणवत असेल!" इंग्रजांच्या लष्करी सामर्थ्याचा वचक बसल्याकारणाने पुणें जरी आता शांत झाल्यासारखें भासत होतें, तरी स्वराज्य नष्ट झाल्यामुळे अन्नाला मोताद झालेले हजारो शिपाई आणि कारकून, प्रतिष्ठेला मुकलेले सरदार, जमीनदार, देशमुख आणि पाटील व दाक्षिण्याला आंचवलेले ब्राह्मणादि आश्रितवर्ग यांच्यामध्ये या नव्या विधर्मी आणि विदेशी राजवटीविरुद्ध किती असंतोष धुमसतो आहे, याची जाणीव एल्फिन्स्टनला पुरेपूर होती. या असंतोषाचा स्फोट लवकरच झाला. पुण्यांतल्या सर्व गोऱ्यांची कत्तल करावी, सभोवतालचे सारे किल्ले काबीज करावे आणि सातारच्या छत्रपतीला ताब्यांत घेऊन स्वराज्याची द्वाही पुकारावी, असा कट 'पुण्याच्या ब्राह्मणां'नी रचिला होता. पण, पुण्यांत या वेळीं फितूर आणि पेंढार हें इतकें कांही फोफावलेलें होतें की, अशा प्रकारची कोणतीहि मसलत गुप्त राहण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे, या बनावाचा सुगावा वेळींच लागून एल्फिन्स्टनने, न्यायनिवाड्याचा घोळ घालीत न बसतां, त्याच्या प्रवर्तकांना तडकाफडकी तोफेच्या तोंडीं

दिलें. मुंबईचा तत्कालीन राज्यपाल सर इव्हॅन नेपिअन हा, बंडखोरांना माफी देण्याची विनंती वरिष्ठ सरकारला करावी, अशा मताचा होता. पण एल्फिन्स्टनने स्वतःच्या जबाबदारीवर केवळ संशयावरून पकडलेल्या व्यक्तींना ही पेशवाईंत प्रचलित असलेली अघोर शिक्षा दिली. या आपल्या अमानुष कृत्याची तरफदारी करतांना त्याने असें म्हटलें आहे की, "देहान्त शिक्षेच्या अंमलबजावणीच्या या पद्धतींत दोन बिनतोड तत्त्वें सांठविलेलीं आहेत: एक, तिच्यामुळे गुन्हेगाराला यत्किंचित्हि यातना होत नाहीत आणि दुसरें, ती पाहणाराला दहशत बसते." या प्रसंगानंतर त्याच्या पुढील नऊ वर्षांच्या कारकीर्दींत मुंबई प्रांतांत पुन्हा चिटपाखरूंहि हललें नाही. कारण, ब्रिटिश सार्वभौम सत्तेला लोकप्रियतेचें अधिष्ठान प्राप्त करून देण्याच्या एकमेव उद्देशानेच, त्याने आपला राज्यकारभार, लोकाराधनेच्या धोरणाने, चालविला. दक्षिणचा कमिशनर या नात्यानें वरिष्ठ सरकारला सादर केलेल्या प्रतिवृत्तांत त्याने असा अभिप्राय व्यक्त केला होता की, "आमच्या अधिकाऱ्यांनी, कामाव्यतिरिक्त, एतद्देशीयांना वारंवार भेटी दिल्या पाहिजेत. अशा रीतीनें एतद्देशीयांशीं संबंध ठेवणें हें केवळ कर्तव्य म्हणूनच नव्हे, तर सुराज्याच्या दृष्टीनेहि कारभाराच्या तपशिलांत मन घालण्या-इतकेंच उपयुक्त आहे." आपला जुना सहकारी एडवर्ड स्ट्रॅची याला पाठविलेल्या पत्रांत तर त्याने असे उद्गार काढले होते की, "लोकांना केवळ चांगले कायदे, किंबहुना चांगलीं न्यायालयें देऊनच भागत नाही; तर त्यांना तुम्ही सहानुभूतीने आपल्या बरोबर घेऊन चाललें पाहिजे. आणि अशी सहानुभूति त्यांच्या भावनांशीं समरस झाल्यानेच उत्पन्न होऊं शकते." विदेशी आणि विधर्मी असा विजेता म्हणूनच महाराष्ट्रांतील जनतेपुढे एल्फिन्स्टन या वेळीं उभा होता; व नुकत्याच पराभूत आणि परागंदा झालेल्या स्वदेशी राज्यकर्त्यांपेक्षा आपण हर एक बाबतींत श्रेष्ठ आहोंत, हें स्वतःच्या वैशिष्ट्याने सिद्ध करून दाखवूनच त्याला आपलें वजन आणि वर्चस्व हीं दोन्ही भांबावलेल्या मराठी जनमनावर बसवावयाचीं होतीं. म्हणून, दक्षिणच्या कारभाराची जोखीम शिरावर घेतांना त्याने आपल्या डोळ्यांपुढे ठेवलेलीं व्यवहारसूत्रें अशीं होतीं की, "न्याय हा सर्व आदराचा किंबहुना शाश्वत लोकप्रियतेचाहि पाया आहे. प्रकट किंवा गर्भित अभिवचनें

देण्याचें टाळणें हा मुख्य नियम असला पाहिजे. दुसरा स्थूल नियम असा की, लोकप्रियता मिळविण्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्न न करितां, व्यासंग आणि योग्य वागणूक यांच्या जोरावर लोकांचा आदर संपादन केला पाहिजे." या सूत्रांनुसार त्याचें स्वतःचें वर्तन होतें. "तो रोज सकाळीं उघड्यावर नास्ता करावयाला बसे आणि आपल्याशीं बोलावयाची इच्छा असलेला एकादा जरी मनुष्य थांबलेला दिसला, तरी त्याला भेटल्याविना तो उठत नसे. त्यानंतर तो जो अदृश्य होई, तो मग आपल्या परिवाराच्याच फक्त दृष्टीस पडे!" नव्या परकीय राज्यकर्त्यांचा अंमल आपल्यावर सुरू झाला आहे, याची जाणीव जनतेस होऊं नये म्हणून तो जसा मर्यादा राखून लोकांत मिसळे आणि मराठी भाषेंतूनच सारे व्यवहार करी, त्याचप्रमाणें राज्यक्रांतीमुळे झालेला बदल जनतेच्या मनाला कोणत्याहि प्रकारें बोचूं नये म्हणून त्यानें जुनी पंचायतपद्धति चालू ठेवली, अदालतींत फारशीऐवजीं मराठी आणि गुजराती भाषा जारी केल्या व न्यायदान आणि करआकारणी या दोन्ही बाबतींत कोणताहि नवा उपक्रम करूं नये, अशी ताकीद कलेक्टरांना दिली. आपल्या सूचनापत्रांत असा स्पष्ट इशारा त्याने अधिकारीवर्गाला दिला होता की, "जुनी देशी पद्धति कायम ठेवा, पीक प्रत्यक्ष पाहून सारा ठरवा, सारा अगदी माफक ठेवा, नवे कर बसवूं नका आणि जुने कर उघड उघड जुलमी असल्याशिवाय रद्द करूं नका. मुख्यतः कोणताहि नवा उपक्रम करूं नका." पेशवाईच्या शेवटल्या काळांतील बाजीरावी आणि सर्जेरावी भ्रष्टाचार आणि बेबंदशाही यांनी त्रस्त होऊन गेलेल्या महाराष्ट्रांतील जनतेला एल्फिन्स्टनच्या या सौम्य, सावध, प्रजारंजक धोरणामुळे इंग्रजी राज्य हें जर 'ईश्वरी वरदान' वाटलें असलें आणि तिने जर त्याच्यावर स्तुतिसुमनें उधळलीं असलीं, तर त्यांत काय आश्चर्य ?

एल्फिन्स्टनच्या राज्यनीतींतील दाक्षिण्य आणि दूरदृष्टि जर कुठें उत्तम रीतीने प्रत्ययाला येत असेल, तर ती त्याच्या शैक्षणिक धोरणांत. महाराष्ट्रांत ब्रिटिश सार्वभौम सत्ता स्थापन झाल्यावर दोन महनीय प्रश्न या नव्या परकीय राज्यकर्त्यांपुढे उभे राहिले: एक, या देशांतील लोकांना राज्यकारभारांत भाग घेण्याची संधि कोणत्या धोरणाने आणि किती मर्यादेपर्यंत द्यावी ? व दुसरें, त्यांना जें शिक्षण द्यावयाचें, तें त्यांच्या जुन्या परंपरागत

पद्धतीने की नव्या पाश्चात्य पद्धतीने? हे दोन्ही प्रश्न परस्परसंलग्न होते. कारण हिंदी लोकांना राज्यकारभारांत भाग घेण्याची पात्रता ही नवीन शिक्षणानेच प्राप्त व्हावयाची होती. १८१९ सालच्या मे मध्ये दक्षिणचा कमिशनर असतांनाच सर जॉन मालकम याला पाठविलेल्या पत्रांत एल्फिन्स्टनने असे उद्‌गार काढलेले आढळतात की, "आज ना उद्या हा सर्व देश आपण आपल्या ताब्यांत घ्यावा, हेंच इष्ट होय. त्यानंतर देशी सैन्यावर जर आपण हुकमत ठेवूं शकलों आणि रशियनांना जर आपण आंत येऊं दिलें नाही, तर आपल्या साम्राज्याला यत्किंचितहि धोका असल्याचें मला दिसत नाही. अर्थात् आपण दिलेल्या शिक्षणाने एतद्देशीय लोक सुसंस्कृत होऊन दोन्ही पक्षांना फारकत इष्ट वाटेपर्यंत !" १८२२ सालीं मद्रासचा तत्कालीन राज्यपाल सर थॉमस मन्रो याला घातलेल्या पत्रांत त्याने आपली या बाबतींतील भूमिका याहिपेक्षा स्पष्ट केली होती. त्या पत्रांत त्याने अशी भीति प्रकट केली होती की, "एतद्देशीय लोकांना आपल्या देशाच्या राज्य-कारभारांत अंशतः तरी भाग घेतां यावा यासाठी आपण मार्ग तयार करणें अवश्य आहे. त्यांना राज्यकारभारांत अंशभागी करण्याचा प्रसंग कदाचित् आणखी पन्नास वर्षे येणार नाही. तथापि, शासन आणि शिक्षण यांची जी पद्धति आपण प्रचलित केली आहे, तिच्यामुळे या देशांतील लोकांत पुढे मागे असें परिवर्तन घडून येईल की, त्यांना कनिष्ठ नोकऱ्यांपाशींच डांबून ठेवणें शक्य होणार नाही. इतकेंच नव्हे, तर त्यांची महत्त्वाकांक्षा आणि कर्तृत्व यांना वाव देण्यासाठी जर आपण आधीच मार्ग मोकळा करून ठेवला नाही, तर असा भडका उडेल की, त्यामुळे आपलें सरकार उलथून पडेल !" पण, हिंदी लोकांना राज्यकारभारांत सामील करून घ्यावयाला ईस्ट इंडिया कंपनीचे उंटावरून शेळ्या हाकूं पाहणारे कृपण डायरेक्टर सहसा कबूल होणार नाहीत, याची त्याला पूर्ण कल्पना होती. म्हणून १८२६ सालीं आपला सहकारी हेन्री एलिस याच्याशीं झालेल्या चर्चेत त्याने अशी सावधगिरीची योजना सुचविली होती की, "दिवाणी अधिकारांसाठी एतद्देशीयांना पद्धतशीर शिक्षण द्यावयाला सुरवात करणें हा आपला पहिला उपक्रम असला पाहिजे. नंतर न्यायखात्यांतील कामाचा मोठा भाग एकदम त्यांच्याकडे सोंपवावा, सामान्यतः त्यांचे पगार वाढवावे व त्यांच्यांतले जे

लोक अतिशय कर्तबगार आणि प्रामाणिक असतील, त्यांना थोडीं वरिष्ठ अधिकारपदें बहाल करावीत. विधानसभेंत त्यांना प्रवेश देण्याचा काळ दूर दिसतो. पण, ज्यांत गुप्त मसलतींचा किंवा अधिकारप्रदानाचा संबंध येत नाही, अशा राजकारणाव्यतिरिक्त इतर सर्व प्रश्नांच्या बाबतींत त्यांचा सल्ला घेण्यांत कांहीहि धोका नाही."

अशा रीतीने, लोकांना शिक्षण देऊन हळुहळू आपल्या देशाच्या कारभारांत भाग घ्यावयाला पात्र करावें, असें जरी एल्फिन्स्टनचें प्रांजळ मत होतें, तरी त्याबरोबरच, नवें पाश्चात्य शिक्षण देतांना जुन्या धार्मिक परंपरेचा धागा तुटतां कामा नये, असाहि त्याचा आग्रह होता. दक्षिणचा कमिशनर या नात्याने शैक्षणिक धोरणासंबंधीं लिहितांना त्याने असा स्पष्ट इषारा दिला होता की, "हिंदु लोकांची सुधारणा करण्याच्या आणि त्यांच्या दुराचरणाला आळा घालण्याच्या कामीं आपण त्यांच्या धर्मसमजुतींची मदत घेणेंच श्रेयस्कर होईल. कारण कायद्यापेक्षा धर्मबंधनें बलवत्तर असतात. त्यांचीं सध्याचीं धर्ममतें कायम राखून आणि शुद्ध करून व त्याबरोबरच त्यांचा सदसद्विवेक जागृत करून, ज्या पूर्णतेच्या दर्जाला त्यांनी यावें, असें आपणा सर्वांनाच वाटतें, त्या दर्जाप्रत त्यांना आपल्याला आणतां येईल. उलट, त्यांच्या धर्मावर जर हल्ला करण्यांत आला, तर तो यशस्वी झाला तरी देखील, तत्त्वतः आज आपल्याला व्यवहारांत प्रत्यक्ष दिसत आहे त्याप्रमाणे, त्यांचा सर्वच धर्माविषयीचा आदर डळमळीत होईल; व अगदी तामसी धर्ममतसुद्धा जे निर्बंध मानवी विकारांवर घालतें, ते उपयुक्त निर्बंध हिंदु लोक झुगारून देतील." सुदैवाने एल्फिन्स्टनच्या या शिक्षण-विषयक विचारांना अनुकूल अशी परिस्थिति या वेळीं नुकतीच निर्माण झाली होती. १८१३ सालपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीपुढे भारतांतील लोकांना शिक्षण देण्याचा प्रश्नच मुळी नव्हता. १७९२ सालीं कंपनीला नवी सनद करून देण्याचा विषय जेव्हा ब्रिटिश पार्लमेंटपुढे आला, तेव्हा पूर्व आशियांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याची तळमळ लागलेला पार्लमेंटचा भूतदयावादी सदस्य विल्यम विल्बरफोर्स याने हिंदी लोकांची उन्नति करण्यासाठी कंपनीच्या खर्चाने शिक्षक आणि मिशनरी भारतांत

पाठविण्याची सूचना आणली. पण, तिला विरोध करितांना कंपनीच्या एका डायरेक्टराने असे उद्गार काढले की, "अमेरिकेंत शाळा आणि कॉलेजें स्थापन करावयाला परवानगी देण्याचा मूर्खपणा केल्यामुळे आपण नुकतीच अमेरिका गमावून बसलों आहोंत. तेव्हा आता भारताच्या बाबतींत आपण त्या चुकीची पुनरावृत्ति करणें योग्य होणार नाही. हिंदी लोकांची कांही शिकण्याची इच्छाच असेल, तर त्यांनी त्यासाठी इंग्लंडला यावें." अर्थात् विल्बरफोर्सची सूचना फेटाळली गेली. पण, त्यानंतर वीस वर्षांनी १८१३ सालीं जेव्हा कंपनीला पुन्हा सनद देण्याचा प्रसंग उद्भवला, तेव्हा विल्बरफोर्सनेहि पुनरपि उचल केली. या वेळीं त्याच्या प्रयत्नांना यश येऊन कंपनीच्या सनदेंत अशा आशयाचें कलम घालण्यांत आलें की, "कंपनीच्या ताब्यांतल्या हिंदुस्थानांतील प्रदेशांतून भाडेपट्टे, महसूल आणि नफा यांच्या रूपाने जें जादा उत्पन्न तिला होईल, त्यांतून लष्करी, मुलकी आणि व्यापारी खात्यांचा खर्च भागविल्यावर व कर्जावरील व्याज ठरलेल्या पद्धतिनुसार चुकतें केल्यावर जी शिल्लक उरेल, तींतून दर वर्षी किमान एक लक्ष रुपये प्राच्य वाङ्मयाचें पुनरुज्जीवन आणि सुधारणा, हिंदी विद्वानांना प्रोत्साहन व हिंदी लोकांत शास्त्रीय ज्ञानाचा प्रारंभ आणि प्रसार या कार्यांवर खर्च करण्यासाठी वेगळे काढून ठेवण्यांत यावेत." या कलमाच्या अंमलबजावणीसंबंधीं बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनी जें तपशीलवार सूचनापत्रक १८१४ सालच्या जूनमध्ये गव्हर्नर-जनरलला पाठविलें, त्यांत हिंदूंच्या परंपरागत पद्धतिप्रमाणेच त्यांना शिक्षण देण्यांत यावें आणि बनारस येथे पंडितांची सभा भरवून शिक्षण-पद्धति निश्चित करावी, असा आदेश दिलेला होता.

## ३

मुंबई प्रांताच्या राज्यपालपदावर आरूढ झाल्यानंतर, या आदेशानुसार, एल्फिन्स्टनने आपलें शैक्षणिक धोरण हळुहळू अंमलांत आणलें. ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांना १८२३ सालीं सादर केलेल्या शैक्षणिक योजनेंत त्याने शिक्षणप्रसारार्थ असे उपाय सुचविले होते की,—

"(१) देशी शाळांतून सध्या जी शिकविण्याची पद्धत आहे, ती सुधारावी आणि शाळांची संख्या वाढवावी; (२) त्यांना शालोपयोगी पुस्तकांचा पुरवठा करावा; (३) याप्रमाणे शिक्षणाच्या ज्या सोई करून देण्यांत येतील, त्यांचा फायदा घेण्याची इच्छा खालच्या दर्जाच्या लोकांना व्हावी म्हणून त्यांना कांही तरी उत्तेजन देण्यांत यावें; (४) पाश्चात्य विज्ञान शिकविण्यासाठी शाळा काढाव्यात आणि शिक्षणाच्या उच्च शाखांत सुधारणा करावी; (५) देशी भाषांतून पदार्थविज्ञान आणि नीतिशास्त्र यांवर पुस्तकें तयार करवून तीं प्रकाशित करण्याची व्यवस्था करण्यांत यावी; (६) पाश्चात्य संशोधनाचें ज्ञान संपादन करण्याचें साधन आणि अभिजात भाषा म्हणून ज्यांची इंग्रजीचा अभ्यास करण्याकडे प्रवृत्ति असेल, त्यांच्यासाठी इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा काढाव्यात; व (७) या ज्या ज्ञानाच्या शाखा शेवटी सांगितल्या, त्यांचा व्यासंग करण्याच्या कामीं देशी लोकांना प्रोत्साहन द्यावें."

वस्तुतः मुंबई बेट हें १६६८ सालीं ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यांत आलें; व तेव्हांपासून तें कंपनीच्या पश्चिम भारतांतील व्यापारी आणि राजकीय हालचालींचें केंद्र होऊन बसल्यामुळे, तिच्या वर्धिष्णु सत्तेबरोबरच त्या बेटाचीहि सारखी वाढ होत गेली. पण, आश्चर्याची गोष्ट अशी की, मुंबई शहरांत इंग्रजी अंमल सुरू झाल्याला जरी आता दीडशे वर्षें होऊन गेलेलीं होतीं आणि इंग्रजी वर्तमानपत्रें निघाल्यालाहि जरी आता तीस वर्षें होत आलेलीं होतीं, तरी इंग्रजीचें आणि त्याबरोबरच नव्या भौतिक विद्यांचें शिक्षण लोकांना देण्याची कांहीहि सोय अद्याप सरकारकडून करण्यांत आलेली नव्हती. इतकेंच नव्हे, तर ख्रिस्ती मिशनरींना धर्मप्रसार करावयाला परवानगी दिल्यास त्यामुळें आपल्या व्यापारी आणि राजकीय हितसंबंधांवर अनिष्ट परिणाम होतील, या भीतीने कंपनीने त्यांना आपल्या राज्यांत पाय ठेवावयालाहि प्रतिबंध केला होता. म्हणून, भारतांत धर्मप्रसार करण्याच्या निर्धाराने १७९३ सालीं आलेल्या डॉ. विल्यम कॅरे प्रभृति ब्रिटिश मिशनरींना, कलकत्यानजीक मदनवटी येथें १७९८ सालीं स्थापन केलेलें आपलें मिशन आणि मुद्रणालय हीं दोन्हीहि तेथून हलवून, कलकत्याच्या उत्तरेस पंधरा मैलांवर असलेल्या श्रीरामपूर

या डॅनिश वसाहतींत न्यावीं लागलीं. डॉ. कॅरे याने श्रीरामपूर मिशनच्या पदरीं असलेला महाराष्ट्रीय पंडित वैजनाथ याच्या मदतीने १८०५ सालच्या मार्चमध्ये जें 'मराठी भाषेचें व्याकरण' (Grammar of the Mahratta Language) देवनागरी लिपींत छापून प्रसिद्ध केलें, तेंच सध्या तरी मराठींतील पहिलें मुद्रित पुस्तक समजलें पाहिजे. फादर थॉमस स्टीफन्स याचें 'ख्रिस्तपुराण' हें 'दोव्त्रिना क्रिस्तँा' (Doutrina Cristam) या नांवानें ता. २९ एप्रिल १६१६ रोजीं गोमंतकांत रायतूर येथील 'लिहितमंडपीं ठासून' प्रकाशित करण्यांत आलेलें होतें, ही गोष्ट खरी. पण, या पुराणाची भाषा जरी मराठी होती, तरी तें रोमन लिपींत छापण्यांत आलेलें असल्याकारणाने, हा मुद्रणसंस्कार मराठी भाषेला घडला, असें म्हणणें अर्थातच योग्य होणार नाही. त्यामुळे, डॉ. कॅरे याचें देवनागरी लिपींत छापलेलें मराठी भाषेचें व्याकरण आणि त्याबरोबरच त्याच वर्षी मोडी लिपींत छापलेलें सेंट मॅथ्यूचें शुभवर्तमान या दोन पुस्तकांनाच तूर्त मराठींतील पहिलीं मुद्रित पुस्तकें म्हणणें भाग आहे. यानंतर जीं आणखी नऊ मराठी पुस्तकें श्रीरामपूर मिशनने प्रकाशित केलीं, तीं सर्वच मोडी लिपींत छापलेलीं होतीं, असें दिसतें. कारण, मोडी हीच महाराष्ट्रांतील सर्वसामान्य जनतेची व्यवहार-लिपि आहे, असा डॉ. कॅरे याचा समज होता. आपल्या मराठी व्याकरणाच्या प्रारंभीं त्याने यासंबंधीं असा खुलासा केलेला आहे की, "मराठी भाषेंतील पुस्तकें हीं बहुतेक देवनागरी लिपींत लिहिण्यांत येतात. पण कामाकाजाच्या व्यवहारांत मात्र सामान्यत: मोडी (Moorh) लिपीच वापरण्यांत येते. मोडी आणि देवनागरी यांची वर्णमाला सारखीच आहे; मोडी लिपीच्या मुद्रा अद्याप बंगालमध्ये पाडण्यांत आलेल्या नसल्यामुळे या ग्रंथांत देवनागरी लिपीचा उपयोग करण्यांत येत आहे." श्रीरामपूर मिशनने जें हें आधुनिक आद्य मराठी गद्य निर्माण केलें, त्याच्या भाषेचें वळण अस्सल नागपुरी होतें. कारण, डॉ. कॅरे याचा मराठी ग्रंथरचनेच्या या कार्यातील मुख्य सहाय्यक वैजनाथ शिवराम कानफाडे हा मूळचा नागपूरचा होता. वॉरन हेस्टिंग्ज याच्या कलकत्ता येथील दरबारीं असलेला नागपूरकर भोंसल्यांचा वकील वेणीराम पंडित याचा वैजनाथ पंडित हा मदतनीस.

पण, त्याचे अनेक पौर्वात्य भाषांतील प्रावीण्य पाहून वेलस्लीने त्याला, आपल्या फोर्ट विल्यम येथील कॉलेजांत, डॉ. कॅरे याच्या जोडीला मराठीचा प्राध्यापक म्हणून घेतलें. डॉ. कॅरे याने आपल्या ग्रंथांतून त्याचा निर्देश "फोर्ट विल्यम कॉलेजांतील मराठीचा मुख्य पंडित" अशा शब्दांनी केलेला असून, त्याच्या मराठी भाषेंतील पांडित्याचीहि प्रशंसा मुक्तकंठाने केली असल्याचें दृष्टीस पडतें. तो त्याचा नामोल्लेख केव्हा 'विद्यानाथ', केव्हां 'विद्युनाथ' तर केव्हा 'वैजनाथ' असा करतो! स्वतः वैजनाथ पंडिताने 'राजा प्रतापादित्याचें चरित्र' या आपल्या ग्रंथांत आपला असा उल्लेख केलेला आहे की, "संप्रती सर्वांपूर्वीं या देशांत प्रतापादित्य नांवाचे एक राजे झाले होतेत् त्याहांचा विस्तार फारसी भाषेंत थोडासा वर्णिला आहे पण सांगोपांग हरपीं समस्त नाहीं याकरितां त्याहांचे चरित्राची वर्णूक वंग भाषेंत यथा कथंचित् आहे त्यास प्रणाली शुद्ध करून महाराष्ट्री भाषेंत् कानफाडोपनामक वैजनाथ शिवरामानें कालेज कौंसलांत् घ्यायाकारणे आणि साहेबलोकांचे प्रीतिप्राप्तीनिमित्त रचना केली असे." वेणीराम पंडिताने ज्याप्रमाणे वॉरन हेस्टिंग्जच्या फौजेला 'मेजवानी करून बहुत स्नेहानें कटकेचे वाटेनें जाऊं दिले' आणि 'बडे साहेबांची खुषी संपादन करून' वीस हजार रुपयांचें इनाम या फितुरीच्या कृत्याबद्दल त्याच्याकडून हबकलें, त्याप्रमाणे त्याचा आश्रित वैजनाथ पंडित यानेहि, डॉ. कॅरे याला ख्रिस्ती धर्मशास्त्र भारतीय भाषांतून अनुवादित करण्याच्या कामीं परोपरीने सहाय्य करून आणि फोर्ट विल्यम कॉलेजांतील कंपनीच्या गोऱ्या तरुण अधिकाऱ्यांना भारतीय भाषा शिकवून, 'साहेब लोकांची परम लाभदायक प्रीति' प्राप्त करून घेतली! श्रीरामपूर मिशनने प्रसिद्ध केलेल्या या मराठी पुस्तकांचा प्रसार कंपनीच्या सैन्यामार्फत नागपूर–कामठीपर्यंत झालेला होता, असें तत्कालीन पत्रव्यवहारावरून कळतें.

यानंतर बरोबर एक तपाने म्हणजे १८१७ सालीं अमेरिकन मिशनरींनी, मुंबईस 'मात्थीउक्त शुभवर्तमान' प्रसिद्ध करून, धर्मप्रसाराच्या कार्याला प्रारंभ केला. मुंबई येथे मुद्रित झालेलें हेंच बहुधा पहिलें मराठी पुस्तक असावें. १८१३ सालीं ईस्ट इंडिया कंपनीला मिळालेल्या सनदेंत

कंपनीच्या राज्यांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करावयाला मोकळीक देणारें जें कलम घालण्यांत आलेलें होते, त्याचा फायदा घेऊन १८१३ सालच्या फेब्रुवारींत गॉर्डन हॉल आणि सॅम्युएल नॉट हे दोघे अमेरिकन मिशनरी कलकत्त्याहून मुंबईस येऊन पोचले; व त्यांनी १८१६ सालीं होरॅशो बार्डवेल याच्या मदतीने छापखाना काढून बायबलचें मराठी भाषांतर छापावयाला सुरुवात केली. मुंबईचा तत्कालीन राज्यपाल सर इव्हॅन नेपियन याने त्यांना या धर्मप्रसाराच्या कार्यांत सक्रिय प्रोत्साहन दिलें. मुंबई शहरांत या वेळीं एकहि सरकारी प्राथमिक शाळा नव्हती. या मिशनरींनीं चार वर्षांत मराठी आणि गुजराती शिक्षण देणाऱ्या सहा शाळा काढल्या. या शाळांत सर्व धर्मीचीं आणि जातींचीं सुमारे आठशें मुलें शिक्षण घेऊं लागलीं. वस्तुत: १८१५ सालीं मुंबई येथें सरकार आणि लोक यांच्या सहकार्याने 'दी बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' स्थापन करण्यांत आली होती. पण, या सोसायटीचा उद्देश युरोपियन सैनिक, नाविक आणि अधिकारी यांच्यापासून एतद्देशीय स्त्रियांना झालेल्या अनौरस संततीला इंग्रजी शिक्षण देण्याचाच मुख्यत: असल्यामुळे, गोऱ्या लोकांच्या लेकवळ्यांसाठी काढलेल्या या सोसायटीच्या शाळांत आपलीं मुलें पाठविणें हें मुंबईच्या नागरिकांना अर्थातच प्रशस्त वाटेना. म्हणून मिशनरींनी स्वतंत्र इंग्रजी शाळाहि मुद्दाम काढल्या; व इंग्रजीचा प्रसार करण्यासाठी सुबोध पुस्तकेंहि प्रकाशित केलीं. 'ख्रैस्त शक' १८१८ मध्ये मुंबईंतील 'प्रेषित' छापखान्यांत छापलेलें 'इंग्लिश भाषणाचें ज्ञान मिळवायासाठी शीघ्र आणि सोपा उपाय' हें पुस्तक, या दृष्टीने, उल्लेखनीय आहे. "ह्या देशांत जे इंग्लिश भाषण आणि विद्या शिकायास इच्छितात त्यांचे हितासाठी नेमला" असें या पुस्तकाचें वर्णन त्याच्या मुखपृष्ठावर केलेलें असून, "जिहोवाचें भय हें ज्ञानाचें मूळ आहे आणि पापापासून फिरणें ही बुद्धी आहे" या बायबलांतील सुभाषिताप्रमाणेच, "सर्व द्रव्येषु विद्यैव वित्तमाहुरनुत्तमं" हें संस्कृत सुभाषितहि दिलेलें आहे. कोणत्याहि भाषेचा पद्धतशीर व्यासंग आणि विकास करावयाला व्याकरण आणि कोश हीं दोन अगदी प्राथमिक साधनें अत्यंत आवश्यक असतात. ही गोष्ट लक्षांत घेऊन श्रीरामपूर आणि मुंबई या दोन्ही ठिकाणच्या मिशनरींनी, बायबलच्या भाषांतराइतक्याच अगत्यानें, देशी भाषांचीं व्याकरणें आणि

कोश तयार करण्याचें काम हातीं घेतलें. डॉ. कॅरे याने तर भारतांतील आणि आशिया खंडांतील मिळून एकंदर चाळीस भाषांत बायबलचा अनुवाद केला; व त्याबरोबरच बहुतेक प्रमुख भाषांचीं व्याकरणेंहि रचिलीं. 'मात्थीउक्त शुभवर्तमान' हें बायबलच्या भाषांतराचें पहिलें मराठी पुस्तक तयार करतांना आपण घेतलेल्या परिश्रमांचें हॉलनें असें वर्णन केलें आहे की, "आम्ही केलेलें भाषांतर अतिशय सदोष आहे, याची आम्हांला पूर्ण जाणीव होती. म्हणून धर्मोपदेश करण्यासाठी ज्या वेळीं आम्ही हिंडत असूं, त्या वेळीं हीं भाषांतरें लोकांना वाचून दाखवून, आम्ही त्यांच्याकडून तीं दुरुस्त करवून घेत असूं. अशा रीतीने बायबलच्या संपूर्ण भाषांतराचें काम आम्ही तडीस नेलें." १८२० सालच्या सुमारास मुंबईंतील बहुतेक प्राथमिक शाळांतून बायबलच्या या मराठी भाषांतराचा प्रसार झालेला होता, असें रा. ब. दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रांतील उल्लेखावरून दिसतें.

एल्फिन्स्टननेहि प्रथम मिशनरींच्या मदतीने शिक्षणप्रसाराचा उपक्रम करण्याचा प्रयत्न केला; व १८२० सालीं, त्यानें 'दी बॉंबे एज्युकेशन सोसायटी'च्या विद्यमाने, 'दी नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक कमिटी' स्थापन केली. पण हा उपक्रम लोकप्रिय होण्याचें लक्षण त्याला दिसेना. कारण, शिक्षणप्रसाराच्या बाबतींत मिशनरींचा कटाक्ष सर्वथैव धर्मांतरावर असल्यामुळे, त्यांच्या देखरेखीखालीं निघालेल्या शाळांतून आपलीं मुलें पाठवावयाला लोक साहजिकच फारसे धजेनात. मिशनरी हे शिक्षणाकडे केवळ धर्मांतराचें एक साधन म्हणून पाहत होते; तर पेशव्यांकडून जिंकून घेतलेल्या विस्तीर्ण प्रदेशाचा जो मुंबई प्रांत आता बनविण्यांत आलेला होता, त्याचा कारभार चालवावयाला पात्र असा मुलकी आणि सनदी नोकरवर्ग त्या प्रांतांतूनच निर्माण करण्याचा प्रश्न एल्फिन्स्टनपुढे प्रामुख्याने होता. त्यामुळे, राज्यकारभार, नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्या, नव्या भौतिक विद्या आणि ब्रिटिश संस्कृति यांचें ज्ञान सुलभ आणि शीघ्र पद्धतीनें देऊन नव्या राजवटींतील निरनिराळ्या प्रकारचीं दुय्यम कामें हातीं घ्यावयाला मुंबई प्रांतांतील लोकांना तयार करणें, हें त्याच्या शैक्षणिक धोरणाचें प्रधान अंग होतें. म्हणून, त्याने ता. २१ ऑगस्ट १८२२ रोजीं, जगन्नाथ

शंकरशेठ, जमशेटजी जिजीभाई, फ्रामजी कावसजी, धाकजी दादाजी, महमद इब्राहिम मकबा प्रभृति मुंबईंतील तत्कालीन थोर नागरिकांच्या सल्ल्याने, 'दी बॉम्बे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी' ही स्वतंत्र संस्था स्थापन केली. तिच्या सल्लागार मंडळांत बारा युरोपियन आणि बारा देशी सदस्य होते. या बारा देशी सदस्यांत हिंदु, पारशी आणि मुसलमान यांचें जें प्रमाण त्याने ठेवलें, तें ब्रिटिशांच्या भेदनीतीचें तंत्र त्यांच्या राज्यकारभारांत अगदी प्रारंभापासूनच कसें काटेकोरपणाने अंमलांत आणलें जात होतें, याचें एक प्रत्यंतर म्हणून सांगतां येईल. सोसायटीचें मराठी नामकरण 'मुंबईची हिंद शाळा आणि शाळापुस्तक-मंडळी' असें करण्यांत आलें ! तिचे मुख्य युरोपियन सेक्रेटरी कॅप्टन जॉर्ज जर्व्हिस आणि साहाय्यक नेटिव्ह सेक्रेटरी सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे हे होते. या मंडळीने ता. ८ 'आप्रिल' १८२५ रोजीं " ग्रंथांचीं भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणारांस बक्षिसाविषयींचें " जें 'प्रसिध्दिपत्र' काढलें, त्यांतील महत्त्वाचीं कलमें अशीं होतीं की,—

" (१) ही मंडळी सर्वांस विदित करत्ये की, जो कोणी बाळबोध ग्रंथ अथवा प्रौढ ग्रंथ यांचीं मराठी किंवा गुजराथी बोलींत चांगलीं भाषांतरें करून आणील अथवा या दोहों भाषांत मान्य पडे असा आपल्ये कल्पनेने नवीन ग्रंथ रचील किंवा पुढे सांगितले प्रकाराचे ग्रंथ हिंदुस्थानी भाषेंत करील त्यास बक्षीस देण्या विषयी गवरनर कौशल यांहीं उदार होऊन या मंडळीस समर्थ केलें आहे.

(२) बक्षीस देण्याचा प्रकार असा आहे कीं, बाळबोध ग्रंथांचीं भाषांतरें करणारांस अथवा नवीन बाळबोध ग्रंथांचे करणारांस शंभर रुपयां पासून चारशे रुपये पर्यंत प्रतिपुस्तकीं बक्षीस मिळेल आणि प्रौढ ग्रंथांचीं भाषांतरें करणारांस अथवा नवीन प्रौढ ग्रंथांचे करणारांस दोन हजार रुपयांपासून पांच हजार रुपये पर्यंत बक्षीस मिळेल.

(६) भाषांतर करावयासाठी जीं पुस्तकें व नवीन ग्रंथ करावयासाठी जे विषय नेमिले आहेत त्यांवांचून दुसरे ग्रंथ न करावे असा नियम ही मंडळी करीत नाही—तर यामध्ये नेमिले नाहीत—असे ग्रंथ योजून

त्याविषयी जो श्रम घ्यावयास इच्छील–त्याणें ते ग्रंथ या मंडळीस पसंद पडतील किंवा नाही, हें समजावयासाठी अगोधर या मंडळीचे सकत्री म्हणजे आज्ञालेखक यांस त्या पुस्तकांविषयी लिहून पाठवावें: नेमलेल्या पुस्तकांवांचून दुसर्या पुस्तकांची गरज लागल्यास ही मंडळी प्रसिध्धिपत्र लिहून वारंवार प्रकट करील.

(९) जा तिहीं बोल्यांमध्ये ग्रंथांचीं भाषांतरें अथवा नवीन ग्रंथ करायास सांगितले आहेत, त्यांत जी देशभाषा सर्व लोक समजतात ती ग्रंथास घ्यावी–प्रौढ भाषेचे शब्द घालून दाटून अवघड करूं नये–आणि जर त्या भाषेंत हावेत तसे शब्द मिळत नाहींत, तर ते त्यांच्या मूळ भाषेंतून घ्यावे...कदाचित् देशभाषेंत किंवा मूळ भाषेंतही जा अर्थास रूढ अथवा योगिक शब्द लागत नाहींत तेथें इंग्रेजी शब्दहि घेतल्यास चिंता नाहीं.

(१०) या देशांतील लोकांस अगत्य पडून ग्रंथ वाचण्याविषयीं आवड उत्पन्न व्हावी यासाठीं जे ग्रंथ करणारे आहेत त्यांणीं जे उघड उपयोगी पडतील त्या विषयावर ग्रंथ लिहावे असें म्हटलें म्हणून केवळ मनोरंजन हाच जांचा परिणाम असे ग्रंथ करूं नयेत असा या मंडळीचा अभिप्राय नाहीं. तर जर ते निर्दोष असतील तर ही मंडळी त्यांसही पसंद करील."

या 'प्रसिध्धिपत्रां'तील आदेशानुसार या मंडळीने १८३५ सालपर्यंत म्हणजे सुमारें दहा वर्षें शालोपयोगी विविध ग्रंथ निर्माण करण्याचें कार्य मोठ्या दक्षतेने केलें. ता. ७ मार्च १८३५ रोजीं इंग्रजी ही भारताची राजभाषा आणि सर्व शिक्षणाचें माध्यम करण्यांत आल्यामुळे अर्थातच या मंडळीच्या कार्याला पुढे फारसा वाव उरला नाही. १८२२ पासून १८४० पर्यंत या मंडळीची 'दी बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' (१८२७) 'दी एलिफन्स्टन नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिटयूशन' (१८३७) आणि 'दी बोर्ड ऑफ एज्युकेशन' (१८४०) अशीं जीं नामांतरें आणि रूपांतरें होत गेलीं, तीं मुंबई प्रांतांतील शैक्षणिक प्रगति आणि परिवर्तन यांची निदर्शक आहेत. एलिफन्स्टनने नवीन ग्रंथांचें लेखन, प्रकाशन, प्रोत्साहन, पुरस्कार वगैरेंसाठी म्हणून या मंडळीला पांच हजार पौंड म्हणजे सुमारे पन्नास हजार रुपये एवढी भरीव मदत सरकारकडून देवविली. १८२६ ते १८३० पर्यंत पहिल्या

पांच वर्षांत या मंडळीने ग्रंथोत्तेजनार्थ १,२९,९२३ रु. खर्च केले, या एकाच गोष्टीवरून अव्वल इंग्रजी अमदानींतील शैक्षणिक मन्वंतराच्या या पर्वणींत देशी ग्रंथकारांना किती सढळ हाताने खैरात झाली असावी, याची कल्पना येईल! याशिवाय कॅप्टन जेम्स मोल्स्वर्थ आणि लेफ्टनंट थॉमस कँडी यांच्या नेतृत्वाखाली पंडितमंडळाने जो 'महाराष्ट्र भाषेचा कोश' तयार केला, त्याचा खर्च आगळाच !!

## ४

१८२० सालीं बाँबे एज्युकेशन सोसायटी अस्तित्वांत आल्यापासून तों १८४० सालीं बोर्ड ऑफ एज्युकेशन स्थापन होऊन शिक्षणाचें इंग्रजी माध्यम अंमलांत येईपर्यंत जो वीस वर्षांचा कालखंड होऊन गेला, त्यांत जर्व्हिस, मोल्स्वर्थ, कँडीबंधु, केनेडी, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर, जगन्नाथ-शास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे, बापू छत्रे, गंगाधरशास्त्री फडके, मॅनवारिंग, मॅकलेनन, हरि केशवजी, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, नाना नारायण प्रभृति पाश्चात्य आणि महाराष्ट्रीय लेखकांनी सर्व प्रकारचें शालोपयोगी वाङ्मय निर्माण करून एका परीने महाराष्ट्रांतील शिक्षण-पद्धतीचा पाया घातला. हैंद शाळापुस्तकमंडळीच्या 'प्रसिध्दिपत्रकां'त अशीं तीन सूत्रें होतीं की, "(१) परस्पर इरेस पडून एक ग्रंथ अनेकांनी करावा हें या मंडळीस बरें आहे; (२) इरेनें एक्या प्रकरणीं दोघे चौघे ग्रंथ करावयास सिध्द होतील, तर त्या सर्वांस तें वर्तमान कळवून सकत्री योग्य अवधी नेमून देतील त्या अवधीस ग्रंथ आणिले असतां परीक्षा होऊन ज्याचा उत्तम ठरेल त्यास बक्षीस मिळेल; आणि (३) इंग्रेजी भाषेच्या पुस्तकांचें भाषांतर जे करितील त्यांहीं...या देशांतील लोकांचे चालीस व समजुतीस जसें नीट येईल, तसें कोठे कोठे मूळ ग्रंथ थोडा थोडा फिरवून अर्थ संपूर्ण येईल असें केलें पाहिजे." हीं सूत्रें डोळ्यांपुढे ठेवून या काळांत 'लिपिधारे' पासून तों 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवादा' पर्यंत नाना विषयांवरील ज्ञानदायक लहान मोठे ग्रंथ या लेखकांनी तयार केले.

भाषेचें ज्ञान यांच्या प्रमाणें संपादन केलें नाही; म्हटलें असतां सदाशिवापेक्षा त्यांस ही भाषा शिकण्याच्या अधिक सोया होत्या. इतर ज्ञातीपेक्षा ब्राह्मण यांची बुद्धिमत्ता व उद्योगीपणा विशेष हें यांच्या उदाहरणा वरून स्पष्ट दिसून येतें. यांणी या परदेशी भाषेचें इतकें सूक्ष्म व शुद्ध ज्ञान केवळ आपल्या बुद्धिकौशल्याने व श्रमानेच संपादन केलें यांत अगदी संशय नाही. म्हणोन हे विशेषे करून आता आपल्या स्तुतीस पात्र होत. मीं इंग्लिश स्कुलांत असतां हे गृहस्थ आमच्या वर्गांत केव्हा केव्हा स्वसंतोषाने येऊन आम्हांस इंग्लिश पुस्तकांचा मराठींत अर्थ समजावून देत असत ..... प्रसिद्ध बाळ गंगाधर शास्त्री हे यांचेच विद्यार्थी. मला पक्कें माहित आहे, कि बाळशास्त्री हे त्या काळीं अल्पवयी असतांहि त्यांस त्यांचे विद्वत्तेवरून इतर सर्व लोक बाळशास्त्री बाबा म्हणोन हाका मारीत आणि हे सदाशिव त्यांस बाळू असे एकेरी शब्दाने हाका मारीत असत. बाळ शास्त्र्यांचे तीर्थरूप गंगाधर शास्त्री जांभेकर हे यांजकडेस आश्रिताप्रमाणें असत. यांहीं आपला मुलगा येथें आणल्या वर बापू छत्र्यें ( सदाशिवांचें घरगुती प्रसिद्ध नाम ) यांणीं त्यांस आपल्या जवळ ठेवून त्यांजकडून इंग्लिश भाषेचा अभ्यास करविला. बाळशास्त्र्यांनी पुष्कळदा सांगितलें, कि " मला 'जॉन्सन्स रँबलर' पर्यंत ग्रंथ त्यांणी घरीं समजावून सांगितले." असा त्यांचा ते मोठा उपकार स्मरून असत. सदाशिव काशीनाथ यांणीं सन १८२९ च्या सुमारास पेनशन घेतल्या वर सुमारें एक दीड वर्षांतच ते निवर्तले. लोकोपकारा विषयींच्या त्यांच्या सर्व इच्छा त्यांच्या मनांत तशाच राहून गेल्या.

याच सुमारास हरि केशवजी यांणी 'मिसेस मार्सेट्स कॉन्व्हर्सेशन्स ऑफ नॅचरल फिलॉसॉफी' या इंग्लिश ग्रंथाचें मराठींत फार सरस भाषांतर केलें, तें बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी या मंडळीने त्यास बक्षीस देऊन तें आपल्या खर्चाने शिलाछापा वर छापिलें .... यांची मराठी लिहिण्याची इतकी खुबी होती की हा ग्रंथ इंग्लिश ग्रंथाचें भाषांतर असतांहि तसें त्या वेळेस कोणास वाटलें नाही ....

मुंबई शहराला कुलाबा जिल्ह्यांतील अष्टागर हा भाग अगदी जवळ; व मुंबईहून पुण्याला जाण्याचा जुना रस्ताहि याच जिल्ह्यांतून जात असे. त्यामुळे जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके, बाळकृष्णशास्त्री सोवनी, बापूशास्त्री शुक्ल, नारायणशास्त्री जोशी प्रभृति या भागांतील पंडितांनी शालोपयोगी वाङ्मय उत्पन्न करण्याच्या या कार्यांत प्रामुख्याने भाग घेतलेला दिसतो. तथापि, बापू छत्रे, हरि केशवजी, बाळशास्त्री जांभेकर आणि दादोबा पांडुरंग हे या कालावधींतील चार अग्रगण्य लेखक म्हणतां येतील. स्वत: दादोबांनीच आपल्या आत्मचरित्रांत या आघाडीच्या समकालीन लेखकांचें असें मार्मिक वर्णन केलेलें आहे की, —

" सन १८२९ सांत सदाशिव काशीनाथ छत्र्ये यांही पेनशन घेतल्या वर त्यांच्या मनांत उपयोगी इंग्लिश ग्रंथांचीं मराठी भाषांतरें लोकोपकारार्थ करून आपल्या आयुष्याचा सद्व्यय करावा असें होतें. या करतां त्यांणी एकांत वासासाठी वाळुकेश्वरीं एक स्वतांची धर्मशाळा घेतली आणि तेथे एक छापखाना ठेवावा, असाहि त्यांचा विचार होता. या गृहस्थांनी पूर्वी मी मराठी शाळेंत असतां ' एसॉप्स फेबलस ' ( इसापनीतिकथा ) आणि ' बर्क्विन्स चिल्ड्रेन्स फ्रेंड ' या ग्रंथाचें बाळमित्र या नांवाचें भाषांतर केलें होते. व ते त्यांचे ग्रंथ पुष्कळ वर्षे पर्यंत सर्व मराठी शाळांत चालू होते. हे दोन्ही ग्रंथ फार सुरस झाले होते. तीं भाषांतरें असें त्या वेळेस कोणास वाटत नसे. मराठींत सरस रीतीनें फक्कींत लिहिणारे हेच पहिले. त्यांच्यामागून आम्ही सर्व लिहिणारे झालों. त्या काळीं सदाशिव काशीनाथा प्रमाणे इंग्लिश भाषा जाणणारे या मुंबई इलाख्यांत एतद्देशीय लोकां मध्ये कोणीच नव्हते. याहीं कोठून कसें या भाषांचें ज्ञान संपादन केलें, हें बराबर समजत नाही. हे जातीचे कोकणस्थ ब्राम्हण असून मुंबईचे राहणारे होते. या मुंबईंत वाळुकेश्वरीं या छत्र्यांची कांही वृत्ति अद्यापि आहे. त्या कुळांतले हे गृहस्थ होते. पुढे येथे इंजिनेराच्या ऑफिसांत हे रैटर होते. परंतु त्या काळीं अशा परभु, शेणवी आदिकरून जातीच्या इंग्लिश रैटरांनी सारी मुंबई व सुरत भरली होती व सदाशिवापेक्षा हे लोक इंग्लिशांच्या अंमलांत मोठ्या बढत्या अवस्थेंत होते. तथापि त्यांतून एकानेहि इंग्लिश

हे हरि केशवजी पांचकळशी म्हणजे सुतार जातीचे गृहस्थ मुंबईचे राहणारे होते. जसे परभु आपणांस क्षत्रिय म्हणवितात, असे हेहि आपणांस सोमवंशी क्षत्रिय म्हणवितात. परंतु हे लोक सुतारपणाचा धंदा करून व शेतीवाडी करून गरीबीच्या हालांत असत, म्हणोन उघड रीतीनें आपल्यास क्षत्रिय म्हणवत नसत.... हरि केशवजी हे या जातीचे असतांहि त्यांणीं आपल्या श्रमानें विद्या व लौकिक मिळविला. ते कोणतेहि सरकारी शाळेंत जाऊन शिकले नव्हते. परंतु सुमारे १८२० साच्या सालीं येथे पहिल्याने अमेरिकन मिशनरी आले, त्यांत रे. केनीसाहेब यांणी आपला बंगला गिरगावांत घेतला होता त्यांज कडेस हरि केशवजी हे जावूं येवूं लागले व त्या पाद्रीसाहेबाच्या योगाने हरि केशवजी यांस इंग्लिश भाषेची व त्याज बरोबर धर्मसंबंधी चर्चा होत असतां इतर पुष्कळ विषयांची माहितगारी झाली..... त्यांणी त्यांची शिफारस मि० जेम्स फारिश जे त्या वेळेस मुंबईंत सरकारी मोठ्या हुद्या वर होते त्याजपाशी केली.... हे सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र त्यांणींच त्यांना समजावून त्यांच्या हातून हा ग्रंथ त्यांणीं तयार करविला. पुढे सन १८३६ सांत मिसेस मार्सेट यांचा आणखी दुसरा 'कॉन्व्हर्सेशन ऑन केमिस्ट्री' हा ग्रंथ त्यांस समजावून त्यांतील रसायनशास्त्राचे प्रयोग त्यांस दाखवून त्यांहीं ग्रंथाचे मराठी भाषांतर त्यांच्या हातून तयार करविलें. हे दोन ग्रंथ हरि केशवजीच्या हातून फार सरस झाले.. या शिवाय आणखी या गृहस्थानें मदिरापाननिषेधक एक लहानसें मौजेचें पुस्तक रचून छापलें होतें तेंहि माझ्या वाचण्यांत आहे. त्यांत मद्यपीं लोकांस त्यांच्या मना वर ठसाया जोगा उपदेश त्यांणीं केला होता, परंतु दैवगति अशी विलक्षण की, उत्तरवयांत तेच स्वत: त्या प्राशनाच्या स्वाधीन झाल्यासारिखे होवून मृत्यू पावले!"

१८२० ते १८४० च्या दरम्यान जें हें मराठी वाङ्मय पाश्चात्य आणि महाराष्ट्रीय लेखकांनी सहकारितेनें उत्पन्न केलें, त्यासंबंधी न्या. म. गो. रानडे आणि सर फेरोजशहा मेहता या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील दोघांहि महानुभावांनीं, आपआपल्या परीने, अननुकूल अभिप्राय प्रकट

केलेला दृष्टीस पडतो; व तें बहुतेक सर्वच वाङ्मय आज विस्मृतीच्या गर्तेत गडप होऊन गेलेलें आहे हें लक्षांत घेतलें असतां, त्या अभिप्रायांत तथ्य नाही, असें म्हणणें कठीण जाईल. पण, त्याबरोबरच ही गोष्टहि कृतज्ञतेने ध्यानांत घेतली पाहिजे की, या ग्रंथकारांनी व्याकरण–कोशादि ग्रंथ परिश्रमपूर्वक रचून, निरनिराळ्या शास्त्रांची सुगम परिभाषा निर्माण करून, नवीन भौतिक विद्यांवर लहान लहान बालबोध ग्रंथ लिहून आणि लोकशिक्षणाच्या उद्देशानें नियतकालिकें काढून अर्वाचीन महाराष्ट्राच्या अभिनव संस्कृतीचें बीजारोपण मोठ्या कळकळीने आणि कुशलतेनेहि केलें; व जित आणि जेते यांच्या सांस्कृतिक समन्वयाचा मार्गहि दाखवून दिला. त्या दृष्टीने, रानडे आणि मेहता यांच्यापेक्षाहि स्वत: एल्फिन्स्टनने जे उद्गार आपण केलेल्या या शैक्षणिक उपक्रमासंबंधीं काढलेले आहेत, ते अत्यंत मार्मिक आणि दूरदर्शीपणाचे वाटतात. मराठ्यांशीं झालेल्या शेवटल्या युद्धांत त्याच्या हाताखालीं काम केलेला ब्रिटिश सेनानी लेफ्टनंट-जनरल ब्रिग्ज हा एकदा त्याला भेटावयाला गेला असतां त्याच्या तंबूच्या कोपऱ्यांत मराठी पुस्तकांचा ढीग पडलेला त्या शिपाईगड्याने पाहिला. तेव्हा, त्याने आश्चर्यानें एल्फिन्स्टनला विचारलें, "हीं पुस्तकें कशासाठी तयार केलीं आहेत ?—" "या देशांतील लोकांना शिक्षण देण्यासाठी !" एल्फिन्स्टनने त्याला उत्तर दिलें आणि तो पुढे म्हणाला, "पण तोच आपला युरोपांत परत जाण्याचा राजमार्ग ठरणार आहे !" तेव्हा ब्रिग्जने त्याला हटकलें, "मुंबईचे गव्हर्नर या नात्याने आपणच स्वत: त्या तयारीला लागावें, याचें मला नवल वाटतें !" त्यावर एल्फिन्स्टन म्हणाला, "कांहीहि असलें, तरी एतद्देशीयांच्या बाबतींतील आपलें जें कर्तव्य आहे, तें करावयाला आपण बांधले गेलेलों आहोंत !" मुंबई शहरांत आपल्या प्रेरणने सुरू झालेल्या या मराठी पुस्तकांच्या मुद्रण–प्रकाशनाचें त्याला स्वत:ला किती कौतुक आणि महत्त्व वाटत असे, याचें एक लहानसेंच पण उद्बोधक प्रत्यंतर तत्कालीन कागदपत्रांतहि पाहावयाला मिळतें. ता. १ नोव्हेंबर १८२२ रोजीं त्याच्या पत्राला पाठविलेल्या उत्तरांत सरदार माधवराव रास्ते यांनी असें म्हटल्याचें आढळतें कीं, "जंजिरे मुंबईस हाली छापखान्यांत माहाराष्ट्र भाषेंत पंचोपाख्यान बालबोध लिपींत यंत्रें करून

बुके वाचावयास तयार केलीं आहेत. हा चमत्कार अवलोकनांत यावा म्हणौन बुक पाठविले आहे, स्वीकार होऊन मनन व्हावे म्हणून लिहिलें तें कललें व बूक पाठविलें तें पावलें. त्याचा स्वीकार करून बहुत खुषी हासल जाहाली. ज्यांचा जसा महजब त्या रीतीनेंच त्यांचे संरक्षण करणें ही बुजुर्गी खुदानें आपल्यास दिल्ही आहे. हारवख्त आपले दानाईची याद होते." एल्फिन्स्टनच्या 'दानाई' ची सरदार रास्ते यांनी केलेली ही प्रशंसा, महाराष्ट्रांतील विचारक्रांतीचा गेल्या सवाशें वर्षांचा इतिहास ध्यानांत घेतला असतां, कोणाला यथार्थ वाटणार नाही ?

वीस वर्षांच्या या पहिल्या कालखंडांत निर्माण झालेल्या शालोपयोगी साहित्यांतील शेखरीभूत ग्रंथ जर कोणता असेल, तर तो 'महाराष्ट्र भाषेचा कोश' हा होय. दादोबांनी आपल्या आत्मचरित्रांत या कोशाविषयी असे उद्‌गार काढले आहेत की, "कॅप्टन मोल्स्वर्थ आणि लेफ्टनंट थॉमस कँडी यांच्या हाता खाली पंडित होते, त्यांणी दोन मोठ्या पुस्तकांत मराठी कोश तयार केला आणि तो सुंदर शिलाछापा वर छापिला. त्या वरून त्या साहेबांनी इंग्लिशांत मराठी कोश तयार केला तो प्रसिद्ध आहेच; परंतु पंडितांचा कोश कोठे दिसेनासा झाला. हें मोठें अद्‌भुत कृत्य मराठी भाषेंत त्या वेळेस झाले. परंतु अशा कृत्याचे गुणग्राहक पुढें कोणी झालेच नाहींत." हा कोश १८२९ सालीं प्रसिद्ध झाला. तत्पूर्वी डॉ. विल्यम कॅरे याचा मराठी-इंग्रजी १८१० सालीं आणि ले. क. व्हान्स केनेडी याचा मराठी–इंग्रजी-मराठी १८२४ सालीं असे दोन कोश प्रकाशित झालेले होते. पण, शुद्ध, व्युत्पन्न आणि त्यांतल्या त्यांत व्यापक असा पहिला मराठी कोश 'महाराष्ट्र भाषेचा कोश' हाच होय. या कोशाच्या प्रस्तावनेंत त्याच्या रचनेसंबंधीं अशी माहिती दिलेली आहे की,—

"महाराष्ट्र भाषा म्हणजे महाराष्ट्र देशीं राहणारे जे देशस्थ ब्राम्हणादिक लोक त्यांची बोलायाची प्राकृत भाषा, तिचा कोश म्हणजें त्या भाषेंत जे शब्द येतात त्यांचा कोश. कोश शब्दाचा सामान्यतः हा अर्थ आहे कीं, प्रसंगी प्रयोगार्थ बाहेर काढायाचा जो अर्थ–संघात त्याचें संग्रहाचे सांठवण. राजकीयादि व्यवहारोपयोगी जीं मोहरा, पुतळ्या,

होन, रुपये इत्यादि द्रव्यें यांचे सांठवण जें भांडारगृह त्यास जशी कोश ही संज्ञा प्रसिद्ध आहे, तशी वाग्व्यवहारोपयोगी जे शब्द तत्संग्रहरूप जो ग्रंथ त्यांस ही संज्ञा प्रसिद्ध आहे. राजकीयादि व्यवहारास मुख्यत्वेकरून आश्रय जसे द्रव्य, त्याच प्रकारें या वाग्व्यवहारास आश्रय शब्द होत. द्रव्यकोश आणि शब्दकोश यांचें सर्व गोष्टींनीं साधर्म्य आहे. परंतु द्रव्यकोश क्षय्य आणि हा अक्षय्य एवढा मात्र याकडे विशेष आहे. याजकरितां वाग्व्यवहारकर्ता जो कोणी त्यास शब्दकोश पाहिजे म्हणून जा जा भाषेने व्यवहार करायाचा त्या त्या भाषेच्या कोशावर सर्वांचा आदर अवश्य असावा. .... असें असताहि आजपर्यंत या भाषेवर कोशव्याकरण करावयास कोणी प्रवृत्त झाला नाहीं हें मनांत आणून सर्व लोकांचे कल्याणार्थ राजकार्यधुरंधर प्रजापालनैकरत हानरबल मौंट स्त्युअर्त एलफिन्स्तन साहेब पात्रण आणि गवरनर याणी मुंबईतील शिक्षा शाळा मंडळीस आज्ञा करून हा ग्रंथ बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, सखाराम जोशी, दाजीशस्त्री शुक्ल आणि परशुरामपंत गोडबोले यांचे हातून करायास आरंभिला. पुढे त्यांचेच हातून प्रतापसिंह परम कारुणिक हानरबल जनराल सिर जान मालकमसाहेब बहादुर पात्रण आणि गवरनर यांणी शेवटास नेला....

या भाषेवर आज पर्यंत कोशव्याकरणादि व्यवस्थापक कांहींच झाले नाही हा प्रथमच संस्कार आहे. हा ग्रंथ करण्याविषयी बुद्धीस आधार मिळून लोकांचा वाग्व्यवहार तो तरी एकरूप आहे असे नाहीं देशपरत्वें जातिपरत्वें किंबहुना व्यक्तिपरत्वेंहि भिन्न भिन्न आहे अशा आधाराचे बलानें जी रचना करायाची ती निर्दोष आणि सर्वांस आनंदजनक अशी कशानें होणार परंतु जसा जितका लोकांचा व्यवहार आढळांत आला तितक्याचें बुद्धीनें आकलन करून यथामति हा ग्रंथ केला आहे हें मनांत आणून सज्जनांनी दोषदर्शनानें विरस न होतां यांतील गुणलेश असतील ते आदरावे......

ही महाराष्ट्रभाषा म्हणजे देशभाषा होय आणि देशभाषांचे वर्तनाचा असा नियम आहे की, स्व स्व देशाचे मध्यभागीं शुद्ध स्वरूपानें असावे

आणि उत्तरोत्तरपर्यंत भागीं तत्तद्देशांतरस्थ भाषांचें मिश्रणानें संकीर्ण रूपानें असावे.

महाराष्ट्र देशाचा मध्यभाग म्हटला असतां प्राय: पुणें प्रांत होतो अतएव पुणें प्रांतीं जे शब्द प्रसिद्ध आहेत, ते प्राय: सर्व महाराष्ट्र देशभर प्रसिद्ध असें समजून ते शब्द प्रांताचे खुणेवाचून लिहिले आहेत आणि इतर प्रांतींचे शब्द त्या त्या प्रांताची आद्यक्षररूप खूण घालून लिहिले आहेत, ते इतर प्रांत, देश, कोंकण, राजापूर, आणि वाडी हे चार प्राधान्यें करून धरिले आहेत, त्यांत देश-शब्देंकरून गंगथडी धरून पंढरपूरचे आसपासचा देश इतका प्रांत विवक्षित आहे. कोंकण शब्दानें मुंबईपासून बाणकोटचे खाडीपावेतों प्रांत विवक्षित आहे: राजापूर शब्दानें बाणकोटचे खाडीपासून प्राय: मालवण पावेतों कोंकणपट्टीइतका प्रांत विवक्षित आहे. वाडी शब्दानें सावंताचे वाडीचे आसपासचा प्रांत विवक्षित आहे."

प्रस्तावनेंतील या विवेचनावरून महाराष्ट्र भाषेच्या या पहिल्या कोशाचें स्वरूप आणि मर्यादा हीं दोन्ही स्पष्ट होतील. विशेषत:, या कोशाची रचना करितांना गोदावरीच्या उत्तरेकडील नर्मदेपर्यंतचा सारा पूर्व महाराष्ट्र अजिबात लक्षांत घेण्यांत आलेला नव्हता, ही गोष्ट ध्यानांत घेतली असतां, कॅप्टन मोल्स्वर्थ आणि त्याचें पंडितमंडळ यांनी केलेलें हें कोशरचनेचें कार्य त्या काळाच्या दृष्टीने अद्भुत वाटण्यासारखें असलें, तरीहि तें किती संकुचित होतें, याची यथार्थ कल्पना येते. प्रस्तावनेंत 'शिक्षामंडळीचे आज्ञांकित पंडित' म्हणून फक्त पांचच पंडितांचा निर्देश केलेला दृष्टीस पडतो. पण, कोशाच्या इंग्रजी आणि मराठी अशा दोन्ही मुखपृष्ठांवर जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांचें नांव पहिलें दिलेलें असून, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांचें नांव चौथें दिलेलें आहे. त्यावरून हें उघड आहे की, याहि दोघा पंडितांनी कोशरचनेंत भाग घेतलेला होता. मग त्यांचा निर्देश प्रस्तावनेंत कां करण्यांत आला नाहीं, कोण जाणे ! या कोशाचा पुरवणी खंड १८३१ सालीं पुणें येथे प्रसिद्ध झाला. याच वर्षी कॅप्टन मोल्स्वर्थ याने जॉर्ज कँडी आणि थॉमस कँडी या बंधूंच्या मदतीने तयार केलेला मराठी–इंग्रजी कोशहि बाहेर पडला.

जर्व्हिस, केनेडी, मोल्स्वर्थ, कँडी प्रभृति ज्या या इंग्रजी अधिकाऱ्यांनी कोशव्याकरणादि ग्रंथांची रचना करून आधुनिक मराठी वाङ्मयाच्या पाया-भरणीचें किचकट शास्त्रीय कार्य इतक्या ईर्येने आणि आस्थेनें वर्षानुवर्ष केलें, ते सर्वच बहुतेक ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करांतले सेवानिवृत्त शिपाईगडी होते; व मोल्स्वर्थने आपल्या मराठी–इंग्रजी कोशाच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणे "शुभवर्तमानाच्या प्रसाराला हातभार लावण्याची जबरदस्त लालसा" हीच त्यांच्या या प्रचंड उद्योगाच्या मूळाशीं असलेली एकमेव प्रेरणा होती. पण, आपल्या हाताखालच्या ढालीएवढाली चक्री पागोटी आणि पायघोळ चुणीदार अंगरखे घालणाऱ्या गबाळग्रंथी मराठी कलमबहाद्दरांशीं या फाकड्या इंग्रज तरवारबहाद्दरांचें इतकें कांही तादात्म्य झालेलें होतें की, कॅप्टन मोल्स्वर्थ याचा हा कोश प्रसिद्ध झाल्यानंतर लोक कौतुकाने त्याला 'मोरेश्वरशास्त्री' म्हणूं लागले!

पण, कॅरेपासून कँडीपर्यंत ज्या या पाश्चात्य मिशनरींनी आणि अधिकाऱ्यांनी, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत मराठी भाषेंत कोश–व्याकरणादि विविध ग्रंथरचना करून, तिच्या पद्धतशीर विकासाचा आणि शिक्षणाचा पाया घातला, त्यांना मराठी भाषा किंवा मराठे लोक यांच्या-विषयी कोणत्याहि प्रकारचा जिव्हाळा किंवा आदर होता, असें मानण्याचें मात्र मुळीच कारण नाही. एतद्देशीयांत स्वधर्मप्रसार करण्याचें एकमेव सुलभ साधन म्हणूनच केवळ ते स्वतः मराठी भाषा थोडीबहुत शिकले आणि तत्कालीन शास्त्री-पंडितांना हाताशीं धरून, सरकारच्या आश्रयाने, त्यांनी मराठींत ग्रंथरचना केली, एवढेंच काय तें! एरवीं, मराठी भाषे-विषयीचें त्यांचें अज्ञान आणि अनादर यांत अधिक बलवत्तर काय होतें, हें सांगणें खरोखरी कठीण जाईल. एल्फिन्स्टनच्या कारकीर्दींत १८२३ सालीं शैक्षणिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी जी खास समिति नेमण्यांत आलेली होती, तिनें आपल्या प्रतिवृत्तांत, मुंबई प्रांतांतील दोन मुख्य लोक-भाषा ज्या मराठी आणि गुजराती, त्यांच्याविषयी असा अभिप्राय व्यक्त केलेला होता की, "मराठी आणि गुजराती या भाषांचा वापर संभाषण आणि कामकाज यांच्यापुरताच मर्यादित आहे. अगदी सामान्य दर्जाच्यासुद्धा

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

साहित्याची अभिवृद्धि आणि विस्तार करण्यासाठीं या भाषांचा कधींहि उपयोग करण्यांत आलेला नाहीं." हैंद शाळा पुस्तक मंडळीनें १८२५ सालच्या 'आप्रिल' मध्ये ग्रंथांचीं भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणारांस उद्देशून काढलेल्या आपल्या 'प्रसिध्दिपत्रा'च्या पहिल्या कलमांत मराठी आणि गुजराती या भाषांचा निर्देश जो 'बोली' या शब्दानें केलेला होता, तो बहुधा याच कारणामुळें! व्हान्स केनेडी यानेंहि १८२४ सालीं प्रकाशित केलेल्या आपल्या कोशाच्या प्रस्तावनेंत मराठी भाषेविषयीं अशी मुक्ताफळें काढली आहेत कीं, "..पण मराठी ही निव्वळ बोलण्याची भाषा आहे. गद्य किंवा पद्य ग्रंथकारांनी ती मुळीच संपन्न किंवा सुसंस्कृत केलेली नाहीं, हें लक्षांत घेतलें पाहिजे" एतद्देशीयांना सर्व शिक्षण त्यांच्यां मातृभाषांतून द्यावे या मताचे जर्व्हिस आणि कँडी हे प्रमुख पुरस्कर्ते होते; व जर्व्हिस याच्या शिल्पशाळेंतील शिक्षणाचें माध्यम पूर्ववत् मराठीच रहावें कीं इंग्रजी करण्यांत यावें या मुद्यावर वाद उपस्थित होऊन, ती शाळा सरकारनें अखेर बंद केल्यामुळें, "त्यांचें मन फार खट्टु होऊन सन १८३०–३१ च्या सुमारास हे पुष्कळ वर्षें पर्यंत रजे वर विलायतेस गेले," असा उल्लेख दादोबांनींहि आपल्या आत्मचरित्रांत केलेला आहे. पण, लोकभाषांच्या या दोघा कैवाऱ्यांपैकीं निदान मेजर कँडी याचें मत तरी मराठी भाषेसंबंधीं केनेडीच्या मताहून फारसें निराळे नव्हतें, असें त्याच्या स्वतःच्या उद्गारांवरून स्पष्ट दिसतें. १८४० सालानंतर शिक्षणाच्या माध्यमाचा वाद विकोपाला जाऊन एज्युकेशन बोर्डाचा नवा अध्यक्ष सर अर्स्किन पेरी याने ज्या वेळीं १८४५ सालच्या आपल्या प्रतिवृत्तांत इंग्रजी माध्यमाची तरफदारी मोठ्या तडफेने केली, त्या वेळीं मेजर कँडी याने मातृभाषांच्या माध्यमाची बाजू मांडतांना असें विधान केलें होतें की, "...पण भारतांतील भाषांचा कधींच विकास करण्यांत आला नाहीं. त्यांच्यांत साहित्य असलेंच तर तें अगदींच थोडें किंबहुना नाहींच म्हटलें तरी चालेल. त्यामुळे त्या भाषा सद्यःस्थितींत शिक्षणाचें माध्यम व्हावयाला अगदीं अयोग्य आहेत." एज्युकेशन बोर्डाच्या १८४५ सालच्या प्रतिवृत्तांत तर मराठे लोक आणि मराठी भाषा यांची एका वाक्यांत अशी बोळवण केलेली आढळते कीं, "मराठे हे त्यांच्या ऐन उत्कर्षाच्या काळांतसुद्धा

रानटी लुटारू लोक होते; व त्यांना साहित्याचा तर गंधहि नव्हता." भारतीय धर्म, संस्कृति आणि साहित्य यांच्याविषयीची जी ही विलक्षण तुच्छता गोरे मिशनरी आणि अधिकारी यांच्या अगदीं रोमरोमीं भिनलेली होती, तिचें प्रदर्शन आधुनिक हिंदी राष्ट्रीयत्वाचे एक प्रतिपादक सर फ़ेरोजशहा मेहता यांनी १८६७ सालीं लंडन येथील ईस्ट इंडिया असोसिएशन-पुढें वाचलेल्या 'मुंबई प्रांतांतील शिक्षणपद्धति' या आपल्या निबंधांतहि अगदी मनसोक्त केलेलें दृष्टीस पडतें. एल्फिन्स्टनने १८२१ सालीं पुण्यास स्थापन केलेल्या संस्कृत पाठशाळेचा प्रयोग अपेशी झाल्याचा निर्वाळा देऊन सर फेरोजशहा यांनी, संस्कृत भाषा आणि साहित्य हीं केवळ विकास-क्षमतेच्या दृष्टीनें वांझोटीच नव्हत, तर एकोणिसाव्या शतकांतील सुधारणेच्या अनुषंगानें होत असलेल्या पुनरुज्जीवनाच्या कार्याला निरु-पयोगी आणि घातुकहि ( Useless and even mischievous ) असल्याचा अनुभव त्या प्रयोगांत आला, असा अभिप्राय व्यक्त केला आहे. जिथें संस्कृत सारखी जगांतली अत्यंत समृद्ध प्राचीन भाषा सर फेरोजशहा यांच्या सारख्या त्या मनूतल्या गाजलेल्या देशभक्तालाहि व्यर्थ किंबहुना अपायकारक वाटली, तिथें बिचाऱ्या मराठीसारख्या लोकभाषेवर शिक्षणाचें माध्यम होण्याच्या बाबतींत 'सर्वथैव निरुपयोगी' ( Utterly useless ) ठरण्याचा प्रसंग यावा, यांत काय आश्चर्य? त्यांच्यापेक्षा भारतीय लोक-भाषा आणि संस्कृति यांच्यासंबंधीचे एल्फिन्स्टनचे विचारसुद्धा, दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने, जास्त उदार ठरण्यासारखे होते !

म्हणून, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत गोरे मिशनरी आणि अधिकारी यांनी मराठी भाषेची जी सेवा केली, तिचें कृतज्ञताबुद्धीनें कौतुक करण्याच्या भरांत त्या सेवेच्या बुडाशीं असलेल्या ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराचा उद्देश आणि आपली सत्ता दृढ करण्याचें धोरण या दोहोंचाहि विसर पडूं देतां कामा नये. मेजर कँडी याच्या उत्कट धर्माभिमानाची एक जी गोष्ट सांगतात, ती, या दृष्टीनें, लक्षांत घेण्यासारखी आहे. त्याच्या तालमींत तयार झालेले सुप्रसिद्ध कोशकार श्रीकृष्णशास्त्री तळेकर हे त्याचे मोठे लोभांतले मुख्य सहाय्यक होते. शास्त्रीबुवा रविवारी कधी कामानिमित्त

कँडीसाहेबाकडे गेले, म्हणजे साहेब त्यांना आपल्याबरोबर प्रार्थनेला बसवी आणि कळवळून उद्गारी, "श्रीकृष्णा, मरणोत्तर तुझ्या आत्म्याचे कसे रे होईल ! " तत्कालीन गोऱ्या अधिकाऱ्यांच्या मनोवृत्तीवर ही गोष्ट किती विदारक प्रकाश पाडते ?

## ५

पण एल्फिन्स्टन हा केवळ कारकून, शिक्षक, प्राध्यापक इत्यादि पढिक नोकरवर्ग पैदा करणाऱ्या शाळा आणि शालोपयोगी वाङ्मय निर्माण करण्याच्या योजना अमलांत आणूनच थांबला नाही; तर त्याबरोबरच त्याने निरनिराळ्या श्रेणींचे मुलकी अधिकारी आणि तंत्रज्ञ तयार करण्यासाठी मुंबईस १८२५ सालीं 'एंजिनीअर इन्स्टिटय़ूशन' काढली आणि विशेष प्रकारचें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खास शिष्यवृत्तीहि ठेवल्या. या सर्व शैक्षणिक उपक्रमांत कॅप्टन जॉर्ज जर्व्हिस हा त्याचा मुख्य सल्लागार आणि सहकारी होता. दादोबांनी आपल्या आत्मचरित्रांत जर्व्हिसची अशी माहिती दिली आहे की,—

"कॅप्टन जर्व्हिस हे सोसाइटीचे सक्रतारचें काम करितच होते. परंतु त्या वेळेस मुंबईंत सन १८२५ च्या सुमारास इंजिनेरीचें काम शिकविण्या करितां एक इंजिनेरीचें स्कुल प्रथम स्थापित केलें; ती शाळा शिकविण्याचें व त्या शाळे करतां देशभाषेंत गणित विषया वर इंग्लिश भाषेंतून ग्रंथ वगैरे तयार करण्याचें व नव्या उमेदवारांस पगार देऊन त्यांस हें इंजिनेरीचें काम शिकविण्याचें हीं सर्व कामें जर्व्हिस साहेबांच्याच स्वाधीन होतीं. ते या कामांत फारच मेहनत घेत होते. सोसाइटींत जसे सदाशिव काशीनाथ छत्र्ये त्यांचे मुख्य मदतनीस, तसे इंजिनेरी स्कुलांत जगन्नाथशास्त्री क्रमवंत हे जर्व्हिस साहेबांचे मुख्य मदतनीस होते. आम्ही त्या वेळेस मराठी शाळेंत शिकणारीं लहान मुलें होतों. नित्य बारा वरांच्या सुमारास जर्व्हिस साहेबांनी सोसाइटीच्या स्कुलांत एक फेरी घालावी.

त्यांची देश भाषेवर फार आवडत होती. त्यांणीं त्या वेळेस "हटन्स कोर्स ऑफ मॅथमेटिक्स' या समग्र ग्रंथाचें जगन्नाथ शास्त्र्यांच्या सहाय्यानें मराठींत भाषांतर केलें. त्याचे पूर्णांक, अपूर्णांक, बीजगणित, भूमिति, सिद्धांत, त्रिकोणमिति, लाग्रतम असे सर्व भाग जसजसे तयार होत तसतसे ते तेथेंच शिला छापावर छापीत असत आणि त्या एक एक भागाची निरनिराळीं पुस्तकें शिवून ती मुलांस शिकण्या करितां विकत देण्याचाहि कारखाना तेथेच केला होता . . . कॅप्टन जर्व्हिस साहेबांचे कारकीर्दींत इंग्लिश शाळेची कांहींच बूज नव्हती. ते इंग्लिश स्कूला कडेस पाहात सुद्धां नव्हते. त्यांचा भर सारा मराठींत शिकविण्या कडेस असे. गणिताची पुस्तकें सर्व छापून तयार झाल्या वर त्यांहीं बाळशास्त्री यांस कांहीं तास आपल्या ऑफिसांत एंजिनिअर स्कूल येथें बलावून ते व जगन्नाथ शास्त्री वगैरे पंडित मिळून 'लॉर्ड ब्रोघॅम्स ट्रीटाइज ऑन द ऑब्जेक्ट, अॅडव्हान्टेजेस अँड प्लेजर्स ऑफ नॉलेज' या इंग्लिश ग्रंथावरून 'विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष' या नांवाचा मराठी व गुजराथी भाषेंत ग्रंथ छापून प्रसिद्ध केला, व तो श्रीमन्महाराज प्रतापसिंह राजे छत्रपति सातारा यांस नजर केला."

जर्व्हिसने नुसत्या गणितशास्त्रावरच इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें मराठींत सात आणि गुजरातींत अकरा ग्रंथ रचिले. हिंदी लोकांची योग्यता जर सर्व दृष्टींनी सत्वर वाढवावयाची असेल, तर त्यांचें संपूर्ण शिक्षण देशी भाषांतूनच झालें पाहिजे, अशी त्याची निष्ठा होती. त्यामुळे, त्यानें आपल्या सतरा वर्षांच्या कारकीर्दींत मराठी, गुजराती, हिंदुस्थानी, फार्शी वगैरे तत्कालीन मान्य देशी भाषांत सुलभ शास्त्रीय वाङ्मय, शास्त्रीपंडितांच्या सहाय्यानें, उत्पन्न करून महाराष्ट्रांतील वैज्ञानिक शिक्षणपद्धतीचा पाया घातला; व राज्यकारभार चालवावयाला योग्य असा निरनिराळ्या विद्यांत निपुण असलेला दुय्यम दर्जाचा नोकरवर्ग निर्माण करण्यांत उत्कृष्ट यश मिळविलें. अव्वल इंग्रजी अमदानींतील एतद्देशीय सरकारी अधिकाऱ्यांची पहिली पिढी त्याच्या तालमींत तयार झालेली होती, असें म्हणावयाला शंका वाटत नाही. कारण, १८२५ सालीं पुण्यास जो जाहिरनामा सरकारनें काढला, त्यांत अशीं कलमें होतीं की,—

"कचेरीचे कामात व अदालतचे कामात तरबियेत लोक हुरमतवाले मिलण्याची अडचण आहे, म्हणौन गौरनर कौसलांत जाहीर जाले. ... याजकरितां ज्या सुभ्यात राहणार त्या सुभ्यातच सरकारी कामावर मुकरर करावे म्हणौन ऐसियास पुणे सुभ्यांतील उमेदवार व हुरमतवाले लोकांस मालूम होणे बदल कलमी केले जाते जे—

१ ज्या तेरखेस कमिषनर साहेब पाठशालेत जातील, त्या तेरखेचे इतला केले जाईल. ते दिवसी शालेतील किंवा दुसरी खुषबाष उमेदवार वगैरे लोक ब्राह्मण जातींतील किंवा हुरमतवाले मराठे जातींतील अथवा मुसलमान जातींतील सर्वांनी दुसरे कलमांत लिहिल्याप्रमाणें मुंबईस जाणारे लोक जमा व्हावे; कारण की उमेदवार हिशेबांत व धर्मशास्त्रांत व सारेचे कामांत व हरयेक भाषेंत तयार व्हावयाजोगे बुध्दिमान असतील त्यास मुकरर करून मुंबईत कपतान जरविस साहेब यांची शाला आहे तेथें रवाना केले जाईल. ते साहेब पैमायषीचे काम व जमाबंदी वगैरेचे हिशेब कितेब व अदालत प्रकर्णी वहिवाट व रिवाज सिकतील त्याचे देखरेख करितील. येणे कडून उमेदवार लोकपैकी जो कोणी दोन तीन सालांत मेहनत केलिया सरकार काम करावयाजोगा पुरा तरबियेत होईल, नंतर कपतान जेरविससाहेब ज्या कामांत जो तयार जाहाला असेल, त्यास त्या कामाची तरबियेत जाल्याची पत्रे देतील; म्हणजे मुंबई इलाखेतील मुलकांत सरकारकामावर कलकटर साहेब अथवा ज्यडज्य साहेब यांचे इखलासाचे रीत मुकरर केले जातील, तेथें त्याची हुशारी बमोजीब पुढें बढती होत जाईल.

३ मुंबईत हर येक आसामीचे पोटाचे वेगमीस दर महिना आठ रुपये सरकार खर्च करितील.

४ मुंबईस जाणार मुलाचे वडिलास हेच खातरजमा आहे की मुलास मुंबईस पाठवणेकडून काही भय नाहीं. सरकार कृपाळू होऊन त्याचे चालचलण चांगली असावयाकरिता सरकारातून येक उत्तम जागा राहण्यास योजना केली आहे. तेथे काही येक उपद्रव होणार नाहीं, व ज्या जातीचे असतील त्यास त्या त्या जातीचे नोकरहि ठेऊन देतील.

या खेरीज ब्राह्मण वगैरे सदरी हर येक जातीस त्या त्या जातीचे रिवाजाप्रमाणे कपतान जेरवीस साहेब बंदोबस्त राखितील."

या जाहिरनाम्यावरून हें उघड आहे की, राज्यकारभाराच्या लहान-मोठ्या खात्यांत काम करावयाला लायक असा नोकरवर्ग अगदी थोड्या अवधींत तयार करण्याची जबाबदारी एल्फिन्स्टनने जर्व्हिसवर टाकली होती. ही जबाबदारी त्याने १८२३ च्या मे पासून तो १८३९ च्या फेब्रुवारी-पर्यंत सतत सतरा वर्षे प्रथम मुंबई आणि नंतर पुणें येथे मराठी, गुजराती, इंग्रजी वगैरे भाषांचें शिक्षण देणाऱ्या शाळा, जमीनमोजणी, जमाबंदी वगैरे मुलकी कारभाराचें शिक्षण देणारे वर्ग आणि इमारती, रस्ते, पूल वगैरे बांधकामाचें शिक्षण देणाऱ्या शिल्पशाळा काढून व सर्व प्रकारचें शालो-पयोगी वाङ्मय देशी भाषांत निर्माण करून उत्तम रीतीने पार पाडली. ता. २२ फेब्रुवारी १८३९ रोजीं तो निवृत्त होऊन विलायतेस जावयाला निघाला असतां, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर, बापूशास्त्री शुक्ल, मोरशास्त्री साठे, बाळशास्त्री जांभेकर, विष्णु सुंदर छत्रे, नाना नारायण, मोरोबा कान्होबा प्रभृति मुंबई प्रांतांतील सवाशें प्राध्यापक, शिक्षक, मामलेदार, इन्स्पेक्टर, सर्व्हेअर वगैरे निरनिराळ्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनीं जें मानपत्र त्याला दिलें, त्यांत त्याच्या या शैक्षणिक कार्याचा गौरव मुक्त-कंठाने केलेला आढळतो. त्यानेहि या मानपत्राला दिलेल्या उत्तरांत आपली अशी निष्ठा व्यक्त केल्याचें दृष्टीस पडते की, "माझे युरोपियन बांधव हे संस्कृति आणि सुधारणा यांच्या ज्या उच्च पदवीला पोचूं शकतात, त्या पदवीला पोंचण्याचें बुद्धिसामर्थ्य भारतीयांच्या ठिकाणी आहे, अशी माझी त्यांच्याशी आलेल्या निकट संबंधावरून खात्री होऊन चुकली आहे." जर्व्हिसने केलेल्या या शिक्षणविषयक कामगिरीचा व्याप, विविधता आणि व्यावहारिकता, देशी भाषांतून सर्व शिक्षण देण्यासंबंधीचा त्याचा आग्रह व भारतीयांच्या बौद्धिक योग्यतेविषयीं त्याला वाटणारा विश्वास लक्षांत घेतला असतां, महाराष्ट्रांतील आधुनिक शिक्षणपद्धतीचा तो आद्य प्रवर्तक आहे, असें म्हणावयाला यत्किंचितहि शंका वाटत नाही.

# ६

एल्फिन्स्टनने आरंभिलेल्या या ज्ञानप्रसाराच्या कार्याला तत्कालीन धर्मसमजुतींचा उपद्रव सुरवातीला तरी झाल्याविना राहिला नाही. एक तर, इंग्रजांनी अंमलांत आणलेली ही नवीन शिक्षणपद्धति आणि तिला साधनीभूत असलेलीं छापील पुस्तकें हीं दोन्ही त्या वेळच्या समाजाला अगदीं अपूर्व होतीं; व दुसरें असें की, त्या दोहोंचाहि उपक्रम प्रथम ख्रिस्ती मिशनरींकडून झालेला असल्यामुळे लोकांनी साहजिकच त्यांचा संबंध तत्पूर्वी दहा वर्षे सुरू झालेल्या धर्मांतराच्या मोहिमेशीं जोडला. स्वत: एल्फिन्स्टन हा सरकारी शाळांतून ख्रिस्ती धर्माचें शिक्षण देण्याच्या अगदी विरुद्ध होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांना १८२३ सालीं सादर केलेल्या आपल्या शैक्षणिक योजनेंत त्याने असा अभिप्राय प्रकट केला होता कीं, " आपल्या शिक्षणप्रसाराच्या योजनेंत धर्माची थोडीसुद्धां भेसळ करावयाला माझा अगदीं कडवा विरोध आहे. या योजनेच्या मार्गांत इतर अनेक अडथळे आधींच आहेत. त्यांत आणखी भर घालण्याची माझी इच्छा नाही. नवीन शिक्षणाच्या प्रसारामुळे या देशांतील लोक धर्मांतराला आपोआप प्रवृत्त होतील, याबद्दल माझी खात्री आहे. पण त्यांना मात्र या परिणामाची कल्पना नाही. नाहीं तर, शिक्षणाचा प्रसार हा जणुं आपल्या धर्मावरच हल्ला आहे, अशा भावनेने त्यांनी त्वेषाने त्याला विरोध केला असता. आपल्या शाळांतून ख्रिस्ती धर्माचें शिक्षण द्यावयाला प्रारंभ करणें म्हणजे ब्राह्मणांना धोक्याचा इषारा देऊन सावध करणेंच होय • • • • त्यामुळे, आपल्या शिक्षणयोजनाच अयशस्वी होतील असें नाही, तर आपल्या साम्राज्याचाहि उच्छेद होऊन जाईल. " म्हणून, १८२५ सालीं सोसायटीने जी पहिली सरकारी इंग्रजी शाळा मुंबईंत काढली, तींत मिशनरींच्या बायबल शिकविण्याच्या प्रथेचा प्रवेश होऊं देण्यांत आला नाही. तरीसुद्धां या शाळेसंबंधीं लोकांचीं मनें कितीं साशंक होतीं, हें दादोबा पांडुरंग यांनी आपल्या आत्मचरित्रांत काढलेल्या उद्गारांवरून दिसून येतें. त्यांनी असें म्हटलें आहे की,--

" त्या वेळेस एक दोन वर्षेपर्यंत सर्व मुंबईंत लोक अशी कल्पना आपल्या मनांत करूं लागले की आमच्या मुलांस शिकविण्याचें सरकारास इतकें काय अगत्य आहे. तेव्हां या धूर्त इंग्रेज सरकारचा यांत कांही तरी मतलब असावा. [ तो म्हणजे ] आमच्या मुलांस हुशार करून त्यांस पुढें बाटवावें, असा सर्वांचा तर्क धांवत होता. म्हणोन ते आपलीं मुलें त्या मोठ्या शाळेंत पाठविण्यांत मोठा संशय घेत होते. आमच्या तीर्थरूपांच्याहि मनांत लोकांनी तो संशय पुष्कळ घातला; तथापि, त्यांनी त्या आपल्या संशयाचें निराकरण व्हावें म्हणून आपले शेट फ्रामजी कावसजी यांचें समत पुसलें. ते शेट त्या सोसाइटीचे मेंबर होते. त्यानी आमच्या तीर्थरूपांस मोठ्या खुषीने सांगितलें, कि " तुम्ही आपलीं मुलें वेलाशक त्या शाळेंत घाला; त्यांचें शिकणें तेथें फार चांगलें होईल. मी तुम्हांस जर्विस साहेबांवर चिठी देईन." असें शेटजीने सांगितल्यावर आमच्या तीर्थरूपांनीं आम्हांस त्या शाळेंत घालण्याचा विचार केला."

पण नवीन शिक्षणाविषयींची ही प्रतिकूल भावना प्रत्यक्ष कृतींत मात्र मुळींच उतरली नाही. कारण, तें शिक्षण घेण्यावरच नव्या राज्यकर्त्यांची कृपा संपादन करण्याचा सुयोग आणि चांगली नोकरी मिळण्याची संधि या दोन्हीहि गोष्टी अवलंबून आहेत, याची जाणीव सर्वच पांढरपेशा जातींना होती. किंबहुना, सोसायटीचा एक उपाध्यक्ष फ्रान्सिस वॉर्डन याने १८२३ सालच्या डिसेंबरमध्ये, सरकारी शाळेंत इंग्रजी वाङ्मयाच्या शिक्षणावरच मुख्य भर देण्यांत आला पाहिजे, या आपल्या मताचा पुरस्कार करितांना असा निर्वाळा दिला होता की, " मी ज्या एतद्देशीय लोकांशीं या प्रश्नाची चर्चा केली, ते सर्वच आपल्या मुलांना इंग्रजी विद्येंत निष्णात करण्याविषयीं अतिशय उत्सुक असल्याचें आढळून आलें." इतकेंच नव्हे, तर इंग्रजी ही राजभाषा झाल्यावर पुढें पंचवीस वर्षांनी शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न जेव्हां निकराला आला, तेव्हां १८४७ सालच्या मे मध्यें सरकारला सादर केलेल्या आपल्या निवेदनांत सोसायटीचे हिंदी सदस्य जगन्नाथ शंकरशेठ, फ्रामजी कावसजी आणि महम्मद इब्राहिम मकबा यांनी, देशी भाषांच्या माध्यमाची इष्टता प्रतिपादन करितांना, अशी प्रांजळ कबुली दिली होती

की, " इंग्रजी भाषा आणि वाङ्मय यांचें ज्ञान संपादन करण्याची एतद्देशीय लोकांची इच्छा फार तीव्र आणि सार्वत्रिक आहे, हे सत्य आहे; व आपल्या मुलांना देशी शाळेंतून शक्य तितक्या लवकर काढून इंग्रजी शाळेंत घालण्या-साठीं पालकांची जी धडपड चालू असते, तिच्यावरूनहि हें उघड दिसतें. इंग्रजी शिकल्यानें नोकऱ्या मिळणें आणि युरोपियनांशीं संबंध ठेवणें सोपें जातें, हेंच या धडपडीचें कारण होय. " त्यामुळें, या नवीन शिक्षणाचा लाभ फक्त आपल्यालाच मिळावा, खालच्या जातींना त्याचा फायदा मिळूं नये, अशा प्रकारची प्रतिगामी भावना मात्र वरिष्ठ जातींत उत्पन्न झाली. दादोबा पांडुरंग आपल्या आत्मचरित्रांत लिहितात—

" मी या शाळेंत गेल्यानंतर सुमारें एक दीड वर्षांत आमच्या सर्व गुरुजींस व पंतोजींस असा एकाएक हुकूम आला, कि या सोसायटीच्या शाळांत जितकी कुळवाड्याची मुलें असतील, म्हणजे मराठे, कोळी, कुळंवी, भंडारी या जातीचीं मुलें असतील त्या सर्वांस काढून टाकावें व पुढें या जातीचीं मुलें घेऊं नयेत. तेव्हा या जातीची दहावीस—अधिक मुलें आमच्या शाळेंत होतीं, त्यांत कित्येक वरच्या वर्गांत चढलेलीं, व त्यांचा अभ्यास चांगला झाला होता, त्यांस एकदम रजा मिळाली. पुढें थोडक्याच दिवसांनीं माझ्या ऐकण्यांत असें आलें कीं असा परस्पराचा नियम ठरविण्यास मुख्य कारण धाकजी दादाजी परभु हे होते. हे गृहस्थ त्या काळीं या सोसाइटीचे एक सभासद होते. यांणीं जगन्नाथ शंकरशेट व दुसरे हिंदु सभासद मोठ्या आग्रहानें आपल्या पक्षाचे करून हा नियम त्यांजकडून करविला आणि इतर पारशी व युरोपियन सभासदांस असें भय दाखविलें कीं, "जर तुम्ही असा नियम न ठरवाल तर मी सभासदाचें काम पहाणार नाहीं व परभु लोकांची मुलें एथें येण्यास मना करीन." धाकजी दादाजी हे त्या वेळेस वयातीत व मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, जर हे हलक्या जातीचे लोक शिकून पुढें हुशार झाले, तर उंच जातीच्या लोकांत इंग्रेजींत रोजगार मिळणार नाहीं, व त्यांची आपली बरोबरी होत जाईल. हें त्यांचें म्हणणें त्या काळच्या बहुत्येक लोकांस मोठें शहाणपणाचें व

दूर अंदेशीचें असें वाटलें, व त्यांची हिंदू लोकांत बरीच वाहवा झाली. त्यांत त्यांच्या जातींत तर फारच झाली. त्यांच्या त्या काळच्या आंखुड समजुतीप्रमाणें ह्यांना मोठा दोष द्यावा, असें मला वाटत नाहीं. अद्यापि आतां इतके शिक्षित लोक झाले आहेत व सुधारलेपणाचा मोठा अभिमान बाळगतात त्यांच्याहि मनांतून अद्यापि ही ग्रंथि सुटत नाहीं, किंबहुना तेव्हांपेक्षां आता जातिद्वेष आतून अधिक वाढल्यासारखा दिसतो."

पण स्वत: दादोबांनींच म्हटल्याप्रमाणें "हा नियम कांहीं फार दिवस टिकला नाहीं." उलट, ख्रिस्ती मिशन्सच्या शाळांतून कनिष्ठ जातींच्या मुलांना सहेतुक उत्तेजन देण्यांत आलें; व त्यांच्या मनांत जातिभेदाविषयीं चीड, वरिष्ठ जातींविषयीं द्वेष आणि हिंदु धर्माविषयीं घृणा उत्पन्न करण्यांत आली. खालच्या जाति या मिशनरींच्या दृष्टीनें लक्ष्य आणि भक्ष्य अशा जाति होत्या. कारण त्यांच्या अज्ञानाचा आणि दारिद्र्याचा फायदा घेऊन त्यांना पचनीं पाडणें सोपें होतें. इतकेंच नव्हे, तर त्या जातींतील डोळस, विचारी लोकांना, नव्या शिक्षणामुळें आणि जरूर तर धर्मांतरामुळेंहि, नवीन विधर्मी राज्यकर्त्यांशीं समीपता आणि सरूपता प्राप्त करून घेतां येते व व्यावहारिक उत्कर्षाचा मार्ग सुकर होतो, याची जाणीव झपाट्यानें होत चालली होती. या जाणिवेंतून महाराष्ट्रांतील जातीय संघर्षाचा उद्‌भव झाला; व इंग्रजांच्या भेदनीतीमुळे त्याला नंतर व्यापक राजकीय स्वरूप प्राप्त झालें.

इंग्रजी शिक्षणाप्रमाणेंच सुरुवातीला कांही दिवस तरी छापील पुस्तकां-बद्दलसुद्धां वरिष्ठ जातींची भावना प्रतिकूलच होती. वस्तुत:, मुद्रणकला ही महाराष्ट्राला अगदींच अपरिचित आणि अपूर्व होती, असें मानण्याचें कारण नाही. श्रीशिवाजीमहाराजांनी छापखाना काढण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वी न झाल्यामुळें १६७४ सालीं त्यानीं भीमजी पारेख याला तो आपला छापखाना विकला, ही जरी केवळ एक आख्यायिकाच आहे असें मानलें, तरी मराठशाहींतील शेवटला मुत्सद्दी नाना फडणवीस यानें लाक-डाच्या ठोकळ्यांवर अक्षरें कोरवून गीता छापण्याचा उपक्रम केला होता, हें ऐतिहासिक सत्य आहे. हा उपक्रमहि जरी त्याच्या हातून पूर्ण झाला नाही, तरी त्या ठोकळ्यांचा उपयोग करून मिरज संस्थानाचे अधिपति

श्रीमंत गंगाधर गोविंद पटवर्धन यांनी १८०५ सालीं छापलेली गीता पहा-वयाला मिळते. त्याचप्रमाणें तंजावरचा राजा सरफोजी भोसले यानें, डॅनिश मिशनरी फ्रेडरिक त्वार्ज्ञ याच्या प्रेरणेने तेथे छापखाना काढून त्यांत १८०६ सालीं छापलेली सचित्र इसापनीति कथा आणि १८०९सालीं छापलेलें भावार्थ रामायणाचें युद्धकांड हीं पुस्तकेंहि आज उपलब्ध आहेत. तंजावरच्या सरस्वती महालांतील ग्रंथसंग्रहांत असलेल्या या युद्धकांडाच्या प्रतींत छापखान्याला 'अर्णयंत्र' या प्रौढ संस्कृत नामाभिधानाने संबोधिल्याचें आढळतें ! पण, महाराष्ट्रांत इंग्रजी राजवट सुरू होण्याच्या सुमारास कलकत्ता आणि मुंबई येथे जीं पहिलीं मराठी पुस्तकें छापून प्रसिद्ध करण्यांत आलीं, तीं ख्रिस्ती मिशनरोनीं स्वधर्माच्या प्रसारार्थ प्रकाशिलेलीं असल्यामुळे, मुद्रित पुस्तकां-विषयीं एक प्रकारचा प्रतिकूल ग्रह लोकांत साहजिकच उत्पन्न झाला. शिवाय छपाईसाठीं वापरल्या जाणाऱ्या शाईसंबंधीहि तत्कालीन लोकमत अनुकूल नव्हतें. बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दिग्दर्शन' मासिकांत या बाबतींत असा खुलासा मुद्दाम करण्यांत आला होता कीं, "या छापाच्या शाईंत चर्बी पडत असती. यामुळें छापलेले पुस्तक अपवित्र अशी लोकांची समजूत आहे. म्हणोन याविषयीं कांहीं लिहिलें पाहिजे. हे 'दिग्दर्शन' ज्या छापखान्यांत छापतात तेथें चर्बीच्या ठिकाणीं तुपाचा उपयोग करतात, व तेणेंकरून काम चरबी-प्रमाणें होतें." छपाईच्या शाईसंबंधी अशा प्रकारची समजूत असल्यामुळे वरिष्ठ जातींतील धर्मशील लोक छापील ग्रंथांना शिवत नसत. रावसाहेब मंडलिक ज्या पोथ्या सोवळ्यानें वाचीत त्या हस्तलिखित असत, याचें कारणहि हेंच होय. म्हणून बाळशास्त्री जांभेकर यांनीं ज्याप्रमाणें आपले 'दिग्दर्शन' तुपाच्या शाईत छापलें, त्याप्रमाणें एका प्रकाशकानेहि 'तुपाचें गुरुचरित्र' छापून प्रसिद्ध केल्याची जाहिरात त्या काळीं दिली होती ! पाणिनीच्या अष्टाध्यायींतील सूत्रांचें १८४३ सालीं आपण केलेलें मराठी भाषांतर एज्युकेशन बोर्डाकडे पुरस्कारार्थ पाठविलें असतां त्याची कशी संभावना करण्यांत आली, याचा दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या आत्मचरित्रांत केलेला उल्लेखहि, या दृष्टीनें, लक्षांत घेण्यासारखा आहे. त्यांनी असें म्हटलें आहे कीं, "... ... ... ... त्यांहीं तें त्या वेळचे मोठे प्रख्यात विद्वान् बाळ गंगाधर शास्त्री यांजकडेस अभिप्रायाकरतां पाठविलें.

त्याहीं तें साद्यंत लक्ष लावून तपासलें; परंतु त्यांतली पाणिनीची अष्टाध्यायींतली सूत्रें हीं वेदोक्त आहेत. तीं तूर्त छापून अशीं ओवळीं केली असतां लोकांस आवडणार नाहीत असा आपला अभिप्राय दर्शविला, यावरून तो ग्रंथ पुढें न चालवितां मी तसाच बांधून ठेविला. तो पुढें माझ्या संग्रहीं तसाच राहिला. माझे मित्र बाळशास्त्री यांनींही जो त्या ग्रंथाविषयीं आपला अभिप्राय दिला, तो त्या काळच्या समजुतीस अनुसरून होता. मला त्यांत कांहीं फारसा विषाद वाटला नाहीं." पण छापील पुस्तकांसंबंधीची ही आरंभीची विरोधी वृत्तिहि फार दिवस टिकली नाही. विशेषत:, १८३१ सालीं गणपत कृष्णाजी यांचा छापखाना स्थापन होऊन, हिंदु धर्माचें समर्थन करणारीं पुस्तकें त्यांतून प्रसिद्ध होऊं लागल्यावर तर ही वृत्ति झपाट्याने कमी होत गेली. अमेरिकन मिशनरींच्या छापखान्यांत काम करीत असतांना ख्रिस्ती धर्माच्या प्रसारार्थ होणारा मुद्रणकलेचा उपयोग पाहून गणपत कृष्णाजी यांचा धर्माभिमान जागृत झाला; व त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक स्वत:चा छापखाना काढून आणि त्यासाठी लागणारी शाईहि स्वत: तयार करून १८३१ सालीं मराठी पंचांग प्रसिद्ध केलें. त्यांचा छापखाना ही पुढें ख्रिस्ती मिशनरींचे हिंदु धर्मावरील पुस्तकी हल्ले परतवून लावण्याची मुख्य आघाडी होऊन बसली; व त्या काळच्या बहुतेक प्रमुख लेखकांचे अनेक ग्रंथहि त्यांतून मुद्रित होऊन बाहेर पडले. गणपत कृष्णाजी हे महाराष्ट्राचे पहिले मुद्रक होत.

महाराष्ट्राचा हा पहिला मुद्रक थाकजी दादाजी यांनी नवीन शिक्षणाला अनधिकारी ठरविलेल्या भंडारी जातींत जन्मलेला होता आणि त्याने काढलेल्या मुद्रणालयाने सतत पंचाऐंशीं वर्षें मराठी भाषेची संस्मरणीय सेवा केली, ही घटना किती उपरोधपूर्ण आहे!

# ७

अशा रीतीने नव्या पाश्चात्य विद्येच्या प्रसाराचा उपक्रम ज्या वेळीं एल्फिन्स्टनने मुंबई शहरांत केला, त्याच वेळीं त्याने पुणें शहरांत मात्र जुन्या संस्कृत विद्येच्या अध्ययनाची व्यवस्था केली. उण्यापुऱ्या सवाशें मैलांच्या अंतरावर असलेल्या मुंबई प्रांतांतील या दोन शहरांत दोन अगदीं भिन्न शिक्षणप्रणालि एकाच वेळीं प्रवर्तित करण्यांत त्याने प्रकट केलेली मुत्सद्देगिरी या दोन शहरांची परंपरा, परिस्थिति आणि परिसर यांना शोभण्यासारखीच होती, यांत शंका नाही. श्रीशिवछत्रपतीने सह्याद्रीच्या उत्संगावर स्थापन केलेलें पुणें शहर हें पुढे दीडशें वर्षें मराठ्यांची संस्कृति, स्वराज्य आणि साम्राज्य यांच्या संवर्धनाचें केंद्र होऊन बसलें. उलट समुद्र-कांठचीं सहा टीचभर बेटें सलग होऊन बनलेल्या मुंबई शहराच्या अस्तित्वाचा विकासच मुळीं इंग्रजांच्या व्यापारी आणि आरमारी आकांक्षांतून झालेला होता. पुणें हें स्वराज्यांतून साम्राज्यांत झपाट्यानें परिणत होत चाललेल्या वर्धिष्णु स्वकीय सत्तेचें अधिष्ठान होतें. उलट, परतंत्र मुंबई ही केवळ विलायती मालाचीच नव्हे, तर आचारविचारांचीहि बकाल उतारपेठ बनलेली होती. पुण्याचा गाभा हा शेती आणि शिलेदारी यांच्यावर पोसलेल्या अस्सल मराठी बाण्याचा होता. उलट नाना देशांतल्या आणि नाना धर्मांच्या बनियांनी गजबजलेल्या मुंबईला स्वतःचें असें मुळीं कांही वैशिष्टयच नव्हतें स्वराज्याच्या वैभवांत गुंग असलेल्या पेशवाईतील महाराष्ट्राला आपल्या पश्चिम किनाऱ्यावर सह्याद्रीच्या पायथ्याशीं असलेलें मुंबई बेट हें विजिगीषु पाश्चात्य संस्कृतीचें प्रवेश-द्वार आणि प्रभावक्षेत्र बनत चाललें असल्याची गंधवार्ताहि नव्हती. किंबहुना, स्वराज्य नष्ट झाल्यानंतरहि पेशवाईच्या वातावरणांत मुरलेल्या पुण्याचा मुंबईकडे पाहाण्याचा दृष्टिकोन किती अज्ञानग्रस्त आणि अनुदार होता, याचें एक लहानसें प्रत्यंतर लोकहितवादींच्या ऐतिहासिक गोष्टींत सांपडतें. पुण्यांतील तत्कालीन वरिष्ठ समाजाच्या आततायी कर्मठपणाचें त्यांनी असें उदाहरण दिलें आहे कीं, "गंगाधर दीक्षित फडके हा मनुष्य

इंग्रजांस शिकविण्याकरिता पंडित म्हणून सन १८२० पासून १८२५ पर्यंत मुंबईस कामावर होता. पुढें तो पुण्यांत आला, तेव्हां त्यास सर्वांनी बहिष्कृत केलें होतें आणि ते त्यास म्हणत कीं, "हा मुंबईस जाऊन तेथे चार वर्षे राहिला, तेव्हां हा बाटल्याशिवाय कसा राहिला असेल ? " शेवटी तो संन्यास घेऊन मेला ! " कुलाब्याच्या दांडीपाशीं स्वतःचें आरमार उभें करणारे आणि वाळुकेश्वराच्या टेकडीला शिडी लावून त्याचें दर्शन घेणारे श्रीशिवाजीमहाराज सोडले, तर आंग्रयांचा आरमारी तळ मुंबईपासून अवघ्या बावीस मैलांच्या टापूंत असतांनासुद्धां त्या लहानशा बेटांत ब्रिटिश साम्राज्यशाहीचा जो अंकुर हळुहळू वाढत होता, त्याकडे लक्ष देण्याची बुद्धि वसईचा किल्ला जिकण्यासाठी तळ हातावर मस्तक घेऊन झुंजणाऱ्या मराठी मुत्सद्यांपैकीं एकालाहि झाली नाही. त्यामुळे, पुणें शहरांत ज्या वेळीं स्वराज्याचें ऐश्वर्य परमावधीला जाऊन पोंचलें होतें, त्या वेळीं मराठशाहीच्या त्या राजधानीपासून सवाशें मैलांवर असलेल्या मुंबई बेटाची वाढ इंग्रजांच्या नेतृत्वाखालीं युरोपियन पद्धतीने निर्वेध होत होती. हिंदी राष्ट्रीयत्वाचे एक अग्रगण्य पुरस्कर्ते मुंबईचे सिंहोपम सुपुत्र सर फेरोजशहा मेहता हे सुशिक्षितांच्या पहिल्या पिढीचें वर्णन " इंग्रजीपणांत इंग्रजांवरहि मात करणारे ब्रिटिश संस्कृतीचे प्रसव " या शब्दांनीं मोठ्या अभिमानानें करीत असत. इतकी ब्रिटिश संस्कृतीची छाप त्या वेळीं मुंबईच्या जीवनावर पडलेली होती. मराठीची पहिली शाळा मुंबईस निघाली, पहिला मराठी छापखाना मुंबईस काढण्यांत आला, पहिलें मराठी पुस्तक मुंबईस प्रसिद्ध झालें आणि पहिल्या मराठी वृत्तपत्राचा उदयहि मुंबईसच झाला, या गोष्टी खऱ्या. पण, या सगळ्या उपक्रमांना प्रेरणा आणि प्रोत्साहन ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून मिळालेलें होतें; यांपैकीं प्रायः कोणताच उपक्रम स्वदेशाभिमानाच्या आंतरिक स्फूर्तीतून झालेला नव्हता, हें विसरून चालणार नाहीं. उलट, पुणें हें कर्मठ आणि अंशतः कालविमुख असलें, तरी त्या शहरांतील स्वराज्याच्या स्मृतींतून स्वाभिमानाचा स्फुल्लिंग सारखा धगधगत होता.

पुणें आणि मुंबई हीं दोन्हींहि शहरें जरी मराठी असलीं, तरी त्यांच्या धारणेंत आणि दृष्टींत हा जो मूलभूत भेद होता, त्याची एल्फिन्स्टनला पूर्ण

जाणीव होती. १८०२ सालच्या प्रारंभी तो जेव्हा प्रथम पुण्यास आला, तेव्हां पुणें हें संस्कृत विद्येचें अध्ययन आणि उत्तेजन या दोहोंचेंहि भारतांतील सर्वांत मोठें केंद्र होऊन बसलेलें होतें. श्रावण मासांतील दक्षिणेच्या रमण्याचा पेशवाईंतील सोहळा त्याने प्रत्यक्ष पाहिलेला होता. अखिल भरतखंडांतील विद्वान् शास्त्री–पंडितांना श्रावण महिन्यांत दक्षिणा देण्याची प्रथा प्रथम श्रीशिवाजीमहाराजांनी पाडली. पेशव्यांनीं आपल्या भरभराटीच्या काळांत ती इतकी परमावधीला नेली कीं, १७५८ सालच्या श्रावणांत नानासाहेब पेशव्यांनी वाटलेल्या दक्षिणेचा देकार अठरा लक्ष रुपयांवर गेला. पण, श्रीमंतांनी ओगराळ्यांनी पदरांत रुपये ओतलेले असतांनाहि, संतुष्ट न झालेले तेलंगे ब्राह्मण त्यांना शिव्या देत धरणें धरून बसत, असे उल्लेख तत्कालीन पोवाड्यांतून आढळतात. रावबाजीच्या राजवटींत जरी हा श्रावणमासांतील रमणा रोडावला, तरीसुद्धां १७९७ सालच्या श्रावणांत पेशव्याने तीन लक्ष रुपये दक्षिणा दिल्याचा निर्देश असून, शिवाय मोहरा, होन, पुतळ्या, रुपये वगैरेंची जी ‘ खिचडी ’ त्याने वाटली, ती निराळीच ! एल्फिन्स्टनने छत्रपतींचा जीर्णोद्धार केल्यावर प्रथम वाई आणि नंतर नाशिक येथे जाऊन स्वत: जातीने ब्राह्मणांना दक्षिणा वाटली; व स्वराज्यांतील देकाराची ही परंपरा पुढे चालविण्यांत येईल, असें आश्वासनहि जाहीर रीतीने दिलें. पेशव्यांच्या या दक्षिणेंतून सालिना वीस हजार पौंडांचा निधि संस्कृत विद्यालयें काढण्यासाठी आणि पंडितांची संभावना करण्यासाठी निर्माण करण्याचा त्याचा विचार होता. पण, कंपनीच्या डायरेक्टरांच्या ठिकाणीं कोणत्याच प्रकारचें दाक्षिण्य नसल्यामुळे, फक्त पांच हजार पौंडच प्रतिवर्षी खर्च करण्याचें ठरून, पुण्यास पाठशाळेची स्थापना करण्यांत आली. ता. २१ सप्टेंबर १८२१ रोजीं या पाठशाळेच्या स्थापनेसंबंधीं जो जाहिरनामा सरकारने काढला, त्यांत अशी घोषणा केलेली होती कीं,—

“ कुंपणी सरकारची मर्जी आहे कीं, या मुलकांत ब्राम्हण लोक बहुत आहेत. विद्या पढून पंडित व्हावे म्हणून, ऐशास शहर पुणें येथें विश्रामबागेचा वाडा पाठशालेस नेमून विद्या पढवणेस शास्त्री वैदिक वगैरेस नेमिलें आहे. विद्या पढवणे पढणेचा वगैरे तपसील.

८ शास्त्र (१) वैयाकरण, (२) अलंकारशास्त्र काव्य देखील, (३) न्यायशास्त्र, (४) वेदांत, (५) अद्वैत द्वैत, (६) वैद्यशास्त्र, (७) ज्योतीष, (८) धर्मशास्त्र.

३ वेद (१) ऋग्वेद, (२) यजुर्वेद (३) आपस्तंभ–माध्यंदिन.

याप्रमाणें विद्या पढवणेंस वैदिक शास्त्री यांस नेमिलें आहे. त्यांणीं पढवितील.

(२) पढणार लोक जितके येतील तितक्यास विद्याभ्यास जे पाहिजे ते पढवावे. विद्या वाढावयाकरितां अनुत्पन्न पाहून पढणार शंभर विद्यार्थ्यास सरकारांतून दरमहा रुपये ५ प्रो खर्चास पोटाकरिता मिलेल.

(३) विद्या पढणेस लोक जे येणार ते आस्विन सुश्र २ चे दिवसी सर्वत्रांनीं दफ्तरचे वाडयामध्ये दाहा घटिका दिवसास प्रात:काली हजर व्हावे. ज्यास जे विद्या अपेक्षा आहे, ते पढवणेस नेमणेत येईल. सुध ५ दिवसापासून पढवणेस प्रारंभ होईल.

(४) पढवणार व पढणार सुधा वर्तणूक करणेस विद्याअभ्यास अधिकोतर जसे जसे करितील तसे त्यास दक्षणा अधिक मिलेल. न्याय, ज्योतिष, वैद्य शास्त्रास जाजती दक्षणा मिलेल; म्हणोन ऐसे वर्तणूक करणेविषई कितेक कलमाची याद निराली लिहिली आहे, त्याप्रमाणें वर्तणूक करणेत यावे."

ही यादी ता. ६ आक्टोबर १८२१ रोजीं आश्विन शुद्ध द्वितीयेस पाठशाळा उघडण्याच्या वेळीं प्रसिद्ध करण्यांत आली. या यादींतील बारा कलमांत एल्फिन्स्टनचें पाठशाळेसंबंधीचें धोरण, गुरु आणि विद्यार्थी यांच्यासंबंधीच्या अपेक्षा, विद्योत्तेजनाविषयींची कळकळ व ब्राम्हणवर्गाला वळण लावण्याची इच्छा या सर्व गोष्टी उत्कृष्ट रीतीने व्यक्त झालेल्या दृष्टीस पडतात. तिच्यांतील कांही महत्त्वाचीं कलमें पुढे दिलीं आहेत:—

(१) हिंदु लोकाची आबादी व खुषी ठेवावयाचा इंग्रजी सरकारचा सांप्रदाय पहिल्यापासून आहे. यास्तव माहाराष्ट्र दक्षणेचे मुलकास विद्या पढावयाकरिता व ब्राह्मण ज्ञातींत अध्ययन पूर्वीपासून चालत आल्या-प्रमाणें होत असावे याजकरिता गोनरसाहेब बाहादर याणी विद्या कायम

राहावयावर नजर ठेऊन शहर पुणे येथे पाठशाला चालवावयाचा निश्चय केला असे.

(२) सदरहू हुकूम अमलात आणण्याविषई कमिशनर बाहादर याणी पाठशालेस आरंभ ६ आक्टोबर तेरखेस करून दक्षणेस थोर ब्राह्मण विद्यान आहेत त्यापैकी अध्ययन सांगण्यास गुरूची नेमणूक केली ..... सदरहू दाहा आसामीपैकी येक मुख्तसर शास्त्री केले आहेत व याशिवाय गुरूस मेहेनत भारी होईल सबब चितणिका सांगणारहि मुकरर केले आहेत.

(३) हर कोणी संभाविताचे पुत्र विद्याभ्यास करण्याची उमेद ठेवून पाठशालेस येतील त्यास काही खर्च न लागता अध्ययन सांगण्याची परवानगी होईल. परंतु विद्याभ्यासाची बहडती होण्याकरिता सरकारातून शंभर विद्यार्थी यांस हर येकास दरमाहा पाच रुपये पोटगीबद्दल दिल्हे जातील व सदरहू शंभर विद्यार्थी याची हरयेक विद्येस दाहा विद्यार्थी या प्रो नेमणूक होईल.

(५) गुरूस उतम प्रकारची नेमणूक केली आहे. त्यास त्यांचे काम हेच आहे की, विद्यार्थी यांस अध्ययन सांगोन त्यांची वागणुकीची चौकशी करीत असावे व हरवख्त त्यास चांगला बुध्यीवाद सिकवीत असावे. गुरु सरकारचे इलाकेदार असे समजून हिंदुधर्माविसी यकाधे वेळेस कारण पडेल तेव्हा शास्त्रार्थ सरकारातून पुसतील त्याचे उतर गुरूनी वास्तविक देत असावे.

(७) वर्षास येक वेल पाठशालेचे चौकसीस सरदार लोक येतील. ते विद्यार्थी लोकाची परीक्षा मोठे मोठे विद्वान ब्राह्मणाचे हातून करवितील. त्यात जे चांगले नजरेस येतील त्याची सिपारस होऊन दक्षणेसमई प्रतिष्टा उतम होईल. वेदशास्त्रामध्ये जे हिंदू लोकांनी पाहावयाचे असेल ते त्याणीच पाहावे.

(८) विद्यार्थी याणी कोणतेहि विद्येचा अभ्यास करावा. त्याविसी सरकारांतून कोणताहि नेम होऊन येणार नाही. परंतु पाठशालेत विद्यार्थी शंभर त्यापैकीं सतर शास्त्राकडे तीस वैदिक या प्रो एकूण दाहा शाला.

प्रेकेके शालेस दाहा दाहा विद्यार्थी असावे. इतका नेम सरकारांतून जाला. विद्यार्थी यास यातून जी विद्या पाहिजे ती पढावी, परंतु धर्मशास्त्र व ज्योतिषशास्त्र. व वैद्यशास्त्र. याचा उपयोग वारंवार सर्व लोकास आहे, याजकरिता याचा अभ्यास अधिकोतर करून जे चांगले होतील त्यांची प्रशंसा होऊन बक्षीस मिळेल.

(९) पाठशालेची व्यवस्था मुख्य सर शास्त्री व दुसरे गुरू याजकडे सोपून दिल्ही. त्याणी आपलाले कामाचा बंदोबस्त ठेवावा. सरकारांतून तो बंदोबस्त पाहू लागल्यास हिंदुधर्मास विरोध दिसेल. याजकरिता पाहाणार नाही. शास्त्री व गुरू पाठशालेत विद्यार्थी याचे वहिवाटीकरिता चकनामे करितील त्याप्रमाणे गुरूनी व विद्यार्थी याणी वागत असावे. त्यात ज्याकडून काहीयेक अंतर पडेल त्यावर सरकारची गैरमर्जी होऊन पाठशालेतून मौकूफ होईल.

(१०) राघवाचार्य रामानुजण थोर विद्वान जाणोन पाठशालेत मुख्तसर केले आहेत. ते गुरुवर व विद्यार्थी यावर व शालेचे इलाखदार यावर हुकूम करितील व वाईट बरें गुरूपासून किंवा सिष्यापासून काय जे होईल ते सरकारांत जाहीर करितील. या करिता सर्वांनी त्यांचे हुकुमांत वागत असावे.

(११) पुस्तकें हाली सरकारांत आहेत ती दरोबस्त पाठशालेंत विद्यार्थी यांस विद्याभ्यास करण्यास ठेविली जातील. याशिवाय आणखी पुस्तकें लागतील ती समजवावी म्हणजे छापिले पुस्तके कलकतेहून आणऊन पाठशालेत दिल्ही जातील."

ही पाठशाळा सुरू झाल्यानंतर पुन्हा १८२२ सालच्या जुलैमध्यें "विश्रामबागचे वाड्यांत पाठशाला घातली आहे त्यास वहिवाट करण्याची कलमे" सरकारने प्रसिद्ध केली. त्यांत एक कलम असें होतें कीं, "शालेपैकीं कोणी आजारी जाहाला तरी सरकारातून वैद्य पाठऊन औषधाचा व पथ्यापाण्याचा बंदोबस्त व्हावा." खुद्द पेशवाईतसुद्धां ब्राह्मण-वर्गाच्या विद्याव्यासंगाची इतकी काळजी तत्कालीन शुद्ध ब्राह्मणी सरकारनेंहि कधीं घेतली नसेल !

## पाठशाळेंतील पेशवाई थाट

पेशव्यांच्या दक्षिणानिधींतून संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनार्थ १८२१ साली निर्माण झालेल्या या पाठशाळेचें पर्यवसान १८५१ सालीं पुणें कॉलेजच्या स्थापनेंत होईपर्यंत तिच्या स्वरूपांत जे बदल झाले, ते पुण्यांतील केवळ शैक्षणिक परिवर्तनाचेच नव्हत, तर सामाजिक स्थित्यंतराचेहि निदर्शक म्हणावे लागतील. ‘पुणें शहराचें वर्णन’ या ग्रंथांत या पाठशाळे-संबंधीं अशी माहिती दिली आहे की,—

“चॅपलेन साहेब, चीफ कमिशनर, यांस असें वाटलें कीं, कांही तरी पुण्यांतील लोकांस विद्यादान द्यावे, म्हणून त्यांनीं सरकारांत असें लिहिलें कीं, हिंदूंच्या विद्येचे जे उपयोगी भाग आहेत, ते चांगले रीतीनें वृद्धिगत करण्याकरितां एक विद्यालय घालावे. त्यास पैसे दक्षणेसाठीं जे ५०,००० रुपये आहेत, त्यापैकीं २०,००० रुपये निराळे काढून विद्याखात्याकडे द्यावे.

हें मंजूर होऊन आल्यावर सन १८२१ सालीं येथे पाठशाळा स्थापिली, त्यांत न्यायशास्त्र, वेद, ऋग्वेद, यजुर्वेद, धर्मशास्त्र, व्याकरण, वैद्य, अलंकार इत्यादि विषय शिकविण्याकरितां गुरु व उपगुरु नेमले. शंभर विद्यार्थी जमवून शाळा विश्रामबाग येथें स्थापित केली. त्यावर मुक्तसर न्यायशास्त्राचे शाळेचे गुरु रा. राघवाचार्य यांस नेमले. पाठशाळेची देखरेख कमिशनरसाहेबै कांही दिवस पहात असत. पुढें ते काम कलेक्टर साहेबाकडे आले. तरी काम बरोबर चालेना म्हणून त्यावर एका निराळ्याच मनुष्याची योजना करावी असे ठरवून सन १८३७ चे फेब्रुवारी महिन्यांत मेजर कँडी साहेबांची योजना केली. या वेळेपासून काम फार सुरळीत रीतीनें चालले.

या शाळेंतील गणपतीच्या उत्सवास फार खर्च होई. कथा चक्री ( ब्राम्हणांचे म्हणणे ) खेरीज रोपनाई सर्व मिळून दोनशें रुपये खर्च होतो असें सांगतात. दिपवाळींत सर्व विद्यार्थ्यांस तेथें अभ्यंग स्नान खेरीज फराळास करंज्या, लाड, अनरसे, कोडबोळी इत्यादि मिळत असत. असा पेशवाई थाट त्या पाठशाळेंत चालला होता.

*या पाठशाळेवर* ज्या साहेबांची नेमणूक झाली होती त्यास त्या वाड्यांत येण्याची *परवानगी नव्हती.* दरवाज्याच्या बाहेरून एक रस्ता पुढलें दिवाणखान्यांत जातो. त्या वाटेनें त्यानें येऊन त्या दरवाज्यावरील दिवाणखान्यांत बसावें. कोणास साहेबाचा विटाळ झाला असता त्यानें घरी जाऊन सचैल स्नान करावें. असें सांगतात कीं एक वेळ साहेब वाड्यांत आले म्हणून उदकशांति केली. याप्रमाणें पूर्वी या शाळेंत सोंवळ्याचें महत्त्व होतें. पुढें साहेबास शिवल्याशिवाय अथवा वाड्यांत येऊं दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें पाहून वस्त्रांतर करूं लागले. पुढें राजास मुळींच विटाळ नाहीं, साहेबानें यावे पण बैठकीवर मात्र बसूं नये असे शास्त्रार्थ काढले. या वेळेस दयाळू कँडीसाहेब यांनी लोकांस गुलवून गुलवून त्यांचीं वेडीं मनें इतकीं फिरविलीं कीं जे शास्त्री कँडीसाहेबास शिवले असतां स्नान करीत त्यांचेच वंशज त्यांच्या डोक्यांतील वेडीं मतें काढून महारांस शास्त्रें शिकविण्यास लागले.''

ही पाठशाळा आणि तिच्या जोडीला चालू ठेवण्यांत आलेली वार्षिक दक्षिणेची प्रथा या दोहोंवरहि एका बाजूने ख्रिस्ती मिशनरी आणि दुसऱ्या बाजूनें लोकहितवादींसारखे अविवेकी समाजसुधारक या दोघांनीहि शस्त्र धरलें. वस्तुतः या पाठशाळेच्या मुख्तसराला मासिक पगार फक्त १०० रु. होता; व इतर अध्यापकांचे पगार ६० ते १०० रुपयांपर्यंत होते. उलट, एलिफन्स्टन इन्स्टिटयूशनच्या गोऱ्या प्रिन्सिपॉलचें मासिक वेतन रु. ७०० होतें; व त्याच्या हाताखालील दोघा गोऱ्या उपाध्यापकांचा पगार अनुक्रमें रु. ६०० आणि ४०० होता. त्याचप्रमाणे खुद्द पाठशाळेवर देखरेख करणाऱ्या गोऱ्या सुपरिंटेंडेंटलाहि २३३ रु. पगार मिळत असे. मेजर कँडी आणि मोरेश्वरशास्त्री साठे यांची नेमणूक या पाठशाळेवर सुपरिंटेंडेंट आणि मुख्तसर म्हणून झाल्यानंतर तिची कार्यक्षमता वाढली; व कृष्णशास्त्री राजवाडे, महादेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, विष्णुशास्त्री पंडित यांच्यासारखे श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथकार आणि कार्यकर्ते तिच्या विद्यार्थिवर्गांतून उदयाला आले. मोरशास्त्री हे जरी जुन्या पद्धतीने शास्त्राध्ययन केलेले पंडित होते, तरी आपल्या भोवतालच्या

झपाट्याने बदलत चाललेल्या परिस्थितीचा रागरंग ओळखण्याचें चातुर्य त्यांच्या ठिकाणीं होतें; व त्यांची दृष्टिहि आधुनिक आणि उदार होती. म्हणूनच, १८४२ सालीं मेजर कँडीने इंग्रजीचे वर्ग पाठशाळेंत सुरू केल्यावर शास्त्रीबुवांनी स्वत: इंग्रजी शिकावयाला प्रारंभ केला; कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारख्या आपल्या बुद्धिमान् शिष्यांना या नव्या विद्येचें शिक्षण घ्यावयाला प्रोत्साहन दिलें; बाळशास्त्री जांभेकर यांनी हातीं घेतलेल्या श्रीपत शेषाद्रि या धर्मांतरित मुलाच्या शुद्धीकरणाच्या कार्याला पुण्याच्या शास्त्रीमंडळीकडून संमति देवविली; व 'कल्याणोन्नायक मंडळी' या नांवाची संस्था काढून लोकमताला प्रगतिपर वळण लावण्याचाहि प्रयत्न केला. "ही सभा दर आदित्यवारी जमे. त्या वेळेस शास्त्रीबुवा हे एकाद्या विषयावर फार चांगलें भाषण करीत; व लोकांची त्या बाबद जी काय वेडी समजूत असे, ती दूर करीत," अशा आशयाचे अभिप्राय या सभेसंबंधीं जुन्या ग्रंथांतून आढळतात. १८५२ सालीं सुरत येथे शास्त्रीबुवांची मुन्सफ म्हणून नेमणूक झाल्यावर एज्युकेशन बोर्डाने आपल्या वार्षिक प्रतिवृत्तांत त्यांच्याविषयी असे गौरवपर उद्गार काढले होते की, "त्यांची बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि बहुश्रुतता यांच्याबद्दल ग्वाही देतांना बोर्डाला संतोष वाटतो. भारताच्या या भागांत त्यांच्यापेक्षा अधिक विद्वान् एतद्देशीय असलेच तर अगदी थोडेच असतील, असा आमचा विश्वास आहे. ज्या नव्या अधिकारावर आतां त्यांची नेमणूक झाली आहे, त्यांतहि त्यांना उत्तम यश यावें, असे आम्ही इच्छितो." बोर्डाच्या या उद्गारांवरून मोरशास्त्री साठे यांची विद्वत्ता आणि एकंदर योग्यता यांविषयी तत्कालीन वरिष्ठ इंग्रजी अधिकाऱ्यांची भावना काय होती, याची यथार्थ कल्पना येते. उलट, पाठशाळेचा त्या वेळचा सुपरिंटेंडेंट मेजर कँडी याच्यासंबंधीं आपल्या 'बालबोध' मासिकामध्ये १९११ सालीं लिहिलेल्या चरित्रलेखांत विनायक कोंडदेव ओक यांनी अशी मार्मिक शंका व्यक्त केली होती की, "मेजर कँडी साहेब म्हटले म्हणजे लष्करी खात्यांतील नोकर होते. त्यांची नेमणूक कोश तयार करणाऱ्या कामावर आणि पाठशाळेच्या मुख्य अध्यापकाच्या कामावर, त्या वेळीं कोणकोणत्या योगांनी कशी झाली असावी ह्याचें मोठें

आश्चर्य वाटते." १८४१ ते १८५२ म्हणजे सुमारें अकरा वर्षे मोरशास्त्री हे पाठशाळेचे मुख्तसर असतांना तिचा लौकिक सर्व महाराष्ट्रांत पसरला; व दिग्विजयी सभानायक म्हणून त्यांचीहि संभावना मुंबईसारख्या पाश्चात्य संस्कृतीच्या आहारीं गेलेल्या राजधानीच्या शहरांतूनसुद्धां झाली.

तथापि, अशा या त्या काळच्या अग्रगण्य चतुरस्र पंडिताने चालविलेल्या पाठशाळेचा आणि 'कल्याणोन्नायक मंडळी'चा अधिक्षेप 'पुरंदरचें बंड' या शब्दांनी करून लोकहितवादींनी १८४८ ते १८५० सालच्या दरम्यान लिहिलेल्या आपल्या 'शतपत्रां'त त्यांच्यावर असा कडाडून हल्ला चढविला कीं,—

"(१) 'कल्याणोन्नायक मंडळीं'तील सभासद संस्कृत विद्येचा पक्ष घेतात; परंतु हा पक्ष व्यर्थ आहे. कारण कीं, संस्कृतांत फार विद्या आहे, असें सांगून लोकांस पंडित प्राचीन काळीं फसवीत होते; परंतु आजचा काळ असा आहे कीं, संस्कृताची उघडीक होऊन पंडितांचें सर्व ज्ञान बाहेर पडले आहे. असें असतां हे सभासद वापडे सर्व पाठशाळेंतील पंडित आहेत; परंतु त्यांस वास्तविक ज्ञान कांहीं नाही. संस्कृत भाषेतील खुळें यांचे मनांत भरली आहेत. तीं झाकून ठेवतील तर फार बरे होईल.

(२) संस्कृताचा इतकाच उपयोग आहे की, लोकांमध्यें भ्रांति उत्पन्न व्हावी व जों जों मनुष्य त्यांत प्रवीण होतो, तों तों अज्ञानसमुद्रांत खोल खोल जात असतो. असें असून कोणी म्हणेल, पाठशाळा सरकारनें कशास चालविली आहे? तर शाळेपासून जे फळ आता दृष्टीस पडूं लागले आहे, तेंच येईल, असें पूर्वी वाटलें नवते. तेव्हा असें वाटत होते की, कोणीकडून तरी विद्येची गोडी या लोकांस लागेल, नंतर लोकांस जी विद्या म्हणून वाटते, त्यांतच अनुपान करून चांगली विद्या शिकवावी. अशा बुद्धीनें हें बीज घातलें. त्यास दक्षिणादिकें करून जलसिंचन केलें. परंतु या वृक्षास इच्छिलें फळ आलें नाही. उलटें आणखी अज्ञान वाढलें.'

"जांस समजत नाही, त्याणे उगेंच बसावें, हें बरें; बोलूं नये, म्हणजे शहाणपणाचा ठाव लागत नाहीं; असे आहे.

अनुक्रम

परंतु तो मार्ग सोडून 'कल्याणोन्नायक मंडळीनें' आपलें ज्ञान प्रसिद्ध करावयास इच्छा केली, हें पाहून मला फार आश्चर्य वाटतें. यांचें ज्ञान कोणाचे उपयोगी नाही. लोकांचें कल्याण हे कसें करितात? त्यांस प्रथमच प्रश्न उलगडत नाही. हे पुसतात की, सुधारणा म्हणजे काय? यांस आपली सुधारणा झाली पाहिजे, हेंच कळत नाही. आम्ही सर्वज्ञ व भूदेव व आमच्या पोथ्यांत सर्व ज्ञान आहे, व आम्हांस काय आणखी कर्तव्य आहे? असें वाटतें. हे अजून पहिल्याच धड्यांत आहेत!

यांणी लोकहिताचा प्रयत्न केला असें कोणास आजपर्यंत स्मरण नाही. त्यांनी आपले पोटावर व शालजोड्यांवर नजर देऊन सर्व देश खराब केला! जोपर्यंत कांही मूर्ख लोक देशांत आहेत व ते मानतात, तोपर्यंत यांचीं ग्रामण्यें चालतील. व कांही दिवसांनी हे जुने लोक गेले, म्हणजे पंडित उताणे पडतील; परंतु या गोष्टीस दहावीस वर्षें आणखी पाहिजेत. म्हणजे आम्हीच या पंडितांचा तमाशा पाहूं. तथापि प्रथम पाठशाळेचा विध्वंस झाला पाहिजे; म्हणजे एक पुरंदरचे बंड मोडलें."

पाठशाळेचा 'विध्वंस' करण्याचें लोकहितवादींचें हें शतकृत्य एका बाजूनें भारतीय संस्कृतीच्या नांवाने तिलांजलि घेऊन उभे असलेले ख्रिस्ती मिशनरी आणि दुसऱ्या बाजूने भारतीय शिक्षणपद्धतींत युरोपियन विद्यांनाच सर्वथैव प्राधान्य दिलें पाहिजे असें प्रतिपादन करणारे वरिष्ठ अधिकारी यांच्या प्रभावाने लवकरच तडीस गेलें. ख्रिस्ती मिशनरींचे या शाळेवर दोन आक्षेप होते: एक तर, तिच्यांतील सर्व शिष्यवृत्त्या फक्त ब्राह्मणांसाठीच ठेवलेल्या होत्या; व दुसरें, ब्राह्मणांव्यतिरिक्त इतर जातींच्या विद्यार्थ्यांना तींत प्रवेश नव्हता. पण मेजर कँडी हा पाठशाळेचा प्रमुख झाल्यावर त्याने ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना तिचीं दारें खुलीं केलीं; व या त्याच्या उपक्रमाला कांही शास्त्र्यांनी जरी प्रथम विरोध केला, तरी नंतर हळुहळू तो अमलांत आणण्याच्या कामीं त्यांचें सहकार्य त्याला मिळालें. मेजर कँडी याच्या या आज्ञेमुळे पाठशाळेंतील शास्त्रीमंडळींत आरंभीं जी खळबळ उडाली, तिचें 'ज्ञानोदय' या ख्रिस्ती वृत्तपत्राने असें वर्णन केलें होतें की,—

"कांहीं दिवसांपूर्वी मेजर क्यांडी याजपासी एका परभूनें पाठशाळेंत संस्कृत शिकविण्याची आज्ञा मागितली होती. परंतु त्यानी गुरु उपगुरूंच्या नादीं लागून नकारल्यासारखें केलें. पण आतां कित्येक शास्त्र्यांस क्यांडीनें असें निक्षून सांगितले आहे कीं कोणाहि संस्कृत शिकण्यास इच्छिणारास तुम्हास शिकविलेंच पाहिजे. एवढ्यावरून कित्येकांच्या मनांत राजीनामा देण्याचें आलें आहे असें समजतें. हा त्या शास्त्र्यांचा अगदीं वेडेपणा आहे. इंग्रज लोकांसहि हे शास्त्री वेदशास्त्रे पुराणें शिकवीत असतात मग जे लोक देशधर्म या संबंधानें आपणास इतके जवळ त्यांस संस्कृत भाषा शिकविण्यास त्यांही कशाकरितां हरकत घ्यावी? त्या शास्त्र्यांस आमचें असें सांगणें आहे कीं त्यांनी चाकऱ्या सोडल्या तर त्यांत सरकारचें कांहीं नुकसान नाहीं उलटा नफाच आहे. त्यास यापेक्षां थोड्या पगारांत दुसरे पुष्कळ शास्त्री मिळतील.

सर्व प्रकारच्या विद्या सर्व जातीच्या लोकांत शिकविण्यास सरकारी शाळांत मना नाहीं असें सर्व भरतखंडांतून ठरलें गेलें आहे. व त्याविषयीं हरकत करण्याचा उपयोग नाहीं. बंगाल सरकार व मद्रास सरकार यांनीं ठरविले आहे कीं, संस्कृत पाठशाळेंत सर्व जातीच्यांस संस्कृत शिकविले पाहिजे. त्याप्रमाणें विलायत सरकार व येथील सरकारहि समजत आहे. सरकारला केवळ ब्राह्मणाकडून पैदास आहे असें नाहीं. त्यास सर्वांकडून उत्पन्न आहे म्हणून विद्यादान, संरक्षण वगैरे सरकारनें सारखेंच केले पाहिजे."

मेजर कँडी याने १८४२ सालीं पाठशाळेंत इंग्रजी वर्ग उघडल्यावर तर तिच्या स्वरूपांत पुष्कळच बदल झाला. शाळेचे मुख्तसर मोरशास्त्री साठे हे स्वत: या वर्गांत दाखल झाले; व महादेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर प्रभृति आपल्या शिष्यांनाहि त्यांनी ही नवी विद्या शिकण्याचा आदेश मोठ्या कळकळीनें दिला.

पाठशाळेंत हे वर्ग उघडण्यापूर्वीच १८३२ सालीं सरकारने बुधवार वाड्यांत स्वतंत्र इंग्रजी शाळा काढला होता. मुंबईस निघणाऱ्या 'दर्पण' पाक्षिकाच्या ता. २१ सप्टेंबर १८३२ च्या अंकांत अशी बातमी आली होती की,

" ...... पुण्यात सरकाराने एक इंग्रेजी शाळा घातली आहे आणि तीमध्यें शिकविणारा मेस्तर ईझिल या नांवाचा साहेब नेमिला आहे. तो साहेब इंग्रेजीमध्यें विद्वान आहे, आणि मराठी भाषाहि जाणतो, म्हणोन जा कामावर त्यास नेमिला आहे, ते काम चालवायाची त्यामध्यें चांगली योग्यता आहे असें आम्ही ऐकतों. . . . पुण्यांत लोक संभावित आहेत आणि या देशचे लोकांत इंग्रेजी शिकण्याची इछा वाढत चालली आहे, यामुळें आम्हांस निःसंशय वाटतें कीं, सरकाराने इछिल्याप्रमाणें घडोन येईल."
यानंतर पुन्हा पाऊण महिन्याने हीच बातमी 'दर्पण'ने प्रसिद्ध केली आणि तीत 'शाळागुरु' सुपरिटेंडेंट डी. ए. एस्डेल याला दरमहा ५०० रु. पगार असल्याचें वृत्त दिलें. योगायोग असा की, पुण्यास सरकारने ही शाळा सुरू केल्याची वार्ता 'दर्पण' मध्ये झळकल्याला दीड महिना होतो न होतों, तोंच हैंद शाळापुस्तकमंडळीला 'सरकारांतून दरसाल मिळणारा पैका कमी केला' असल्याबद्दल त्याच्या ता. ९ नोव्हेंबर १८३२ च्या अंकांत संपादकीय टीकालेख आला. या लेखांत प्रथम, "या मंडळीसाठी गेल्या चार पांच वर्षांपासून सरकारांतून दरसाल रुपये ४०,००० अथवा ५०,००० खर्च सरासरी होत असे .... त्याबद्दल आता दरसाल २०,००० रुपये मात्र मिळतात," अशी माहिती देऊन नंतर 'दर्पण' चे संपादक बाळशास्त्री जांभेकर यांनी अशी टीका केली होती की,—

" नेटिवलोकांचा शिक्षेकरितां इतका खर्च फार आहे असा सरकारचा विचार आहे, यास्तव त्यांही तो पैका कमी केला किंवा या देशाचें मध्यें स्थानीं ज्या शहरांत पुष्कळ लोक आहेत, तेथे शाळा मांडून त्याचा खर्च या पैक्यांतून चालवावा, म्हणजे मग कार्य अधिक बरें होईल, असें सरकारने समजोन तशा बेतानें तें केलें, हें आमचानें निश्चय सांगवत नाहीं. खरे कीत्येक मनुष्यें असें समजतात कीं मागील विचार सत्य आहे, आणि तो अर्थ साधावयास पुण्या मध्यें मोठ्या आणि प्रौढ रितीनें इंग्रेजी शाळा घालण्याचा विचार केला आहे. ...कारण कांहीं असलें तरी, नेटिव लोकांचा शिक्षेची जे इछा करतात, त्यांस ही गोष्ट वाईट वाटेल, अशी आमची खातरी आहे. जेव्हां राजा किंवा लोक आपल्यास ज्ञानी

म्हणवतात, तेव्हां राज्य चालविणाराचा धर्म आहे कीं प्रजामध्यें ज्ञान वाढवायाकरितां आणि त्यांचीं मनें चांगलीं करायाकरितां त्याणें सर्व प्रकारें आश्रय द्यावा आणि साह्य व्हावे, असें करण्यानें जे लाभ होतात ते जेव्हा इतके समजण्यांत आले, आणि मान्य केले गेले आहेत, कीं मनुष्यास, त्यांचीं ज्ञान इंद्रियें चालू करण्यानें ज्ञानावस्थेंत आणावे, हें प्रितीचें कृत्य फारच उत्तम आणि उपयोगी आहे; जेव्हां सामान्य मनुष्यें नेटिव लोकांची मनें बरी व्हावी म्हणोन सर्व यत्न करतात; आणि अशा यत्नांचे चांगलें फळाचा दाखला, कलकत्त्याकडे पाहिले असतां चमत्कारिक आणि अश्रय द्यायास योग्य दिसून येतो. अशा समई, या देशांत जे त्याच कारणास्तव श्रम करतात, त्यांस सरकारनें आजदीन-पर्यंत जें साहित्य केलें होतें, त्यांतील एक मोटा अंश कमी केल्यानें, त्यांस इतके अश्रय हीण करावें आणि त्यांचा श्रमाचें फळ प्राप्त व्हाया करितां जे उपाय होते ते इतके कमी करावे, हा विचार केल्यानें आम्हांस फार दुःख होतें यांत संशय नाहीं,"

जांभेकरांनी ही टीका तत्कालीन जबाबदार विवेकी लोकमताची निदर्शक आहे. वस्तुतः, पुण्याची संस्कृत पाठशाळा ही दक्षिणानिधींतून निघालेली असल्यामुळे सरकारी इंग्रजी शाळा तिच्या मुळावर येण्याचें कांहींहि कारण नव्हतें; व मुंबईची एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन ही एल्फिन्स्टन निधींतून निर्माण झालेली असल्यामुळे तिचाहि विकास हैंद शाळापुस्तक-मंडळीला बाधक व्हावयाला नको होता. पण, युरोपियन विद्यांच्या शिक्षणा-वर भर देण्याची सरकारची प्रवृत्ति जसजशी बळावत गेली, तसतसें देशी भाषा आणि संस्कृत विद्या यांना उत्तेजन देण्याचें त्यांचें सुरवातीचें धोरण सुटत चाललें, हाच या प्रकाराचा अर्थ होय. आपल्या 'इंग्रजी विद्ये' वरील पत्रांत लोकहितवादींनी असे उद्गार काढले होते कीं,—

"पुणें शहरांत प्रथम १८३२ सालीं इंग्रजी शाळा घातली, तेव्हां लोकांची अशी समजूत होती की, इंग्रजांचा स्पर्श झाला, तर स्नान करावें व इंग्रजांची भाषा शिकली, तर ब्राम्हणपणा जातो. याजमुळे त्या समई रॉबर्टसन साहेब कलेक्टर यांनी आर्जवाने गृहस्थांची मुलें

थोडीशीं जमविलीं. नंतर कांही दिवसांनी पुष्कळ लोकांच्या समजुती बदलल्या आणि खुशीने मुलें पाठवूं लागले; परंतु पहिल्या समजुतीचे ब्राम्हण अद्यापि ब्रहुत आहेत. त्यांच्याने लोकांस इंग्रजी शिकण्यापासून तर बंद करवत नाही; परंतु आपल्या मंडळींत ते असें बोलतात की, जे इंग्रजी शिकले आहेत, ते नास्तिक, निर्दय, अधर्मी, अमर्याद आहेत. "

या सगळ्या एककल्ली, विकृत प्रचाराचा परिणाम, संस्कृत पाठशाळा अजिबात बंद होऊन, १८५१ सालच्या जूनमध्ये तिच्या जागीं पूना कॉलेज स्थापन होण्यांत झाला. 'ज्ञानोदया' ने आपल्या ता. १६ जून १८५१ च्या अंकांत या घटनेचें वर्णन असें केलें होतें की,—

" पुण्यांत इंग्लिश सरकारनें संस्कृत पाठशाळा १८२१ सालीं घातली तेव्हांपासून कांहीं फेरफार होत आले. अलिकडे दोन वर्षामागें या शाळेचे निरुपयोगाबद्दल मुंबईचे वर्तमानपत्रांत बहुत वादविवाद झाला. त्या वेळेस सर्व वर्तमानपत्र करणारे जितके होते त्यांचा एक अभिप्राय पडला होता.. सरकारनें असा विचार केला कीं पुण्यांतील इंग्लिश शाळा आणि पाठशाळा असा एकत्र करून संस्कृत विद्या कमी करून इंग्लिश वाढवावे म्हणजे शाळा उपयोगी होईल, आणि पुण्यांतील लोकांस बहुत फायदा होईल. यास्तव हा बेत पसंत होऊन पहिली संस्कृत शाळा म्हणत होते ते नांव बदलून पुण्याचें कॉलेज म्हणजे विद्यालय असें नांव ठेवलें आणि या विद्यालयास आरंभ करण्याचा समारंभ करण्याकरितां ज्युडिशल कमिशनर यांची रवानगी झाली. त्यांनी शनिवारी ता. ७ माहे जून रोजी सर्व लोकांची सभा भरून या नवीन विद्यालयाचे उपयोगाविषयी संभाषण केले. "

अशा रीतीने, मुंबई आणि पुणें या दोन शहरांतील शिक्षणपद्धतींत तीस वर्षे जो भेद होता, तो नाहीसा होऊन हीं शहरें अखेर एकाच शैक्षणिक धोरणाच्या दावणींत गोवलीं गेलीं. पाठशाळेबरोबरच शास्त्रीपंडितांना—लोकहितवादींच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'घोकी भटां'ना—प्रतिवर्षी दक्षिणा देण्याची प्रथाहि बंद करण्यांत आली; व त्या निधीचा विनियोग करण्यासाठी 'दक्षिणा प्राइज कमिटी' अस्तित्वांत येऊन तिच्या मताने

उत्तम ठरणाऱ्या ग्रंथांना पारितोषिकें देण्याचा क्रम सुरू झाला. या सगळ्या परिवर्तनाची परिणति १८५४ सालीं कंपनी सरकारने आपल्या खलित्यांत प्रवर्तित केलेल्या नव्या शैक्षणिक नीतींत झाली. सर फेरोजशहा मेहता यांनी या खलित्याचें वर्णन 'भारतांतील शैक्षणिक हितसंबंधांची बडी सनद' (The great charter of the educational interests in India) या शब्दांनी केलें होतें. या नव्या शैक्षणिक नीतीचे मुख्य उद्देश दोन होते: एक युरोपांतील विद्यांचा प्रसार भारतांत करणें आणि दुसरें सर्व उच्च शिक्षण इंग्रजी भाषेच्या माध्यमांतून देणें. त्याबरोबरच, माध्यमिक शाळांतून देशी भाषांचा अभ्यास आणि अभिवृद्धि यांच्यावर भर देण्यांत यावा, अशीहि शिफारस या 'बड्या सनदें'त करण्यांत आलेली होती. शिक्षणाचें माध्यम होण्याच्या देशी भाषांच्या पात्रतेसंबंधीं जी आशा या शिफारशींत व्यक्त करण्यांत आलेली होती, ती सुद्धां सर फेरोजशहा मेहता यांना रुचली नाही. यानंतर तीन वर्षांनी म्हणजे १८५७ सालीं लंडन युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर मुंबई विद्यापीठाची प्रतिष्ठापना होऊन नव्या शैक्षणिक नीतीचें मध्यवर्ती केंद्र मुंबई येथे निर्माण झालें. त्यामुळे अर्थातच पूना कॉलेजच्या परिस्थितींतहि बदल झाला. त्याला सर्वांगपूर्ण महाविद्यालयाचें स्वरूप देण्यांत येऊन तें विश्रामबाग वाड्यांतून प्रथम १८६५ सालीं शहराबाहेर वानवडीला नेण्यांत आलें; व १८६८ सालीं येरवड्याला खंडोबाच्या माळावर बांधलेल्या नवीन प्रशस्त इमारतींत, 'डेक्कन कॉलेज' ही व्यापक ऐतिहासिक अभिधा धारण करून, त्याने थाटानें प्रवेश केला. अशा रीतीने, श्रीशिवाजीमहाराजांनी प्रचलित केलेल्या दक्षिणेच्या प्रथेचा संकोच आणि शकलें होतां होतां, शेवटीं 'दक्षिण महाविद्यालय' हाच काय तो तिचा अवशेष आजपर्यंत शिल्लक उरलेला दिसतो.

## ८

महाराष्ट्रांत इंग्रजी राज्य स्थापन झाल्यानंतर, एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चरणांत, केवळ संस्कृत आणि केवळ पाश्चात्य अशा

ज्या या दोन अगदीं भिन्न शिक्षणप्रणालि पुणें आणि मुंबई या दोन शहरांतून सुरू झाल्या, त्यांचे परिणाम मराठी जनता आणि वाङ्मय यांच्यावर कोणत्या प्रकारचे झाले, याचा आढावा आतां घेणें उद्बोधक होईल. संस्कृत पाठशाळा आणि हैन्द शाळा पुस्तक मंडळी या अस्तित्वांत आल्यापासून तो १८५४ सालच्या खलित्यांतील नव्या शैक्षणिक नीतिनुसार १८५७ सालीं मुंबई विद्यापीठाची प्रतिष्ठापना होऊन पाश्चात्य विद्यांचें शिक्षण आणि इंग्रजी भाषेचें माध्यम यांची सक्तीने अंमलबजावणी होई-पर्यंत सुमारे चाळीस वर्षांचा काळ होऊन गेला. या कालखंडांत नवशिक्षि-तांची पहिली पिढी बाहेर पडली आणि नववाङ्मयहि बरेंच निर्माण झालें. या पिढीने महाराष्ट्राच्या जीवनाला कोणतें वळण लावलें आणि या वाङ्म-याने त्याच्या बुद्धीवर कोणता संस्कार केला? नवशिक्षितांच्या या पहिल्या पिढींत निव्वळ संस्कृत पढलेले, संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही विद्यांचा व्यासंग केलेले आणि केवळ इंग्रजी शिकलेले असे तीन प्रकार होते. या तिन्हीहि प्रकारच्या शिक्षितांना सरकारी नोकरींत त्या वेळीं सामान्यत: सारखाच वाव मिळत असे. बापूशास्त्री शुक्ल किंवा मोरशास्त्री साठे यांच्यासारख्या शिक्षक म्हणून प्रथम सरकारी नोकरींत शिरलेल्या संस्कृत पंडितांना पुढे मामलतदार आणि मुन्सफ होऊन प्रत्यक्ष राज्यकारभाराचीं कामें करावीं लागलीं, यावरून सरकारला तेव्हा लायक शिक्षित माणसांची सर्वच खात्यांत किती तीव्र गरज भासत होती, याची कल्पना येते. त्यामुळे शिक्षणाचा थोडा बहुत गंध लागलेल्याहि माणसाला सरकार चटकन उचलून त्याच्या पात्रतेनुसार कांही ना कांहीं काम देत असे. अशा रीतीने शिक्षितांच्या पहिल्या दोन पिढ्या संपूर्णतया सरकारी नोकरींत रिचविल्या गेल्या; व ज्या इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हातां-खालीं किंवा मिशनरींच्या सहवासांत त्यांनी शिक्षण घेतलें आणि त्यांना निरनिराळीं कामें करावीं लागलीं, त्यांच्या विचारांचा आणि धोरणाचा प्रभाव त्यांच्या मनोवृत्तीवर होऊन, त्यांना भारतीय धर्म, संस्कृति आणि समाजधारणा यांच्याविषयी आत्मीयता आणि आदर उरला नाही. एकंदर समाजापासून ते तुच्छतेने फुटून वेगळे निघाले आणि त्या समाजाचे वाभाडे काढणें हा त्यांचा नित्यक्रम होऊन बसला. जर्व्हिस, मनी, मोल्स्वर्थ, फारिश,

कँडी, बेल, हेंडर्सन, एस्डेल प्रभृति त्या वेळचे बहुतेक सर्व वरिष्ठ इंग्रजी अधिकारी हे ख्रिस्ती धर्माचे कडवे अभिमानी होते. त्या धर्माच्या प्रसाराला शक्य त्या सर्व उपायांनी हातभार लावणें हें ते आपलें मुख्य कर्तव्य समजत असत; व केनी, विल्सन, मिचेल, स्टीव्हन्सन, नेस्बिट, ह्यूम प्रभृति मिशनरींशीं त्यांचें या बाबतींत पूर्ण संगनमत असे. किंबहुना, वर राज्यपालापासून तों खालीं हेंद शाळा पुस्तक मंडळीच्या कार्यवाहापर्यंत सगळे लहानथोर इंग्रजी अधिकारी या एकाच भावनेने प्रेरित झालेले होते की, इंग्रजी विद्येचा प्रसार भारतांत ज्या प्रमाणांत होईल, त्या प्रमाणांत या देशांतील लोकांची धर्मावरील श्रद्धा नष्ट होऊन, ते ख्रिस्ती धर्माचा अंगीकार करितील; व ही गोष्ट ब्रिटिश सत्तेच्या दाढर्याला आणि स्थैर्याला पोषक होईल. भारतांतील पाश्चात्य शिक्षणपद्धतीचा प्रवर्तक लॉर्ड मेकॉले याने ता. १२ ऑक्टोबर १८३६ रोजीं कलकत्याहून आपल्या पित्याला पाठविलेल्या पत्रांत असे उद्‌गार काढलेले आढळतात की, " आमच्या इंग्रजी शाळांची भरभराट आश्चर्यकारक रीतीने होत आहे. या शिक्षणाचा हिंदूंवर होत असलेला परिणाम खरोखरी विलक्षण होय. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या कोणत्याहि हिंदूची आपल्या धर्मावर निष्ठा राहूं शकत नाही. कांही हिंदु केवळ धोरण म्हणून धर्मनिष्ठेचा बहाणा करतात; पण कांही स्वत:ला शुद्ध एकेश्वरी म्हणवितात; तर कांही ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करितात. माझा असा दृढ विश्वास आहे की, आपण जर आपल्या शिक्षणविषयक योजना नीट अमलांत आणल्या, तर बंगालमधील प्रतिष्ठित वर्गांत आणखी तीस वर्षांनी एकहि मूर्तिपूजक शिल्लक उरणार नाही. आणि हें परिवर्तन, धर्मांतरासाठी प्रयत्न न करितां किंवा धार्मिक स्वातंत्र्याला यत्किंचितहि हात न लावतां, केवळ ज्ञानाचा प्रभाव आणि चिंतन यांनी घडून येईल ! " मेकॉलेचें हें भाकित जरी खरें ठरलें नाही, तरी सुशिक्षितांच्या पहिल्या दोन पिढ्या स्वधर्माविषयी उदासीन किंबहुना एकंदरींत स्वत्वशून्य अशा निपजल्या, हें मात्र निस्संशय. इतकेंच नव्हे, तर इंग्रजी अधिकाऱ्यांच्या म्हणा, प्राध्यापकांच्या म्हणा किंवा मिशनरींच्या म्हणा, कक्षेंत जी केवळ संस्कृतचें अध्ययन केलेलीहि शास्त्रीमंडळी आली, त्या मंडळीला त्यांच्या सान्निध्यांत इंग्रजी विद्येचा संसर्ग घडतांच, त्यांच्याहि वृत्तींत आणि विचारांत परिवर्तन घडून

आल्याविना राहिलें नाही. मोरशास्त्री साठे, बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री फडके, दादोबा पांडुरंग, हरि केशवजी, भाऊ महाजन यांच्यासारख्या शिक्षितांच्या पहिल्या दोन पिढ्यांतील प्रमुखांवर धर्मभ्रष्ट, नास्तिक किंवा मनाने ख्रिस्ती झाल्याचा जो आरोप तत्कालीन समाजाने केला आणि खुद्द न्या. रानडे यांच्यासारख्या नंतरच्या पिढींतील सुधारकाग्रणीला सुद्धा दादोबांचा स्वीडनबर्गच्या नवपंथावरील इंग्रजी प्रबंध वाचून त्यांनी ख्रिस्ती धर्ममतांचा अंगीकार न केल्याची खात्री पटल्यावर जें हायसें वाटलें, त्यावरून हें परिवर्तन किती मूलगामी होतें, याचा प्रत्यय येतो.

मुंबईस १८४९ सालच्या सुमारास दादोबा पांडुरंग, राम बाळकृष्ण, आत्माराम पांडुरंग, भिकोबादादा चव्हाण, लक्ष्मणशास्त्री हळवे, मोरोबा विनोबा प्रभृति पहिल्या पिढींतील सुधारकांनी स्थापन केलेली 'परमहंस सभा' हा या परिवर्तनाचाच खरोखरी परिपाक होय. दादोबा पांडुरंग हे या सभेचे आद्य प्रवर्तक होते; व त्यांनी 'एक जगद्वासी आर्य' या टोपण नांवाने 'धर्मविवेचन' हा गद्य आणि 'पांडुरंगात्मज दादो' या नांवाने 'पारमहंसिक ब्राम्हधर्म' हा अभंगात्मक प्रबंध लिहून त्यांत या सभेच्या धार्मिक आणि नैतिक भूमिकेचें प्रासादिक समंजस विवरण केलेलें दृष्टीस पडतें. 'धर्मविवेचना'च्या प्रारंभी "विवेकी पारमहंसिक वृत्तीच्या पुरुषांचे" पुढील सात निर्णय दिलेले आहेत:– "(१) ईश्वर एक व तोच पूज्य. (२) नीतिपूर्वक सप्रेम ईश्वरभक्ति हाच धर्म. (३) मनुष्यमात्राचा पारमार्थिक धर्म एकच होय. (४) प्रत्येक मनुष्यास विचार करण्याचें स्वातंत्र्य आहे. (५) नित्यनैमित्तिक कर्में विवेकास अनुसरून असावीं. (६) मनुष्यमात्राची एक ज्ञाति आणि (७) सर्वांस ज्ञानशिक्षा असावी." या निर्णयांचें सयुक्तिक, सुबोध विवरण नंतर सात प्रकरणांत केलेलें आहे. पण त्याहिपेक्षां 'पारमहंसिक ब्राह्मधर्म' या प्रबंधांतील अभंगांत दादोबांनी केलेले सभेच्या तत्त्वांचे प्रतिपादन अधिक हृदयंगम वाटते. आरंभी "ॐ नमः परमहंसास्वादितचरणकमलचिन्मकरंदाय भक्तजनमानसनिवासाय सच्चिदानंदरूपाय ब्रम्हणे" असें संस्कृत नमन करून नंतर वीस अभंगांत त्यांनी सभेचें म्हणजेच खरोखरी त्यांचें स्वतःचें तत्त्वज्ञान विशद केलेलें आहे. दादोबांची

आध्यात्मिक दृष्टि किती ऋजु आणि व्यापक होती, याची कल्पना पुढें दिलेल्या पहिल्या आणि पंधराव्या अभंगावरून येईल—

ऐका सांगतों मीं। विसां अभंगांत। सर्वशास्त्रमत। ब्राम्ह धर्म ॥
विश्वकुटुंबी जो। सर्वादिकारण। बापा त्या शरण। जावें तुम्हीं ॥
बंधूच्या नात्यानें। वागा मानवांशीं। उदार मनाशीं। ठेवुनिया ॥
जातिभेद सर्व। सोडा अभिमान। द्यावें आलिंगन। एकमेकां ॥
भूतदयेनें ती। करा देवपूजा। हीच अधोक्षजा। आवडत्ये ॥१॥
ज्ञानी व महन्त। सर्व देशीं झाले। बोल जे बोलिले। ज्ञानाचे ते ॥
लिहुनि ठेविला। ग्रंथीं उपदेश। त्याचा तो सारांश। घेऊं आम्हीं ॥
जियें मिळे त्यांची। एकवाक्यता ती। प्रमाण प्रतीती। आमची पैं ॥
सर्वानुभविक। महंताचे बोल। प्रमाणांचें मोल। देऊं त्यांना ॥
त्यांत देशकाल। विचार न सोडूं। सर्वांशीच जोडूं। स्नेहभाव ॥
असो कृष्णगीता। किंवा ख्रिस्तगीता। महम्मदाची वार्ता। असेना कां ॥
असो बौधाचार्य। किंवा जैनाचार्य। शंकर आचार्य। कबीरही ॥
तत्वज्ञान एक। असें त्यांचें जरी। न कां तें पदरीं। घ्यावें आम्हीं ॥
येईना का आला। थोडा तो विरोध। दाऊं तो न क्रोध। तेणें आम्हीं ॥
स्वर्गाहूनि जणूं। आणवियेलें ज्ञान। 'भांडों न' जाणून आम्हीं ऐसे ॥१५॥

'परमहंस सभे'चे सदस्य सुमारे एक हजारापर्यंत होते; व तिच्या शाखा पुणें, अहमदनगर, बेळगांव इत्यादि मुंबई प्रांतांतील शहरांतूनच नव्हत, तर काशी, कलकत्ता, मद्रास यांसारख्या अन्य प्रांतांतील दूरदूरच्या शहरांतूनहि पसरलेल्या होत्या. सभेचा हा शाखाविस्तार तिची कार्यपद्धति गुप्त असूनहि झाला, ही घटना नवशिक्षितांच्या पहिल्या दोन पिढ्यांत त्या वेळीं सुरू असलेल्या बौद्धिक प्रक्षोभाची साक्ष देते. डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी आपल्या एका भाषणांत या सभेसंबंधीचा आपला स्वत:चा असा अनुभव वर्णन केलेला आहे की,—

" सुमारें १८५० सालीं जातिभेद हा राष्ट्रघटनेच्या आड येत असतो हा विचार लोकांच्या पुढें विशेषरूपानें आला, आणि त्याच वेळीं रा. ब.

दादोबा पांडुरंग हे नारमल क्लासांतील आपल्या विद्यार्थ्यांस जातिभेदापासून किती अनिष्ट परिणाम होत आहेत तें सांगून जातिभेद नष्ट झाला पाहिजे असे प्रतिपादीत असत. त्यांनी 'परमहंस सभा' स्थापन केली होती. या परमहंस सभेची हळुहळू सारखी भरभराट होत गेली. मंडळीमध्ये कोणासहि सभासद करून घेते वेळीं त्यास प्रथम एक प्रार्थना वाचावयास सांगत; नंतर जातिभेद न मानण्याची तयारी झाली आहे असें पटवून देण्यासाठीं किरिस्तावाने तयार केलेल्या पावाचा एक तुकडा खावयास देत असत. वर्षांतून एकदा किंवा कधीं अनेक वेळां निरनिराळ्या जातींच्या लोकांचें मिळून सहभोजन होत असे. परंतु हें सर्व गुप्तपणें होत असे. नांवें उघडकीस आलीं तरी हरकत नाही असें कोणासहि वाटत नसे. नारमल क्लासचे विद्यार्थी फणसवाडींत दुमेटयाच्या चाळींत दुसऱ्या मजल्यावर राहत असत. हेच विद्यार्थी परीक्षा पास झाले म्हणजें शिक्षक म्हणून बाहेरगावीं जेथें जेथें जात तेथें तेथें परमहंस सभेच्या मतांचा प्रसार व प्रचार करीत असत. ह्यांपैकी एक विद्यार्थी रत्नागिरीस मास्तर होता. येथेंच १८५२ पर्यंत मी होतों. ह्या मास्तराने पुष्कळांना परमहंसमताची दीक्षा दिली होती. माझ्या बरोबरीच्या एका विद्यार्थ्याने परमहंसमताचा स्वीकार केला होता; व तो मला वळविण्याचा प्रयत्न करीत असे. आम्ही संध्याकाळच्या वेळीं दूरदूर फिरावयास जात असूं व तेथे जातिभेद हा कसा घातक आहे, उच्चनीच भेदामुळें आपलें कसें नुकसान होत आहे व जातिभेद घालविल्यावाचून राष्ट्राची खरी उन्नति होणें कसें अशक्य आहे या विषयावर संभाषणें होत. हीं सर्व मतें माझ्या विचारांस पटलीं होतीं; परंतु त्यावेळीं मला सभासद करून घेतलें नव्हतें. पुढे १८५३ सालीं एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें मी अभ्यास करीत असतां वयाच्या १६ व्या वर्षी मी परमहंस सभेचा सभासद झालों. हा विधि वर म्हटलेल्या दुमेटयाच्या चाळींत एका खोलींत झाला. ज्यावेळीं मला पावाचा तुकडा खावयास दिला व मी तो खाऊं लागलों, त्यावेळीं माझ्या अंगावर शहारे उभे राहिले, जणूं काय मी कांहींतरी गैर केलें आहे असेंच वाटलें. अशा प्रकारें सुमारे १८६० पर्यंत परमहंस सभा

चालू होती. नंतर कोणीतरी सभासदांच्या नावांचेंच पुस्तक लांबविलें व त्यामुळे सर्वांचे धाबे दणाणलें व आपापल्या जातीकडून आपल्याला त्रास होणार असें ज्याला त्याला वाटूं लागलें. अशा प्रकारें परमहंस सभा मोडली व जातिभेदाचा प्रश्न दुसऱ्या संस्थेकडे सहज रीतीनें गेला."

पण, ही सभा केवळ गौप्यस्फोटामुळे मोडली असावी, असें वाटत नाही. सभेच्या नेतृत्वांत आणि कार्यपद्धतींतच मुळीं तिच्या नाशाचीं बीजें होतीं. सभेचे प्रवर्तक दादोबा पांडुरंग यांनी स्वतः तिच्या कार्यक्रमांत कधी प्रत्यक्ष भाग घेतला नाही; सभेचे पुरस्कर्ते भाऊ महाजन यांनी तिच्या तत्त्वांचें प्रतिपादन आपल्या 'प्रभाकर' पत्रांतून कधी जाहीर रीतीने केलें नाही; व सभेची कार्यपद्धति गुप्त असूनहि तिला जी इतकी सदस्यसंख्या लाभली आणि तिचा जो इतका शाखाविस्तार झाला, त्याला केवळ धर्मजिज्ञासेपेक्षाहि इतर अपेक्षा कारण होत्या, असेंहि स्पष्ट दिसतें. कारण, 'राजकीय ऋषि' या टोपण नांवाने 'इंदुप्रकाश' पत्रांत लिहिलेल्या आपल्या एका लेखांत डॉ. सर नारायण गणेश चंदावरकर यांनी सभेच्या सदस्यांसंबंधीं असा अभिप्राय व्यक्त केलेला आढळतो की, "अशा रीतीने कांहीं तरुण सभेच्या कार्याची महती त्यांच्या मनाला पटल्यामुळे तिचे सदस्य व्हावयाला प्रवृत्त झाले; तर कांही कमी बुद्धिप्रधान आणि अधिक व्यवहारी असलेले तरुण दादोबा, राम बाळकृष्ण प्रभृति तिच्या प्रमुखांची सरकारी नोकरींतील प्रतिष्ठा, प्राप्ति आणि सरकारी कृपेचा लाभ घडवून देण्याचें त्यांच्या ठिकाणीं असलेलें सामर्थ्य ध्यानांत घेऊन तींत सामील झाले!" सभेला तत्त्वस्फूर्तीचा पुरवठा जरी दादोबांनीं केला आणि तिचे सदस्य जरी त्यांना "गुरुस्थानीं समजत होते", तरी तिच्या अध्यक्षपदाची धुरा मात्र दादोबांहून वयाने, विद्वत्तेने आणि दर्जाने लहान असलेल्या रा. ब. राम बाळकृष्ण जयकर यांच्यासारख्या तत्कालीन तरुण कार्यकर्त्याला आपल्या शिरावर घ्यावी लागली आणि त्यांचा बंगला हेंच सभेचें कार्यकेंद्र होऊन बसलें, ही घटनाहि कांही कमी सूचक नाही. प्रथम या सभेचे सदस्य असलेले आणि नंतर ख्रिस्ती झालेले रे. बाबा पदमनजी यांनी या प्रकारासंबंधीं असे उद्गार काढले आहेत की,—

"सभेच्या आरंभी व शेवटीं मराठींत प्रार्थना वाचीत, त्या रावबहादूर दादोबा पांडुरंग यांनी रचलेल्या होत्या. रा. ब. दादोबा पांडुरंग व रा. रा. भाऊ महाजन हे जरी मंडळीच्या मताचे व मंडळीचे पुरस्कर्ते होते तरी ते सभेस कधीं येत नसत. आलेच तर दुसऱ्या खोलींत बसत व सभा विसर्जन झाल्यावर अध्यक्षांची व कांही निवडक मंडळीची भेट घेत. रा. ब. दादोबांचे बंधु रा. रा. दाक्तर आत्माराम पांडुरंग हे ह्या मंडळीचे सभासद होते; पण यांची वर्तणूक अशा प्रकारची नव्हती. ते सभेस येत इतकेंच नाही तर आपल्या घरी सभा भरवीत."

"एका दिवशीं ह्या मंडळीच्या सभेस कोणी नवीन तरुण गृहस्थ येऊन नेमाप्रमाणे शपथा वगैरे घेऊन तींत मिळाला. आणि कांही दिवसांनी त्याने सर्व सभासदांची नांवें फोडून असें प्रसिद्ध केलें कीं, ते सर्व ख्रिस्ती होणार असून अमुक दिवशीं त्यांचा बाप्तिस्माही होणार आहे. ही बातमी शहरांत पसरतांच मोठा गवगवा झाला. मिशनशाळेंत जाणाऱ्या मोठमोठ्या हिंदु मुलांस त्यांच्या आईबापांनी भराभर शाळेंतून काढलें; कित्येकांस मुंबईच्या बाहेर पाठविलें."

"या संस्थेचे जे पुढारी म्हणून गृहस्थ होते, ते सर्व सदाचारसंपन्न व देशहितेच्छु गृहस्थ होते," हा सर नारायण चंदावरकर यांनी दिलेला निर्वाळा कोणीहि ग्राह्य मानील. कारण, जातिभेदविध्वंसनाला आपली तयारी असल्याचें निदर्शक म्हणून जरी या सभेचे सदस्य दीक्षाविधीच्या वेळीं ख्रिस्ती भटाऱ्याकडून आणलेला पाव खात असत किंवा मुसलमान भिस्त्याच्या हातचें पाणी पीत असत व त्यांच्यापैकी कांही अत्युत्साही सदस्यांनी जरी एकादे वेळीं पावाची मिरवणूक काढली असली किंवा कांहींनी जरी डॉ. विल्सन यांच्या घरीं जाऊन आपल्या बाटलेल्या मित्रांसह चोरून गोमांसावर ताव मारला असला, तरी "भक्ष्य-पानीं ठेवूं शुद्ध तो विचार। त्यांत अनाचार साहूं ना तो॥" हा दादोबांनी घालून दिलेला दंडक सामान्यत: दक्षतेने पाळला जात असावा, असें गृहीत धरावयाला हरकत नाही. 'परमहंस सभे' ची जी ही वाताहत झाली, तिची मीमांसा

करितांना सर नारायण चंदावरकर यांनी असे मार्मिक उद्गार काढले आहेत की,—

"...परमहंस सभेला सगळ्या जनतेच्या सुधारणेचा प्रश्न दिसला; पण हिंदु व्यक्तींची व हिंदु कुटुंबांची सुधारणा ह्याकडे सभेचें लक्ष गेलें नाही. ही अंधारांत एकदम उडी घेणें झालें. आपलें अवसान लक्षांत न आणतां उडी घेणें अगर मागे पुढे न पाहतां उडी घालणें अथवा आपल्या सामर्थ्याचें मापन न करतां घाला घालणें, म्हणजे अपयशाला आमंत्रणच करणें होय. परमहंस सभेच्या सभासदांचे विचार व सर्वसाधारण जनतेचे विचार ह्यांच्यांत फार मोठें अंतर असतांना अखिल जनता सहजासहजी आपल्या विचारांची होईल अशी अपेक्षा करावयास काय आधार होता? ह्याला खरा व एकच उपाय असा होता की, ज्या सुधारणा समाजांत घडवून याव्या असें वाटत होतें, त्या सुधारणा व्यक्तिमात्राने आपआपल्या कुटुंबांतून करावयास प्रारंभ करणें अगत्याचें होतें. तसें कांही न झाल्यामुळे केवळ नांवांची यादी व हकीकतीचीं पुस्तकें गहाळ होतांच सर्वांची वाताहात झाली! जर एखाद्या सामाजिक व्यंगाविरुद्ध चळवळ करावयाची आहे, तर प्रथम लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. असें न केलें, कांही आडदांडपणा केला, तर लोक दुराग्रही बनतात व सुधारणेविषयी प्रयत्न करणारांत मात्र गैरसमज उत्पन्न होतो. परमहंस सभेचें असेंच झालें.."

"....शेकडो व हजारों वर्षे चालत आलेले आचार, ज्यांच्याविषयी अंधश्रद्धा उत्पन्न झाल्यामुळे ज्यांस धर्माचारांचे स्वरूप प्राप्त झाले होते असे आचार गुप्तपणे उपाययोजना करून घालविण्याचा प्रयत्न करणे हा केवळ वेडेपणा होय. जातिभेदामुळे सर्वत्र पांगलेल्या लोकांना एकत्र करावयाचे व त्यांच्यांत एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न करावयाची तर त्या कार्यीं गुप्त उपायांची योजना हे अगदी चुकीचे व आत्मघातकी तत्त्व होय. कारण, ज्या लोकांची सहानुभूति मिळवून व ज्यांच्या विचारांचें परिवर्तन घडवून काम करावयाचें, त्यांच्यामध्येच अशा गुप्तपणामुळें संस्थेविषयीं शंका उत्पन्न होते व हेतूंचा विपर्यास व्हावयास

जागा मिळते. दुसरी गोष्ट अशी की, अशा गुप्तपणामुळें सभासदांत एक प्रकारचा भित्रेपणा येतो. आपल्या विचारांबद्दलचा त्यांचा अभिमान नष्ट होतो व त्यांचें नैतिक दृष्टया अधःपतन होतें. अशा प्रकारें बाहेरच्या लोकांच्या दृष्टीने व आंतील सभासदांच्या दृष्टीनें हें धोरण चुकीचें ठरतें... "

" ...पुरातनाभिमानी लोकांना जात हेंच सर्वस्व होतें व आताहि (१८८६) तसेंच आहे. असें असतां गुप्तपणें जेवणें झोडून व गुप्तपणें सर्व व्यवहार करून, जातीचें वर्चस्व कमी कसें व्हावें? त्याला उपाय म्हणजे लोकांना खऱ्या धर्माची ओळख करून देणें, स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांचीं मनें उदार मतांस अनुकूल करणें, निरनिराळ्या सुधारणांचा प्रथम आपापल्या कुटुंबांत प्रवेश करविणें हें होतें. तें न केल्यामुळे परमहंस सभेचा पूर्ण पराजय झाला. वर म्हटल्याप्रमाणे आपल्या कार्यास प्रारंभ न केल्यामुळे सुधारणेला जनतेकडून विरोध करून घेण्याचें श्रेय मात्र परमहंस सभेने आपल्याकडे घेतलें. योग्य मार्गाचें अवलंबन केलें असतें तर सुधारणा लोकांत अधिक प्रिय झाली असती. परंतु त्या वेळीं जें अशक्य होतें त्यालाच हात घातल्यामुळें तें साधलें तर नाहीच, पण पदरांत घोर निराशा मात्र पडली आणि सभेच्या निरनिराळ्या वृत्तींच्या सभासदांवर निरनिराळे परिणाम झाले. त्यांच्यापैकी कांहीं उत्साही सभासद नास्तिक बनले, कांहीं अगदीं जुन्यांत शिरले, कांहींनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला व फारच थोड्या लोकांनी आपलें चुकलें होतें कोठें ह्या विचारास प्रारंभ केला, व निरनिराळ्या मार्गांचें अवलंबन करून आपला हेतू पूर्ण करण्याच्या मार्गास ते लागले. परमहंस सभेचा लोकांना विसर पडला, मात्र त्या संस्थेनें सुरू केलेले प्रकार, न कळतां स्मारकरूपानें मागें राहिले! वर्ज्य वस्तूंचें चोरूनमारून सेवन करणें व अज्ञानी व दुराग्रही लोकांच्या दृष्टीनें मौजमजा, अभक्ष्यभक्षण व अपेयपान हीच सुधारणा असल्या गोष्टी मात्र मागे राहिल्या! ह्यामुळें ह्या परमहंस सभने सुधारणेचें कार्य अधिक बिकट मात्र करून ठेवलें! ."

सभा मोडल्यावर 'कवीश्वर' रामकृष्ण अनंत जोशी, पुणेकर, यांनीं

'परमहंसमतप्रशंसा' या नांवाचें सरसकट सर्वच नवशिक्षितांच्या अभद्र कुचाळीनें भरलेलें एक छोटेखानी किळसवाणें काव्य लिहून त्यांत सभेच्या नेत्यांच्या नांवानें शिमगा केला. या काव्यांतील—

'प्रभुराज्यधारकांनीं आणिवली ह्या पुरांत सोसाटी ।
मिशनारीहि तद्वत झटती अत्यंत भ्रष्टतेसाठीं ॥
नित्य सोसेटींत विद्याभ्यास ॥
तेथें म्लेंछांसी सहवास ॥
आवडू लागे कैफ मनास ॥
ज्वान मुलाला ॥ कर्माचा लोप झाला ॥
गांजा भांग जिरणीस पडली ॥
बरांडीवर इच्छा जडली ॥
ही उत्पत्ती कोणी कडली ॥
ठाऊक आईला ॥"

इत्यादि प्रलापांवरून हा कवि आणि त्याचें कवित्व यांचा हीन दर्जा कळून येईल. तथापि, सर नारायण चंदावरकर यांनीं म्हटल्याप्रमाणें, 'परमहंस सभे'चा जरी 'पराजय' झाला, तरी ज्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणेच्या उन्नत तत्त्वांचा तिने, गुप्त रीतीनें का होईना, पुरस्कार आणि प्रसार केला, त्या तत्त्वांचा कांही 'पराजय' झाला नाही. १८६७ सालीं स्थापन झालेला 'प्रार्थनासमाज' आणि १८७३ सालीं स्थापन झालेला 'सत्यशोधक समाज' हे खरोखरी 'परमहंस सभे'चेंच नव्या परिस्थितींत आणि नव्या स्वरूपांत झालेलें पुनरुत्थान होय.

## ९

चाळीस वर्षांच्या या पहिल्या कालखंडांत इंग्रज अधिकारी आणि ख्रिस्ती मिशनरी यांच्या नेतृत्वाखाली जें वाङ्मय उत्पन्न करण्यांत आलें, तें तिऱ्हाईत दृष्टीने पाहाणाराला 'खुळचट' [Superstitious] किंवा 'पोरकट' (Childish) वाटण्याचा संभव आहे, असा अभिप्राय न्या. रानडे यांनीच दिलेला आढळतो. किंबहुना, प्रौढ भारतीय भाषांच्या प्रणालींत

मराठी ही लवकरच अग्रपद प्राप्त करून घेऊं शकेल, अशी आशा जरी त्यांनी, तिच्या १८६३ सालापर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेतांना, प्रकट केली होती, तरी मराठी वाङ्मयावरील हा बालिशतेचा अपवाद दूर करण्यासाठी कळकळीच्या प्रयत्नांची अनेक शतकें जावीं लागतील, असेहि उद्गार त्यांनी त्याबरोबरच काढलेले दृष्टीस पडतात. न्यायमूर्तींचा हा अभिप्राय कठोर भासला, तरी अंशत: समर्पक वाटतो. या कालावधींत जें वाङ्मय निर्माण झालें, तें मुख्यत: सरकारची ज्ञानप्रसाराची आणि मिशनरींची धर्मप्रसाराची निकड भागविण्यासाठीच; व सरकारचे आदेश, प्रेरणा, प्रोत्साहन आणि आश्रय हींच त्याच्या निर्मितीचीं कारणें बव्हंशीं होती. अर्थात् अशा परिस्थितींत आणि पध्दतीने तयार करण्यांत आलेल्या वाङ्मयांत स्वतंत्र स्फूर्ति आणि मौलिक प्रतिभा यांचें तेज कुठून पहावयाला मिळणार ? बाळशास्त्री जांभेकर हे या काळांतले सर्वच दृष्टींनी अग्रगण्य आणि अग्रेसर पुरुष. किंबहुना, न्या. रानडे सोडल्यास, प्रतिभेच्या, विद्वत्तेच्या आणि कर्तृत्वाच्या बाबतींत त्यांच्या तोडीचा नेता पश्चिम भारतामध्ये एकोणिसाव्या शतकांत दुसरा झाला नाही, असेंच खरोखरी म्हणावें लागेल. पण, त्यांच्या अलौकिक प्रतिभेच्या छटा त्यांनी केलेल्या अनेक बौद्धिक, सामाजिक आणि राजकीय उपक्रमांत जरी प्रतीत होत असल्या, तरी सरकारी उत्तेजनाची अपेक्षा त्यांनी 'दर्पणा'सारखें स्वतंत्र वृत्तीचें पाक्षिक वृत्तपत्र काढण्याच्या वेळींसुद्धा केली होती, ही घटना अर्थपूर्ण आहे. आता, 'दर्पणा'च्या 'थोड्याशा प्रती' विकत घेऊन त्याला 'उत्तेजन देण्या-संबंधीं' ता. २ जानेवारी १८३२ रोजीं जांभेकरांनी केलेली ही विनंती मुंबई सरकारने झिडकारून दिली, हा भाग वेगळा ! हाच प्रकार या काळांतले दुसरे युगंधर पुरुष जे दादोबा पांडुरंग त्यांचाहि ! आपल्या आयुष्याच्या शेवटल्या दिवसांत लिहिलेल्या 'शिशुबोध' या प्रबंधांत त्यांनी असे उद्गार काढलेले आहेत की, " मुलांनों, आता इंग्रज सरकारांत चाकरी करणें दिवसानुदिवस फारच कठीण काम होत चाललें आहे ..... अलिकडेस तीस वर्षांपासून उदार व उमद्या मनाचे वरिष्ठ इंग्लिश अंमलदार जाऊन त्यांच्या जागीं बहुत करून हलक्या स्वभावाचे व क्षुल्लक बुद्धीचे

असे अंमलदार येत चालले आहेत." दादोबा जे अवेळीं सेवानिवृत्त झाले आणि त्यांच्या मनावर पुढे जी विषादाची छाया पडत गेली, ती खरोखरी इंग्रजी आमदानींतील सुरवातीचें स्वास्थ्य आणि औदार्य नष्ट झाल्याचा अनुभव येत गेल्यामुळेच! तथापि, ही उदासीनता जसजशी त्यांच्या वृत्तींत मुरत गेली, तसतसा त्यांचा कल परमार्थाकडे झुकत जाऊन, त्यांच्या उतार वयांतील लिखाणांत विलक्षण जिव्हाळा आणि गोडवा आला, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. १८१८ पासून १८५७ पर्यंत जीं एकंदर १४५ मराठी पुस्तकें प्रसिद्ध झाल्याची नोंद न्या. रानडे यांनी केली आहे, तींत दादोबांचें 'मराठी भाषेचें व्याकरण' सोडल्यास नांव घेण्याजागें एकहि पुस्तक आढळत नाही. जांभेकरांचे इंग्रजी प्रबंध आणि 'दर्पणां'तील इंग्रजी लेख वाचतांना त्यांतील विचारांचें गांभीर्य आणि शैलीची प्रगल्भता पाहून आजहि आनंद वाटतो. पण, त्यांच्या मराठी ग्रंथांची किंवा 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन' या त्यांनी संपादिलेल्या मराठी नियतकालिकांतील लेखांची भाषा मात्र अगदी वाचवत नाही.

तथापि मराठी भाषेच्या एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील या दैन्याबद्दल नवल वाटण्याचें मात्र कांही कारण नाही. १८३२ सालीं पुण्यास सरकारने इंग्रजी शाळा स्थापन केली; व १८४२ सालीं संस्कृत पाठशाळेंत इंग्रजीचा वर्ग काढला. तोपर्यंत पुणें हें केवळ शुद्ध संस्कृत विद्येचेंच केंद्र होतें. पेशवाईंत सरकार–दरबारीं फारशीच्या बरोबरीनें मराठीला स्थान मिळालेलें होतें आणि मराठमंडळाचा सर्व अंतर्गत पत्रव्यवहारहि मराठींतूनच चालत असे, ही गोष्ट खरी. पण मराठ्यांच्या दरबारींसुद्धा संस्कृतची प्रतिष्ठा मराठीला कधीच प्राप्त झाली नाही. किंबहुना, पेशवाईच्या उत्तर काळांतील मोरोपंतासारख्या मान्य कवीलाहि मराठींतून काव्यरचना केल्याबद्दल जी स्वतःची आणि मराठी भाषेचीहि तरफदारी मोठ्या अजीजीने करावी लागली, ती लक्षांत घेतली असतां, संस्कृतप्रमाणे मराठी ही अध्ययन, अध्यापन आणि लेखन यांना पात्र अशी भाषा आहे, ही कल्पना स्वराज्यांतहि कधी शिष्टसंमत झाली नाही, हें स्पष्ट आहे. संस्कृत भाषा, तदंतर्गत शास्त्रें आणि वैदिक वाङ्मय यांतील प्रावीण्य हेंच

पांडित्याचें एकमेव लक्षण समजलें जात असे; व या पांडित्यानें संपन्न असलेल्या पढीक वेदोनारायणांचीच संभावना श्रावण मासांतील दक्षिणेच्या रमण्यांत पेशव्यांकडून होत असे. मराठी कवि, हरिदास, पुराणिक, शाहीर इत्यादींना जीं इनामें, वर्षासनें, पारितोषिकें किंवा अन्य पुरस्कार मराठी राज्यकर्त्यांकडून त्या काळांत क्वचित् मिळालेला दृष्टीस पडतो, तो त्यांपैकी कांहींच्या साधुत्वाचा गौरव करण्यासाठी आणि कांहींच्या लोकरंजन करण्याच्या कौशल्याची बूज करण्यासाठी! मराठी विद्या, काव्य किंवा ग्रंथरचना यांना प्रोत्साहन देण्यासाठी खचितच नव्हे!! याहि उपेक्षेच्या परिस्थितींत मराठी भाषेचा झोक, डौल आणि व्याप जो विशेषत: नानासाहेब पेशव्याच्या कारकिर्दीपासून पुढे सारखा वाढत गेला व पत्रव्यवहार, हकीकतनामे, बखरी वगैरे तत्कालीन राजकारणी लिखाणांतून तिला जें बव्हर्थ, ओजस्वी आणि प्रौढ स्वरूप झपाट्याने येत गेलें, तो मराठ्यांच्या राजकीय उत्कर्षाची त्यांच्या भाषेवर केवळ यदृच्छेने घडलेली अप्रत्यक्ष इष्ट प्रतिक्रिया होय! पेशवाईंत संस्कृत भाषेला असलेलें हें महत्व लक्षांत घेऊनच एल्फिन्स्टननें, पुण्यास इंग्रजी शाळा न काढतां किंवा मराठींतून ग्रंथरचना करण्यासाठी उत्तेजन देण्याचीहि व्यवस्था न करितां, तेथे फक्त संस्कृत पाठशाळा उघडली. या पाठशाळेत पढविणाऱ्या किंवा पढलेल्या संस्कृत पंडितांना मराठी भाषेविषयी कांही अगत्य वाटण्याचें मुळी कारणच नव्हतें. त्यामुळे मोरशास्त्री साठे यांच्यासारख्या 'कल्याणोन्नायक सभे'चा प्रमुख असलेल्या नवीन दृष्टीच्या पंडितानेहि मराठींतून ग्रंथलेखन करण्याचा विचार कधी मनांत आणला नाही. तथापि, १८४२ सालीं पाठशाळेला इंग्रजी वर्ग जोडले गेल्यावर, त्या नव्या पाश्चात्य विद्येचा संस्कार झालेली महादेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री राजवाडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर प्रभृति नवशिक्षितांची जी पहिली पिढी तिच्यांतून बाहेर पडली, तिने मात्र संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषांतील साहित्य आणि ज्ञान मराठी भाषेंत आणून तिला समृद्ध करण्याचें व्रत मोठ्या ईर्ष्येने अंगीकारिलें; व त्यांच्या कर्तृत्वामुळे नंतर पुण्याला मराठी भाषेचें प्रबळ केंद्र बनण्याची योग्यता आली. पण, तोंपर्यंत म्हणजे

सामान्यत: १८५० पर्यंत, मराठी भाषेच्या अभिवृद्धीच्या दृष्टीनें, पुणें हें मुंबईच्या मागेंच होतें म्हटलें तरी शोभेल.

तथापि, मुंबई शहर हें, विनायक कोंडदेव ओक यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "भ्रष्ट मराठीचें आगर"! त्या शहराची वसती जशी बहुजिनसी, तशी भाषाहि भेसळ. १५३४ पासून १६६१ पर्यंत पोर्तुगीजांचा अंमल मुंबई बेटावर असतांना साष्टी प्रांतांत जो प्रळय त्यांनी केला त्याचें वर्णन साष्टीच्या बखरींत असें केलेलें आहे की, "हें राज्य फिरंगी याने घेऊन कुबुद्ध धरिली. जमिनदारांचीं वतनें बुडविलीं. गांवाचे गांव घेऊन बाटविले... घरांत कोणी नसेल तर पोरें नेऊन बाटवावीं. असा उपद्रव महाराष्ट्रांत मांडिला... क्रियाकर्मांतराचा लोप झाला. देवधर्म बुडाला. प्रांतांतील तीर्थक्षेत्रें सर्व लोपलीं. देवालयें फोडून साफ केलीं. फिरंगी याने आपलीं देवळें बांधलीं. फिरंगी धर्म चालवावयास लावले." परळ येथील श्रीवैद्यनाथाचें पुरातन मंदिर याच सुमारास उध्वस्त करण्यांत येऊन त्या मंदिरांतील मराठीचा ११०९ मधील पहिला समजण्यांत येणारा शिलालेख असलेला पाषाण त्याच वेळीं जमिनींत पुरला गेला असावा. या शिलालेखाच्या रूपाने मुंबई बेटांतील मराठी भाषाच जणुं पोर्तुगीजांनी गाडून टाकली! कारण, १५६० सालीं पोर्तुगीजांच्या ताब्यांतील भारतीय प्रदेशांत 'इन्क्विझिशन' म्हणजे लोकांच्या धर्माचरणाची चौकशी करणारी 'धर्मसमीक्षण सभा' स्थापन झाल्यावर हिंदु धर्मासंबंधीचे ग्रंथ संग्रही ठेवणें आणि वाचणें हा गुन्हा ठरविण्यांत आला; व गुप्त हेरांच्या मदतीने घरांत दडवून ठेवलेलीं पोथ्या-पुस्तकें हुडकून काढण्यांत येऊन त्यांची ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांकडून जाहीर रीतीने होळी करण्यांत येऊं लागली. त्यामुळे, मुंबई आणि साष्टी बेटांतील हजारों संस्कृत आणि मराठी ग्रंथांची आहुति 'इन्क्विझिशन'च्या सत्रांत पडून, फक्त जेजुइट 'शास्त्री' आणि 'पुराणिक' यांनी जीं ख्रिस्ती 'शास्त्रें' आणि 'पुराणें' मराठींत रचलीं होतीं, तीं उजळ माथ्याने वाचण्याची उजागरी तेवढी शिल्लक उरली. पोर्तुगीजांनी आपल्या सव्वाशें वर्षांच्या राजवटींत गाजविलेल्या या नादिरशाहीमुळे मुंबई बेटांतील खालच्या जातीतले बव्हंश लोक बाटून

ख्रिस्ती झाले; व वरच्या जातींतील ज्या लोकांनीं धर्मांतर केलें नाही, त्यांनाहि जेत्यांच्या संस्कृतीचा स्वीकार करावा लागला. वरिष्ठ हिंदु जातींचें हें सांस्कृतिक दास्य इतक्या थराला गेलें होतें की, १६६१ सालीं मुंबई बेट हें पोर्तुगालचा राजा अल्फॉन्सो याने आपला वहिणोई इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स याला लग्नांत हुंडा म्हणून आंदण दिल्यामुळे, जरी त्याच्या-वरील पोर्तुगीजांची सत्ता संपुष्टांत आली, तरीसुद्धा मुंबईंतील पांढरपेशे हिंदु हे पोर्तुगीज भाषा शिकणें आणि बोलणें हें सुसंस्कृतपणाचें लक्षण समजत असत ! एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमधील दादोबांचे वर्गबंधु रा. ब. नाना मोरोजी त्रिलोकेकर यांच्या चरित्रांत असें वर्णन आहे की, "मराठी साधारण लिहितांवाचतां येऊं लागलें, इतक्यांत या मुलांस फिरंगी शाळेंत पाठविलें. यावेळीं अद्याप हें बेट फिरंग्यांचें असें लोकांच्या मनांत वागत असे. या लोकांच्या घरांमध्ये उपयोग करण्याच्या शब्दसमूहांत बरेच शब्द फिरंगी असत व पुरुषमंडळींत फिरंगी बोलणें म्हणजे सुशिक्षितपणाचें एक अंग मानीत असत. जुन्या लोकांमध्ये अद्यापहि वृद्धलोक पोर्तुगीज बोलणारे आढळतात." मुंबई बेट हा वस्तुत: महाराष्ट्राचा सर्वच दृष्टींनी सलग भाग. पण, बाळपणीं विजातीयांनी झडप घालून पळवून नेलेला आणि सर्वथैव विपरीत परिस्थितींत वाढविलेला मुलगा जसा स्वकीयांना आणि स्वत्वाला पारखा होऊन जातो, तशी १५३४ पासून १८१८ पर्यंत पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्या हुकमतीखाली त्यांची केवळ व्यापारी पेठ म्हणून वसविल्या गेलेल्या मुंबई बेटाची अवस्था होऊन गेली. महाराष्ट्रापासून अगदी विभिन्न अशा वातावरणांत, पारतंत्र्याचीं सतत तीन शतकें, विदेशी, विधर्मी आणि विजातीय अशा संस्कारांच्या संकराने मुंबईचें जीवन बनत गेलेलें होतें. १८१८ सालीं पेशव्यांच्या खालसा केलेल्या राज्याचा मुंबई प्रांत बनविण्यांत आल्यानंतर त्या प्रांताची राजधानी म्हणून मुंबईचा महाराष्ट्राशीं प्रथम निकट संबंध आला; स्वराज्य नष्ट झाल्या दिवसापासून स्वत:ची राजकीय प्रतिष्ठा टिकविण्यासाठी आणि त्याबरोबरच स्वराज्याच्या पुन:प्राप्तीसाठी झगडावयाला प्रवृत्त झालेल्या पुणें शहराशीं तिचें संघटन आणि स्पर्धा हीं दोन्ही सुरू झालीं; व नव्या पाश्चात्य विद्येच्या प्रसाराचें माध्यम म्हणून मराठी भाषेच्या विकासाचें केंद्रहि तेथे निर्माण

करण्यांत आलें. या नव्या विद्येंत निष्णात झालेली जी नवशिक्षितांची पहिली पिढी बाहेर पडली, तिच्यासंबंधीं भाऊ महाजन यांनी आपल्या 'प्रभाकर' पत्राच्या ता. १२ डिसेंबर १८४१ च्या अंकांत असे उद्गार काढले होते की,–

"मुलें व्याकर्ण मात्र करतात. परन्तु शुद्ध बोलणें व लिहीणें याचे नांवें त्यांचा पांचजन्य होतो... तेव्हां फार काय सांगावे ? या मराठी शाळांचें हयगईमुळें सर्व इंग्रजी शाळांचाहि जो उद्देश आहे, तो पराभूत होतो... सांप्रत जे मोटाले आपणांस एलफिन्स्तन विद्यार्थी म्हणवितात त्यांणी आपले लोकांस जर कांहीं समजावयाचें जाहलें तर कित्येक थोडेसे खेरीज करून बाकीच्यास ती गोष्ट मोठी अवघड येऊन पडेल.. त्यांस असें वाटतें की मराठी ती काय केवळ आडु लोकांची भाषा आहे. यामुळें विलियम दि कांकर राजापासून इंग्लंडांत जसी फ्रेंच भाषा मोटे इष्की मंडळींत बोलण्याचा परिपाठ कांही दिवस पडला होता तसाच इंग्रजी भाषेचा. घरींदारीं हावेतसें बोलतात. याजमुळें त्यास मराठी म्हणजे केवळ परभाषेप्रमाणें होऊं लागली आहे. सारांश, इंग्रेजो शाळेंतील मुलें मराठी भाषेपेक्षां इंग्रेजींत अधीक हुषार आहेत असें म्हटल्यास यथायोग्य साजेल."

पण, केवळ 'एल्फिन्स्टन विद्यार्थ्यां'चीच नव्हे, तर एकंदर पांढरपेशा वर्गाचीच दृष्टि मुळीं, वरिष्ठ अधिकाऱ्यांची कृपा आणि बड्या पगाराची सरकारी नोकरी यांचा लाभ करून देणाऱ्या या विद्येच्या प्रभावाने, अगदी फिरून गेल्यासारखी झाली होती. भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' पत्राच्या ता. ८ मे १८४२ च्या अंकांत मुंबईंतील हिंदु लोकांच्या 'स्थिति--रीती'वर अशी टीका केली होती की,--

"सांप्रत मुंबई येथील हिंदु लोक इंग्रेजी भाषा आणि विद्या यापासून संसारांत उपयोग आहे म्हणोन त्या शिकणें हाच मोठा पुरुषार्थ मानून त्यांत सर्व वेळ खर्च करितात. आणि देशपरंपरागत जो स्वभाषा किंवा त्या भाषेचें मूळ आणि धर्मशास्त्र पुराणें यांच्या ज्ञानास साधन अशी जी संस्कृत भाषा तिचा अभ्यास करण्याकडेस कांहींच लक्ष देत नाहींत.

अनुक्रम २२.१०७ ०५५७७
विभाग २०१९५

यामुळे येथील लोकांची भाषा व स्थिती-रीती हीं विलक्षण होत चालली आहेत; तीं अशी कीं ते बोलूं लागले असतां पंचवीस शब्दामध्ये वीस शब्द इंग्रजी येऊन, मध्यें विभक्ती, अव्ययें, सर्वनामें आणि प्रसिद्ध क्रियापदें, इतकी मात्र बहुधा स्वभाषेचे उपयोगांत आणतात. तसेंच नमस्कार करणें अथवा आगतस्वागत विचारणें झाल्यास इंग्रेजी शब्दांनी करतात. कोणी स्नेही आला असतां इंग्रेजाप्रमाणें त्याचा हात धरतात आणि ते देवळांत गेले असता टोपी काढितात, त्याप्रमाणें आपण पागोटें काढितात. हा एक दृष्टांत लिहिला, पण याचप्रमाणें आणखी बहुत संप्रदाय पडत चालले आहेत. त्याहीं करून असें होतें कीं, प्रौढ भाषा, आणि आमचे शिष्ठसंप्रदाय यांचाच ज्यास जन्मापासून अभ्यास त्यांची व येथील लोकांची गांठ पडली असतां त्यांस हे जसे द्वीपान्तरचे लोक तसे भासतात आणि त्यांचे स्वरूप यांस न समजून आपलें हेंगाडें बोलणें त्यांस समजत नाहीं एवढ्यावरच हे त्यास वेडे ठरवून उपहास करितात...

..अशा समयीं आमची रीति, स्थिति, धर्म यांची माहितगारी अथवा याचें ज्ञान होण्यास साधन जी संस्कृत भाषा तिचा अभ्यास सुलभ होण्याचा उपाय जितका होईल तितका चांगला आणि हा उपाय जो करील तो स्तुतीस पात्र होय... ”

अशा परिस्थितींत सरकारी प्रेरणेने आणि प्रोत्साहनाने जें वाङ्मय निर्माण झालें, त्यांत भाषेचें सौष्ठव आणि विचारांचें तेज कुठून दृष्टीस पडणार ? बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून तों रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्यापर्यंत तत्कालीन थोर विद्वानांनी जे प्राय: अनुवादित ग्रंथ या कालावधींत लिहून प्रसिद्ध केले, ते जर आज आपण वाचूं लागलों, तर त्यांतील भाषा आणि विचार यांचें दारिद्र्य पाहून, “ ज्या कागदावर हे ग्रंथ छापले गेले, त्या कागदापेक्षाहि त्यांची किंमत कमी होती, ” हा सर फेरोजशहा मेहता यांचा अभिप्राय जरी अतिशय कटु असला, तरीहि अखेर यथार्थ वाटल्यावाचून राहत नाही.

# १०

तथापि, परतंत्र महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनाची पहिलीं स्वप्नें मुंबईनेच पाहिलीं आणि तीं स्वप्नें मूर्तावस्थेला आणण्याचे पद्धतशीर प्रयत्नहि प्रथम तिच्याच सुपुत्रांनी केले, यांत शंका नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुंबई शहरांतून जे द्रष्टे आणि कर्ते पुरुष उदयाला आले व ज्यांनी आपल्या प्रतिभेने आणि कर्तृत्वाने आधुनिक महाराष्ट्राच्या उन्नतीची दिशा निश्चित केली, त्यांत जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर आणि दादोबा पांडुरंग यांना अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. जगन्नाथ शंकरशेठ यांनीं राष्ट्रीय जीवनाचीं अंगोपांगें विकसित करणाऱ्या नाना प्रकारच्या संस्था धडाडीने काढल्या; बाळशास्त्री जांभेकर यांनी लोकांच्या बौद्धिक जागृतीला उपकारक होणारे निरनिराळे उपक्रम धैर्यानें केले; व दादोबा पांडुरंग यांनी भाषेबरोबरच जनतेचाहि आचारधर्म सुधारण्यासाठी वाणीचा सद्व्यय निष्ठेने केला. हे तिघेहि पुरुष आपआपल्या परीने सुधारक होते, ही गोष्ट खरी. पण, जगन्नाथ शंकरशेठ यांचें धोरण एकंदर समाजाला आपल्या बरोबर घेऊन चालण्याचें होतें; बाळशास्त्र्यांची वृत्ति समाजाचा सदसद्विवेक हर एक बाबतींत जागृत करण्याची होती; तर दादोबांचा कल जरूर तर समाजापासून फुटून निघून सुद्धां वेगळा मार्ग काढण्याकडे होता. तथापि, आपल्या राज्यकारभाराची घडी बसविण्याच्या उद्योगांत त्या वेळी असलेले परकीय राज्यकर्ते आणि त्यांच्या संस्कृतीचा प्रभाव पाहून दिपलेली तत्कालीन दिङ्मूढ जनता या दोघांनाहि योग्य सल्ला देऊन त्यांचें सहकार्य घडवून आणण्यासाठीं व त्याबरोबरच बदलत्या कालमानाला अनुरूप अशा नव्या संस्थात्मक लोकजीवनाची अगदी पायापासून उभारणी करण्यासाठी या तिघाहि पुरुषांनीं आमरण सारखेच परिश्रम घेतले, हें कृतज्ञतापूर्वक लक्षांत ठेवलें पाहिजे.

जगन्नाथनाना शंकरशेठ मुर्कुटे (१८०३–१८६५) यांचें सर्व आयुष्य मुंबई शहरांत, महाराष्ट्राच्या त्या नव्या राजधानींतून, त्याच्या अभिनव संस्थात्मक जीवनाचा विकास करण्यांत गेलें. त्या दृष्टीने, "त्यांचें आयुष्य

म्हणजे मुंबईंतील एतद्देशीय लोकांच्या प्रगतीचा इतिहासच होय," असे जे उद्गार तत्कालीन न्यायाधीशमंडळाचे अध्यक्ष ए. आर. स्कोबल यांनी काढलेले आहेत, ते अगदी समर्पक वाटतात. एलिफन्स्टनने आपलें शैक्षणिक धोरण निश्चित करितांना त्यांचा सल्ला घेतला होता; व त्याने आणि नंतरच्या राज्यपालांनीहि तें धोरण अमलांत आणण्यासाठीं पुढें जे जें उपक्रम केले, त्या त्या सर्व उपक्रमांत नाना हे त्यांचे प्रमुख सहकारी होते. म्हणूनच दादाभाई नौरोजी यांनी त्यांचें असें यथार्थ वर्णन केलें आहे कीं, "ज्यांनीं शिक्षणाचे बीज रुजत घातलें, त्याची निगा राखली आणि आज दृष्टीस पडणारी त्याची निरामय अभिवृद्धि होईपर्यंत त्याचा परिपोष केला, त्या आघाडीच्या पहिल्या कार्यकर्त्यांत जगन्नाथ शंकरशेठ हे पहिले होते." १८४८ सालीं त्यांनीं आपल्या वाड्यांत मुलींची शाळा काढली आणि त्या शाळेंत स्वतःच्या मुली पाठवून प्रत्यक्ष कृतीनें लोकांना स्त्रीशिक्षणाचा धडा घालून दिला. मुंबईतील ही पहिली मुलींची शाळा होय. पण, नाना केवळ शिक्षणसंस्थाच स्थापन करण्यांत पहिले होते, असें नाही; तर राजकीय, सांस्कृतिक, औद्योगिक, साहित्यविषयक इत्यादि सर्व प्रकारच्या संस्था काढण्यांत आणि चालविण्यांत ते अग्रेसर होते. किंबहुना, मुंबई शहरांत अशी एकहि संस्था किंवा चळवळ नव्हती कीं, जिला नानांच्या नेतृत्वाचा आणि दातृत्वाचा लाभ कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत घडलेला नसेल. हैंद शाळा पुस्तक मंडळी, एलिफन्स्टन निधि, स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी, रॉयल एशियाटिक सोसायटीची मुंबई शाखा, अॅग्रि–हॉर्टिकल्चरल सोसायटी, मुंबई म्युनिसिपालिटी, व्हिक्टोरिया म्यूझियम, जी. आय. पी. रेल्वे कंपनी, मुंबई युनिव्हर्सिटी वगैरे ज्या ज्या संस्था मुंबईंत त्यांच्या हयातीत सरकारच्या प्रेरणेने किंवा लोकांच्या प्रयत्नानें निघाल्या, त्यांचे ते संस्थापक, सल्लागार किंवा सहायक होते. त्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट ही की, १८५२ सालच्या जुलैंत दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी, जमशेटजी जिजीभाई, सखाराम लक्ष्मणजी प्रभृति कार्यकर्त्यांच्या सहाय्याने 'बॉम्बे असोसिएशन' ही संस्था स्थापन करून त्यांनीं सनदशीर राजकीय चळवळीला प्रारंभ केला. ते स्वतः या

संस्थेचे अध्यक्ष आणि त्यांचे थोरले चिरंजीव विनायकराव हे कार्यवाह होते. पश्चिम भारतांत राजकीय चैतन्य उत्पन्न करण्याचें श्रेय या संस्थेला दिलें पाहिजे. १८६१ सालच्या जानेवारींत त्यांची मुंबई विधानसभेंत नेमणूक झाली. एतद्देशीयांच्या वाट्याला हा जबाबदारीचा बहुमान प्रथमच आला होता. नानांनीं त्याचा लोकहिताच्या दृष्टीने उत्तम उपयोग करून दाखविला. विठोबाच्या पालखीची अडवणूक करणाऱ्या मुसलमानांना जरब बसविण्याचा प्रश्न असो, सतीच्या अमानुष रूढीला प्रतिबंध करण्याचा प्रश्न असो, मुंबईचें सोनापूर स्मशान कायम ठेवण्याचा प्रश्न असो, जुव्वेबाजीला आळा घालण्याचा प्रश्न असो, धर्मांतरितांच्या शुद्धीकरणाचा प्रश्न असो किंवा मराठी माध्यमाच्या पुरस्काराचा प्रश्न असो; नानांनी अशा प्रकारचे सगळे तत्कालीन प्रश्न केव्हा हिमतीने तर केव्हा हिकमतीने सोडवून घेऊन लोकपक्षाची बिनी मोठ्या दक्षतेने सांभाळल्याचें दृष्टीस पडतें. त्यांचें व्यक्तित्व भव्य, दातृत्व विवेकी आणि नेतृत्व स्वयंभू होतें. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, दादाभाई नौरोजी यांच्यासारख्या त्या काळांतील महत्त्वाकांक्षी तरुणांना उत्कर्षाचा मार्ग आक्रमितांना त्यांचा हातभार लाभला होता, ही गोष्ट त्यांच्या गुणज्ञतेची निदर्शक आहे. पाश्चात्य विद्येच्या प्रभावाने सरकार-दरबारीं प्राप्त झालेल्या प्रतिष्ठेच्या गुर्मीत आपल्या समाजावर दुगाण्या झाडण्याची प्रवृत्ति त्या वेळीं पराकोटीला जाऊन पोंचली होती; व त्यामुळे बिचारे सामान्य लोक साहजिकच भांबावून गेले होते. नव्या परकीय राजवटींतील त्या संक्रमण-कालांत आपल्या अज्ञ समाजाला सर्व प्रकारें सांभाळून घेण्यांत नानांनी दाखविलेली सहृदय लोकाभिमुखता आणि त्याबरोबरच राज्यकर्त्यांना त्यांच्याशीं सहानुभूतीने वागावयाला प्रवृत्त करण्यांत प्रकट झालेली त्यांची स्वाभिमानी मुत्सद्देगिरी या दोहोंचा गौरव त्या काळांतील सर्व पक्षांच्या, धर्मांच्या आणि जातींच्या कार्यकर्त्यांनी मुक्तकंठाने केलेला आढळतो. त्या दृष्टीने जगन्नाथनाना शंकरशेठ हे आधुनिक महाराष्ट्रांतील पहिले लोकाग्रणी ठरतात

बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर ( १८१२–१८४६ ) यांचें वर्णन आधुनिक महाराष्ट्राचे पहिले आचार्य म्हणून यथार्थतेने करितां येईल. कारण, स्वाध्याय हा त्यांनी आपला जीवनधर्म मानला; व त्यांचें सर्व आयुष्य ज्ञानोपासनेंत, विद्यार्जन आणि विद्यादान करण्यांत, विद्यार्थिवर्ग आणि लोकसमाज या दोघांच्याहि मनाचें आणि बुद्धीचें उद्‌बोधन आणि उन्नयन करण्यांत गेलें. पण, बाळशास्त्री केवळ एवढेंच करून थांबले नाहीत; नवीन उपऱ्या राज्यकर्त्यांची जी शोषक कूटनीति या सुमारास नुकतीच कुठे जनतेला जाणवूं लागली होती आणि ज्या नीतीमुळे त्यांच्या राजकीय धोरणालाहि दिवसेंदिवस झपाट्याने धार येत चालली होती, त्या नीतीचे दुष्परिणाम त्यांनी आपल्या सौम्य पण प्रभावी शैलीने सत्ताधाऱ्यांच्या निदर्शनाला स्पष्ट आणून दिले. त्याबरोबरच, आपल्या रूढिग्रस्त अज्ञ समाजाचे सगळे दोष, त्याचा उपहास किंवा उपमर्द न करितां, मायेच्या कनवाळू पण कणखर शब्दांनी उघडे करून दाखवावयालाहि ते चुकले नाहीत. ख्रिस्ती मिशनरींचा संसर्ग घडल्यामुळे पतित ठरलेल्या श्रीपत शेषाद्रि परळीकर या ब्राह्मण कुमाराच्या शुद्धीकरणासाठी त्यांनी केलेल्या भगीरथ प्रयत्नांत त्यांची चिकाटी आणि धारिष्ट हीं दोन्ही कसोटीला लागून गेलीं. आपल्या वांट्याला आलेल्या उण्यापुऱ्या पस्तीस वर्षांच्या आयुष्यांत त्यांनी जे विविध आणि विशाल उपक्रम केले, त्यांतून प्रतीत होणारी त्यांच्या प्रतिभेची मूलग्राही, दूरगामी आणि सूक्ष्मवेधी दृष्टि पाहिली, म्हणजे मनाला खरोखरीच आचंबा वाटतो; व न्या. रानडे यांच्या मृत्युसंबंधीं शोक व्यक्त करण्यासाठी १९०१ सालच्या जानेवारींत एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये भरलेल्या सभेंत सर नारायण चंदावरकर यांनी त्यांच्याविषयीं काढलेले उद्‌गार अगदी समर्पक वाटतात. सर नारायण यांनी असें म्हटलें होतें की, "न्या. रानडे हे पदवीधरांचे मुकुटमणि होते. त्यांच्याशीं ज्याची आपण तुलना करूं शकूं, असा एकहि पदवीधर सुशिक्षितांच्या विद्यमान किंवा गतकालीन पिढींत सांपडत नाही. नाही म्हणावयाला, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धाकडे जर आपण वळलों, तर याच महाविद्यालयांतील पहिले हिंदी प्राध्यापक प्रो. बाळशास्त्री जांभेकर हेच

काय ते त्यांच्याशीं तुल्य असे आपल्या डोळ्यांपुढे उभे राहतात. प्रो. जांभेकर यांना जे ओळखीत असत—श्री. दादाभाई नौरोजी आणि प. वा. सोराबजी शापुरजी बंगाली यांच्यासारखे त्यांचे विद्यार्थी असलेले गृहस्थ त्यांच्यासंबंधीं असें सांगतात की, ते तेजस्वी प्रतिभेचे, नानाविध उद्योगांत गुंतलेले, सावे आणि सहृदय होते; पण ते अगदी अकालीं वारले—वयाच्या अवघ्या पस्तिसाव्या वर्षीं. त्यामुळे, ते जर अधिक काळ जगते, तर आणखी किती थोरवीला पोंचले असते, याचें अचूक मापन करणें कठीण आहे." सर नारायण यांनीच केवळ नव्हे, तर सर अर्स्किन पेरी, डॉ. विल्सन, दादोबा पांडुरंग, केरोपंत छत्रे, नारायण महादेव परमानंद, विश्वनाथ नारायण मंडलिक, केशव शिवराम भवाळकर यांच्यासारख्या त्या काळांतल्या थोर व्यक्तींनी आणि 'बॉम्बे टाइम्स', 'ओरिएंटल ख्रिश्चन स्पेक्टेटर', 'रास्त गोफ्तार'. 'श्रीमुमबईना समाचार', 'मुमबईना चाबूक', 'ज्ञानोदय' यांच्यासारख्या प्रमुख वृत्तपत्रांनी त्यांच्या बुद्धिमत्तेची आणि कर्तबगारीची जी प्रशंसा मुक्तकंठाने केली आहे, तिच्यांतून दृग्गोचर होणाऱ्या त्यांच्या निरनिराळ्या गुणांच्या मनोज्ञ छटा त्यांचें व्यक्तित्व किती लोकातिग आणि लोकोपकारी होतें, याची साक्ष देतात. सरकारी नोकरीचीं बंधनें साक्षेपानें सांभाळून देशोन्नतीच्या निरनिराळ्या चळवळी प्रत्यक्षाप्रत्यक्ष करणारे महाराष्ट्राचे पहिले विचाराग्रणी जांभेकर,—दुसरे रानडे. साठीच्या घरांत गेल्यावर दिवंगत झालेल्या रानड्यांच्या बुद्धीला जितके पैलू असल्याबद्दल आपल्याला त्यांचें कौतुक वाटतें, त्यापेक्षां जास्त पैलू तिशीच्या घरांत असताना मृत्युमुखीं पडलेल्या जांभेकरांच्या बुद्धीला होते. किंबहुना, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत बाळशास्त्री जांभेकर यांनी आपल्या परतंत्र देशाची सर्वांगांनी प्रगति व्हावी म्हणून ज्या अनेक अभिनव कल्पनांना आणि योजनांना चालना दिली, जे नाना प्रकारचे उपक्रम आणि उद्योग आमरण केले, त्यांचाच विकास आणि विस्तार न्या. रानडे यांनी त्या शतकाच्या उत्तरार्धांत, कालाच्या अनुकूलतेनुसार, केलेल्या अधिक व्यापक आणि वर्धिष्णु चळवळींत दिसून येतो, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

कोंकणांत देवगड तालुक्यांतील बहुधा पोंभुर्ले या गांवीं जन्म, १८२५ सालच्या सुमारास मुंबईस आगमन, बापू छत्रे यांच्या आश्रयाने विद्याभ्यास, १८३० सालीं हैंद शाळापुस्तक मंडळीचे नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून नेमणूक, १८३१ सालापासून ग्रंथरचनेला प्रारंभ, १८३२ सालाच्या सुरवातीलाच 'दर्पण' पाक्षिकाचें प्रकाशन, १८३४ सालीं 'एल्फिन्स्टन निधी' च्या उपाध्यापकपदावर योजना, १८४१ सालीं 'दिग्दर्शन' मासिकाचा उपक्रम, १८४३ सालापासून श्रीपत शेषाद्रीच्या शुद्धीकरणाची चळवळ, १८४५ सालीं अध्यापनवर्गाचे संचालक आणि ता. १७ मे १८४६ रोजीं देहावसान!—अशी बाळशास्त्र्यांच्या पस्तीस वर्षांच्या आयुष्याची स्थूल रूपरेषा आहे. या अवधींत त्यांनी निरनिराळ्या विषयांवर सोळा सतरा ग्रंथ लिहिले; दोन नियतकालिकांचें बारा वर्षे स्वत: संपादन केलें; दोन तीन नियतकालिकांच्या सल्लागाराचें काम केलें; व शुद्धीकरणाची चळवळ, तत्कालीन धर्मधुरीणांचा विरोध आणि सामाजिक छळ सोसून, इतक्या धैर्याने आणि चिकाटीने मरेपर्यंत केली की, "आमच्या शापाने बाळशास्त्री मेला!" असे दर्पोद्‌गार त्यांच्या अकालमृत्यूनंतर सजातीय ब्रह्मवृंदाने मोठ्या शेखीने काढले म्हणतात! पहिले अध्यापक, पहिले पत्रकार, पहिले संशोधक, पहिले शिक्षणशास्त्रज्ञ, पहिले समाजसुधारक, पहिले राजकीय प्रतिपादक, पहिले उदारमतवादी!—सारांश, समाजजीवनाचा सर्वांगांनी विकास घडवून आणण्यासाठी त्या वेळीं नुकत्याच सुरू झालेल्या कितो तरी कार्यशाखांत बाळशास्त्री हे प्रथम आणि प्रमुख, अग्रेसर आणि अग्रगण्य असल्याचें दृष्टीस पडतें. नवल नाही की, पौर्वात्य आणि पाश्चात्य विद्यांत, विज्ञानांत आणि वाङ्मयांत सारखीच सलील गति असणारा, चारित्र्याने आणि मनोबलाने समाजांतील सर्व वर्गांवर स्वत:चा प्रभाव पाडणारा व आपल्या देशबांधवांच्या उन्नतीसाठी अहर्निश तळमळीने आणि उत्साहाने झटणारा असा हा महापंडित अकालीं निधन पावल्यामुळे पश्चिम भारताची केवळ अतुल अशी हानि झाली, असे उद्‌गार मुंबईच्या वरिष्ठ कोर्टाचे तत्कालीन न्यायाधीश सर अर्स्किन पेरी यांनी काढावेत! व दिवसाचे चोवीस तास समाजाच्या हितचिंतनांत आणि ज्ञानप्रसारांत जातिधर्मातीत

वृत्तीने घालवून आपल्या चारित्र्याने, विद्वत्तेने आणि कर्तृत्वाने सरकार आणि लोक यांना सारख्याच आदरणीय होऊन बसलेल्या या महापुरुषाचा सर नारायण चंदावरकर यांनी 'आधुनिक महाराष्ट्राचे आद्य ऋषि' म्हणून गौरव करावा! ! आणि, ही सर्व कामगिरी बाळशास्त्र्यांनी, आपल्या समाजाला शक्य तोंवर न दुखवितां, न डिवचतां आणि न डावलतां केली आहे, हें विशेष होय. श्रीपत शेषाद्रीला शुद्ध करून घेण्याच्या बावतींत त्यांनी करवीर मठाच्या शंकराचार्यांपासून तों वाराणसीस्थ विद्वद्वृंदापर्यंत सनातनी पक्षाच्या अध्वर्यूंची जी 'चरणसेवा' केली, ती त्यांच्या शालीन आणि संग्राहक वृत्तीची निदर्शक आहे. "त्यांच्या सुधारलेल्या मतांवरून त्यांचा कल ख्रिस्ती धर्माकडे आहे व ते पाव–बिस्कुटें खातात व ग्लासाने पाणी पितात, अशी लोकांत कंडी उठली होती.. तसेंच मार्गांतून पालखींत बसून जातांना साहेब लोकांप्रमाणे बुक वाचीत, त्यावरून ते बैबल वाचीत असा लोकांनी तर्क केला होता." पण, त्यांचे एक नामांकित सहकारी ग्रंथकार गंगाधरशास्त्री फडके यांनी त्यांच्याविषयी असा मार्मिक अभिप्राय व्यक्त केला आहे की, "हिंदु लोक अविद्वान, अविवेकी असें सरकारास वाटून, यांस विद्वान करावें, विवेकी करावें या उद्देशाने कृपाळू सरकाराने कोट्यावधि रुपये खर्च करून हजारो शाळा घातल्या व हजारो विद्वान केले. परंतु त्या विद्या शिकून त्यांचा उपयोग कै. बाळ गंगाधर शास्त्री यांणी मात्र उत्तम रीतीने केला. तो असा की, त्यांणी इतरधर्मी लोकांचीं मतें स्वमताशीं ताडून पाहून स्वमत सर्व इतर मतांपेक्षा चांगलें असा सिद्धांत करून, स्वधर्मावर पूर्ण विश्वास ठेऊन, त्याप्रमाणे आचरणहि करून कैलासवासी झाले." भारतीय धर्म, संस्कृति आणि तत्त्वज्ञान यांच्याविषयींचा त्यांचा अभिमान किती गाढ आणि उत्कट होता, हें जसें त्यांच्या स्वतःच्या अनेक लेखांवरून प्रत्ययाला येतें, त्याचप्रमाणे त्यांचे सहाध्यायी, सहकारी आणि शिष्य यांनी त्यांच्यासंबंधीं काढलेल्या प्रांजळ उद्गारांवरूनहि कळून येतें. "पंतोजीपणाचें काम हालकें" समजणाऱ्या आपल्या अध्यापनवर्गांतील विद्यार्थ्यांना त्यांनी जो उपदेश केला होता, त्याचा सारांश त्यांचे एक विद्यार्थी केशवराव भवाळकर यांनी असा दिला आहे की, "पूर्वकाळचे महाप्रबुद्ध ऋषिजन यांनी अरण्यवास करून विद्यासंपन्नता व विद्यादान

या उन्नत कार्यांत आपली कालक्रमणा केली होती. व आपल्या देशांत जो अपूर्व व अप्रतिम ज्ञानभांडारें भरून ठेविलीं आहेत तीं इतकीं तुडुंब व ओतप्रोत आहेत की, आपण तीं नुसतीं उपसून काढून साफसूफ व चाळूनपुसून पुन: जेथल्या तेथे ठेवूं लागलों, तरी आपले क्षणभंगूर आयुष्यांत आपल्या सर्वांचाने तें होऊं शकेल कि नाही याची वानवाच. त्या ऋषिमहाराजांचे आपण वंशज म्हणवितों आणि आपल्यास खाण्यालेण्यास देत असतां आपण विद्याभ्यास मनापासून करून आपण आपल्या देशबांधवांस विद्यादान देण्याविषयीं पुढारी होऊं नये हें आपणांस किती लाजिरवाणें आहे ! तुम्हांस विद्या शिकून कारकुनी पेशा करावा व मोठे आमलदार बनावें असें वाटत असेल; परंतु या विचारांत तुम्ही असाल तर ती तुमची मोठी चूक आहे .. तुम्ही चांगला विद्याभ्यास करून विद्याभिलाषी व्हा आणि प्रांतांत जाऊन लोकांस सुशिक्षण द्या. जेणे करून लोकांस सरकार व प्रजा, धनी व चाकर, मातापितर व पुत्र, सुहृदसंबंधी व इष्टमित्र व देशबांधव, स्वदेशाभिमान व स्वदेशप्रीति, परमेश्वर व स्वधर्म यांवर विद्याभ्यासांत मनन करून त्याचें परिज्ञान लोकांचे ठायीं वसे असें करा. हेंच आपलें ऋषिवंशजांचें कर्तव्य होय." बाळशास्त्र्यांची स्वधर्मनिष्ठा ही निरनिराळ्या धर्मांच्या तुलनात्मक परिशीलनाने अत्यंत दृढ आणि विकसित झालेली होती. म्हणूनच खरोखरी, सरकारी नोकरीच्या बंधनांत असतांना सुद्धा, त्या प्रखर धार्मिक संघर्षाच्या काळांत, त्यांनी श्रीपत शेषाद्रीच्या शुद्धीकरणाचा प्रश्न निर्धाराने सोडवून घेतला. ता. १९ नोव्हेंबर १८४३ रोजीं या बाबतींत आपले त्या वेळीं पुण्यास असलेले बहिणोई रामचंद्रशास्त्री जान्हवेकर यांना पाठविलेल्या पत्रांत त्यांनी अशी विनंती केली होती की, "...पाद्रीलोक लोकांस भ्रष्ट करावे या हेतूने जे आले आहेत, त्यांस मोठे लोक बहुतकरून वधत नाहींत. यामुळें थोडेच बाटतात. त्यांचा डाव मुलावर अनायासानें सिद्धीस जातो. मुलाचे बुद्धीस भेद करण्यास त्यास कांहीं श्रम पडत नाहींत. पाद्रीचे शाळेंत मुलें जाण्याची बंद करावी तर गरीब निराश्रित लोकांचे मुलास विद्या होणे कठीण. सबब त्या लोकांस इजा फार होत्ये. यामुळें तेंही सिद्धीस जात नाहीं. परधर्मांत गेलेला एक मुलगा परत आणिला म्हणजे बाटविण्याच्या उद्योगाला आळा पडून आपलें

धर्मसंरक्षणाचा फार फायदा आहे हें जाणून लिहिलें आहे. तरी येविषयीं तेथील मंडळीची खात्री करावी." या चळवळींत जगन्नाथ शंकरशेठ यांनी त्यांना मोठ्या हिंमतीने साथ दिली; तर रा. ब. धाकजी दादाजी यांनी इतक्या निकराने विरोध केला की, त्यांच्या शुद्धिविरोधी सनातनी पक्षाला 'परभू तट' असें नांव पडलें ! शुद्धिवादी पक्षाला अर्थातच 'शास्त्री तट' म्हणून निदण्यांत आलें. बाळशास्त्र्यांच्या या जाज्वल्य धर्माभिमानाबद्दल ख्रिस्ती मिशनरींचा त्यांच्यावर किती खुनशी राग होता, याचें एक प्रत्यंतर 'ओरिएंटल ख्रिश्चन स्पेक्टेटर' या ख्रिस्ती नियतकालिकाने १८४६ सालच्या जूनमध्ये त्यांच्यावर लिहिलेल्या मृत्यु-लेखांतसुद्धा पाहावयाला मिळतें. 'स्पेक्टेटर'ने असें म्हटलें होतें की, "...शुभवर्तमानांतील नीतीची ते प्रशंसा करीत असत. पण, या नीतीची तारीफ केल्यानें आपण पर्यायानें स्वतःला पतित ठरवितों आणि देवापुढें आपण दोषी असल्याची कबुली आपल्याला द्यावी लागेल, हें मात्र त्यांच्या ध्यानांत आलें नाही. त्यांचें ऐहिक जीवन सफल झालें व त्यांच्या मृत्युबद्दल भारतीय आणि युरोपियन अशा दोन्ही समाजांतील हजारों लोकांनी शोक केला. पण, मृत्युनंतर आपण कुठें जात आहोंत, याची कांही त्यांना जाणीव नव्हती; — त्यांच्या डोळ्यांपुढें केवळ अंधतम होतें." सनातनी आणि मिशनरी या दोघांनीहि, निधनानंतर देखील, त्यांची जी ही नालस्ती केली आहे, तो खरोखरी त्यांनी मोठ्या ईर्ष्येने केलेल्या धर्मसुधारणेच्या आणि धर्मरक्षणाच्या कार्याचा गौरवच नव्हे काय ?

बाळशास्त्र्यांच्या प्रतिभेची शुचिता, ऋजुता, सूक्ष्मता, ओजस्विता आणि विशालता यांचें पूर्ण प्रतिबिंब जर कुठे पाहावयाला मिळत असेल, तर तें त्यांनी चालविलेल्या 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन' या दोन नियतकालिकांत. 'दर्पण' हें मराठींतील पहिलें वृत्तपत्र आणि 'दिग्दर्शन' हें पहिलें मासिक. दादोबांनी आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें आहे, "बाळशास्त्री यांहीं एक मोठें संस्मरणीय काम केलें तें असे. त्या वेळेस मुंबईस मराठी व इंग्लिश भाषेंत नेटिव लोकांनी चालविलेलें असें एकहि वर्तमानपत्र नव्हतें. तेव्हां एक दोन पैकेवाले नेटिव गृहस्थ मिळून

' दर्पण ' या नांवाचें मराठींत व इंग्रजींत वर्तमानपत्र काढण्याचें योजिलें आणि त्याचे बाळशास्त्री यांस एडिटर नेमिलें. शास्त्रीबावांनी तें काम मोठ्या मनोत्साहानें कांहीं दरमहा न घेतां पत्करिलें. " ' दर्पणा'चा ' प्रस्ताव ' ता. १२ नोव्हेंबर १८३१ रोजीं प्रसिद्ध करण्यांत आला. त्यांत त्याचें स्वरूप आणि उद्देश यांच्यासंबंधीं असें निवेदन करण्यांत आलें होतें कीं,—

" स्वदेशीय लोकांमध्यें विलायतेंतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा, आणि या देशची समृद्धि व एथील लोकांचें कल्याण याविषयीं स्वतंत्रतेनें व उघड रीतीनें विचार करायास स्थल व्हावें, या इछेनें कित्येक मुंबईंत राहणारे लोकांचे मनांत आहे कीं दर्पण या नांवाचें एक न्यूसपेपर म्हणजे वर्तमानपत्र छापून प्रसिद्ध करावें. त्याचा पहिला नंबर तारीख ६ शुक्रवार माहे जान्युआरी सन १८३२ ते दिवशीं छापला जाईल. या देशचे लोकांत विलायती विद्यांचा अभ्यास वाढावा आणि तेथील ज्ञान प्रसिद्ध व्हावें अशे नात्यानें या वर्तमानपत्राचा उद्योग मुख्यत्वें आरंभिला आहे खरा; परंतु जांस इंग्रेजी भाषा येत्ये त्यांस मात्र याचा उपयोग असें न व्हावें म्हणोन योजिलें आहे कीं, एक बाजूस इंग्रेजी व एक बाजूस मराठी असावें; म्हणजे जे मराठी मात्र जाणतात त्या सर्वांसही याचा उपयोग होईल. इंग्रेजींत कोणी कांही विषय लिहून पाठविला तर त्याचें मराठींत भाषांतर केलें जाईल आणि मराठी भाषेंत पाठविलेले विषयांचें इंग्रेजी केलें जाईल, व मूळ विषय आणि भाषांतर ही समोरासमोर छापली जातील. दर्पणांत जाहीर खबरा आणि विलायतचे व बंगालचे पत्रांचे कांही कांहीं अंश लिहिले जातील. तसेंच या देशांतील, विलायतेंतील व दुसरे देशांतील मोठमोठी वर्तमानेंही लिहिलीं जातील.

. . .मनोरंजन करणे, चालते काळची वर्तमानें कळीवणें आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे, या गोष्टींची दर्पण छापणारास मोठी उत्कंठा आहे; म्हणोन या गोष्टी साध्य होण्याविषयीं जितका प्रयत्न करवेल, तितका ते करितील. कोणा एकाचा पक्षपात किंवा नीचपणा या दोषांचा मळ दर्पणास लागणार नाहीं; कारण की दर्पण छापणारांचें लक्ष निष्कृत्रिम

आहे. म्हणोन हे वर्तमानपत्र जा रीतीनें भले आणि गुणी पुरुषास मान्य होईल, त्या रीतीनें करण्यास ते दृढ निश्चयाने उद्योग करितील."

"लोकस्थिति, धर्मरीति आणि राज्यरीति यांत चांगले आणि उपयोगी फेरफार घडवून आणणें," हे नियतकालिकांचें कर्तव्य आहे, अशी बाळशास्त्र्यांची भावना होती; व या बाबतींत त्यांच्या डोळ्यांपुढें पाश्चात्य विद्येच्या प्रभावाने जागृत झालेला बंगाल आणि त्याचे नेते राजा राममोहन राय यांचें उदाहरण होतें. ता. ६ जानेवारी १८३२ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'दर्पणा'च्या पहिल्याच अंकांत त्यांनी बंगालमधील जागृति आणि त्या वेळीं दिल्लीच्या बादशहातर्फे वकिली करण्यासाठीं विलायतेस गेलेले राजा राममोहन राय यांच्याविषयीं असे उद्‌गार काढलेले आढळतात की,–

> "राममोहन रायाशीं नेहमीचे संघट्टनांतले एके गृहस्थाचे विलायतेंतून तारीख १८ जुलैचें पत्र आलें, त्यांत आहे कीं, त्याचे शरीरास आरोग्य आहे. .. राममोहन रायाने दुसरे बहुत ठिकाणी परिचय केला आहे. तेणेंकरून राजाजवळची मंडळी आणि आतांचे प्रधान यांत त्याचा प्रवेश होत आहे. त्याची भीड पडेल, म्हणोन कोर्ट आफ डरेकटर म्हणजें कंपनीचे कारभार करणारे लोकांचा मंडळीचा मनांत भय आहे, आणि दिल्लीचा बादशहास वकील चांगला मिळाला असें लोक म्हणतात.
>
> राममोहन राय हा बंगाल देशचा राहणारा, आणि जातीचा ब्राम्हण आहे. त्याणें लहानपणींच या देशांतील व युरोप खंडांतील भाषांचा अभ्यास केला. त्या भाषांतून बहुतांमध्ये त्याचे प्रवीणतेची प्रशंसा आज दिवसचे मोठेमोठे विद्वान लोक करितात. जसी त्यास विद्येची आवड, तशीच धर्माचे विचाराची होती. तो विचार करून करून शेवटीं त्याणें आपला मूळचा वर्णाश्रमादि ब्राम्हण धर्म सोडिला आणि वेदांतमत स्वीकारिलें."

राजा राममोहन राय हे ब्राम्ह समाजाचे आद्य संस्थापक. त्यांच्या या मतपरिवर्तनाविषयीं, "त्याणे . . . ब्राम्हणधर्म सोडिला आणि वेदांतमत स्वीकारिलें," असा जो उल्लेख या लेखांत केलेला आहे, तो किती सूचक आणि मार्मिक वाटतो! त्यानंतर, ता. २२ जूनच्या अंकांत राजा राममोहन राय यांनी

ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतांतील न्यायरीतींविषयीं जी साक्ष ब्रिटिश पार्लमेंटने नेमलेल्या कमिटीपुढे दिली, तिच्यासंबंधी लिहितांना त्यांनी असे उद्‌गार काढले आहेत की, " या मोठे हिंदुस्थानाचे राज्यांत राममोहन रायापेक्षे कमी नव्हत असे लोक निश्चय आहेत; आणि जा रीतीनें विलायतेंत त्याचा मान केला, तसा जर त्यांचा एथें केला, तर त्याणें जशी पार्लमेंटापुढें बातमी सांगितली, तशी तेही सांगतील. " या उद्‌गारावरून बाळशास्त्र्यांची राजकीय आकांक्षा किती व्यापक, दूरगामी आणि निःस्पृह होती, हें दिसून येतें. किंबहुना, " इंग्लंड देशांतील राज्यरीतींत बदल करण्यासंबंधीं यत्न " हा जो लेख त्यांनी ' दर्पणा 'च्या पहिल्याच अंकांत लिहिला, त्यांत त्यांनी इंग्लंडांतील उदार पक्षाच्या भूमिकेचें जें समर्थन आपल्या सौम्य शैलीनें केलें आहे, त्यावरून त्यांचें राजकीय दर्शन किती लोकाभिमुख आणि प्रगतिशील होतें, याचा स्पष्ट प्रत्यय येतो. या लेखांत त्यांनीं शेवटीं असेंहि भाकित वर्तविलें होतें की, " सांप्रत इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांत बहुत संबंध आहे. म्हणोन जा गोष्टीपासून तेथें बरे वाईट होईल, त्यांपासून एथेंहि कांहीं थोडेबहुत त्याप्रमाणें होईल." आपल्या नवीन मतांच्या प्रसाराविषयीं त्यांना इतकी तळमळ लागलेली होती कीं, ता. ४ मे १८३२ पासून त्यांनीं ' दर्पण ' साप्ताहिक स्वरूपांत काढावयाला प्रारंभ केला. ' शेतकरी लोकांस सरकारचें उत्तेजन ' कंपनी सरकारच्या तीन इलाख्यांतील जमाखर्चाची याद, ' ' या देशचे लोकांतून मोठ्या सरकारी जागेवर नेमणुका, ' ' नाचतमाशे हा गुलामगिरीचा एक प्रकार आहे, ' ' इंग्लंड देशांतील राजकीय सुधारणेसंबंधीचें बिल संमत झालें, ' ' या देशावर रशियनांचा हल्ला होण्याचें भय,' ' रहदारी जकाती,' ' विलायतचे बादशहाचे कौंसलांत फेरफार ', ' एतद्देशीय ग्रहस्तास इंग्रेजाप्रमाणेंच आदरें करून लिहावे,' ' सातार्‍याचा राजा आणि ब्रिटिश यांच्यांतील वैमनस्य ', ' ब्रिटिश सरकारचें देशी संस्थानांसंबंधीचें धोरण ', ' हिंदु विधवांचा पुनर्विवाह ', ' धंदेशिक्षणाची आवश्यकता ' इत्यादि विषयांचें ' दर्पणां 'त आलेले प्रतिपादन अतिशय तर्कशुद्ध आणि मुद्देसूद आहे. ' दर्पणा 'ची इंग्रजी भाषा जितकी भारदस्त, तितकीच मराठी भिकार होती. त्यांतील मराठी भाषांतरांतल्या चुका जेव्हां एका मित्रानें संपादकाच्या

निदर्शनास आणून दिल्या, तेव्हां बाळशास्त्र्यांनीं ता. १५ जून १८३२ च्या अंकांत त्याला असें उत्तर दिले कीं, " ... आम्ही इछितों कीं, केव्हां कांहीं वाक्यांची भाषांतरें जरी केवळ शुद्ध नाहींत असें वाटलें, तरी... आमचा कागद वाचणारे आम्हांस क्षमा करितील, कारण भाषांतर करायाचा विषय फार असतो. म्हणोन आमचे कामास फार मेहनत लागत्ये. इतकेंच नाहीं, परंतु परभाषेंतील शब्द आणि अर्थ बरोबर आणि शोभायाजोगा या अप्रौढ मराठी भाषेंत येणें ही गोष्ट अशक्य आहे." तथापि, एवढें एक वैगुण्य सोडल्यास, मराठी भाषेंतील हें पहिलें वृत्तपत्र आपल्या प्रवर्तकाप्रमाणें सर्वच बाबतींत आदर्श होतें, यांत शंका नाही.

त्या दृष्टीनें, 'दर्पण' हा बाळशास्त्र्यांच्या प्रतिभेचाच केवळ नव्हे, तर अस्मितेचाहि आविष्कार आहे, असें म्हटलें तरी शोभेल. पण त्यांच्या बाबतींत अस्मितेचा उल्लेख तरी कसा करावा ? 'अस्मिता' म्हणजें मानवी अहंतेचें व्यापक, व्यवच्छेदक, आक्रमक असें स्वरूप; व म्हणूनच योगशास्त्रांत तिला 'क्लेश' मानलेलें आहे. आणि बाळशास्त्र्यांची प्रतिभा ही तर अध्यात्मप्रसाद प्राप्त झालेली ऋतंभरा प्रज्ञा होती. त्यांच्या खाजगी पत्रांत, ग्रंथांत किंवा नियतकालिकांतील लेखांत कुठें अहंतेचा लेशहि दृष्टीस पडत नाही. जणुं स्वतःला लपवून आणि लोपवून त्यांनीं लोकजागृतीचें कार्य, निर्मम आणि निरहंकार वृत्तीनें, आमरण केलें. राममोहन राय, जगन्नाथ शंकरशेठ, भाऊ महाजन, मोरभट दांडेकर, व्हान्स केनेडी, जॉन विलसन, बाळशास्त्री घगवे, दादोबा पांडुरंग प्रभृति आपल्या समकालीनांविषयीं त्यांनीं प्रशंसेचे म्हणा किंवा प्रोत्साहनाचे म्हणा उद्गार काढलेले आढळतात. पण संपादकीय पद्धतिनुसारसुद्धां स्वतःविषयीं मात्र त्यांनीं कुठेंहि निर्देश केलेला सांपडत नाहीं. तेव्हां त्यांच्या ठिकाणीं अस्मिता मुळीं नव्हतीच; होती काय ती फक्त प्रतिभा ! आणि, तीहि केवळ नवनवोन्मेषशालिनी नव्हे, तर ऋतंभरा ! त्यामुळे आपल्या नियतकालिकांतूनहि त्यांनीं विशुद्ध ज्ञान-साधनाच केली; व कोणत्याहि प्रकारच्या मालिन्याचा डाग त्यांना लागूं दिला नाहीं. " दुरुत्तरें किंवा एका पत्र लिहिणारानें दुसऱ्याचीं वर्मं काढावीं हें आमचे मनास येत नाही आणि असें जा पत्रांत असेल तीं सर्वं

पुढें छापलीं जाणार नाहींत," हा 'दर्पणा'च्या पत्रलेखकांना घालून दिलेला दंडक त्यांनीं स्वतःहि आपल्या संपादकीय लेखनांत दक्षतेनें पाळला. बुद्धिवाद आणि उदारमतवाद हे जे त्यांच्या प्रतिभेचे दोन मुख्य घटक, तेच 'दर्पणा'च्याहि प्रतिपादनाचे आत्मीय विशेष होते किंबहुना, महाराष्ट्राचा आद्य पत्रकार या नात्याने त्यांच्या कामगिरीचें मापन करितांना, बुद्धिवाद आणि उदारमतवाद यांचा पहिला प्रवर्तक आणि प्रतिपादक म्हणूनच इतिहास त्यांचा गौरव करील, यांत शंका नाही. 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन' या दोन नियतकालिकांच्या रूपानें त्यांनी या दोन अभिनव तत्त्वप्रणालींची दीक्षा महाराष्ट्राला देण्यांत सतत एक तप घालविलें; व वृत्तपत्रव्यवसायाचा सात्त्विक प्रभावी आदर्श निर्माण केला. लोकशिक्षणाचें कार्य आठ वर्षे केल्यानंतर 'दर्पण' ता. २६ जून १८४० रोजीं वाचकांचा 'शेवटचा निरोप' घेऊन विराम पावलें. पण त्याने उत्पन्न केलेली वृत्तपत्र-व्यवसायाची परंपरा कांही त्याच्या अस्तामुळे खंडित झाली नाही. कारण, तें चालू असतांनाच ता. १ मे १८४० रोजीं " मराठी भाषेंत सर्व विषयांचा संग्रह " करणारें 'दिग्दर्शन' मासिक बाळशास्त्र्यांनीं काढलें होतें; व त्याच्या पाठोपाठच ता. २४ आक्टोबर १८४१ रोजी त्यांचे सहकारी भाऊ महाजन यांच्या प्रयत्नाने 'प्रभाकर' साप्ताहिकाचाहि उदय झाला. 'दिग्दर्शन' हें वस्तुत: व्यवहारोपयोगी शास्त्रें आणि विद्या यांची दिशा दाखविण्यासाठी काढलेलें मासिक. पण त्यांतहि बाळशास्त्र्यांचे मूलगामी विचार प्रसंगोपात्त प्रकट झाल्याविना राहिले नाहींत. त्याच्या दुसऱ्याच अंकांत, अफूच्या व्यापाराच्या मिषाने, इंग्लंडने चीनवर जी स्वारी केली, तिच्यासंबंधीं अशी मार्मिक टीका केलेली आढळते को, " ... इकडे अफीण हा जिन्नस औषधामध्यें अल्पस्वल्प मात्र उपयोगी, असें असतां इंग्लिश सरकारनें त्या जिनसाचा इतका व्यापार वाढूं दिला हें त्या सरकारच्या सूज्ञपणास व अब्रूस योग्य नाही; कारण जसें बंधूंनीं परस्परांचें वांकडें ज्यांत असेल तें करूं नये, तसें सरकारांनी ही करूं नये, हा त्यांचा धर्म आहे. या रीतीनें पाहिलें असतां या लढाईंत उभय पक्षांचा अन्याय आहे, असेंच बहुत करून सर्व लढायांत असतें." हें मासिक सुमारें चार वर्षें चालून बंद पडलें. तथापि, मोरभट दांडेकर यांचें 'उपदेशचंद्रिका', भाऊ

महाजन यांचें 'प्रभाकर' इत्यादि तत्कालीन नियतकालिकांशीं त्यांचा शेवटपर्यंत घनिष्ठ संबंध असल्यामुळे स्वमतप्रचाराच्या त्यांच्या व्रतांत देह पडेपर्यंत खंड पडला नाहीं. 'दर्पणा'च्या अखेरच्या अंकांत त्यांनी आपल्या संपादकीय कामाचें वर्णन 'लुकुब्रेशन्स' — 'निशाभ्यास' या सूचक इंग्रजी शब्दाने केलेलें आहे. त्या शब्दावरून संपादकीय व्यवसायाविषयीं त्यांची कल्पना किती उदात्त होती, हें दिसून येतें. भारतीय संस्कृतींत स्वाध्याय आणि प्रवचन ही ऋषींचीं दोन परम कर्तव्यें म्हणून सांगितलेलीं आहेत. किंबहुना "तद्धि तपस्तद्धि तपः" असा त्या कर्तव्यांचा गौरव उपनिषदांनी केलेला आहे. बाळशास्त्र्यांचें सर्व जीवन हीं कर्तव्यें करण्यांत व्यतीत झालें. म्हणूनच त्यांना 'तपोनित्य' आचार्य म्हणावयाचें! परतंत्र महाराष्ट्राला, त्या संधिकालाच्या पहिल्या प्रहरांत, अनेक भाषा, शास्त्रें आणि विद्या यांत पारंगत असलेला असा हा महान् द्रष्टा मार्गदर्शक लाभला, हें त्याचें महद्भाग्य होय.

रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर (१८१४–१८८२) हे, जगन्नाथ शंकरशेठ यांच्याप्रमाणे, घरंदाज मुंबईकर. मुंबईंतील सर्व सामाजिक आणि शैक्षणिक चळवळींत त्यांनी प्रामुख्याने भाग घेतल्याचें आढळून येतें. बाळशास्त्र्यांच्या मृत्यूनंतर दादोबांची नेमणूक त्यांच्या जागीं अध्यापनवर्गाचे संचालक म्हणून झाली. १८६१सालच्या ऑगस्टमध्ये, ठाणें येथे हुजूर डेप्युटी कलेक्टर असतांना, वरिष्ठ गोऱ्या अंमलदारांच्या दुष्टाव्याला कंटाळून त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला; व आपलें उत्तरायुष्य धर्मचिंतनांत आणि साहित्यसेवेंत घालविलें. दादोबा हे महाराष्ट्राचे पहिले धर्मसुधारक, वैयाकरण आणि भाष्यकार. किंबहुना स्वतंत्र प्रज्ञेचे पहिले ग्रंथकार म्हणूनहि त्यांना अग्रमान देणें अयोग्य होणार नाही. कारण, 'निबंधमाले'चा उदय होण्यापूर्वी बापू छत्रे यांच्यापासून तों कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यापर्यंत जे अनेक लेखक उत्पन्न झाले, त्या सर्व लेखकांत दादोबांचें साहित्य हें मौलिक, रसपूर्ण आणि विचारप्रवर्तक असल्याचें अनुभवाला येतें. त्यांची शैलीहि रस-प्रसंगानुसार आर्ष आणि आर्जवी, प्रसन्न आणि प्रौढ आहे. 'धर्मविवेचन' आणि 'पारमहंसिक ब्राह्मधर्म'

हे त्यांचे दोन छोटे प्रबंध म्हणजे महाराष्ट्रांत गेल्या सवाशें वर्षांमध्ये धर्मसुधारणेसाठी जीं नाना प्रकारचीं आंदोलनें झालीं, त्यांचे मूळ उगमच होत. व्याकरणशास्त्रांत त्यांचा सुलभतेने प्रवेश करून देणारे त्यांचे शाळागुरु बापूशास्त्री शुक्ल हे त्यांना एकदां म्हणाले, "दादद्या, तुझे केलेलें व्याकरण मी पाहिलें आणि मला फार संतोष झाला, तसे तुझे दुसरे गुण आणि विद्वत्तेचा स्तव ऐकून मला फार संतोष होतो. परंतु गड्या, तूं नास्तिक झालास रे. तुझी आपल्या धर्मावर निष्ठा नाही हें ऐकून मी दिलगीर आहे." त्यावर दादोबांनी आपल्या गुरूला नम्रतेने उत्तर दिलें, "शास्त्रीबावा, शिष्याच्या कीर्तीने गुरूस आनंद व्हावा, हें उचित आहे; परंतु धर्माविषयीं जो आपण मला ठपका दिला, तो जर धर्म शब्दाचा यथायोग्य अर्थ समजून दिला असला, तर तो मला लागत नाही; आणि सध्याच्या लोकव्यवहाराप्रमाणे त्याचा अर्थ समजून जर मला दिला असला, तर तो घेणें मला प्राप्त आहे." हें उत्तर जितकें शालीन तितकेंच समर्पकहि होतें. कारण दादोबांची धर्मजिज्ञासा दुरंत होती. बाळशास्त्र्यांप्रमाणेच तेहि आमरण जिज्ञासु आणि विद्यार्थी होते. फरक इतकाच की, शास्त्रीबुवांची प्रवृत्ति भौतिक विद्या आणि शास्त्रें यांच्याकडे होती; तर दादोबांचा कल अध्यात्म आणि साहित्य यांच्याकडे होता. 'धर्मविवेचन' आणि 'स्वीडनबोर्ग ह्यांच्या मतांविषयी एका हिंदु गृहस्थाचे विचार' या त्यांच्या दोन प्रबंधांत त्यांच्या धर्मचिंतनाची प्रक्रिया आणि प्रगति यांचें मनोज्ञ प्रतिबिंब पडलेलें दिसतें. पण, ही त्यांची धर्मजिज्ञासा वैयक्तिक होती, असें समजणें मात्र संकुचितपणाचे होईल. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत पाश्चात्य संस्कृति आणि तिला अंगभूत असलेला ख्रिस्ती धर्म यांच्या संसर्गामुळे नवशिक्षितांच्या पहिल्या पिढींत जो वैचारिक संघर्ष सुरू झाला होता व ज्या संघर्षाचें पर्यवसान एका बाजूने 'परमहंस सभे'च्या स्थापनेंत आणि दुसऱ्या बाजूने तिच्या कांही मुख्य सदस्यांच्या धर्मान्तरांत नंतर झालें, त्या संघर्षाची, त्या युगक्षोभाची त्यांची ती धर्मजिज्ञासा प्रातिनिधिक होती. दादोबांच्या स्वभावानुसार ती सौम्य, सात्त्विक होती, इतकेंच! बाळशास्त्र्यांपेक्षा ते धारिष्टांत आणि विद्वत्तेंत उणे, पण सहृदयतेंत आणि रसिकपणांत अधिक वाटतात. त्यांनी प्रासादिक वाणीने

लिहिलेलें आत्मचरित्र हा जसा मराठी भाषेचा अपूर्व अमोलिक ठेवा, तसेंच महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाचें पहिलें उद्‌बोधक पान आहे. त्यांत त्यांनी रेखाटलेलीं समकालीन व्यक्तींचीं शब्दचित्रें जितकीं हळुवार, तितकेच निरनिराळ्या घटनांसंबंधीं काढलेले समयस्फूर्त उद्‌गार हृदयंगम आहेत. बाळशास्त्र्यांच्या प्रतिभेचें नाना विषयांतील विलक्षण नैपुण्य पाहून आपल्याला त्यांच्याविषयीं विस्मय वाटतो; तर दादोबांच्या अस्मितेचा त्यांच्या साहित्यांतील प्रांजळ आविष्कार पाहून आपल्याला त्यांच्याविषयीं आपुलकी वाटते. बाळशास्त्र्यांप्रमाणे तेहि बहुभाषाभिज्ञ होते; व मराठी, गुजराती, संस्कृत आणि इंग्रजी अशा चार भाषांत मिळून त्यांनी सुमारें सत्तावीस गद्यपद्य ग्रंथ लिहिले. चिपळूणकरांनी मराठी कवितेचे अपूर्व टीकाकार आणि मराठी भाषेचे पाणिनि म्हणून जो त्यांचा गौरव मुक्तकंठाने केला आहे, तो अगदी यथार्थ आहे, असेंच कोणीहि म्हणेल. ‘यशोदा–पांडुरंगी’ या त्यांच्या ‘केकावली’वरील रसाळ भाष्यग्रंथांत संस्कृतांतील व्याख्या आणि इंग्रजींतील टीका या दोन्ही पद्धतींचा सुंदर मिलाफ झालेला असून, त्या ग्रंथाची विस्तृत विवेचक प्रस्तावना हा मराठींतील पहिला उत्कृष्ट टीकात्मक प्रबंध ठरेल. परशुरामपंत तात्या गोडवोले, चिपळूणकर, हंस, पांगारकर, परांजपे, भिडे प्रभृति मराठी कवितेच्या विमर्शकांना या प्रबंधाने स्फूर्ति दिली. त्याहिपेक्षा मराठी व्याकरणाला मूर्तता आणि पूर्णता आणण्यासाठी त्यांनी केलेले परिश्रम केवळ अतुल होत. त्यांच्यापूर्वी रामचंद्रशास्त्री जान्हवेकर, बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री फडके प्रभृति पंडितांनी लिहिलेलीं बालव्याकरणें प्रचारांत होतीं, ही गोष्ट खरी. पण, बापूशास्त्री शुक्ल यांनी म्हटल्याप्रमाणे तीं सर्व व्याकरणें ‘भुसकट’ होतीं. १८३६ सालच्या डिसेंबरमध्ये प्रसिद्ध झालेलें दादोबांचें ‘मराठी भाषेचें व्याकरण’ हाच, बाळशास्त्री जांभेकर यांच्या चिकित्सक अभिप्रायानुसार, मराठींतील पहिला स्वतंत्र बुद्धीने लिहिलेला मौलिक सुबोध व्याकरणग्रंथ होय. दादोबांनी या वेदांगाच्या व्यासंगांत आपल्या आयुष्याचीं चार तपें घालविलीं; व १८३६ पासून १८८१ पर्यंत त्या व्याकरणाच्या पूरणिकेसह सात आवृत्त्या त्यांनी स्वतः सुधारून आणि वाढवून प्रकाशित केल्या. लोकहितवादींनीहि केवळ

एवढ्याच एका कारणामुळे त्यांना 'ऋषि' म्हणून गौरविलें आहे. पण, दादोबा हे जसे भाषेचे तसेच धर्माचेहि संशोधक आणि सुधारक होते; व त्यांचें सर्व जीवन धर्मचिंतन आणि ग्रंथलेखन यांत गेलें. आधुनिक महाराष्ट्राला मातृभाषेची सेवा स्वतंत्र बुद्धीने करण्याची दीक्षा त्यांनीच प्रथम आपल्या उदाहरणाने दिली.

जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर आणि दादोबा पांडुरंग यांनी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत पराभूत, परतंत्र महाराष्ट्राच्या पुनरुत्थानाचे पहिले मंत्र उच्चारले; व आपला समाज, संस्कृति आणि साहित्य यांची पुनर्घटना कोणत्या तत्त्वांवर झाली पाहिजे, याचीहि स्पष्ट कल्पना लोकांना दिली. आधुनिक महाराष्ट्राचे पहिले नेते आणि गुरु म्हणून ते सदैव वंदनीय आहेत.

## ११

पेशवाईचा अस्त होऊन इंग्रजी राज्याची घडी बसण्याच्या या संधिकालांत जुन्या आणि नव्या विद्यांचा सांधेजोड घालून देण्याचें बिकट कार्य इंग्रजी शिक्षणाचा संस्कार घडलेल्या ज्या तरुण शास्त्रीमंडळीने मोठ्या कळकळीने आणि कुशलतेने केलें, त्यांचे कृष्णशास्त्री चिपळूणकर हे अग्रगण्य अभिजात प्रतिनिधि ठरतील. किंबहुना, सर्वच प्रकारच्या विसंगतींनी विनटलेलें त्यांचें वैचित्र्यपूर्ण व्यक्तित्व हा त्या प्रमाथी संधिकालाचा एक विलोभनीय शेखरीभूत प्रसव आहे, असेंहि म्हटलें तरी शोभेल. जर्व्हिस, मोल्स्वर्थ, कँडी प्रभृति अधिकाऱ्यांच्या हातांखाली शालोपयोगी ग्रंथरचना करणाऱ्या जुन्या पंडितमंडळावर जरी त्यांच्या सान्निध्यानें नवीन पाश्चात्य विद्येचा कृपाकटाक्ष पडलेला होता, तरी त्यामुळे त्या पंडितांच्या मनाची किंवा बुद्धीची चलविचल मात्र फारशी झालेली नव्हती. ते शास्त्रीच होते आणि शास्त्रीच राहिले. नव्या राज्यकर्त्यांना त्यांच्या निरनिराळ्या उपक्रमांत साहाय्य केल्यामुळे सुखेनैव घडणारें स्वार्थसाधन आणि त्याबरोबरच जुन्या राजवटींतील स्वतःला जाचक होणाऱ्या कांही प्रथा मोडण्याच्या कामीं त्यांची मदत सुलभतेने मिळण्याची

शक्यता या दोन्ही लाभांची जाणीव या पंडितांना अर्थातच होती. त्याचें एक बोधप्रद प्रत्यंतर असें की, १८२७ साली करवीर मठाचे शंकराचार्य पुण्यास आले असतां, त्यांनी ज्या वेळीं आपल्या पाद्यपूजेची भारी पट्टी लोकांवर सक्तीने लादावयाला सुरवात केली, त्या वेळीं नीळकंठशास्त्री थत्ते, राघवाचार्य, महादेव दीक्षित ओक, चिंतामण दीक्षित आपटे, बाळंभट डोंगरे प्रभृति वेदोनारायणांनीं कलेक्टरला अर्ज करून आचार्यांच्या त्या भूयसीच्या भूर्दंडांतून आपली मुक्तता करून घेतली. पेशवाई नष्ट झाल्याला दहा वर्षें होत नाहीत, तोंच पुण्यांतील याज्ञिक–वैदिकांना आपल्या धर्मगुरु–विरुद्ध विधर्मी आणि विदेशी अशा एका इंग्रज सत्ताधीशाकडे धांव घ्यावयाला व "लोक स्वेच्छेने जी दक्षिणा देतील ती शंकराचार्यांनीं स्वीकारावी" असा हुकूम त्याच्याकडून मिळवावयाला यत्किंचितहि संकोच वाटू नये, ही घटना किती उपरोधपूर्ण आहे! तथापि, कचेरींत असतांना साहेबाच्या नजरेचा नूर ओळखून तो सांगेल तीं कामें खालच्या मानेने मुकाट्याने उरकावयाचीं आणि सायंकाळीं घरीं आल्यावर मात्र सचैल स्नान करून म्लेच्छसंसर्गदोषाच्या परिहारार्थ जपजाप्य करावयाचें, असा दुटप्पी दिनक्रम त्या काळांतल्या बहुतेक पंडितांचा होता. त्यांच्या या मतलबी जुनाट मनोवृत्तीचे कांही मासले दादोबा पांडुरंग, बाबा पदमनजी आणि केशवराव भवाळकर यांनी आपल्या आत्मवृत्तांतून दिलेले आढळतात. गंगाधरशास्त्री फडके हे वस्तुतः बाळशास्त्री जांभेकर यांचे अंतेवासी सहकारी आणि धर्मरक्षणाची तळमळ लागलेले त्या वेळचे कर्ते ग्रंथकार. पण, त्यांचा पुराणमताचा अभिमान इतका कांही दृढमूल होता की, गुरुत्वाकर्षणाचें तत्त्व खोटें आहे, पृथ्वी शेषाच्या मस्तकीं आहे, वगैरे आपलीं दुर्मतें ते वर्गांत बिचाऱ्या विद्यार्थ्यांच्या माथीं बिनदिक्कत मारीत असत!

तथापि कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४–१८७८) हे मात्र खरो-खरीच त्रैविद्य होते. त्यांनी प्रथम वेदपठण, नंतर शास्त्राध्ययन आणि शेवटीं पाश्चात्य ज्ञान-विज्ञानाचे गाढ परिशीलन केल्यामुळे त्यांच्या संस्कारक्षम बुद्धीवर त्याचा परिणाम प्रकर्षाने होऊन ते मनाने पूर्ण आधुनिक बनले.

त्यांच्या प्रखर बुद्धीची चमक ते पाठशाळेंत शिकत असतांनाच त्यांचे गुरु मोरशास्त्री साठे यांच्या प्रत्ययाला आली. पाठशाळेंत झालेल्या एका कृतक वादांत कृष्णशास्त्र्यांनी आपल्यावर कोटि लढविलेली पाहून मोरशास्त्री संतुष्ट झाले आणि ‘ शिष्यादिच्छेत्पराजयं ’ या भावनेने त्यांनी स्वत:च्या अंगावरली शाल आपल्या या शिष्याच्या अंगावर घालून त्याला ‘ बृहस्पति ’ ही पदवी दिली. जुन्या पद्धतीने पढलेल्या संस्कृत पंडितांना अद्याप सरकार-दरबारीं चांगला मान होता. तरीसुद्धा पाठशाळेंत ज्या वेळीं इंग्रजी विभाग सुरू झाला, त्या वेळीं मोरशास्त्र्यांनी आपल्या या पट्टशिष्याला असें स्पष्ट सांगितलें की, “ या उप्पर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यांत प्रतिष्ठा रहाणार नाही. तूं शहाणा असलास तर इंग्रजी शीक. ” आपल्या गुरूच्या या आदेशाचें मर्म लक्षांत घेऊन त्या सुमारास पंचविशीच्या घरांत असलेल्या कृष्णशास्त्र्यांनी इंग्रजीच्या अभ्यासाला उत्साहाने प्रारंभ केला. त्यांची धारणाशक्ति असामान्य होती; व तिला अविरत उद्योगाची जोड मिळालेली असल्यामुळे त्यांच्या बुद्धीला अविषय किंवा अगम्य असें मुळी कांही नव्हतेंच. न्यायशास्त्राच्या मरुभूमीपासून तों अलंकारशास्त्राच्या नंदनवनापर्यंत ती ज्ञान–विज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत लीलेनें संचार करीत असे. त्यामुळे मोरशास्त्रीप्रभृति पाठशाळेंतील अध्यापकांप्रमाणेच पूना कॉलेजांतील कँडी, ग्रीन, ग्रँट प्रभृति प्राध्यापकांचीहि मर्जी त्यांनी आपल्या बुद्धिचापल्याने संपादन केली. इतिहास आणि अर्थशास्त्र या विषयांतील त्यांचा गुरु हेन्री ग्रीन हा स्वत: जबरा वाचक होता; व ह्यूम, मिल प्रभृति ग्रंथकारांचीं हातीं येतील तेवढीं तीस चाळीस पानें रोज विद्यार्थ्यांना वाचावयाला देतांना त्यांच्या वाचनाची गति आपल्याबरोबर टिकावी, अशी त्याची अपेक्षा असे. या त्याच्या कसोटीला शास्त्रीबुवा पुरेपूर उतरले. इतकेंच नव्हे, तर कॉलेजचा प्रिन्सिपल मेजर कँडी याने तयार केलेल्या ‘ वाचनपाठमाले’साठी तीन गोष्टी त्यांनी इतक्या सफाईने इंग्रजींतून मराठींत अनुवादून दिल्या की, त्या त्यांच्या कौशल्याबद्दल “ कॉलेजांतील इंग्रजी विभागाचा अग्रविद्यार्थी कृष्णा चिपळूणकर ” याचें कौतुक मेजरबहादुराने जाहीर रीतीनें केलें.

शास्त्रीबुवांनी केलेल्या या तिहेरी विद्याव्यासंगामुळे त्यांच्या मनाला जी विलक्षण आधुनिकता आली, तिचें मोठें रमणीय प्रतिबिंब त्यांचें जीवन आणि साहित्य या दोहोंतहि पडलेलें आढळतें. ते जर फक्त वेदपठण आणि शास्त्राध्ययन करूनच थांबले असते, तर गोपीनाथशास्त्री आगाशे, त्र्यंबकशास्त्री शाळिग्राम, नीळकंठशास्त्री थत्ते, बापूशास्त्री शुक्ल, मोरशास्त्री साठे प्रभृति तत्कालीन पंडितांप्रमाणे त्यांचीहि विद्वत्ता केवळ सांचेबंद राहिली असती; व गंगाधरशास्त्री फडके यांनी आपल्या 'हिंदुधर्मतत्त्व' या ग्रंथांत हळहळून म्हटल्याप्रमाणे स्वभाषेच्या पुनरुज्जीवनार्थच काय पण स्वधर्म-रक्षणार्थसुद्धा तिचा कांही उपयोग झाला नसता. पण, पाठशाळेंतील शिक्षण मराठी भाषेंतून देण्यांत येऊं लागल्यामुळे आणि तिला इंग्रजी विभागाचीहि जोड मिळाल्यामुळे, तिच्यांतून बाहेर पडलेल्या महादेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री राजवाडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, विष्णुशास्त्री पंडित प्रभृति विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं आपला धर्म, देश आणि भाषा यांची सेवा करण्याची नवीन प्रवृत्ति निर्माण झाली. "आजपावेतों बहुधा असें होत असे की, ज्यांहीं या पाठशाळेंत विद्याभ्यास पुरा केला, ते आपले स्वभाषेस धिक्कारीत असत व त्यास स्वभाषेंत शुद्ध असें एक साधारण पत्रहि लिहिण्यास किंवा वाचण्यास कठिण पडतें. . . .सर्व विषय. . .आता मराठींत शिकवूं लागले आहेत, यापासून मोठा व शाश्वत लाभ होईल," असें जें भाकित एका जुन्या रिपोर्टांत वर्तविलेलें होतें, तें अक्षरशः खरें ठरलें. पाठशाळेचा सुपरिंटेंडेंट मेजर कँडी याने तिला जोडून छापखाना काढला; व त्यांतून शालोपयोगी ग्रंथ तयार होऊन बाहेर पडूं लागले. या त्याच्या ग्रंथनिष्पत्तीच्या उपक्रमांत पाठशाळेंतील परशुरामपंत तात्या गोडबोले, रघुनाथशास्त्री तळेकर प्रभृति अनुभविक सहकाऱ्यांप्रमाणेच महादेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यासारखे उदयोन्मुख शिष्यहि सामील झाल्यामुळे, पुण्यांत जी मराठी ग्रंथरचनेची परंपरा या उपक्रमांतून उदित झाली, तिने पुढे आपल्या प्रकर्षानें आणि प्रभावाने अखिल महाराष्ट्र व्यापला. त्या दृष्टीने, पूना कॉलेजांतील विद्याभ्यास पूर्ण झाल्याबरोबर, १८५२ सालीं कृष्णशास्त्री हे 'ट्रान्स्लेटर एक्झिबिशनर' म्हणून राजसेवेच्या मार्गाला लागले आणि त्याच वर्षी

अनुक्रम ९५.३३
विभाग
क्रमांक
नों. दि. २०/१२

'सात्रेटीस ह्याचें चरित्र ' हा आपला पहिला ग्रंथ प्रसिद्ध करून त्यांनी स्वभाषासेवेच्या महाव्रताला प्रारंभ केला, हा योगायोग लक्षांत घेण्यासारखा आहे.

त्याबरोबरच, शास्त्रीबुवांच्या आयुष्यांत याच वेळीं जो एक संघर्ष उत्पन्न झाला आणि लगेच अल्पावधींत विरामहि पावला, तोहि अनेक दृष्टींनी अतिशय सूचक वाटतो. पुण्यांत या सुमारास रे. मरे मिचेल, हेन्री बॅलंटाईन, रॉबर्ट नेस्बिट प्रभृति मिशनरींनी चौकाचौकांतून धर्मप्रचाराचा धडाका सुरू केल्यामुळे त्यांचीं व्याख्यानें ऐकून आणि चोपडीं वाचून तरुण मंडळीची धर्मश्रद्धा डळमळीत होऊं लागली; व वरिष्ठ जातींतील कांही तरुण त्यांच्या वाग्जालांत सांपडले. मिशनरींच्या या धर्मांतराच्या मोहिमेला शह देण्यासाठी पुण्यांतील कांही प्रमुख विद्वानांनी 'विचारलहरी ' या नांवाचें पाक्षिक १८५२ सालच्या जूनमध्ये काढलें. त्याच्या संपादनाची जबाबदारी शास्त्रीबुवांवर सोपविण्यांत आली. 'विचारलहरी 'च्या मुखपृष्ठावर शिरोभागीं 'सद्धर्मोद्धारक ' आणि 'दुर्धर्मोच्छेदक ' हीं बिरुदें व 'सत्य ' आणि 'शांति ' हे ध्येयशब्द दिलेले असत. त्याचप्रमाणे ख्रिस्ती सनाऐवजी शालिवाहन शक, मास आणि मिति देण्यांत येत असे. आठ पृष्ठांचें हें छोटें पाक्षिक महिन्यांतून फक्त दोन गुरुवारीं प्रसिद्ध होत असे; व पुरतीं दोन वर्षेंहि तें चाललें नसावें, असें दिसतें. पण, त्यांतून होणारें ख्रिस्ती धर्माचें निर्दय दोषाविष्करण आणि हिंदु धर्माचा सयुक्तिक पुरस्कार हीं दोन्ही मिशनरींच्या अगदी मर्मीं झोंवत, हें तत्कालीन ख्रिस्ती वृत्तपत्रें आणि पुस्तकें यांतील त्याच्या निदखोर निर्देशावरून उघड आहे. 'ज्ञानोदया'ने 'विचारलहरी ' संबंधीं असें लिहिल्याचें आढळतें की, "सन १८५२ यांत हिंदु धर्माचें स्थापन करण्याच्या मिसाने परंतु वास्तवीक म्हटलें तर नास्तिक मत चालविण्याच्या उद्देशाने पुण्यामध्ये कोणी कोणी विचारलहरी काढली. तेव्हां ज्ञानोदय लागलाच तिसीं संग्रामार्थ उभा राहिला आणि विचारलहरींतील नास्तिक मतें व ख्रिस्ती धर्माविरुद्ध जी बीभत्स निंदा होती ती ज्ञानोदयांत उघडी करून दाखविली, आणि दोन वर्षें झालीं नाहीत इतक्यांत तीहि नाहींशी झाली. . या इलाख्यांत एक मोठें शहर

आहे, तेथे अगोदर विचारलहरीच्या बहुत प्रती खपत असत." रे. बाबा पदमनजी यांनीहि आपल्या आत्मवृत्तांत 'हलकट' आणि 'पोरकट' अशीं विशेषणें 'विचारलहरी'ला बहाल केलेलीं आहेत. पण, न्या. रानडे यांनी आपल्या मराठी वाङ्मयाच्या समालोचनांत मात्र 'तेजस्विता' (brilliancy) आणि 'कळकळ' (earnestness) या गुणांबद्दल तिची वाखाणणी केली असल्याचें दृष्टीस पडतें. 'विचारलहरी'च्या रूपाने व्यक्त झालेला शास्त्रीबुवांचा स्वधर्माभिमान त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाहि सहन झाला नाही; व त्यांच्या हातून "बाहेरचालीची कांही आगळीक घडल्याची संधि साधून" त्यांना कामावरून तात्पुरतें बडतर्फ करण्यांत आलें. शास्त्रीबुवांनी वरिष्ठांच्या या इतराजीची पर्वा केली नाहीं. ग्रंथ लिहून, वर्तमानपत्र चालवून किंवा खाजगी इंग्रजी शाळा काढून आपला चरितार्थ स्वतंत्र बाण्याने भागविण्याचा संकल्प त्यांनी केला. पण सरकारनें तो प्रसंग त्यांच्यावर येऊं दिला नाही. कारण, शिक्षणखात्यांतील उच्च दर्जाच्या जागांवर काम करावयाला पात्र असे बुद्धिमान् सुशिक्षित त्या वेळीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेहि नसल्यामुळे, अधिकाऱ्यांनाच अखेर त्यांच्यापुढे नमतें घ्यावें लागून, पूना कॉलेजांतील उपाध्यापकपदावर त्यांची नेमणूक करण्यांत आली. मात्र, तारुण्याच्या ऐन उमेदींत उफाळून आविर्भूत झालेली ही स्वाभिमानाची प्रबळ ऊर्मि, अशा रीतीने एकदा ओसरून गेल्यानंतर, पुन्हा कधीहि प्रकट झाल्याचें प्रत्ययाला आलें नाही. उलट, पुढे दोन तपांनी 'निबंधमाले'त चिपळूणकरांनी प्रसंगोपात्त मिशनरीवर केलेली टीका शिक्षणखात्यांतील अधिकाऱ्यांच्या नाजूक कृपादृष्टींत खुपून तिची कागाळी जेव्हा शास्त्रीबुवांच्या कानांवर गेली, तेव्हा चिरंजीवांचें तें साहस अनुचित असल्याचें त्यांनी स्पष्ट बोलून दाखविलें.

यानंतरचें शास्त्रीबुवांचें सर्व आयुष्य केवळ काव्यशास्त्रविनोदांत गेलें. आणि, तेंहि, राजसेवा आणि लोकरंजन हीं दोन्ही निष्ठेने आणि नैपुण्याने केल्यामुळे, जो मानसन्मानांचा वर्षाव सतत होत गेला, त्याचा उपभोग घेत! त्या काळांतलें पुणें जसें रसिकतेबद्दल तसेंच रंगेलपणाबद्दलहि गाजलेलें होतें. सहृदय मनुष्याच्या मनाला हटकून मोहनी घालणाऱ्या वस्तु

[library stamp]

म्हणून कवीनें सुभाषित, गीत आणि युवतींच्या लीला यांचा निर्देश एकदमच केलेला आढळतो. या निर्देशांत त्याची स्वतःची जशी रसज्ञता तसेंच जगाचें मार्मिक निरीक्षणहि दिसून येतें, यांत शंका नाही. कारण, सुभाषित आणि गीत यांना वश होऊन फक्त युवतीच्या लीलांवरच तेवढा लुब्ध न होणारा मनुष्य खरोखरीच विरळा. रसिकतेबद्दल पुण्याचा लौकिक कांही आजकालचा नाही. दिल्लीचें डळमळणारें तक्त आपल्या भाल्याच्या टोकांवर सावरून धरणाऱ्या भीमपराक्रमी बाजीरावानें गजेंद्राच्या उन्नत शुंडाग्रांतील केवळ लीलाकमलच अशी मुक्त बुंदेलखंडांतील मदनमंजरी ज्या दिवशीं आपल्या दिग्विजयी जरीपटक्यांत लपेटून दक्षिणेंत आणली, त्या दिवसापासूनच उत्तर भारतांतील गुणिजनांचे डोळें शनिवार वाड्याकडे उत्कंठेने लागले. मुलूखगिरीच्या कायमच्या धांदलींतहि पेशव्यांनीं ललित कलांचें करवेल तितकें लालन मोठ्या कौतुकानें केलें. पेशवाईच्या अखेरच्या काळांत राज्यकर्त्यांची आणि रयतेचीहि अभिरुचि अजिबात बिघडून गेली, हा भाग वेगळा. रावबाजीच्या राजवटींतील हें शिमग्याचें चांदणें पेशवाईनंतरहि मावळलें नाही. त्याची राजवट जरी पुण्यांतून गेली, तरी रंगेलपणा मात्र मागे राहिला. चिमणी, साळू, मैना यांच्या मंजुळ कंठांत ठसलेले होनाजी बाळाचे भेदक सूर आणि बहिरू, मल्हारी, सगनभाऊ यांनी सजविलेले कलगीतुऱ्याचे शरायती सामने या डफतुणतुण्यावरील कलंदरी किमयेचा पुण्याच्या डोळ्यांवरील कैफ कांही अद्याप उतरलेला नव्हता. रात्रीच्या पहिल्या प्रहरीं, कानांत अत्तराचे फाये घालून आणि हातांत फुलांचे गजरे घेऊन, मलमलीच्या पांढऱ्या शुभ्र चुण्यांवर मनगटांतील चमकदार सलकडी चाळवीत, मशालींच्या झगझगीत प्रकाशांत बनारसी तांबूल चघळीत चघळीत प्रियाराधनार्थ झुलतझुलत बाहेर पडणें, हें त्या वेळीं कमीपणाचें समजलें जात नसे. उलट, १९०१ सालच्या मार्चमध्ये चिपळूणकरांच्या श्राद्धतिथिनिमित्त वाचलेल्या निबंधांत लो. टिळक यांनी म्हटल्याप्रमाणे, "अशा प्रकारचा व्यसनीपणा हा पुण्यांतल्या प्रतिष्ठित सुखवस्तु लोकांनी आपल्या उघड उघड चालणाऱ्या या उंडग्या वर्तनानें तेव्हा एक शिष्टाचार करून सोडलेला होता." (They have made vice fashionable in Poona) शास्त्रीबुवांचे एक स्नेही आणि

चिपळूणकरांचे शिक्षण-व्यवसायांतील पहिले वरिष्ठ तत्कालीन प्रमुख शाळाचालक बाबा गोखले यांची तर अशी गोष्ट सांगतात की, त्यांच्या शाळेंतील विद्यार्थ्यांना केव्हा केव्हा सकाळीं आठ वाजून गेल्यावर आपल्या या गुरूला बावनखणींतील त्याच्या प्रेमपात्राच्या महालांतून मुद्दाम जाऊन उठवून आणावें लागत असे !

कृष्णशास्त्र्यांच्या वर्तनाचा प्रकार कांही बाबा गोखले यांच्यापेक्षा निराळा नव्हता. त्यांच्या या वर्तनाला स्वतःच्या मनाचा काय आळा असेल तेवढाच; जनाचा असण्याचें अर्थातच कांही कारण नव्हतें. गृहव्यवस्थेची सर्व जबाबदारी त्यांचे वडील हरिपंत मामा आणि आई भागीरथीमामी यांच्यावर होती; व हें वृद्ध दांपत्य अत्यंत सालस आणि सदाचरणी असल्यामुळे शास्त्रीबुवांच्या मनाला, नाही म्हटलें तरी, त्यांच्या चारित्र्याचा धाक मात्र थोडा तरी होताच. आपल्या मुलाच्या विद्वत्तेमुळे आणि कर्तृत्वामुळें आपल्याला म्हातारपणीं चांगले दिवस पाहावयाला मिळाले, याची जाणीव त्या दोघांनाहि होती. त्यामुळे, संसारांतल्या कोणत्याहि काळजीचें कुसळ त्याला खुपूं नये, म्हणून तीं डोळ्यांत तेल घालून जपत असत. हरिपंतमामा हे वस्तुतः तापट आणि अबोल; व देवपूजा, एकादशण्या, पुराणश्रवण, सप्तशतीचा पाठ इत्यादि धर्मकृत्यांतच त्यांचा बहुतेक वेळ जात असल्याकारणाने त्या व्रतचर्येमुळे एक प्रकारची कठोरताहि त्यांच्या वृत्तींत आलेली होती. पण, त्यांचें पुत्रवात्सल्य इतकें विलक्षण होतें कीं, त्यांना स्वतःला सुपारीचें खांड चघळण्याची सुद्धा संवय नसतांनाहि, चिरंजिवांसाठी विड्याचीं पानें आणून तीं धुवूनपुसून ठेवणें आणि त्यांच्या धोतराच्या निऱ्या करून तें स्नानाच्या वेळीं पाटावर ठेवणें, येथपर्यंत त्यांनी उतारवयांत शास्त्रीबुवांची शागिर्दी केली ! त्यांचा बाहेरख्यालीपणा पाहून मात्र हरिपंतांच्या मनाची अर्थातच अतिशय तळमळ होत असे. पण मुलाला कोणत्याहि बाबतींत कांही बोलणें हें मुळी त्यांच्या स्वभावांतच नव्हतें. अतीच झालें, तर आपल्या मनांतलें हें शल्य ते एकादे वेळीं भागीरथीमामीजवळ मात्र बोलून दाखवीत असत, तेवढेंच ! पण पितापुत्रांत खटका उडण्याचा प्रसंग त्या धूर्त मातेने कधीहि येऊं दिला नाही. चिपळूणकर

केव्हां केव्हां सांगत असत की, " शास्त्रीबुवांना बाहेरचा नाद फार लागल्यामुळे मामा व मामी यांस फार दुःख होई. एकदा बरीच रात्र झाली, तरी शास्त्रीबुवा घरीं आले नाहींत. हें पाहून मामा मनांत फार तळमळून म्हणाले कीं, 'मी याला एकदा बोलूं कां ?' परंतु मामी ही अधिक शहाणी. तिनें उत्तर केलें, 'तुम्ही बोलूं नका. बोलण्याने तो आपला नाद कांहीं सोडणार नाही. तुमचा थोडाबहुत जो वचक आहे, तो मात्र नाहीसा होईल !' " शास्त्रीबुवांचा पिंड केवळ रसिकाचा होता. त्यांच्या जीवनांत असलीच, तर फक्त ज्ञाननिष्ठा होती. अन्य कोणत्याहि निष्ठेची धर किंवा धार त्यांच्या वाङ्मयलोलुप, विलासी जीवनाला नव्हती. त्यांनी निरनिराळ्या विषयांचें आणि शास्त्रांचें जें आलोडन रसग्रहणबुद्धीनें आमरण केलें, त्याचा उत्कृष्ट परिपाक त्यांच्या 'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह' या सुंदर ग्रंथांत सांठविलेला आहे. स्वधर्माविषयीहि त्यांना फक्त सांस्कृतिक अभिमान होता; पण त्यावर श्रद्धा मात्र यत्किंचित्‌हि नव्हती. त्यांच्या शेवटल्या दुखण्यांत काळजांतली कळ असह्य होऊन जेव्हा ते गुरासारखे ओरडूं लागले, तेव्हा त्यांच्या पत्नी काशीताई यांनी त्यांना 'राम राम' म्हणून देवाचें नांव घेण्याची सूचना केली. पण शास्त्रीबुवा नामस्मरण न करितां फक्त 'आई, आई' म्हणून ओरडत राहिले. पुढें थोडें बरें वाटल्यावर जेव्हा देवाविषयी गोष्टी निघाल्या, तेव्हा शास्त्रीबुवा आपले स्नेही डॉ. विश्राम यांना इंग्रजींत म्हणाले, "विश्राम, तुम्हीच माझे देव आहांत. मी विष्णु किंवा राम यांना ओळखीत नाही !" ( Vishram, you are my God, I Know no Vishnu or Ram. ) पण, ते जरी अज्ञेयवादी होते, तरी लोकविरुद्ध आचरण करण्याची मात्र त्यांची मुळीच तयारी नव्हती. त्यांचे गुरु आणि वरिष्ठ सर अलेक्झांडर ग्रँट यांनी, सेवानिवृत्त झाल्यावर विलायतेस जावयाला निघण्याच्या वेळीं, आपल्या खात्यांतील विशेष लोभांतल्या हिंदी अधिकाऱ्यांना निरोपाची मेजवानी दिली. त्या वेळीं शास्त्रीबुवांनी फक्त फळें आणि बर्फ यांचाच काय तो आस्वाद घेतला होता. तरीहि अधर्माचरण केल्याबद्दल पुण्याच्या काकदृष्टि ब्रम्हवृंदाने त्यांच्यावर ग्रामण्य घातलें. तेव्हा शास्त्रीबुवा मुकाट्याने शंकराचार्यांना शरण गेले; व सर्वांगप्रायश्चित्त घेऊन त्यांनी

असेव्यसेवनाच्या त्या पातकाची यथाविधि निष्कृति केली! १८७० सालच्या मार्च महिन्यांत विधवापुनर्विवाहाच्या शास्त्रोक्ततेबद्दल पुण्यास शंकराचार्यांसमोर नऊ दिवस जें तुंबळ वादरण झालें, त्यांत शास्त्रीबुवा हे एक पंच होते; व विष्णुशास्त्री पंडित, डॉ. सर रामकृष्ण भांडारकर, न्या. रानडे प्रभृति मंडनपक्षाच्या नेत्यांची त्यांच्या अनुकूलतेविषयीं खात्री होती. पण त्याहि कसोटीच्या प्रसंगीं हा आधुनिक कणाद ऐन वेळीं गडबडला म्हणतात !

शास्त्रीबुवांचें वर्तन ज्याप्रमाणे त्यांच्या प्रतिष्ठेला आणि विद्वत्तेला शोभण्यासारखें नव्हतें, त्याचप्रमाणे त्यांचें वाङ्मयहि त्यांच्या प्रतिभेला आणि कर्तृत्वाला शोभण्यासारखें नाही. ते जसे रससिद्ध लेखक तसेच सहज-स्फूर्तीचे वादपटु वक्तेहि होते. पाठशाळेंत असतांना त्यांच्या एका सहाध्यायी पद्यकाराने 'काकवत्कर्करायते' असें त्यांच्या वाणीचें वर्णन केलें होतें, म्हण-तात. पण, त्यांचें वक्तृत्व खरोखरीच इतकें तर्ककर्कश होतें की, ख्रिस्तो धर्म स्वीकारल्यानंतर दिग्विजय करण्याच्या ईर्ष्येने मुद्दाम पुण्यास आलेल्या नेहेमिया—नीळकंठशास्त्री—गोरे यांच्यासारख्या काशीच्या बडया बाटग्या धेंडाला त्यांनी वादसंगरांत लोळवून आपले गुरु मोरशास्त्री साठे यांच्या 'सभानायक'त्वाच्या कीर्तीवर ऐन तारुण्यांत मात केली. तेव्हापासून पुण्यांतल्या सार्वजनिक सभा-समारंभांचें अध्यक्षपद जें त्यांच्याकडे आलें, तें कायमचेंच. त्यामुळें "पुण्यांतील लोकप्रिय अध्यक्ष" असाच त्यांचा उल्लेख तत्कालीन पत्रव्यवहारांतून आढळतो. तथापि, त्यांच्या वक्तृत्वाचा आणि विद्वत्तेचा जो हा प्रभाव त्या काळांतल्या सार्वजनिक जीवनावर इतक्या प्रकर्षाने पडल्याचें सांगतात, त्याची म्हणण्यासारखी प्रतीति कांहीं त्यांच्या साहित्यांत आज येत नाही. वस्तुतः, दक्षिणा प्राइज कमिटीचे सेक्रेटरी, ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल, रिपोर्टर ऑन दि नेटिव्ह प्रेस इत्यादि ज्या जागांवर त्यांची सरकारी नोकरींत बढती होत गेली, त्या जागा साहित्यसेवेला बव्हंशी पोषक होत्या; व त्यांच्या लालित्यपूर्ण लेखणींतून जें काय बाहेर पडे, त्याचें कौतुक करण्यासाठी सरकार आणि समाज यांच्यांत जणुं स्पर्धा लागलेली होती. पण, अशाहि अनुकूल परिस्थितींत शास्त्रीबुवांनी जें

वाङ्मय निर्माण केलें, तें कांही आज उल्हासाने किंवा उत्साहाने वाचावेंसें वाटत नाही. 'साक्रेटीस ह्याचें चरित्र' 'अर्थशास्त्रपरिभाषा—प्रकरण पहिलें,' 'संस्कृत भाषेचें व्याकरणाचें पुस्तक,' 'अनेक विद्यामूलतत्त्व-संग्रह,' 'पद्यरत्नावलि,' 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी,' 'रासेलस' इत्यादि त्यांचे आठ नऊ ग्रंथ हे त्यांच्या अष्टपैलू बुद्धीच्या निरनिराळ्या विशेषांचे निदर्शक आहेत, हें निस्संशय. पण, यांपैकी बहुतेक ग्रंथ अनुवादित किंवा आधाररचित आहेत, ही गोष्ट ध्यानांत घेतली असतां, त्यांच्यासारख्या प्रतिभाशाली विद्वानाने केवळ भाषांतराच्या हीणकस व्यवसायांत आपलें बुद्धिसर्वस्व वेचावें, याबद्दल मात्र विस्मय वाटल्याविना राहत नाही. त्याहिपेक्षा आश्चर्यकारक प्रकार असा कीं, अनेक विद्या आणि शास्त्रें यांचे अवगाहन केलेल्या त्या काळांतल्या या विद्वदग्रणीने 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टीं'चें भाषांतर करण्यांत १८६१ पासून १८६६ पर्यंत पांच वर्षें खर्ची घातलीं. आपल्या मातेला दास्यमुक्त करण्यासाठी अमृतकुंभ आणण्याचें सामर्थ्य अंगीं असलेल्या गरुडाने दारूची सुरई आणावी, त्यांतलेंच हें शास्त्रीबुवांच्या बुद्धिचापल्याचें चेष्टित होय! जॉन्सनच्या 'रासेलस' या तत्त्वचिंतनात्मक कादंबरीचा १८७३ सालीं प्रसिद्ध झालेला अनुवाद हा त्यांचा शेवटला ग्रंथ. कारण, या अनुवादाचे अठरा वीस भाग स्वतः केल्यावर, पुढील भाग तयार करण्याचें काम चिरंजीवांवर सोपवून, १८५२ पासून १८७३ पर्यंत वीस वर्षें अव्याहत आचरिलेल्या साहित्यसेवेच्या व्रताचें त्यांनी एका परीने उद्यापनच केलें. जणुं कांही, बगदादच्या खलिफांच्या राजधानींतील भोगविलासांचीं भडक शब्दचित्रें रंगवून विटलेल्या आपल्या विषयलोलुप मनाला विरंगुळा वाटावा, म्हणून त्या महापंडिताने, पन्नाशीची झुळूक लागल्यावर, मानवी सुखाची अपूर्णता मनावर बिंबविणाऱ्या जॉन्सनच्या मानसपुत्राच्या सहवासांत मननाच्या गुहेंत प्रवेश केला!

शास्त्रीबुवांचें जीवन आणि साहित्य यांच्यांतलीं हीं वैगुण्यें आणि न्यूनता यांचा विचार, त्यांच्या अगोदरच्या पिढींतले ग्रंथकार दादोबा

पांडुरंग यांच्या तुलनेनें, केला असतां, मनाला फार तीव्रतेनें जाणवतात; व पुण्यांतील तत्कालीन जनतेला इतकें महनीय वाटलेलें त्यांचें व्यक्तित्व सर्वंच दृष्टींनी किती उणें आणि खुजें होतें, याची यथार्थ कल्पना येते, शास्त्रीबुवांची सगळी हयात पुण्यामध्ये सरकारी कृपाछत्राखालीं बैठें पढीक व्यवसाय करण्यांत गेली; तर दादोबांनी नोकरीच्या निमित्ताने महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यभारत या प्रदेशांच्या निरनिराळ्या भागांत प्रवास आणि वास्तव्य करून तेथील लोकस्थितीचें निरीक्षण बारकाईने केलेलें होतें. नोकरींतहि जशी त्यांनी अनेक प्रकारचीं कामें जबाबदारीने केलीं, तसाच अनेक बऱ्यावाईट व्यक्तींचा अनुभवहि विपुल घेतला. त्यांचें प्रांजळ आत्मवृत्त म्हणजे या निरीक्षणाचा आणि अनुभवाचा परिपाकच होय. नोकरींत आरंभीं लाभलेलें स्वास्थ्य आणि प्रतिष्ठा या दोहोंचाहि उपयोग त्यांनी समाज आणि साहित्य यांच्या उन्नतीसाठी इतक्या दक्षतेने केला की, महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही देशांच्या इतिहासांत त्यांची कामगिरी संस्मरणीय होऊन बसली आहे. दादोबांनी प्राय: एकहि अनुवादित ओळ कधी लिहिली नाही; तर शास्त्रीबुवांनी एकहि स्वतंत्र ग्रंथ लिहिल्याचें बहुधा दाखवितां येणार नाही. व्याकरणासारखे रुक्ष, किचकट वेदांग हा दादोबांचा जीवनव्यासंग होऊन बसलेला होता; व त्याच्या चिंतनांत आणि संशोधनांत आपल्या आयुष्याचीं चार तपें त्यांनी चिकाटीने घालविलीं. उलट शास्त्रीबुवांनी भ्रमरवृत्तीने अनेक विद्या आणि शास्त्रें यांचा आस्वाद घेण्यांत व त्यांतील रसांश मराठी भाषेंत आणण्यांत आनंद मानला. आपल्या व्याकरणाच्या शेवटल्या सातव्या आवृत्तीला १८७९ सालच्या जुलैमध्यें लिहिलेल्या प्रस्तावनेत दादोबांनी असे हृदयस्पर्शी उद्‌गार काढलेले आहेत की, “ अलिकडेस मागच्या पंचवीस वर्षांपासून सर्व लोकांचा भर इंग्लिश भाषा शिकण्यांत फार वाढत चालल्यामुळे स्वभाषेविषयी त्याच मानाने मोठी अनास्था वाढत चालली आहे, ही उघड अत्यंत शोचनीय गोष्ट माझ्या दृष्टीपुढे असतां हा असा स्वभाषा सुधारण्याविषयी व्यर्थ परिश्रम करणें हा माझा शुद्ध वेडेपणा आहे, असें जरी मला हस्तामलकासारखें ढळढळीत दिसत आहे, तरी जीस मी जननीप्रमाणे मानतों, त्या आपल्या भाषेची

शेवटपर्यंत सेवा केल्यावांचून माझ्यानें राहावत नाही." मातृभाषेविषयीची ही विलक्षण कळकळ शास्त्रीबुवांच्या ठिकाणीं होती, असें वाटत नाही. दादोबांचें मातृभाषेवरील हें उत्कट प्रेम ' यशोदापांडुरंगी ' या त्यांच्या केकावलीवरील टीकाग्रंथाच्या रूपानेहि प्रकट झालेलें आहे. किंबहुना, आपली परम आवडती सुशीला कन्या कावेरी हिच्या अकालमृत्युमुळे शोकविव्हल झालेल्या दादोबांनी तिचें स्मरण राहण्याकरिता "आपल्या स्वदेशीय लोकांस कांही उपयोग घडेल असें पूतकर्म करण्याच्या उद्देशाने पूर्वापर शोधन करून, यश देणारें मातृनाम जें यशोदा आणि त्या यशाची निर्मलता दर्शविणारें पितृनाम जें पांडुरंग त्या नामयुग्माने पुनीत झालेली ही टीका" लिहिण्यांत जी पवित्र कौटुंबिक प्रेमाची गाढ भावना व्यक्त केली, ती शास्त्रीबुवांच्या कलंदर जीवनांत किती प्रमाणांत वसत होती, हें सांगणें खरोखरीच कठिण! "शतपंडितांत एकादा पंडित प्राकृत ग्रंथांचें आस्थापूर्वक अवलोकन करणारा सांपडेल," असे उद्गार काढून दादोबांनी ' यशोदापांडुरंगी 'च्या प्रस्तावनेंत त्या विरळ कोटींत परशुरामपंत तात्या गोडबोले यांची गणना केलेली आहे. पण, ते स्वतःहि त्या विरळ कोटींतले होते, म्हणूनच त्यांना '. केकावली 'वर व्याख्या लिहिण्याची सुबुद्धि सुचली. उलट, शास्त्रीबुवांना जुन्या मराठी कवितेविषयी एकंदरींत किती अनादर होता, याचा उल्लेख खुद्द चिपळूणकरांनीच आपल्या मोरोपंतावरील निबंधांत केल्याचें आढळतें. दादोबांना जुनी मराठी कविता अतिशय प्रिय होती; व ' पारमहंसिक ब्राह्मधर्म ' आणि ' माबाईच्या ओव्या ' हीं दोन रसाळ काव्यें अभंग–ओवी वृत्तांत लिहून त्यांच्या शैलींतील प्रसाद आणि माधुरी त्यांनी आधुनिक मराठींत आणण्याचा प्रयत्नहि केला. ' यशोदा-पांडुरंगी 'च्या रूपाने त्यांनी जी व्याख्येची आणि टीकेची अपूर्व पद्धति मराठींत प्रथमच घालून दिली, ती डोळ्यांपुढे ठेवूनच परशुरामपंत तात्या गोडबोले यांनी आपला ' केकादर्श ' आणि प्रो. श्रीधर विष्णु परांजपे यांनी आपलें ' केकावली '-वरील बृहद्भाष्य यांची रचना केली. शास्त्रीबुवांची साहित्यसेवा हा सुद्धा एक राजयोगच होता. पण सरकारचा आश्रय आणि उत्तेजन हीं दोन्हीहि दादोबांच्या वांट्याला सुखासुखी कधी आलीं नाहीत. वरिष्ठ अंमलदारांच्या त्रासाला कंटाळून वयाच्या सत्तेचाळिसाव्या वर्षी त्यांनी सरकारी नोकरी

सोडली; व "पुढच्या काळाचा सद्व्यय करण्यांत मनाचें समाधान" मानलें. उलट, सरकारी नोकरीसंबंधीं आपल्या चिरंजीवांची जी एकंदरींत बेपर्वाईची वृत्ति असे, ती सुद्धा शास्त्रीबुवांना कधी रुचली नाही. दादोबांचा पिंडच मुळी सुधारकाचा होता. त्यामुळे त्यांचें चारित्र्य कुठल्याच बाबतींत केव्हाहि ढळलेलें किंवा डागळलेलें दिसत नाही. उलट, शास्त्रीबुवांच्या रंगेलपणानें त्यांच्या चारित्र्यावर मात केली, हें प्रसिद्धच आहे. सारांश, त्यांचें व्यक्तित्व आणि वाङ्मय हीं दोन्हीहि त्या बदलत्या काळाचें आवाहन आणि आव्हान ओळखावयाला अपुरीं पडलीं, हें उघड आहे.

शास्त्रीबुवांच्या विविध विषयांवरील ग्रंथांत मौलिक किंवा चिरंतन स्वरूपाचे ग्रंथ जर कोणते असतील, तर ते 'दादोबाकृत व्याकरणावरील टीकात्मक लेख' आणि 'पद्यरत्नावलि' हे होत. पूना ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रिन्सिपलच्या जागेवर काम करीत असतां त्यांना दादोबांचें व्याकरण विद्यार्थ्यांना शिकविण्याचा योग आला. त्या वेळीं त्यांत जे दोष आणि न्यूनता असल्याचें त्यांच्या अवलोकनांत आलें, ते दादोबांच्या आणि विद्यार्थिवर्गाच्याहि निदर्शनाला आणून देण्यासाठी त्यांनी १८६५ सालीं 'शालापत्रकां'तून मराठी व्याकरणावर चर्चात्मक लेख लिहावयाला सुरवात केली. हे त्यांचे पंचवीस लेख पुढे पुस्तकरूपानेहि प्रसिद्ध झाले. या लेखांत त्यांची जी व्युत्पत्ति आणि तार्किकता व्यक्त झालेली आहे, ती पाहून अशा या सूक्ष्म बुद्धीच्या पंडिताने स्वतंत्र ग्रंथरचना न करितां केवळ भाषांतरें करण्यांत आपल्या विद्वत्तेचा व्यय करावा, याबद्दल खेद वाटल्याशिवाय राहत नाही. त्यांचा टीकात्मक आणि त्रुटित का होईना मौलिक असा ग्रंथ फक्त एवढाच. 'पद्यरत्नावलि' ही जरी 'सरसरमणीय' असली, तरीहि अनुवादरूपच आहे. जगन्नाथपंडित हा त्यांचा अत्यंत आवडता कवि. त्याचें लोकाधिक चरित्र डोळ्यांपुढे ठेवूनच जणूं त्यांनी स्वतःचें जीवन व्यतीत केलेलें होतें. त्याच्या 'भामिनीविलासां'तील कांही अन्योक्ति आणि 'करुणविलास' यांचें उत्कृष्ट रूपांतर या 'रत्नावलीं'त ग्रथित केलेलें आहे. 'विद्याप्रशंसा' हें त्या काव्यसंग्रहांतील चटकदार लघुकाव्य मात्र स्वतंत्र दिसतें. पण, 'रत्नावलीं'तील अनुपम कलाकृति जर कोणती

असेल, तर ती 'मेघदूता'चा मराठी अनुवाद ही होय. त्याची भाषा आणि रचना इतकी सहजसुंदर आहे की, कालिदासाच्या मूळ काव्यापेक्षाहि त्याचें साकी वृत्तांतील हें सैल भाषांतर अधिक सरस आहे, असें म्हणण्याचा मोह मनाला पडतो. शास्त्रीबुवांच्या रंगेलपणाचे सगळे रस-रंग जणुं या अनुवादांत स्वयमेव उतरलेले आहेत. शास्त्रीबुवा हे जन्मसिद्ध शीघ्रकवि होते. त्यांच्या या शीघ्रकवित्वाविषयी अशी एक आख्यायिका सांगतात की, 'ज्ञानप्रकाश' पत्र सुरू करण्याच्या वेळीं कांहीं स्वरचिन्हांच्या मुद्रा छापखान्यांत नसल्यामुळे, जेव्हा छपाईची अडचण उत्पन्न झाली, तेव्हा शास्त्रीबुवांनीं त्या मुद्रांची गरज पडूं नये अशा रीतीने शंभर कवितांची कथा बसल्या बैठकीला लिहून देऊन मुहूर्त साजरा केला आणि निरोष्ठादि रामायणें रचणाऱ्या मोरोपंतावर आपल्या रचनाकौशल्याने मात केली ! शास्त्रीबुवांचें कवित्व जसें शीघ्र तसेंच सुश्लिष्टहि होतें; व 'मेघदूता'च्या अनुवादांत त्यांच्या शैलीतील प्रसाद आणि सौष्ठव हे दोन्ही गुण एकवटलेले आहेत. किंबहुना, शास्त्रीबुवांनी एकहि स्वतंत्र मराठी ग्रंथ लिहिलेला नसतांना आणि त्यांचा प्राय: एकहि ग्रंथ आज वाचला जात नसतांना सुद्धा, त्यांचें जें नांव अद्याप मराठी साहित्यांत टिकून राहिलेलें आहे, तें मुख्यत: त्यांच्या भाषाप्रभुत्वामुळे. बापू छत्रे, हरि केशवजी, बाळशास्त्री जांभेकर, परशुरामपंत तात्या गोडबोले, दादोबा पांडुरंग, गोविंद नारायण माडगांवकर प्रभृति त्यांच्या प्राक्कालीन किंवा महदेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री राजवाडे, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित, बाबा पदमनजी प्रभृति त्यांच्या समकालीन लेखकांनी विविध आणि विपुल वाङ्मय लिहिलें, ही गोष्ट खरी. पण यांपैकी एकहि लेखक भाषाप्रभु नव्हता. कृष्णशास्त्री हे आधुनिक महाराष्ट्राचे पहिले भाषाप्रभु, पहिले शब्दशिल्पी, पहिले शैलीकार साहित्यिक ! आज जी प्रौढ, बव्हर्थ, प्रभावशाली, लालित्यपूर्ण मराठी भाषा शास्त्रीय, ललित आणि नियतकालिक वाङ्मयांतून लिहिली जात आहे, ती अर्वाचीन मराठीची ग्रांथिक शैली शास्त्रीबुवांनी आपल्या आरस्पानी, मुलायम कलमाने घडविली आणि रंगारूपाला आणली.

'निबंधमाले'च्या जन्मानंतर तीन वर्षांनी ता. २० मे १८७८

रोजीं झालेला त्यांचा मृत्यु म्हणजे आधुनिक मराठी वाङ्मयाच्या बाल्यावस्थेची परिसमाप्तीच होय.

# १२

अशा बहुश्रुत आणि भाग्यशाली पित्याच्या कृपाछत्राखाली चिपळूणकरांचें बहुतेक आयुष्य गेलें. तथापि, एकाद्या प्रचंड, प्रच्छाय वृक्षाच्या कक्षेंत उगवलेला रोपा जसा त्याच्या सांवटाखाली खुरटून जावा, तसा प्रकार मात्र त्यांच्या प्रतिभेचा झाला नाही. उलट परस्परविरोधी संस्कारांच्या संघर्षांत तिचा विकास स्वच्छंदाने होत गेला. कारण, जुन्या नव्या संस्कृतींचें जें द्वैत आणि द्वंद्व घरांत सतत चालू होतें, त्यांत एका बाजूला आपल्या करारी कर्मठ आजोबांचें निग्रही जीवन आणि दुसऱ्या बाजूला रंगेल राजमान्य वडिलांचें ढिलें चारित्र्य यांतील तीव्र विरोध जन्मल्या दिवसापासूनच त्यांना रोज पाहावा लागल्यामुळे, त्याचा परिणाम त्यांच्या बालमनावर विपरीत होऊन, जुन्याविषयीं सामान्यतः अनुकूल ग्रह आणि नव्याविषयी सरसकट अवज्ञेची अढी त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. न्या. रानडे यांनी तत्कालीन समाजधुरीणांच्या ज्या 'दुहेरी' जीवनाची मीमांसा आपल्या व्याख्यानांतून इतक्या सहृदयतेने वारंवार केलेली आहे, त्या जीवनांतील सगळे अंतर्विरोध आपल्या पित्याच्या रूपाने त्यांच्या डोळ्यांपुढे मूर्तिमंत उभे ठाकलेले होते. त्याचा परिणाम त्यांच्या चिंतनशील मनावर अगदी विदारक असा झाला. शास्त्रीबुवा हे कुटुंबांतील एकमेव कमावते आणि कर्ते पुरुष होते, ही गोष्ट खरी. पण, त्यांच्यामागे सर्वच प्रकारचे बाहेरचे व्याप इतके अहोरात्र लागलेले होते की, त्यांना घरांत लक्ष द्यावयाला मुळी उसंतच मिळत नसे. अर्थात् घरांतल्या वाढत्या नव्या पिढीवर वचक, वजन आणि वर्चस्व साहजिकच हरिपंतांचें होते. त्यांनी आपल्या आयुष्यांत राज्यक्रांति, दैन्य आणि संपन्नता या तिहींचाहि अनुभव पुरेपूर घेतलेला असल्यामुळे त्यांच्या वृत्तींत एक प्रकारचें उग्र गांभीर्य आणि अबोल सहृदयता यांचें

चमत्कारिक मिश्रण झालेलें होतें. त्यांच्या धर्मशील, कणखर चारित्र्याचा ठसा चिपळूणकरांच्या कोमल मनावर उमटल्याविना राहिला नाही. १८५९ सालीं त्यांचें व्रतबंधन झाल्यावर स्वतः हरिपंतांनी त्यांना संध्या, पूजा, वैश्वदेव वगैरे ब्रह्मकर्म पढविलें. बचंभट मामा नांवाचे वृद्ध, विरक्त भिक्षुक या वेळीं त्यांच्या शेजारीं राहत असत. या भटजींपाशी चिपळूणकरांनी कांही दिवस वेदाध्ययनहि केलें. त्यांनी आपली असाधारण पाठशक्ति जशी वेदपठणांत, तशीच उत्कृष्ट इंग्रजी कविता कंठगत करण्यांतहि व्यक्त केली. १८६१ सालीं ते पूना हायस्कूलमध्ये गेले. हायस्कुलांतील त्यांचे वर्गशिक्षक चिमणाजी महादेव यांनी एकदा वर्गीत मुलांना म्हटलें, "जे विद्यार्थी मला 'डेझर्टेड व्हिलेज' सर्व बिनचूक म्हणून दाखवितील, त्यांस मी एक एक हातरुमाल बक्षिस देईन." चिपळूणकरांनी गोल्डस्मिथचें तें दीर्घ काव्य धडधडा म्हणून दाखवून तें बक्षिस पटकावलें. पूना हायस्कुलांतील व्युत्पन्न पंडित कृष्णशास्त्री वैजापूरकर यांच्या वत्सल शिक्षणशैलीमुळे त्यांना संस्कृत कवितेची गोडी लागली. बचंभट मामा काय किंवा वैजापूरकरशास्त्री काय, यांच्या ज्या कुचाळच्या इतर विद्यार्थी करीत, त्यांत ते कधीहि सामील झाले नाहीत; व त्यांच्यापासून प्राचीन संस्कृत विद्येचें जें कांही ज्ञान मिळविणें शक्य होतें, तें सर्व त्यांनी मोठ्या भक्तिभावाने संपादन केलें. वैजापूरकरांचें शास्त्रीबुवांशीं सूत नव्हतें. पण, चिपळूणकरांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन, त्यांनी गुरुदक्षिणेची अपेक्षा न करितां, आपल्या या विनीत शिष्याला प्रेमाने विद्या दिली.

तथापि या शालेय शिक्षणापेक्षा किती तरी विविध आणि व्यापक असें उद्बोधक शिक्षण आपल्या वडिलांच्या विकासप्रद सान्निध्यांत चिपळूणकरांना मिळालें. त्यांच्या बाबतींत पिता आणि गुरु हीं दोन्हीं नातीं शास्त्रीबुवांच्या ठिकाणीं एकवटलेलीं होतीं. त्यांच्यामागे जरी अनेक सार्वजनिक कार्यांचा व्याप होता, तरी ते मधून मधून मुद्दाम सवड काढून आपल्या या थोरल्या मुलाला मोठ्या ममतेने शिकवीत असत. त्यांची शिकविण्याची रीत अशी होती की, "धड्यांतील अर्थ वगैरे सांगून शिवाय जेणेंकरून शिकणारास स्वतः विचार करण्याची शक्ति येईल असे प्रश्न विचारायाचे व त्यांतील

कांही न सांगतां आलें म्हणजे मग आपण स्वत: त्याचें स्पष्टीकरण करायाचें." आपल्या पित्याच्या स्वत:ला लाभलेल्या या सान्निध्याला चिपळूणकरांनी जी 'रविकरगतकमलन्याया'ची उपमा दिलेली आहे, ती अनेक दृष्टींनी अत्यंत समर्पक वाटते. त्यांच्या प्रतिभाविलासाला जशी शास्त्रीबुवांनी निर्मिलेली परिस्थिति पुढे पोषक ठरली, तशी मनोविकासाला या वेळी गृहस्थिति सहाय्यक झाली. अस्फुट अवस्थेंत असलेल्या त्यांच्या प्रतिभेभोवती या सुमारास एक प्रकारचें वाङ्मय वातावरण होतें. १८५९ सालीं शास्त्रीबुवा दक्षिणा प्राइज कमिटीचे सेक्रेटरी झाले. त्यामुळे नवीन ग्रंथ आणि ग्रंथकार यांचा राबता त्यांच्या घरीं साहजिकच मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. कमिटीचे सेक्रेटरी असतांना त्या सहा वर्षांच्या काळांत त्यांनी तिच्याकडे पुरस्कारार्थ आलेल्या संस्कृत नाटकांचीं भाषांतरें काळजीपूर्वक तपासून शुद्ध केलीं; नव्या ग्रंथांत सुधारणा करण्याविषयी त्यांच्या लेखकांना मार्मिक सूचना केल्या; व हर एक ग्रंथावर मार्गदर्शक परीक्षणें अगत्याने लिहिलीं. घरीं सतत चालणारें हें तत्कालीन नव्या साहित्याचें संशोधन आणि समालोचन चिपळूणकरांना अहर्निश पाहावयाला मिळत होतें. त्याबरोबरच, शास्त्रीबुवांकडे केवळ ग्रंथरचनेसंबंधींच नव्हे,तर निरनिराळ्या सामाजिक आणि राजकीय प्रश्नांसंबंधीहि सल्लामसलत घ्यावयाला जे नाना प्रकारचे लोक सदैव येत असत, त्यांच्याशीं होणारी चर्चाहि चिपळूणकरांच्या कानांवर पडत असे. 'ज्ञानप्रकाशा'दि पुण्यांतल्या बहुतेक प्रमुख नियतकालिकांशी शास्त्रीबुवांचा निकट संबंध होता; व १८६१ साली निघून १८७५ सालापर्यंत चाललेल्या 'शालापत्रक' या शिक्षणव्यवसायाला वाहिलेल्या मासिकाचे तर ते मुळीं प्रवर्तक आणि संपादकच होते. त्यामुळे, नियतकालिकांची संपादनपद्धति आणि एकंदर कारभार या दोहोंचेंहि अंतर्ज्ञान चिपळूणकरांना विद्यार्थिदशेंत असतांनाच होऊन, स्वत:चें स्वतंत्र मासिक काढण्याची कल्पना पुढें त्यांच्या मनांत उद्भवली. १८६५ सालीं शास्त्रीबुवा ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल झाल्यावर त्या कॉलेजांतील बहुमोल ग्रंथसंग्रह त्यांना घरच्या सारखाच सुलभतेने उपलब्ध झाला. जुन्या मराठी कवितेचे अभिमानी भक्त माधव चंद्रोबा डुकले यांनी १८६० सालीं तिच्या जीर्णोद्धारार्थ काढलेल्या 'सर्वसंग्रह' मासिकाचीं

बांधलेलीं पुस्तकें, वडिलांच्या न कळत, परस्पर कॉलेजांतील कारकुनाकडून आणवून त्यांतील मोरोपंत, वामन प्रभृति कवींची कविता वाचावयाला त्यांनी याच वेळीं सुरवात केली. चिरंजीवांच्या हातीं एक दोनदा तीं जुन्या मराठी कवितेचीं पुस्तकें पाहून शास्त्रीबुवांनी त्यांना हटकलें, " हीं पुस्तकें वाचून तुला तादृश कांही फायदा होणार नाही !" पण त्यांच्या या प्रतिकूल अभिप्रायामुळे चिपळूणकरांचा मराठी कवितेवरील प्रेमा कमी न होतां उलट उत्तरोत्तर वाढतच गेला. १८६६सालच्या अखेरीस पुत्रशोकाने पोळल्या-मुळे विरक्त होऊन परमार्थाच्या मार्गाला लागलेले त्या काळचे लोकप्रिय हरिदास पन्हळंकर गोसावी यांचीं कीर्तनें पुण्यास चालू होतीं. त्यांचें वक्तृत्व इतकें ओजस्वी आणि आकर्षक होतें की, बुवा एकदा कीर्तन संपवून खाली बसल्याबरोबर त्या दिवशीं श्रोते मंडळींत उपस्थित असलेले परशुरामपंत तात्या गोडबोले त्यांना म्हणाले, " आपली कर्तबगारी नांवा-प्रमाणेच आहे. कीर्तनास आरंभ झाला म्हणजे आपल्या रसाळ वाणीच्या पन्हळांनी श्रोतृजन अगदी तृप्त होऊन जातो !" खुद्द चिपळूणकरांनीहि, ' मोरोपंताची कविता ' या निबंधाला दिलेल्या एका टीपेंत, रामजोशाच्या छेकापन्हुतीची प्रशंसा करितांना, बुवांच्या कीर्तनाचा असा प्रसंग वर्णन केलेला आढळतो की, " अकरा वर्षांपूर्वी पुण्यांत नातूंच्या एका घराला रात्रीं आग लागली होती, त्याच वेळेस जवळच पन्हळकर गोसावी यांचें कीर्तन चालू असून त्यांनी वरील छेकापन्हुति त्या समयास काढली होती. बोवांची म्हणण्याची रीत जोशीबोवांच्या अस्सल धाटणीची मोठी चटकदार असल्यामुळें मंडळी इतकी गर्क होऊन गेली होती की, सगळें कीर्तन आटपून विडा, खिरापत होऊन खुशालपणें लोक जों बाहेर पडतात, तों आगीचा डोंब त्यांच्या दृष्टीस पडला !" शास्त्रीबुवांना, त्या युगांतल्या नव्या इंग्रजी विद्वानांप्रमाणे, जुन्या मराठी कवितेइतकीच तिच्यावर परिपुष्ट झालेली कीर्तनाची प्रथाहि अगदी अप्रिय होती. त्यामुळे, चिपळूणकर, अंशतः वडिलांच्या धाकाने आणि अंशतः महाविद्यालयांतील आपल्या वर्गबंधूंच्या उपहासाच्या भीतीनेहि, श्रोत्यांच्या अगदी मागल्या रांगेंत बसून किंवा उभें राहूनहि कीर्तनानंदाची बहार लुटीत असत ! कीर्तनाप्रमाणेंच

उत्तम ललित, रंगदारी तमाशा, पोवाड्याचा फड, जादूचे खेळ, नाटकें, सर्कस इत्यादि करमणुकीच्या हर एक कार्यक्रमाला ते अगत्यानें हजर राहत असत. कारण करमणुकीचे हे सर्वच प्रतिष्ठित आणि प्राकृत प्रकार त्यांना सारखेच प्रिय होते. किंबहुना, त्यांनी 'नाटकें करावीं की करूं नयेत ?' या ता. २९ नोव्हेंबर १८८१ रोजी 'केसरीं'त लिहिलेल्या आपल्या अग्रलेखांत असें स्पष्टच म्हटलें आहे की, "लोकरंजनाचा जो जो मार्ग असेल तो तो लोकांत अवश्य प्रवृत्त झाला पाहिजे. इतकेंच की, ज्यापासून शरीरास किंवा मनास, साक्षात् किंवा परंपरेनें, इजा होण्यासारखी मात्र नसावी. यास्तव अशा तऱ्हेचे करमणुकीचे जेवढे म्हणून प्रकार आहेत, तेवढे सर्व अत्यंत ग्राह्य होत." त्यामुळे, कीर्तनापासून तों तमाशापर्यंत करमणुकीचा कोणताहि प्रकार, शिष्टंमन्यतेच्या कोत्या कल्पनांमुळे, त्यांनी कधीं वर्ज्य मानला नाही.

१८६५ सालच्या उत्तरार्धांत चिपळूणकरांच्या आयुष्यांतील तीन महत्त्वाचे प्रसंग घडून त्याला निराळें वळण लागण्याचा योग आला. या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यांत त्यांचे आजे हरिपंत वारले; त्यानंतर तीन महिन्यांनी त्यांचा विवाह झाला; व वर्षाअखेर प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण होऊन ते १८६६ सालच्या प्रारंभीं पूना कॉलेजांत दाखल झाले. त्या वेळीं हें कॉलेज नुकतेंच विश्रामबाग वाड्यांतून हलवून शहरापासून दूर वानवडी येथे एका बंगल्यांत नेण्यांत आलेलें होतें. त्याच्या अध्यापकवर्गांत प्रि. वर्ड्स्वर्थ, प्रो. ऑक्सन्हॅम, डॉ. कीलहॉर्न, प्रो. केरोपंत छत्रे, अनंतशास्त्री पेंडरकर, शंकर पांडुरंग पंडित आणि आबाजी विष्णु काथवटे ही मंडळी होती. चिपळूणकरांच्या विद्याव्यसनाला जर यांपैकी कोणाची शिक्षणशैली विशेष पोषक झाली असेल, तर ती प्रि. वर्ड्स्वर्थ, अनंतशास्त्री पेंडरकर, डॉ. कीलहॉर्न आणि केरोपंत छत्रे यांची. प्रि. वर्ड्स्वर्थ हे विख्यात इंग्रजी कवि वर्ड्स्वर्थ याचे नातू असून, त्यांचीं मतें सर्वच बाबतींत स्वतंत्र आणि उदार होतीं. त्याचप्रमाणे भारतीय लोकांच्या उन्नतिविषयी त्यांना कळकळहि फार वाटत असे. ते अतिशय विद्वान् पण कोपिष्ठ होते. विद्यार्थ्यांचें अवांतर वाचन आणि ज्ञान हें जितकें अधिक, तितका तो विद्यार्थि खरा जिज्ञासु

आणि पात्र अशी त्यांची भावना होती. त्यामुळे ते स्वत: शिकवितांना सपाटून विषयांतर करीत आणि विद्यार्थ्यांनाहि अभ्यासक्रमाबाहेरील पुस्तकें वाचण्याबद्दल आग्रहाने सांगत असत. केवळ परीक्षार्थी मुलांविषयी त्यांना अगदी तिटकारा असे. खुद्द चिपळूणकरच त्यांच्या या स्वभावाची अशी एक गोष्ट सांगत असत की, "आम्ही पांच चार असामींनी एफ. ए. चे परीक्षेस बटलर्स सर्मन्स म्हणून ऐच्छिक विषय घेतला होता. तो समजावून घेण्याकरिता आम्ही एके दिवशीं साहेबांचे बंगल्यावर गेलों. बटलरचे चवदा सर्मनांपैकी आमचे परीक्षेस फक्त तीनच असत; व याखेरीज त्यांची प्रस्तावनाहि नेमिली असे. आमचे तीन सर्मनपुरता प्रस्तावनेचा भाग संपलासा पाहून आम्हांपैकी एक सिंधी विद्यार्थी होता, तो साहेबांस हळूच म्हणाला, "सर, उरलेल्या सर्मन्ससाठीसुद्धा आम्ही प्रस्तावना वाचावयाची का? त्या सर्मन्स कांही आमच्या परीक्षेसाठी नेमलेल्या नाहीत." विद्यार्थ्याचे शेवटले चार शब्द साहेबांचे कानीं पडतांच ते रागावून लाल होऊन मोठ्याने ओरडून म्हणाले, "काय यांत्रिक भाडोत्री इसम आहांत तुम्ही! केवळ घोकंपट्टी करून परीक्षेंत उत्तीर्ण होण्यापलिकडे दुसरा कोणताच चांगला उद्देश तुमच्यापुढे नाही काय?" ( What a mechanical, mercenary sort of fellow you are! Have you nothing better to aim at, than simply to cram and pass in the examinations? ) संकोची स्वभावाच्या चिपळूणकरांना, आपल्या इतर कांही सहाध्यायींप्रमाणे, या थोर गुरूच्या क्रोधाचे तडाके खाण्याचा प्रसंग बहुधा कधी आला नसावा. उलट, त्यांच्या गाढ विद्वत्तेच्या ज्या विविध शलाका वर्गांतील पल्लेदार प्रभावी वक्तृत्वांतून प्रकट होत असत, त्या आत्मसात् करण्याची मात्र एकहि संधि त्यांनी कधी दवडली नाही. किंबहुना, वर्गांतील अभ्यासाकडे दुर्लक्ष करून आपल्या आवडत्या विषयांवरील ग्रंथांचें वाचन करण्याची जी विलक्षण चटक त्यांना या वेळीं लागली, तिलाहि कारण, बहुधा आपल्या पित्याप्रमाणेच, प्राचार्यांच्याहि विशाल विद्याव्यासंगाचें डोळ्यांपुढे सतत असलेलें उदाहरण हेंच असावें. या त्यांच्या बेसुमार वाचनासक्तिमुळे, मराठी,

इंग्रजी आणि संस्कृत या तिन्ही भाषांतील प्रावीण्याबद्दल त्यांना अगदी प्रारंभापासून सारख्या शिष्यवृत्ति मिळत गेलेल्या असूनसुद्धा, केवळ गणित आणि न्यायशास्त्र या विषयांसंबंधीं अनावर अरुचि असल्याकारणानें, १८६७ सालीं ते लिटलगोच्या आणि १८७० सालीं बी. ए. च्या परीक्षेंत कांहीं यशस्वी होऊं शकले नाहीत. मराठी आणि संस्कृत या दोन्ही भाषां-विषयी त्यांना नितांत प्रेमादर होता, ही गोष्ट खरीच. पण, त्यांचा स्वत्वाभिमान इतका जाज्वल्य असतांनासुद्धा, इंग्रजीसारख्या आपल्या विजेत्यांच्या भाषेविषयी देखील त्यांना जो निस्सीम प्रेमादर होता आणि तिच्यासंबंधीं जे अतिरिक्त गौरवाचे उद्‍गार त्यांनी 'निबंधमालें'त वारंवार काढलेले दृष्टीस पडतात, तोहि वर्डस्वर्थसाहेबांच्या विकासप्रद शिक्षणशैलीचाच प्रभाव असावा, यांत शंका नाही.

प्रि. वर्डस्वर्थ यांच्या खालोखाल अनंतशास्त्री पेंढरकर, डॉ. कीलहॉर्न आणि प्रो. केरूनाना छत्रे यांच्या शिक्षणाचा परिणाम चिपळूणकरांवर झालेला दिसतो. आपल्या परतंत्र देशांतील राजाश्रयाला मुकलेल्या जुन्या उपेक्षित विद्या आणि त्यांचा व्यासंग करण्यांत विषण्ण मनानें आयुष्य कंठीत असलेला अवमानित पंडितवर्ग या दोघांच्याहि संबंधीं त्यांना सानुकंप आदर होता. अनंतशास्त्री हे या पंडितपरंपरेंतील प्राय: शेवटलेंच रत्न. डॉ. कीलहॉर्न याचे ते सहाय्यक शास्त्री होते. डॉक्टरसाहेबांना त्यांच्या-विषयी फार आदर असे; व त्या वेळीं महाविद्यालयांतून शिकविण्यांत येणारें आपलें प्रसिद्ध संस्कृत व्याकरण रचण्यांतहि त्यांना शास्त्रीबुवांची मदत घेतलेली होती. पण, पेंढरकरांची जुनाट रहाणी, असंतुष्ट वृत्ति आणि शिकविण्याची टाळाटाळ यांमुळे विद्यार्थी मात्र त्यांचा ठेवावा तसा मान ठेवीत नसत. अर्थात् विद्यार्थ्यांनाहि त्यांच्या त्या अंगचोर, मुखदुर्बळ विद्वत्तेपासून म्हणण्यासारखा लाभ कधी झाला नाही. ते एकादे वेळीं चुकून कधी रंगांत आले, म्हणजे त्यांच्या मुग्ध रसवंतीला बहर यावयाचा आणि मग संस्कृत कवींच्या चमत्कृतिजनक आख्यायिका, चटकदार सुभाषितें इत्यादि ठेवणींतल्या चिजा त्यांच्या स्वैर कथालापांतून बाहेर पडावयाच्या! पण, अशा वेळीं एकाद्या अरसिक किंवा चिकित्सक विद्यार्थ्यानें जर शंका काढून त्यांना हटकलें, तर

मुखस्तंभ शास्त्रीबुवा मौनाच्या कुहरांत जी एकदा दडी देत, ती कायमचीच ! चिपळूणकरांनी त्यांच्या या रसभंगाचा एक प्रकार असा वर्णन केलेला आहे की, " शास्त्रीबोवांची स्वारी एके वेळीं अंमळ खुषींत येऊन महाभारता-विषयी एक आख्यायिका सांगूं लागली. ते म्हणाले कीं, 'एकदा कालिदास कवि स्वकाव्यप्रतिष्ठेने उन्माद होत्साता महाभारत हातीं घेऊन त्यांतील कांही प्रमाद काढून ते खोडूं लागला. इतक्यांत तेथे वरील महाकाव्याचा कर्ता जो व्यासमुनि तो शुकाचें रूप धारण करून येऊन,--' इतक्यांत एक महारसिक विद्यार्थी या वाक्रसाचे प्रवाहाचा अवरोध करून शास्त्रीबुवांस मध्येच हटकून म्हणाले, 'शास्त्रीबुवा, या मंडळींना स्वर्गांतून खाली कशाला उतरवितां ?' मग काय विचारतां ? अगोदरच शास्त्रीमहाराजांची हौस आणि त्यांत विद्यार्थ्यांची अशी सहृदयता ! शास्त्रीबुवा, कविकुलगुरु, व्यासमुनि सर्व एकदम वरील परीक्षामुमुक्षु विद्यार्थ्याचे एका शब्दानें गप्प बसले ! ! " पण चिपळूणकर मात्र त्यांचे असले सगळे विश्रब्धालाप साक्षेपाने स्मृतिगत करीत असत. 'निबंधमाले'त जागोजाग ग्रथित केलेलीं समर्पक सुभाषितें, मधून मधून दिलेल्या रोचक कथा आणि 'विनोद–महदाख्यायिका' 'अर्थसादृश्य 'चमत्कारिक माहिती,' 'उत्कृष्ट उतारे' इत्यादि तिच्यांतील स्वतंत्र सदरें हीं सर्व त्यांची जिज्ञासु रसिकता किती संग्राहक आणि सर्वंकष होती, याची उत्कृष्ट साक्ष देतात. संस्कृत विषयाचे मुख्य अध्यापक डॉ. कीलहॉर्न यांची शिक्षणपद्धति अगदी रेखीव होती. 'नामूलं, नानपेक्षितमुच्यते' असा, मल्लिनाथाप्रमाणे, जणुं त्यांचाहि बाणा होता. घरून आगाऊ तयारी करून आल्याशिवाय त्यांनी वर्गांत कधी तोंड उघडलें नाही. चिपळूणकर कौतुकाने त्यांची अशी एक आठवण सांगत असत की, " एकदां शाकुंतल नाटक वर्गांत चाललें असतां मॉनियर विल्यम्सकृत सदरहू नाटकाची प्रत साहेब घरून आणण्यास विसरले; आणि वर्गांत बसल्यावर पेटींत पाहतात तों तें पुस्तक नाही. तेव्हा विद्यार्थ्यां-पैकीच एकाद्याचें बिनटीकेचें पुस्तक घेऊन वर्ग चालू न करतां घरीं शिपाई पाठवून आपली प्रत आणीपर्यंत ते तसेच मुकाट्याने बसले आणि प्रत आल्यावर, मग वर्ग चालू झाला ! " चिपळूणकरांना इंग्रजी आणि संस्कृत हे भाषाविषय जितके प्रिय होते, तितकाच न्यायशास्त्र आणि गणित यांचा

कंटाळा होता. सुदैवाने त्यांचे गणिताचे गुरु प्रो. केरोपंत छत्रे हे अतिशय शांत, प्रेमळ आणि बोलके होते; व विद्यार्थ्यांच्या मनांत शिरून त्याला विषय समजावून देण्याची त्यांची हातोटीहि अप्रतिम होती. शिवाय, कृष्णशास्त्र्यांशीं त्यांचा घनिष्ठ स्नेह असल्यामुळे, चिपळूणकरांवर त्यांचा साहजिकच फार लोभ होता. इतकेंच नव्हे, तर कृष्णशास्त्री किंवा पुढे 'सार्वजनिक सभे'च्या राजकारणांत गाजलेले त्यांचे धाकटे बंधु सीतारामपंत चिपळूणकर यांचे वक्तृत्वादि दिखाऊ आकर्षक गुण जरी आपल्या या मंद भासणाऱ्या मितभाषी शिष्याच्या ठिकाणीं नसले, तरी त्याचें निरीक्षण मार्मिक आणि आकलन मूलग्राही असल्याबद्दल मात्र केरूनानांना मुळीच शंका नव्हती. असें सांगतात की, "याच सुमारास एकदा विष्णुशास्त्री आणि सीतारामपंत हे उभयतां शुक्रवार पेठेंतील डिस्पेन्सरींत, तेथील डॉक्टर बाळकृष्ण चितोबा हे सूक्ष्मदर्शक यंत्राने रक्तबिंदूतील द्रव्यांचे पृथक्करणाचा प्रयोग दाखविणार होते, तो पाहण्यास गेले असतां, तेथे केरोपंत नाना हेहि सहज आले होते. डॉ. बाळकृष्ण चितोबा हे सूक्ष्मदर्शक यंत्र लावून रक्तबिंदुप्रयोग दाखवूं लागले. या वेळीं सीतारामपंतांची चंचलता व बाह्य हुशारी पाहून वरवर परीक्षा करणारे डॉक्टरसाहेब हे त्यांजवर मोठे खुष झाले आणि त्यांचे चंचलतेंत आणि विष्णुशास्त्री यांचे संकोचित वृत्तींत मोठी तफावत पाहून केरोपंत नानांकडे वळून म्हणाले, 'पाहा, हा विष्णु किती थंड आहे! सीताराम बरा हुशार दिसतो. त्याने इकडूनतिकडून सर्व यंत्र पाहिलें; पण विष्णु हा एके जागे-वरून हालला देखील नाही.' परंतु, केरोपंत नाना यांची परीक्षा अगदी वेगळ्या तऱ्हेची. त्यांनी उत्तर दिलें, 'विष्णु हा दिसण्यांत चंचल नाही खरा. परंतु, त्याने एके जागेवरच उभें राहून या प्रयोगांतील जितक्या खुब्या लक्षांत आणल्या असतील तितक्या चोहोंकडून फिरून पाहूनहि सीतारामाच्या लक्षांत आल्या नसतील, अशी माझी खात्री आहे.'" पण, चिपळूणकरांना गणिताविषयी इतकी कांहीं अरुचि आणि अप्रीति होती की, आपल्या या वत्सल गुरुकडून त्यांनी आनुषंगिक ज्ञान काय संपादन केलें असेल, तेवढेंच! स्कॉट, बायरन, शेले प्रभृतींच्या काव्य-कादंबऱ्या, संस्कृत काव्य-नाटकें, मिल, मॅकॉले, गिबन, बकल प्रभृति इंग्रज ग्रंथकारांचें वाङ्मय,

मुक्तेश्वर–वामनादि मराठी कवींची कविता इत्यादि साहित्याच्या वाचनांत रमलेल्या त्यांच्या मनाची गणितांत कांही केल्या गति होईना. म्हणून, महाविद्यालयांतील दुसऱ्याहि वर्षाच्या शेवटीं ते चांचणी परीक्षेंत नापास झाल्याचें पाहून प्रि. वर्डस्वर्थ यांनी शास्त्रीबुवांना अशा आशयाचें पत्र लिहिलें की, "तुमचा मुलगा या सालींहि विशेष तयार आहे असें नाही. तो गणितांत व इंग्रजींत सरासरीच उतरला आहे व लॉजिकमध्ये तर तो नापासच झाला आहे. तथापि, तुम्ही जर हिवाळ्याचे सुट्टींत त्यास लॉजिक शिकविण्याचें पत्करीत असाल तर मात्र मी त्यास परीक्षेस पाठवितों." पुढे बी. ए. च्याहि वर्गांत मुद्दाम चांगला अभ्यास करण्यासाठी दोन वर्षे काढून आणि वसतिगृहांत राहूनसुद्धा, केवळ अवांतर वाचनाच्या या अनावर व्यसनामुळे, त्यांना परीक्षेंत गोता खावा लागला. शेवटी १८७१ सालीं आपले सहाध्यायी गणेश परशुराम जोशी यांच्या मदतीने 'स्टॅटिस्टिक्स'चा अभ्यास करून ते कसेबसे एकदाचे पदवी घेऊन परीक्षेच्या कांचांतून बाहेर पडले! हे त्यांचे वर्गबंधु त्यांच्याप्रमाणेंच मितभाषी आणि मननशील होते. चिपळूणकर एकदां सांगत होते कीं, "डॉ. कीलहॉर्नसाहेबांबरोबर त्यांचे देशचा कोणी साहेब एकदां कॉलेजांत आला होता. त्याला तरुण मनुष्यांचीं डोकीं पाहून त्यांवरून तीं पुढें कशीं निघतील हें कळत असे असें सांगत असत. या साहेबांनीं कॉलेजांतील बहुतेक विद्यार्थ्यांचीं डोकीं तपासलीं. त्यांत त्यांनी माझे व जोशी यांचें अशीं दोन डोकीं पसंत केलीं"

महाविद्यालयांतील या सहा वर्षांच्या काळांत सतत केलेल्या वाचनामुळे चिपळूणकरांच्या बुद्धीला जशी प्रगल्भता आली, तसाच निरनिराळ्या विषयांच्या चिंतनामुळे त्यांच्या मनाचाहि विकास होत गेला. १८६८ सालच्या प्रारंभीं डेक्कन कॉलेजसाठीं खास बांधलेली इमारत पूर्ण होऊन तें कॉलेज वानवडीहून येरवड्यास नेण्यांत आलें. कॉलेजचें हें स्थलांतर जसें एका दृष्टीने सुखकर तसेंच दुसऱ्या दृष्टीने क्षोभकारकहि वाटण्यासारखें होतें. कारण, अवघ्या पन्नास वर्षांपूर्वी खडकीच्या ज्या रणमैदानावर बाजीराव आणि एल्फिन्स्टन यांचा शेवटला सामना होऊन मराठशाहीचा अंत

झाला, त्या मैदानावर बांधलेल्या या इमारतींत अधिष्ठित झालेलें दक्षिण महाविद्यालय हें जणुं, सभोवती पडलेल्या मराठा वीरांच्या अस्थींना साक्ष ठेवून, महाराष्ट्रांतील तरुण पिढीला विजयी पाश्चात्य विद्येची दीक्षा जेतृत्वाच्या दर्पानें देत आता खडे ठाकलेलें होतें. कॉलेजच्या टॉवरवरून दिसणारें तें अफाट, रखरखीत रणक्षेत्र आणि त्याच्या पश्चिमेस तारकेश्वरापासून पर्वतीपर्यंत पसरलेलें तें पराभूत, पडित पुणें ! –तें दृश्य पाहून चिपळूणकरांच्या प्रमाथी, अंतर्मुख मनांत कोणत्या ऊर्मि उसळून आल्या असतील ? त्या मितभाषी, मानधन, मननशील युवकाच्या डोक्यांत कोणत्या विचारांनी थैमान घातलें असेल ? "······· इंग्रजांनी दौलत हरण करण्यांत बाकी ठेवली नाहीं व सर्वांचे अंतःकरणाचे धर्म की श्रीमंत प्रगट जाहल्याखेरीज कोणी घजावत नाहीं. श्रीमंत प्रगट जाहाले असतां सर्वहि प्रगट होऊन येक समई पायवंद जिकडील तिकडे लागले असतां बंदोबस्त होईल असा सर्वांचा मनोधर्म येक विचाराचा जाणोन इंग्रजासी लढाई सुरू जाहाली ····· सर्वत्रांनीं येके समई पायबंद लाविल्यावाचून जेरीस येणार नाहीं. हिंदुधर्म रक्षावयाचा समय जाणोन सर्व हिंदूंनीं येक होणें हें हिंदु धर्मास व कीर्तीस योग्य,"—हें शहाणपण मराठमंडळाला अति उशिरा सुचलें; व त्यामुळे खडकीच्या पराजयाची पूर्तता आष्टीच्या पूर्णाहुतीने झाली. पण हा लाजिरवाणा इतिहास इथेंच संपला नाही. त्या सगळ्या प्रमादांची त्याहिपेक्षा उद्वेगजनक पुनरावृत्ति अवघ्या दहा वर्षीपूर्वी झालेल्या सत्तावन सालच्या बंडांतहि घडून आलेली होती. १८१७ सालच्या काय किंवा १८५७ सालच्या काय या घटनांची स्मृति आणि स्मारकें मूर्तामूर्त अवस्थेंत चिपळूणकरांच्या भोवती सर्वत्र वावरत होतीं. खड्यांची फत्ते आणि खडकीचा फडशा हीं दोन्ही भरल्या डोळ्यांनीं पाहिलेले,—या दोन्ही घटनांच्या दाहक आठवणी हृदयसंपुटांत साठवून पिचत असलेले अनेक वृद्ध पुण्यांत अद्याप हयात होते; व स्वराज्य नष्ट झाल्यामुळे अन्नाला मोताद झालेले शाहीर आणि गोंधळी यांच्या खड्या कवनाची काळजाचा थरकांप करणारी डफावरली थाप पुण्याच्या भारलेल्या परिसरांत अद्याप कडकडून उठत होती. किंबहुना, सत्तावन सालच्या बंडांतून जीव बचावून परत आलेले जे शिपाई गडी कुठे शागीर्दांचा, कुठें

पुजाऱ्याचा, कुठे हरिदासाचा, कुठे गोंधळ्याचा तर कुठें फेरीवाल्याचा पेशा पत्करून, लपत छपत गुजराण करीत होते, त्यांच्या दंडांतली रग आणि डोळ्यांतली धग खाजगी मैफलींतील गप्पाष्टकांत अजूनहि उफाळून प्रकट होत होती. विष्णुशास्त्री पंडित यांचे चुलत बंधु सातारचे हरिशास्त्री पंडित हे पुण्यांतल्या दक्षिणेच्या समारंभासाठी कधीमधी कृष्णशास्त्र्यांकडे येऊन उतरत असत; व केव्हा केव्हा तीन चार महिनेहि त्यांचा मुक्काम पुण्यास राहत असे. स्वराज्याचे अखेरचे दिवस प्रत्यक्ष बघितलेल्या त्या शास्त्रीबुवांची स्मरणशक्ति इतकी प्रखर आणि वक्तृत्व इतकें प्रभावी होतें की, ते आपल्या जुन्या आठवणी एकदा उजळावयाला लागले, म्हणजे त्यांच्या रसवंतीच्या अस्खलित ओघांत ते ते रस-प्रसंग डोळ्यांपुढें अगदी मूर्तिमंत उभे राहत असत. पेशवाईच्या उत्तरकालाचा चालता बोलता ज्वलंत इतिहासच जणुं त्यांच्या रूपाने चिपळूणकरांना प्रत्यक्ष पाहावयाला मिळाला. कथा आणि कीर्तनें, ललितें आणि लावण्या, आख्यायिका आणि पोवाडे ऐकण्याचें आणि त्यांचा संग्रह करण्याचें त्यांना विलक्षण व्यसन होतें. या त्यांच्या व्यसनांतूनच पुढे 'काव्येतिहाससंग्रह' आणि 'चित्रशाळा' यांचा उदय झाला.

अशा ऐतिहासिक वातावरणांत चिपळूणकरांच्या अस्मितेचा विकास झाला, त्यांची प्रतिभा परिपुष्ट होत गेली. त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचा गाभा आणि घडण हीं दोन्हीहि अस्सल स्वदेशी होतीं. त्या वेळचे कांही द्रष्टे, नेते, कार्यकर्ते, पत्रकार किंवा लेखक स्वत:ला ब्रिटिश संस्कृतीचे प्रसव आणि सत्तेचे पुरस्कर्ते म्हणविण्यांत धन्यता मानीत असत. या कश्मलाचा स्पर्श चिपळूणकरांना स्वप्नांतसुद्धा कधी झाला नाही. पारतंत्र्यांत जन्म झालेला असूनहि त्यांची अस्मिता पारतंत्र्याचें अपत्य, आश्रित आणि उद्गायक नव्हती. त्यांचा देशाभिमान स्वयंभू आणि स्वयंदीप्त होता. भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेवर त्यांची अनन्य श्रद्धा होती; व त्या श्रद्धेने त्यांचा देशाभिमान प्रस्फूर्त आणि प्रभावित झालेला होता. त्यामुळे त्यांचें एरवीं अत्यंत खंबीर असलेलें मन, देशाभिमानाच्या बाबतींत मात्र, कवि चंद्रशेखर यांच्याप्रमाणे,—

तृणास जरि येथल्या कुणि अनार्यता लावली
बसेल हृदयास या तरिहि डागणी तावली

असें म्हणण्याइतकें अगदी हळवें आणि हळुवार होऊन गेलेलें होतें. ख्रिस्ती मिशनरी काय, लोकहितवादी काय किंवा जोतीराव फुले काय, यांच्यावर चिपळूणकरांनी अत्यंत त्वेषाने जी जलाल टीका केली आहे, तीहि त्यांनी भारतीय धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृति आणि इतिहास यांच्याविरुद्ध जी नालस्तीची निरर्गल मोहीम त्या काळीं सुरू केली होती, तिची चीड येऊन! त्यांच्या आयुष्यांतील अगदी लहानसहान प्रसंगांतसुद्धा त्यांच्या या भावनेची उत्कटता आणि तीव्रता अनुभवास येते. 'निबंधमाला' काढल्या-वर १८७४ सालच्या आश्विन महिन्यांत कोजागिरीच्या दिवशीं आपल्या मित्रमंडळींना बोलावून ती रात्र मजेंत घालविण्याचा बेत त्यांनी केला होता. पण, त्या दिवशीं सायंकाळीं एकाएकी अशी बातमी आली की, सत्तावन सालच्या बंडांतून शेवटीं निसटून बेपत्ता झालेले नानासाहेब पेशवे हे गोसाव्याच्या रूपाने लपूनछपून ग्वाल्हेर संस्थानांत दिवस कंठीत असतां, शिंदे सरकारला त्यांचा शोध लागला आणि त्यांना पकडून रेसिडेन्सीच्या ताब्यांत देण्यांत आलें. हें वृत्त कळतांक्षणींच चिपळूणकरांनी एकदम कोजागिरीचा बेत रद्द केला. आपले गुरुजन कसेहि असले, आपला धर्म कसाहि असला आणि आपली समाजरचना कशीहि असली, तरी त्यांच्या-संबंधीच्या आत्मीयतेची आणि आदराची योग्य मर्यादा सांभाळूनच आपण त्यांच्या बाबतींत काळजीपूर्वक वागलें पाहिजे, ही त्यांच्या आचरणाला बाळ-पणीं हरिपंतांनी लावलेली कौटुंबिक शिस्त शेवटल्या क्षणापर्यंत सुटली नाही. मृत्यूच्या आदल्या दिवशीं रात्रीं, त्यांच्या अंगांत ताप असल्यामुळे, त्यांचे चुलत बंधु विनायकराव हे त्यांना कोचावर पडल्यापडल्याच जेवणासाठी आणलेल्या भाताचे घास भरवीत होते. तोंच त्यांच्या कानांवर त्यांच्या मातुश्री काशीताई यांचा शब्द पडला. तेव्हा, त्या आपल्या खोलींत येत आहेत अशा समजुतीने चिपळूणकर कोचावरून धडपडत उठले आणि खाली पाट मांडला होता त्यावर चटकन जाऊन बसले! आपल्या आईने आपल्याला कोचावर बसून जेवतांना पाहिलें, तर ती आपल्याला बोलेल, असा धाक त्यांना त्या

अनुक्रम १७-१-६२ ८२९ २०१७

वयांत आणि त्या अवस्थेंतहि वाटला ! ! हरिपंत, बचंभटमामा, कृष्णशास्त्री वैजापूरकर, हरिशास्त्री पंडित, पन्हळकर गोसावी ही विद्यार्थिदशेंत त्यांच्या कोमल जीवनाला आपआपल्या परीने आकार देऊन गेलेलीं माणसें, कृष्ण-शास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, रानडे प्रभृति तत्कालीन नेत्यांच्या मानाने, अगदीच सामान्य आणि क्षुद्र होतीं, यांत संशय नाही. पण, त्यांचें चारित्र्य, वैराग्य, धर्मशीलता आणि देशाभिमान यांचा जो प्रभाव चिपळूणकरांच्या मनावर त्या कोवळ्या वयांत पडला, त्याने त्यांची प्रकृति आणि नियति निश्चित करून टाकली. स्वभाषा आणि स्वदेश यांच्यापरतें त्यांना दुसरें कांही प्रिय राहिलें नाही; व त्यांचा उज्ज्वल पूर्वेतिहास आणि आजची अवनत परिस्थिति हा त्यांच्या चिंतनाचा आणि चर्चेचा एकमेव विषय होऊन बसला. त्यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यापुढे संसारांतलीं सर्व सुखें हात जोडून सदैव दत्त म्हणून उभीं असतांनासुद्धा त्यांचा बाहेरख्याल सुटला नाही. उलट, चिपळूणकरांच्या पत्नीची प्रकृति रोगट असल्यामुळे, त्यांनी दुसरें लग्न करावें असा आग्रह त्यांच्या आप्त-मंडळींनी त्यांना वारंवार केलेला असतांना देखील, त्या निग्रही तरुणाने, सुखाच्या किंवा संततीच्या न्यूनतेबद्दल यत्किंचित्हि विषाद न मानतां, केवळ विद्याव्यासंगांत निष्कलंक जीवन घालविलें. पिता-पुत्रांच्या वृत्तींतील हा एकंदर फरक किती बोधप्रद आहे ! शास्त्रीबुवां-पेक्षा चिपळूणकरांची रसिकता किती अधिक गाढ आणि व्यापक होती, याची साक्ष 'निबंधमाला' आणि त्यांचे इतर वाङ्मय देतच आहे. पण, त्या रसिकतेचें औचित्याचें अवधान मात्र कोणत्याच बाबतींत कधीहि सुटलें नाही, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

पाश्चात्य वाङ्मय आणि इतिहास यांच्या वाचनाने आणि चिंतनानें चिपळूणकरांच्या मनोवृत्तींतील हे पीळ आणि पेंच दृढतर होत गेले. या नव्या विद्येच्या प्रभावाने इतर कित्येकांचीं मनें त्या वेळीं स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांना इतकीं कांही पारखीं होऊन गेलीं होती की, सर फेरोजशहा मेहता यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ते सवाई इंग्रज बनून गेले. पण, चिपळूणकरांचा स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांच्याविषयीचा

अभिमान आणि आदर मात्र उलट शतगुणित होऊन गेला. किंबहुना, आपलें वाङ्मय आणि इतिहास यांच्या परिशीलनाने उद्दीपित झालेल्या त्यांच्या देशाभिमानाला पाश्चात्य वाङ्मयेतिहासाच्या व्यासंगाने विलक्षण धार येऊन त्यांच्या स्वातंत्र्याकांक्षी युयुत्सु प्रतिभेला उद्दाम तेज चढलें. जणुं त्यांच्या अंतर्मुख, आत्मलीन प्रतिभेने, पाश्चात्य ज्ञान–विज्ञानांतील आपल्या आत्मीय विशेषांना पोषक असलेले तेवढेच अंश आत्मसात् करून, ओज आणि शैली यांची साधना पूर्ण केली. देशाभिमान आणि स्वातंत्र्यप्रियता हे इंग्रजांचे दोन राष्ट्रीय स्वभावविशेष त्यांनी आदर्श मानले होते; इंग्रजांच्या राष्ट्रीय गुणावगुणांचा केवळ प्रतिनिधीच असा डॉ. जॉन्सन हा त्यांनी आदर्श ग्रंथकार मानला होता; व त्याचें निःस्पृह, विरागी, एकांत जीवन आणि प्रतिपादनाची एकांगी, असहिष्णु, ऊर्जस्वल शैली हीहि त्यांनी आदर्श मानली होती. ॲडिसन आणि मॅकॉले या दोन इंग्रजी लेखकांचे कांही साहित्यगुण जरी त्यांनी उचललेले असले, तरी जॉन्सनच्या चारित्र्याचा जितका परिणाम त्यांच्या मनो–जीवनावर झालेला होता, तितका दुसऱ्या कोणत्याहि मराठी किंवा इंग्रजी लेखकाचा झाल्याचें दिसत नाही. जॉन्सनचें अकुतोभय आणि आव्हानप्रद व्यक्तित्व, त्याची राष्ट्राभिमानाने रसरसलेली आणि राष्ट्रवादाच्या कवचांत अवगुंठित होऊन बसलेली व्यवच्छेदक अस्मिता चिपळूणकरांना किती विलक्षण आदरणीय आणि अनुकरणीय वाटत होती, हें, त्याच्या गुणावगुणांचें जें विवेचन आणि विश्लेषण त्यांनी त्याच्यावरील आपल्या प्रदीर्घ निबंधांत इतक्या समरसतेने केलेलें आहे, त्यावरून स्पष्ट प्रतीत होतें. स्वतःचा दुरभिमान, दुर्ग्रह आणि दुर्मतें हीं कोणत्याहि परिस्थितींत सहसा सोडावयाचीं नाहीत, प्रतिपक्षाची कोटि अंगावर आली तरीहि ती ईर्ष्येने उडवून देऊन, 'जितं मया' अशा अभिनिवेशाने, उलट त्याच्यावर तुटून पडावयाचें, ही जी जॉन्सनची बेमुर्वतखोर वादपद्धति, ती चिपळूणकरांनी बहुतेक सगळ्या वादांत तितक्याच तडफेने अवलंबिल्याचा अनुभव 'निबंधमालें'त ठिकठिकाणीं येतो. इंग्रजी भाषेला जी 'वाघिणीच्या दुधा'ची उपमा त्यांनी दिली आहे, ती त्यांना त्या भाषेंतील वाङ्मयाविषयीच केवळ नव्हे, तर ती भाषा बोलणाऱ्या इंग्रज राष्ट्राच्या विजिगीषु, विदारक अस्मितेविषयी देखील

जी आश्चर्य आणि असूया यांनी संमिश्र असा नितांत आदर वाटत असे, त्याची निदर्शक आहे. म्हणूनच, 'माले'च्या दुसऱ्या अंकांत तिचे उद्देश विशद करितांना, त्यांनीं लोकांना असा स्पष्टच उपदेश केला आहे की, " इंग्लिश लोकांच्या उत्कर्षाचाच नुसता हेवा करण्यापेक्षा त्यास कारणीभूत जे त्यांचे अनेक गुण त्यांचा मत्सर करणें फार समंजस व अत्यंत हितावह होय." सारांश, चिपळूणकरांचें व्यक्तित्व एकसंध होतें; तत्कालीन इतर कांही नेते, कार्यकर्ते, पत्रकार किंवा लेखक यांच्या व्यक्तित्वाप्रमाणे विभागलेलें किंवा विचकलेलें नव्हतें. विद्यार्थिदशेंत मनावर झालेल्या निरनिराळ्या संस्कारांनी त्यांच्या प्रतिभेचा जो पिंड एकदा बनून गेला, त्यांच्या अस्मितेचें जें स्वरूप एकदा निश्चित होऊन गेलें, त्यांत नंतर पुढे म्हणण्यासारखा बदल झाला नाही. 'निबंधमाले'त जें विचारांच्या विकासाचें नावीन्य किंवा नवनव्या प्रमेयांच्या चिंतनाने प्रतिपादनाला येणारी गाढता, विशालता आणि प्रगतिपरता जी विशेष आढळत नाही, ती याच कारणामुळें. डॉ. जॉन्सन याच्याविषयी त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे तेहि कांही बाबतींत 'दुराग्रही' आणि 'स्थूलबुद्धि' होते. त्यामुळे, भांडारकर, रानडे, सार्वजनिक काका, दयानंद सरस्वती, जोतीराव फुले प्रभृति त्या काळांतल्या थोर कार्यकर्त्यांनी धर्म आणि समाज यांच्या शोधनाचे आणि सुधारणेचे जे उपक्रम मोठ्या धैर्याने केले, त्यांचें मर्म आणि महत्व त्यांच्या बुद्धीला फारसें आकलन होऊं शकलें नाही. त्यांच्या वडिलांप्रमाणेच तेहि बदलत्या काळाचें आवाहन आणि आव्हान ओळखावयाला अंशतः असमर्थ ठरले. कारण, ते जरी अत्यंत देशाभिमानी होते, तरी त्यांचाहि प्रबळ मनोधर्म, शास्त्रीबुवांप्रमाणे, रसिकता हाच खरोखरी होता.

चिपळूणकरांच्या महाविद्यालयांतील आयुष्यक्रमांत त्यांचा हा मनोधर्म सर्वच बाबतींत मोठ्या रुचिरतेने प्रकट झालेला दिसतो. वस्तुतः ते आंतल्या गाठीचे आणि म्हणून अबोल. त्यांच्या या घुम्या स्वभावाविषयीं कॉलेजांतील त्या वेळचे फेलो आबाजी विष्णु काथवटे यांनी एकदां असे उपहासाचे उद्गारहि काढले होते की, "सीतारामपंतांचा स्वभाव बरा बोलका आहे. कृष्णशास्त्री यांस सुद्धा बोलायास चालायास बरेंच लागतें! पण हे

शास्त्रीबुवा म्हणजे पेटींतलेच शास्त्रीबुवा! यांना बोलायास म्हणून नकोच."
पण हें वर्णनहि तितकेसें बरोबर नाही. वाचन, लेखन आणि चिंतन यांच्या-नंतर जर चिपळूणकरांना कांही प्रिय असेल, तर त्या म्हणजे समानशील मित्रांच्या मैफलींतील मनसोक्त गप्पा. अशा विश्रब्ध बैठकींत त्यांना ऐकणें जितकें प्रिय असे, तितकेंच बोलणेंहि. जुन्या–नव्या जमान्यांतील बड्या लोकांच्या आख्यायिका आणि आठवणी ऐकण्यांत, व्यक्ति आणि ग्रंथ यांचें गुणदोषविवेचन करण्यांत व लोकांत प्रचलित असलेल्या नाना प्रकारच्या वाद-प्रवादांची चर्चा करण्यांत ते तास न् तास घालवीत असत. ते अभ्यास सामान्यतः दिवसाच करीत. मग अर्थात् सायंकाळीं जेवण झाल्यापासून तों रात्री अंथरुणावर पडेपर्यंत त्यांचा सारा वेळ गप्पांत जावयाचा. अशा वेळीं जर कोणी विश्वासांतला मित्र आला नाही, तर मात्र ते, खोलींत दिवा वगैरे न लावता, अंधारांतच खिडकींत पाय टाकून स्वस्थ कांहीतरी गुणगुणत खुर्चीवर बसून रहावयाचे! वाचनाच्या बाबतींतहि, जॉन्सनप्रमाणे, त्यांची भ्रमरवृत्ति होती. म्हणजे असें की, एकाद्या विषयाचें किंवा ग्रंथाचें, डोहांत डुंबणाऱ्या हत्तीप्रमाणे, अथपासून इतिपर्यंत गाढ अवगाहन न करितां, ते, या फुलावरून त्या फुलावर केवळ स्पर्शास्वाद घेत गुंजन करीत हेलावणाऱ्या भ्रमराप्रमाणे, विषयाचा किंवा ग्रंथाचा आवडेल तेवढा भाग चाळून पाहून त्याचें मर्म समजावून घेत असत. १८६८ सालीं कॉलेजच्या वसतिगृहांत राहावयाला आल्यावर त्यांचा वेळ वर्गापेक्षा अवांतर वाचनांतच जास्त जाऊं लागला. त्यांचे सहाध्यायी फेलो अच्युत नारायण आजगांवकर हे त्यांचा हा वाचनाचा हव्यास पाहून त्यांना एकदा म्हणालेहि, "परीक्षा पास होईपर्यंत दुसरें अगदी कांही करावयाचें नाही व कोणतेहि विषयाचा नाद म्हणून धरायाचा नाही असा मी पहिल्यापासूनच निश्चय केला होता. एकदा कोठें मला चुकून आनालिटिकल जॉमेट्रीचा छंद लागत होता. परंतु मी लवकरच सावध झालों आणि त्याबद्दल कानाला खडा लावून घेतला! तुम्ही पहा, नाही तें भलतेंच संस्कृत, मराठी वाचीत बसतां आणि मग परीक्षेंत गोता खाता!"
पण, चिपळूणकरांनी, या गोता खाण्याचें वैषम्य न मानतां, आपलें अवांतर वाचन अव्याहत चालू ठेवलें; व कॉलेजांतील निरनिराळ्या कार्यक्रमांतहि यथारुचि भाग मोठ्या हौसेने घेतला. त्यांच्या ठिकाणीं वक्तृत्व अजिबात

म्हहतें. तथापि कॉलेजांतील साप्ताहिक वादसभेंत दोन तीन निबंध मात्र त्यांनी वाचले. त्यांपैकी एका निबंधाचा विषय 'प्राचीन हिंदु लोकांचें ज्ञान' हा होता. या निबंधांत त्यांनी, विष्णुबुवा ब्रम्हचारी यांच्या 'वेदोक्तधर्मप्रकाश' या ग्रंथाच्या आधाराने, पृथ्वी सूर्याच्या आकर्षणांत असल्याचा उल्लेख वेदांत सांपडतो, असें प्रतिपादन केलें होतें. अध्यक्षांनी हें त्यांचें प्रतिपादन 'काल्पनिक' (fanciful) असल्याबद्दल टीका केली होती. आपल्या प्राचीन संस्कृतिविषयींचा चिपळूणकरांचा जो उत्कट अभिमान पुढे 'निबंधमाले'तून जागोजाग उफाळून आविर्भूत झाला, त्या अभिमानाच्या प्रादुर्भावाला कॉलेजांतील या वादसभेपासूनच प्रारंभ झालेला दिसतो. या वादसभेपेक्षाहि कॉलेजांतील स्नेहसंमेलनें आणि संस्कृत नाट्यप्रयोग यांच्याविषयी त्यांना साहजिकच जास्त उत्साह असे; व 'वेणीसंहार' आणि 'मृच्छकटिक' या दोन्ही नाटकांत त्यांनी अनुक्रमें धर्मराज आणि न्यायाधीश या आपल्या वृत्तीला साजेशा भूमिका केल्या होत्या. नाट्यकलेविषयींचा हा त्यांचा सक्रिय जिव्हाळा पुढे दहा वर्षांनी, 'केसरीं'तील अग्रलेखांतून, किर्लोस्कर नाटक मंडळीच्या पुरस्काराच्या रूपाने, जाहीर रीतीने व्यक्त झाला.

चिपळूणकरांच्या या सर्वस्पर्शी रसिकतेला तितक्याच व्यापक सहृदयतेची जोड मिळालेली होती. डॉ. जॉन्सन याच्याविषयी त्यांनी असे उद्गार काढले आहेत की, "त्याची आपल्या आईबापांवर भक्ति, बायकोविषयी प्रेम, मित्रांचे ठिकाणीं स्नेहपूर्वक निष्ठा, आश्रित व सेवक यांविषयी आदर, प्राणिमात्राविषयी भूतदया, वगैरेचीं उदाहरणें दाखल केलीं असतां निराळा ग्रंथच होईल." त्यांच्याहि स्वतःच्या सहृदयतेचें वर्णन याच शब्दांनी करितां येईल. रसिक मनुष्य हा सहृदय असतोच असें नाही. उलट रसिकता ही अत्यंत आत्मकेंद्रित आणि म्हणून अमानुष असल्याचाहि अनुभव पुष्कळदा येतो. खुद्द कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या रसिकतेला सहृदयतेची जोड असावी तितकी नव्हती आणि औचित्याचेंहि भान एकंदरींत कमी होतें, हें आपण पाहिलेंच आहे. पण, चिपळूणकरांची रसिकता हें त्यांच्या सहृदयतेचेंच खरोखरी कलात्मक स्वरूप होतें, असें

म्हटलें तरी शोभेल. 'निबंधमालें'त त्यांच्या अस्मितेची जी उग्रता, प्रखरता आणि युयुत्सुता इतक्या प्रकर्षानें प्रकट झालेली आपल्याला दिसते, तिचा आढळ त्यांच्या प्रापंचिक जीवनांत कुठेहि होत नाही. तिथे ते अगदी सौम्य, सहिष्णु आणि सात्त्विक असेच दृष्टीस पडतात. त्यांचे वडील कृष्णशास्त्री आणि चुलते सीतारामपंत हे दोघेहि आपआपल्या परीनें तऱ्हेवाईक; आईचा माहेरच्या मंडळीकडे जबर ओढा; पत्नी अशक्त आणि आजारी; व कुटुंबपरिवार फार मोठा. पण, चिपळूणकरांचा कौटुंबिक जिव्हाळा इतका गाढ होता की, यांपैकी कोणाचीहि अवज्ञा, उपेक्षा किंवा आबाळ त्यांच्या हातून कधी झाली नाही. शास्त्रीबुवांच्या मृत्यूनंतर कुटुंबांतील स्वार्थ-मूलक कलह विकोपाला जाऊन त्यांना स्वतःला किती मनस्ताप झाला, हें त्यांनी आपले धाकटे बंधु लक्ष्मणराव यांना त्या वेळीं पाठविलेल्या पत्रांवरून कळून येतें. या संयुक्त कौटुंबिक जीवनांतील सर्वांत चमत्कारिक, सदैव ठुसठुसणारें बोंचक शल्य जर कोणतें असेल, तर तें हें की, 'निबंधमाले'-पासून तों 'केसरी'पर्यंत जे निरनिराळे उद्योग त्यांनी हातीं घेतले, त्यांपैकी एकाहि उद्योगाविषयी त्यांच्या कुटुंबीयांना आपुलकी किंवा अगत्य नव्हतें. त्यामुळे या उद्योगांसंबंधीचे सारे व्यवहार त्यांना परस्पर न कळत करावे लागत असत. 'चित्रशाळे'च्या स्थापनेंतील आपले मुख्य सहकारी बाळकृष्ण वासुदेव जोशी यांना जे विस्तृत पत्र ता. २४ जुलै १८७८ रोजी त्यांनी रत्नागिरीहून घातलें होते, त्यांत त्यांचा स्वतःचा आत्मविश्वास, कुटुंबांतील मंडळीविषयीचा धाक आणि आपल्या सहकाऱ्यांविषयीची कळकळ यांचे विचित्र मिश्रण पहावयाला मिळतें. या पत्रांत त्यांनी बाळकृष्णपंतांना असें लिहिलें होते की,—

"आपल्या छापखान्याविषयीं तुम्ही व शालिग्राम यांनीं पुढील गोष्ट चांगली लक्षांत ठेवली पाहिजे, कीं त्याच्या संबंधाचा बोभाटा तुम्ही बिलकुल होऊं देतां कामास नाहीं. ... तुमच्या दोघांच्या नांवावर ७०० रुपये खातेवहीवर घातले आहेत, ते दिनकरानें अद्याप चांगलेसे पाहिले नाहींत. ते पाहिल्या बरोबर, आमच्या घरांत, सासुरवाडच्या मंडळींत व छापखान्यांतल्या मंडळींत तेव्हांच अवई फुटेल, आणि त्यावर

गांवांत काय काय बातम्या फुटतील तें तर सांगवतच नाहीं. यास्तव आणखी वर्षभरानें, आपला छापखाना चांगल्या स्थितीस येईपर्यंत, वरील मौन तुम्ही दोघांनीं धरलें पाहिजे. आंतून काय पाहिजे ती गुप्त व्यवस्था करा, पण तिचा मागमूसहि कोणास लागूं देऊं नका. जितकें काय लोकांस प्रत्यक्ष दिसणारच, त्याखेरीज साऱ्या कारभाराविषयीं तिघांखेरीज चवथ्यास एक अक्षरहि कळणार नाहीं अशी व्यवस्था ठेवा. शाळिग्राम बोवांत सुमार अंमळ कमीच आहे, यास्तव सारी बाजू तुम्हीच संभाळली पाहिजे. लोकांस दिसण्यांत सहजच दिसणार आहे, कीं आज-पर्यंत कोणी न काढलेली चित्रशाळा या तिघांनी काढली आहे. तिघेहि उमेदवार गडी, व्यापार कसा करावा हें एकासहि माहित नाहीं. त्यांतून शाळिग्रामाचें नांव प्रमुख, तेव्हां बोलायालाच नको. शिवाय वाढता वाढतां, हत्ती बाळगण्याच्या खर्चापर्यंत आपलें...एस्टिमेट वाढलें आहे ! तेव्हां तिऱ्हाईत पहाणारास या वेडेपिरांनी हे काय खूळ काढले आहे असें सहजच वाटणार आहे ! येवढ्या शहाण्याशहाण्यांनी काढलेलीं स्वदेशी दुकानें, मेणबत्त्यांचे आगपेटयांचे कारखाने जर धड चालत नाहींत, तर या छोटया मंडळीनें अंगावर घेतलेलें हें अवडंबर कसें चालावें ? हे सर्व भ्रम लवकरच फेडण्याची स्थिति येईल अशी माझी खात्री आहे.

छापखाना तूर्त बंद राहिल्यास कांहीं हरकत नाहीं. तुमच्या मागें इतकीं कामें जी तुंबली आहेत, त्यांचा मधल्या वेळांत निकाल करून टाका. शिवाय तुमची प्रकृति अशक्त आहे; तर अतिशय मेहनतहि न करण्याविषयीं खबरदारी ठेवीत जा. तुमच्या व शाळिग्राम यांच्या नांवावर ज्या रकमा लिहून ठेवल्या आहेत त्यांच्या संबंधाने बिलकुल काळजी मनांत आणूं नका. व्यापारी दृष्टीनें कोणत्याहि कामांत शिरण्याचा जर माझा मनोदय असता तर 'चित्रशाळा' निघालीच नसती; व 'निबंधमाला'हि निघती ना."

अशाहि बिकट परिस्थितींत चिपळूणकरांनी एकामागून एक विविध उपक्रम केले आणि ते आत्मप्रत्ययाच्या जोरावर तडीसहि नेले. 'निबंधमाला'

जशी सगळी त्यांनी सतत सात वर्षें एकटाकी लिहिली, तसेच हे उद्योगहि सर्व एकटयाच्या हिंमतीवरच उभारले. पण, त्यांचा आत्मप्रत्यय जरी इतका उद्दाम आणि अविचल होता, तरीहि त्याच्या तोऱ्यांत त्यांनी कधी आपल्या भोवतालच्या वडीलधाकटया माणसांना, सहकाऱ्यांना किंबहुना आश्रितांनाहि दुखविलें नाही. उलट, 'निबंधमालें'तील आपल्या प्रतिपादनाचें धोरण वडिलांना आवडणार नाही, या गोष्टीची पूर्ण कल्पना असल्यामुळे, त्यांच्या नजरेस तिचे अंक पडूं नयेत, अशी खबरदारी ते दक्षतेने घेत असत. वडिलांच्या सर्व वैगुण्यांची त्यांना पुरेपूर जाणीव होती. तरीसुद्धा शास्त्रीबुवांची कोणी निंदा केलेली मात्र त्यांना कधीहि सहन झाली नाहीं. पूना हायस्कूलचे मुख्याध्यापक, त्यांचे वरिष्ठ, तत्कालीन विख्यात ग्रंथकार आणि कार्यकर्ते रा. ब. महादेव मोरेश्वर कुंटे हे एकदा चिपळूणकरांना उद्देशून कुचाळीच्या भरांत उद्गारले, "तें आहे की नाही 'अनेक विद्यामूलतत्त्वां'त घटकाभटकावयव ! " कुंटे यांनीं आपल्या वडिलांविषयीं काढलेल्या या दुरुद्गारांमुळे चिपळूणकरांच्या मनांत त्यांच्याविषयी जी अढी बसली, तिच्यांतूनच पुढें त्या दोघांतील बेबनावाचा उद्भव झाला.

कुटुंबीयांप्रमाणेच मित्रमंडळीशींहि चिपळूणकरांचें वर्तन अत्यंत सहृदयतेचें असे. महाविद्यालयांत काय किंवा सार्वजनिक कामांत काय ज्या व्यक्तींशीं त्यांचा एकदा निकट संबंध आला किंवा स्नेह जडला, त्या व्यक्तींविषयींच्या त्यांच्या आत्मीयतेंत पुढे सहसा कधीं अंतर पडलें नाही. 'काव्येतिहाससंग्रहा'तील त्यांचे एक सहकारी, लावणी–पोवाडयांचे दर्दी संशोधक, शंकर तुकाराम शाळिग्राम हे व्यवहारांत अगदी सैल होते; व 'काव्येतिहाससंग्रह,' 'चित्रशाळा' आणि 'किताबखाना' या चिपळूणकरांनी आरंभिलेल्या तिन्ही उद्योगांत शाळिग्राम यांचा हात असल्यामुळे या अव्यवस्थितपणाचा त्यांना अतिशय उपद्रव झाला. तरीहि चिपळूणकरांनी त्यांना शक्य तोंवर सांभाळून घेतलें. त्यांची ही 'मित्रनिष्ठा' इतकी गाजलेली होती की, महाजनि, किर्लोस्कर, मोडक प्रभृति आपल्या सहाध्यायी लेखकांच्या ग्रंथांवर 'निबंधमालें'त त्यांनी जीं अनुकूल परीक्षणें लिहिलीं, त्यांबद्दल तत्कालीन नियतकालिकांनी त्यांच्यावर पक्षपाताचा उघडउघड आरोप केलेला

दृष्टीस पडतो. विष्णु मोरेश्वर महाजनि, महादेव बाळकृष्ण चितळें, कोंडोपंत छत्रे, जनार्दन बाळाजी मोडक, रामचंद्र सखाराम किर्लोस्कर, बाळाजी प्रभाकर मोडक, श्रीधर गणेश जिनसीवाले, पांडुरंग व्यंकटेश चिंतामणिपेठकर प्रभृति त्यांचे विद्यार्थिदशेंतील बरेच स्नेही पुढे ग्रंथकार किंवा कार्यकर्ते म्हणून उदयाला आले. यांपैकी बहुतेक मित्रांचा उल्लेख त्यांनी आपल्या वाङ्मयांत प्रसंगोपात्त अगत्यानें केलेला आढळतो. ही स्नेहभावना मतभेदातीत आणि निरपेक्ष होती. त्यांचे सहाध्यायी रा. ब. वि. मो. महाजनि यांना त्यांचीं जहाल मतें आणि जलाल टीकापद्धति हीं दोन्ही अगदी पसंत नव्हतीं. ते त्यांना वारंवार लिहीत असत की, "असल्या कडक लेखांनी तुम्ही आपले मालेची योग्यता मात्र कमी करून घेता. दुसरा त्यापासून कांही उपयोग नाही." एकदा ते चिपळूणकरांच्या भेटीला गेले असतां, शेजारी 'जूनियस'च्या पत्रांचे दोन भाग पडलेले पाहून, त्यांना म्हणाले, "काय हो, हीं बुकें तुम्ही कशाला वाचता? अगोदर तुमचे लेखणींत काय कमी विष आहे, तें तुम्ही तिला 'जूनियस' वाचून अधिक पुट देऊं पाहता?" पण महाजनींचा हा तीव्र मतभेदहि त्यांच्या स्नेहाला कधी बाधक झाला नाही. हीच सहृदयता त्यांनी तत्कालीन लेखक आणि नियतकालिकें यांच्यासंबंधींहि सामान्यतः व्यक्त केल्याचें दिसतें. परशुरामपंत तात्या गोडबोले, दादोबा पांडुरंग, भास्कर दामोदर पाळंदे, लोकहितवादी, माधव चंद्रोबा डुकले, जनार्दन रामचंद्रजी, शंकर पांडुरंग पंडित, रघुनाथ भास्कर गोडबोले, रामचंद्र भिकाजी गुंजीकर, काशीनाथ पांडुरंग परब, नीळकंठ जनार्दन आणि विनायक जनार्दन कीर्तने, शंकर बाळकृष्ण दीक्षित, विनायक कोंडदेव ओक प्रभृति त्या काळांतल्या लेखकांविषयी आणि 'दिग्दर्शन', 'चंद्रिका', 'ज्ञानप्रसारक', 'विविधज्ञानविस्तार', 'ज्ञानसंग्रह' 'दंभहारक' इत्यादि नियतकालिकांविषयी 'निबंधमालें'त आणि पुढे 'केसरीं'त आलेले उल्लेख त्यांच्या गुणज्ञतेचे द्योतक आहेत. पंडित, ओक आणि लोकहितवादी यांच्या ग्रंथांवर जी प्रतिकूल टीका त्यांनी केली आहे, ती मुख्यतः त्यांच्या मतांच्या दृष्टीनें; त्यांचा ग्रंथकर्तृत्वाचा उद्योग आणि स्वभाषाप्रेम यांच्याविषयी, त्या टीकेच्या तडाक्यांतहि, ते आदर व्यक्त करावयाला चुकलेले नाहीत. राजाश्रय

आणि लोकाश्रय हीं दोन्ही नसलेल्या आपल्या मातृभाषेंतील हर एक नवीन उपक्रमाचें संवर्धन आपण आत्मीयतेने केलें पाहिजे, या गोष्टीची उत्कट जाणीव त्यांना होती. त्याबरोबरच, आपल्या श्रेष्ठतेच्या गुर्मींत समाजाशीं तुसडेपणाने किंवा तुच्छतेने न वागतां, आपण त्याला ममतेच्या भावनेने बरोबर घेऊन चाललें पाहिजे, ही जी एक जबाबदारीची चाड लोकजागृति आणि लोकशिक्षण यांचें कार्य करूं इच्छिणाऱ्या संपादकाला असावी लागते, तीहि त्यांच्या ठिकाणीं तीव्रतेने वसत होती. त्यामुळेच खरोखरी, ते स्वत: एकेश्वरी मताचे असतांनासुद्धा, दुसरें लग्न करण्याच्या बाबतींत जरी त्यांनी आपल्या मातोश्रीचा शब्द रागाने झिडकारला, तरी संध्या, देवपूजा, वसंतोत्सव, सप्तशतीचा पाठ इत्यादि कुटुंबांत चालत आलेलीं नित्य आणि नैमित्तिक धर्मकृत्यें मात्र ते आस्थेने करीत असत. इतकेंच नव्हे, तर आपल्या आईने केलेला नवस फेडण्यासाठी त्यांनी सप्तशृंगीची यात्राहि एकदा केली होती. सारांश, तत्त्वाच्या बाबतींत अत्यंत निग्रही आणि निष्ठुर पण इतर व्यवहाराच्या बाबतींत मात्र अगदी सोशीक आणि सैल अशी त्यांची वृत्ति होती. ‘निबंधमाले’चा स्थायी भाव देशाभिमान हा असल्यामुळे, तिच्या एकंदर प्रतिपादनांत ओजस्विता आणि युयुत्सुता यांचा अतिरेक होऊन, तिला अहंकार आणि अभिनिवेश यांचा उग्र दर्प साहजिकच येतो. पण, ही तिची स्वाभाविक उग्रता सौम्य व्हावयालाच केवळ नव्हे, तर तिला हृद्यता आणि रोचकता यावयालाहि चिपळूणकरांचे रसिकता आणि सहृदयता हे आत्मीय गुण बऱ्हंशीं कारण झालेले आहेत, यांत शंका नाही.

चिपळूणकरांचें व्यक्तित्व आणि वाङ्मय यांचें समालोचन केल्यावर एक सत्य मनाला अगदी तीव्रतेने जाणवतें. तें हें की, ते सर्वथैव एकाकी आणि आत्मलीन होते. संपूर्ण ‘निबंधमाला’ त्यांनी एकट्याने एकटाकी लिहिली, हा कांही केवळ योगायोग नव्हे; तर तें त्यांच्या प्रकृतीचें आणि परिस्थितीचें साक्षात् प्रतीक आहे. त्यांच्या आयुष्यांत अनेक व्यक्ति आल्या आणि अनेकांचे सहकार्य त्यांनी आमरण घेतलें. पण, यांपैकी एकाहि व्यक्तीचें वर्णन त्यांची सहधर्मी, समानशील किंवा सहानुभवी म्हणून करितां येणार नाही. संसारांतील सर्व कोमल आणि मधुर भावनांचें केवळ

निधानच असा जो स्त्रीसहवास, त्याला ते दुर्दैवानें आचवलेले होते. कुटुंबांतील लहानमोठीं माणसें त्यांच्या मानानें अगदी उणीं, त्यांच्या आकांक्षा आणि उद्योग यांचें मर्म आकलन करूं न शकणारी व म्हणून त्यांसंबंधीं उदासीन किंवा अननुकूल अशीं होतीं. त्यांचें जें काय थोडें बहुत रहस्य होतें, तें फक्त त्यांचे धाकटे बंधु लक्ष्मणराव यांच्याशीं. चिपळूण-करांच्या विरागी, व्यवसायबहुल जीवनांत केव्हा केव्हा जो 'रंग उडत' असे, त्याचें वर्णन लक्ष्मणरावांनी लिहिलेल्या त्यांच्या चरित्रांत असें केलेलें आहे की,—

"त्यांचा स्वभावच संकुचित असल्यामुळें विशेष परिचय असल्या-शिवाय ते कधी फारसे बहारींत येत नसत. चित्रशाळेचे माजी मॅनेजर रा. बाळकृष्णपंत हे सांगत असत की, त्यांजबरोबरसुद्धा विष्णुशास्त्री कामाशिवाय कधी चार गप्पाटप्पा मारीत बसले आहेत, असें कधीहि होत नसे. त्याचप्रमाणे न्यू इंग्लिश स्कूलचे इतर चालकांपैकीहि कोणाबरोबर ते विशेष रहस्यानें कधी बोलत बसले असतील असे प्रसंग तरी बहुधा विरळाच! दुसरे काय बोलत असतील त्याकडे त्यांचें लक्ष असे; व मधून एकादे वेळीं ते एकादा खुबीदार शब्द बोलत असतील, परंतु मोठेसें त्यांचें भाषण कधीहि म्हणून व्हावयाचें नाही. फार दिवसांचा ज्यांचा परिचय असेल किंवा त्यांचेविषयीं ज्यांचा पूर्ण पूज्यभाव असून त्यांचें भाषण जे लक्ष लावून ऐकतील आणि स्वभावतः रंगेल असून त्यांचे भाषणास आपल्या भाषणानें जे मधून मधून विसावा देत जातील, त्यांसच त्यांचे भाषणाची किंमत होऊन त्यापासून लाभ होत असे. त्याचा रंग म्हटला म्हणजे त्यांचेच कुटुंबांतील त्यांचे बंधु लक्ष्मणराव, चुलतबंधु विनायकराव, दिनकरपंत, शाळीग्राम वगैरे मंडळी जमली असतां उडायाचा! तथापि, निरनिराळें ग्रंथांवरील टीका, त्यांतील उत्कृष्ट स्थळें वगैरे ज्यांस विशेष ज्ञानाची जरूर आहे, त्यांसंबंधीं विवेचन चाललें असतांना त्यांना प्रस्तुत चरित्रलेखकाशिवाय दुसरा अधिक भाविक श्रोता मिळत नसे हें उघडच आहे. पुष्कळदा संध्याकाळीं इतर सर्व उद्योग आटोपून गेला आहे व

इतर मंडळी दुसरीकडे कोठे गेली आहे व अंधार थोडा थोडा पडत चालला आहे व पश्चिमेकडील आकाशांत चंद्राची कोर ताऱ्यांचे समुदायांत रमणीय अशी दिसत आहे अशा वेळीं विष्णुशास्त्री बहारींत येऊन संस्कृत काव्यांतील खुबीदार स्थळें, स्फुट सुभाषित पद्यें, मोरोपंतांच्या आर्या त्याचप्रमाणे शेली, बायरन वगैरेमधील उत्कृष्ट उतारे हीं मधूनमधून आणून जें उत्कृष्ट विवेचन करीत त्या प्रसंगापेक्षा अधिक आनंदाचे व सुखाचे असे प्रस्तुत चरित्रलेखकाचे आयुष्यांत दुसरे प्रसंग क्वचित्च आले असतील !"

या प्रांजळ वर्णनांतून एकच निष्कर्ष निघतो. तो हा की, चिपळूणकरांनी जीवनांतील फक्त एकाच आनंदाचा आस्वाद घेतला आणि तो आनंद म्हणजे वाङ्मयानंद होय. या एकाकितेचा परिणाम त्यांच्या अस्मितेवर काय झाला असेल ? या एकाकितेच्या जोडीला त्यांनी हातीं घेतलेल्या निरनिराळ्या उद्योगांत त्यांना हातोहात आलेलें यश व त्यामुळे नवीन पिढींत लाभलेली लोकप्रियता हींहि दोन्ही लक्षांत घेतली पाहिजेत. तीं एकाकिता आणि हें यश यामुळे त्यांचा आत्मविश्वास आणि अहंकार यांच्यावर काय परिणाम झाला असेल? "एका केवलमेव साधनविधौ. . ." अशी जर चाणक्याप्रमाणे त्यांचीहि आपल्या बुद्धिमत्तेविषयी भावना झाली असली, तर त्यांत काय आश्चर्य ? 'निबंधमाले'चा बहुधा तिसावा अंक संपवून उठतांना, "मी मराठी भाषेचा शिवाजी आहे,–ज्याच्या बरोबरीचा पूर्वी कुणी झालेला नाही, पुढे होणार नाही ! " — ( I am the Shiwaji of the Marathi language who had not his equal either to precede or succeed him ! ) असा जो दर्पोद्गार त्यांनी इंग्रजींत आपल्या बंधूंजवळ काढला, तोसुद्धां या परिस्थितीच्या अनुषंगानेच ध्यानांत घेणें अवश्य आहे. या एकाकितेमुळे हातीं घेतलेल्या विषयांच्या आणि व्यवसायांच्या पलिकडे अन्य कशांतहि त्यांना गम्य किंवा रम्य उरलें नाही; व त्यांच्या ठिकाणीं ही जी विलक्षण आत्मकेंद्रित एकाग्रता निर्माण झाली, तिच्यामुळे त्यांच्या विचारांचें क्षितिजहि पुढें फारसें विकसित होऊं शकलें नाही. 'निबंधमालें'त

उत्तरोत्तर जी पुनरुक्ति आणि जो पाल्हाळ, जें एक प्रकारचें आव्हान-प्रद अनौचित्य आणि औद्धत्य अधिकाधिक येत गेलें, त्याचें मुख्य कारण त्यांची एकाकिता आणि एकाग्रता हेंच होय. 'ज्ञानप्रकाश'शिवाय दुसरें वर्तमानपत्र वाचण्याची किंवा जगांतील उलाढालींचें मर्म समजावून घेण्याची प्रवृत्ति जी त्यांच्या ठिकाणीं उरली नाही, तीहि याच कारणामुळे. या एकाकितेने त्यांना अहंनिष्ठ केलें, त्यांची बौद्धिक प्रगति अंशत: कुंठित केली; व त्यांच्या विचारांचा ओघ अखंड वाहता आणि वाढता न ठेवतां तो अवरुद्ध करून त्यांत आवर्त आणि विवर्त मात्र उत्पन्न केले. त्यामुळे विद्यार्थिदशेंतून बाहेर पडल्यावर त्यांच्या व्यक्तित्वाचा विकास झाला नाहीं; व वर्तमानाचें इंगित जाणून घेऊन भविष्याचे वेध घेण्याऐवजी केवळ वाङ्मयानंदांत रमण्यांत त्यांच्या बुद्धीला धन्यता वाटूं लागली. 'निबंधमालें'तील वाङ्मयांत जर सर्वांत मोठी न्यूनता कोणती असेल, तर ती ही की, इतिहासाच्या सम्यगवलोकनाने आपल्या राष्ट्रीय चारित्र्यांतील दोषांचें निदान करून त्यांचें निर्मूलन करण्याचा आणि जुन्या संस्कृतींतील ग्राह्य तेवढेच अंश उचलून आधुनिक ज्ञान–विज्ञानाच्या समन्वयाने बदलत्या युगाला अनुरूप अशी अभिनव राष्ट्रीय संस्कृति निर्माण करण्याचा कोणताच मार्ग त्यांत सुचविलेला नाही. अर्थात् चिपळूणकर हे द्रष्टे नव्हते; फक्त राष्ट्रवादाचे ऊर्जस्वल प्रतिपादक होते. पण, तो राष्ट्रवाद धर्म, जाति किंवा प्रांत यांच्या दुरभिमानाने संकुचित किंवा अवलिप्त झालेला नव्हता; तर त्याचें स्वरूप शुद्ध सांस्कृतिक आणि भारतीय होतें; स्वातंत्र्य आणि लोकप्रभुत्व या परस्परपूरक ध्येयांनी विशालता पावलेलें होतें. चिपळूणकरांच्या व्यक्तित्वाला, त्यांच्या अस्मितेला आणि प्रतिभेला विद्यार्थिदशेंतच ज्या या मर्यादा, त्यांच्या विशिष्ट परि-स्थितीमुळे पडत गेल्या, त्यामुळे त्यांच्या वाङ्मयाचें स्वरूप आणि कार्य निश्चित होऊन गेलें.

# १३

चिपळूणकरांना विद्यार्थिदशेंत असतांनाच 'स्वभाषाभिवृद्धीच्या व्रता'ची दीक्षा वडिलांकडून मिळाली. १८६५ सालीं कृष्णशास्त्री हे ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल झाल्यापासून 'शालापत्रका'च्या संपादनाचें सर्वच काम त्यांच्याकडे आलें. त्यांतून त्यांनी दादोबांच्या व्याकरणावरील समालोचक लेखमाला आणि डॉ. जॉन्सन याच्या 'रासेलस' या कादंबरीचा अनुवाद हीं दोन सदरें सुरू केलीं. 'रासेलस'च्या अनुवादाचे अठरा वीस भाग झाल्यावर १८६८ सालीं त्यांनी आपल्या चिरंजीवांना, हें अनुवादाचें काम कितपत साधतें हें पाहण्यासाठी, पुढील दोन भागांचें भाषांतर करून आणावयाला सांगितलें; व तें पसंत पडल्यामुळे अनुवाद पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकली. अशा रीतीने बी. ए. च्या वर्गांत असतांनाच चिपळूणकरांचा "'शालापत्रका'च्या द्वारें प्रथमत: लेखनसरस्वतीच्या मुलखांत प्रवेश झाला." आपल्याला पितृपरंपरेने प्राप्त झालेली लेखनकला प्रत्यहीं नियमाने कामीं लावून तिच्यांत प्रावीण्य मिळविण्याची आणि तिचा प्रभाव अजमावून पहाण्याचीहि ही जी संधि त्यांना अनायासें लाभली, तिचा उत्कृष्ट उपयोग त्यांनी, 'निबंधमाला' निघेपर्यंत, पुढें सहा वर्षें साक्षेपानें करून घेतला. त्यांनी स्वत:च 'निबंधमाले'च्या सहाव्या वर्षीच्या समालोचनांत यासंबंधीं असें म्हटलें आहे की, "'शालापत्रक' शेवटलीं चार वर्षें आम्ही चालविलें. प्रस्तुत स्वतंत्र पुस्तक काढण्याची कल्पना ही वरील सरकारी पुस्तकावरूनच आमचे मनांत प्रथमत: आली." त्यांचें वय जरी या वेळीं एकोणीस वर्षांचें होतें, तरी वडिलांनी अंगावर टाकलेली ही जबाबदारी पार पाडावयाला अवश्य असलेली बौद्धिक तयारी त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केलेली होती. बी. ए. च्या परीक्षेसाठी त्यांनी संस्कृत, पोलिटिकल एकॉनमी, लॉजिक, मॉरल फिलॉसफी आणि इतिहास हे विषय घेतलेले होते. या विषयांच्या अभ्यासाच्या जोडीला त्यांचें जें आवडत्या विषयांचें अवांतर वाचन अव्याहत चालू होतें, तें निराळेंच. शिवाय, संस्कृत, इंग्रजी आणि मराठी

ऱ्या तिन्ही भाषांचें वैशिष्टय आत्मसात् करण्यासाठी व त्याबरोबरच त्या भाषा लिहिण्याचा सराव होण्यासाठीहि आपल्या अवलोकनांत येणारे या तिन्ही भाषांतील सुंदर भाग स्मृतिगत करणें, सारांशाने लिहून काढणें, त्यांचा अनुवाद करणें इत्यादि त्यांचा उद्योगहि सारखा चालू होता. महाविद्यालयांतील वसतिगृहांत रहात असतांना त्यांचा असा परिपाठ होता की, दर शनिवारी घरीं आल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी मराठी क्रमिक पुस्तकांतील पांच ओळींचें भाषांतर संस्कृतांत करून त्या दिवसाची तारीख त्याखाली लिहून ठेवावयाची. हा क्रम सतत तीन वर्षं चालला होता. तेवढ्या अवधींत तीन क्रमिक पुस्तकांचें संस्कृत भाषांतर पूर्ण होऊन चौथ्या पुस्तकाचीहि कांही पानें होऊन गेलेलीं होतीं. संस्कृत भाषेचा हा जो लेखनाभ्यास त्यांनी अनुवादाच्या मार्गानें केला, त्यामुळे उचित, अभिजात, सुश्लिष्ट संस्कृत शब्दांची गुंफण आपल्या मराठी रचनेंत करण्याची कला त्यांना अवगत होऊन, त्यांच्या शैलीला बव्हर्थता आली.

संस्कृत भाषेप्रमाणे इंग्रजी भाषा देखील आपल्याला सफाईने लिहिता यावी, म्हणूनहि चिपळूणकरांनी फार कष्ट घेतले. त्यांचे पूना हायस्कूलमधील वरिष्ठ रा. ब. कुंटे यांनी एकदां त्यांच्या पाठीवर हात ठेवून त्यांची हंसत हंसत अशी टवाळी केली होती की, "पुण्यांत असे कांही इसम आहेत की, जे मोठे लोक समजले जातात, पण ज्यांना इंग्रजीची दोन वाक्येंहि धड बोलतां येत नाहीत. शास्त्रीबुवांना चांगले माहित आहेत हे लोक!" ( There are some people here who pass for great men and yet who cannot speak two sentences correctly in English. Shastriboa well knows that ! ) कुंटे यांनी केलेल्या या टवाळींत तथ्य होतें, ही गोष्ट खरी. पण, चिपळूणकरांना जसें मराठी बोलतां येत नसे, तसेंच इंग्रजीहि. त्यांच्या मुखदुर्बळपणाचाच खरोखरी तो एक प्रकार होता. परंतु, कुंटे हे पूना हायस्कूलचे हेडमास्तर होण्यापूर्वी त्यांच्या 'मन' या काव्यावर 'ए पोएट टर्न्ड् ए फिलॉसफर'च्या शीर्षकाखालीं चिपळूणकरांनी 'ज्ञानप्रकाशां'तून केलेली मर्मभेदक इंग्रजी टीका आणि 'निबंधमाले'च्या तिसाव्या अंकावर

'एलिफास'ने 'बॉंबे गॅझेट'मधून केलेल्या खोडसाळ टीकेला त्यांनी 'ज्ञानप्रकाशा'तून दिलेलें झणझणीत इंग्रजी उत्तर या त्यांच्या दोन लेखांवरून ते मराठीप्रमाणेच इंग्रजीहि किती झोकदार लिहीत असत, याची यथार्थ कल्पना येते. त्यांचा खाजगी पत्रव्यवहार आणि त्याच स्वरूपाचें इतर लेखन बव्हंशीं इंग्रजींतूनच चालत असे. किंबहुना, विद्यार्थिदशेंत घेतलेलें 'स्वभाषावृद्धीचें व्रत' जरी त्यांनी आमरण निष्ठेने आचरिलें, तरी आपल्या नियतकालिकांव्यतिरिक्त त्यांना एरवीं मराठी लिहिण्याचा कंटाळा वाटत असे, हें त्यांच्या एका पत्रांतील उल्लेखावरून उघड दिसतें. 'चित्रशाळे'चे व्यवस्थापक बाळकृष्णपंत जोशी यांना रत्नागिरीहून पाठविलेल्या पत्रांत त्यांनी असें लिहिल्याचें दृष्टीस पडते की, "तुमच्या घराचा नंबर लिहून कळवावा म्हणजे परस्पर पत्र पोचण्यास हरकत पडणार नाही. अगर ऑफिसचा पत्ता लिहून कळवावा म्हणजे त्याहिपेक्षा बरें पडेल. साधारण रीतीचें इंग्रजी पत्र तुम्हास समजेल की नाही हें कळवावें. म्हणजे मराठी लिहिण्याची पंचाईत करावी लागणार नाही." आपले व्यावसायिक व्यवहार कुटुंबांतील मंडळींना कळूं नयेत हा जसा त्यांचा एक उद्देश ही 'मराठी लिहिण्याची पंचाईत' न करण्यांत असावा, तशीच आपलें मनोगत इंग्रजींतून निःसंकोच व्यक्त करणें सोपें वाटतें अशी जी एक समजूत आजहि कांही मराठी लेखकांची आहे, तीहि या 'पंचाईत' न करण्याला कारण असावी! पण, चिपळूणकरांच्या व्यासंगाचा आणि मनाचाहि कल जर बारकाईने तपासून पाहिला, तर एक चमत्कारिक सत्य मनाला जाणवल्याविना राहत नाही. तें सत्य हें की, "गीर्वाणवाणीषु विशिष्टबुद्धिस्तथापि भाषांतरलोलुपोऽहं" असे उद्गार जरी त्यांनी स्वतःविषयीं काढलेले असले, तरी त्यांच्या हृदयांत मात्र इंग्रजीला पहिलें, संस्कृतला दुसरें आणि मराठीला तिसरें स्थान होतें! तथापि, त्यामुळेच त्यांना, संस्कृत आणि इंग्रजी या दोन भाषांतील साहित्याचें गाढ अवगाहन करून, त्यांतील सौष्ठव आणि ओज यांच्या संमीलनाने मराठीची नवीन सामर्थ्यशाली अभिजात शैली निर्माण करितां आली, हें निर्विवाद आहे.

'शालापत्रकां'तील चिपळूणकरांचें लेखन जितकें व्यासंगपूर्ण तितकेंच विविधहि आहे. स्वतंत्र आणि अनुवादित, गंभीर आणि ललित असे सर्वच प्रकार त्यांत दृष्टीस पडतात. 'समुद्र,' 'चंद्र आणि तारे,' 'मनुष्याचें आटोकाट ज्ञान,' 'प्रवास,' 'शिक्षकाचें काम' इत्यादि त्यांचे लेख विचारांच्या आणि शैलीच्या दृष्टीने सुंदर आहेत. त्यांच्यापूर्वी बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी आणि स्वतः कृष्णशास्त्री चिपळूणकर असे तीन निबंधकार महाराष्ट्रांत होऊन गेलेले होते; व त्यांनी त्या त्या काळांतल्या वाचकवर्गावर आपली छापहि पाडलेली होती. पण, जांभेकरांच्या 'दर्पणां'तील इंग्रजी लेखांची भाषा जरी प्रौढ असली, तरी त्या लेखांचे प्रतिबिंबच असे त्यांतील अनुवादित मराठी लेख मात्र भाषेच्या दृष्टीनें अगदी भिकार होते. लोकहितवादींनी मुंबईच्या 'प्रभाकर' साप्ताहिकांतून १८४८ ते १८५० या दोन वर्षांच्या काळांत 'शिमग्यांतील दुराचारा'पासून तों 'हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या विचारा'पर्यंत अनेक विषयांवर १०८ छोटे छोटे निबंध लिहिले. इंग्रजींत गोल्डस्मिथ, जूनियस प्रभृति लेखकांनी पत्ररूपानें लोकांना बोधप्रद किंवा टीकाप्रद असे लहान लहान निबंध लिहिण्याची जी पद्धत सुरू केलेली होती, तिच्या धर्तीवर कदाचित् लोकहितवादींनी आपलीं हीं 'शतपत्रे' लिहिलेलीं असावींत. या 'शतपत्रां'त लोकांच्या सर्वांगीण उन्नतीविषयी लोकहितवादींची जी विलक्षण कळकळ आणि तळमळ प्रकट झालेली आहे, ती खरोखरीच प्रशंसनीय होय. पण, जांभेकरांच्या निबंधांत, विचारांच्या म्हणा किंवा विवेचनाच्या म्हणा, दृष्टीने जो तोल आणि जें तारतम्य आहे, तें या 'शतपत्रां'त अजिबात आढळत नाही. त्यांची भाषाहि केव्हा केव्हा अगदी अनुचित आणि असभ्य अशी असल्याचें अनुभवाला येतें. त्यामुळे, आज लोकहिवादींचीं हीं 'शतपत्रें' वाचतांना, त्यांच्यासारख्या बहुश्रुत लेखकाने इतके बेताल लेख कसे लिहिले, याबद्दल मनाला आचंबा वाटल्याविना राहत नाही. लोकहितवादींच्या नंतरचे निबंधकार कृष्णशास्त्री चिपळूणकर हे होत. त्यांनी स्वतंत्र आणि अनुवादित असे जे अनेक बोधप्रद आणि मनोरंजक निबंध निरनिराळ्या विषयांवर लिहिले, त्यांतील विचारांची सात्त्विकता आणि शैलीचें सौष्ठव लक्षांत घेतलें असतां, त्यांनाच खरोखरी आघाडीच्या या पहिल्या तीन निबंधकारांत

अग्रपूजेचा मान द्यावा लागेल. जांभेकरांप्रमाणे त्यांचीहि भूमिका बुद्धिवादी आणि बुद्धिप्रधान होती; व त्यांच्या रसिकतेमुळे त्या भूमिकेला एक प्रकारचें सौंदर्यहि आलें असल्याचें दिसून येतें. शास्त्रीबुवांनी व्यासंग आणि चिंतन यांच्या मनोज्ञ मिश्रणाने नटविलेले निबंध लिहिण्याची जी ही नवीन पद्धति मराठींत सुरू केली, तिचा अत्यंत ओजस्वी आणि रमणीय असा विकास पुढें चिपळूणकरांच्या 'शालापत्रकां'तील निबंधांतून झाला.

'शालापत्रकां'तील चिपळूणकरांचे उत्कृष्ट निबंध सर्वच काव्य-विषयक आहेत. ते कवितेचे किंबहुना एकंदर ललित वाङ्मयाचे अत्यंत भोक्ते होते. वनसृष्टीला जशी लता, जीवसृष्टीला जशी वनिता तशी शब्दसृष्टीला कविता होय. वाङ्मयाची खरी लज्जत ज्याला कळते, तो कवितेचा नादी क्वचित्‌च नसतो.

**म्लानस्य जीवकुसुमस्य विकासनानि ।**
**संतर्पणानि सकलेंद्रियमोहनानि ॥**

हें रामचंद्राने केलेलें आपल्या दयितेच्या सुवचनांचें वर्णन कवितेलाहि अक्षरश: लागू पडतें. किंबहुना, कविता आणि दयिता यांच्यांतील सर्वच प्रकारचें सुखद साम्य लक्षांत घेऊनच बहुधा, जगन्नाथपंडिताने "सा मामकीन कवितेव मनोभिरामा" असे उद्‌गार 'करुणविलासां'त काढलेले असून, "तुझ्यास्तव तुझ्यापरी मृदुलदेहिनी गेहिनी । अनेक समयीं दिली ढकलुनी अये मोहिनी" असा टोमणा कवि चंद्रशेखर यांनीहि 'कवितारतीं'त दिलेला आढळतो. परब्रह्माचा साक्षात्कार जसा भक्तीने होतो, तसा शब्दब्रह्माचा साक्षात्कार कवितेने होतो. कविता ही वाङ्मयांत अनेक रूपांनी अवतरते. तिचें स्वरूप नेहमीच छंदोमय असतें, असें नाही. पण, वसंतसेना ही जशी आपल्या अंगावरील फुलांच्या सुवासाने आणि भूषणांच्या सिंजिताने अंधारांतहि विटाला ओळखतां आली, तशी कविता ही आपल्या भावनांच्या कोमलतेने आणि कल्पनांच्या तरलतेने गद्यांतहि रसिकाला तेव्हाच ओळखूं येते. विविध रूपांनी शब्दविश्वांत विहार करणाऱ्या या कामरूपिणी अप्सरेला रसिकांनी आनंददायक वाङ्मयाची अधिदेवता मानलेली असून,

वाङ्मयाच्या ज्या ज्या प्रदेशांत म्हणून तिचा संचार होतो, त्या त्या सर्व प्रदेशाला त्यांनी 'ललित वाङ्मय' ही सामान्य संज्ञा दिलेली आहे. ललित वाङ्मयाचा भोक्ता हाच प्राय: त्याचा समीक्षकहि असतो. कारण, त्याच्या सौंदर्यनिष्ठ चिकित्सक मनाला त्या वाङ्मयांतील अगदी किरकोळ दोषहि कुसळासारखे खुपत असल्यामुळे, त्याची निर्मिति शक्य तितकी निर्दोष आणि रसपूर्ण व्हावी, या उद्देशाने त्याचें दोषदर्शन आणि रसविवरण करणें हें तो आपलें कर्तव्य समजतो. चिपळूणकर हे जसे रसज्ञ तसेच मार्मिक समीक्षकहि होते. त्यांच्यापूर्वी दादोबा पांडुरंग, परशुरामपंत तात्या गोडबोले आणि कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी प्रसंगोपात्त टीकालेखन केलेलें होतें; व दादोबांनी 'यशोदा-पांडुरंगी'ला जी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिलेली आहे, तीच खरोखरी मराठींतील पहिला साहित्यविषयक टीकालेख म्हणावा लागेल. तथापि, ॲडिसन, जॉन्सन, हॅज्लिट, मेकॉले प्रभृति इंग्रजी समीक्षकांच्या पद्धतिनुसार मराठींत स्वतंत्र टीकात्मक प्रबंध लिहिण्याचा प्रघात मात्र प्रथम चिपळूणकरांनीच पाडला. १८७२ सालच्या मेपासून 'शालापत्रकां'त कालिदास, भवभूति, बाण, सुबन्धु आणि दण्डी या 'संस्कृत कविपंचका'वर त्यांनी लिहिलेले विस्तृत विवेचक निबंध हाच मराठींतील नव्या धर्तीचा पहिला टीकाग्रंथ होय.

साहित्याचें समालोचन करण्याची ही पाश्चात्य टीकापद्धति महाराष्ट्राला त्या वेळीं अगदी अपरिचित होती. दादोबांची 'यशोदा–पांडुरंगी'ची प्रस्तावना आणि रा. ब. नीळकंठ जनार्दन कीर्तने यांची 'ग्रांट डफकृत मराठ्यांचे बखरीवर टीका' हे दोनच काय ते त्या पद्धतींत मोडण्यासारखे टीकेचे नमुने तोंपर्यंत मराठी वाचकांपुढे आलेले होते. कारण, पाश्चात्य वाङ्मयांत 'क्रिटिसिझम्' या नांवाने संबोधिलें जाणारें ज्या प्रकारचें समीक्षेचें शास्त्र गेलीं पांच सहा शतकें सतत विकसित होत आलेलें आहे, तशा प्रकारचें शास्त्र संस्कृत वाङ्मयांत नसल्यामुळे, मराठींतहि त्या शास्त्राचा उदय, पाश्चात्य वाङ्मयाचा महाराष्ट्राशीं निकट संबंध येईपर्यंत, होऊं शकला नाही. संस्कृत वाङ्मयांत साहित्याचीं मूल तत्त्वें, घटक आणि अंगोपांगें यांची जितकी सूक्ष्म आणि सविस्तर मीमांसा करण्यांत आलेली आहे, तितकी

जगांतील बहुधा दुसऱ्या कोणत्याहि वाङ्मयांत आढळणार नाही. संस्कृतांतील रस आणि ध्वनि हे दोन सिद्धान्त व रीतीची कविस्वभावनिबद्धता आणि श्रेष्ठ साहित्याच्या निर्माणासाठी आध्यात्मिक तयारी असण्याची आवश्यकता हीं दोन तत्त्वें या संस्कृत साहित्यमीमांसेच्या जागतिक साहित्यमीमांसेला सर्वांत थोर देणग्या ठरतील. पण समीक्षाशास्त्राचा स्वतंत्र असा विकास मात्र संस्कृतांत झाला नाही. व्याख्या, व्याख्यान, भाष्य, वृत्ति, वार्तिक, टीका, टिप्पणी, पंजिका इत्यादि ग्रंथ–विवरणाचे अनेक प्रकार संस्कृत वाङ्मयांत आहेत, ही गोष्ट खरी. पण, वाक्यांतील शब्दांची संगति दर्शवून अन्वयमुखाने अर्थबोध आणि दोषदर्शन करणें या पलिकडे या प्रकारांची मजल कधी जात नसे. कारण कवीचा अभिप्राय स्वमतानुसार विशद करणें एवढाच फक्त उद्देश या सगळ्या टीकाप्रकारांचा होता. स्वतः चिपळूणकरांनीच ‘ संस्कृत कविपंचका ’च्या स्वतंत्र आवृत्तीला १८७६ सालीं जोडलेल्या उपोद्घातांत असे उद्गार काढलेले होते की, “ मल्लिनाथासारख्यांनी मोठमोठ्या संस्कृत काव्यांवर सर्वमान्य टीका केलेल्या आहेत; पण त्यांत पाहिलें तर सांपडतें काय ? नुसता शब्दार्थ, व्याकरणाची कांही अडचण असली तर ती, आणि फार झालें तर अमुक स्थलीं अमुक अलंकार झाला आहे, इतकेंच. या तीन चार ठरीव गोष्टींखेरीज त्यांत वाचकांस जास्त कांही मिळायाचें नाही. इंग्रेजी टीकाकार मूळ काव्यांतलीं रसविशेषात्मक स्थलें, वर्णनाच्या खुब्या वगैरे प्रकार जसे सांगतात, तसें वरील टीकांतून कांही आढळत नाही. टीकाकारांच्या मतें सारे कवि सारखेच, साऱ्यांचीं काव्यें उत्कृष्टच व सारींच पद्यें बहारीचीं, असें असल्यासारखें दिसतें.” उलट, ड्रायडन, ॲडिसन, जॉन्सन, लेसिंग, हॅज्लिट, सेंटव्यूव्ह प्रभृति पाश्चात्य टीकाकारांनी सतराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंत समीक्षेचें शास्त्र इतक्या परिणतावस्थेला नेऊन पोचविलें की, समीक्षा ही सृजनशाली कलात्मक वाङ्मयाची एक मुळी स्वतंत्रच शाखा होऊन बसली. ‘ उक्त, ’ ‘ अनुक्त ’ आणि ‘दुरुक्त’ यांच्या विस्तृत विवेचनाबरोबरच ‘अमूल’ आणि ‘अनपेक्षित’ अशा परिस्थितीचेंच काय, पण वाचकवर्गाला प्रायः अज्ञात आणि केव्हा केव्हा अनाकलनीयहि असणारें असें लेखकाचें व्यक्तित्व व त्याच्या साहित्याचे इतरहि अनेक प्रत्यक्षाप्रत्यक्ष घटक यांचें सर्वांगीण, सुसंगत आणि

सूक्ष्म पर्यालोचन करणें, हें समीक्षेचें मुख्य कार्य मानण्यांत आलें; व तदनुसार अॅडिसनपासून टेनपर्यंत अनेक धुरंधर पाश्चात्य टीकाकारांनी त्या त्या काळांतील ग्रंथकारांच्या साहित्याची विश्लेषणपूर्वक विस्तृत आलोचना केली. पूर्वी केवळ अर्थबोध आणि दोषदर्शन हे टीकेचे हेतु असत; आज ग्रंथाचें रहस्य आणि ग्रंथकाराचें व्यक्तित्व यांचें आकलन हा तिचा हेतु झालेला आहे. संसारी मनुष्याच्या मनाप्रमाणे पूर्वीची टीका बहिर्मुख असे; आजची टीका तत्त्वजिज्ञासु मनुष्याच्या मनाप्रमाणे अंतर्मुख झालेली आहे. ही पाश्चात्य टीकापद्धति मराठींत आणण्याचा पद्धतशीर प्रयत्न, आपल्या संस्कृत कवींवरील निबंधांच्या रूपाने, प्रथम चिपळूणकरांनीच केला.

पण, 'शालापत्रकां'तील चिपळूणकरांचे हे काव्यविषयक निबंध व्यासंगपूर्ण आणि चटकदार असले, तरी विचारांच्या दृष्टीनें ते सखोल आणि विवेचनाच्या दृष्टीने सूक्ष्म मात्र वाटत नाहीत. संस्कृत कवींवरील निबंधांना आरंभ करण्यापूर्वी, त्यांनी १८७२ सालच्या फेब्रुवारीपासून मे पर्यंत प्रथम 'कविता' या विषयावर एक आणि नंतर कवितेच्या तीन प्रकारांचीं उदाहरणें देण्यासाठी म्हणून इंग्रजी कवितेवर दोन, मिळून एकंदर तीन प्रास्ताविक लेख लिहिले. त्यांतील पहिल्याच 'कविता' या लेखांत जुन्या मराठी कवितेविषयी जो अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे, तो त्यांच्या विद्यार्थिदशेंतील प्रगत, मार्मिक दृष्टिकोनाचा निदर्शक वाटतो. जुन्या मराठी कवितेविषयीं त्यांनी असे निस्संदिग्ध विधान केलेलें होतें की, "पेशव्यांच्या कारकीर्दींत होऊन गेलेल्या विख्यात पुरुषांवर केलेल्या ज्या लावण्या किंवा पवाडे आपण ऐकतों तेच वास्तविक पाहतां मराठी भाषेची आद्य कविता होत. कारण वामन पंडित, मोरोपंत वगैरे कवींनी जरी मराठी भाषेंत आपली कविता लिहिली, तरी ती संस्कृत भाषेच्याच केवळ धाटणीवर असल्यामुळे तीस मराठी कविता म्हणण्यापेक्षा संस्कृत कवितेचें रूपांतर म्हणणें हें वाजवी आहे." या प्रास्ताविक लेखांत व पुढे 'माले'तील 'विद्वत्त्व आणि कवित्व' या निबंधांतहि कवितेच्या उत्पत्ति–स्थितिविषयी जी चर्चा त्यांनी केली आहे, तिच्यावर इंग्रजी

ग्रंथकार मेकॉले याच्या मतांची छाप स्पष्ट पडलेली दिसते. किंबहुना, जॉन्सनचें व्यक्तित्व आणि चारित्र्य यांचा परिणाम जसा त्यांच्या जीवनावर झालेला होता, तसा मेकॉलेची भाषाशैली आणि प्रतिपादनपद्धति यांचा परिणाम त्यांच्या वाङ्मयावर झालेला होता, असें म्हणावयाला शंका वाटत नाही. नाद, मोहनी आणि ओज यांच्या मिलाफाने बनलेली त्याची चित्रदर्शी, डौलदार भाषाशैलीच केवळ नव्हे, तर विवेचनाच्या ओघांत बुद्धया विषयांतर करून आपल्या आवडत्या विषयांवरील एकांगी मतांचें उपाख्यान वारंवार लावण्याची त्याची जी वक्तृत्वपूर्ण पल्लेदार प्रतिपादनपद्धति आहे, ती सुद्धा जशीच्या तशीच उचलून चिपळूणकरांनी 'मालें'त इतक्या पराकोटीला नेली की, त्यामुळे त्यांच्या निबंधांचा घाट आणि तोल हे दोन्ही पुढे पुढे अगदी बिघडून गेल्याचें आढळतें. वस्तुतः, मेकॉलेवर जितकी कडक टीका त्यांनी 'मालें'त प्रसंगोपात्त केली आहे, तितकी बहुधा कोणत्याहि पाश्चात्य लेखकावर केलेली नसेल. मेकॉलेप्रमाणे तेहि स्वतः कडवे राष्ट्रवादी असल्यामुळे, भारतीय संस्कृति आणि समाज यांच्यासंबंधींच्या स्वतःच्या दुर्ग्रहांचें आणि दुर्मतांचें जें निरर्गल प्रदर्शन मेकॉलेने आपल्या सर्वच वाङ्मयांतून जागोजाग केलेलें आहे, त्याचा प्रतिवाद तितक्याच प्रखर टीकेने त्यांनी 'मालें'त केलेला दृष्टीस पडतो. पण त्याचीं वाङ्मयविषयक मतें आणि शैली यांच्या बाबतींत मात्र ती सावधता चिपळूणकर ठेवूं शकले नाहीत. उलट, अविवेक आणि अतिरेक, अपलाप आणि उपहास हे जे त्याच्या आवेशपूर्ण, ओघवती शैलीतील आत्मीय दोष, ते 'मालें'तील कांहीं निबंधांत उतरलेले दिसतात. "सुधारणेच्या प्रगतिबरोबर कवितेचा अपकर्ष होतो" आणि "अर्धवट सुधारलेल्या लोकांचें वाङ्मय कवितेच्या रूपाने प्रकट होतें" हीं दोन मूलतः भ्रामक प्रमेयें मेंकॉलेने आपल्या मिल्टन-वरील निबंधांत प्रतिपादिलेली होतीं. तीं गृहीत धरून त्यांच्या अनुषंगाने चिपळूणकरांनी काव्यविषयक उपपत्तींचें विवेचन केलेलें आहे. स्वतः मेकॉलेनेच आपल्या वाङ्मयविषक निबंधांसंबंधीं असे उद्गार काढलेले आहेत की, "प्रतिभाशाली लेखकांच्या कृतींचें विश्लेषण करण्यांत मला यश मिळालें नाही. ऐतिहासिक आणि नैतिक प्रश्नांवर मी बरेंच लिहिलें आहे. त्याबद्दल मला पुन्हा विचार केल्यानंतरहि लाज वाटत नाही; व

त्याच्या अनुरोधाने मी स्वतःचें मूल्यमापन करून घ्यावयालाहि राजी आहे. पण, कविता किंवा ललित कला यांच्या समीक्षेचें मात्र असें एकहि पान मी लिहिलेलें नाही की, जें मला आज शक्य होतें, तर मी जाळून टाकले नसतें ! " पण, ज्या या आपल्या प्रमेयांच्या फोलपणाबद्दल पुढे खुद्द मेकॉलेलाच इतकी खंत वाटूं लागली होती, त्या प्रमेयांच्या आधारानेच चिपळूणकरांनी 'शालापत्रकां'तील आणि 'निबंधमालें'तीलहि आपलें काव्यविषयक विवेचन सजविलेलें आहे. 'शालापत्रकां'तील तिसऱ्या निबंधाच्या शेवटीं ज्या टेनिसनचा निर्देश त्यांनी राजकवि म्हणून केलेला आहे, त्याचीं काव्यें जरी ते चाळते, तरी त्यांना मेकॉलेच्या या प्रमेयांची निरर्थकता पटल्याविना राहती ना.

चिपळूणकरांचे ' संस्कृत कविपंचका 'वरील निबंध मात्र त्या मानाने अधिक मूलग्राही आणि मार्मिक आहेत. या त्यांच्या निबंधांनी समीक्षेची केवळ पाश्चात्य पद्धतीच नव्हे, तर आपल्या प्राचीन कवींचा काल, कविता आणि कला यांची मीमांसा करण्याची ऐतिहासिक चिकित्सक दृष्टीहि मराठींत आणली. इतिहाससंशोधनाची प्रवृत्ति आणि प्रथा या दोहोंचाहि विकास बाळशास्त्री जांभेकर, भाऊ दाजी, भांडारकर, मंडलिक, तेलंग, पंडित प्रभृति विद्वानांच्या प्रयत्नाने या वेळेपर्यंत महाराष्ट्रांत बराच झालेला होता. पण, या थोर संशोधकांचें बहुतेक मौलिक लेखन इंग्रजींतूनच होत राहिल्यामुळे, मराठी अभ्यासक आणि वाचक यांच्यापर्यंत त्यांचें संशोधन पोचूं शकलें नाही; व त्यामुळे जुन्या वाङ्मयेतिहासाच्या व्यासंगाची जी ही नवीन परंपरा सतत अर्धशतक प्रगत होत आलेली होती, तिने उत्पन्न केलेल्या अभिनव दृष्टीला मराठी वाचक हा अद्याप पारखाच राहिलेला होता. चिपळूणकरांच्या संस्कृत कवींवरील विस्तृत विवेचक निबंधांनी ही अभिनव दृष्टि मराठी वाचकाला प्रथम दिली. विद्यार्थिदशेंत असतांना एका बाजूने कृष्णशास्त्री वैजापूरकर, अनंतशास्त्री पेंढरकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्यापासून प्रत्यक्षाप्रत्यक्ष संपादन केलेल्या संस्कृत वाङ्मयाच्या ज्ञानामुळे त्यांची रसिकता आणि प्राचीनाभिमान हे

दोन्ही परिपुष्ट झालेले होते; व दुसऱ्या बाजूने डॉ. कोलहॉर्न, प्रि. वर्डस्वर्थ, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या आधुनिक शिक्षणशैलीच्या मनावर झालेल्या संस्कारामुळे शोधक बुद्धि आणि तौलनिक परिशीलनाची जाणीव या दोन्ही गुणांचा उदय त्यांच्या ठिकाणीं झालेला होता. त्यामुळे संस्कृत कवींवरील हे त्यांचे निबंध सर्वच दृष्टींनी सरस वठले. प्राचीन भारतीय वाङ्मयेतिहासाचे मिल, मेकॉले प्रभृति विदेशी निंदक आणि त्यांच्या दुर्ग्रहांची री ओढणारे लोकहितवादी प्रभृति स्वकीय अविवेकी प्रतिपादक या दोघांनी संस्कृत विद्या आणि वाङ्मय यांच्यासंबंधीं जीं दुर्मतें त्या वेळीं लोकांत प्रसृत केलेली होती, त्यांचें मुद्देसूद खंडन करून आपल्या या पुरातन सांस्कृतिक धनाची यथार्थ महती नवीन पिढीच्या मनावर बिंबविण्याच्या उद्देशानेच मुख्यतः त्यांनी हे निबंध लिहावयाला घेतले होते. या 'कविपंचका'च्या स्वतंत्र आवृत्तीला १८७६ सालीं जोडलेल्या उपोद्घातांत चिपळूणकरांनी असे उद्गार काढलेले होते की, —

"प्रस्तुत विषयाच्या निरूपणाचें पहिलें मुख्य कारण त्याचें रमणीयत्व होय. या उपयोगाचें ज्यांस विशेष महत्त्व वाटत नाहीं, व कवितेचें अध्ययन हें केवळ व्यर्थ काळक्षेप करण्याचें एक साधन होय असें ज्यांस वाटतें, त्यांशीं वाद करून आपला अभिप्रेत अर्थ त्यांच्या मनांत पक्का बिंबवून देतां येईल असा आमचा आम्हांसच भरवंसा येत नाहीं. यास्तव त्याबद्दल मुळीच पंचाईत न करतां इतकेंच सांगतों की, प्रस्तुत विषयापासून आपल्या लोकांस वरील मुख्य उपयोगाखेरीज दुसरेहि दोन मोठे उपयोग होणारे आहेत. ते एक राष्ट्राच्या संबंधानें व एक देशभाषेच्या संबंधानें असे आहेत. राष्ट्राच्या संबंधाने उपयोग हा की, सध्यां आम्हांस आमच्या विषयींचेंच जें लज्जास्पद अज्ञान आहे तें नाहीसे होऊन आपली योग्यता वास्तविक किती आहे हे चांगलें कळून येईल. इंग्लंडातील कित्येक अरण्यपंडितांनी आम्हांस साऱ्या मानवजातींत अधम पदवी देऊन पशुवर्गाशीं आमचा अत्यंत निकटभाव जो स्थापित केला आहे, तो कितपत खरा आहे, याविषयीं आमची खात्री होईल; व आमुच्या पाश्चात्य गुरूंचे लेख नेहमी शिरसावंद्यच केले पाहिजेत किंवा प्रसंगविशेष

पाहून त्यांची गति वरच्याविरुद्ध करणें अवश्य आहे कीं नाहीं याचा निर्णय होईल. भाषेच्या संबंधानें उपयोग असा आहे कीं, जुनी गीर्वाण भाषा ही चालू देशभाषांची आदिजननी असल्यामुळें व अत्यंत परिपक्व दशेस येऊन पोंचल्यावर तिचा लय झाल्यामुळें तिचें ज्ञान सांप्रतच्या भाषांचें व्युत्पत्तिज्ञान होण्यास व त्यांची अभिवृद्धि होण्यास कारणभूत होणार आहे."

अर्थात् रसिकता आणि प्राचीनाभिमान यांनी उत्स्फूर्त होऊन लिहिलेल्या या निबंधांत संस्कृत कवि आणि त्यांचीं काव्यें यांसंबंधीं मेकॉले, होल, विल्सन प्रभृति पाश्चात्य विमर्शकांनी जीं दुर्मतें, पूर्वग्रहांच्या आहारीं जाऊन, आपल्या ग्रथांतून प्रतिपादन केलेलीं होतीं, त्यांचें खंडन सावेश पण सयुक्तिक असें केलेलें दृष्टीस पडावें, यांत नवल नाही. किंबहुना, उपोद्-घातांत त्यांनी या बाबतींतील आपलें धोरण विशद करितांना असा समर्पक युक्तिवाद केलेला होता की,—

"पुढील निबंध सगळे वाचल्यावर वाचकांस कळून येईल कीं, ते केवळ स्वतंत्र बुद्धीनें लिहिले असून इंग्रेज ग्रंथकारांच्या किंवा एतद्देशीय पंडितांच्या मतांचें त्यांत बुद्धिपुरःसर अनुकरण केलेलें नाहीं. त्यांचा प्रसंगोपात्त उल्लेख मात्र करून कोठे कोठे त्यांशी विरोध दाखविला आहे, किंबहुना त्यांचें खंडनहि केले आहे. आतां यासंबंधें सर्वांस एवढेच कळविणे आहे कीं, वरील प्रकार दुष्ट बुद्धीने किंवा गर्वाने केला आहे असें नाही. आपल्या देशाची सध्या कोणत्याहि गोष्टी विषयी स्थिति पाहिली तरी ती गेल्या पांच पंचवीस वर्षांत पुष्कळच बदलली आहे. इंग्रज लोकांची विद्या व वैभव पाहून आम्ही पूर्वी जसे केवळ चकित होऊन जात होतों व आम्ही त्यांच्यापुढें काय अगदी पामर आहों, त्यांची योग्यता आम्हांस कधींहि यावयाची नाही, असे आमचे समज असत, तें सर्व मान आता अगदी फिरले आहे. इंग्रेजी विद्येने अलिकडे आमच्या मनास नवा संस्कार घडून त्याची फळें आज जी चोहोंकडें दृष्टीस पडताहेत त्यावरून सर्वांची खात्री होत चालली आहे कीं, वरील समजुती साऱ्या चुकीच्या होत्या. बुद्धीच्या मानाने पाहतां आम्ही इंग्रेजा-

हून मुळीच कमी नसून ज्या कामांत आम्ही मन घालूं त्यांत वरील लोकांची बरोबरी करूंच करूं. हें म्हणणें केवळ फुशारकीचें नव्हे; याचा प्रत्यय दिवसांदिवस विशेष येत चालला आहे; व आमच्या राज्यकर्त्यां लोकांपैकीं अप्रबुद्ध व कोत्या मनाचे जे आहेत, त्यांचा आम्हांविषयीं अधिकाधिक द्वेष व मत्सरभाव उत्पन्न होत चालला आहे, हें वरील गोष्टीचें उत्कृष्ट प्रमाण होय. असो; तर पुढील लेखांत जो प्रकार दृष्टीस पडेल तो वरील स्थित्यंतराचे फल होय असें समजावें. यापूर्वी युरोपीय पंडित आम्हांस जे सांगतील ते आम्हीं निमूटपणी मान्य करावें, त्यावर आक्षेप काढण्याचीहि आम्हास योग्यता नाही; मग खंडन करण्याची वार्ता तर दूरच, असा प्रकार चोहोंकडे असे. पण आता व पुढें उत्तरोत्तर वरील शिरजोरपणा बिलकुल चालायाचा नाहीं. इंग्रेजी शिक्षणानें आमच्या बुद्धीस जी तीव्रता आली आहे ती आमच्या गुरूंच्याच गर्वखंडनास अगोदर कारण होईल. त्यांची मतें जेवढी यथार्थ असतील तेवढ्यांचेंच ग्रहण करून अज्ञानास्तव, अरसिकतेमुळें, किंवा दुराग्रहानें ज्या मतिभ्रमांचा प्रसार त्यांनी आजपर्यंत केला आहे व पुढें करतील त्यांचा आमच्या लोकांकडून निरास झाल्याविना कधीं राहावयाचा नाहीं. त्यांतून प्रस्तुत विषय असा आहे कीं, त्याविषयीं मत देण्यास आम्हांस जो अधिकार आहे तो परस्थ लोक कितीही शहाणे व चतुर असले तरी त्यांस बिलकुल नाहीं. कारण एक तर संस्कृत भाषेचें परिपूर्ण ज्ञान होणें हें परक्यास अगोदर कठीण, आणि त्यांतून राष्ट्रभेदामुळें आमच्या हजारो समजुती व भाव परस्थांस यथास्थित समजणें तर बहुधा अशक्यच होय. यास्तव शेक्सपीयराविषयीं व्हॉल्टेर् यानें जे अभिप्राय प्रगट केले आहेत, त्यास इंग्रेज लोक जसे मुळींच मान देत नाहीत, त्याप्रमाणेच या लोकांतील कित्येक महापंडितांनी आमच्या प्राचीन कवींवर जीं दूषणें दिलीं आहेत, त्यांचा ही अत्यंत तिरस्कार व उपहास करण्यास आम्हांस पूर्ण अधिकार आहे. यास्तव तो गाजविला असतां द्वेषवुद्धि किंवा गर्व हीं प्रगट केलीशीं मुळींच होत नाहींत हें सांगावयास नको."

गेल्या पन्नास वर्षांत संस्कृत वाङ्मयाची ज्या प्रकारची सृजनशाली समीक्षा टिळक, रमेशचंद्र दत्त, राजारामशास्त्री भागवत, केतकर, टागोर, अरविंद घोष, राधाकृष्णन, रा. द. रानडे, राजगोपालाचार्य, विनोबा, कालेलकर, लक्ष्मणशास्त्री जोशी प्रभृति आधुनिक विमर्शकांनी केलेली आहे किंवा त्यांतील कथाप्रसंगांतून नावीन्यपूर्ण निष्कर्ष काढलेले आहेत, तशा प्रकारचें मूलगामी, रहस्योद्ग्राहक किंवा प्रमेयप्रचुर विवेचन या निबंधांत वाचावयाला मिळत नाहीं, ही गोष्ट खरी. पण, विद्यार्थिदशेंत चिपळूणकरांनीं लिहिलेल्या या 'संस्कृत कविपंचका'नें त्या काळच्या नवीन पिढींत प्राचीन संस्कृत कवितेविषयीं अभिमानयुक्त अभिरुचि, जिज्ञासा आणि संशोधक दृष्टि उत्पन्न केली व त्याबरोबरच जागतिक वाङ्मयाच्या तौलनिक अभ्यासांत त्यांना असलेलें अनन्य महत्त्वहि विशद करून सांगितलें, ही त्यांची कामगिरी राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या दृष्टीनें संस्मरणीय होय.

'शालापत्रकां'तून प्रसिद्ध झालेले हे संस्कृत कवींवरील निबंध त्या वेळीं इतके लोकप्रिय झाले की, ते पूर्ण झाल्याबरोबर कांही शिक्षकांनी त्याच धर्तीवर जुन्या मराठी कवींवर निबंध लिहिण्याची विनंती चिपळूणकरांना केली. म्हणून १८७५ सालच्या फेब्रुवारीपासून त्यांनी मराठी कवितेवरील प्रास्ताविक विवेचनाला प्रारंभ केला. पण, हे त्यांचे लेख, संस्कृत आणि इंग्रजी कवितेवरील लेखांच्या मानानें, अगदी उथळ आणि नीरस असून, त्यांतील बव्हंश भाग, मराठी कवितेच्या त्रिवर्ग प्रतिपक्ष्यांचा परामर्श घेतांना, 'अलिकडील नवीन विद्वान' आणि 'मिशनरी' लोक यांच्यावर केलेल्या पाल्हाळिक टीकेनेच व्यापलेला आहे. त्या वेळीं 'निबंधमाला' सुरू झालेली असल्यामुळेहि कदाचित् चिपळूणकरांकडून या लेखांच्या बाबतींत अनास्था झाली असेल. या लेखांत त्यांनी 'सर्वसंग्रह' मासिकाला असलेला सरकारी आश्रय शिक्षण खात्यानें, मिशनरी आणि इतर बडे सल्लागार यांच्या सांगण्यावरून, काढून घेतल्यामुळे, जुन्या मराठी कवितेच्या जीर्णोद्धाराच्या कार्याची जी हानि झाली, तिच्याबद्दल त्या खात्यावर कडक टीका केली होती. ही टीका जरी योग्य होती, तरी 'शालापत्रका'सारख्या खुद्द शिक्षण

खात्याच्याच अधिकृत मुखपत्रांतून ती प्रकाशित होण्यांत जो गैरशिस्त प्रकार घडला, तो त्या खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना न रुचणें अगदी स्वाभाविक होतें. शिवाय, चिपळूणकरांकडे या मासिकाचें संपादन आल्यापासून, त्यांत उत्तम साहित्य देण्याच्या त्यांच्या हव्यासामुळे त्याचे अंकहि आतां वेळेवर निघेनासे झालेले होते. त्याचा परिणाम असा झाला की, शिक्षण खात्याचे आदेश, आज्ञा इत्यादि जें सरकारी वृत्त त्या मासिकांतून शिक्षकवर्गाच्या माहितीसाठी देण्यांत येत असे, तें वृत्त, त्याचे अंक महिना महिना उशिरा निघूं लागल्याकारणाने, शिक्षकांना वेळच्या वेळीं कळणें अशक्य होऊन, त्या मासिकाचा सरकारच्या दृष्टीनें महत्वाचा असलेला हा एक उपयोग नाहीसा होऊन गेला. याहि परिस्थितींत, शिक्षण खात्याचे त्या वेळचे डायरेक्टर चाटफील्ड यांना तें मासिक, संपादकीय व्यवस्थेंत बदल करून, चालू ठेवणें सहज शक्य होतें. तथापि, कृष्णशास्त्र्यांविषयी त्यांना विशेष आत्मीयता आणि आदर असल्यामुळे, तें मासिक त्यांच्याकडून काढून दुसऱ्या संपादकाच्या हातीं दिल्याने त्यांचा अपमान केल्यासारखा दिसेल, या भीतीने त्यांनी तें अजिबात बंद करण्याचा निर्णय अखेर घेतला. अशा रीतीने, १८६१ सालीं 'पुणें पाठशाळा पत्रक' या नावाने निघालेलें हें मासिक, मुख्यत: चिपळूणकर पितापुत्रांच्या नेतृत्वाखालीं, सुमारें चौदा वर्षें उत्कृष्ट रीतीने चालून, शिक्षणखात्यामार्फत निघणाऱ्या मासिकांत खुद्द त्याच खात्यावर टीका करण्याचा जो अतिप्रसंग चिपळूणकरांनी केला, त्यामुळेच केवळ लयाला जाण्याची पाळी आली. सारांश, सरकारी अधिकारी, मिशनरी लोक, नवीन विद्वान् इत्यादींवरील टीकेचें सत्र आणि अंकांच्या प्रकाशनाच्या बाबतींतील दिरंगाई या ज्या दोन वैगुण्यांचा पुढे 'निबंधमालें'त इतका अतिरेक झाला, त्यांचा उद्भव प्रथम 'शालापत्रकां'त झालेला दिसतो.

# १४

'शालापत्रकां'तील हें निबंधलेखन चालू असतांनाच चिपळूणकरांच्या आयुष्यांतील दोन महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्या म्हणजे अध्यापनाच्या व्यवसायाला प्रारंभ आणि 'निबंधमाले'चा उपक्रम. १८७० सालीं बी. ए. च्या वर्गांत दोन वर्षे घालवूनहि परीक्षेंत अपयश आल्यानंतर त्यांनी कॉलेज सोडलें; व घरी अभ्यास करूनच पुन्हा परीक्षेला बसण्याचा निश्चय केला. तेव्हा कृष्णशास्त्र्यांचे एक रंगेल स्नेही, तत्कालीन विख्यात शाळाचालक बाबा गोखले यांनी त्यांना पत्र पाठवून असें विचारलें की, "विष्णु यास आमचे शाळेंत तुम्ही शिकविण्यास पाठवाल काय ?" शास्त्रीबुवांनी चिरंजीवाच्या संमतीने त्यांच्या या पत्राला रुकार दिला; व अशा रीतीने १८७१ सालच्या जानेवारीपासून चिपळूणकरांच्या व्यावसायिक जीवनाला सुरवात झाली. त्यांच्या ठिकाणी जरी शिक्षकाला आवश्यक असलेले वक्तृत्वादि आकर्षक गुण नव्हते, तरी त्यांना अध्यापनाची आवड मात्र उपजतच होती. किंबहुना, नवीन पिढीला विद्यालयांतून देण्यांत येणारें शिक्षण ही ते व्यापक लोकशिक्षणाची पहिली पायरी समजत असत; व म्हणून या शालेय शिक्षणासंबंधीसुद्धां त्यांना जिवंत कळकळ होती. शिक्षकाच्या व्यवसायाविषयीची ही त्यांची उदात्त भावना त्यांच्या 'शालापत्रकां'तील लेखांतूनहि व्यक्त झालेली आहे. पुढे ते पूना हायस्कूलमध्ये शिक्षक झाल्यानंतर, त्या वेळचे प्रसिद्ध एक्झिक्युटिव्ह इंजिनियर काशिनाथपंत गोडबोले हे एकदां सहज हायस्कुलांत आले असतां, गप्पांच्या भरांत उद्गारले "काय बोवा, मास्तरचे कामाचा मोठा त्रास नाही बरें ? मला वाटतें, एक तास शिकविणें आणि तीन तास वाचीत बसणें बरोबर होईल!" या त्यांच्या उद्गारावर टीका करून चिपळूणकर म्हणाले, "या मंडळीस शिकविण्याचा एवढा काय त्रास वाटतो कोण जाणे. मी स्वतः चार चार तास शिकविलें, तरीं मला त्याचें फारसें वाटत नाही." अध्यापनाविषयीची ही त्यांची आवड कोणत्याहि परिस्थितींत कमी झाली नाही. ते बी. ए. झाल्यावर शास्त्रीबुवांनी वकिलीच्या किंवा मुन्सफीच्या परीक्षेचा अभ्यास

करून पैसा आणि स्वतंत्रता हीं दोन्हीहि मिळविण्याच्या त्या काळांतील राजमार्गाकडे वळण्याची सूचना त्यांना करून पाहिली. पण ती कांही त्यांनी मनावर घेतली नाही. कायद्याचा अभ्यास आणि वकिलीचा धंदा या दोहोविषयी त्यांना अगदी अरुचि होती. त्यामुळे, अध्यापन आणि ग्रंथलेखन या दोन परस्परपूरक कार्यांतच आपलें जीवन व्यतीत करण्याचा संकल्प त्यांनी विद्यार्थिदशेंत असतांनाच केला होता; व तदनुसार 'शालापत्रकां'तून त्यांचें लेखन सुरूहि होऊन गेलें होतें. आता, बाबा गोखले यांच्या निमंत्रणामुळे, त्यांना अध्यापनाच्या व्यवसायांत प्रवेश करण्याची संधिहि अनायासें मिळाली.

पण पूना हायस्कूलचे हेडमास्तर रा. ब. कुंटे यांनी मात्र चिपळूणकरांच्या या आवडीचें चीज केलें नाही. वस्तुतः कुंटे हे त्या काळांतले प्रमुख ग्रंथकार आणि कार्यकर्ते. त्यामुळे, चिपळूणकरांसारखा बहुश्रुत, लेखनकुशल, हौशी तरुण आपल्या हातांखाली दुय्यम शिक्षक म्हणून काम करावयाला आला असतां, त्याला सहृदयतेने वागवून त्यांनी त्याच्या गुणांना पूर्ण वाव द्यावयाला हवा होता. विशेषतः, चिपळूणकरांचे नंतरचे वरिष्ठ, रत्नागिरी हायस्कूलचे हेडमास्तर, प्रार्थनासमाजाचे अध्वर्यु, तत्कालीन अग्रगण्य सुधारक रा. ब. वामन आबाजी मोडक यांच्याशीं त्यांचा 'निबंधमालें'तून उघड उघड सामना झालेला असतांनासुद्धा, मोडकांनी ज्या सौजन्याने आणि अगत्याने त्यांना वागविलें, तें ध्यानांत घेतलें असतां तर, कुंटे यांचें वर्तन त्यांच्याशीं सगळ्याच बाबतींत अगदी असमंजस, अनुदार आणि अप्रबुद्ध असें झालें, असें म्हणावयाला शंका वाटत नाही. पुढे रत्नागिरीला बदली झाल्यानंतर चिपळूणकरांनी तेथे पोंचल्याबरोबर जें पत्र वडिलांना ता. २ जानेवारी १८७८ रोजीं पाठविलें, त्यांत आपले जुने वरिष्ठ कुंटे आणि नवे वरिष्ठ मोडक यांच्यासंबंधीं असे उद्गार काढलेले आढळतात की, "माझे सध्याचे हेडमास्तर हे, त्यांच्या हातांखालच्या प्रत्येक शिक्षकाला अनुभव आलेला आहे त्याप्रमाणे, मला अतिशयच संभावित आणि मनमिळाऊ असल्याचें दिसून आलें; व त्यांच्या सहवासांत असतांना क्षणोक्षणीं, ज्या चीड आणणाऱ्या गांजणुकीतून मी सुटलों, तिच्याविषयीचा विचार माझ्या मनांत आल्याविना राहत नाही." ( My present Head Master, too I find, as every subordinate of his finds, to be eminently gentle-

manly and sociable; and every moment I have been with him, I can't help looking back on that hateful tyranny that I have escaped.) कुंटे यांची अगदी सुरवातीपासून त्यांच्याशीं झालेली वागणूक, त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून रावबहादुरांवर वारंवार आलेली वैयक्तिक टीका आणि खुद्द ना. गो. कृ. गोखले यांनी न्या. रानडे यांच्याशीं त्यांनी केलेल्या तऱ्हेवाईक वर्तनाची आपल्या एका व्याख्यानांत सांगितलेली आठवण या सर्व गोष्टींचा विचार केला असतां चिपळूणकरांचा त्यांच्यासंबंधींचा हा तिरस्कार अगदी रास्त वाटतो. १८७२ सालीं शिक्षणखात्याचे डायरेक्टर चाटफील्ड हे, कृष्णशास्त्र्यांच्या घरीं रिपोर्टरच्या कचेरीची पाहणी करण्यासाठी आले असतां, त्या वेळीं शास्त्रीबुवांशीं झालेल्या कुशल प्रश्नांत, त्यांना चिपळूणकर नुकतेच बी. ए. झालेले असल्याचें समजलें. म्हणून, त्यांनी शास्त्रीबुवांना विचारलें, "मुलगा चाकरी धरीत नाही का ?" त्यावर शास्त्रीबुवांनी उत्तर दिलें, "तो तूर्त एम.ए. चा अभ्यास करीत असतो. चाकरीचा अद्याप निश्चय नाही." तथापि, या संभाषणाची आठवण ठेवून, पूना हायस्कूलमध्ये तिसऱ्या असिस्टंट मास्तराची जागा रिकामी झाल्याचें समजतांच, चाटफील्डसाहेबांनी, शास्त्रीबुवांसंबंधींच्या स्नेहभावामुळे, कुंटे यांना मुद्दाम पत्र लिहून चिपळूणकरांना त्या जागेवर घेण्याची सूचना केली. तेव्हा, कुंटे यांनी चिपळूणकरांना बोलावून, त्या पत्राचा उल्लेख वगैरे न करितां, त्यांना म्हटलें की, "आमचे शाळेंतील थर्ड असिस्टंट मास्तरचे जागेबद्दल तुम्ही खुषी असाल तर तुमची आम्ही डायरेक्टरसाहेबांकडे शिफारस करून पाठवितों." चिपळूणकरांनी अर्थातच रुकार दिला. पण, नोकरीच्या बाबतींत आपल्यावर करण्यांत येत असलेली ही मेहेरबानी कांही हेडमास्तरांची नसून, तिचा उगम खुद्द डायरेक्टरसाहेबांच्या आपल्या वडिलांविषयींच्या आत्मीयतेंतून झालेला आहे, हें त्यांना लवकरच कळलें !

तथापि चाटफील्डसाहेबांच्या कृपालोभामुळें लाभलेली ही सरकारी नोकरी चिपळूणकरांना सुखावह झाली नाही. याला एक कारण जसा रावबहादुरांच्या ठिकाणीं असलेला तारतम्याचा अभाव, तसेंच दुसरें

कारण खुद्द चिपळूणकरांचे दुरतिक्रम स्वभावदोष. शाळेंत किंवा वर्गावर वेळेवर जाणें त्यांच्याकडून सहसा होत नसे. ते कांही वाचीत बसलेले असले, म्हणजे तासाची घंटा वाजून गेलेली असली, तरी हातांतलें पुस्तक खाली ठेवून वर्गावर जाईपर्यंत पंधरा वीस मिनिटें निघून जावयाचींच !' गोखले यांच्या शाळेंत असतांना मॅट्रिक्युलेशनच्या वर्गाचे संस्कृत, इतिहास, भाषांतर वगैरे विषय त्यांच्याकडे असत; व हे विषय त्यांचे आवडते असल्यामुळे ते शिकविण्यांत त्यांचें मन रमत असे. पण, कुंटे यांची आपल्या हाताखालच्या शिक्षकांना वागविण्याची तऱ्हा अशी कांही अजब होती की, ते वरच्या श्रेणींतील असिस्टंट मास्तरांना खालचे वर्ग आणि खालच्या श्रेणींतील असिस्टंट मास्तरांना वरचे वर्ग घ्यावयाला सांगत असत ! चिपळूणकर म्हणावयाचे की, "पहिला वर्ग आम्हाकडे मराठीशिवाय कधी यावयाचा नाही; कधी दुसरे वर्गाची एकादी तुकडी व कधी दुसरे वर्गापासून बाकी सर्व खालचे इयत्तांचें संस्कृत ही आम्हास मिळायाचीं; परंतु पहिले क्लासाचे इंग्लिश किंवा संस्कृत किंवा इतिहास हे विषय आमचे वांट्यास कधींहि आले नाहीत." त्यांचे मित्र रा. ब. वि. मो. महाजनि हे एकदा शाळेंत त्यांना भेटावयास गेले असतां वर्गाचें जें स्वरूप त्यांनी पाहिलें, त्याचें असें वर्णन त्यांनी नंतर केलें की, "वर्गांतील पहिले दहा बारा मुलांनाच काय तें येत होतें; बाकी तितकेच मुलांस कांहीं समजत होतें असें दिसत नव्हते. प्रश्न विचारतांना शास्त्री-बोवांचे बोट आठ दहा मुलांखालीं गेलें म्हणजे पुढील दशकावरून तें झरकन फिरून पहिले मुलावर येई !" कृष्णशास्त्र्यांविषयीच्या स्नेहभावामुळें चाटफील्डसाहेबांनी त्यांना आपण होऊन नोकरी तर दिलीच; पण वर्षाच्या शेवटीं त्यांची बढती करण्याचा योग येतांच तोहि तत्परतेने साधला. हायस्कुलांतील एक सीनियर शिक्षक द्वारकानाथ राघोबा यांची बदली मुंबईस झाल्यामुळे डॉ. कीलहॉर्न हे आपल्या एका एम. ए. झालेल्या शिष्याची त्या जागेसाठी शिफारस करण्याकरिता चाटफील्डसाहेबांकडे गेले. पण, त्यांनी, "चिपळूणकर हा एम. ए. पास झालेला नसला, तरी त्याच्या लायकीची मला खात्री आहे," असें उत्तर डॉक्टरसाहेबांना देऊन

त्या जागेवर चिपळूणकरांची नेमणूक केली. तथापि, हेडमास्तरांशीं त्यांचा बेबनाव सुरू झालेला असल्यामुळे, डायरेक्टरसाहेबांच्या या मेहेरबानीचें चीज होऊं शकलें नाही. कुंटे यांनी आपल्या उत्शृंखल स्वभावानुसार कृष्णशास्त्र्यांची जी कुचाळी एकदा चिपळूणकरांजवळ केली, तिच्यामुळे या बेबनावाला प्रारंभ झाला; व त्यानंतर कुंटे यांची विक्षिप्त, लहरी वागणूक आणि चिपळूणकरांचा मानी, हेकेखोर स्वभाव यांमुळे तें वैमनस्य उत्तरोत्तर विकोपाला गेलें. त्यांचा स्वभाव जर थोडा कमी स्वाभिमानी आणि जास्त लवचिक असता, तर याहि परिस्थितींत त्यांनी कुंटे यांच्याशीं जमतें घेतलें असतें-पण अपमान गिळणें हें मुळी त्यांच्या स्वभावांतच नव्हतें. डॉ. जॉन्सन याच्या-वरील निबंधांत त्यांनी त्याच्या चरित्रांतील एक प्रसंग असा रेखाटलेला आहे की, "पहिल्याने त्याने एका शाळेंत चाकरी धरली. ही शाळा खाजगी होती; व हींत जॉनसन हा दुय्यम म्हणून राहिला.. शाळेचे सरमास्तर स्वभावाने मोठे गर्विष्ठ व तिस्मारखान होते; त्यांचा हिशेब असा होता की, या दुय्यमाला आम्हीं मोठी मेहेरबानी करून अन्नाला लावला आहे, तेव्हा आमचा मोगलाई अंमल याने निमूटपणें मान खाली करून सोसला पाहिजे. आम्ही सांगू तें याने शिरसावंद्य करून बंद्या गुलामाप्रमाणे प्रत्येक शब्दास 'हां जी, जी हां' अशी मान डोलविली पाहिजे. पण जॉनसन कसचा? जो पुढे ऑसबोर्न याच्या डोकींत त्याचेंच एक भलें मोठें बूक पाहून घाला-याला चुकला नाही, व ज्याने चेस्टरफील्डसारख्याचीहि पर्वा ठेविली नाही, तो यःकश्चित् शाळामास्तराला विचारतो काय? त्याने खाडदिशी चाकरीला लाथ मारिली...." हें शब्दचित्र जणूं त्यांच्या स्वतःच्याच जीवनांतलें असल्यासारखें वाटतें.

अशा रीतीने, अनायासें लाभलेल्या सरकारी नोकरीमुळे जें आर्थिक स्वास्थ्य चिपळूणकरांना ऐन तारुण्यांत प्राप्त झालें, त्याचा त्यांनी सांसारिक दृष्टीने सदुपयोग केला एवढेंच केवळ नव्हे, तर लोकहिताचेहि एकामागून एक नवीन उद्योग झपाट्याने हातीं घेतले. वडिलांचें कृपाछत्र मस्तकावर असल्याकारणाने प्रपंचाची प्रत्यक्ष अशी कोणतीच जबाबदारी त्यांच्यावर अद्याप पडलेली नव्हती. त्यामुळे ते आपल्या पगाराचा इच्छेस येईल तसा

उपयोग करावयाला मोकळे होते. हायस्कुलांत नोकरी लागल्यावर शास्त्रीबुवांनी त्यांना आपला पगार घरांत खर्चावयाला न देतां बँकेंत वेगळा ठेवण्याची सूचना केली होती. पण चिपळूणकरांच्या सर्वस्पर्शी रसिकतेमुळे आणि निरपेक्ष सहृदयतेमुळे त्यांचा पगार जशाचा तसा दरमहा बँकेकडे जाण्याचा योग बहुधा कधीच आला नसावा. त्यांच्या वडिलांची अभिजात रसिकता त्यांच्या ठिकाणीं जणुं अधिक अविकृत, उन्नत आणि उदार स्वरूप धारण करून प्रकट झालेली होती; व "कर्मणुकीचे जेवढे म्हणून प्रकार आहेत, तेवढे सर्व अत्यंत ग्राह्य होत," हें त्या रसिकतेचें आचारसूत्र होतें. त्यामुळे पुस्तकें, चित्रें, फुलझाडें, सहली, नाटकें, तमाशे, सर्कशी या मनाला उल्लसित करणाऱ्या करमणुकीच्या सर्वच प्रकारांचा त्यांना शौक होता. कृष्णशास्त्री हे त्या काळांतले अग्रगण्य पंडित आणि शिक्षणखात्यांतले बडे अधिकारी असल्यामुळे घरीं साहजिकच ग्रंथसंपत्ति चांगल्यापैकी होती. तींत भारी किंमतीच्या उत्तमोत्तम नवीन ग्रंथांची भर घालणें, हें चिपळूणकरांचें मुख्य व्यसन होतें. त्यांचा कोणी स्नेही किंवा परिचित मुंबईस जावयाला निघाला, म्हणजे त्याच्याकडे नवीन पुस्तकें विकत आणण्याचें काम जावयाचेंच! मराठींत प्रसिद्ध होणारीं चांगलीं पुस्तकें आणि नियतकालिकें यांनाहि त्यांचा आश्रय असे. त्याबरोबरच मेमण लोकांच्या दुकानांतून किंवा जुन्या बाजारांतून विकावयाला निघालेले जीर्ण ग्रंथ, चित्रें, हस्तलिखितें वगैरेहि ते आस्थेने विकत घेऊन त्यांचा संग्रह काळजीपूर्वक करीत असत. याशिवाय, निरनिराळ्या प्रकारचीं फुलझाडें विकत घेऊन तीं स्वतः बगिचांत लावणें आणि त्यांची निगा ठेवणें, हाहि नाद त्यांना होता. शास्त्रीबुवांच्या नंतर त्यांच्या संयुक्त कुटुंबांत तेच मुख्य आणि कर्ते समजले जात असत. त्यामुळे, आप्त, आश्रित, मित्रमंडळी इत्यादींना मदत करणें, हें त्यांचें कर्तव्य होऊन बसलें होतें आणि तें कर्तव्य ते अगत्यानें पार पाडीत असत. ते अबोल खरे, पण विलक्षण संगतिप्रिय आणि उत्सवप्रेमी होते. त्यामुळे, महिन्यांतून एक दोन वेळां तरी आपल्या अंतेवासी स्नेह्यांना बरोबर घेऊन नदीकांठीं पोहावयाला, वनभोजनाला, डोंगरचढाईला किंवा करमणुकीच्या एखाद्या कार्यक्रमाला जाणें हा त्यांच्या परिश्रमशील, व्यवसायबहुल

जीवनांतील आवडता विरंगुळा होता. आपल्या भोवतालच्या लहान थोर व्यक्तींविषयीची चिपळूणकरांची ही कळकळ, त्यांचीं जीं मोजकींच खाजगी पत्रें आज उपलब्ध आहेत, त्यांतून उत्कृष्ट रीतीनें व्यक्त झाली असल्याचें दृष्टीस पडतें. लोकोपयोगी सार्वजनिक कार्यांना तर ते सढळ हाताने सहाय्य करीत असत. पुण्यास नगरभवन बांधण्याच्या योजनेचा विचार करण्यासाठी न्या. रानडे यांच्या प्रेरणेने भरलेल्या सभेंत त्यांनी एक महिन्याच्या भर पगाराचा आंकडा देणगी-पत्रकावर टाकल्याची गोष्ट प्रसिद्धच आहे. प्रथम नोकरींत आणि नंतर निरनिराळ्या उद्योगांत त्यांनी मिळविलेला पैसा बव्हंशीं परोपकारांत आणि लोकहिताचे नवनवीन उपक्रम करण्यांत सार्थकीं लागला. डॉ. जॉन्सन याच्याविषयी त्यांनी असे उद्‌गार काढले आहेत की, .. "त्यास सरकारांतून जें नियमित वेतन मिळत असे... तें जरी अगदी रगाडीचें होतें, तरी रिकाम्या छानछुकींत किंवा ऐषआरामांत त्याने कधीहि त्याचा व्यय केला नाही.... जॉनसनचें वर्तन एकंदरींत पाहतां पुरातन काळच्या तत्त्वज्ञा-प्रमाणे असे. म्हणजे ते स्वभावतःच निरिच्छ असून जें यदृच्छेनें मिळेल त्यावर काळक्रमणा करून जसे नित्य संतुष्ट असत, तसाच प्रस्तुत महापंडित असे ······· याप्रमाणेच जॉनसनने पहिला संबंध तुटला असतां शेवटपर्यंत दुसरा जोडण्याची बिलकूल इच्छा केली नाही व यावज्जन्मांत दहा बारा वर्षें संसारसुखाचा जो अनुभव त्यास घडला तितक्यांतच त्यानें संतोष मानला, हा प्रेमातिशय आणि मनोनिग्रहहि विचारार्ह होय." हे त्यांचे उद्‌गार त्यांना स्वतःलाहि तितक्याच यथार्थतेने लागू पडतात. त्यांना दोन मुलें होऊन तीं बाळपणींच वारलीं; व त्यांची पत्नी ही आपल्या आई-बापांची एकुलती एक मुलगी असल्यामुळे आणि पुढे आजारपण सारखें मागे लागल्यामुळेहि तिचें राहणें माहेरींच जास्त होत असे. पण, संसारांतील या विदारक शल्याचें वैषम्य न मानतां, पुण्यासारख्या 'माषुक' शहरांत त्यांनी आपलें तारुण्य, केवळ वाङ्‌मयानंदाचा आस्वाद घेण्यांत आणि स्वतःच्या विशिष्ट कल्पनांनुसार देशोन्नतीचे निरनिराळे उपक्रम करण्यांत, आमरण मोठ्या उत्साहाने घालविलें. इतकेंच नव्हे, तर पत्नीच्या या

शारीरिक विकलतेमुळे त्यांची तिच्याविषयीची आपुलकी, आस्था आणि आदर यांतहि अखेरपर्यंत कधी अंतर पडलें नाही. त्याचें एक हृदयस्पर्शी प्रत्यंतर असें की, रत्नागिरी येथील शेवटल्या मुक्कामांत सरकारी नोकरीचा राजीनामा देण्याचा निश्चय ज्या वेळीं त्यांनी आपल्या मनाशीं केला, तेव्हा तें आपलें हृद्गत त्यांनी फक्त तिला एकटीलाच मुद्दाम आगाऊ विश्वासांत घेऊन सांगितलेलें होतें.

'निबंधमाला' काढण्याची कल्पनाहि मित्रमंडळीसह केलेल्या अशा एका सहलींतच चिपळूणकरांना सुचविण्यांत आली. १८७३ सालच्या नाताळच्या सुटींत किर्लोस्कर, आगाशे, जांभेकर प्रभृति आपल्या मित्रांसह ते आळंदीला सहज मजेने गेले होते. तेथून परत येत असतांना वाटेंत जांभेकर त्यांना म्हणाले, "तुम्ही एकादें मासिक पुस्तक कां काढीत नाही? त्यांत कधी नवीन विषय घालावेत व कधी तुम्ही 'शालापत्रकां'त संस्कृत कवींविषयी जे निबंध यापूर्वी छापले आहेत त्यांतीलच कांही घालावेत." चिपळूणकरांना ही कल्पना पसंत पडली; व त्यांनी लगेच 'ज्ञानप्रकाश' पत्रांत आपल्या या नव्या मासिकाची जाहिरातहि दिली. 'निबंधमाले'चा पहिला अंक ता. २५ जानेवारी १८७४ रोजी प्रसिद्ध झाला. अंकाच्या दर्शनी पृष्ठावर "निबंधमाला ... अंक १ ... मराठी भाषेची सांप्रतची स्थिति ... रचणार ... विष्णु कृष्ण चिपळोणकर ..." अशी माहिती अनुक्रमें एकाखाली एक दिलेली असून, पुढे जगन्नाथपंडिताचा 'अन्योक्तिविलासां'तील

तोयैरल्पैरपि करुणया भीमभानौ निदाघे
मालाकार, व्यरचि भवता या तरोरस्य पुष्टिः ।
सा किं शक्या जनयितुमिह प्रावृषेण्येन वारां
धारासारानपि विकिरता विश्वतो वारिदेन ॥

हा श्लोक दिलेला होता. नंतर अनुक्रमाने "पुणें ... बाबाजी कृष्ण गोखले यांच्या ... ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें ... किंमत दोन आणे ... ता. २५ जानेवारी १८७४" ही माहिती दिलेली होती. 'निबंधमाले'चें बहिरंग कमालीचें साधें किंबहुना अनाकर्षक होतें. तिचा आकार, त्या काळांतील मासिकांच्या

पद्धतीप्रमाणे, डेमी द्वादशपत्री होता. या पहिल्या अंकाची पृष्ठसंख्या वीस होती; व त्यांत 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' आणि दोन 'सूचना' इतकाच मजकूर होता. यांपैकी एक सूचना अखेरच्या विसाव्या पानावर, मुख्य निबंध संपल्याबरोबर त्याच्या खाली, दिलेली होती. ती अशी—

"या निबंधमालेचा उद्देश काय आहे हें वाचकांस या पहिल्या अंकावरून समजेलच. तो मुख्यतः भाषाशोधनाचा तर आहेच; पण त्याबरोबर त्यांस मनोरंजन व बोध ही कांही होईल असा भरंवसा आहे. हा बेत लोकांच्या पसंतीस जर पडेल, तर आम्ही आपलें काम बजावण्यांत यत्किंचित्‌ही आळस करणार नाही हें सांगावयास नकोच.

यांतील मजकुराच्या तर्फेनेंहि येथे कांही विनंती करणें अवश्य वाटतें. ती इतकीच कीं, तो कोणाच्या द्वेषबुद्धीनें आम्ही कधींही लिहिणार नाही. जर त्यांत कोणास काही गैर दिसून आम्हांस कळविण्यांत येईल, तर आमची चुकी आम्ही मोठ्या संतोषानें पदरांत घेऊं. तसेंच त्यांत जें जें कांहीं अहंकारोक्तीसारखें कोणास दिसेल त्यांत सत्यनिरूपणाखेरीज दुसरा उद्देश कधींही असणार नाही हेंही आम्ही एकवार खात्रीनें सांगून ठेवतो."

दुसरी सूचना शेवटल्या दर्शनी पृष्ठावर दिलेली होती. ती अशी—

"हें मासिक पुस्तक कोणत्या प्रकारचें असणार याविषयी येथें थोडेसें लिहिणें इष्ट होय. ज्ञानप्रकाशांतील आमच्या जाहिरातीवरून पुष्कळांस असें वाटत आहे कीं, हें मागील पुस्तकांच्याच पद्धतीस अनुसरून चालणार–म्हणजे त्याप्रमाणें यांत नानाविध विषयांचा संग्रह होणार. पण तसें नव्हे. निबंध-माला नांवाच्या पुस्तकांत नाटकांची, काव्यांचीं भाषांतरें, कल्पित कथा, देशवर्णनें इत्यादि विषय शोभणार नाहीत हें उघड आहे. यास्तव या मासिक पुस्तकाच्या नांवाप्रमाणे यांत निबंध मात्र छापले जातील. ते प्रायः मराठी भाषेच्या, देशस्थितीच्या, लोकाचाराच्या वगैरे संबंधांचे असतील. अवकाशानुसार इतिहासादि शास्त्रीय विषयांवरहि लिहिण्याचा आमचा उद्देश आहे.

हें प्रस्तुत पुस्तकाच्या मुख्य भागाविषयीं झालें. पण वाचकांस एकच

लांबलचक विषयाचा त्रास येईल यास्तव पुस्तकाच्या शेवटीं दर खेपेस विशेषत: मनोरंजन होण्यासारखा कांही मजकूर घालण्याचा आमचा बेत आहे. हा मजकूर उत्कृष्ट ग्रंथकारांचे उतारे, सुभाषित, विनोदपर चुटके, महादाख्यायिका म्ह. थोर लोकांच्या गोष्टी, अशा तऱ्हेचा असेल.

पुस्तक महिन्यांत केव्हा तरी निघून त्याचीं पृष्ठें ४०–५० असतील. कधी कदाचित् अधीकही होतील. किमतीचे दर मागें दिले आहेत ते पहावे."

या दोन 'सूचनां' वरून 'निबंधमाला' सुरू करितांना तिचा उद्देश आणि स्वरूप यांसंबंधीं चिपळूणकरांच्या कल्पना कशा प्रकारच्या होत्या, हें कळून येईल. 'माले'चा पहिला अंक जरी फक्त वीसच पानांचा निघाला, तरी दुसऱ्या अंकापासून छत्तीस पानें देण्यांत येऊं लागलीं. पंचविसाव्या अंकापासून तिचा आकार डेमी अष्टपत्री करण्यांत आला, म्हणजे दिढोने वाढविण्यांत आला; व पानें बत्तीस करण्यांत आलीं. यानंतर मात्र आकार आणि पृष्ठसंख्या यांत कोणत्याहि तऱ्हेचा बदल झाला नाही. 'माले'ची वार्षिक वर्गणी अडीच रुपये होती. त्या काळांतल्या शिक्षणप्रसाराच्या आणि वाचकवर्गाच्या मानाने 'माले'ला प्रारंभापासून लोकाश्रय चांगला मिळूं लागला होता, असें चिपळूणकरांच्या वार्षिक समालोचनांतील उद्गारांवरून समजतें. दुसऱ्या वर्षाच्या शेवटीं 'माले'च्या चोविसाव्या अंकांत, 'निबंधमाला-हितेच्छु' या टोपणनांवाने रा. ब. वामन आबाजी मोडक यांनी पाठविलेल्या टीकात्मक पत्राला दिलेल्या विस्तृत उत्तरांत, त्यांनी असे उद्गार मोठ्या अभिमानाने काढलेले होते की, "ईश्वरकृपेने सरकारचें मिंधें झाल्यावांचून व बड्या मंडळीची ओशाळगत वागविल्यावांचून आमचें पुस्तक आज दोन वर्षे खासें सुरळीत चाललें आहे. महाराष्ट्र भाषेविषयी कळकळ, स्वदेशाचा अभिमान, किंवा ज्ञानाविषयी उत्कंठा, यांहीं प्रेरित होत्सात्या शेकडो लोकांचा आम्हांस बळकट आश्रय आहे, व तो दिवसांदिवस वाढत आहे. आमच्या पुरस्कर्त्यांच्या मालिकेंत आमच्या देशाच्या गतवैभवाचें स्मारक व त्याचें अवशिष्टांशभूत असें जें जुनें राजमंडळ त्यांचींहि नांवें मधून मधून झळकतात." पुन्हा तिसऱ्या वर्षाच्या

शेवटीं घेतलेल्या आढाव्यांत त्यांनी असें जाहीर केलें होतें की, "या सालींहि आमचे वर्गणीदार बरेच वाढून आमच्या एका मित्राच्या साहृयानें एका संस्थानाकडून आम्हांस बराच आश्रय मिळाला आहे, हेंहि येथें आमच्या हितचिंतकांस कळविणें इष्ट दिसतें." रत्नागिरीहून ता. २ मार्च १८७८ रोजी आपल्या चुलत्यांना त्यांनी पाठविलेल्या पत्रांत 'माले'च्या त्या वेळच्या खपाचा निश्चित आंकडा दिलेला आढळतो. या पत्रांत त्यांनी अशी उमेद व्यक्त केली होती की, "जर प्रतींची संख्या ६५० पर्यंत वाढली असेल, तर मला जास्त प्रती काढण्याचा आदेश द्यावा लागेल." :( If the number has risen considerably towards 650, I should have to order more copies.) पुढील चार वर्षांत म्हणजे १८८२ सालापर्यंत हा खप आणखी बराच वाढला असला पाहिजे, हें उघड आहे. चिपळूणकरांच्या निधनाची वार्ता ता. ३० एप्रिल १८८२ रोजी निघालेल्या 'माले'च्या ऐंशाव्या अंकांत आली; व त्यानंतर तिचा शेवटला चौऱ्यांऐशावा अंक त्यांच्या मृत्यूनंतर बाहेर पडून हें 'साप्ताब्दिक महासत्र' समाप्त झालें. या सात वर्षांच्या अवधींत 'निबंधमालें'तून एकंदर सुमारें २८०० पानें मजकूर त्यांनी मराठी वाचकवर्गाला सादर केला.

भाषाशोधनाच्या मुख्य उद्देशाबरोबरच मनोरंजन आणि बोध असे जे 'निबंधमाले'चे आणखी दोन उद्देश प्रथमांकांत दिलेल्या या दोन्ही 'सूचनां'त उल्लेखिलेले होते, ते साध्य करण्यासाठी चिपळूणकरांनी एकामागून एक उद्बोधक सदरें 'मालें'त दुसऱ्याच अंकापासून सुरू केलीं. हीं सर्व सदरें त्यांच्या स्वतःच्या रसिक, शोधक आणि संग्राहक बुद्धीची मोठी आल्हाददायक प्रतीति देतात; व त्या वेळीं अगदी प्राथमिक स्वरूपांत असलेल्या मराठी वाचकवर्गाची जिज्ञासा, अभिरुचि, मार्मिकता आणि संशोधनबुद्धि यांचा विकास या सदरांनी उत्कृष्ट रीतीनें केला असला पाहिजे, हें निस्संशय. किंबहुना, या विविध सदरांच्या रूपानें चिपळूणकरांनी त्या सुमारास नुकत्याच कुठे वाचनोन्मुख होत असलेल्या महाराष्ट्राच्या जिज्ञासेला, अभिरुचीला, विचारशक्तीला आणि चिकित्सक दृष्टीला जें वळण लाविलें व वाङ्मयेतिहासाच्या व्यासंगाविषयी जी आस्था आणि

गोडी वाचकवर्गांत उत्पन्न केली, ती केवळ अपूर्व असून, ‘ निबंधमाले’ने घडवून आणलेल्या राष्ट्रीय जागृतीइतकेंच महत्त्व तिच्या याहि उपांगभूत कामगिरीला आहे, हें बिसरून चालणार नाही. ‘ माले ’च्या दुसऱ्या अंकांपासून ‘सुभाषित ’ आणि ‘ विनोद–महदाख्यायिका ’ हीं दोन सदरें, तिसऱ्या अंकापासून ‘ अर्थसादृश्य ’ आणि ‘ भाषापरिज्ञान ’ हीं दोन सदरें, चवथ्या अंकापासून ‘ उत्कृष्ट उतारे ’ हें सदर व सहाव्या अंकापासून ‘ चमत्कारिक माहिती ’ हें सदर अशीं एकंदर सहा सदरें पहिल्या सहा महिन्यांच्या आंतच त्यांनी ‘मालें’त ग्रथित केलीं. अडतिसाव्या अंकांत“वर अलंकारादिकांचें लक्षण लिहून खाली त्यांचें उदाहरण ” देण्यासाठी म्हणून ‘ साहित्य’ या नांवाचें जें आणखी एक नवें शास्त्रीय सदर त्यांनी घातलें, तें मात्र फक्त तीनच वेळां येऊन गेलेलें दिसतें. या सात सदरांत ‘सुभाषित’ या सदराला अर्थातच अग्रस्थान मिळालें. ‘माले ’च्या ३४ अंकांत मिळून एकंदर ६१४ संस्कृत सुभाषितें मराठी अर्थासह येऊन गेलीं. ‘ विनोद–महदाख्यायिका ’ हें सदर २७ अंकांत आलेलें असून, त्यांत सुमारें ९० गोष्टी दिलेल्या आढळतात. निरनिराळया काळांतील आणि क्षेत्रांतील विख्यात व्यक्तींविषयी ज्या बऱ्यावाईट आख्यायिका कर्णोपकर्णीं चालत आलेल्या असतात, त्या ऐकण्याचा आणि स्मृतिगत करण्याचा चिपळूणकरांना विलक्षण नाद होता. संस्कृत साहित्यांत सुभाषितांप्रमाणेच कवींविषयींच्या असलया सूक्तासूक्त, सुसंगत–विसंगत आख्यायिकांचें भांडारच असून, इंग्रजींतहि डिझ्राएली प्रभृति लेखकांनीं साहित्यिकांविषयींच्या चमत्कारिक, वैचित्र्यपूर्ण आख्यायिकांचे आणि आठवणींचे संग्रह प्रकाशित केलेले आहेत. चिपळूणकरांनी या सदरांत दिलेल्या गोष्टी कांही ऐकीव, कांही ऐतिहासिक, कांही काल्पनिक, कांही भारतीय, तर कांही पाश्चात्य वाङ्मयांतून घेतलेल्या अशा आहेत. आपल्या समकालीन नामांकित व्यक्तींसंबंधींच्याहि अनेक आख्यायिका त्यांच्या कानांवर अर्थातच सतत येत असत ; व त्यांतून पुणें हें जुन्या काळापासून फाजील चौकस, प्रवादप्रिय, चर्चाचटुल, कुत्साकुशल म्हणून गाजलेलें शहर असल्यामुळे तर त्यांच्या घरीं जो गप्पांचा अड्डा असे, त्यांत त्या काळांतल्या सर्वच प्रमुख व्यक्तींची आणि घटनांची झडती होऊन जात असावी, हें ओघानेच येतें. पण, कुंटे यांच्यासंबंधींच्या दोन तीन आख्यायिकांशिवाय, इतर कोणाहि तत्कालीन

मोठ्या व्यक्तीविषयींच्या आपल्या ऐकण्यांतील प्रवादांचा उपयोग त्यांनी, या सदरांत म्हणा किंवा वादप्रसंगांतसुद्धा म्हणा, केल्याचें सहसा दृष्टीस पडणार नाहीं. या दोन सदरांच्या नंतर इतर सदरांचा क्रम लागतो. 'अर्थसादृश्या'चे १५, 'उत्कृष्ट उताऱ्यां'चे १४ आणि 'भाषापरिज्ञाना'चे १२ हप्ते 'मालें'त आलेले असून, ' चमत्कारिक माहिती ' हें सदर ८ वेळां येऊन गेलेलें आहे. या सदरांशिवाय मोरोपंताचें ' मुक्तामाला ' हें संस्कृत काव्य, भर्तृहरीच्या शतकत्रयावरील वामन पंडिताची म्हणून समजली जाणारी समश्लोकी टीका आणि सोनपत–पानपतचा पोवाडा हें जुनें वाङ्मयहि 'मालें'त मुद्रित होऊन गेलेलें आहे प्रारंभीं निबंधाला सामान्यतः वीस पानें आणि उरलेल्या पानांत इतर सदरांचा प्रपंच अशी 'मालें'तील मजकुराची वाटणी होती. त्यामुळे, या सदरांच्या विकासाला भरपूर वाव मिळून, त्यांनी आपल्या विचारप्रेरक रंजकतेने 'माले'ची लोकप्रियता वाढवावयाला चांगलीच मदत केली असावी, हें निश्चित.

तथापि, या नियोजित आणि नियमित सदरांपेक्षाहि, ज्याला 'सदर' या नांवाने संबोधितां येणार नाही, पण जें पुढे या सर्व सदरांची शिराणी होऊन बसलें, त्या अनाहूत, आगंतुक अशा ' माले 'च्या आणखी एका जबरदस्त उपांगाचाहि निर्देश शेवटीं करणें अवश्य आहे. हें उपांग म्हणजे पत्रव्यवहार ! आरंभापासून हळुहळू जागा बळकावीत गेलेल्या या उपांगाने, पुढे ' माले 'चें प्रधान अंग जो निबंध त्यालाहि केव्हा केव्हा अर्धचंद्र देऊन, कित्यक अंकच्या अंक स्वतः व्यापलेले आहेत. पण क्रमाक्रमाने परिपुष्ट होऊन शेवटीं प्राधान्य पावत गेलेलें ' माले 'चें हें उपांग तिला आणि तिच्या जनकाला सर्वच दृष्टींनी गौरवास्पद आहे. कारण, हा पत्रव्यवहार आणि त्याला चिपळूणकरांनी दिलेलीं उत्तरें हीं दोन्ही त्यांची सहृदयता, सहिष्णुता आणि समावेशकता यांची ज्याप्रमाणे साक्ष देतात, त्याचप्रमाणे, ' प्रहर नमितु चापं प्राप्तप्रहारप्रियोऽहं ' या भावनेने, आपले प्रतिपक्षी आणि प्रतिस्पर्धी, आक्षेपक आणि दूषक यांना जास्तींत जास्त संधि देण्याच्या त्यांच्या प्रांजळ वृत्तीचाहि प्रत्यय आणून देतात. ' मालें '-तील त्यांचा पहिला सामना त्यांना नितांत आदरणीय वाटणारे त्यांचे

शालागुरु रा. ब. वामन आबाजी मोडक यांच्याशींच झाला. या वाग्युद्धांत गुरूचे प्रखर वाग्बाण प्रणामपूर्वक आपल्या अंगावर झेलतांना आणि तितकेच खरतर वाग्बाण उलट त्यांच्या अंगावर ईर्ष्येने सोडतांना स्वमताभिमान आणि आत्मविश्वास यांच्या उद्दाम गर्जिताबरोबरच चिपळूणकरांचा विवेक आणि विनय यांचाहि जो हृदयंगम आविष्कार होऊन गेलेला आहे, तो त्यांच्या प्रांजळ वृत्तीवर मनोज्ञ प्रकाश टाकतो. या त्यांच्या प्रांजळ वृत्तीमुळे वादविवादाच्या खुल्या रंगणाचें जें रंगतदार, खळकर स्वरूप ' माले 'ला उत्तरोत्तर येत गेलें, त्याचें त्यांनी स्वत:च ' उपसंहारां 'त असें वर्णन केलें, आहे की,—

" वरील दुर्मतध्वंसन चाललें असतां आम्ही आपल्या प्रतिपक्ष्यास स्वमतप्रतिपादनार्थ नेहेमी आव्हान केलेलें असून त्याप्रमाणें कितीकांची व आमची सदरील पुस्तकांतच चकमक झालेली आमच्या वाचकांस माहीत आहेच. ही पद्धति किती उत्तम आहे हें कोणासहि स्पष्ट दिसणारच आहे. नाही तर आपणावर कोणी प्रहार केला असतां तोंडावर बुरखा घेऊन एखाद्या दुसऱ्याच पुस्तकांत किंवा वर्तमानपत्रांत गुप्तपणें प्रवेश करून तेथून आडगोळ्या माराव्या, आणि तशांत ही फजिती झाली असतां मग आपल्या गोटांत चोरट्यासारखे पळून यावें, यापेक्षा तालीमबाजी आखाड्यांत जो प्रकार आढळतो तो किती सरळ व किती मर्दुमकीचा आहे ! सर्व लोकांसमक्ष दंड ठोकून लढणें हें सत्यासत्याच्या निर्णयास तर अत्यावश्यक व परम भूषणरूप होय. ज्यास आपला पक्ष खरा आहे ही पक्की खातरी वाटते आहे त्याला पडदपोशी व आडपडदा कशाला हवा ? तर आमच्या पुस्तकावरून जे जे सिद्धांत आमच्या देशबंधूंच्या मनांत बिंबणारे आहेत ते वरच्यासारख्या स्पष्ट रीतीने नमूद केले असून त्यांजविषयीची प्रसंगवशात् झालेली चर्चा ही जशी काय चव्हाट्यावर झालेली आहे ! "

' मालें 'तील या पत्रलेखकांत वामन आबाजी मोडक, श्रीमंत गणपतराव हरिहर पटवर्धन, जनार्दन बाळाजी मोडक, वामन दाजी ओक, मोरो गणेश लोंढे, गोविंद पांडुरंगशास्त्री पारखी, गणेशशास्त्री लेले, काशिनाथ पांडुरंग

परब, खंडो कृष्ण गर्दे, केशव बाळकृष्ण कानेटकर, बाळकृष्ण नारायण देव, कृष्णाजी श्रीपत अर्जुनवाडकर प्रभृति त्या काळांतले व्यासंगी, चिकित्सक, रसज्ञ आणि कर्ते पुरुष आहेत. जनार्दन बाळाजी मोडक आणि वामन दाजी ओक हे या पत्रलेखकांत अग्रगण्य असून, मोरोपंतावरील निबंधाच्या बाबतींत ओक आणि चिपळूणकर यांच्यांत झालेला समर-चमत्कार जितका सुचिर तितकाच आजसुद्धा रुचिर वाटण्यासारखा आहे. याशिवाय, निनांवी किंवा टोपणनांवी अशींहि जीं बरीच पत्रें 'मालें'त आलेलीं आहेत, तीं निराळींच. या सर्व पत्रकारांनी काव्य, साहित्य, इतिहास, ज्योतिष, गणित, विज्ञान, समाजसुधारणा, राजकारण इत्यादि विषयांवर उपयुक्त आणि उद्बोधक पत्रे लिहून 'माला'कारांनी प्रवर्तिलेलें महासत्र आपल्या सूक्ष्म, पांडित्यप्रचुर, नावीन्यपूर्ण विचारप्रदानानें समृद्ध केलें, यांत शंका नाही.

'निबंधमाला' काढल्यानंतर चिपळूणकरांनी पुढे जे अनेक उद्योग एकामागून एक हातीं घेतले, त्या सर्व उद्योगांत त्यांना निरनिराळ्या व्यक्तींचें सहाय्य आणि सहकार्य घेणें भाग पडलें. पण 'माले'चें लेखन, संपादन आणि कारभार हा मात्र आरंभापासून अखेरपर्यंत अगदी एकटाकी आणि एकहाती होता. त्यांच्या अंतर्मुख, आत्मविश्वस्त, एकाकी जीवनाचा 'निबंधमाला' हा जणूं मूर्तिमंत आविष्कारच होय. 'माले'च्या या एकटाकी कारभाराबद्दल ते स्वतःच असें म्हणत असत की, "जे लोक आम्ही लिहूं म्हणत ते अगोदर चांगले काळजीपुरस्सर लिहिणारे नसायाचे व त्यांतून आपले निबंधांत दुसऱ्याचे निबंध घुसडल्याने त्यांत पुष्कळदा मतविरोध होणार. तेव्हा पुस्तकाचें काम सर्वच एकट्याचें असलें,म्हणजे वरील अडचण अर्थातच राहणार नाही." 'माले'चें सर्वच काम एकट्याने करण्याचा हा निश्चय आणि उत्तमांतलें उत्तम विविध साहित्य तिच्या प्रत्येक अंकांत देण्याचा आग्रह या दोन कारणांमुळे अंक अर्थातच दोन दोन महिने उशिरा निघावयाचे. या उशिरासंबंधींचा बोभाटा तिसऱ्या वर्षापासून विशेष सुरू झाला; व पांचव्या वर्षाच्या शेवटीं तर अंक अकरा महिन्यांनीं मागे पडले. तेव्हा, त्यांनी, "आपली प्रिय वाचकमंडळी पांच वर्षांच्या अखेर एक वर्षाची सुटी मंजूर करण्यास फारशी कुरकुर करणार नाहीत," असें गृहीत धरलें;

व "दोन वर्षे चहा प्यायलेलें आपलें घड्याळ येत्यां सालच्या आरंभापासून अगदी वेळेवरोबर लावण्या "च्या निर्धाराने 'मंडूकप्लृति' केली. तथापि, 'माले'च्या शेवटल्या अंकांत, आपल्या देशबंधूंचा निरोप घेतांना, या उशिराचें जें समर्थन त्यांनी केलेलें आहे, तें मात्र सर्वच दृष्टींनी अगदीं समर्पक आणि मार्मिक वाटतें. "दुर्मतध्वंसनार्थ उचललेल्या आपल्या धनुष्यास तूर्त रजा देण्या"चा आपला हा संकल्प जाहीर करितांना त्यांनी 'उपसंहारां'त असे उद्‌गार काढलेले आहेत की--

"गेल्या आठ वर्षांत सदरील पुस्तकाचा जो आम्ही अव्याहत उद्योग केला त्याला आमच्याच देशांत काय पण पाश्चात्य देशांतहि तोड सांपडणार नाहीं असें म्हटलें असतां गर्वोक्ति केल्याचा दोष माथीं येईल असें आम्हांस वाटत नाहीं. मासिक किंवा त्रैमासिक पुस्तकाची कोठेंहि स्थिति पाहिली, तरी येवढा डोलारा कोणी एकट्यानेंच शिरीं वागवला आहे असें आम्हांस तर अद्याप कोठें आढळलें नाहीं. केवळ भाषांतररूप किंवा प्रकाशनरूप पुस्तक असलें तर वरील गोष्ट सुसंभाव्य आहे. पण स्वतंत्र निबंधरचनेचा विचार केला असतां ती पद्धति वरच्याहून किती भिन्न आहे हें कोणाच्याहि सहजगत्या लक्षांत येणारें आहे. असलें काम म्हटलें म्हणजे चारचौघांचे जेव्हां हात लागतील तेव्हां तें उठायाचें. आज अमक्यानें लिहिलें, उद्या तमक्यानें लिहिलें, हा विषय एकानें घेतला, दुसरा विषय दुसऱ्यानें घेतला, याप्रमाणें 'दसकी लकडी एक का बोजा' या न्यायानें प्रस्तुत उद्योग उभारला जाऊन चालत असतो. तर हें बहुजनसाध्य कार्य आम्ही स्वतःच अंगीकारलें असतां त्यांत इतक्या अडचणी आल्या व तें वरचेंवर मागे पडत असे या गोष्टीचें वस्तुतः पाहतां कोणास आश्चर्य करण्यास कारण नसून इतक्या विषयांवर इतका काळ पावेतों आम्ही लेखणी चालवली आणि कोणापाशी एक छदाम किंवा एक ओळही न मागतां, अगर मेहेरबान डायरेक्टर साहेब किंवा ट्रान्स्लेटर साहेब यांच्या मेहेरबानीची बिलकुल फिकीर न करतां हें महासत्र संपवून आज अवभृथस्नानाला मोकळे होणार हीच विशेष गोष्ट असें म्हणण्यास फारसी हरकत दिसत नाही."

'माले'चें स्वरूप, प्रसार, प्रगति, प्रभाव इत्यादि गोष्टींसंबंधींचें चिपळूणकरांचें स्वत:चें हृद्गत प्रत्येक वर्षाच्या शेवटीं केलेल्या समालोचक लेखांतून अगदी प्रांजळपणानें प्रकट झालेलें आहे. त्यावरून हें स्पष्ट दिसतें की, 'माले'चे कांही विशेष आणि वैगुण्यें हीं दोन्ही ज्याप्रमाणें ते स्वाभाविक समजून चाललेले होते, त्याप्रमाणेच तिच्यावरील कांही आरोप आणि आक्षेप यांचाहि अंदाज त्यांनी प्रथमपासूनच आपल्या मनाशीं करून ठेवलेला होता. पहिल्याच वर्षाच्या शेवटीं केलेल्या समालोचनांत त्यांनी असें म्हटलेलें होतें की, "सदहू पुस्तकाविषयी कितीकांच्या ज्या कल्पना झाल्या आहेत त्यांचें आम्हास मोठें नवल वाटतें. या पुस्तकाचा उद्देश ज्यास त्यास शिव्या द्याव्या, ज्याची त्याची फजीती करावी, एवढाच पुष्कळांच्या मतें आहे. इंग्लिश लोक, नवीन विद्वान्, मोठमोठे ग्रंथकार वगैरेंची मानहानि करून आपली प्रतिष्ठा मिरवावी, इतकाच या लिहिणाऱ्याचा उद्देश आहे असें कित्येकांचें मत आम्हास समजलें आहे. आमचे ख्रिस्ती बंधु 'ज्ञानोदय' महाराज यांनी तर आम्हावर मोठाच कडाका उठवून राजद्रोहहि ते आम्हावर शाबीत करूं पाहत आहेत." पण, 'माले'वर अगदी प्रारंभापासून सतत होत गेलेल्या या प्रतिटोकेची व तिच्याबरोबरच नंतर झालेल्या इतरहि प्रत्याघातांची यत्किंचित्सुद्धा पर्वा न करितां चिपळूणकरांनी "अनेक दुर्मतांचें सत्यदेवतेच्या प्रीत्यर्थ हवन करण्याचें व 'तक्षकाय स्वाहा इंद्राय स्वाहा' असा वषट्कारहि अनेक वेळा उच्चारण्या"चें आपलें व्रत शेवटल्या क्षणापर्यंत अखंड चालू ठेवलें. कारण, "आजपर्यंत आमच्या देशाच्या हरएक गोष्टीविषयी–आमच्या विद्येविषयीं, स्वभावाविषयी, आचाराविषयी, धर्माविषयी, भाषांविषयी, कवितेविषयी वगैरे ज्या लोकांच्या समजुती ठरून गेल्या होत्या, त्यांपैकी कित्येक निःशंकपणे खोडून टाकून खोट्या ठरविणें.. आणि....आमच्या बुद्धीनें जे जे आम्हांस खरें भासलें व ज्याच्या सत्यत्वाविषयी आम्हांस स्वत: संशय उरला नाही, तें तें कितीहि लोकमतविरुद्ध असलें तरी आमच्या सुज्ञ व निःपक्षपाती वाचकांस प्रमाणासहित सादर करणें," हा त्यांचा बाणा होता. हा बाणा हेंच 'निबंधमाले'चें वैशिष्ट्यच होय; व तिच्यांतील वैगुण्यें हीं या वैशिष्ट्यांतूनच उद्भवलेलीं आहेत, हें तिच्याविषयी विचार करितांना लक्षांत ठेवलें पाहिजे.

# १५

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्रजी साम्राज्यसत्तेच्या शोषक नीतीची जाणीव झाल्यामुळे जागृत झालेल्या जनतेची जी क्षोभशक्ति हळुहळू बळ घेऊन, निरनिराळ्या निमित्तांनी आणि रूपांनी, ठिकठिकाणी आविर्भूत होऊं लागली, त्या शक्तीचेंच एक रूप 'निबंधमाला' हेंहि होय. ही क्षोभशक्ति प्रारंभीं अंतर्मुख होती, पुढे बहिर्मुख झाली. पारतंत्र्याबरोबरच पाश्चात्य संस्कृतीचा जो पहिला आघात भारतीय धर्म, संस्कृति आणि जीवनप्रणालि यांच्यावर झाला, त्यामुळे जनतेचा स्वत्वाभिमान डिवचला आणि दुखावला जाऊन, त्यांतल्या त्यांत जे जिज्ञासु, विचारी लोक होते, त्यांची दृष्टि आपला धर्म, संस्कृति आणि जीवनप्रणालि यांतील कोणत्या दोषांमुळे आपल्यावर पारतंत्र्याचें हें अरिष्ट ओढवलें, याचा शोध घेण्याकडे प्रथम वळली. विदेशी ख्रिस्ती मिशनरी आणि इंग्रजी अध्यापकवर्ग यांनी ते दोष चवाट्यावर आणून जाहीर रीतीने चिवडावयाला सुरवात केलीच होती; व जीं नवीन नियतकालिकें आता एकामागून एक निघूं लागलीं होतीं, त्यांनीहि हें दोषाविष्करणाचे काम मोठ्या ईर्ष्येने हातीं घेतलेलें होतें. भारतीय धर्म, संस्कृति आणि जीवनप्रणालि यांचें अंतरंग पारखून त्यांतील दोषांचा आविष्कार आणि उन्मूलन करण्यासाठी ही जी मोहीम ख्रिस्ती मिशनरी, इंग्रजी अध्यापक, सरकारी अधिकारी, त्यांच्या तालमींत तयार झालेले नवे सुधारक आणि पत्रकार यांनी, आपआपल्या विशिष्ट उद्देशांनुसार, घडाक्याने आरंभिली होती, तिचे परिणाम इष्ट आणि अनिष्ट असे दोन्ही प्रकारचे झाले: इष्ट परिणाम हा कीं, ज्या या नवीन पाश्चात्य विजेत्यांशीं आपला संसर्ग आलेला आहे, त्यांचे गुण, जीवनदृष्टि आणि विद्या हीं कांही एका मर्यादेपर्यंत तरी आपण आत्मसात् केल्याविना आपली उन्नति होणार नाही, अशी अत्यंत प्रबळ जाणीव सर्वत्र उत्पन्न झाली; व अनिष्ट परिणाम हा की, आपला धर्म, संस्कृति आणि जीवनप्रणालि यांच्याविषयी मनांत अगदी घृणा उद्भूत होऊन नव्या राज्यकर्त्यांशीं सामीप्य आणि सारूप्य साधण्यांतच या देशाच्या उद्धाराची आशा आहे, या

भावनेने कांही नवशिक्षित लोक अंतर्बाह्य इंग्रजी बनण्याच्या उद्योगाला लागले. रेव्हरंड बाबा पदमनजी यांनी 'प्रभाकर,' 'ज्ञानोदय' आणि 'ज्ञानप्रकाश' हीं त्या काळांतलीं तीन प्रमुख मराठी वृत्तपत्रें वाचून आपल्या मनावर जो संस्कार झाला, त्याचें असें वर्णन आपल्या आत्मचरित्रांत केलेलें होतें की, "...... ह्या तिन्ही पत्रांकडून माझी तीन प्रकारची सुधारणूक झाली. म्हणजे 'ज्ञानोदया'ने माझी ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेविषयी व हिंदु धर्म ईश्वरप्रणीत नाही याविषयी खातरी केली. 'प्रभाकरा'ने माझ्या मनांत ब्राह्मणांविषयी जी पूज्य बुद्धि होती, ती नष्ट केली ..... आणि 'ज्ञानप्रकाश'ने नास्तिक मतांकडे माझी प्रवृत्ति होऊं दिली नाही. ...... 'प्रभाकर' पत्र रा. भाऊ महाजन हे काढीत असत. हे गृहस्थ विद्वान् असून पहिल्या प्रतीचे मराठी लिहिणारे होते . ... ख्रिस्ती धर्माविषयी त्यांचें असें मत होतें की, मनुष्याच्या सामाजिक सुखाच्या वृद्धीसाठी हा धर्म फार चांगला आहे. त्यांच्या पत्रांत 'लोकहितवादी' या सहीची जी दीर्घ निबंधमाला येऊं लागली होती, तिजपासून मला अत्यंत उपयोग झाला. ब्राह्मणधर्म व ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व यांजवरील माझा विश्वास व पूज्यबुद्धि हीं उत्तरोत्तर नष्ट होण्यास ही पत्रमालिकाच बहुतेक कारण झाली." एका बाजूने मनी, एर्स्डेल, हेंडर्सन, बेल यांच्यासारख्या नव्या इंग्रजी शाळांतले अध्यापक आणि दुसऱ्या बाजूने नेस्बिट, मिचेल, विल्सन, व्हॅलंटाइन प्रभृति ख्रिस्ती धर्माचे प्रचारक यांनी संगनमताने नवशिक्षितांना ख्रिस्ती धर्मांत ओढण्याचें काम त्या वेळीं जोराने चालविलेलें होतें; व तत्कालीन वृत्तपत्रांतून हिंदु संस्कृतीवर सतत येत असलेली विध्वंसक टीका ही त्या प्रचाराला पर्यायाने पोषक होत होती. मिशनरींनी चालविलेल्या शाळांतून जो हा भारतविरोधी प्रचार सारखा चालत असे, त्याचें स्वरूप किती व्यापक आणि भयानक होतें, याचें एक अगदी लहानसेंच पण अत्यंत सूचक प्रत्यंतर सर नारायण चंदावरकर यांच्या आठवणींत पाहावयाला मिळतें. १८६९ सालीं सर नारायण हे शिक्षणार्थ कारवारहून मुंबईस आल्यावर त्यांच्या मामांनी त्यांना सेंट मेरी स्कूलमध्ये घातलें. एक दिवस त्या शाळेंतले एक फादर वर्गांत बोलतांना सहज उद्गारले, "आशियांत जन्माला येणें हें एक पापच

आहे !" (It is a sin to be born in Asia!) त्यावर सर नारायण यांनीं त्यांना तावडतोब उठून विचारलें की, " गुरुजी, ख्रिस्त हा आशियांतच जन्मलेला नव्हता काय ? " (Sir, was not Christ born in Asia ?) असला उर्मटपणाचा प्रश्न शिक्षकाला विचारल्याबद्दल सर नारायण यांना शिक्षा करण्यांत आली, हें सांगावयाला नकोच.

सभा, शाळा, नियतकालिकें इत्यादि प्रचाराच्या निरनिराळ्या क्षेत्रांतून आणि साधनांतून हिंदु संस्कृतीची जी ही सारखी निर्गल नालस्ती, अंशतः आत्मपरीक्षणाच्या ईर्ष्येने आणि अंशतः धर्मप्रसाराच्या लालसेने, सर्वत्र सुरू झालेली होती, तिचे परिणाम कनिष्ठ जातींवर तर अतिशयच विपरीत, विकृत आणि विग्राहक झाले. हिंदु धर्मांतील सर्वव्यापी विषमता, अमानुप रूढि आणि त्यांच्या परिपालनाच्या बाबतींत दक्ष असलेल्या वरिष्ठ जाति यांच्याबद्दल जशी एका बाजूने त्यांच्या मनांत विलक्षण चीड उफाळून उठली, तसाच नव्या परकीय राज्यकर्त्यांच्या काटेकोर, उदार न्यायनीतिविषयी आदरयुक्त गाढ विश्वासहि त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाला. त्यांतच पुन्हा आपल्या राजवटीची घडी बसविण्याच्या कामीं इंग्रजांनी जे वरिष्ठ जातींतील लोक हाताशीं धरले, त्यांनी, स्वतःची तुंबडी भरण्यासाठी, रयतेची पिळणूक आणि पायमल्ली करण्याच्या बाबतींत कांही सुमार ठेवला नाही. त्यामुळे वरिष्ठ जातींसंबंधींची ही चीड, राजकीय आणि आर्थिक कारणांची जोड मिळून, शतगुणित झाली. ता. १९ मार्च १८४८ रोजी लोकहितवादीनी जें आपलें पहिलेंच पत्र 'प्रभाकर' मधून प्रसिद्ध केलें, तें पुण्याच्या ब्राह्मण फौजदारांच्या दुराचरणाबद्दल होतें या पहिल्या आणि नंतर 'नेटीव अंमलदारां'विषयी लिहिलेल्या नवव्या पत्रांत त्यांनी असे उद्‌गार काढलेले होते की,—

" हल्ली अशी बातमी कळली आहे की पुणें येथे राज्य बुडाल्यापासून फौजदार कोतवालीचे कामावर ठेवीत होते, त्यापैकी जे ब्राह्मण फौजदार झाले, त्या सर्वांची बहुत करून वहिवाट दुरुस्त नाही, असें अनुभवावरून कळलें, व माजी फौजदार बळवंतराव गोविंद याजवर तर दरवड्यांचे वगैरे अपराध स्पष्टपणें शाबिद होऊन त्यास मोठी शिक्षा झाली. तेव्हा

ब्राह्मण लोक अविश्वासु आहेत; याजकरिता येथील अधिकाऱ्यांनी असें मनांत आणलें आहे की, या कामावर पुनरपि ब्राह्मण न नेमितां ख्रिस्तीयन धर्मांतील मनुष्य नेमावा. त्यास याविषयी मी थोडासा मजकूर आपल्यास लिहून पाठवितों. हा जर कृपा करून आपलें पत्रद्वारें प्रसिद्ध होईल, तर ब्राह्मणांवरील दोष निवारण होईल, असें वाटतें.

...पुण्यांत बहुत संभावित व कुलीन व सरंजामदार व पेन्शनवाले गृहस्थ आहेत. परन्तु त्यांतील चांगला मनुष्य आणि विद्वान् आजपर्यंत कामावर कोठे ठेवला असें जाहलें नाही. शाळेंतील शिकलेले, कुलीन व विद्वान यांचे विषयी तर सरकारने बहुत वेळ हुकूम पाठविले आहेत. परन्तु जिल्ह्यांतील साहेब लोक या सर्वास एकीकडे ठेवितात आणि आपले कृपेंतील एखादा मनुष्य त्याचें कुलशील चांगले नसले व अगदी कवडीचा माल असला, तरी त्यास ठेऊन "रजाचा गज" करितात व याप्रमाणें कुलहीन लोक इंग्रजांचे दरबारांत फार जमले आहेत. त्यामुळे ब्राह्मण लोकांची अब्रू कमतर दिसते, हें त्यांचें दुर्दैव म्हणावें. याची तजवीज कोणी मनांत आणीत नाहीत. साहेब लोक मनास येईल तसा दोष ठेवितात हें ठीक नाही. राजाने खराब लोक सन्निध केले तर कारभार चांगला कसा होईल ?

".. मी एकदा खेड्यांत एका कुळंब्याचे तोंडाने ऐकिलें की, साहेबांचे राज्य चांगलें, साहेब न्याय इनसाफ चांगला करितो, पण ब्राह्मण लोक त्यास शिकवून आमची घरें बुडवितात. आणि बहुतकरून सर्व रयतेची समजूत अशीच आहे, आणि ती खरी आहे. हे हलकट लोक फार प्रळय करितात, आणि त्यांस आशा फार. म्हणून जोपर्यंत नेटीव लोक दुर्गुणी व लोभी आहेत, तोपर्यन्त त्यांचा पक्षपात कोणी धरावा ?"

लोकहितवादींच्या 'शतपत्रां 'पेक्षाहि वरिष्ठ जातींच्या या धार्मिक आणि राजकीय जुलुमाविषयीची चीड मागासलेल्या जातींतील आद्य सुधारक, तत्कालीन प्रमुख कार्यकर्ते, 'सत्यशोधक समाजा 'चे संस्थापक महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांच्या 'गुलामगिरी' या छोट्या संवादात्मक

पुस्तकांत तर अत्यंत जलाल आणि जहरी स्वरूपांत प्रकट झालेली आढळते. "भट कामगार इंजिनियर खात्यांत कशी पेंढार गर्दी करितात या विषयी" लिहिलेल्या पोवाड्यांत त्यांनी गोरगरिबांच्या नागवणुकीचें आणि कामगारांच्या लुचपतखोरीचें असें भेदक शब्दचित्र रेखाटलेलें होतें की,—

"पेशवाई दक्षिणा रमणा इंजिनियर खातीं ।
भरिती होळकरी पोतीं ॥ धृ ॥
गवताकरिता नित्य बिगारी घोड्याची भरती ।
पाळिने घोडे खाजविती ॥
फैलामधील शूद्र बायका भांडीं घासिती ।
बिगारी बिछाने करिती ॥
वेडसरसा कुणवी पाहून पाय दाबविती ।
मजेने झोंपा मारिती ॥
स्वजातीचे भिक्षुक ब्राह्मण फैलावर नेती ।
भिक्षा माठून देवविती ॥
मिळकतीचे वांटे हुजूर सोबत्यांना देती ।
समजूत वरच्यावर करिती ॥
दप्तरदारा हप्ते बांधून भेटीला जाती ।
शिपाया विड्यास बोलाविती ॥
ठेपलें गोरें येऊन
कचेरी तंबू घेऊन
थकले शिकार खेळून
कागदी सह्या करून
भटावर बाकी सोंपवून
विसावा ग्लास घेऊन
शोभती खासे कोचास । वाचिती न्यूज पेपरास ।
मान पहा मधी डुकलीस ॥
बिगाऱ्यांच्या कोंबड्या वगैरे सामानाची भरती ।
पैसा मधीच की खाती ॥

लूट धुमाळी पैसा आठवण रमण्याची होती ।
रपोटीं मेळ मिळविती ।।
खजिन्यामधी पैसा सरतां कर योजिती ।
हाडें कुणब्याचीं पिळिती ।।
कर्मनिष्ठ चाकर बनले लक्षाधीपती ।
बुधली कुणब्याची वरती ।।
टोपीवाल्या गुह्य कळतां राजिनामे देती ।
हवेल्या तीन मजली करती ।।

भटजोशी, भटखोत, भटमास्तर, भटकारकून, भटकुळकर्णी, भटचिटणीस, भटमामलेदार, भटइंजिनियर इत्यादि भटकामगार आणि कलमकसाई यांची अदालतीपासून तों नगरपालिकेपर्यंत माजलेली पेंढारगर्दी मोडण्यासाठी आणि या 'ब्रह्मराक्षसां'च्या 'पीडे'चें निवारण करण्यासाठी फुले यांनी 'गुलामगिरी' या पुस्तकांत आपल्या बुद्धीने कांही बिनतोड उपायहि 'माबाप' सरकारला सुचविलेले होते. त्यांपैकी एक उपाय असा होता की,–

"आमच्या दयाळू सरकारने भट समाजाच्या संख्येच्या प्रमाणानें सर्व खात्यांत भट कामगार नेमू नयेत असें माझें म्हणणें नाही. परंतु त्याच प्रमाणानें बाकी सर्व जातींचे कामगार नच मिळाल्यास सरकारानें त्या ऐवजी फक्त युरोपियन कामगार नेमावेत म्हणजे सरकारचे व अज्ञानी शूद्रांचें इतकें नुकसान भट कामगारांस करतां येणार नाहीं. हा याला एक उपाय आहे. दुसरा उपाय असा की, ज्या ज्या युरोपियन कलेक्टरास महाराष्ट्र भाषा स्वच्छ बोलतां येत असेल त्यांस तहाहयात भर पेनशनी देऊन येथेंच खेड्यापाड्यांतून अज्ञानी भेकड बाहुल्यासारख्या शूद्रांत मिसळून ते रहातील असें करावें व त्यांजकडून भटकुळकर्णी वगैरे कामगारांच्या कसबांवर चांगली नजर ठेववावी. येथील सर्व कच्च्या हकीगतीवर त्यांजकडून हमेशा रिपोर्ट मागवूं लागल्यास सरकारी शाळा खात्यांतील भटांच्या गुलाबी लबाड्या उघडकीस येऊन शाळा खात्यांत जी अव्यवस्था झाली आहे तिचा बंदोबस्त थोड्याच दिवसांत होऊन अज्ञानी, गांजलेल्या शूद्रांस खरें ज्ञान मिळेल व मग ते

या भटाच्या कुतर्की अधिकाराचा धि:कार करून आमच्या राणी सरकारचे उपकार कधीहि विसरणार नाहींत अशी माझी प्रतिज्ञा आहे. कारण आम्हां शूद्रांच्या गळयांतील दासत्वाच्या पट्टयाचा घट्टा कोणासहि जलदी घांसून काढवणार नाही."

लोकहितवादी आणि फुले यांच्या या उद्गारांवरून पाश्चात्य संस्कृतीच्या संसर्गामुळे पुढारलेल्या आणि मागासलेल्या अशा दोन्हीहि जातींच्या नेत्यांत जी अंत:शोधनाची तीव्र तळमळ त्या वेळीं उत्पन्न झालेली होती, तिच्या स्वरूपाची यथार्थ कल्पना येते. परमहंस सभा, उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा, कल्याणोन्नायक मंडळी, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज इत्यादि ज्या संस्था १८४० ते १८७५ पर्यंत स्थापन झाल्या, त्यांचा मुख्य उद्देश आपला धर्म, संस्कृति आणि जीवनप्रणालि यांचें शोधन आणि सुधारणा करणें हाच केवळ होता.

जनतेच्या क्षोभशक्तीचा हा अंतर्मुख आविष्कार जितका उत्कट, उग्र आणि उत्शृंखल होता, त्या मानाने तिचा बहिर्मुख आविष्कार मात्र साहजिकच अगदी क्षीण आणि सौम्य होता. कारण, एक तर, इंग्रजी सत्तेच्या दर्शनी सुसंस्कृत स्वरूपामुळे तिचें रक्तशोष करणारें घस्मर आर्थिक धोरण आणि समाजांत अधिकाधिक फूट पाडीत जाणारी कुटिल भेदनीति यांचें आकलन व्हावयाला वेळ लागला; व दुसरें असें की, या दुधारी नीतीची जाणीव ज्या सुशिक्षित वर्गाला प्रथम झाली, तो स्वत: त्या सत्तेचा हस्तक आणि आश्रित होऊन बसलेला असल्यामुळे, तिच्या या नीतिविरुद्ध, एका मर्यादे-पलिकडे जाऊन, त्याला लोकमत जागृत करणेंहि सोईचें नव्हतें. त्यामुळे, आपल्या समाजाच्या अंत:सुधारणेच्या बाबतींत जो प्रचार करावयाचा, तो अगदी भडक आणि बेफाम पद्धतीने करावयाचा व नव्या राजवटींतील दोषांचें जें आविष्करण करावयाचें, तें मात्र अगदी जपून तोलून करावयाचें, असें दुटप्पी धोरण तत्कालीन कार्यकर्त्यांनी आणि पत्रकारांनी अवलंबिलें. इंग्रजी राज्यांतील शोषणाची, विषमतेची आणि भेदनीतीची कल्पना महाराष्ट्राचे पहिले विचाराग्रणी बाळशास्त्री जांभेकर यांना अगदी पुरेपूर आलेली होती, हें त्यांच्या 'रहदारी जकाती', 'या देशाचे लोकांतून मोठ्या सरकारी

जागांवर नेमणुका', 'मध्यविभागांतील पोलिस खात्याचें गैरवर्तन', 'सातारचा राजा आणि ब्रिटिश यांच्यांतील वैमनस्य', 'ब्रिटिश सरकारचें हिंदी संस्थानां-संबंधींचें धोरण' इत्यादि 'दर्पणां'तील लेखांवरून स्पष्ट दिसतें. तथापि, जांभेकर हे स्वतः सरकारी अधिकारी आणि त्याहिपेक्षा स्वभावतःच सौम्यप्रकृति असल्यामुळे, त्यांनी या राजकीय प्रश्नांवर, लोकांच्या लक्षांत तर निरनिराळ्या अन्यायांचें स्वरूप पूर्णतया यावें, पण सरकारच्या जिव्हाळीला तर त्या दोषदर्शनाचा दंश जाणवूं नये, अशा बेताने आपली लेखणी चालविली. परंतु, त्यांचे सहकारी पत्रकार भाऊ महाजन यांना नोकरीचें बंधन नसल्यामुळे, त्यांनी मात्र आपल्या 'प्रभाकर' पत्रांतील संपादकीय लेखांतून आणि पत्रव्यवहारांतून इंग्रजी राज्यनीतीचा दंभस्फोट उघड उघड केला. 'प्रभाकरां'तील एका लेखांत त्यांनी असा सरळच जाब विचारला होता की, " हिंदुस्थानांतून द्रव्य जातें तें बंद झाल्याशिवाय देशाची बरी गत नाही. इंग्रज लोक येथून द्रव्य नेतात यास प्रमाणें फार आहेत. जर हिंदुस्थानांतून रोकड जात नाही तर दोन अडीच कोट रुपयांचा माल दर वर्षास विलायतेहून अधीक येतो, त्याचा पैका कसा फिटतो ? हें त्याणेंच सांगावें. . . . . हिंदुस्थानची गरीब दशा किती आहे ही ज्यास पाहणें आहे त्याणें कोकणांत आणि देशावर खेड्यांतून आणि गांवांतून फिरावें आणि लोकांची सध्याची खरी हकीगत पुसावी म्हणजे समजेल. इंग्रजी अंमलदार हजारो रुपये पगार खाऊनहि लक्षावधी रुपये लांच खातात !" 'प्रभाकरा'च्या ता. १३ मार्च १८४२ च्या अंकांत 'एक कोकणस्थ' या सहीने जें विस्तृत पत्र आलेलें होतें, त्यांत तर इंग्रजी राज्यनीतीच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा अतिशयच मोकळेपणाने केलेली होती. या 'कोकणस्था'ने असें म्हटलें होतें की,—

" इंग्रेज लोक यांहीं हिंदुस्थान घेतल्यापासून त्यांचे ग्रंथकार व वर्तमान-पत्रवाले त्यांची नेहमी तारीफ करित असतात कि आपल्याकडे हिंदुस्थान आल्यापासून तो देश दिवसंदिवस सुधारत चालला आहे. लोक मोट सुखी होताहेत आणि त्यांचे हातीं हें राज्ये दिल्ह्यावरून ईश्वराने हा हिंदु लोकांवर मोटा अुपकार केला असी नाना तऱ्हेची बडबड ते करित

असतात. त्यास असी वडबड करण्यास त्यांस काय आधार आहे तो मला समजत नाही. परंतु मला अेक वाटतें कीं हिंदु लोक अज्ञान आहेत तेणेकरून त्यास आपली स्थिती कोणत्या प्रकारची आहे आणि अुत्तरोत्तर कसी होत जाअील याजविषयी कांहीच समजत नाहीं व दुसरें त्यांस इंग्रेजी भाषेचें ज्ञान नसतें. त्यामुळे ते इंग्रेज लोक ग्रंथांतून काय लिहितात हेंही समजत नाहीं. असी संधि सापडल्यामुळे ते इंग्रेज युरोपांतील दुसरी मोटमोटी राज्यें आहेत त्यांस भुलथाप देण्याकरितां अशा लवाडचा करितात. त्यास त्यांचा अशा लबाडचा चालु नये आणि या लोकांस इंग्रेज लोकांची दगलबाजी समजावी आणि आपले हिंदु लोकांचे या बाबे डोळे उघडावे अशा हेतुने तुमचासारखे जे विद्वान पुरुष आहेत त्याहीं आपले लेखणीस विसावा न होतां हमेशा या गोरे लोकांचा काळेपणा यत्किंचित् अुघडकीस आणावा असा तुमचा धर्म होय असें आसतां आज चार पांच महिने होत आले तुमचे पत्र चाललें आहे परंतु हा विषय अद्यापि तुम्ही काढला नाहीं.

इंग्रेज लोक यांहीं हिंदुस्थानावर काय अुपकार केले हें पाहूं गेलों असतां मला अेकही आढळत नाही. ते आत्मस्वार्थि लोक परमुलखांतून आलेले मुळचे केवळ बुभुक्षित आणि दरिद्री असे जे लोक ते हिंदुस्थानांत पहिल्यानें आले तेव्हां तेथील संपदा व वैभव पाहून सहज चकित जाहालेच असतील. तेव्हां प्रथमतः त्यांचे मनांत ती संपदा आपले मुलुकांत न्यावी याशिवाय दुसरी कल्पनाच आलि नसेल!!"

याच सुमारास, म्हणजे १८४१ सालांतील जुलै ते आक्टोबर महिन्यांत, दादोबा पांडुरंग यांचे वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी मृत्युमुखीं पडलेले धाकटे बंधु भास्कर पांडुरंग तर्खडकर यांनी मुंबईच्या 'बॉंबे गॅझेट' या ॲंग्लो-इंडियन वृत्तपत्रांत 'ए हिंदु' या सहीनें जीं आठ पत्रें लिहिलीं, त्यांत केलेली इंग्रजी राज्यनीतीची विचिकित्सा आणि विदारणा इतकी मूलगामी आणि मर्मभेदक होती की, ती इतक्या निःस्पृहतेने करण्यांत तर्खडकरांनी दाखविलेलें धैर्य आणि तिला आपल्या साप्ताहिकांत स्थळ देण्यांत 'बॉंबे गॅझेट'चे संपादक जे. डब्ल्यू. कॉसकॅंडन यांनी दाखविलेलें

औदार्य यांचें आजसुद्धा नवल वाटल्याविना राहत नाही. दादोबांनी या पत्रांचें असें वर्णन केलें होतें की,—

"माझे प्रिय बंधु भास्कर हे सर जमशेटजी जीजीभाई यांच्या ऑफिसांत इंग्लिश क्लार्क असतां इ. स. १८४७ सालच्या जून महिन्यांत १७ वे तारखेस अकस्मात् छातींतून रक्त पडून तीन चार तासांत परलोकास गेले......त्या काळीं मुंबईंत कोरियर व गॅझेट व आणखी एक वर्तमानपत्र निघत होतें. त्या पत्रांत या आमच्या बंधूंनी इंग्लिश पत्रें लिहून पुष्कळ प्रसिद्ध केलीं. त्यांचा मुख्य विषय स्वदेशकल्याणपर असे. इंग्लिशांची राजनीति केवळ स्वार्थपर. जींत लोकांचे व देशाचें कल्याण होणे दुरापस्त असें त्यांहीं तेव्हां पूर्णपणें जाणिलें. त्या आमच्या बंधूंची इंग्लिश भाषेंत इतकी सुंदर शैली पाहून व त्यांणी प्रसिद्ध केलेल्या पत्रांच्या विषयांचा उद्दाम व स्वतंत्रपणा पाहून त्या काळचे पुष्कळ इंग्लिश व सिव्हिल सर्व्हंट विस्मय करूं लागले. त्यांची तीं पत्रें 'ए हिंदु' ('एक हिंदु') या सहीची होती. त्या वेळचे विद्यार्थि व इंग्लिश शिकलेले तरुण लोक तर तीं पत्रें मोठ्या विस्मयानें व उत्कंठेनें वाचित असत. ........ त्या काळचीं वर सांगितलेलीं इंग्लिश वर्तमानपत्रें व त्यांत प्रसिद्ध केलेलीं आमच्या बंधूंची देशकल्याणाचीं व लोकहितवादाची पत्रें आतां कोठेंच दिसत नाहींत, त्याचा आम्हास मोठाच खेद वाटतो. कारण तीं पत्रें व त्यांची इंग्लिश लिहिण्याची शैली पाहून दर्पणकर्ते जे विद्वान् बाळ गंगाधर शास्त्रीही कांही दिवस मोठे चकित होते."

या आपल्या पत्रांत तर्खडकरांनी इंग्रजी राजवटीविषयी असे जळजळीत उद्गार काढलेले होते की,--

"पेंढारी आणि रामोशी यांच्या तावडींतून आम्हाला सोडविल्याबद्दल तुम्हांला दुवा द्यावयाला जावें, तर तुमची बनियेगिरी त्याच्या आड येते. खरोखरी, या टोळ्यांनीं गेल्या पांच सहाशें वर्षांत आमच्यावर धाड घालून आमची जितकी लूट केली नसेल, त्यापेक्षां आमची किती तरी जास्त लूट अगदीं थोड्या दिवसांत तुमच्या बनियेगिरीनें

केलेली आहे....सती, बालहत्या किंवा ठगी यांच्यासारखे प्रकार बंद करण्यांत तुम्ही थोडीबहुत सहृदयता दाखविली आहे, ही गोष्ट मी मान्य करितों. पण, तुमच्या राजकीय क्रौर्याच्या गदारोळापुढें हीं भूतदयेचीं सर्वसामान्य कृत्यें अगदीं लोपून जातात. तुमची महत्त्वाकांक्षा आणि आत्मप्रीति यांनीं आमच्या देशबांधवांत आज जो कहर उडवून दिलेला आहे, तसा प्रळय त्यांनीं पूर्वीं कधी पाहिलेला नसेल." (३०-७-१८४१)

"आपला लौकिक, राष्ट्रीय दानत आणि पत यांना हरताळ फासून राजा प्रतापसिंह याच्यासारख्या इतक्या शहाण्या आणि नामांकित राजाला पदच्युत करण्याइतका त्याच्याविषयीं मत्सर आणि द्वेष बाळगण्याचें सरकारला काय कारण होतें? हिंदुस्थानाच्या राज्यकारभारासंबंधी ज्याला कांहीं माहिती नाहीं, तो या प्रकरणांत कांहीं तरी रहस्य आहे, असाच निष्कर्ष काढील. पण आम्हांला मात्र या कृत्याबद्दल कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. कारण, शहाणा आणि कर्तबगार राजा सरकारला मुळींच नको आहे, हें आम्ही पुरेपूर जाणतों. दुबळा आणि नाकर्ता राजा हाच सरकारला जास्त सोईचा वाटतो..हिंदुस्थानांतील सर्व देशी संस्थानिकांत सातारचा माजी राजा हाच काय तो राज्य करण्याचें कांही ज्ञान असलेला आणि सुविख्यात संस्थानिक होता. पण, ज्या या गोष्टींमुळे त्याची चांगल्या मंडळींत चहा होती, त्याच गोष्टी त्याच्या पदच्युतीला कारण झाल्या आहेत. (१३-८-१८४१)

"इंग्रजी राज्य हा हिंदुस्थानाच्या नशिबाला आजपर्यंत कधी न आलेला असा अत्यंत जहरी शाप आहे, याव्यतिरिक्त त्या राज्याविषयीं आमची दुसरी भावना राहूंच शकत नाहीं. (We cannot look upon your Government in any other light than that of the most bitter curse India has ever been visited with.) हिंदुस्थानाची सर्व संपत्ति इंग्लडला नेण्यांत आली आहे आणि आम्हांला आतां कांहींहि कामधंदा उरलेला नाहीं....हाय रे नशिबा! हिंदुस्थानांतील सर्व मोलवान्

> वस्तु त्याच्यापासून हिरावून घेतल्याशिवाय आणि त्याच्या संतानांना भिकेला लागल्याशिवाय ज्यांचें समाधान होणार नाहीं, अशा दैत्यांच्या तावडींत आज हा देश सांपडलेला आहे." ( २०-८-१८४१ )

मुंबईसारख्या राजधानीच्या शहरांतील 'बॉम्बे गॅझेट' सारख्या प्रमुख इंग्रजी वृत्तपत्रांत हीं आठ पत्रें प्रकाशित झालीं होतीं, ही गोष्ट ध्यानांत घेतली असतां तर, तर्खडकरांनी त्या काळांत प्रकट केलेलें हें धारिष्ट खरोखरीच अलौकिक ठरतें. चिपळूणकर, आगरकर आणि टिळक यांनी सरकारवर तुटून पडण्याच्या बेदरकार धारिष्टाची ही परंपरा पुढे पराकोटीला नेली. पण, तर्खडकरांनी ज्या परकीय इंग्रजी राज्याचा धिक्कार 'जहरी शाप' या समर्पक शब्दांनी १८४१ सालीं केला, त्याच या इंग्रजी राज्याची प्रशस्ति 'ईश्वरी योगायोग' आणि 'ईश्वरी वरदान' असल्या भाविक शब्दप्रयोगांनी नंतरच्या पिढींतील लोकहितवादी आणि रानडे यांच्या सारख्या द्रष्टयांनी पुढे वर्षानुवर्षं कंठरवानें करीत रहावें, ही घटना किती उपरोधपूर्ण आहे !

# १६

या दुहेरी प्रक्षोभाचें एका परीने विचित्र पण सर्वस्पर्शी प्रतिबिंब जर कुठे पाहावयाला मिळत असेल, तर तें लोकहितवादींच्या 'शतपत्रां'त. लोकहितवादी यांचें खरें नांव रा. ब. गोपाळराव हरि देशमुख (१८२३-१८९२). त्यांचे वडील हरिपंत हे पेशव्यांचे शेवटले सेनानी बापू गोखले यांचे फडणीस होते. रावबाजी ब्रह्मावर्तास गेल्यावर हरिपंत हे त्यांचे वकील म्हणून पुण्यास राहिले. पुणें ताब्यांत घेतल्यावर, पेशव्यांच्या पक्षाच्या सर्व लोकांनी आपल्याला दोन महिन्यांच्या आंत येऊन भेटावें आणि नव्या सरकारशीं एकनिष्ठ राहण्याची ग्वाही द्यावी, अशा आशयाचा जाहिरनामा एल्फिन्स्टनने काढला होता. पण, हरिपंत हे त्या वेळीं बाजीरावाच्या देशोधडीला लागलेल्या फौजेबरोबर हिंडत असल्याकारणाने,

एल्फिन्स्टनला मुदतींत भेटूं शकले नाहीत. त्यामुळे त्यांची सालिना दहा हजार रुपये उत्पन्न असलेली तीन गांवांची जहागीर जप्त करण्यांत आली. तथापि, स्वतः खुद्द बाजीरावानेच एल्फिन्स्टनकडे रदबदली केल्यामुळे, मागील बाकीच्या भरपाईसह १८२४ सालीं हरिपंतांना त्यांचा सरंजाम परत मिळाला. १८३६ सालीं ते मरण पावल्यावर ही जहागीर, त्यांच्या स्वतःच्या हयातीपुरतीच भोगवटयाला दिलेली होती, अशी सबब सांगून खालसा करण्यांत आली. पण, याहि प्रसंगीं पुन्हा बाजीरावाने ब्रह्मावर्ताहून थेट विलायतेपर्यंत खटपटी केल्यामुळे, जहागीर जरी सुटली नाही, तरी हरिपंतांच्या तिन्ही मुलांना, सरकारी नोकरी लागेपर्यंत, दोनशे रुपये वर्षासन देण्याचें औदार्य मेहेरबान कंपनी सरकारने दाखविलें. अशा रीतीने राज्यक्रांतिमुळे झालेल्या परिवर्तनाचे चटके जन्मल्या दिवसापासूनच अनुभवावे लागल्याकारणाने, तीव्र बुद्धीच्या गोपाळरावांनीं नवी इंग्रजी विद्या संपादन करण्याचा निश्चय केला; व १८४१ सालीं ते पुण्याच्या सरकारी इंग्रजी शाळेंत दाखल झाले. तेथे तीन वर्षें शिक्षण घेतल्यावर १८४४ सालच्या मेमध्ये, इंग्रजी भाषेंत प्रावीण्य मिळविल्याबद्दल आणि कोणत्याहि मानाच्या जागेवर काम करावयाला पात्र असल्याबद्दल त्या शाळेचा मुख्याध्यापक एस्डेल याचें प्रशस्तिपत्र घेऊन, ते बाहेर पडले. त्यांच्यासारख्या सरदारी पेशाच्या देशमुख घराण्यांतील मुलाने इंग्रजी शिक्षण घ्यावें आणि सरकारी नोकरी धरावी, या दोन्ही गोष्टी त्या वेळीं पुण्यांत इतक्या अपूर्व होत्या की, गोपाळरावांना घरांतील वडील मंडळीची नजर चुकविण्यासाठी आपल्या वाड्यांतील विहिरीच्या कोनाड्यांत बसून अभ्यास करावा लागला आणि दक्षिणेंतील सरदारांच्या एजंटाच्या कचेरींत भाषांतरकाराची नोकरी धरल्यावर सायंकाळीं सचैल स्नान करून घरांत पाऊल ठेवावें लागलें ! १८४४ सालीं ७७ रुपये पगारावर त्यांनी राजसेवेला सुरवात केली; व क्रमाक्रमाने हेड क्लार्क, शिरस्तेदार, मुन्सफ, असिस्टंट इनाम कमिशनर, सेशन्स जज्ज इत्यादि बढतीच्या जागांवर चढत जाऊन १३५० रुपये पगार असतांना १८७९ सालीं ते निवृत्त झाले. नोकरींत असतांनाच १८७७ सालीं, लिटनशाहींतील दिल्ली दरबाराच्या वेळीं, सरकारने त्यांना 'रावबहादुर' हा किताब दिला; निवृत्त झाल्यावर

वर्षाच्या आंतच १८८० साली मुंबई विधानसभेंत त्यांची जादा सभासद म्हणून नेमणूक केली; व १८८१ सालीं 'फर्स्ट क्लास' सरदारांच्या श्रेणींत त्यांना औपचारिक स्थान देऊन त्यांच्या घराण्याच्या पेशवाईंतील प्रतिष्ठेचेंहि पुनरुज्जीवन पर्यायाने केलें. वडिलांनी स्वामिनिष्ठेच्या आहारीं जाऊन गमावलेली जुन्या राजवटींतील सरदारी लोकहितवादींनी, अशा रीतीने, नव्या राजवटीचीं तीन तपें इमानाने सेवा करून परत मिळविली. सेवेंतून मुक्त करण्याच्या वेळीं सरकारने त्यांना ५००० रुपये वर्षासन दिलें; व नोकरीवर असतांना बंद केलेल्या जुन्या २०० रुपयांच्या राजकीय वर्षासनाचीहि त्याला जोड दिली. सेवानिवृत्त झाल्यावर १८८४ सालीं रतलाम संस्थानाच्या दिवाणगिरीचेंहि काम त्यांनी वर्षभर केलें. महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान या तीन प्रांतांत त्यांची नोकरी झाली; व दिल्ली दरबाराच्या वेळीं उत्तर भारताचाहि बराच प्रवास त्यांनी केला. नोकरीच्या निमित्ताने लोकजीवनाचें निरीक्षण करण्याची ही संधि जशी त्यांना मिळाली, तसाच समाजाच्या अंतरंगाचाहि ठाव अंशत: घेण्याचा सुयोग त्यांना लाभला. १८५५ ते १८६१ ते इनाम कमिशनवर काम करीत असतां, जहागिरी, इनामें, वतनें यांच्यासंबंधीचे हजारो जुने कागदपत्र त्यांच्या डोळ्यां-खालून जाऊन, मराठशाहींतील सरंजामी पद्धति, तिचें स्वरूप आणि परिणाम यांचें साक्षात् ज्ञान त्यांना झालें; कमिशनपुढे आलेल्या साक्षी-पुराव्यावरून आपल्या लोकांची दानत किती डागळलेली आणि ढांसळलेली आहे याचा प्रत्यय त्यांना आला; व १८६१ सालीं मुंबई हायकोर्टांत हिंदु आणि मुस्लिम धर्मव्यवहार-शास्त्राची संहिता ( Digest ) तयार करीत असतांना हिंदु धर्मशास्त्रांतील विसंगति, विरोध आणि व्यत्यास हीं ध्यानांत येऊन हिंदु समाजाच्या ऱ्हासाचीं कारणेंहि त्यांना कळून आलीं. १८६० सालानंतर जें धार्मिक, ऐतिहासिक आणि समाजसंशोधनपर वाङ्मय लोकहितवादींनी लिहिलें, त्यांत त्यांच्या या काळांतील अवलोकनाचा अनुभवांचा आणि चिंतनाचा उत्कृष्ट परिपाक सांठविलेला आढळतो. नोकरीवर असतांना त्यांनी नाना विषयांवर विपुल ग्रंथ लिहिले; 'ज्ञानप्रकाश,' 'इंदुप्रकाश,' 'लोकहितवादी' इत्यादि नियतकालिकें काढण्याच्या कामीं पुढाकार घेतला; निरनिराळ्या संस्था स्थापन करून अनेक उपक्रमांना

चालना दिली; व हजारो रुपयांचा दानधर्म सढळ हातांनी करून आपलें 'लोकहितवादी' हें नांव सर्वच दृष्टींनी सार्थ करून दाखविलें.

म्हणूनच, चिपळूणकरांनी त्यांच्यावरील आपल्या टीकात्मक निबंधाच्या प्रारंभीं, "लोककल्याणाच्या निमित्त सतत दीर्घकाळ परिश्रम करणें व या कामाविषयी सदोदित उत्साह बाळगणें, या गोष्टीच्या संबंधाने सर्वांनी व विशेषत: आमच्या अलिकडील कमकुवत मंडळीने रावबहादुरांचा कित्ता घेणें अत्यंत उचित होय," असे मार्मिक उद्गार काढलेले आहेत. लोकहितवादींच्या 'शतपत्रां'तील पहिलें पत्र ता. १९ मार्च १८४८ रोजीं प्रसिद्ध झालें; व त्यांचा शेवटला ग्रंथ 'उदेपूरचा इतिहास' हा १८९२ सालीं बाहेर पडला. या चवेचाळीस वर्षांच्या कालावधींत त्यांनी धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, वाङ्मयीन, ऐतिहासिक इत्यादि विषयांवर सुमारें पस्तीस ग्रंथ लिहिले. चिपळूणकरांनी म्हटल्याप्रमाणे हे ग्रंथ जरी 'प्राय: भाषांतररूपच' असले, तरी त्यांतील विषयांची विविधता आणि व्याप्ति पाहून मनाला खरोखरीच आचंबा वाटतो. किंबहुना, "आकारसदृशी प्रज्ञा प्रज्ञया सदृशागम:" ही कविकुलगुरूची उक्ति लोकहितवादींचें व्यक्तित्व आणि वाङ्मय या दोहोंना अगदी यथार्थतेने लागू पडते, असें म्हणावयाला शंका वाटत नाही. त्यांच्या नुसत्या नियतकालिकांतीलच 'शतपत्रा'दि लेखांचा जो सुमारें १०४९ पानांचा 'महासागराएवढा' प्रचंड ग्रंथ 'निबंधसंग्रह' या नांवाने १८६६ सालीं प्रकाशित करण्यांत आलेला होता, त्यावरून सुद्धा, "या परोपकारी व लोकहितवादी गृहस्थाने जाति, धर्म, शास्त्र, आचार, राज्य, लोकव्यवहार इत्यादि विषयांवर निर्भीडपणाने रास्त विचार दर्शवून" त्या काळांत केवढें लोकजागृतीचें कार्य केलें, याची चांगली कल्पना येते. 'शतपत्रां'त ब्राह्मण, त्यांची विद्या आणि त्यांचा आचारधर्म यांच्यावर जी जलाल टीका केलेली आहे, ती वाचल्यावर साहजिकच असा समज होतो की, लोकहितवादी हे 'बोले तैसा चाले' या कोटींतील कडवे सुधारक असावेत. पण वस्तुस्थिति मात्र अगदी उलट होती. ज्या जुन्या कर्मठ सरदारांची त्यांनी इतकी नालस्ती आपल्या 'पत्रां'त केलेली आहे, त्यांच्यासारखीच त्यांची स्वत:चीहि दिनचर्या आणि रहाणी

होती. "कोट वगैरे त्यांनी कधीहि घातला नाही. चाकरीवर असतांना कचेरीचे वेळीं कोट, बूट व स्टॉकिंग कोर्टातच ठेवलेले असत. ते घालून कामावर बसत व काम संपल्यावर तो पोषाख तेथेच काढून ठेवीत." त्यांचे स्नेही, त्या वेळचे विख्यात ग्रंथकार, बळवंत मनोहर पंडित यांनी त्यांच्या दिनचर्येचें असें चित्र रेखाटलेलें आहे की,--

"मला अमदाबाद येथे असतांना जो त्यांचा सहवास घडला, त्यावरून माझ्या मनाची अशी खातरी झाली कीं गोपाळराव हे माणिक प्रभूसारखे सकल मतस्थापक होते. कारण ते वैष्णवाबरोबर वैष्णव होते, शैवाबरोबर शैव होते! त्यांची वास्तविक उपासना कोणती होती हें कोणासच सांगतां येणें शक्य नाहीं! उपनिषदें व वेदांतांत ते प्रवीण होते. तथापि ते वेदांती नव्हते! ते केवळ प्रेमळ भक्त व परमेश्वराचे सगुण उपासक होते! ते एकेश्वरी मताचेही होते! ते ब्रह्मोपासकही असून शिवाय प्रार्थनासमाजांत जाऊन ते प्रार्थनाहि करीत असत!".

त्यांचे अंतेवासी चरित्रकार, 'केरळकोकिळ'चे संपादक, 'महाराष्ट्रभाषा-चित्रमयूर' कृ. ना. आठल्ये यांनीहि मोठ्या कौतुकाने त्यांच्या धर्माचरणाचें असें सुरस वर्णन केलेलें आहे की,--

"गोपाळरावजी घरीं ऊन पाण्याने कधीच स्नान करीत नसत. ते नेहमी नदीवर स्नानास जात आणि तेहि एकटे नव्हे तर आपलीं सारीं मुलेंबाळें घेऊन. स्नान झालें म्हणजे सर्व मुंज झालेल्या मुलांसहवर्तमान मोठ्याने म्हणून संध्या करावयाची. नंतर ब्रह्मयज्ञ व तर्पण आपण स्वत: उरकावयाचें. इतकें झाल्यावर देवदर्शन. अमदाबादेंत देवांचीहि कांही वाण नाही. नदीच्या काठाला पुष्कळ देवालयें आहेत. अर्थात् इतकीं देवालयें असून त्यांत कांही मूर्ति व कांही शिवलिंगें आहेत. या प्रत्येक देवाचें गोपाळरावजी दर्शन घेत. त्यांच्याबरोबर तांब्याची एक मोठी झारी असे तींत ते नदीचें पाणी भरून घेत. देवापाशी गेलें की, पहिल्याने स्वत: त्यांनी देवास झारीने पाणी घालावयाचें व नंतर एका मुलाने उगाळून आणलेलें गंध देवास लावावयाचें, दुसऱ्यानें फुलें वाहावयाची व त्यांनी नमस्कार करावयाचा. ह्याप्रमाणें सर्व देवांची दर्शनें घेऊन स्वारी

सर्व मुलाबाळांसह बारा वाजण्याचे सुमारास घरीं यावयाची. नंतर मृत्तिकेचे लिंग करून पार्थिवपूजा ते स्वत: करीत व घरच्या देवाची पूजा, नैवद्य, वैश्वदेव वगैरे उपाध्याय करीत असे. नंतर अतिथी, पांथस्थ, पाहुणे वगैरे असतील ते पंक्तीस घेऊन भोजन करावयाचें."

"... स्नानसंध्यादि नित्यकर्म तर केवळ कर्मठ ब्राह्मणाचें! हें पाहून पुष्कळांस त्यांचे कौतुक वाटे. पुण्यास तुळशीबागेमध्ये वे. शा. सं. कृष्णंभट पुराणीक ह्या नांवाचे मोठे नामांकित वैदिक ब्राह्मण होते. ते गोपाळरावजींस अगदी लहानपणापासून ओळखीत व त्यांस मुलाप्रमाणें 'अरे जारे' च म्हणत. ते पुण्यास घरी येऊन जेव्हां जेव्हां त्यांची स्नानसंध्या, देवपूजा, घरांतील वैदिक संप्रदाय पाहत तेव्हां म्हणत:— "काय रे गोपाळराव! तुला कोण रे सुधारक म्हणतात? येऊन देत बरे असे त्यांना माझ्यापुढे! वेटे शतमूर्ख आहेत तुला असे म्हणणारे. त्यांनी येऊन आधीं तुझे पाय धरावेत अशीच तुझी योग्यता आहे."

कृष्णंभट पुराणिक यांच्यासारख्या वेदशास्त्रसंपन्नाचे हे उद्गार वाचल्यावर सुधारक आणि सनातनी यांना आपल्या व्यवहारचातुर्याने सारखेच झुलविणाऱ्या लोकहितवादींच्या या लवचीक तत्त्वनिष्ठेचें कोणाला कौतुक वाटणार नाही? त्यामुळेच महाराष्ट्रांतील चिकित्सक जागरूक नियतकालिकांनी जरी "दंभासाठी करी उपदेश लोकां" असा आरोप त्यांच्यावर उघड उघड केला, तरी भाविक गुजराती समाजाने मात्र त्यांच्यावर 'गोपालवर्णन' हें काव्य लिहून त्यांची प्रशस्ति मुक्तकंठाने केली!

लोकहितवादींच्या खाजगी वर्तनाचा जो हा प्रकार, तोच सार्वजनिक वर्तनाचाहि. आर्यसमाज आणि प्रार्थनासमाज या दोहोंचेहि ते पुरस्कर्ते आणि सदस्य होते. सनातन्यांना आव्हान आणि समाजाला उदाहरण घालून देण्यासाठी म्हणून ता. १५ जून १८६९ रोजी जो जाहीर पुनर्विवाह मुंबई येथे मोठ्या समारंभाने घडवून आणण्यांत आला, त्याच्या प्रवर्तक 'सप्तर्षीं'त विष्णुशास्त्री पंडित आणि न्या. रानडे यांच्याबरोबर,

लोकहितवादीहि अर्थातच होते. या पुनर्विवाहाच्या समारंभाला आपल्या सह्यांचे आगाऊ 'गुप्त' पत्र पाठवून जी मदत या 'सप्तर्षीं'नी महाराष्ट्रांतील त्या वेळच्या प्रतिष्ठित नागरिकांकडून मागितलेली होती, त्या मदतीचे तीन प्रकार असे होते की,—

"१. लग्नसमारंभास आपण मुंबईंत येऊन वधूवरांबरोबर अन्न-व्यवहार करूं शकाल किंवा नाही ? आपणांस रजा मिळण्याची जरूरी असल्यांस ती घेऊन आलें पाहिजे; तसें न घडेल तर आपण आपले कुटुंबापैकी कोणी पाठवाल कीं नाही ?

२. लग्नसमारंभास पुरुषाप्रमाणें स्त्रियांचीही आवश्यकता असते, तेव्हां आपली सहकुटुंब येण्याची सोय आहे अगर नाही ?

३. मुंबईस लग्नसमारंभास नच येण्याचे जमलें तर लग्नसमारंभांत ज्या गृहस्थांचा व वधूवरांचा अन्नव्यवहार झाला असेल, त्यांपैकीं कोणा एकाबरोबर आपण अन्नव्यवहार कराल कीं नाही ? "

पण, लोकहितवादींनी जरी या 'गुप्त' विनंतिपत्रावर सही केलेली होती, तरी या पत्रांत अपेक्षिलेल्या तीन प्रकारांपैकी कोणत्याहि प्रकारची मदत त्यांनी स्वत: मात्र या पुनर्विवाहाला मुळीच केली नाही. तरीहि, केवळ पत्रावर सही केलेली असल्यामुळे, त्यांच्यावर बहिष्कार पडलाच. तथापि, ते या वेळीं अमदाबाद येथे सेशन्स जज्ज असल्याकारणाने, अमदाबाद आणि बडोदें येथील ब्रह्मवृंदाने आणि द्वारकापीठाच्या शंकराचार्यांनीहि, ते पुनर्विवाहाला हजर नसल्याच्या मुद्यावर, त्यांना 'अपवाद प्रायश्चित्त' देऊन 'पंक्तिपावन' केल्याचा निर्णय दिला. या अनुभवानें लोकहितवादी इतके कांही सावध झाले कीं, १८७३ सालीं ज्या वेळीं त्यांचे चिरंजीव कृष्णराव हे विलायतेहून बॅरिस्टर होऊन स्वदेशीं परत आले, तेव्हां त्यांनी " त्यांस घरीं उतरण्यास न आणतां निराळ्या बंगल्यांत राहण्याची त्यांची सोय केली; " व शंकराचार्यांना 'ब्रह्मदंड' देऊन त्यांनाहि पावन करून घेतलें. इतकेंच नव्हे, तर त्यानंतर लगेच पार्लमेंटरी फायनॅन्स कमिटीपुढे साक्ष देण्यासाठी सरकारने त्यांना विलायतेस जाण्याबद्दल पाचारण केलें असता, " धर्माच्या आणि जातीच्या अडचणीमुळे मला विलायतेस जाणें शक्य नाही," असें

* उत्तर जाहीर रीतीनें देऊन तीहि आपत्ति त्यांनी टाळली. त्यांचें हें नकाराचें पत्र प्रसिद्ध होतांच विष्णुशास्त्री पंडित यांच्या संपादकत्वाखाली निघणारें त्या वेळचें अग्रगण्य सुधारणावादी पत्र 'इंदुप्रकाश' याने, त्यांनी पुनर्विवाहाच्या वेळीं केलेल्या 'नामर्दपणा'च्या वर्तनाची आठवण देऊन, त्यांच्यावर अशी टीका केलेली होती की,—

"सार्वजनिक जीवनांत शिरल्यापासून ज्या विधवाविवाह पक्षाचे ते अत्यंत प्रमुख पुरस्कर्ते होते, त्या पक्षांतील आपल्या मित्रांना पाठ दाखविण्यांत व ज्या जोडप्यानें ते विधवाविवाह पक्षाचे गाजलेले पुरस्कर्ते असल्याकारणानें त्यांच्या आश्वासनांवर आणि उत्तेजनांवर विश्वास ठेवला त्यास दगा देण्यांत त्यांचें जें नामर्दपणाचें वर्तन झालें, त्यावरून त्यांचा हा प्रकार सर्वांना कळून चुकला होता." (It was sufficiently wellknown already by his unmanly conduct in withdrawing from among his friends of the widow-marriage party of which he was the most leading champion from the time that he entered into public life, and in his throwing over-board the couple that had already married on his assurances and encouragement as a declared champion of the cause.)

रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्या 'नेटिव ओपिनियन'ने तर असा स्पष्ट अभिप्राय दिलेला होता की,—

"रा. गोपाळराव यांनी आपला जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत केवळ राजकीय भांडवलबाजी केली, असें आम्ही समजतों. 'सुधारक' हा शब्द आज आपल्यामध्यें फार सवंग झालेला आहे. पण, सर्व कागदपत्र काळजीपूर्वक पाहिल्यावर या अधिकाऱ्यानें स्वतःला 'सुधारक' म्हणवून घेण्याची आपली लायकी सिद्ध केली आहे, असे आम्हांला वाटत नाही. कांही वर्षें लोटल्यावर ते कदाचित् होतील. पण लूथर आणि तुकाराम यांच्या प्रणालिकेंत बसण्यासाठी त्यांना जन्मभर स्वार्थत्याग, अविश्रांत परिश्रम आणि चिकाटी यांची आवश्यकता आहे." (We regard

Mr. Gopalrao's publishing his manifesto as merely making of so much political capital. The word *Reformer* has become very cheap amongst us; but after a very careful examination into the documents, we can not hold that this officer has yet proved his title to be a reformer. We hope he may become one, as years roll on; but it will require a lifelong selfsacrifice and untiring labour and perseverance on his part before we can admit him into the roll of our Luthers or Tukarams.)

'विविधज्ञानविस्तारा 'ने लोकहितवादींचा दंभस्फोट करणारे जे तीन लेख आपल्या १८७९ सालच्या ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांच्या तीन अंकांत दिलेले होते, त्यांतहि या नकारासंबंधीं असें म्हटलेलें होतें की,–

"..कित्येकांच्या डोक्यात असें वेड शिरलें आहे की, आपण रामदास, लूथर, तुकाराम इत्यादिकांचे अवतारच आहों. परंतु तशी कृति करण्यास जेव्हां ते प्रवृत्त होतात, तेव्हां 'रासेलास' नामक कादंबरींतील पंख लावून उडणाऱ्या यंत्रशास्त्र्या प्रमाणें त्यांची दशा होते. सुखवस्तु बोलण्यानें आणि सुधारणेची टिमकी वर्तमानपत्रांतून वाजविल्यानें जर सुधारणा होती तर आतां आमचे देशांत सुधारणा अगदी कळसास जाऊन पोंचली असती .... आपलें नकाराचें पत्र छापून प्रसिद्ध करण्याचा उपद्व्याप लोकहितवादीनें कोणत्या अर्थानें केला असेल तो असो. या योगानें लोकहितवादीचे मानसिक दौर्बल्य मात्र प्रकट झालें."

या निरनिराळ्या उताऱ्यांवरून लोकहितवादींच्या हयातींत त्यांच्या समाज-सुधारणेच्या कार्यासंबंधीं तत्कालीन लोकमत कशा प्रकारचें होतें, याची यथार्थ कल्पना येईल.

लोकहितवादींच्या इनाम कमिशनवरील कामाबद्दलहि त्या वेळचें सुजाण लोकमत अतिशय साशंक होतें, असें तत्कालीन नियतकालिकांतील चर्चेवरून वाटतें. कमिशनवरील त्यांच्या कामासंबंधीं, " सरकारची तुंबडी भरून आपलें व आपल्या मुलाबाळांचें कल्याण करून घेतलें," अशा

आशयाचा लोकापवाद त्या वेळीं फार पिकला होता, ही गोष्ट खुद्द त्यांच्या चरित्रकारांनीच मुळी नमूद केलेली आहे. त्या लोकापवादावरून असे दिसतें की, सरकारने १८५५ सालच्या नोव्हेंबरमध्ये खास ठराव करून त्यांनी या कामांत दाखविलेली "जाणकारी आणि पोटाग" ( intelligence and zeal ) यांचा जाहीर रीतीने गौरव केला व त्यांना 'सबअसिस्टंट'चे 'असिस्टंट इनाम कमिशनर' करून बढती दिली, ही घटना तत्कालीन जनतेला चमत्कारिक वाटली असावी. इनाम कमिशनच्या कामासंबंधीं त्या काळांतील लोकमत किती प्रतिकूल होतें, हें न्या. रानडे यांनी उल्लेखिलेल्या 'गैरइन्साफ' या पुस्तिकेवरूनच केवळ नव्हे, तर 'टाइम्स ऑफ इंडिया' पासून तों 'विविधज्ञानविस्तारा'-पर्यंत निरनिराळ्या जबाबदार नियतकालिकांनी त्याच्या कार्यपद्धतीवर केलेल्या टीकेवरूनहि कळून येतें. "राजनीतीच्या तत्त्वाला बोळा फासून केवळ सरकारी तिजोरींत पैसा कसा ओढला जाईल इकडे लक्ष देऊन इनामदारवर्गाला दारिद्र्यांत पिचण्याचा सुसंघटित प्रयत्न झाला व त्यामुळे सरकारच्या शब्दावरील जनतेचा विश्वास पार उडाला," असा अभिप्राय कमिशनच्या कामासंबंधीं 'टाइम्स'ने दिलेला होता; तर "हें कमिशन चाललें होतें त्या वेळीं एका गृहस्थाने अशी सूचना केली होती की, ज्या सनदांमध्ये यावच्चंद्रदिवाकरौ किंवा त्याच अर्थाचे दुसरे शब्दप्रयोग असतील त्या सनदा अमावस्येच्या रात्रीं रद्द कराव्यात–कारण अमावास्येच्या रात्रीं सूर्य व चंद्र हे दोन्हीहि नसतात," अशी माहिती 'विविधज्ञानविस्तारा'ने त्याच्या कार्यवाहीविषयी दिलेली होती ! अशा स्थितींत लोकहितवादींना मिळालेली बढती हा लोकापवादाचा विषय व्हावा, यांत नवल काय ? लोकहितवादींच्या 'लौकिक वर्तना'ची ही सगळी लोकोत्तर तऱ्हा लक्षांत घेतली असतां, "त्यांचे ठायीं या देशाचें कल्याण व्हावें ही इच्छा जरी पूर्णपणें वागत आहे व आजपर्यंत अनेक कार्यांत त्यांनी शक्त्यनुसार आपला वांटा जरी बराच उचलला, तरी अनेक प्रसंगीं मागील पिढीच्या मंडळीस जें अपयश आलें त्याचे हेहि अंशभाक् झाले ... व लोकहित-वादी या नांवाला न साजणारें असें आचरण त्यांच्या हातून अनेक प्रसंगीं

घडलें आहे, हेंहि सर्वप्रसिद्धच आहे," हे चिपळूणकरांनी आपल्या निबंधाच्या सुरवातीलाच त्यांच्यासंबंधीं काढलेले उद्गार अगदी समर्पक वाटतात.

लोकहितवादींच्या 'लौकिक वर्तना'चा हा सगळा प्रकार डोळ्यां-आड करून, केवळ त्यांचीं 'शतपत्रें'च तेवढीं जरी लक्षांत घेतलीं, तरी विवेक, औचित्य, सुसंगति, तारतम्य आणि सदभिरुचि यांचा त्या 'पत्रां'तील अभाव मनाला अत्यंत तीव्रतेने जाणवतो, असें म्हणणें भाग आहे. हीं 'पत्रें' लिहिण्यांत त्यांचा उद्देश जितका उदात्त होता, तितकेंच त्यांतील प्रतिपादन विकृत होतें. किंबहुना, संस्कृत विद्या, वेदपुराणादि प्राचीन साहित्य, भारतीय धर्म, संस्कृति आणि तत्त्वज्ञान, पेशवाईंतील मुत्सद्दी, शास्त्रीपंडित इत्यादि विषयांवर जी एकांगी, उथळ आणि अभद्र टीका या 'पत्रां'त केलेली आहे, तिचें अत्यंत विपर्यस्त आणि हीन स्वरूप ध्यानांत घेतलें असतां, आपल्याला अप्रिय असलेली विचारप्रणालि, संस्था, मतें, वर्ग आणि व्यक्ति यांच्यावर कुत्सित, शिवराळ, खुनशी आणि बीभत्स टीका करण्याची जी दुष्ट प्रथा मराठी वृत्तपत्रव्यवसायांत पुढे प्रचलित होऊन गेली, तिचा प्रारंभ लोकहितवादींनी प्रथम आपल्या या 'शतपत्रां'च्या रूपाने केला, असें म्हणावयाला यत्किंचितहि शंका वाटत नाही. ज्या 'ज्ञानप्रकाशा'च्या संपादनाशीं त्यांचा निकट संबंध होता, त्यानेहि त्यांचीं मतें आणि तीं प्रदर्शित करण्याची पद्धति यांच्यासंबंधीं नापसंती व्यक्त करितांना असें स्पष्ट म्हटलें होतें की, "लोकसुधारणेची रीती लोकहितवादी मनांत आणतात तें नव्हे. जर बोध करण्याचा असल्यास चांगले युक्तीने व मृदु भाषणाने व ईश्वरावर नजर ठेवून बोललें पाहिजे. यांपैकी एकहि गुण त्याचे लिहिण्यावरून आम्हांस दिसत नाही.. त्याजवरून लोकहितवादीस गर्व व विचार किती आहे हें सहज ध्यानीं येईल." इतकेंच नव्हे, तर लोकहितवादींचीं 'पत्रें' 'प्रभाकरां'तून येत असतां, त्यांचें खंडन करणारीं 'यथार्थवादी'चीं पत्रें 'ज्ञानप्रकाशा'ने अगत्याने छापून, त्यांच्या प्रतिपादनांतील तर्कच्युति आणि वस्तुविपर्यास वाचकांच्या निदर्शनाला आणून देण्याचीहि दक्षता घेतली. वस्तुतः, १८१८ पासून १८९८ सालपर्यंत जे लेखक

महाराष्ट्रांत होऊन गेले, त्यांत लोकहितवादींइतकी विपुल आणि विविध ग्रंथरचना प्राय: एकाहि लेखकाची नसेल. पण, आश्चर्याची गोष्ट अशी की, त्यांचे सार्वजनिक चळवळींतील एक प्रमुख सहकारी न्या. रानडे यांनी या कालावधींतील वाङ्मयाचें जें तपशीलवार समालोचन काटेकोरपणानें केलेलें आहे, त्यांत लोकहितवादींच्या कोणत्याच ग्रंथाचा उल्लेख आढळत नाही; व आपल्या या लेखमालेच्या शेवटीं विद्यापीठांतील उच्च अभ्यासक्रमांत समाविष्ट करावयाला योग्य अशा साठ मराठी ग्रंथांची जी यादी त्यांनी दिलेली आहे, तींतहि फक्त 'पृथ्वीराज चव्हाण' हें लोकहितवादींचें एकच पुस्तक घातलेलें दिसतें. आपल्या पूर्वींच्या पिढींतील लोकहितवादींसारख्या कर्त्या बहुप्रसू ग्रंथकाराचा न्या. रानडे यांच्यासारख्या सूक्ष्मदृष्टि विमर्शकाला नुसता निर्देशसुद्धा आपल्या लेखमालेंत करण्याची इच्छा होऊं नये, हा प्रकार जितका चमत्कारिक तितकाच सूचकहि वाटतो.

पण, 'शतपत्रां'त जागोजाग केलेलें सगळें गालिप्रदान गाळून लोकहितवादींनी तत्कालीन समाजाला केलेल्या पृच्छा आणि सूचना याच जर नुसत्या लक्षांत घेतल्या, तर त्या मात्र बऱ्याच समयोचित आणि शहाणपणाच्या होत्या, असें दिसून येतें. 'जुन्या समजुती' आणि 'वाईट चालींचे प्रकार' या दोन 'पत्रां'त विचारलेले चाळीस प्रश्न, 'स्वदेशप्रीति' या 'पत्रां'त विचारलेले बारा प्रश्न, 'हिंदुस्थानाच्या पराधीनतेचीं कारणें' या 'पत्रां'त दिलेलें 'हिंदुनाशाष्टक' 'धर्म-सुधारणा' या 'पत्रां'त दिलेलीं सुधारणेचीं सोळा कलमें, 'शाक्त मार्ग' या 'पत्रां'त वामाचारी लोकांच्या दुराचरणावर उडविलेले कोरडे, 'मद्यपान' या 'पत्रां'त इंग्रजी राज्यांत सरकारी आश्रयाने बोकाळत चाललेल्या 'महान् भयंकर व त्वरित वृद्धि पावणाऱ्या' दारूबाजीच्या दुर्गुणासंबंधीं लिहितांना सरकारवर केलेली टीका इत्यादि 'शतपत्रां'तील कांही भाग लोकहितवादींची लोकहिताविषयीची कळकळ आणि तळमळ उत्कृष्ट रीतीनें दर्शवितो. त्याचप्रमाणे 'राज्यसुधारणा' या 'पत्रां'त आपल्या राजकीय आकांक्षा कोणत्या प्रकारच्या असाव्यात आणि त्या साध्य करण्यासाठी प्रयत्न कोणत्या दिशेने करावेत, यासंबंधीं केलेलें

विवेचनहि त्यांच्या दूरदर्शीपणाचें निदर्शक आहे. या 'पत्रां'त त्यांनी अशा सूचना केलेल्या होत्या की,—

"सन १८३४ सालीं कंपनीची सनद २० वर्षांची बाहाल झाली, त्या समयीं या गोष्टीचा विचार पडला होता. किती एक विलायतेंतील दयाळू लोक यांनी सांगितलें की, इंग्रज लोकांचे राज्य जा रीतीने चालतें त्याप्रमाणें हिंदु लोकांचे चालावे; तेव्हा कंपनी सरकारने अशी शाबिती केली की, हिंदु लोक मूर्ख आहेत, त्यांस पार्लमेंट म्हणजे काय हें ठाऊक नाहीं. याजमुळे तेथे असें राज्य बसविल्याने बखेडा मात्र होईल आणि सर्व बेबन्द होईल. पार्लमेंटात बसणारे लोक मोठे शहाणे पाहिजेत. त्यांचें मनांत लोकांचें हित नेहमी वागलें पाहिजे. तेव्हाच ती सभा नीट चालेल. त्याप्रमाणे पार्लमेंटात बसावयास सर्व हिंदुस्थानांत एकही योग्य मनुष्य मिळावयाचा नाही, ही मोठी अडचण आहे. याजमुळे विलायतेंतील बादशहाने कंपनी सरकारची सनद कबूल करून वीस वर्षेपर्यंत कमाविशी कायम केली.

तीं वीस वर्षें सन १८५४ नांत भरतात. तेव्हा अजून ६ वर्षांचा अवकाश आहे. इतक्यांत किती एक लोक शहाणे होतील व हल्ली किती एक शहाणे सापडतील, याजकरितां आजपासून सर्व गरिबांनी व श्रीमंतांनी एकत्र होऊन विलायतेंतील राणीसाहेबांस तपशीलवार एक अर्ज करावा की, हल्ली राज्यपद्धति आहे, ती पासून आमचा फायदा नाही व आमचे राज्यासंबंधी हक्क चालत नाहीत व हिंदु लोक जसे, तसेच इंग्रज लोक मनुष्यें आहेत. याजकरितां इनसाफ बरोबर होण्याकरितां सर्व इंग्रज व नेटीव लोक यांमध्ये सांप्रत मोठा भेद आहे, तो मोडून एकसारखे होण्याकरिता हिंदुस्थानचे देशांत पार्लमेंट ठेवावें व ही मोठी सभा मुंबईस भरावी. आणि तेथे दर एक शहरांतून व दरएक जिल्ह्यांतून दोन दोन असामी घेऊन त्या सर्वांस कौंसलांत बसवून गवरनराने त्यांत मुख्य असावें व जे लोक दर जिल्ह्यांतून आणावयाचे ते सर्व जातींतील सारखे असावे. दर जिल्ह्याचे माजिस्ट्रेट साहेबांकडून दवंडी पिटवावी

की, राज्याचा विचार चांगले रीतीने होण्याकरिता संपूर्ण लोकांनी विचार करून दोन शहाणे मुखत्यार नेमावे व त्याप्रमाणे नेमिलेले सर्व लोकांनी हजर व्हावें. हे लोक बोलणारे, चतुर व मुच्छदगिरी केलेले असावे. कारण हे राज्याचे हिस्सेदार आहेत. केवळ शिरस्तेदार, मुनसफ, मामलेदार नव्हत व या लोकांत भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान, इंग्रज इत्यादि जे शहाणे दिसतील, ते नेमावे व त्यांनी राज्य चालवावें, म्हणजे लोकांचा फार फायदा होईल....

...याप्रमाणे अर्जी करून विलायतेस दहा पांच असामी प्रयत्न करण्याकरितां नेमून त्यांजबरोबर ती पाठवावी म्हणजे आपले लोकांचा कांही उदयकाळ होईल. नाहीतर हें असेच किती एक वर्षेपर्यंत रहातील. यास्तव जे लोकांचे हित पहाणारे आहेत, त्यांनी हा बेत केला पाहिजे.

.... .. ... राज्य करण्यास गरीब व मातबर, नीच जातीचे व उंच जातीचे लोक समान मानावे, हें सर्वांस कळूं लागेल. अशा सभेंत जातीविषयी निवड नको, हे वर सांगितलेंच आहे. जे फार विद्वान व चांगले चालीचे लोक आहेत तेच नेमले पाहिजेत. मग त्यांची कोणतीही जात असो, परन्तु ब्राह्मणांस गर्विष्ठपणा फार आहे, याजकरितां ती जात फार थोडी असली पाहिजे."

लोकहिवादींनी या पत्रांत व्यक्त केलेल्या राजकीय आकांक्षा प्रगतिपर असल्या, तरी त्याबद्दल नवल वाटण्याचें मात्र कांही कारण नाही. इंग्लंडांतील सांसदीय राज्यपद्धतीचा कारभार आणि त्याचे भारतांतील इंग्रजांच्या ताब्यांतल्या प्रदेशावर होणारे परिणाम यांची त्या काळांतल्या शिकलेल्या विचारी लोकांना पूर्ण जाणीव होती; व राजा राममोहन राय यांचें तर सर्व आयुष्य इंग्लंडांतील या लोकाभिमुख राज्यपद्धतीचे जास्तींत जास्त फायदे भारतांतील इंग्रजी अमलाखालील प्रदेशाला मिळावेत, यासाठी प्रयत्न करण्यांत गेलेलें होतें. १८३२ सालीं "इंग्लंड देशांतील राज्यरीतींत बदल करण्यासंबंधीं" जें बिल पार्लमेंटांत आलेलें होतें, त्याची चर्चा आपल्या 'दर्पण' पत्रांत करितांना बाळशास्त्री जांभेकर यांनी असें भाकित वर्तविलेलें होतें की, "अशे चांगले रीतीचे पार्लमेंट सभेपासून इंग्लंड

देशांत जें कल्याण होईल असें इछित आहेत, त्यांतून कांही विभाग या देशासही मिळेल; जेव्हां झरा स्वछ होतो, तेव्हां त्यापासून वाहाणारे प्रवाह निर्मळ वाहातात." इतकेंच नव्हे, तर ता. २४ ऑगस्ट १८३२ रोजीं 'दर्पण' मध्ये "विद्या हें वळ आहे" या विषयावर लिहिलेल्या आग्रलेखांत जांभेकरांनी असा मार्मिक प्रश्न विचारलेला होता कीं, "...... विलायतेसारिखे लहान आणि दूर देशचे लोकांनी येऊन विलायतेपेक्षें हीं मनुष्यांचे संपत्तीविषयी चांगले हें राज्य घेतले, आणि रक्षण केले, हे सामर्थ्य त्यांस विद्येनें आलें नव्हे ? बरें असेच हिंदुस्थानचे लोक पुढें कोणत्ये वेळेस विलायत घेतील, ही कल्पना असंभाव्य स्वप्नासारिखी वाटत्ये याचें कारण काय ? याचें कारण हिंदुस्थानचे लोकांपेक्षें विलायतेचे लोकांत विद्या फार आहे हें नव्हे काय ?" (Is it not owing to the power which knowledge has given to the people of so small and so distant a country as England, that they have been enabled to conquer and keep possession of these vast territories far more congenial to the prosperity of the human race than the sterile soil of England? Why is it thought that the most extra-vagant dream to suppose that India should ever conquer England? Is it not because the latter enjoys the blessings of knowledge in a far greater degree than the former?) या उद्‌गारांवरून पारतंत्र्याच्या त्या पहिल्या प्रहरांतहि जांभेकरांसारख्या द्रष्टया पत्रकाराच्या कल्पनेची भरारी कुठपर्यंत जात होती, याची कल्पना येते. अर्थात् पार्लमेंटरी राज्यपद्धति या देशांत सुरू व्हावी हा जो विचार 'दर्पणा'ने महाराष्ट्रांत वाढीला लावला, त्याचाच पुढे लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी प्रभृति कार्यकर्त्यांनी, आपापल्या विशिष्ट मतांनुसार, विकास केला. सार्वजनिक काका आणि रानडे यांनी नंतर त्याच विचाराला धरून जबाबदार राज्यपद्धतीची व्यवहार्य मागणी सार्वजनिक सभेमार्फत पुढे रेटली; व चिपळूणकरांनी 'आमच्या देशाची स्थिति' या आपल्या शेवटच्या निबंधांत स्वातंत्र्याबरोबरच 'लोकप्रभुत्वा'च्याहि

( Sovereignty of the people ) तत्वाचा निर्देश करून त्याच्या स्थापनेसाठी "व्हॉल्टेर प्रभृति महान् महान् ग्रंथकारांप्रमाणें देशभाषेच्या द्वारे लोकांचें मन क्षुब्ध करून त्यांस सुजाण करण्याची", म्हणजेच विचारक्रांति घडवून आणण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

या राजकीय आकांक्षांबरोबरच इंग्रजी राज्यावरील लोकहितवादींची असीम श्रद्धा आणि इंग्रजांच्या न्यायनीतीवरील त्यांचा अतिरिक्त विश्वास यांचें जें प्रदर्शन 'इंग्लिश राज्याची आवश्यकता' या त्यांच्या 'पत्रां'त झालेलें आहे, तेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. आपली राजकीय निष्ठा प्रकट करितांना त्यांनी या पत्रांत असे उद्गार काढलेले होते की,—

" .....इंग्रज लोक यांनीं इकडे राज्य संपादन केले, याचें कारण काय? याचा विचार करतां दिसतें की, हिंदु लोकांमध्ये मूर्खपणा वाढला, तो दूर होण्याकरितांच हे गुरु दूर देशांतून इकडे ईश्वराने पाठविले आहेत. पहा, हिंदु लोकांस हा मोठा लाभ आहे की, इंग्रज लोकांचें राज्यामुळे हिंदु लोकांस जागृति जहाली व पृथ्वीवर काय काय आहे, हें कळूं लागलें. ज्यास कोकणापासून पुण्यापर्यंत प्रदेश ठाऊक, त्यास पूर्वींचे लोक मोठा माहितगार असें म्हणत, पण आता बहुतांस इंग्रजांचा देश इंग्लंड व अमेरिका माहीत झाली. हें सर्व इंग्रजांमुळे झालें. ईश्वरानें ही शहाणपणानेच योजना केली आहे. लोकांची झोप जाण्यास दुसरा इलाज नवता. सती जाणें, जलसमाध घेणें, पोरें मारणें, प्रयागास करवत घेणें, जगन्नाथास रथ उरावर घेणें व हिमालयांत स्वर्गास जाणें, इत्यादि अघोरी व लज्जास्पद चालींमुळें ईश्वराचा क्षोभ अत्यंत जहाला. तेव्हा दुष्ट लोकांस ताळचावर आणण्यास ईश्वराने इंग्रज सरकारची योजना केली.

परंतु त्यांनी न्यायाने राज्य मिळविलें किंवा कसे याविषयीं कोणास अन्देशा वाटेल, म्हणून त्यांचे इकड राज्य स्थापन जहाले, त्याचा इतिहास पाहिला, त्याजवरून माझें असें मत झालें आहे की इंग्रजांनी यथान्याय वर्तणुकीने राज्य घेतलें आणि ईश्वराने त्यांस हे राज्य अशा प्रकाराने दिले की, त्यास कोणी दोष ठेवणार नाही ...

. . इंग्रेज सरकाराचा या देशांत मोठा धर्म हाच आहे की, त्यांनी विद्या वाढवून या लोकांस शहाणे करावें आणि जेव्हा स्वदेशाचे राज्य करण्याचें व्यावहारिक ज्ञान यांस येईल आणि हे पृथ्वीवरची हकीकत सर्व जाणतील आणि दुर्गुण सोडतील, तेव्हा हें राज्य त्यांनी त्यांचे हवालीं करावें."

इंग्रज लोक हे या देशाचे ईश्वरप्रेषित गुरु व इंग्रजी राज्य हा ईश्वरी योगायोग आणि ईश्वरी वरदान या ज्या कल्पनांचा उद्‌घोष लोकहित-वादींनी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत आपल्या आर्ष वाणीने या 'शतपत्रां'तून केला, त्यांनाच पुढे त्या शतकाच्या उत्तरार्धांत आपल्या पुष्पिता वाणीने गोंडस तात्त्विक मुलामा देऊन न्या. रानडे यांनी त्या कल्पनांच्या पायावर राजकारण आणि राजकीय पक्षसंघटना उभारण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले. एकीकडे आपला देश, धर्म, संस्कृति, इतिहास, समाज यांच्याविषयी विलक्षण तुच्छता आणि दुसरीकडे इंग्रजी राज्य, संस्कृति, समाजरचना, न्यायनीति यांच्यावर विलक्षण श्रद्धा या 'शतपत्रां'-तील दोन मुख्य विचारधारा होत्या; व १८४८ पासून १८६८ पर्यंत सतत वीस वर्षें या मतांचा प्रचार लोकहितवादींनी, वृत्तपत्रांतून आणि व्यासपीठावरून, मोठ्या ईर्ष्येने केला. सारांश, लोकहितवादी हे पारतंत्र्याचे पहिले उद्‌गायक, पारतंत्र्याची तात्त्विक चर्वणा करून इंग्रजी राज्याची महती आणि मांगल्य विशद करणारे पहिले प्रतिपादक होत.

लोकहितवादींच्या बरोबरच महात्मा जोतीराव गोविंदराव फुले (१८२७–१८९०) यांच्याहि लोकजागृतीच्या कार्याचा विचार करणें अवश्य आहे. लोकहितवादींनी पांढरपेशा वर्गांत जागृति केली, फुल्यांनी बहुजन-समाजांत. पण यापलिकडे त्या दोघांत कांहीही साम्य नाही. लोकहितवादी हे जुन्या राजवटींतील सरदार घराण्यांत जन्मले आणि नव्या राजवटींत सरदार होऊन कृतार्थ झाले. त्यांचें सर्व आयुष्य राजसेवेंत एकाहून एक बढतीचीं अधिकारपदें उपभोगण्यांत गेलें. उलट, फुल्यांची सर्व हयात स्त्रिया, शूद्र आणि अतिशूद्र या हिंदु समाजांतील हीन दीन वर्गांच्या उन्नति-साठी जिवाभावाने झटण्यांत आणि झिजण्यांत गेली. त्यांचें मूळचे आडनांव

गोऱ्हे; सातारा जिल्ह्यांतील कडगुण हें त्यांचें मूळ गांव. तेथील कुळकर्ण्याच्या कारवायांना कंटाळून आणि तरवारीने त्याचे दोन तुकडे करून त्यांचे पणजोबा पुणें जिल्ह्यांत आले. कुळकर्ण्यांचें वर्णन जे 'कलमकसाई' या शब्दाने फुल्यांनी 'गुलामगिरीं'त केलेलें आहे, त्यांतील पिढीजात खुनस या घटनेंतून उफाळलेला होता. पुण्यास त्यांच्या वडिलांना रावबाजींच्या रंगेल आमदानींत फुलांचे शेले, पागोटीं, लोड, गाद्या इत्यादि पुष्पाभरणें पेशव्यांना पुरविण्याचें काम मिळालें. या सुमनसाजांतील कौशल्यामुळे त्यांची इतकी भरभराट झाली की, 'गोऱ्हे' हे 'फुले' म्हणूनच नंतर पुण्यांत ख्यातनाम होऊन बसले. पण मालाकाराचा हा वडिलार्जित व्यवसाय चालविण्यासाठी कांही फुल्यांचा जन्म नव्हता. त्यांचे शेजारी मुनशी गफ्फार बेग यांनी त्यांच्या उमलत्या बुद्धीची चमक ओळखली; व त्यांना शाळेंत घालण्याचा सल्ला त्यांच्या वडिलांना दिला. 'सत्यशोधक समाजां'तील त्यांचे प्रमुख सहकारी रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी 'गुलामगिरी'ला लिहिलेल्या प्रस्तावनेंत अशी माहिती दिलेली आहे की, "मेहरबान लिजिट साहेबांचे प्रयत्नाने जोतीरावांचा त्यांच्या वयाच्या पंधराव्या वर्षी सरकारीं शाळेंत प्रवेश झाला. त्या वेळीं त्यांचे जिवलग मित्र सदाशिवराव गोवंडे, सखाराम यशवंत परांजपे आणि मोरो विठ्ठल वाळवेकर हे होते. जॉर्ज वॉशिंग्टन, शिवाजी वगैरेंच्या चरित्राच्या वाचनाने व विशेषतः ब्राह्मण गुरुजींच्या शिकवणीने स्वदेशाभिमानाचें वारें शिरून जोतीराव आणि त्यांचे तीन मित्र यांनी गोळीबार, दांडपट्टा वगैरे शिकण्यास सुरवात केली. या कामीं त्यांचा गुरु लहुजीबुवा या नांवाचा एक प्रसिद्ध मांग होता." लहुजी हे मराठ्यांच्या आमदानींत पायदळांत प्रत्यक्ष लष्करी नोकरी करून सेवानिवृत्त झालेले अंमलदार होते. तारुण्याच्या उमेदींत इंग्रजी सत्तेविरुद्ध बंड करण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या लढाऊ शिक्षणासंबंधीं फुल्यांनी नंतर 'गुलामगिरीं'त असा पस्तावा प्रदर्शित केलेला आढळतो की,—

"धोंडीबा—तर मग तुम्ही लहानपणीं दांडपट्ट्याची आणि गोळी-निशाण मारण्याची कसरत कशाकरिता करीत होता ?

जोतीराव—आपल्या दयाळू इंग्रज सरकारास पालथे घालण्याकरिता.

धोंडीबा—असली दुष्ट मसलत तुम्ही कोठून शिकलां ?

जोतीराव—चार सुधारल्या भट विद्वानांपासून. याचें कारण ( घरांत चुलीजवळच) ते असें देतात कीं, आपल्यांतील बहुतेक जातींचे लोक आपल्या आनादिसिद्ध धर्माविषयीं अज्ञानी असल्यामुळें आमची एकी नाहींशी झाली. नाना प्रकारचे जातिभेद होऊन आपली अशी फुटाफूट झाली, या कारणानें इंग्रजांचें हातीं आपलें राज्य लागलें. आपल्या अज्ञानी धर्मभोळ्या लोकांतील बहुतेकांचा देशाभिमान नाहीसा व्हावा म्हणून ते आपल्या मतलबी धर्माचा आधार दाखवून त्यांस आपलें गुरुबंधू करीत आहेत. यास्तव आपणां सर्व जातींच्या लोकांची एकी झाल्याशिवाय या लोकांस आपल्या देशांतून हाकून देण्याची ताकद आपल्यास येणार नाहीं. व आपल्या आनादिसिद्ध धर्मांत थोडासा फेरफार करून आपली सर्वांची चांगली एकी केल्याशिवाय आपल्यास अमेरिकन, फ्रेंच आणि रशियन लोकांची बरोबरी करितां येणार नाहीं. असें त्यांनीं मला टॉमस, पेन्स वगैरे ग्रंथकारांच्या पुस्तकांतील कित्येक वाक्यांच्या आधारानें सिद्ध करून दाखविले. यावरून मी तसले वेडेचार कांही दिवस माझ्या लहानपणीं करीत होतों. परंतु पुढें मी त्याच ग्रंथांचा बारीक विचार करूं लागलों तेव्हां या सुधारलेल्या भटांच्या मतलबी मसलतीचा खरा अर्थ माझ्या ध्यानांत आला."

हें आपलें मतपरिवर्तन कोणाच्या उपदेशामुळे झालें, याचाहि उलगडा त्यांनी 'गुलामगिरीं'तच असा केलेला होता की,—

" इंग्रज बहादराचें राज्य या देशांत आल्यापासून बहुतेक कनवाळू युरोपियन व अमेरिकन सत्पुरुषांस आमचें दुःख पाहवेना. तेव्हां त्यांनीं आमच्या बंदीखान्यांत हमेशा येऊन आम्हांस असा उपदेश केला कीं, " बाबांनो, तुम्ही आम्हासारखेच मनुष्य आहांत. तुमचा व आमचा उत्पन्न व पालन व पोषणकर्ता एकच आहे. आणि तुम्हीही आम्हां-सारखेच सर्व अधिकारांस पात्र असतां, या भटांच्या कृत्रिमी अधिकारांस कां मानितां ? असा नानाप्रकारच्या पवित्र सूचनावरून विचारांअंती मला माझे वास्तविक अधिकार समजल्याबरोबर मी त्या कैदखान्याच्या

कृत्रिमी कोटाच्या मुख्य ब्रम्हकपाट दरवाजाला लाथ मारून बाहेर पडून आपल्या उत्पन्नकर्त्यांचे आभार मानले."

"... असल्या परोपकारी लोकांस म्हणजे भटांच्या दासत्वापासून आम्हांस मुक्त करणाऱ्या लोकांस आपल्या देशांतून हांकून देण्याविषयींची या विद्वानांची मसलत कोण घेईल? ज्याच्याने आपल्या तारणाऱ्यावर आपला हात उगारवेल असा मूर्ख कोण आहे? परंतु, मी तुला सांगतो कीं, इंग्रज लोक आज आहेत उद्या नाहींत. ते आपल्या जन्मास पुरवतील म्हणोन कोणाच्याने खात्री देऊन सांगवत नाहीं. यास्तव त्या लोकांचे राज्य या देशांत आहे तोंच आपण सर्व शूद्रांनी जलदी करून भटांच्या वडिलोपार्जीत दास्यापासून मुक्त व्हावें यांतच मोठा शहाणपणा आहे. देवाजीनें शूद्रांधर दया करून इंग्रज बहादराच्या हातून भट नानाचें बंड मोडविलें, म्हणोन बरें झालें. नाहीं तर त्या शादावलाच्या पुढल्या लिंगापुढें रुद्र करणाऱ्या सुधारलेल्या भटांनी आजपावेतों कित्येक महारांस एकेरी धोतर नेसल्यामुळें अथवा कीर्तनामध्यें संस्कृत श्लोकांचा उच्चार केल्यामुळें काळेपाणी दाखविले असते."

ब्राह्मण जातिविषयीं ही जी विलक्षण चीड त्यांच्या मनांत उत्पन्न झाली, तिच्या भरांत त्यांनी सरकारला अशी सूचना आपल्या या पुस्तकांतून केलेली होती की,—

"आतां तरी आमच्या सरकारनें शुद्धिवर येऊन प्रत्येक खेड्यास निदान एका तरी इंग्लिश अथवा स्कॉच गृहस्थाच्या निर्वाहापुरती गतकुळी शेतें इनाम देऊन त्यावर उपदेशकांचे काम सोंपवून त्यांनीं त्या त्या गांवच्या सर्व कच्च्या हकिकतीविषयीं वर्षांतून निदान एक तरी रिपोर्ट सरकारास करीत जावा असा कायदा करून बंदोबस्त करावा. म्हणजे पुढें नानासारख्या भटास एखादे बंड उपस्थित करणें झाल्यास एखाद्या पिराच्या पुढील लिंगाची यात्रा जमवून तींत सारभाताच्या ऐवजीं तयार केलेल्या गूढ चपात्या गांवोगावीं नेमलेल्या वेळीं एकदम पोहोंचवून तो प्रसाद अज्ञानी शूद्रांकडून आपल्या सरकारास पुसलें पाडून त्यांच्या मुखांत घालण्याच्या कामीं हा वतनदार कुळकर्ण्यांचा

एकोपा बिलकूल उपयोगी पडणार नाहीं. व तसें झाल्याशिवाय सर्व अज्ञानी शूद्रांचे पाय थारीं लागणार नाहींत. जेव्हां हे युरोपियन उपदेशक शूद्रांस खरें ज्ञान सांगून त्यांचे डोळे उघडतील तेव्हा ते या ग्रामराक्षसांच्या वाऱ्यास देखील उभे राहाणार नाहींत."

पेशवाईच्या उत्तर काळांत ब्राह्मण्याच्या अभिमानाचा अतिरेक आणि अध:पात होऊन जातिभेदाची कडक रीतीने अंमलबजावणी करण्याच्या धोरणाचा जो कहर झाला, धर्माचरणासंबंधींच्या चुकीच्या कल्पनांमुळे जें जुलमी, भ्रष्ट वातावरण सर्वत्र उत्पन्न झालें, त्याच्या तावडींतच पुणें शहर अद्याप होतें; व त्याबरोबरच त्या मदांध, पतित, कालविमुख ब्राह्मण्याचा दंभस्फोट शक्य त्या सर्व उपायांनी ख्रिस्ती मिशनरींकडून त्या वेळीं चाललेला होता. फुल्यांचा बुद्धिविकास या संघर्षाच्या काळांत, एकीकडे विषमतेने आमूलाग्र ग्रासलेल्या स्वधर्मांतील अन्यायाचे आघात सोशीत आणि दुसरीकडे विजयी विधर्मीयांच्या मतलबी, दिखाऊ भूतदयेचा आधार घेत, झपाट्याने होत गेला. त्यामुळे आततायी ब्राह्मण्याविषयी जाज्वल्य द्वेष आणि त्याने नाडलेल्या स्त्री-शूद्रातिशूद्रांविषयी नितांत जिव्हाळा हा त्यांचा एकच एक उत्कट, उदग्र, उत्शृंखल मनोधर्म होऊन बसला; व हातीं लागेल त्या हत्याराने ब्राह्मण्याचा नायनाट करण्याची आणि शक्य होईल त्या साधनांनी मागासलेल्या जातींचा उद्धार करण्याची तळमळ त्यांच्या जिवाला लागली.

या तळमळीने फुल्यांनी आमरण स्त्रिया, शूद्र आणि अतिशूद्र यांच्या उद्धारार्थ लेखणी आणि काया अहर्निश राबविली. त्यांचें वाङ्मय हा या त्यांच्या दुहेरी मनोधर्माचा मूर्तिमंत आविष्कार होय. 'ब्राह्मणांचें कसब,' 'शिवाजीचा पवाडा', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसूड', 'इषारा' आणि 'सार्वजनिक सत्यधर्मप्रकाश' हीं जीं सहा पुस्तकें त्यांनी लिहिलीं व 'सत्सार' आणि 'दीनबंधु' हीं जीं दोन नियतकालिकें चालविलीं, त्यांत त्यांची ही दुहेरी तळमळ ओतप्रोत भरलेली दिसते. त्यांचें अस्पृश्यतानिवारणाचें कार्य हें स्वतःचें जीवनव्रत करून निष्ठेने जन्मभर पुढे चालविणारे त्यांचे शिष्य महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांच्या या

वाङ्मयाचें वर्णन 'रानफळ' या शब्दानें जें केलेलें आहे, तेंच बरोबर. कारण त्या वाङ्मयांत कोणत्याहि प्रकारचें सौष्ठव किंवा सभ्यता यांची पर्वा केलेली नाही. त्यांत माधुर्य किंवा मार्दव अगदी नाही; खारट, तुरट, तिखट, आंबट, कडवट, जहरी अशा जालीम औषधिगुणांनी तें संपन्न आहे. तें कसलेल्या धनुर्धराचें शरसंधान नाही; तर चवताळलेल्या दलिताने घातलेले घणाचे घाव आहेत. तें चिरकाल चमकत राहणारें अभिजात साहित्य नाही; तर प्रतिपक्षाला विदीर्ण करून विलय पावणारी तात्कालिक अमोघ शक्ति आहे. त्यांत लाविलेला पुराणेतिहासांतील कथांचा आणि घटनांचा अन्वयार्थ बव्हंशीं भ्रांत आहे, हें निःसंशय; पण त्यांतून काढलेले कांही निष्कर्ष मात्र वाजवी वाटतात. फुल्यांचें वाङ्मय आणि कार्य यांच्या विषयी विचार करितांना एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. ती ही की, त्यांच्या मुख्य आजीव सहकारी मित्रांत रा. ब. सदाशिव बल्लाळ गोवंडे यांच्यासारखे ब्राह्मण कार्यकर्ते होते; व मुलींची शाळा किंवा बालहत्याप्रतिबंधक गृह काढतांना त्यांच्या डोळ्यांपुढे ब्राह्मणांतील स्त्रीवर्ग हाच विशेषतः होता. ब्राह्मण जात ही त्यांनी हिंदु संस्कृतींतील सर्व प्रतिगामी आणि विकृत प्रवृत्तींची प्रतीक आणि संरक्षक मानली; व त्या भावनेने तिच्यावर टीकास्त्र चालविलें. या त्यांच्या भावनेला पुढे निव्वळ जातिद्वेषाची धार आली आणि न्या. रानडे यांच्यासारख्या त्यांच्याशीं तत्परतेने सहकार्य करित आलेल्या त्या काळांतल्या सुधारकाग्रणीचीहि 'आर्य ब्राह्मणांतील पहिला दिवाभीत,' 'नूतन शंकराचार्य' इत्यादि वाक्पुष्पांनी त्यांची संभावना केली, हा भाग वेगळा! तथापि, फुल्यांनी केलेल्या समाजसुधारणेच्या निरनिराळ्या उपक्रमांत त्यांना ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्व जातींचे सहकारी सतत मिळत गेले, ही गोष्ट त्यांच्या स्वतःच्या संग्राहक दृष्टीप्रमाणेच त्यांच्या उपक्रमांच्याहि व्यापक आवाहनाची आणि उपयुक्ततेची निदर्शक आहे. १८५१ सालच्या जुलैंत मुलींची शाळा, १८५२ सालच्या मे मध्ये अस्पृश्यांची शाळा आणि १८६४ सालीं बालहत्या-प्रतिबंधक गृह त्यांनी स्थापन केलें; स्वतःच्या समानशील साध्वी पत्नी सावित्रीबाई यांच्या निरपेक्ष सहाय्याने या सर्व संस्था चिकाटीने चालविल्या; व वंचित गर्भवती ब्राह्मण विधवांना जसा आपल्या घरांत आश्रय दिला,

त्याचप्रमाणे घरांतला पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला करून देऊन अस्पृश्यतानिवारणाचेंहि उदाहरण प्रत्यक्ष कृतीने घालून दिलें. १८६४ सालीं त्यांनी सारस्वत ब्राह्मण जातींत जो पुनर्विवाह घडवून आणला, तो पुण्यांतील पहिला विधवाविवाह होय. ता. २३ सप्टेंबर १८७३ रोजीं सत्यशोधक समाजाची प्रतिष्ठापना करून आपल्या या सर्व विचारांना आणि कार्याला त्यांनी तात्त्विक अधिष्ठान आणि संघटित स्वरूप प्राप्त करून दिलें.

'सत्यशोधक समाज' हा महाराष्ट्राच्या आधुनिक जीवनांत जणु बलरामाचा नांगर ठरला. त्या नांगराने, जातिघटित मराठी समाजाच्या अंतरंगांत जणु शेषाच्या टाळूपर्यंत घुसून, त्यांतील सगळे खालचे थर वर उफाळून आणले; व त्यांत शतकानुशतकें दृढमूल होऊन बसलेल्या दुष्ट धार्मिक रूढींचीं पाळेमुळें उखडून काढलीं. या समाजाचीं तत्वें, उद्देश, स्वरूप आणि मर्यादा त्याच्या प्रतिवृत्तांतील पुढील उताऱ्यांवरून कळून येतील—

"(१) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्स्वरूप आहे व सर्व मनुष्यप्राणी त्याचीं प्रिय लेकरें आहेत.

(२) ईश्वराची भक्ति करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईस संतुष्ट करण्यास अगर बापास विनविण्यास जशी मध्यस्थ दलालाची जरुरी नसते त्याप्रमाणें सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ति करण्यास भट दलालाची आवश्यकता नाहीं.

(३) मनुष्य जातीनें श्रेष्ठ ठरत नसून तो गुणानें श्रेष्ठ ठरतो.

(४) कोणताहि ग्रंथ सर्वांशीं प्रमाण व ईश्वरप्रणीत नाहीं.

(५) परमेश्वर सावयवरूपानें अवतार घेत नाहीं.

(६) पुनर्जन्म, कर्मकांड, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत.

...ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये अित्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरितां व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारें आज हजारों वर्षें ते शूद्र लोकास नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारें त्यांस त्याचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरितां म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे

बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यांस मुक्त करण्याकरितां कांहीं सुज्ञ शुद्र मंडळींनीं हा समाज ता. २४ माहे सप्तेंबर सन १८७३ असवी रोजीं स्थापन केला. या समाजांत राजकीय विषयांवर बोलणें अजी वर्ज आहे."

आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या संवादात्मक पुस्तकांत फुल्यांनी मानवता आणि धर्म यांसंबंधीं असे विचार व्यक्त केलेले होते की,--

"आपल्या सर्वांच्या निर्माण कर्त्यानें एकंदर सर्व स्त्रियांस अगर पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्काविषयीं आपले पाहिजेत तसे विचार, आपलीं पाहिजेत तशी मतें बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे. परंतु ज्या विचारांपासून व मतांपासून कोणत्याहि व्यक्तीचें कोणत्याच तऱ्हेचें नुकसान मात्र होऊं नये म्हणून जे खबरदारी ठेवतात त्यांनाच सत्य वर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे आपल्या सर्वांच्या निर्मिकानें निर्माण केलेल्या प्राणिमात्रांपैकीं मानव स्त्रीपुरुषांमध्यें कोणत्याहि तऱ्हेची आवड न करतां त्यांचे खाणेंपिणें व लेणें-नेसणें याविषयीं कोणत्याच प्रकारचा विधिनिषेध करीत नाहींत त्यांनाच सत्यधर्मी म्हणावे. त्याचप्रमाणें महारोग्यास, पंगूस व पोरक्या मुलांस आपल्या शक्तिनुसार मदत करतात; देवाची शांति करण्याच्या निमित्तानें अनुष्ठानी बनून अज्ञानी जनांस भोंदाडून आपलें पोट जाळीत नाहींत; अज्ञानी जनांत कलह उत्पन्न करीत नाहींत; अंगारा व धुपारा देऊन लोकांची फसवणूक करीत नाहींत; शेतकरी, कामकरी, कारागीर यांना श्रेष्ठ मानून आदरसत्कार करतात; उद्योगधंदा न करतां निरर्थक धार्मिकपणाचा डौल घालून व तत्संबंधी पुस्तकें तयार करून अज्ञ जनांस लुबाडीत नाहींत, त्यांनाच सत्यधर्मी म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे एकंदर सर्व गांवच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधानें अथवा कोणत्याहि धर्मांतील मताच्या संबंधानें कोणत्याच प्रकारची आवड निवड न करतां या सर्व स्त्रीपुरुषांनीं या भूगोलावर आपलें एक कुटुंब समजून एकमतानें, एकजुटीनें, एकमेकांशीं सत्यवर्तन करून वागावे. इतकेंच काय, एका घरांत बौद्धधर्मी बायको,

ख्रिस्तधर्मी नवरा, इस्लामधर्मी कन्या व सार्वजनिक सत्यधर्मी पुत्र यांना प्रेमानें नांदायला लावील तोच खरा धर्म."

'सत्यशोधक समाजा'च्या या सहा सूत्रांत किंवा 'सार्वजनिक सत्यधर्मा'तील या विचारांत अभिनव असें मात्र खरोखरी कांहीहि नव्हतें. कारण, परमहंस सभा आणि प्रार्थनासमाज या तत्पूर्वी निघालेल्या दोन्ही नवधर्म-संस्थांच्या प्रवर्तकांनी हे विचार समाजांत प्रसृत करण्याचें कार्य तीस वर्षे निष्ठेने चालविलेलें होतें. किंबहुना, हीं उदात्त तत्त्वें आणि हे प्रगल्भ विचार तितक्याच उदात्त आणि प्रगल्भ शैलीने "वेदोक्त मंत्रांनी असंस्कृत अशा जातींत जन्मलेले" 'परमहंस सभे'चे संस्थापक रा. ब. दादोबा पांडुरंग यांनी आपल्या सात्त्विक, निरागस, प्रासादिक वाणीनें गद्य पद्य ग्रंथांत पूर्वीच विशद केलेले होते, हें आपण पाहिलेलेंच आहे. तथापि, फुल्यांनी हीं तत्त्वें आणि हे विचार समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंत नेऊन पोंचविले, ही त्यांची कामगिरी संस्मरणीय होय. किंबहुना, मराठा आणि तत्सम जाति या नांवाने जो महाराष्ट्रांतील बहुजनसमाज ओळखला जातो, त्या विराट् पण विस्कळित जनसमाजांत स्वत्वाची आणि स्वाभिमानाची चाड उत्पन्न करून, 'मराठा' या नात्याने त्याची राष्ट्रीयत्वाची जाणीव त्यांनी वाढविली व नव्या लोकशाही मराठी राष्ट्राच्या निर्माणाचा मार्ग सुकर केला, ही त्यांच्या जीवनकार्याची ऐतिहासिक फलश्रुति आज आपल्याला प्रत्यक्ष दिसतच आहे. १८५२ सालीं त्यांच्या शिक्षणकार्याचा पुण्यास विश्रामबाग वाड्यांत भरलेल्या दरबारामध्ये मुंबईच्या राज्यपालांनीं महावस्त्र अर्पण करून गौरव केला; व त्यानंतर तीन तपांनी १८८८ सालीं मुंबईच्या कोळीवाडा सभागृहांत त्यांना 'महात्मा' ही पदवी देऊन जनतेनेहि त्यांच्या जनसेवेचें—

सत्याचा पालनवाला । हा धन्य जोतिबा झाला
पतितांचा पालनवाला । हा धन्य महात्मा झाला
जन्माचा मालाकार
कर्माची खडी तलवार
जनतेचा जागा शेर
त्या समान कोण तो बोला । हा धन्य महात्मा झाला

हें जयगीत भरल्या कंठानें गाइलें.

पण, फुल्यांनी केलेल्या मराठी बहुजनसमाजाच्या जागृतीच्या या महान् कार्यांतील तितकेंच महान् वैगुण्यहि लक्षांत घ्यावयाला हवें. १८८२ सालीं कोल्हापूर प्रकरणांत टिळक–आगरकरांवर झालेल्या खटल्याच्या वेळीं ते जमानत द्यावयाला पुढे सरसावले किंवा त्या दोघां तरुण देश-भक्तांचा बंधमुक्त झाल्यावर त्यांनी सन्मान केला, असल्या अपवादात्मक कृतींनी कांही त्या लाजिरवाण्या वैगुण्याची भयानकता कमी होत नाही. तें वैगुण्य हें की, ब्राह्मणशाहीवर सदैव जहरी टीका करणाऱ्या या दलितोद्धार-काला ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या शोषक आणि विग्राहक नीतीची जाणीव मात्र यत्किंचित्हि झाल्याचें निदान त्यांच्या वाङ्मयांत तरी कुठे दिसून येत नाही. किंबहुना, पारतंत्र्य हे त्यांनी जनतेचे परम भाग्य म्हणून पुनः पुन्हा कंठरवानें गौरविलें आणि "युरोपियनांना गतकुळी शेतें इनाम देऊन त्यांची खेड्यापाड्यांतून उपदेशक म्हणून वसाहत करावी," अशीहि सूचना केली. ही अनर्थकारक सूचना करितांना, आफ्रिका, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या तिन्ही खंडांत वसाहती करावयाला गेलेल्या युरोपियनांनी जिथे शक्य झालें तिथे त्या त्या देशांतील आदिवासी जमातींची कशी अमानुष कत्तल केली आणि जिथें तें शक्य झालें नाही तिथे भारतांतील अस्पृश्यतेवर ताण करणारीं त्यांचीं वेगळी वसतिस्थानें निर्माण करून त्यांच्यावर मुदतबंद गुलामगिरी कशी जुलमानें लादली, या ऐति-हासिक सत्यांचें भान कांही फुल्यांना राहिलें नाही. "जगत्कर्ता भगवान. . . त्यालाच आम्हां शूद्रांची दया आल्यावरून त्याने आपल्या परमप्रिय इंग्रज लेकरास राजा करून आम्हां क्षत्रियांस ब्रह्मराक्षसाच्या दाढेंतून ओढून काढण्याकरितां हिंदुस्थानांत पाठविलें आहे", या एकमेव अंधश्रद्धेने त्यांचें सगळें वाङ्मय ग्रासलेलें आहे. "परदेशी भट-पांडे, कोकण्या नाना, तात्या टोप्या वगैरे अनेक प्रांतस्थ भटजींनी १८५७ सालीं केलेल्या थोरल्या चपाती गूढ बंडा"ची गोष्ट आपण सोडून देऊं. पण, "आजपावेतों जीं जीं मोठमोठालीं बंडें झालीं त्यांमध्ये आंतून किंवा बाहेरून मुख्य अग्रेसर भटजी नाहीत असें बंडच सांपडत नाही," असे उद्गार काढून 'गुलामगिरीं'त 'उमाजी रामोशाच्या बंडा'चीहि हेटाळणी करावयाला फुले हे चुकलेले

नाहीत. पण इतकें तरी कशाला ? " .. माळी कुणब्यास समजण्याजोगी सोपी भाषा होण्याविषयी फार श्रम करून " ज्या शिवाजी राजाचा पवाडा त्यांनी आठ भागांत रचिला, त्याच्याहि क्रांतिकार्याचें आकलन त्यांना अजिबात झालें नाही, ही गोष्ट "अक्षरशून्य शिवाजीसारख्या महावीरास फसवून धूर्त आर्य भटांनी त्यास मुसलमान लोकांचे पाठलाग करावयास लाविलें, " या त्यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्मा'तील विधानावरून अगदी स्पष्ट आहे. जिथे श्रीशिवछत्रपतीसारख्या शककर्त्या राष्ट्रजनकाची ही संभावना, तिथे सार्वजनिक सभा किंवा राष्ट्रीय सभा यांसारख्या संस्थांची कथा काय पुसावी ? त्यांच्यासंबंधीं 'सार्वजनिक सत्यधर्मा'त फुल्यांनी असें म्हटलेलें होतें की,—

"धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मुलांनीं ज्या सभा उपस्थित केल्या आहेत, त्यांपैकीं मुख्य पुणें येथील सार्वजनिक सभा आणि नॅशनल कांग्रेस. त्यांत कुळंबी, माळी, धनगर वगैरे शेतकरी किंवा साळी, कोष्टी, खत्री वगैरे कारागीर यांचे नांवसुद्धां नाहीं. उलट बारा आलोत्यांपैकीं ब्राह्मण, जोशी, उपाधि आलोत्यांचा मात्र या सभेंत भरणा आहे. बाकीचे सरकारी कामगार, वकील अगर श्रीमंत आहेत. यांत महार, मांग मग कसे असणार ! अथवा त्यांच्या पडझडीसंबंधाने या सर्वांनीं कधीं सरकारास अर्ज केल्याचेंहि माझ्या कानांवर नाहीं. उलट मोघम हिंदूच्या नांवावर कलेक्टरांच्या जागा इंग्रज सरकारनें द्याव्यात म्हणून या सभेच्या रेकार्डांत अर्ज असतील. परंतु ते अर्ज अविद्वान शूद्रादि अतिशूद्रांच्या काय उपयोगाचे–कारण मोघम नांव हिंदूंचे आणि उपभोग घेणारे एकटे ब्राह्मण–वाहावारे सभा ! आणि वाहावारे तिचें दुटप्पी रेकॉर्ड ! यावरून या बळीस्थानांतील एकंदर शूद्रादि अतिशूद्रांसह भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होईपावेतों ते सर्व सारखे एकमत झाल्याशिवाय ती सभा National होऊंच शकत नाहीं. असें असतां एकटचा उपऱ्या आर्यभट ब्राह्मणांनीं अगर चार व्यापाऱ्यांनीं नॅशनल कांग्रेस स्थापिली तर तिला कोण विचारतो ? "

सार्वजनिक सभा काय किंवा राष्ट्रीय सभा काय यांची घटना आणि कार्य हीं कितीहि दोषपूर्ण होतीं असें मानलें, तरी त्यांची हेटाळणी करितांना फुल्यांच्या लक्षांत एक साधें व्यावहारिक राजकीय सत्य आलें नाही. तें सत्य हें की, अत्यल्प-संख्य ब्राह्मणांच्या मुठींत असलेल्या या संस्था ज्या लोकशाही स्वराज्याची मागणी त्या वेळीं ईर्ष्येनें करीत होत्या, त्या स्वराज्यांतील सर्व सत्ता महाराष्ट्रांत अतिसंख्य असलेल्या ब्राह्मणेतर बहुजनसमाजाच्याच हातीं खरोखरी जावयाची होती ! १८८७ सालीं त्यांनी शेतकऱ्याच्या डोईवर वाढलेल्या समाजवृक्षाचें जें व्यंग्यचित्र तयार केलें होतें, त्यांत शेतकऱ्याची पिळणूक करणारा म्हणून त्यांना ब्राह्मण दाखविता आला, पारशी दाखविता आला' मारवाडी दाखविता आला, गुजराती दाखविता आला, मुसलमान दाखविता आला, पण त्याचा रक्तशोष करणारा इंग्रज मात्र दाखविण्याचें कांही सुचलें नाही ! 'गुलामगिरीं'त आणि 'सार्वजनिक सत्यधर्मा'त ज्या फुल्यांनीं वेदपुराणांचा उपसा केला आणि सगळ्या जगाच्या इतिहासाची झडती घेतली, त्यांना इंग्रज, युरोपियन आणि अमेरिकन यांच्या अखिल मानव जातीचें आणि विशेषत: सर्व श्वेतेतर लोकसमाजांचें शोषण आणि निर्मूलन करणाऱ्या आसुरी साम्राज्यवादाचा अणुमात्रसुद्धा बोध होऊं नये, हा केवढा चमत्कार ! लोकहितवादी आणि रानडे यांनीहि पारतंत्र्याला ईश्वरी कृपाप्रसाद म्हणण्याचा घृणास्पद राष्ट्रीय प्रमाद केला, ही गोष्ट खरी; पण, त्याबरोबरच ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या शोषक भेदनीतीचे वाभाडे काढावयालाहि ते चुकले नाहीत आणि त्यांनी लोकमत त्या नीतिविरुद्ध हळुहळू संघटित केलें, हें विसरून चालणार नाही. पण फुल्यांचे डोळे मात्र कधीच उघडले नाहीत. त्यांच्या या एकांगी विकृत जातीय प्रचाराचा आणि पारतंत्र्याच्या राष्ट्रघातकी पुरस्काराचा दुष्परिणाम महाराष्ट्राच्या जीवनावर किती भयंकर झाला, याची साक्ष इतिहास देतच आहे.

# १७

लोकहितवादी आणि फुले या दोघांच्या विचारधारांप्रमाणेच तिसरीहि एक जी विचारधारा या वेळीं महाराष्ट्रांत वाहत होती, तिचाहि मागोवा घेणें अवश्य आहे. या धारेचे आद्य प्रवर्तक अर्थातच बाळशास्त्री जांभेकर. दादोबा पांडुरंग आणि भाऊ महाजन यांनी ती परिपुष्ट केली; व मोरभट दांडेकर, गंगाधरशास्त्री फडके, हरि केशवजी, लक्ष्मणशास्त्री हळवे, भाऊ दाजी, भास्कर दामोदर पाळंदे, विष्णुबुवा ब्रह्मचारी, विश्वनाथ नारायण मंडलिक, बाळ भास्कर शिंत्रे प्रभृति तात्कालीन कार्यकर्त्यांनी, आपआपल्या प्रकृतिनुसार, तिला विचारप्रदान केलें. १८४८ सालच्या सप्टेंबरमध्ये दादोबा पांडुरंग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेली 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा' आणि भाऊ महाजन यांचे १८४१ सालीं निघालेलें 'प्रभाकर' वर्तमानपत्र हीं या नव्या विचारधारेचीं मुंबईतील मुखें होतीं; तर १८५३ सालच्या जानेवारींत कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरोपंत छत्रे प्रभृतींच्या प्रयत्नाने स्थापन झालेली 'डेक्कन इन्स्टिटयूट' आणि कृष्णाजी त्रिंबक रानडे यांचें १८४९ सालीं निघालेलें 'ज्ञानप्रकाश' वर्तमानपत्र यांच्या मुखाने पुण्यांत या धारेचा आविष्कार होत होता. या धारेचें वैशिष्टय एका शब्दांत सांगावयाचें झालें, तर तें 'समन्वय' या शद्वाने सांगतां येईल. या विचारधारेच्या प्रवर्तकांना कोणत्याच बाबतींत कोणत्याहि प्रकारचा विग्रह किंवा विद्रोह नको होता. त्याबरोबरच ते रूढिनिष्ठ, परंपराभिमानी किंवा जीर्णोद्धारवादीहि नव्हते. हिंदु धर्म आणि समाज यांचें शोधन आणि सुधारणा करणे हेंच त्यांचे ध्येय होतें. पण, ही सुधारणा समन्वयाच्या मार्गाने क्रमशः व्हावी, अशी त्यांची भूमिका होती. ख्रिस्ती मिशनरींचा हिंदु धर्मावरील हल्ला परतवून लावणें, हिंदु धर्मांतील दुष्ट प्रमेये आणि रूढि यांचें निर्मूलन करणें, हिंदु समाजांत एकात्मता उत्पन्न करून त्याला समान राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवर आणणें आणि नव्या युगाला अनुरूप अशी भौतिक जीवनदृष्टि त्याच्या ठिकाणीं निर्माण करणें, हें महान् सामाजिक पुनर्घटनेचें कार्य त्यांच्यापुढे होतें. या सर्व कार्यकर्त्यांत सर्वच बाबतींत

मतैक्य होतें, असें मात्र नाही. व्यक्तिगणिक भिन्न वृत्ति आणि भिन्न मतेंहि अर्थातच होतीं. पण स्थूलमानाने हे सर्व कार्यकर्ते सुधारणावादी होते; व ती सुधारणा त्यांना, आपल्या धर्माचा आणि समाजाचा तेजोवध करण्यासाठी, नव्या राज्यकर्त्यांच्या आश्रयाने सर्व आधुनिक साधनसंपदेसह ईर्ष्येने पुढे सरसावलेल्या पाश्चात्य मिशनरींशीं सामना देत करावयाची होती; म्हणजेच जरूर तर प्रसंगीं आपल्या धर्मांतील वैगुण्यांचें समर्थनहि करून आपल्या समाजाचा आत्मप्रत्यय जागृत करीत करावयाची होती, ही त्यांची मर्यादा लक्षांत घेणें अवश्य आहे. त्याशिवाय त्यांच्या विचारांतील आणि वर्तनांतीलहि विसंगतीचा, वैचित्र्याचा आणि विक्षेपांचाहि उलगडा होणार नाही. सुधारणेच्या या विराट्, बिकट, जटिल कार्यांतील निरनिराळ्या कार्यकर्त्यांचे गुण घेण्यांत जांभेकर आणि रानडे यांनी दाखविलेली उदार, संग्राहक बुद्धि केवळ अजोड होय. ख्रिस्ती मिशनरींचा हिंदु धर्मावरील हल्ला परतवून लावावयाला आत्मविश्वासाने उभा राहिलेला पहिला हिंदुधर्म-प्रतिपादक मोरभट दांडेकर. 'दर्पणा'च्या ता. १३ एप्रिल १८३२ च्या अंकांत जांभेकरांनी डॉ. विल्सन यांच्या 'हिंदुधर्मप्रसिद्धिकरण' (An exposure of the Hindu Religion) या ग्रंथाविषयी लिहितांना असें म्हटलें होतें की, "उइलसन साहेबांचे ग्रंथाचे प्रस्तावनांत गेले वर्षी त्यांचा व मोरभटाचा वाद झाला, त्याची संक्षेपानें गोष्ट लिहिली आहे. तसीच हिंदु धर्म स्थापना मोरभटानें कोणत्ये रीतीनें तयार केली व छापिली हें लिहिलें आहे. नंतर भटजींचे ग्रंथाचें इंग्रेजी भाषांतर आहे; आणि त्याचें पुढें प्रसिद्धि करण छापलें आहे. ब्राह्मणानें हिंदु धर्म स्थापायाकरितां पुढें येऊन आणि त्यासंबंधि ग्रंथ छापून वादाचा प्रारंभ केला, अशी ही गोष्ट प्रथम मोरभटानेंच केली, असें आम्हांस वाटतें." स्वतः जांभेकरांनी हिंदु धर्माचें प्रतिपादन व त्याबरोबरच विधवाविवाह, धर्मांतरितांचें शुद्धीकरण, दुराचारांचें निर्मूलन, जातिभेदाचें निराकरण, स्पर्शास्पर्शाच्या कल्पनांचें खंडन, परदेशगमनाचें समर्थन इत्यादि सुधारणांचा पुरस्कार 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन' या आपल्या दोन्ही नियतकालिकांतून अतिशय चिकाटीने केला; व आपल्या समाजाच्या ठिकाणीं नवी भौतिक दृष्टि आणण्यासाठीहि नाना

अनुक्रम ९५३३ २०९

प्रकारचे उपक्रम केले. त्यांच्या अकालमृत्यूने खंडित झालेलें हें कार्य दादोबा पांडुरंग आणि भाऊ महाजन यांनी पुढे चालविलें.

एकुणिसाव्या शतकाच्या तृतीय चरणांत हिंदुधर्माचे अत्यंत प्रभावशाली प्रतिपादक आणि सुधारक म्हणून जर कोणी गाजून गेलेले असतील, तर ते विष्णुबुवा ब्रह्मचारी (१८२५–१८७३). त्यांचें मूळ नांव विष्णु भिकाजी गोखले. "मी लग्न केलें नाही, त्या कारणावरून मला ब्रह्मचारी बावा म्हणतात," असें त्यांनी स्वतःच आपल्या आत्मचरित्रांत म्हटलेलें आहे. कुलाबा जिल्ह्यांत शिरवली येथील त्यांचा जन्म. घरच्या गरिबीमुळे वयाच्या नवव्या वर्षापासूनच त्यांना नोकरी करावी लागली. प्रथम तालुका कचेरींत, नंतर भुसाऱ्याच्या दुकानांत आणि शेवटी कस्टम खात्यांत याप्रमाणें चौदा वर्षें कुलाबा, रत्नागिरी आणि ठाणें या तीन जिल्ह्यांत नोकरीमध्ये काढल्यावर वयाच्या तेविसाव्या वर्षी ते सर्वसंगपरित्याग करून आत्म-साक्षात्कारासाठी बाहेर पडले. अनेक संत-महंतांचा आणि सिद्ध-साक्षात्कारी पुरुषांचा त्यांनी अनुभव घेतला; व त्यांच्या दंभाला विटून शेवटी सप्तशृंगीच्या डोंगरावर एकांतांत साधना केली. या तपस्येमुळे जो साक्षात्कार आपल्याला झाला, त्याचें त्यांनी स्वतःच आपल्या 'वेदोक्त धर्मप्रकाश' या ग्रंथांत असें वर्णन केलेलें होतें की,—

> "हे ईश्वरा, तूं मला अरण्यांत शंकर-पार्वतीरूपानें अनेक वेळां दर्शन देऊन आज्ञा दिल्हीस कीं, माझ्या वेदोक्त नियमांत ज्या तारक गोष्टी आहेत, त्या लोकांच्या मनांत ठसवून दे; कारण कीं, त्या गोष्टींचा लोप झाला आहे."

> "हे ईश्वरा, बापा, तूं दत्तात्रेय अवतार रूपानें दर्शन देऊन बोललास कीं, तूं जगांत तारक उपदेश कर, पण त्या वेळेस मी बोललों कीं, मला संस्कृत भाषा येत नाहीं. मग तूं हास्यवदन करून बोललास कीं, जा विष्णु तूं सहज भाषण बोलशील; तोच वेदगर्भीचा परम सिद्धांत होईल."

अशा प्रकारचा ईश्वरी आदेश मिळाल्यावर विष्णुबुवा सप्तशृंगीवरून खाली उतरून प्रथम नाशिकला आणि नंतर पंढरपूरला गेले. त्यांच्या

प्रचारकार्याला पंढरपूर येथे प्रारंभ झाला. आपल्या तेथील तीन वर्षांच्या मुक्कामांत त्यांनी विठ्ठलमंदिरांत श्रीएकनाथांच्या 'भावार्थ रामायणा'चीं पारायणें केलीं; प्रवचनें करून वैदिक धर्माचें रहस्य लोकांना विशद करून सांगितलें; व १८५६ सालीं आपला 'भावार्थसिंधु' हा पहिला ओवीबद्ध ग्रंथ प्रसिद्ध केला. विष्णुबुवांची प्रागतिक विचारसरणी आणि प्रचाराची तळमळ यांची यथार्थ कल्पना पुढील ओव्यांवरून येईल—

पृथ्वीवरील मनुष्यमात्र । म्लेंच्छादिक सकल जात ।।
उपदेशास अधिकारी निश्चित । हीच माझी आज्ञा असे ।।
मनुष्य जाती असे एक । हेंच ज्ञान सम्यक ।
ऐसा जाणोनि विवेक । मुक्तें उपदेश करावा ।।
सकलद्वीपें सकलखंडें । मुक्तें फिरावीं उदंडे ।
मोडूनि मतवादांचीं बंडे । उपदेश ज्ञानाचा करावा ।।
या भावार्थसिंधूचें बोलणें । सकळ जनांच्या हिताकारणें ।
तरी याचें पुस्तक बाळगणें । स्त्रियापुरुषांनीं वाचावया ।।
यांचें भाषांतर करावे । द्वीपद्वीपांतरीं न्यावें ।
स्त्रियापुरुषांनीं पहावें । संसारीं वर्तता सर्वदा ।।

त्यानंतर महादेवशास्त्री कोल्हटकर यांच्या आग्रहानुसार सांगली, मिरज, वाई, सातारा, पुणें, नगर इत्यादि शहरीं जाऊनहि त्यांनीं प्रवचनें दिलीं. महाराष्ट्रांतील या संचारांत नवी इंग्रजी राजवट आणि तिच्या आश्रयानें धर्मप्रसार करणारे पाश्चात्य ख्रिस्ती मिशनरी यांचें शोषक, विग्राहक आणि आक्रमक स्वरूप जरी बुवांच्या दृष्टीस पडलें, तरी त्याची व्यापकता आणि भीषणता मात्र, १८५६ सालच्या सप्टेंबरमध्ये द्वारकेस जाण्याच्या निमित्तानें मुंबईस आल्यावरच, त्यांना पूर्णतेने आणि प्रखरतेने आकलन झाली. कारण मुंबई हें त्या वेळीं डॉ. विल्सन प्रभृति कर्तबगार पाश्चात्य मिशनरींच्या शैक्षणिक आणि धार्मिक कार्याचें प्रबळ केंद्र होऊन बसलेलें होतें. प्रथम त्यांनी धाकजी दादाजी प्रभृति त्या काळांतील प्रतिष्ठित नागरिकांच्या वाड्यांत प्रवचनांना सुरवात केली. पण, अशा प्रकारच्या खाजगी जागेंतील बंदिस्त सभांना अस्पृश्य लोकांना हजर राहतां येत नाही, असें दिसून आल्यामुळें

आणि ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी आव्हान दिल्यामुळेहि, त्यांनी १८५७ सालीं समुद्रकिनाऱ्यावर खुल्या सभा भरवून व्याख्यानें आणि वाद यांचें सत्र सुरू केलें. ता. १५ जानेवारीपासून जूनपर्यंत सुमारें साडे चार महिने हें तुंबळ वादरण चाललेलें होतें. दर गुरुवारीं वादाचा फड समुद्रकाठीं पडे; व त्यांत पारशी, मुसलमान, ख्रिस्ती मिशनरी इत्यादि भिन्नधर्मीयहि भाग घेत असत. या वादाच्या वीस बैठकींचा वृत्तांत त्या वेळचे प्रमुख मिशनरी बोअेन यांनी प्रसिद्ध केलेला होता. त्यांत त्यांनी या बैठकींचें असें वर्णन केलेलें होतें की —

" आज समुद्रावर बावांशी संभाषण करण्यास गेलों. एका पाठीमागें एक अशीं चोहों बाजूंनीं बाकें मांडून एकांत एक दोन चौक केले होते. तीं सर्व बाकें लोकांनीं भरलीं होतीं. आणि ते बावांची मार्गप्रतीक्षा करीत होते. बावांकरितां मध्यभागीं एक खुर्ची व मेज मांडिलें होतें. पाठीमागली भिंत जरी फार उंच होती तरी थोड्या वेळांत निरनिराळ्या जातींच्या लोकांनीं ती भरून गेली; तेथें सुमारें हजार बाराशें लोक जमले होते. बावांची स्वारी आली तोंच मी त्यांस म्हटलें कीं, तुम्ही एकदम बहुत शंका काढितां आणि आम्ही तुमच्या बोलण्यांत आड येत नाहीं. त्याप्रमाणें आम्ही त्या शंकांची उत्तरें देतांना तुम्हांकडून कांहीं प्रतिबंध होऊं नये. नाहीतर तुम्ही एक एक शंका काढावी व तिचें उत्तर घेत जावें. यांतून दुसरी गोष्ट बावानें मान्य करून संभाषण सुरू केले. "

" . .ज्या सर्व सभा झाल्या त्यांमध्यें अव्यवस्था किंवा दांडगाई नव्हती. वादविवाद होत असतां सभेस आलेल्या हिंदु, फारशी, मुसलमान लोकांनी बहुधा सभ्य रीतीची वर्तणूक केली. . . "

"...कोणी एक मुलगा एका पाद्रीपाशीं बाप्तिस्मा घेण्यास गेला होता. त्याच्याशीं संभाषण करण्यास बावा गेले म्हणून त्यांच्यावर त्या पाद्रीनें फिर्याद केली असें बाबानें वादविवाद करण्याच्या प्रारंभीं सांगितलें. आणि उपहास केल्यासारखें हांसून म्हटलें कीं, मज बापड्याचीं

लढण्याची शस्त्रें शब्दमात्र आहेत, पण ज्यांस दुसरीं शस्त्रें हवींत त्यांनी तीं घ्यावीत. . . ."

"...पारशी धर्म व मुसलमानी धर्माविषयीं आपलें काय मत आहे हें कृपा करून सांगावे. तुम्ही या धर्मांचा मोड करण्यास कां कंबर बांधीत नाहीं ?

"जर ते लोक हिंदु धर्माचा मोड करण्याच्या कामांत हात घालतील तर मीही त्यांच्या धर्मांचा मोड करण्यास यत्न करीन. ख्रिस्ती धर्म खेरीज करून पारशी व मुसलमानी व अितर सर्व धर्म खरे आहेत असें मी मानितों."

"माझा धर्म म्हणाल तर वेद आहे. दुसऱ्या कोणत्याहि धर्मांतून चांगल्या गोष्टी घेण्यास मला कांहीं प्रतिबंध नाहीं. जसा कोणी एखादा मनुष्य आंब्याचा गीर भक्षण करून कोई व सालपटें टाकून देतो, त्याप्रमाणें प्रत्येक धर्मांतून जो चांगली गोष्ट माझ्या मनास पटेल ती घेण्यास व वाईट टाकून देण्यास मी खुषी आहे. ख्रिस्ती धर्माविषयींहि मी असेंच करणार."

या साप्ताहिक वादसंगराचा लोकांच्या मनावर इतका विलक्षण परिणाम झाला की, १८५७ सालच्या जूननंतर बंडाचा भडका उडाल्याची संधि साधून सरकारने बुवांची मुस्कुटदाबी केली.

विष्णुबुवांचे एकंदर स्वलिखित आणि अन्यसंपादित मिळून 'भावार्थ सिंधु', 'वेदोक्त धर्मप्रकाश', 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध', 'चतुःश्लोकी भागवत याचा अर्थ', 'सहजस्थितीचा निबंध', 'समुद्र-किनारीचा वादविवाद', 'वेदोक्त धर्माचा विचार व ख्रिस्ती मतखंडन', 'नारायणबावाकृत बोधसागराचें रहस्य' आणि 'सेतुबंधनी टीका' असे नऊ गद्य पद्य ग्रंथ आहेत. त्यांत 'वेदोक्त धर्मप्रकाश' आणि 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध' हे दोन मुख्य. "म्लेंच्छ मतें माजलीं उदंड। म्हणून माझी प्रेरणा" या निष्ठेने त्यांनी 'वेदोक्त धर्मप्रकाश' हा ग्रंथ १८५९ सालीं प्रसिद्ध केला. सुमारें ७५० पानांच्या या ग्रंथांत बुवांनी वैदिक धर्माचीं तत्त्वें, विधिविधान, वर्णव्यवस्था, जातिभेद इत्यादि विषयांचें विवरण

केलेलें असून, ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी त्यावर घेतलेल्या आक्षेपांचेंहि खंडन केलेलें आहे. मूळ वैदिक धर्म हा अत्यंत शुद्ध, उन्नत, उज्ज्वल आणि सामर्थ्यप्रद असून, त्याच्या पुनरुज्जीवनानेच हिंदु समाजाचें पुनरुत्थान होईल, अशी बुवांची श्रद्धा होती. त्या श्रद्धेचा व्यासंगपूर्ण, चिंतनप्रधान, सुधारणाभिमुख, युयुत्सु आविष्कार म्हणजेच 'वेदोक्त धर्मप्रकाश'. म्हणूनच, न्या. रानडे यांनी १८१८ ते १८६४ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या तत्त्वज्ञानपर, धार्मिक ग्रंथांमध्ये, "जुन्या श्रद्धा आणि रूढि यांचा उदो उदो करण्याच्या त्या काळांत, निराळी निरामय दिशा दाखविणारा एकमेव ग्रंथ" ( The only work indicative of any healthy departure in this connection ) म्हणून त्याला अग्रस्थान दिलेलें आहे. दयानंद सरस्वतींचा उदय, त्यांच्या 'सत्यार्थ-प्रकाशा 'चें प्रकाशन आणि 'आर्यसमाजा 'ची स्थापना होण्यापूर्वी बुवांचा हा 'वेदोक्त धर्मप्रकाश' जनतेपुढे आला होता, ही गोष्ट लक्षांत घेतली असतां, त्यांच्या पुरोगामी दृष्टीची कल्पना येईल. "सर्व पक्षांना सामान्यतः स्वीकार्य वाटेल अशा रीतीने जुन्या धर्ममतांची मांडणी त्यांत केली आहे," असा जो अभिप्राय न्या. रानडे यांनी त्या ग्रंथाविषयी दिलेला होता, तो त्याचें त्या काळांतील हें अद्वितीय वैशिष्टच लक्षांत घेऊनच! हीच बुवांची पुरोगामी दृष्टि त्यांच्या १८६७ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध' या प्रबंधांतहि प्रतीत होते. या निबंधांत पुरस्कारिलेल्या 'सुखदायक राज्यनीती 'ची मध्यवर्ती कल्पना 'एक कुटुंब सर्व प्रजा' ही आहे. बुवांनी ती अशा रीतीने विशद केलेली होती की—

> "याप्रमाणें सर्व प्रजा एक कुटुंब व सर्व जमीन हाच एक बाग व त्यांतून जें जें निघेल तें तें सर्वांचे एक. याप्रमाणें राज्यव्यवस्था असली म्हणजे सर्वांना सर्व उपभोग मिळतात व सर्वांना उत्तम खावयास मिळते, सर्वांना उत्तम विपुल वस्त्रें व अलंकारभूषणें मिळतात, सर्वांना नाच, तमाशे, बैठकी पहावयास सांपडतात. पालख्या, रथ, घोडे, व हत्ती यांजवर सर्वांना वृद्ध अवस्थेंत "पार्लमेंट"च्या जागीं बसावयास मिळतें. यामुळें कोणाला कांहीं प्राप्त नाहीं असें होतच नाहीं. म्हणून सर्व लोक पूर्णकाम होतात. यामुळें कामाच्या अपूर्णतेनें क्रोध येणें हें शिल्लकच

राहत नाही; आणि क्रोध नसल्यामुळे गुन्हा करणें किंवा गुन्हा करण्यास्तव मत्सर धरून बसणें यांचा लवलेशहि राहत नाहीं. यामुळे हाच प्रजेचा व राजाचा खरोखर असावा तसा संबंध आहे."

त्यांची ही 'सुखदायक राज्यनीती'ची कल्पना साम्यवादाशीं इतकी सदृश भासणारी होती की, चिपळूणकरांनी जॉन्सनवरील आपल्या निबंधांत 'कम्युनिजम' म्हणजे 'सार्वस्विक संप्रदाय' असें सांगून, "विष्णुबोवा यांनी 'सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध' म्हणून एक लहानसा ग्रंथ केला होता, त्यांत वरील प्रकारचींच मतें प्रणीत केलीं होतीं," असें म्हटलेलें आहे. आपल्या या निबंधाचें इंग्रजी भाषांतर मुंबई हायकोर्टाचे भाषांतरकार बाळ भास्कर शित्रे यांच्याकडून करवून आणि तें कॅप्टन फेल्प्स याच्याकडून तपासवून घेऊन बुवांनी १८६९ सालीं त्याच्या १०,००० प्रती काढल्या; व त्या सर्व देशांतील प्रमुख विचारी लोकांकडे अवलोकनार्थ पाठवून दिल्या. इतकेंच नव्हे, तर ब्रिटिश पार्लमेंटचे सदस्य, मंत्रिमंडळ, महाराणी व्हिक्टोरिया आणि युवराज एडवर्ड यांच्याकडेहि त्याच्या प्रती धाडून, भारतांतील सुशिक्षित लोकमत हें राजकारणाचा विचार करण्याच्या बाबतींत पाश्चात्य लोकमतापेक्षा कमी प्रगतिशील नाही, याचीहि प्रतीति आपल्या नव्या राज्यकर्त्यांना बुवांनी आणून दिली. त्यांचें सर्व कार्य मराठी भाषेंतून झालेलें असलें, तरी त्यांची आकांक्षा मात्र सर्व जगाची उन्नति करण्याची होती. त्या आकांक्षेंत हिंदु अहिंदु, वैदिक म्लेंच्छ, आर्य अनार्य इत्यादि कोणत्याच प्रकारच्या भेदभावांना थारा नव्हता. त्यांचें आचरणहि या अफाट आकांक्षेला शोभेल असें म्हणजे अनिर्बंध होतें. ते जातिभेद हा वेदविहित नाही म्हणून निषिद्ध आणि त्याज्य मानीत असत; व त्यामुळे वाटेल त्याच्या हातचें अन्न वाटेल तिथें खावयाला त्यांना दिक्कत वाटत नसे. त्यांनी कांही दिवस मुसलमान खानसामाहि ठेवलेला होता. त्यांचें वर्तन नैतिक दृष्टचा अत्यंत शुद्ध पण व्यावहारिक दृष्टचा अगदी स्वच्छंदी असे. साक्षात्कार झाल्यानंतर त्यांनी खरोखरी विदेहावस्थेंतच आपलें सर्व आयुष्य घालविलें. ते केवळ मुंबईंत किंवा महाराष्ट्रांतच गाजले असें नाही; तर काशी, कलकत्ता आणि मद्रास येथेहि जाऊन त्यांनीं आपल्या विचारांचा प्रसार केला. किंबहुना, ज्याचें कर्तृत्व आणि

विचारप्रणालि हीं दोन्हीहि लंडनसारख्या जगाच्या चवाठ्यावर गाजलीं व 'इलस्ट्रेटेड लंडन न्यूज' आणि 'एशियाटिक' यांसारख्या नियतकालिकांनाहि ज्याच्या विचारांचा परामर्श घ्यावासा वाटला, असा इंग्रजी आमदानींतील पहिला महाराष्ट्रीय विचाराग्रणी बहुधा हाच असावा. वेदांत सर्व ज्ञान असल्याबद्दलचा त्यांचा आग्रह, त्यांचीं लोकविलक्षण सामाजिक आणि राजकीय मतें व त्यांचें लोकविरुद्ध आचरण यांमुळे केवळ ख्रिस्ती नियतकालिकांतूनच नव्हे, तर 'प्रभाकर', 'नेटिव्ह ओपिनियन', 'ज्ञानप्रकाश', 'इंदुप्रकाश' इत्यादि तत्कालीन महाराष्ट्रीय नियतकालिकांतूनहि त्यांच्यावर सतत प्रतिकूल टीका येत असे. पण वाद आणि प्रवाद यांची धूळ अंगावर घेत यथेच्छ वप्रक्रीडा करण्यांत बुवांच्या युयुत्सु अस्मितेने आमरण आनंद मानला. त्यांचें व्यक्तित्व अकुतोभय आणि आव्हानप्रद होतें. त्यांच्या हयातींत जरी त्या वेळच्या प्रतिष्ठित वृत्तपत्रांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठविली, तरी देहावसानानंतर मात्र 'नेटिव्ह ओपिनियन' आणि 'इंदुप्रकाश' यांनी त्यांचा असा गौरव केलेला होता की —

"मुंबईंत पुष्कळ वर्षेंपर्यंत विष्णुबावा गोखले हे धर्मोपदेशकाच्या नात्यानें राहत असत. हे गृहस्थ शनिवार ता. १७ रोजीं रात्रौ कैलासवासी झाले. त्यांनीं पुष्कळ वर्षांपूर्वीं 'वेदोक्त धर्मप्रकाश' म्हणून एक हिंदुधर्मपर ग्रंथ प्रसिद्ध केला. या शहरांत पुष्कळ विद्यार्थ्यांस माहीत असेल कीं, कैलासवासी धाकजी दादाजी यांचा जो प्रसिद्ध वाडा, तेथें हे रात्रौ व्याख्यान देत असत. आणि त्यांच्या भाषणाची वेधक शक्ति व समयसूचकताहि प्रसिद्ध होती. त्यांची स्मृति फार तिखट होती आणि धैर्य विलक्षण होतें. या गृहस्थानें थोड्या दिवसांवर सुखदायक राज्यप्रकरणी निबंध म्हणून एक ग्रंथ प्रसिद्ध केला होता. त्यांतील सिद्धांत जरी आम्हांस कबूल नसल्यामुळें त्याविषयींची टीका इंग्रेजींत थोडीशी छापून प्रसिद्ध केली होती; परंतु जरी ब्रह्मचारी बावांच्या ग्रंथाशीं मिळून आमचा अभिप्राय नसला तथापि तो पुरुष निस्पृह असून विरक्त होता असें आम्हांस वाटतें. म्हणून तसें म्हणण्यास अगदीं आशंकणार नाहीं. या आपलपोटी व कपटी जगामध्यें विष्णुबावासारख्या लोकांची फार जरूर आहे. ('नेटिव्ह ओपिनियन'— २६ फेब्रुवारी १८७१)

"आम्हांस लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं, मुंबईतील प्रसिद्ध साधु व मराठी भाषेंत अनुपम वक्ते ब्रह्मपरायण विष्णुबाबा ब्रह्मचारी हे गेल्या शनिवारी रात्रौ एक वाजावयाच्या सुमारास समाधिस्थ झाले. त्यांच्या मानेस काळपुळी झाली होती, तिच्या योगानें त्यांचा काळ झाला. ब्रह्मचारी बाबांच्या मृत्यूनें फार लोकांस दुःख होईल. कारण यांजसारखा विलक्षण बुद्धिवान, बोलल्याप्रमाणें आचरण असणारा असा धैर्यवान, आपल्याला जो लोक व देशकल्याणाचा मार्ग वाटला, त्याजकरितां सारखें दोन तपें सतत व अस्खलित झटून प्रयत्न करणारा असा पुरुष मिळणें फार कठीण आहे. तेव्हां अशा थोर व योग्य पुरुषाचें मरण हें एक आमच्या लोकांचे एकंदरीनें व महाराष्ट्र लोकांचे विशेषतः मोठें नुकसान असें समजलें पाहिजें." ( इंदुप्रकाश, २० फेब्रुवारी १८७१ )

या उद्गारांवरून लोकहितवादीप्रभृति त्या पिढींतील इतर सुधारक आणि विष्णुबुवा यांच्यांतील फरक लक्षांत येईल. बुवा हे महाराष्ट्रीय नव्हते, राष्ट्रवादी नव्हते किंवा हिंदुत्वनिष्ठहि नव्हते; तर 'कृण्वन्तो विश्वमार्यं' या वैदिक आकांक्षेने उद्युक्त झालेले विश्वकुटुंबी ऋषि होते. जसे तपस्वी तसेच मनस्वीहि. कोणत्याहि रूढ प्रणालीच्या सांचांत मावण्याइतकें त्यांचें व्यक्तित्व संकुचित नव्हतें. जातीयता, अंधानुकरण, आत्मविस्मृति, राजसेवेंत राहून राष्ट्रोद्धार करण्याचा हव्यास, पारतंत्र्याचा जयजयकार करण्याचें वेड इत्यादि प्रतिगामी प्रवृत्तींनी ग्रासलेल्या त्या संक्रमणकालांत विष्णुबुवांचें 'ज्वलन्निव ब्रम्हमयेन वर्चसा' असें व्यवच्छेदक, विदेही व्यक्तित्व अगदी आगळें आणि अद्वितीय वाटतें.

## १८

हिंदु धर्म, संस्कृति आणि समाज यांचें शोधन आणि सुधारणा करण्याचे हे जे उपक्रम जांभेकरांपासून तों फुल्यांपर्यंत निरनिराळ्या वृत्तींच्या आणि श्रेणींच्या कार्यकर्त्यांनी सामान्यतः १८१८ पासून १८६० पर्यंत केले, त्या सर्व उपक्रमांतील प्रगतिपर, विशुद्ध, उन्नत तत्वविचारांचा अंश

तेवढा उचलून घेऊन त्यांतून उदारमतवादाचें समन्वयप्रवण ' दर्शन ' निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न विष्णु परशुरामशास्त्री पंडित, वामन आबाजी मोडक, रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि महादेव गोविंद रानडे यांनी केला. अल्पायुषी जांभेकर आणि दीर्घायुषी दादोबा या दोघांनी आपल्या ऋजु आर्ष वाणीने या नव्या आधुनिक ' दर्शना 'ची पहिलीं सूत्रें उच्चारलीं होतीं, ही गोष्ट खरी. पण, नवीन इंग्रजी राजवटी-बरोबर सुरू झालेल्या प्रमाथी विचारमंथनाचें—त्यांतून आविर्भूत झालेल्या सुरेचें म्हणा, हलाहलाचे म्हणा वा अमृताचें म्हणा—सूक्ष्म दृष्टीने विश्लेषण करून, प्रगतीचें बीज पोटीं असलेला त्यांतील कोणताहि कलुष विचार-सुद्धा सर्वथैव त्याज्य न मानतां आणि समाजोन्नतीच्या तळमळीने केलेल्या कोणत्याहि सदोष उपक्रमाचा सुद्धा, ' धूमेनाग्निरिवावृतः ' या जाणिवे-मुळे, तुच्छतेने अधिक्षेप न करितां, त्या सर्व विचारांतला आणि उपक्रमांतला गुणांश तेवढा घ्यावयाचा आणि त्यांच्या साधर्म्यावर भर देऊन त्यांच्यांत जास्तीत जास्त सात्म्य उत्पन्न करावयाचें, या विशाल, संग्राहक धोरणानें या नव्या ' दर्शना 'ला परिणति आणि पूर्णता मात्र या चौघां ऋषींनीच आणली, हें निस्संशय. १८६२ सालच्या जानेवारींत मुंबई येथे जनार्दन सखाराम गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली निघालेलें ' इंदुप्रकाश ' पत्र हें या नव्या ' दर्शना 'चें मुख आणि १८६७ सालच्या मार्चमध्ये पापमोचनी एकादशीच्या पवित्र दिवशीं, भिकोबादादा चव्हाण यांच्या पुरस्काराने, स्थापन झालेला ' प्रार्थनासमाज ' हें त्याचें व्यासपीठ होतें. लोकसेवेच्या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन विष्णुशास्त्री पंडित यांनी १८६४ सालीं सरकारी नोकरी सोडली; व ते ' इंदुप्रकाशा 'च्या संपादकमंडळांत येऊन दाखल झाले. त्यांच्यासारखा ' चित्ते वाचि क्रियायां च एकरूपता ' असलेला तत्त्वैकनिष्ठ धर्मशास्त्रज्ञ संपादक ' इंदुप्रकाशा 'ला लाभल्यामुळे त्यांतील प्रतिपादनाला प्रामाण्य आणि तेज हीं दोन्ही आलीं. त्याबरोबरच न्या. रानडे यांचा सर्वस्पर्शी आणि सूक्ष्मदर्शी व्यापक दृष्टिकोन हेंहि त्याचें विलोभनीय, उद्बोधक वैशिष्ट्य होऊन बसलें. धर्मशास्त्रांच्या आधाराने समाज-सुधारणूचें समर्थन करणारे पंडितांचे लेख आणि प्रबंध, मोडक आणि भांडारकर यांची धर्मपर व्याख्यानें व न्या. रानडे यांनी, सामाजिक

परिषदेच्या व्यासपीठावरून, देशांतील समाजसुधारणेच्या निरनिराळ्या चळवळींचें वर्षानुवर्षं निरीक्षण करून, आपल्या विचारगर्भ वाणीने केलेलें त्यांचें तात्त्विक संश्लेषण–हें सर्व वाङ्मय म्हणजे उदारमतवादाची संहिता होय. चारित्र्य, विद्वत्ता, निरहंकार वृत्ति, स्वजनांच्या उन्नतीविषयीं जिवंत कळकळ, आपली प्राचीन संस्कृति आणि परंपरा यांच्याविषयीं योग्य अभिमान व सर्व जगांतील विचारौघांचें सतत आलोडन केल्यामुळे मनाला आणि बुद्धीला आलेली गाढता आणि विशालता या गुणांमुळे या चौघां विचाराग्रणींनी आपला धर्म, संस्कृति आणि समाज यांच्या अवनतीचे जे निदान केलें आणि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीचीं जीं तत्त्वें घालून दिलीं, तीं जशीं सौम्य आणि सात्त्विक तशीच संधायक आणि संजीवकहि होतीं.

पंडित काय, मोडक काय, भांडारकर काय किंवा रानडे काय यांचें जीवन जात्याच धर्ममय, दृष्टिकोन स्वभावतःच आध्यात्मिक होता. त्यांनी मानवी जीवनाकडे केवळ धर्म म्हणूनच पाहिलें; व धर्म म्हणूनच त्यांनी स्वतःच्या आणि समाजाच्याहि जीवनाचा विचार आमरण केला. त्यांच्या मागून आलेल्या टिळक–आगरकरांच्या पिढींत जो अज्ञेयवाद प्रसृत होत चाललेला होता, त्याची त्यांना विलक्षण चीड होती. भरतभूमि ही धर्म-भूमि आहे, या एकाच उदात्त जाणिवेने त्यांचें अंतर्याम आणि आचरण व्यापलेलें होतें. न्या. रानडे यांनी स्पष्टच म्हटलेलें आहे की, " ही धर्माची भूमि आहे. चांगल्यासाठी असो किंवा वाईटासाठी असो, आम्हाला देव-धर्मांविषयी बोलण्याची आणि विचार करण्याची खोड लागली आहे, यांत संशय नाही. तिच्यापुढे आमचा इलाज चालत नाही. देवाधर्माबद्दलचे विचार आमच्या रक्तांत आहेत. त्यांना चुकविण्याकरिता आम्ही पळून जाऊं लागलों, तर ते आमचा पाठलाग करितील. आम्हाला सोडणार नाहीत." त्यामुळे उपनिषदांपासून तों एकनाथी भागवतापर्यंत मानवाचा मानव म्हणून सर्वांगीण विकास करावयाला संधि आणि सहाय देणारा जो भागवतधर्म शतकानुशतकें भारतांत विकसित होत आलेला होता व ज्या धर्माने आपल्या कवेंत ब्राह्मणापासून अंत्यजांपर्यंतच केवळ नव्हे, तर अविधांसारख्या विधर्मीयांपर्यंतहि सर्वांना समदृष्टीने समाविष्ट करून घेतलेलें होते, त्यालाच या ऋषींनी, नव्या युगानुसार, उदारमतवादाचे आधुनिक

स्वरूप दिलें. मानवाचें संपूर्ण दास्यमोचन आणि त्याची सर्वांगीण उन्नति हें या दर्शनाचें एकमेव साध्य होतें. न्या. रानडे यांनी १८९६ सालीं कलकत्ता येथे सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरून केलेल्या भाषणांत या साध्याचें असें सुंदर विवरण केलेलें होतें की, "मानवाची बुद्धि मुक्त करून, त्याची कर्तव्याची श्रेणी उन्नत करून आणि त्याच्या सर्व शक्ति परिणत करून संपूर्ण मानवाची नवनिर्मिति करणें, त्याला पवित्र आणि पूर्ण करणें हें अंतिम साध्य आहे." ( The end is to renovate, to purify and also to perfect the whole man by liberating his intellect, elevating his standard of duty and perfecting all his powers. ) अर्थात् मानवाच्या सर्वांगीण सुधारणेच्या, या संयम आणि समतोल यांनी युक्त अशा तत्त्वज्ञानांत कोणत्याहि प्रकारचा एक-कल्लीपणा किंवा अतिरेक असणें शक्यच नव्हते. मानवाची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय उन्नति ही एकाच वेळीं आणि एकाच गतीने सतत होत राहिली पाहिजे, हा या नव्या दर्शनाचा मध्यवर्ती सिद्धांत होता. त्याचें प्रतिपादन करितांना न्या. रानडे यांनी असा मार्मिक इषारा दिलेला होता की—

"राजकीय हक्कांच्या बाबतींत जर तुमची अधोगति झालेली असेल, तर तुमची समाजरचना चांगली असणें शक्य नाही. त्याबरोबरच तुमची समाजरचना जर बुद्धि आणि न्यायनीति यांच्यावर अधिष्ठित झालेली नसेल, तर राजकीय हक्क आणि सवलती यांचा उपभोग घेणें तुम्हाला शक्य होणार नाही. तुमची सामाजिक व्यवस्था जर अपूर्ण असेल, तर तुमची आर्थिक रचना चांगली असणें शक्य नाही. तुमची धार्मिक ध्येयें हीं जर हीन आणि नीच असतील, तर राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांत तुम्हांला यश येणें शक्य नाही. . . . या सर्व सुधारणांचें परस्परावलंबन हा कांही अपघात नाही; तर तो आपल्या प्रकृतीचा कायदा आहे." ( You cannot have a good social system when you find yourself low in the scale of political rights, nor can you be fit to exercise political rights and privileges unless your social system is based on **reason and justice.** You cannot have a good economical system when your social

arrangements are imperfect. If your religious ideals are low and grovelling you cannot succeed in social, economical and political spheres.......This interdependence is not an accident but is the law of our nature. )

सर्वांगीण सुधारणेच्या या संयत कल्पनांत कदाचित् पुरेसा वेग किंवा प्रखरता नसेल. कारण समाजाला बरोबर घेऊन चालण्याच्या भावनेनें या ऋषींनी 'लघुतम प्रतिकारा'च्या ( Line of least resistance ) धोरणाचा जाणून बुजून अंगीकार केलेला होता. पण, समाजाच्या जीवनाचा विचार त्यांनीं खंडशः किंवा भागशः केला नाही; तर त्याच्या समग्र जीवनाचा विचार साकल्याने करून पूर्वपरंपरेला सुसंगत अशा रीतीने, त्याच्या आमूलाग्र उन्नतीचीं तत्त्वें लोकांना विशद करून सांगितलीं, हें त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य अद्वितीय होय. राजा राममोहन राय यांच्यानंतर या देशाच्या सर्वांगीण सुधारणेच्या तत्त्वांचा इतका तर्कशुद्ध पुरस्कार इतक्या निष्ठेने भारतांत अन्यत्र कुठेंहि केलेला आढळणार नाही.

न्या. रानडे यांच्या 'सामाजिक उत्क्रांति', 'सामाजिक प्रगतीची खरी कसोटी', 'पुण्यांतील प्रक्षोभाचें कारण', 'जीर्णोद्धार की सुधारणा?', 'वसिष्ठ आणि विश्वामित्र' इत्यादि सामाजिक परिषदेंतील व्याख्यानांतून या तत्त्वांचें अत्यंत सुंदर विवरण, भारताच्या गतेतिहासाचा मागोवा घेत घेत, मोठ्या सहृदयतेने केलेलें आढळतें. जुन्या हिंदु समाजापासून फुटून निघण्याची किंवा त्याचें सर्व जीवन आमूलाग्र बदलून टाकण्याची अतिरेकी भाषा बोलणारांना त्यांनी असा स्पष्ट इषारा दिलेला होता की,--

"जो यज्ञीय अग्नि केवळ शुद्ध आणि उन्नत करण्यासाठींच प्रदीप्त होतो, त्याच्या शलाकांनीं हा विराट् मानव समाज उज्जीवित होत असल्याचीं जीं चिन्हें दिसत आहेत, त्यांतच प्रगतीची खरी कसोटी आपण पाहिली पाहिजे. कांहीं लोकांना असें वाटतें कीं, अशीं कोणतीच चिन्हें दृग्गोचर होत नाहींत; व म्हणून या सडत असलेल्या समाजापासून फुटून निघणें आणि आपल्या स्वतःच्या सुरक्षिततेचा विचार करणे हे आपले परम कर्तव्य आहे. आपल्या समाजापासून फुटून निघण्याच्या या

कल्पनेविरुद्ध गेलीं तीस वर्षें मी झगडत आलेलों आहे; व माझ्यांत जोंपर्यंत त्राण आहे आणि माझी वाणी जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत या कल्पनेला मी विरोध करित राहीन. हिंदु समाज हा कांहीं ऱ्हास आणि भ्रष्टाचार यांचा कुजत पडलेला ढिगारा नाहीं. तो एका मर्यादेपर्यंत पुराणमतवादी आहे, हें निस्संशय; पण तो पुराणमतवाद हेंच त्याचें सामर्थ्य आहे. बदलत्या कालमानाबरोबर जें राष्ट्र आपली तत्त्वप्रणालि आणि आपले नीतिनियम, आपल्या चालीरीति आणि आपली समाजधारणा बदलतें, त्याला इतिहासांत नियत स्थान नाहीं. नवीन कल्पना हळुहळू आत्मसात् करणें आणि नवे आचार हळुहळू उचलून अंगवळणीं पाडणें याच्या आड कांहीं आपला पुराणमतवाद येत नाहीं. "

( The true test of progress must be seen in signs which show that this vast mass of humanity is being vivified by the sacred fire which burns only to purify and elevate. There are those who think that no such signs can be seen and that our highest duty is to separate ourselves from the decaying mass and look to our own safety. I have battled with this idea for the last 30 years and I shall protest against it, till life is spared and my voice permits me to speak. The Hindu community is not a festering mass of decay and corruption. It is no doubt conservative to a degree, but that conservatism is its strength. No nation has any destined place in history which change its creed and its morals, its customs and its social polity, with the facility of fashions. At the same time our conservatism does not prevent the slow absorption of new ideas and the gradual assimilation of new practices. )

अशा रीतीने आपल्या समाजापासून फुटून निघण्याच्या किंवा त्याचें सर्व जीवनच मुळी नव्या मुशींत ओतण्याच्या अविवेकी उतावळ्या कल्पनांचा जरी रानड्यांनी निषेध केला, तरी त्याबरोबरच, "सुधारणा म्हणजे जीर्णोद्धार नव्हे–सुधारणेचें कार्य खरोखरी बंधमोचन हें आहे," (Reform was not Revival...the work of Reform is really

the work of Liberation ) हें तत्त्वसूत्र विशद करितांना त्यांनी सुधारकाची भूमिका आणि कार्य यांचें असें विवरण केलेलें होतें की,—

"खऱ्या सुधारकाला कोऱ्या पाटीवर लिहावयाचें नसतें. अर्धवट लिहिलेलें वाक्य पूर्ण करण्याचेंच प्राय: त्याचें कार्य असतें. . . भूतकाळांतून सतत वहात आलेला जीवनाचा ओघ आपल्यामागून येत आहे; व गतकालांतील तत्वांनुसार घडलेल्या आणि नोंदल्या गेलेल्या कृति या प्रमाण म्हणून स्वीकारूनच आपण त्या ओघाला जरूर तिथे हळुवार हातांनीं वळण दिलें पाहिजे. त्याला अजिबात बांध घालणे किंवा नव्या पात्रांत तो जबरदस्तीनें आणून सोडणें या दोन्ही गोष्टी आपल्याला परवडणार नाहींत. . .भूतकाळाशीं आपण पूर्णतया संबंध तोडूं शकत नाहीं आणि आपल्या भूतकाळाशीं आपण अजिबात संबंध तोडणें योग्यहि नाहीं. कारण आपला भूतकाळ हा मोठा समृद्ध वारसा आहे. त्याबद्दल आपल्याला लाज वाटण्याचें कांहींहि कारण नाहीं. आपल्या समाजानें भूतकाळांत आश्चर्यकारक लवचिकपणा दाखविलेला आहे; व त्याच्या ठिकाणचा तो गुण, सहिष्णुता आणि चिकाटी हीं नाहींशी झालेलीं आहेत, असें समजण्याचें कांहींहि कारण नाहीं. भूतकाळाचा आदर करितांना त्याच्यावर वाढलेल्या ज्या अनेक बांडगुळांनी त्याच्या जीवनसत्वाचें शोषण चालविलेलें आहे आणि त्याला गंज आणलेला आहे, तीं रूढीचीं बांडगुळें काढून टाकण्याचा प्रयत्न आपण सदैव केला पाहिजे. सामाजिक परिषदेशीं संलग्न असलेल्या ज्या संस्था आणि संघटना काम करित आहेत, त्यांची भूमिका तरी अशा प्रकारची आहे. बदलासाठी बदल त्यांना नको आहे किंवा इतरत्र एकादी टूम वोकाळली आहे म्हणूनहि ती त्यांना नको आहे. आपल्या भूतकाळांतील उत्कृष्ट परंपरेपासून ते स्फूर्ति घेतात आणि परस्परसहिष्णुतेच्या भावनेनें भूतकालाचा वर्तमानाशीं मेळ घालतात. शास्त्रांविषयीं त्यांना पूज्यबुद्धि आहे. पण जुन्या विधानांच्या शब्दप्रामाण्यापेक्षा त्यांतील तत्वाला ते अधिक मानतात." ( The true reformer has not to write upon a clean slate. His work is more often to complete the

half-written sentence......We cannot break with the past altogether, with our past we should not break altogether, for it is a rich inheritance, and we have no reason to be ashamed of it. The society to which we belong has shown wonderful elasticity in the past, and there is no reason for apprehending that it has ceased to be tractable and patient and persistent in action. While respecting the past, we must ever seek to correct the parasitical growths that have encrusted it, and sucked the life out of it. This is, at least, the spirit in which the societies and associations which are represented at the social Conference seek to work. They seek no change for its own sake, or because it is fashionable elsewhere. They seek their inspiration in the best traditions of our own past, and adjust the relations of the past with the present in a spirit of mutual forbearance. The Shastras they revere, but they respect the spirit more than the letter of the old law. )

आपल्या देशाचा भूतकाळ आणि परंपरा यांच्यासंबंधी रानड्यांना हा जो निरतिशय आदर होता, त्याचें मूळ त्यांच्या भरतभूमीवरील नितांत श्रद्धेंत होतें. १८९३ सालीं लाहोर येथे भरलेल्या सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरून त्यांनी आपल्या भावगंभीर वाणीने अशी घोषणा केलेली होती की,–

"माझ्या तत्त्वप्रणालींतील दोन तत्त्वांवर माझी अनन्य श्रद्धा आहे: आपली भूमि ही खरी आश्वासित देवभूमि आहे आणि आपली जाति ही देवाची नियोजित जाति आहे. आर्यावर्ताच्या या भूमीवर परमेश्वरानें जो आपल्या कृपाप्रसादाचा वर्षाव केलेला आहे, तो कांहीं उगाच नव्हे. इतिहासांत त्याचा हात आपल्याला स्पष्ट दिसतो. इतर देशांपेक्षां आपल्याला अशा संस्कृतीचा, धर्माचा आणि समाजधारणेचा वारसा आलेला आहे कीं, कालाच्या विशाल रंगभूमीवर आपला विकास करून घ्यावयाला ज्यांना पूर्ण मुभा मिळाली. क्रांति एकदाहि झाली नाहीं आणि तरी सुद्धां जुनी रचना स्वतःची सुधारणा, नव्या

गोष्टी धिम्मेपणानें आत्मसात् करण्याच्या क्रियेनें, करून घेत आहे. ( I profess impilcit faith in two articles of my creed; This country of ours is the true land of promise. This race of ours is the chosen race. It was not for nothing that God has showered his choicest blessings on this ancient land of Aryavarta. We can see his hand in history. Above all other countries we inherit a civilization and a religious and social polity which has been allowed to work their own free development on the big theatre of time. There has been no revolution, and yet the old condition of things has been tending to reform itself by the slow process of assimilation. )

रानडयांच्या स्वतःच्या या दैवी श्रद्धेने त्यांच्या प्रभावळींतील सर्व कार्यकर्ते उत्स्फूर्त झालेले होते. आपल्या धर्माची अवहेलना किंवा समाजाचा तेजोभंग न करितां समाजाच्या कलाने त्याला आपल्याबरोबर घेऊन जाण्याच्या त्यांच्या या धोरणाचा पुरस्कार डॉ. भांडारकर यांनी एका निराळ्याच पण अगदीं समयोचित दृष्टीने केलेला आढळतो. ब्राह्म समाजांतील 'नवविधान' पंथाचे प्रवर्तक केशवचंद्र सेन यांच्याप्रमाणे प्रार्थना समाजाने हिंदु समाजापासून फुटून निघण्याचा अविचार करितां कामा नये, असा इषारा देतांना डॉ. भांडारकर यांनीं रानडयांना पाठविलेल्या एका खाजगी पत्रांत असे उद्‌गार काढलेले होते की, "प्रि. वर्डस्वर्थ यांनी सुद्धा एल्फिन्स्टन कॉलेज यूनियनमध्ये भाषण करितांना नुकतीच अशी कबुली दिली की, वैदिक आणि बौद्ध वाङ्मयाच्या व्यासंगामुळे आज पुनरुज्जीवनाची लाट उसळलेली आहे.... हिंदूंच्या धार्मिक आणि तात्त्विक कल्पनांचा प्रभाव युरोपवर पडत आहे; व त्यांची जर आपण अवज्ञा केली, तर तिचे परिणाम अनिष्ट होतील. आपल्या समाजाशीं असलेल्या आपल्या मतभेदांचें प्रदर्शन करणें अत्यंत अनर्थकारक होईल." (Even Principal Wordsworth acknowledged the other day in his address to the Elphinstone College Union, that 'there was at the present day a *renaisance*......due to the study of

Brahmanic and Buddhistic literatures. The religious and philosophic ideas of Hindus have been influencing Europe and a neglect of them on our part is sure to be attended with melancholy results. It would be disastrous to parade our differences from the rest of our community.) समाजसुधारणेच्या या विराट् कार्यांत लोकमताचा अनुनय आणि विनयन यांच्याइतकाच कायद्याचा अवलंब आणि उपयोग हा सुद्धा या विचाराग्रणींनी विहित मानलेला होता. १८२९ सालीं सतीला कायद्यानें प्रतिबंध करण्यांत आल्यापासून तों १८६० सालीं पीनल कोड अंमलांत येईपर्यंत धर्मांतरितांचा वारसा हक्क, कन्यावधाला बंदी, ठगींचें निर्मूलन, गुलामगिरीचें उच्चाटन, जातिमूलक अपात्रतेचें निराकरण, विधवाविवाहाला मान्यता इत्यादि जे कायदे इंग्रज सरकारने जारी केले, त्यामुळे सरकारी कायदा हा सुधारणेची प्रगति किती सुकर करितो, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेलेंच होतें; व १८६१ सालीं नवीन विधिमंडळें अस्तित्वांत येऊन त्यांत लोकप्रतिनिधि नेमण्याचा उपक्रम सरकारने केल्यामुळे, राज्यसत्ता जरी परकीय होती, तरी सुद्धा त्या प्रतिनिधींच्या संमतीने सुधारणेला पोषक असे कायदे करण्याचा अधिकार विधिमंडळांना ओघानेच प्राप्त झालेला होता. ही स्थिति लक्षांत घेऊन एकीकडे लोकजागृति करण्याची आणि दुसरीकडे सरकारच्या न्यायबुद्धीला चालना देण्याची अशी दुहेरी कामगिरीहि त्यांनी मोठ्या चिकाटीने बजाविली. त्यांच्या आदर्श आध्यात्मिक जीवनाने महाराष्ट्राचें जीवन विकसित आणि उन्नत केलें. मराठी संतकवींनी परिपुष्ट केलेल्या प्राचीन भागवतधर्माला आधुनिक उदारमतवादाचें विशाल स्वरूप देऊन जें नवें 'दर्शन' त्यांनी निर्माण केलें, ती एकोणिसाव्या शतकांतील सर्वांत प्रभावी वैचारिक घटना होय.

## १९

या अंतर्मुख प्रक्षोभापेक्षां, १८५७ सालच्या मे महिन्यांत जो बहिर्मुख प्रक्षोभाचा पहिला स्फोट अचानक झाला, त्याचें स्वरूप अतिशयच व्यापक

आणि भयानक होतें. १८५७ सालच्या बंडाला 'स्वातंत्र्ययुद्ध' म्हणून गौरविण्याची पद्धति अलिकडे पडलेली आहे. पण, या बंडाच्या पार्श्वभूमीचें, त्याच्या तात्कालिक कारणांचें, त्यांत भाग घेतलेल्या प्रमुख व्यक्तींच्या मनोवृत्तींचें आणि त्यांतील निरनिराळ्या घटनांचें जर निराग्रह बुद्धीने पृथक्करण केलें, तर हा गौरव सर्वथैव अवास्तव आणि अशास्त्रीय असल्याबद्दल मनाची खात्री पटल्याविना राहत नाही. संपूर्ण देशभर आपल्या सार्वभौम सत्तेची पकड बसविण्याची, व्यापारी दृष्टीने फायदेशीर असलेले सर्व समृद्ध प्रदेश स्वतःच्या सरळ ताब्यांत घेण्याची आणि आपलें हें नवीन साम्राज्य लष्करी दृष्टीनेहि निष्कंटक करण्याची जी निकड, मराठशाहीचा नाश होऊन भारतांत बहुतेक सर्वत्र ईस्ट इंडिया कंपनीचें अधिराज्य स्थापन झाल्यावर, कंपनीच्या वेलस्ली, मिंटो, हेस्टिंग्ज, ॲम्हर्स्ट, बेंटिंक, डलहौसी प्रभृति राज्यकर्त्यांना वाटूं लागली होती, तिच्यामुळें १८१८ पासून १८५७ पर्यंत भारतांतील राजेरजवाडे, जहागिरदार, जमीनदार, इनामदार, वतनदार इत्यादि जुन्या राजवटींतील सरंजामी वर्गाचीं राज्यें, संस्थानें, जहागिरी, इनामें, वतनें वगैरे, निरनिराळीं कारणें दाखवून, खालसा आणि जप्त करण्याचें सत्र धडाक्याने सुरू झालें. १८२६ सालीं भरतपूरचा किल्ला पडल्यानंतर त्या वेळचा गव्हर्नर-जनरल लॉर्ड ॲम्हर्स्ट हा मुद्दाम दिल्लीस गेला; व त्याने मोगल बादशहाचें भारतावरील साम्राज्य आतां नष्ट झालेलें असून, कंपनी ही सर्वसत्ताधीश झाली असल्याची द्वाही पुकारली. ही द्वाही म्हणजे सत्तेच्या दृढीकरणाचा खरोखरी प्रारंभच होता; व तें दृढीकरण निरनिराळ्या कायद्यांच्या रूपाने नंतर झपाट्याने सुरू झालें. या दृढीकरणाच्या क्रियेंत ज्यांचीं राज्यें, संस्थानें, जहागिरी, सरंजाम, इनामें, वतनें, वर्षासनें वगैरे खालसा झालीं, अशा दिल्लीच्या बहादुरशहापासून तों नानासाहेब पेशव्यापर्यंत शेकडों राजपुरुषांच्या आणि सरंजामदारांच्या मनांत या नव्या उपऱ्या साम्राज्यसत्तेसंबंधीं चीड उत्पन्न झाली. त्यांचे लाखो आश्रित आणि अनुयायी अन्नाला मोताद होऊन गेले. पेंढारी आणि ठग यांच्या म्होरक्यांचा निःपात केल्यामुळे लूटमार करण्याची सवय अंगीं मुरलेल्या हजारों धाडसी लोकांना धंदा उरला नाही. समाजसुधारणेचे निरनिराळे कायदे अंमलांत

येऊन सती, कन्याहत्या, नरमेध इत्यादि धार्मिक दुराचारांना बंदी झाल्यामुळें हें नवें परकी सरकार हळुहळू आपल्या धर्मांतहि हात घालीत आहे, असा समज लोकांत पसरत चालला. वस्तुतः, १८०६ सालच्या जानेवारींत मद्रास सरकारनें आपल्या लष्करांतील शिपायांच्या पोशाखांत एकजिनसीपणा आणण्यासाठी जेव्हा एकाच प्रकारची पगडी सर्व शिपायांनीं वापरावी, कानांत कुंडलें घालूं नयेत आणि गंधादि धार्मिक चिन्हेंहि धारण करूं नयेत असे नियम केले, तेव्हा वेलोर येथे मद्रासी पायदळ पलटणींनी जो दंगा केला होता, त्यावरून लष्करांतील हिंदी सैनिकांच्या धार्मिक आणि जातीय भावना किती उत्कट असतात, याचा कटु अनुभव कंपनीच्या सेनाधिकाऱ्यांना एकदा येऊन गेलेला होता. तरीसुद्धां, हिंदी शिपायांच्या धर्मभावना लक्षांत न घेतां, नवी चरबीचीं काडतुसें वापरण्याची सक्ती त्यांच्यावर करण्यांत आली. याशिवाय, काळ्या-गोऱ्या सैनिकांना वागविण्यांत आणि त्याहिपेक्षां त्यांच्या पगारभत्त्यांत वगैरे जो पंक्तिप्रपंच करण्यांत येत असे, तोहि आतां हिंदी सैनिकांना जाणवूं लागलेला होता. लष्करांतील या असंतोषाचा स्फोट १८५७ सालच्या मेमध्ये बंडाच्या रूपानें झाला; व इंग्रजी सत्तेवर असंतुष्ट आणि रुष्ट असलेले सगळे वर्ग त्यांत नंतर सामील झाले. पण या बंडाला कोणतेंहि तात्त्विक अधिष्ठान किंवा राजकीय धोरण नव्हतें. लष्करांतील मुसलमान सैनिकांना बादशाहीचा आणि हिंदु सैनिकांना पेशवाईचा जीर्णोद्धार व्हावा, एवढीच ढोबळ अपेक्षा होती. नानासाहेब पेशवा, झांशीची राणी, तात्या टोपे प्रभृति ज्या महाराष्ट्रीय व्यक्तींनी या बंडांत प्रामुख्यानें भाग घेतला, त्या व्यक्ति स्वाभिमानी आणि शूर होत्या, हें खरें; पण त्यांच्यावर आधुनिक स्वरूपाच्या राष्ट्राभिमानाचा किंवा स्वातंत्र्याकांक्षेचाहि आरोप करण्यांत मुळींच अर्थ नाही. स्वतःचें राज्य, संस्थान, जहागीर, सरंजाम यांपलिकडे त्यांची दृष्टि गेलेली नव्हती. कंपनी सरकारनें जप्त किंवा खालसा केलेली आपलीं संस्थानें किंवा सरंजाम परत मिळवण्याचे सगळे कायदेशीर उपाय थकल्यामुळेच खरोखरी हताश आणि संतप्त झालेल्या या वैभवहीन व्यक्ति, केवळ 'बलादिव नियोजितः' अशा परिस्थितींत, यदृच्छेने आणि अनिच्छेने, बंडाच्या वणव्यांत ओढल्या गेल्या, इतकेंच !

या बंडाचें नेतृत्व जरी झांशीची राणी, नानासाहेब पेशवा, तात्या टोपे प्रभृति महाराष्ट्रीय सेनानींकडे होतें, तरी नर्मदेच्या खालीं दक्षिण भारतांत मात्र त्याचा प्रसार अजिबात झाला नाही. कांही ठिकाणीं फक्त त्याच्या ठिणग्या उडाल्या, इतकेंच ! मुंबई, पुणें, सातारा, औरंगाबाद, कोल्हापूर, बेळगांव, धारवाड वगैरे शहरीं कुठे पलटणींनी तर कुठे जुन्या राजवटीच्या आश्रितांनी थोडी गडबड केली. पण ती गोऱ्या अधिकाऱ्यांनी अगदी पोलादी हाताने तबडतोब ठेंचून टाकली. पुणें ही पेशव्यांची राजधानी. पण, नानासाहेब पेशवा हा पेशवाईच्या गादीवर आपला हक्क सांगण्यासाठी पुण्यास येत आहे, अशा जाहिराती बुधवार वाड्यावर लागण्यापलिकडे, तेथे विशेष कांही घडलें नाही. नूर उल् हुदा नांवाचा मौलवी पुण्यांत दंगा घडवून आणण्याच्या खटपटींत असल्याचा पुरावा पत्ररूपाने हातीं आल्यामुळे ता. २८ जुलै रोजी त्याला त्याच्या साथीदारांसह पकडण्यांत आलें; व ता. ३१ रोजीं कँपमधील लोकांचीं हत्यारें जाहीर रीतीने काढून घेण्यांत आलीं. गणू माळी नांवाच्या एका इसमाने दंग्याची चिथावणी दिल्याबद्दल त्याला बुधवारवाड्यासमोर पंचवीस फटके मारण्यांत आले. " या समयीं शहरांतील हजारो लोक तेथे मिळाले. रस्ता अगदी गच्च भरून गेला होता. " धारवाड जिल्ह्यांतील छोट्या नरगुंद संस्थानाचा अधिपति भास्करराव भावे याने मात्र बंडाचा पद्धतशीर उठाव करून पाहिला. दक्षिणेंतील संस्थानांचा पोलिटिकल एजंट मॅन्सन याच्यावर रातोरात अचानक छापा घालून भास्कररावाने त्याला गारद केला; व त्याचें मस्तक विजयचिन्ह म्हणून नरगुंदच्या वेशीवर टांगून ठेवलें. पण या झटापटींत शेवटीं भास्करराव आणि त्याचें संस्थान या दोघांचीहि आहुति पडली. नाशिकच्या दक्षिण भागांत याच सुमारास भागोजी आणि पथाजी यांच्या नेतृत्वाखाली सात हजार भिल्लांनी दंगा केला. पण त्याचा १८५७ सालच्या बंडाशीं कांहीहि संबंध नव्हता. हा दंगा मोडल्यानंतर भिल्लांना निःशस्त्र करण्याची कामगिरी दादोबा पांडुरंग यांनी, हुजूर डेप्युटी कलेक्टर या नात्याने, त्यांच्यांत गोडीगुलाबीने मिसळून हिंमतीने पार पाडली. सारांश बंडाची कोणत्याहि प्रकारची झळ महाराष्ट्रांतील तत्कालीन कार्यकर्त्यांना लागली नाही. फक्त मुंबईचे जगन्नाथ

शंकरशेठ यांचा मात्र सरकारला प्रथम संशय आला. पण तोहि अर्थातच खोटा ठरला. उलट, बंडाच्या संकटांत सरकारला योग्य सल्लामसलत दिल्याबद्दल मुंबईचे चीफ सेक्रेटरी अँडर्सन यांच्यावर त्यांना नंतर जाहीर रीतीने धन्यवाद देण्याची पाळी आली ! १८५७ सालच्या जूनमध्ये "हिंदु व विशेषेंकरून दक्षिणी लोक यांस" उद्देशून जो जाहीरनामा 'ज्ञानप्रकाशां'तून प्रसिद्ध करण्यांत आला होता, त्यांत वरिष्ठ जातींना रुचेल असा पुढील युक्तिवाद केलेला होता—

"हल्ली दिल्ली एथें बंड माजलें आहे. त्यावरून तुम्हांस वाटतें कीं, आतां राज्यक्रांति होऊन तुम्ही पूर्ववत् राज्याधिकारी व्हाल; परंतु ही तुमची आशा व्यर्थ आहे. आणखी तुम्ही आशा करतां हीहि सर्वथैव अप्रोयजक आहे असें खचित तुम्ही समजावें. काय ? तुम्हांस असें वाटत असेल की, हिंदुस्थानचें राज्य आपल्या पूर्वीच्या राजांस अगर कोणाहि राजवंशास तें प्राप्त होऊन स्वराज्य व्हावें. आतां तुम्ही असा विचार करावा कीं, मागील राज्यें जीं स्वराज्यें होतीं, तीं तुमचीं किती दिवस टिकली. त्यांच्या जुवाखाली आपण असतां काय व किती सौख्य आपल्या पूर्वजांस मिळाले आहे. आतां ह्याविषयी जितका जितका सूक्ष्म व दूर विचार कराल तितकें तुमच्या अनुभवास येईल कीं, हल्लीचा इंग्रज जो प्रभु आहे तोच आपल्यास बरा आहे.

तुम्ही स्वराज्य व्हावे अशी इच्छा कां करिता असें तुम्हांस विचारलें तर तुमचें उत्तर हेंच पडेल कीं, आम्हांस या राज्यांत देणग्या मिळत नाहींत. आमची मागचीं इनामें, सरंजाम वगैरे देणग्या या राज्यांत कमी होत चालल्या व आम्हांस राज्याधिकारांत मोठमोठाले हुद्दें मिळत नाहींत. आणखी आमच्या धर्मावर अलिकडे जे जुलूम करूं लागले. या खेरीज तुमच्याने कांही अधिक बोलवेल अशी जागा क्वचित्. तर आतां ह्या सर्व तुमच्या दुःखाची बयादवार समाधानें थोडक्यांत या प्रसंगी केलीं पाहिजेत.

तुम्हांस मोठमोठे हुद्दे देत नाहींत; परंतु तुमची तसे हुद्दे चालविण्याची योग्यता दिसल्यास हें सरकार ते देण्यास संतोष आहे; आणि पाहा, कांहीं

कांहीं अधिकारांच्या जागा आपल्या लोकांस मिळूं लागल्या आहेत; आणि पुढें जसजशी आपली योग्यता उत्तम प्रतीची होत जाईल तसतसे आपल्या लोकांस अधिकारांच्या जागाहि मिळतील अशी आशा आपणास आहे."

वरिष्ठ जातींतील विचारी सुशिक्षितांच्या मनांतहि नेमक्या याच कल्पना त्या वेळीं घोळत होत्या, हें रावसाहेब मंडलिक यांनी त्यानंतर विलायतेस असलेले आपले शिक्षणखात्यांतील सेवानिवृत्त वरिष्ठ पीट यांना ता. ९ सप्तेंबर १८५७ रोजीं पाठविलेल्या पत्रावरून स्पष्ट दिसतें. या पत्रांत रावसाहेबांनी बंडासंबंधीं असे उद्‌गार काढलेले होते की,—

"बंगाल सरकारच्या विरुद्ध शिपायांनी बंड केल्यापासून प्रत्येकाला जबर धक्का बसला आहे. याचा प्रादुर्भाव कसा झाला याचीं कारणें मला अजून कळून आलीं नाहींत. कारण आमची तूर्त मदार वर्तमानपत्रांवर आहे व तीं तर कधीं कधीं अशा त्रोटक बातम्या पसरवितात कीं त्यापासून कांहीं एक अनुमान मी काढूं शकत नाहीं. तें कांहीही असो. हा मतिभ्रममूलक जो स्फोट झाला आहे तें एक आमच्या राष्ट्रावर मोठें अरिष्टच आलें आहे असें मानल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. हिंदुस्थानवासि जनांच्या प्रगतीला तेणेंकरून अनंत कालपर्यंत प्रतिबंध होणार अशी मला भीति पडली आहे. हृदयांत उद्वेग उत्पन्न करणारीं कृत्यें—जीं घडून आल्याची बातमी पसरली आहे तीं—रानटी पशूंचींच कृत्यें आहेत. असले प्राणी हिंदुस्थानांत अद्यापि कांहीं तरी असतील अशी माझी कल्पनाच नव्हती."

". . . जें स्तुतीला पात्र नाहीं त्याची स्तुति मी केव्हांही करणार नाहीं असें तुम्हांला माझ्या पुष्कळ परिचयामुळें ठाऊक आहेच. हिंदुस्थानांतील कंपनीच्या राज्याची शिफारस मी किंवा दुसरा कोणीहि समंजस माणूस ( असें मी तुमच्या परवानगीनें म्हणतों ) अगदीं बिनशर्थ करूं शकणार नाहीं. तथापि, मला वाटतें कीं, तें प्रस्तुत परिस्थितीच्या मानानें उत्तम आहे. त्यांत 'कंपनीच्या राज्यांत' सुधारणा करण्याची, चुका दुरुस्त करण्याची, पाहिजे असेल त्याला

न्याय मिळेल असें करण्याची इच्छा आहे, असा माझा भरंवसा आहे. हल्लीं हल्लीं इंग्लंद देशाशीं दळणवळण लवकर लवकर वाढल्यानें व रेलवेच्या प्रसारानें पुष्कळ प्रगति होण्याची आशा उत्पन्न झालेली होती. परंतु आतां या शिपायांच्या उन्मत्तावस्थोचित बंडामुळें आमची किती पिछेहाट होईल तें मला कळत नाहीं."

कनिष्ठ जातीचे उद्धारक जोतीराव फुले यांनी, राजनिष्ठेच्या भरीला आणखी जातीय भावनेने प्रेरित होऊन, या बंडाविषयी किती तिरस्काराचे उद्‌गार काढलेले होते, हें आपण पाहिलेंच आहे. बंडाचा उपशम झाल्यावर ता. १ नोव्हेंबर १८५८ रोजीं महाराणी व्हिक्टोरिया हिचा भारतांतील सर्व धर्म, जाति, श्रेणी इत्यादींना समदृष्टीने वागविण्यासंबंधींचा जाहिरनामा प्रसिद्ध होऊन कंपनीचें राज्य ब्रिटिश सरकारने आपल्या हातीं घेतल्याची घोषणा करण्यांत आली. या समारंभानिमित्त मुंबईस जो दीपोत्सव झाला त्याचें वर्णन रावसाहेब मंडलिक यांना पाठविलेल्या पत्रांत हरि बाळकृष्ण लिमये यांनी असें केलें असल्याचें आढळतें की, "...पहिल्या दिवशीं सर्व गांवांत रोषनाई रयतेने व सरकारने केली. अशी रोषनाई मुंबईंत आजपर्यंत कधींच झाली नाही; व पुढे होण्याची आशा नाही. हजारों रुपये खर्च करून लोकांनी नाना तऱ्हेची आरास केली. दुसऱ्या दिवशीं मोठा दरबार भरला होता. व रात्रीं दारूकाम झालें." सत्तावनच्या 'स्वातंत्र्ययुद्धा'ची त्या काळच्या महाराष्ट्रावर जी प्रतिक्रिया झाली, तिचें स्वरूप हें अशा प्रकारचें होतें.

पण, या बंडाच्या ज्वाळा महाराष्ट्रापर्यंत येऊन पोंचल्या नाहीत, याचा अर्थ असा मात्र नव्हे की, इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर महाराष्ट्रांत सर्वत्र आणि सदैव स्वस्थता आणि शांतता नांदत होती. उलट, लोकहितवादी आणि फुले हे ज्या वेळीं इंग्रजी राज्य हें ईश्वरी वरदान असल्याचा उद्‌घोष वेळींअवेळीं कंठरवाने करीत होते, त्याच वेळीं उमाजी नाईक, तंट्या भिल्ल, राघोजी भांग्रे, वासुदेव बळवंत फडके प्रभृति बंडखोरांनी तें राज्य उलथून पाडण्याचे प्रयत्न, जिवावर उदार होऊन, आपल्या परीने निकराने करून पाहिले. "मराठशाहींत रामोशी, भिल्ल, कोळी इत्यादि असंस्कृत, जंगली जातींकडे किल्ले, खजिने, जंगलें, गांवें वगैरेंच्या रखवालीचीं कामें आणि

वतनें शतकानुशतकें चालत आलेलीं होतीं. इंग्रजी राजवटींत किल्ल्यांचें महत्त्व नष्ट झाल्यामुळे रामोशी आणि कोळी हे बेकार झाले; व भिल्लांकडे असलेलींहि रखवालीचीं कामें गेलीं. त्यामुळे, पेशवाई बुडाल्यानंतर दहा वर्षांच्या आंतच, १८२७ सालीं उमाजी नाइकाने बंडाचा झेंडा उभारून अशा आशयाचा जाहिरनामा काढला की, "लोकांनी इंग्रज सरकारला सारा न देतां तो आमच्याकडेच भरावा. ज्या गांवचे लोक याप्रमाणें वागणार नाहीत त्यांची लुटालूट आणि जाळपोळ करण्यांत येईल!" या धमकीचें चिन्ह म्हणून गवत, लाकूड आणि कोळसे त्याने गावांतून वाटले. पुरंदर ते पनवेल एवढ्या भागांत त्याने पुष्कळच दंगल केली. गोरगरिबांचा वाली आणि शेठसावकारांचा कर्दनकाळ म्हणून उमाजी नाईक सर्वत्र गाजला. कॅप्टन मॅकिन्टॉश याने त्याला पकडल्यावर तो फांशी गेला; व अशा रीतीने महाराष्ट्रांतलें हें पहिलें बंड मोडलें. तंट्या भिल्ल आणि राघोजी भांग्रे यांचीं बंडेंहि याच स्वरूपाचीं पण लहान प्रमाणावरील होतीं. सरकारी सारा धान्याच्या स्वरूपाने भरण्याची पहिली पद्धत बदलून तो रोख पैशाने भरण्याची सक्ती करण्यांत आल्यामुळे शेतकरीवर्ग अड-चणींत आला; व सावकार आणि सरकार या दोघांकडून त्याची जणुं संगनमताने पिळणूक सुरू झाली. आगगाड्यांच्या प्रसारामुळे धान्याची वाहतूक अतिशय सुकर होऊन त्याच्या व्यापाराला या वेळीं तेजी येत चाललेली होती. त्यामुळे शेतांतील उभें पीक पडत्या भावाने विकत घ्यावयाला मारवाडी बनिये आणि परदेशी भांडवलदार हे दोघेहि चढा-ओढीने पुढे सरसावले. 'ज्ञानोदया'ने आपल्या ता. १५ मार्च १८४८ च्या अंकांत या परिस्थितीचें असें वर्णन केलें होतें की, "...कापणीचे दिवस येतात, तों इतक्यांत पट्टीविषयीं सरकारचें मागणें येतें. ती पट्टी तर बरीच असते. तरी तिजकडून कोणी उपाशी मरणार नाही. कारण की साल चांगलें असतां त्याजपाशीं पट्टी देऊन वर्षपर्यंत कुटुंबाची बेगमी होईल असें धान्य असतें. परंतु सरकार धान्य मागत नाही, तें रोखारोखीच मागतें आणि ही जिन्नस तर त्या गरीबाजवळ नाही. मग काय करावें? या गरीबाला कोणी रुपये देईल की काय?... एथे एक मळकट मारवाडी आहे; तो दिसण्यांत जरी रंक तरी जी अगत्याची जिन्नस ती त्याजपाशीं आहे आणि

दुसरा कोणी शेतकऱ्यांचें धान्य घेणार नाही...म्हणून आपल्या मनाप्रमाणें तो मारवाडी धान्याचा भाव उतरवितो आणि तो शेतकरी आपला सर्व दाणा विकून सरकारची पट्टी देतो..." या परिस्थितींतच १८२४–२५, १८३२–३३ आणि १८४५–४६ सालीं दक्षिणेंत दुष्काळ पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या दुर्दशेला पारावार उरला नाही. नाशिक आणि नगर जिल्ह्यांत राघोजी भांग्रे याने १८४५ सालीं केलेला दंगा हा या दुर्दशेचाच खरोखरी एक स्फोट होता. पण, १८७५ सालीं पुणें, सातारा, सोलापूर आणि नगर या चार जिल्ह्यांत सरकार आणि सावकार यांच्या दुहेरी पिळणुकीमुळें गांजलेल्या शेतकऱ्यांनी सावकारांविरुद्ध जी दंग्यांची उठावणी केली, तिचें स्वरूप अधिक क्रांतिगर्भ आणि व्यापक होतें. सावकारांचीं घरें आणि विशेषत: त्यांचे कागदपत्र यांची जाळपोळ करणें, हा या दंग्यांचा विशेष होता. राज्यक्रांतीच्या पहिल्या तडाक्याने सरंजामदारांचा वर्ग कोलमडून पडला. आता तिचे रक्तशोषक वेध शेतकरी वर्गाला लागून, आपल्या शेतीवाडीलाच केवळ नव्हे, तर घरादारालाहि मुकण्याची पाळी त्यांच्यावर आलेली होती. पण, स्वराज्याच्या दिवसांत दसऱ्यानंतर त्याच्या हातांत चमकणारा भाला जरी कायमचा काढून घेण्यांत आलेला होता आणि केवळ नांगराचे फाळ तेवढेच त्याच्या हातीं शिल्लक उरलेले होते, तरी त्याच्या मराठी मनगटांतली रग कांही अद्याप मेलेली नव्हती. त्यामुळे तो चवताळून प्रतिकारार्थ उभा ठाकला.

या संकटांत पुण्याच्या 'सार्वजनिक सभे'ने त्याला मोठ्या कळकळीने साथ दिली. 'सार्वजनिक काका' या लोकप्रिय नांवाने महाराष्ट्रांत संस्मरणीय होऊन बसलेले गणेश वासुदेव जोशी (१८२८–१८८०) हे या सभेचे संस्थापक. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या प्रोत्साहनाने आणि सदाशिवराव गोवंडे यांच्या सहकार्याने ता. २ एप्रिल १८७० रोजीं त्यांनी ही सभा स्थापन केली. काका हे मूळचे सातारचे. त्यांना इंग्रजी शिक्षणाचा गंध तेवढाच काय तो लहानपणीं लागलेला होता. पुण्यास न्यायकचेरींत नोकरी करीत असतां त्यांच्याविरुद्ध कुभांड रचून त्यांना बडतर्फ करण्यांत आल्यामुळे वकिलीची परीक्षा देऊन

त्यांनी स्वतंत्र व्यवसायाला सुरवात केली. दरम्यान सरकारने ते निर्दोष आणि नोकरीला लायक असल्याचें जाहीर केलें. पण ते कांही पुन्हा सरकारी नोकरीकडे वळले नाहीत. इतकेंच नव्हे, तर आपला भरभराटीला आलेला वकिलीचा धंदाहि बाजूला सारून, त्यांनी स्वतःला लोकजागृतीच्या कार्याला वाहून घेतलें. राजसेवेच्या त्या मोहयुगांत संसाराची आसक्ति ऐन तारुण्यांत सोडून देशसेवेचें व्रत घेणारे काका हे महाराष्ट्रांतले पहिले राजकारणी नेते. स्वदेशीचाहि सक्रिय पुरस्कार आणि पद्धतशीर प्रसार त्यांनीच महाराष्ट्रांत प्रथम केला. १८७१ सालीं मकर संक्रांतीच्या दिवशीं खादीचे कपडे घालून ते आणि त्यांचे सहकारी गोवंडे हे ज्या वेळीं तिळगुळ वाटावयाला गेले, त्या वेळीं लोकांनी त्यांची टवाळी केली. पण, त्यांची स्वदेशीवरील निष्ठा इतकी जाज्वल्य होती की, महाराणी व्हिक्टोरिया हिने 'भारतसम्राज्ञी' ही पदवी धारण केल्यावर, १८७७ सालच्या जानेवारींत जो बादशाही दरबार लॉर्ड लिटन याने दिल्ली येथे भरविला, त्या वेळीं महाराणीला मानपत्र देण्यासाठी 'सार्वजनिक सभे'तर्फे गेलेल्या शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून त्या दरबारालाहि ते खादीच्या पोशाखांतच हजर राहिले. या मानपत्रांत जबाबदार संघराज्यपद्धतीची मागणी करण्यांत आलेली होती, हें विशेष होय. त्या वेळीं दरबाराच्या निमित्ताने भारताच्या निरनिराळ्या भागांतील जे निमंत्रित प्रमुख नागरिक दिल्लीस जमणार होते, त्यांची सभा तेथे भरवून अखिल भारताची मध्यवर्ती प्रातिनिधिक राष्ट्रीय सभा निर्माण करण्याचाहि प्रयत्न काकांनी करून पाहिला. पण तो यशस्वी झाला नाही. १८७४ सालीं बडोदें संस्थानाचे तरुण अधिपति मल्हारराव गायकवाड यांच्यावर रेसिडेंट कर्नल फेअर याला विषप्रयोग केल्याचा आरोप ठेवून जेव्हा त्यांना पदच्युत करण्यांत आलें, तेव्हा काकांच्या प्रेरणेने 'सार्वजनिक सभे'ने त्यांच्या बचावासाठी भगीरथ प्रयत्न केले. मल्हाररावांना हद्दपारीची शिक्षा होऊन तें प्रकरण संपतें न संपतें, तोंच शेतकऱ्यांच्या दंग्यांचा डोंब महाराष्ट्रांत उफाळला. तेव्हा 'सार्वजनिक सभे'ने हे दंगे आणि त्यांना कारण झालेल्या आर्थिक घटना यांची तपशीलवार माहिती गोळा केली; व दंग्यांच्या खऱ्या कारणांवर विदारक प्रकाश टाकून त्यांची पुनरावृत्ति न होण्याच्या दृष्टीने

विधायक सूचना करणारा अर्ज सरकारकडे पाठविला. सरकारनेहि आपल्या परीने दंग्यांच्या कारणांची चौकशी करून, सारावाढ कमी न करितां, शेतकऱ्यांच्या दु:खनिवारणासाठी म्हणून फक्त सावकारांना जाचक अशा कायदेशीर सुधारणा केल्या. मल्हारराव गायकवाडांवरील विषप्रयोगाचा खटला आणि शेतकऱ्यांचे दंगे हे दोन्ही नाजूक बिकट प्रश्न धसाला लावण्याच्या बाबतींत 'सार्वजनिक सभे'ने सरकारशीं हुज्जत घालण्याची जी ही हिंमत दाखविली, तिच्यामुळे सनदशीर चळवळीची उपयुक्तता आणि शक्ति या दोहोंचाहि अनुभव मराठी जनतेला प्रथमच आला; व कायद्याने स्थापन झालेल्या परकीय सरकारविरुद्ध, कायद्याच्या मर्यादा प्रत्यक्ष न ओलांडतां, झगडण्याचें शास्त्र आणि शस्त्र हीं दोन्ही तिला याच प्रसंगीं प्रथम अवगत झालीं. महाराष्ट्रांतील सनदशीर राजकीय चळवळीचा हा प्रारंभ होय. या चळवळीचे प्रवर्तक क्रियाशील त्यागी नेते सार्वजनिक काका आणि तिला नंतर लाभलेले अंत:स्थ सल्लागार मुत्सद्दी न्या. रानडे यांच्या दृष्टींत, वृत्तींत आणि कृतींत अगदी मूलभूत असा फरक कांही बाबतींत असतांनासुद्धां, त्यांनी सभेचा कारभार एकदिलाने चालविला, जबाबदार राज्यपद्धतीचें ध्येय जनतेपुढे ठेवलें, आधुनिक सनदशीर राजकारणाची दीक्षा महाराष्ट्राला दिली व 'सभे'च्या व्यासपीठावर दक्षिणेंतील सर्व धर्मांचे, जातींचे आणि वर्गांचे कार्यकर्ते एकत्र आणून संयुक्त लोकशक्ति निर्माण करण्यांत यश मिळविलें, हा त्यांनी उत्पन्न केलेला सार्वजनिक जीवनाचा आदर्श महाराष्ट्राने निरंतर डोळ्यांपुढे ठेवावा, असाच खरोखरी आहे.

'सार्वजनिक काकां'च्या देशभक्तीची आणि धैर्याची कसोटी लागण्याचा प्रसंग वासुदेव बळवंत फडके (१८४६–१८८३) यांच्या बंडाचा बीमोड झाल्यावर आला. फडके हे इंग्रजी आमदानींतील नव्या शिक्षणाचा संस्कार घडलेले उच्च जातींतील पहिले आणि शेवटले बंडखोर. पण, इंग्रजी राज्यासंबंधीच्या त्यांच्या कल्पना जशा यथार्थ नव्हत्या, तशीच त्यांची बंडाची योजनाहि व्यवस्थित नव्हती. त्यांचा जन्म पनवेल तालुक्यांत शिरढोण येथे झाला. कल्याण येथे थोडेसें इंग्रजी शिक्षण झाल्यावर त्यांनी प्रथम

ग्रँट मेडिकल कॉलेजांत आणि नंतर मिलिटरी फायनान्स खात्यांत नोकरी केली. या दुसऱ्या नोकरीच्या निमित्ताने पुण्यांत आल्यावर त्यांची धर्मभावना जागृत होऊन त्यांनी दत्तोपासनेचें अनुष्ठान कांही काळ केलें. या मन:स्थितींत ते असतांनाच १८७१ सालीं त्यांची आई अत्यवस्थ असल्याचें पत्र घरून आलें. वरिष्ठ गोऱ्या अधिकाऱ्याने त्यांना रजा दिली नाही. तरीहि ते तसेच, स्वत: आजारी पडल्याची सबब सांगून, आईच्या भेटीला गेले. पण तत्पूर्वीच तिचें देहावसान होऊन गेलेलें होतें. त्यानंतर पुढे वर्षश्राद्धाच्याहि वेळीं त्यांनी पुन्हा रजा मागितली असतां त्यांना नकार मिळाला; व वरिष्ठांशीं त्यांची बाचाबाचीहि झाली. त्या रागांत ते नोकरी सोडून बाहेर पडले. पुण्यास या वेळीं 'सार्वजनिक सभे'ची चळवळ नुकतीच सुरू झालेली असून, सार्वजनिक काका, रानडे प्रभृति तिच्या नेत्यांच्या प्रचारामुळे नवें राजकीय जीवन पांढरपेशा वर्गांत संचरलेलें होते; व कोळी, रामोशी आणि शेतकरी यांच्या दंग्यांच्या रूपाने समाजाच्या खालच्या थरांतील धुमसता असंतोषहि उफाळून वर आलेला होता. या परिस्थितीचा परिणाम फडक्यांवर होऊन त्यांनीहि कांही दिवस ठिकठिकाणी व्याख्यानें देऊन पाहिलीं. पण, सुस्त जनतेला निव्वळ व्याख्यानांनी कांही चेव येत नाही, असा अनुभव त्यांना आला. व्याख्यानांच्या या दौऱ्यांतच त्यांनी नरसोबाच्या वाडीला जाऊन अनुष्ठानहि केलें. प्रचाराचा परिणाम होत नाही असा प्रत्यय आल्यामुळे त्यांचें मन अधिक प्रभावी उपायांकडे वळलें. मिलिटरी खात्यांत असतांना त्यांनीं लष्करी शिक्षण थोडें बहुत घेतलेलें होतें. त्यामुळे बेकारीने गांजलेल्या आणि दरोडे घालण्याच्या मार्गाला लागलेल्या रामोशी लोकांना हाताशी धरून, त्यांनीं बंडाचा उठाव करण्याचें ठरविलें; व पुण्याच्या आसपास असलेल्या रामोशांना जेवणें घालून, दारू पाजून आणि पागोटी बांधून आपला हा वीरमंत्र त्यांना दिला. कोळी, भिल्ल, गोंड इत्यादि जंगली जमातींना आपल्या कवेंत ओढण्याचेहि प्रयत्न त्यांनी केले. पण, भरपूर पैसा गांठीं असल्याशिवाय बंडाची उठावणी करिता येणार नाही, असा उमज शेवटीं त्यांना झाला. त्यांच्या मनांत असें आलें की,—

"मला जर पांच हजार रुपये कोणी दिले तर मी जागोजाग दोन दोन चार माणसें महिना महिना पूर्वी पाठवून चारी देशांत लहान लहान बंडें करीन. एवढें केलें तरी इंग्रजाचे मनांत मोठी भीति उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. चारी देशांत जर अशीं बंडे केली, तर डांका बंद होतील, आगगाडी बंद होईल, तारा बंद पाडतां येतील. इकडील बातमी तिकडे जाणार नाहीं. असा बंदोबस्त झाला म्हणजे तुरुंग मोकळे करण्यास हरकत नाहीं. तुरुंगांतले लहान ठेपेचे कैदी जरी आम्हांला मिळाले नाहींत तरी लांब ठेपेचे कैदी खात्रीने मिळतील. याचें कारण असें कीं, पुन्हा जर इंग्रजी राज्य झालें तर ते आपल्याला पकडून पुन्हा कैदेंत टाकतील ही त्यांना भीति पडेल. अशा रीतीने आम्हांला जरी दोनशे लोक मिळाले, तरी पुष्कळ आहेत. शें दोनशें लोकांच्या जोरावर खजिनें वगैरे लुटतां येणार नाहींत हें खरें; पण पुष्कळसे कैदी मुक्त करतां येतील. आणि जागोजाग एकदम अशी लहान लहान बंडे झाली तर कोण कोठें आहे, फौज किती आहे, वगैरे गोष्टींचा अडाणी लोकांना नीटसा पत्ता न लागल्यामुळें सहजच ते आपल्या बाजूस जमा होतील; आणि असें झालें तर सर्वच चमत्कार व्हावा त्याप्रमाणें होऊन जाईल; व इंग्रजांना हांकून लावून प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याचा जो आपला हेतु होता तो तडीस जाईल."

या त्यांच्या हृद्गतावरून बंडासंबंधींचे त्यांचे विचार किती अपक्व आणि उथळ होते, हें कळून येईल. अशा रीतीने आपल्या भोवती जे चाळीस पन्नास रामोशी जमले, त्यांना बरोबर घेऊन त्यांनी पैसा उभा करण्यासाठी धामारी, वाल्हें, हर्णई, भांगदरी वगैरे गांवें लुटलीं. त्यांच्या साथीदार रामोशांनीहि त्यांच्या नांवावर स्वतंत्र रीतीने दरोडे घालून लूटमार केली. दक्षिणेंतील शेतकऱ्यांच्या दंग्यांपाठोपाठ पुणें आणि कुलाबा जिल्ह्यांत ही दरोड्यांची धामधूम सुरू झाल्यामुळे जनता आणि सरकार या दोघांनाहि फडक्यांच्या या बंडाचें स्वरूप खरोखरी होतें त्यापेक्षा अक्राळविक्राळ भासलें. त्यांतच, १८७९ सालच्या मे महिन्यांत खुद्द पुण्यांतील बुधवार आणि विश्रामबाग या पेशव्यांच्या वाड्यांना अचानक आग लागल्यामुळे, सरकारच्या काळजाचा

ठाव सुटला; व शनिवार वाड्यापुढे लष्कराचा तळ ठेवून पुण्याच्या राजकीय जीवनाची त्यानें गळचेपी केली.

पण, सरकारच्या संशयाला ज्या वेळीं अशा रीतीने जोर चढत होता, त्याच वेळीं फडक्यांचें बंड मरगळीला येत चाललेलें होतें. त्यांच्या रामोशी साथीदारांनीं त्यांना फसविल्यामुळे ते हताश होऊन १८७९ सालच्या एप्रिल-मध्येंच श्रीशैलमल्लिकार्जुनाला गेले; व तेथे देव प्रसन्न न झाल्यास आपलें मस्तक त्याला अर्पण करावयाचें, अशा निर्धाराने त्यांनीं अनुष्ठानाला प्रारंभ केला. दरम्यान, आपण केलेल्या पैशाच्या अफरातफरीचा पुरावा नष्ट करण्यासाठीं पेशव्यांच्या वाड्यांना आग लावणारा सरकारी बुक-डेपोंतील कारकून केशव बाळकृष्ण रानडे याला 'सार्वजनिक सभे'ने आपल्या लवाद कोर्टांत आणून त्याच्याकडून गुन्ह्याची कबुली घेतली; व नंतर त्याला पोलिसांच्या ताब्यांत दिलें. त्यानें आपल्यावरील खटल्यांत दिलेल्या जबानींत, फडक्यांच्या चिथावणीमुळे आपण आगी लावल्या, असा कांगावा केला. तेव्हा सरकारने त्यांना पकडून देण्याबद्दल इनाम जाहीर करून पुण्याचा पोलिसप्रमुख मेजर डॅनियल याला त्या कामावर नेमलें. फडक्यांच्या कानावर ही बातमी जातांच ते गाणगापूरला आले. डॅनियल त्यांच्या पाळतीवर होताच. त्याने गाणगापूरजवळील एका खेड्यांतल्या देवळांत, तापाने फणफणलेल्या स्थितींत झोपेंत असतांनाच, फडक्यांना पकडलें. १८७९ सालच्या ऑक्टोबरमध्ये त्यांच्यावरील खटल्याला पुण्यास सुरवात झाली. त्या वेळीं त्यांचा बचाव करण्यासाठी पुण्यांतला एकहि वकील पुढे येईना. शेवटी 'सार्वजनिक काकां'नी त्यांचें वकीलपत्र घेतलें. तेव्हा त्यांच्या कांही मित्रांनी त्यांना हटकलें, "गणपतराव, आपल्या या धाडसाचा परिणाम काय होईल याचा तुम्ही नीट विचार केला आहे ना?" त्यावर काकांनी उत्तर दिलें, "परिणाम काय व्हायचा आहे? सरकार फारच रागावलें, तर वासुदेव बळवंताबरोबर गणेश वासुदेवालाहि फासावर लटकावील! यापेक्षा जास्त काय करणार आहे? वासुदेव बळवंताने जें कांही केलें, तें देशाभिमानाच्या विकाराने प्रेरित होऊन केलें. मग एक देशभक्त या नात्यानें त्याची बाजू मांडण्यास काय हरकत आहे?" काकांच्या या धाडसी

वकिलीमुळे फडक्यांना जन्मठेप हद्दपारीची शिक्षा झाली; व त्यांना एडनला रवाना करण्यांत आलें. तेथेच चार वर्षांनी त्यांचा बंदिवासांत अंत झाला. फडक्यांचें बंड हा शिवछत्रपतीच्या साहसी वीरचरित्रापासून स्फूर्ति घेऊन केलेला राज्यक्रांतीचा शेवटला प्रयत्न होय. चिपळूणकरांनी 'लोकहितवादी' आणि 'आमच्या देशाची स्थिति' या दोन निबंधांत "'एडनवासी दरवडेखोर' आणि 'यःकश्चित् दरवडेखोर' या तुच्छतागर्भ शब्दांनी जो त्यांचा उल्लेख केलेला आहे, त्यावरून त्या प्रयत्नाविषयी त्या वेळच्या सुशिक्षितांची भावना किती प्रतिकूल होती हें जसें कळून येतें, तशीच खुद्द चिपळूणकरांच्याहि देशाभिमानाला व्यापक राजकीय दृष्टि कशी नव्हती, याचाहि बोध मनाला होतो. राज्यकर्त्यांच्या मदांधतेला अशा प्रकारच्या विफलहि प्रयत्नांनी हादरा बसतो आणि म्हणून स्वातंत्र्याच्या लढ्यांत त्यांना मानाचें स्थान आहे, या गोष्टीची जाणीव त्यांना नव्हती, हें स्पष्ट आहे. फडके यांचा बंडाचा प्रयत्न कितीहि भ्रांत आणि अशास्त्रीय असला, तरी त्यांचा देशाभिमान आणि शौर्य यांच्याविषयी आदर वाटल्याविना राहत नाही. " . . . मी कांहीं सुद्धां पुरुषार्थ केला नाही. दधीचि ऋषीनींहि आपल्या अस्थि देवांच्या कल्याणाकरितां काढून दिल्या, तर ईश्वरानें तरी माझा बळी घेऊन तुमचें कल्याण करावें, अशी मी त्यास उभय कर जोडून प्रार्थना करतों, " हे आपल्या आत्मचरित्रांत त्यांनी काढलेले उद्गार त्यांचा विनय आणि त्यागबुद्धि यांचे निदर्शक आहेत.

१८१८ सालीं मराठशाही नष्ट झाल्यापासून तों १८७९ सालीं फडक्यांच्या बंडाचा उपशम होईपर्यंत या साठ वर्षांच्या कालावधींत महाराष्ट्रांत जीं निरनिराळ्या प्रकारचीं आंदोलनें झालीं आणि ज्या राजकीय घटना घडून आल्या, त्यांचा मागोवा घेतला असतां एक अत्यंत उज्ज्वल सत्य मनावर उत्कटतेने बिंबतें. तें हें की, महाराष्ट्रांतील पांढरपेशा वर्गानी काय किंवा बहुजनसमाजाने काय स्वातंत्र्य नष्ट झाल्या दिवसापासून विजयी परकीय सत्तेच्या प्रतिकारार्थ शक्य त्या सर्व उपायांनी उठाव केला. उमाजी नाइकापासून तों फडक्यांपर्यंत आणि बाळशास्त्री जांभेकरांपासून तों 'सार्वजनिक काकां' पर्यंत ज्या कर्त्या पुरुषांनी या काळांत

इंग्रजी सत्तेविरुद्ध झगडण्याचे प्रयत्न, आपापल्या कल्पनांनुसार, अविरत केले, त्यांच्या त्या प्रयत्नांत जरी कांही वैगुण्यें असलीं, तरी त्या सत्तेची शोषक भेदनीति आणि तिचे आपल्या राष्ट्रीय जीवनावर होणारे विदारक दुष्परिणाम या दोहोंची पुरेपूर जाणीव त्यांना झालेली होती, हें निस्संशय. त्या दृष्टीने या सगळ्या घटना महाराष्ट्राच्या बुद्धीची अखंड जागरूकता आणि त्याच्या अस्मितेची दुर्दम स्वातंत्र्यप्रियता यांच्या निदर्शक आहेत. एक जोतीराव फुले यांचा अपवाद सोडला, तर इंग्रजी राज्य या महाराष्ट्र-भूमींत बद्धमूल आणि चिरंतन व्हावें, अशी करंटी इच्छा महाराष्ट्रांतील कोणत्याहि कार्यकर्त्याने किंवा प्रतिपादकाने चुकूनसुद्धा कुठें प्रकट केलेली आढळणार नाही. लोकहितवादी हे इंग्रजी राज्याला ईश्वरी कृपाप्रसाद म्हणणारे त्याचे पहिले पुरस्कर्ते. पण, त्यांनीसुद्धा, इंग्रजांना 'गुरु' म्हणून गौरवीत गौरवीतच, त्यांच्या राज्यनीतीचे भयानक दुष्परिणाम आणि तिच्यांतून मुक्त होण्याचे सनदशीर उपाय यांची चर्चा आपल्या 'शतपत्रां'तूनच करून, 'गुरू'ची विद्या गुरूवरच उलटविण्याचा मंत्र महाराष्ट्राला मोठ्या ईर्ष्येने दिला. मराठी राज्याचा ताबा घेतल्यानंतर एल्फिन्स्टनने जीं खाजगी पत्रें, सरकारी परिपत्रकें आणि धोरण आखून देणारीं अनुशासनें आपल्या मित्रांना आणि हाताखालच्या अधिकाऱ्यांना पाठविलीं होतीं, त्या सर्वांत दोन प्रकारची भीति त्याने वारंवार व्यक्त केलेली दृष्टीस पडते: एक, पेशवाई बुडाल्यामुळे सत्ता आणि आश्रय यांना मुकलेला पुण्याचा बुद्धिमान् कावेबाज ब्राह्मणवर्ग नव्या इंग्रजी राजवटीविरुद्ध कारस्थानें करील; व दुसरें, संस्थानें, वतनें, इनामें, सरंजाम वगैरे जप्त झाल्यामुळे चिडलेले जुन्या राजवटींतील शिपाई बाण्याचे शस्त्रजीवी वर्ग हे बंडाळी माजविण्याची खटपट करितील! सत्तावन सालच्या बंडाचा प्रळय जरी लक्षांत घेतला नाही, तरी उमाजी नाईक, राघोजी भांग्रे, सार्वजनिक काका, न्या. रानडे, वासुदेव बळवंत फडके प्रभृति बंडखोरांनी आणि कार्यकर्त्यांनी एल्फिन्स्टनचें हें भाकित आपल्या कर्तृत्वाने इतकें कांही खरें करून दाखविलें की, त्यामुळे पुण्याचा ब्राह्मण, लढाऊ मराठी लोकसमाज आणि महाराष्ट्र देश यांच्याविषयी कायमचा दंश आणि दहशत इंग्रजी राज्यकर्त्यांच्या मनांत उत्पन्न झाली-

किंबहुना, दक्षिणेंतील शेतकरी वर्ग, बडोद्याचे मल्हारराव गायकवाड आणि फडके यांची वकिली करण्यांत 'सार्वजनिक सभे'ने जी व्यापक राजकीय दृष्टि आणि जें नैतिक धैर्य दाखविलें, त्यामुळे सरकारची अशी खात्री होऊन चुकली की, पुण्याचे पुढारी हे स्वतः जरी कायद्याच्या मर्यादा काटेकोरपणानें सांभाळून सर्व चळवळी सावधगिरीने करीत असले, तरी पारतंत्र्याविरुद्ध जो जो कोणी मनुष्य लढा द्यावयाला उभा ठाकेल, त्या त्या विद्रोही बंडखोराचा,— मग तो शेतकरी असो, रामोशी असो, संस्थानिक असो किंवा पांढरपेशा असो— कायदेशीर बचाव करण्यासाठी बेदरकारपणानें पुढे येण्याइतकी त्यांची स्वातंत्र्यप्रियता ज्वलंत आणि स्वत्वाभिमान जाज्वल्य आहे. ही स्वातंत्र्यप्रियता आणि हा स्वत्वाभिमान 'निबंधमालें'त अत्यंत प्रकर्षाने आणि प्रखरतेने प्रकट झाला, हेंच 'माले'चें मराठी वाङ्मयांतील अनन्य युगतेज आणि युगकार्य होय.

## २०

महाराष्ट्राचें सार्वजनिक जीवन आणि मराठी वाङ्मय यांचा जो हा विकास 'निबंधमाले'च्या उदयापूर्वी होत आलेला होता, त्याची चिपळूणकरांना पूर्ण जाणीव होती, हें त्यांच्या 'मालें'तील अनेक उद्गारांवरून अगदी स्पष्ट दिसतें. किंबहुना, 'माले'च्या दुसऱ्या अंकांत, तिचा उद्देश विशद करितांना, त्यांनी "गेल्या वीस पंचवीस वर्षांत जें स्थित्यंतर झालेलें आहे," त्यासंबंधीं असें म्हटलेलें होतें की, "आज हजारो वर्षें जी हिंदुस्थानाचीं गेलीं ती एक महारात्रच गेली. आज परमेश्वराने महाभाग्याचा सुदिन दाखविला;—असे प्रमादजनित उद्गार नुकते नुकते ऐकूं येत होते. त्यांचा घोष अजून आमचे कानांत घुमतो आहे ! पण या समजुती आता बऱ्याच पालटत चालल्या आहेत. विलायतेंतील कांही थोड्या थोर लोकांची मतें कशींही असलीं तरी चार हजार कोसांवरून या उष्ण देशांत येऊन व गेलीं शंभर वर्षें सतत युद्धप्रसंग करून जे लोक आपले धनी होऊन

बसले त्यांनी एवढी यातायात केवळ परोपकारबुद्धीने केली नाही व हिंदुस्थानचें राज्य करण्यांत या देशाच्या हिताव्यतिरिक्त त्यांचे कांहीतरी हेतु असावे, हें आता सर्वांच्या मनांत वागूं लागलें आहे ........ स्वतःच्या उद्योगाखेरीज राज्यकर्त्यांचें शहाणपण व उदारपण हीं आपल्या कामास येणार नाहीत असें लोकांस भासूं लागलें आहे." त्याबरोबरच राजा राम मोहनराय, एल्फिन्स्टन, छत्रे, मोल्स्वर्थ, कँडी, जांभेकर, दादोबा पांडुरंग, भाऊ दाजी, परशुरामपंत तात्या गोडबोले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, महादेवशास्त्री कोल्हटकर, हळबे, लोकहितवादी, माधव चंद्रोबा डुकले, मंडलिक, पाळंदे, जमशेटजी टाटा, शंकर पांडुरंग पंडित, रानडे, कीर्तने बंधु, अण्णासाहेब किर्लोस्कर प्रभृति आपल्या पूर्वी होऊन गेलेले कार्यकर्ते, ग्रंथकार, संशोधक आणि पत्रकार यांच्याविषयी जे नितांत आदराचे उद्‌गार, केव्हा केव्हां तर प्रतिकूल टीकेच्या ऐन ओघांतहि, त्यांनी जागोजाग काढलेले आहेत, त्यांवरून 'निबंधमाले'चा जन्म होण्यापूर्वी जे नाना प्रकारचे उपक्रम महाराष्ट्रांत होऊन गेलेले होते, त्यांची उपयुक्तता आणि आपल्या राष्ट्रीय जीवनांत त्यामुळे घडून येत असलेलें इष्ट परिवर्तन यांसंबंधीं त्यांना वाटणारी कृतज्ञता किती गाढ होती, याचीहि यथार्थ कल्पना येते. आपल्या पूर्वी इतरांनी केलेल्या कार्याची जशी त्यांना जाणीव होती, आपल्या कर्तृत्वाविषयी जसा त्यांना आत्मविश्वास होता, तसेंच आपल्या मर्यादांविषयीचेंहि त्यांचें अवधान सतत जागृत होतें. 'निबंधमाले'ला चार वर्षे पूर्ण होतात न होतात, तोंच 'मेकॉलेचा नवीन अवतार' म्हणून समकालीन टीकाकारांनी त्यांना खिजवावयाला सुरवात केली होती; व ॲडिसन आणि जॉन्सन यांच्याशीहि त्यांची तुलना कौतुकाने होऊं लागली होती. या सगळ्या टीका आणि तुलना यांच्याविषयी त्यांनी 'माले'च्या चवथ्या वर्षाचा समारोप करितांना असे उद्‌गार काढलेले होते की, "आमच्या कित्येक देशबंधूंस आपल्या विशाल बुद्धीची स्वतःची स्वतःला पक्की खात्री वाटून कोणी आपणास मिल्टन म्हणवून घेतो, कोणी डिमॉस्थेनीसच्या, कोणी लूथरच्या पदवीला पोहोचलेले आहेत. अशा प्रकारची मनोमय साक्ष आमचे मन आम्हाला कांहीच देत नाही. ज्या विख्यात ग्रंथकाराचें महत्त्व पोप, जॉनसन, मेकॉले अशा सारख्यांनीहि भक्तिपुरःसर वर्णिलें आहे, त्याची बरोबरी करूं जाणे यापरतें धाडस कोणतें ? एवढेंच

मात्र साम्य धरण्यास हरकत नाही की, स्वभाषेच्या अभ्युदयाची इच्छा मनांत धरून वरील ग्रंथकाराने तदर्थं जसा यत्न केला, तशीच आमचीहि मनीषा असून आमचे यथाशक्ति प्रयत्न त्याच उद्देशाने सतत चालू आहेत. यापलीकडे कोणत्याहि प्रकारचे सादृश्य आपणावर ओढून घेण्याचें वाष्टर्य आमच्याने करवत नाही." त्याचप्रमाणे, एकाद्या विषयाचें प्रतिपादन करितांना काय किंवा ग्रंथांवर टीका करितांना काय त्यांनी, आपण त्या बाबतींत काय वाचलेलें आहे आणि काय वाचलेलें नाही, हेंहि जागोजाग अगदीं प्रांजळ-पणाने सांगून टाकल्याचें आढळतें. हाच त्यांचा प्रांजळपणा टीकाकारांच्याहि बाबतींत दिसून येतो. त्यांचा आपल्या अंगावरहि येणारा एकादा कोटिक्रम, माहिती किंवा मुद्दा जेव्हा चिपळूणकरांना ग्राह्य किंवा अविवाद्य वाटला, तेव्हा तो त्यांनी अगदी मोकळ्या मनाने मान्य केल्याचें दृष्टीस पडतें.

आपल्यापूर्वी होऊन गेलेले कार्यकर्ते, ग्रंथकार, संशोधक, पत्रकार प्रभृतींच्या कामगिरीची जशी चिपळूणकरांना पूर्ण जाणीव होती, तसेंच त्यांनी केलेले नानाविध उपक्रम आणि त्यांचें आचरण यांतील दोष आणि न्यूनता यांचेंहि त्यांना यथार्थ आकलन झालेलें होतें. त्यामुळे 'निबंधमालें'त त्यांच्या गौरवाबरोबरच प्रसंगोपात्त त्यांचें दोषाविष्करणहि ठिकठिकाणीं येऊन गेलेलें आहे. या बाबतींत, किंबहुना एकंदर मतप्रतिपादनाच्या बाबतींतच, त्यांची भूमिका कोणत्या प्रकारची होती, हें प्रथमच लक्षांत घेणें इष्ट होईल. आपल्या प्रतिपादनांत त्यांनी सत्याभिमानाला अग्रस्थान दिलेलें होतें. 'माले'च्या दुसऱ्या अंकांत तिचा उद्देश विशद करितांना त्यांनी असे मार्मिक उद्गार काढलेले होते की—

"एकाद्या गोष्टीविषयी जो स्वतंत्रपणें विचार करील, व ते लोकांस मोकळ्या मनाने जो प्रदर्शित करील त्याचे अभिप्राय सर्वांच्या अभि-प्रायांशी नेहमी जुळतीलच, किंवा ते सर्वांस सारखे आवडतील, असे कदापि घडणार नाही. तरी ते अभिप्राय आम्ही केवळ सत्यनिरूपणाच्याच उद्देशाने लिहूं अशी आमची खात्री आहे. व आम्ही दुसऱ्यांस वाजवी रीतीने नांवें ठेवण्यास ज्याप्रमाणे मागें पुढे पाहणार नाही, त्याचप्रमाणें दुसऱ्यांनी आमच्या लेखांविरुद्ध मतें प्रदर्शित केल्यास त्यांत आम्हांसहि

अगदीं वाईट वाटणार नाही. आपणास जें खरें वाटतें तें स्पष्टपणें लिहिण्यास जो भितो, किंवा तसे आपणाविरुद्ध कोणी लिहिलेलें ज्यास आवडत नाही, तो खरा सत्यनिष्ठ नव्हे, असें आम्ही समजतों! आतां अशा रीतीने प्रदर्शित केलेलें मत कदाचित् अगदीं खोटें ठरेल; पण तसें ठरलें असतांही तो मनुष्य प्रशस्यच होय; कां तर तो तसें न करता, तर सत्याचा निवाडा होता ना."

त्यांच्या प्रतिपादनांत पुष्कळदा आढळणाऱ्या परस्परविसंगतीमुळे त्यांच्या स्वत:च्या मतांसंबंधीं जी शंका तत्कालीन वाचकवर्गाच्या मनांत उद्भवलेली होती, तिचें निराकरण करितांना 'आमच्या देशाची स्थिति' या शेवटल्या निबंधांत त्यांनी 'सत्याच्या चांचल्या'चें असें सुंदर वर्णन केलेलें होतें की—

"आम्ही कधी कधी नव्या लोकांस नांवे ठेवतो; व कधीं कधीं जुन्यांस हि ठेवायाला चुकत नाही. कधीं इंग्रजांची व इंग्रेजी ग्रंथकारांची आम्हीं तारीफ केलेली आढळते; कधीं तोच उलटही प्रकार आढळतो. तेव्हा हें आहे तरी काय? एक आमचें कोणत्याच विषयावर कांहींच मत निश्चित म्हणून नाही असें तरी असलें पाहिजे किंवा उगीच हें कांहीतरी गौडबंगाल तरी आम्ही चालवित असूं!

आतां आमचें प्रतिपादन कधीं या पक्षाचें असतें व कधीं त्या पक्षाचें असतें हें खरें आहे; पण याचें कारण आमचें बुद्धिचांचल्य नव्हे तर सत्याचेंच चांचल्य होय. सत्य हें एकाच राष्ट्राला, एकाच धर्माला, किंवा एकाच पक्षाला अनुसरून असतें असें नाहीं; तर अशोधित धातूंत जसे सुवर्णरज यदृच्छेनें मिसळलेले असतात, व रसायनव्यापारांनीं त्यांचें पृथक्करण करून ते वेगळे काढावे लागतात, त्याप्रमाणेंच सत्याचीहि गोष्ट होय. त्याचे अंश ज्यांत मिश्रित झाले नाहीत असा प्राय: कोणता ही पक्ष नाहीं. यास्तव एकाच पक्षाचा दृढ अभिमान धरणें हा दुरभिमान होय. तर लोकांत यथार्थ ज्ञानाचा प्रसार करण्याचें काम जो पतकरील त्यानें केवळ एका सत्याचीच ओळख ठेवली पाहिजे."

'सत्यनिरूपणा'च्या या प्रतिज्ञेबरोबरच 'निबंधमालाकार' या नात्याने आपले

मित्र कोण आणि द्वेष्य कोण याचाहि स्पष्ट उलगडा त्यांनी 'माले'च्या अडतिसाव्या अंकांतील 'मकरंदा'च्या पत्राला दिलेल्या उत्तरांत केलेला होता. ते म्हणतात, "आमच्या पुस्तककर्त्यांच्या नात्याने जगाशीं जो शत्रुमित्रत्व संबंध आहे, तो केवळ सत्य व स्वदेशप्रीति या दोहोंच्या संबंधानेच काय तो आहे. म्हणजे आपल्या जन्मभूमीचा योग्य अभिमान असून, ज्यांस सत्य आवडतें ते आमचे मित्र, व स्वदेशाची टवाळी करण्यांत ज्यांस भूषण वाटतें व जे असत्यास जाणूनबुजून भजतात किंवा त्याच्या निरसनाविषयी अनास्था प्रगट करतात, ते आमचे द्वेष्य. याखेरीज इतर संबंध आम्ही कोणतेहि ओळखीत नाही." या त्यांच्या उद्‌गारांवरून 'मालें'तील प्रतिपादनाचें वैशिष्ट्य आणि मर्यादा हीं दोन्ही ध्यानांत येतील. किंबहुना, 'निबंधमाला–हितेच्छु' या टोपण नांवाने त्यांचे शालागुरु रा. ब. वामन आबाजी मोडक यांनी, त्यांच्या 'वक्तृत्व' या निबंधांत दयानंद सरस्वती प्रभृतींवर आलेल्या टीकेला उत्तर म्हणून, जें प्रदीर्घ पत्र त्यांना पाठविलेलें होतें, त्याला दिलेल्या विस्तृत प्रत्युत्तरांत त्यांनी आपली ही भूमिका आवेशाने पण समर्पक युक्तिवादाने उत्कृष्ट रीतीने विशद केल्याचें आढळतें. या प्रत्युत्तरांत त्यांनी अशी ग्वाही दिलेली होती कीं, "'केवळ सद्‌बुद्धिप्रेरित, परोपकारी व खऱ्या स्वदेशाभिमानी' पुरुषांचीहि आमच्या पुस्तकांत कोठेंहि बिलकुल विटंबना केलेली नाही. त्याविषयी मजकूर आढळलाच तर उलटया तऱ्हेचा मात्र आमच्या वाचकांस आढळला असेल." पण "केवळ अनुकरणेच्छेने किंवा प्रतिष्ठेच्या आशेनेच" जे लोक "देश-कल्याणाच्या उद्योगांना प्रवृत्त होतात," त्यांचा उपहास करणें, हें मात्र त्यांनी आपलें कर्तव्य मानलेलें होतें. म्हणून मोडकांना दिलेल्या प्रत्युत्तरांत त्यांनी असें म्हटलें होतें की, "···· वरील उपहासापासून कांही उपयोग नाही असें जें आमच्या पत्रकाराचें म्हणणें आहे, तेंहि आम्हांस बरोबर वाटत नाही. त्याचा उपयोग उघडच आहे की, त्यामुळे जे लोक इतःपर देशहिताच्या उलाढालींत पुढारीपणा घेऊं पाहतील ते पूर्वीप्रमाणे खुशाल मौजेखातर तें काम कधी हातीं घेणार नाहीत. आपण या कामांत शिरणार तर अगोदर पूर्ण विचार करून शिरलें पाहिजे व यांत आपण दक्षता दाखविली नाही किंवा लबाडी केली तर साऱ्या लोकांचा आपणावर गहजप होईल

हेंही ते पक्केपणीं समजून राहतील." पण, दुर्मतध्वंसन आणि दंभस्फोट करण्याच्या भरांत या उपहासाचा अनेक ठिकाणीं अतिरेक झालेला आहे, यांत शंका नाही. कारण, "स्वदेशाच्या संबंधाने कोणी खोटाहि अभिमान वाहिला असतां तो तादृश दूषणार्ह नाही," अशी जी त्यांची भावना होती, तिच्यामुळे "इंग्रेज लोक, मिशनरी, बाटे मंडळी व इंग्रेजीचा संस्कार झालेले नवीन विद्वान" यांच्यावर टीकेचा कडाका उडवितांना, त्यांच्या स्वदेशाभिमानाने सदभिरुचि, औचित्य आणि सारासारविवेक यांच्यावर अनेकदा मात केल्याचें दृष्टीस पडतें. तथापि, स्वदेशाच्या संबंधाने खोटाहि अभिमान जरी त्यांच्या प्रतिपादनांत कांही ठिकाणी दिसून येत असला, तरी आपली सत्यनिरूपणाची भूमिका त्यांनी जाणूनबुजून सोडल्याचें उदाहरण मात्र प्राय: एकहि दाखवितां येणार नाही.

'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' आणि 'प्रस्तुत मालेचा उद्देश' या 'निबंधमाले'च्या पहिल्या दोन अंकांतील लेखांत चिपळूणकरांनी, आपल्या नियोजित कार्याविषयी आत्मविश्वास व्यक्त करून, मराठी भाषेची त्या वेळची दैन्यावस्था आणि नवीन पदवीधरांची तिच्याविषयींची उपेक्षा-बुद्धि यांची जी मीमांसा केलेली आहे, ती अगदी यथार्थ वाटते. किंबहुना, न्या. रानडे यांनी, त्यांच्या मृत्युनंतर पंधरा वर्षांनी, १८१८ ते १८९६ पर्यंतच्या कालावधींत निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयाचें जें विस्तृत समालोचन, आपल्या मूलगामी विश्लेषक पद्धतीने, 'मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीवरील टिप्पणी'त (A Note on the Growth of Marathi Literature, 1898) केलेलें होतें, त्यांत काढलेले निष्कर्ष चिपळूण-करांच्या या मीमांसेशीं बहुतेक सर्वच बाबतींत जुळते असल्याचें दिसून येतें. "युनिवर्सिटीचे किताबवाले तिच्या भजकांत किती सापडतील ?"—असा जो खोचदार प्रश्न त्यांनी 'माले'च्या पहिल्याच अंकांतील 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' या लेखांत विचारलेला होता, त्या प्रश्नाला त्यानंतर दोन तपांनी केलेल्या आपल्या या समालोचनाच्या समारोपांत न्या. रानडे यांनी असें उत्तर मोठ्या उद्वेगानें दिल्याचे आढळतें की—

"पदवीधरांना त्यांच्या योग्यतेला अनुरूप अशा नोकऱ्या मिळत नाहीत अशा तक्रारी आज सर्व बाजूंनी कानावर येत असतां, जे आपले

देशबांधव आपल्यापेक्षा कमी शिकलेले आहेत असें तें समजतात, त्यांना नोकरी आणि भरीव वेतन देणाऱ्या वाङ्मयव्यवसायाला वाहून घेणारे इतके थोडे पदवीधर कां निघावेत, याचें विशेष कारण कांही कळत नाही. ज्यांनी प्राचीन ग्रंथ संपादन केले, भाषांतरे केली किंवा वाङ्मयाच्या सर्व शाखांत मौलिक ग्रंथरचना केली असे या कालखंडांतील लेखक स्थूल मानानें सातशें तरी भरतील. त्यांपैकीं सुमारे साठ ते सत्तर पदवीधर आहेत. म्हणजे दहाला एक असें प्रमाण पडतें. यांत व्यक्तींचा तितकासा दोष नाही; तर ज्या शिक्षणपद्धतींत त्यांची वाढ होते, तिचाच दोष जास्त आहे. त्यांना मिळत असलेलें शिक्षण हें इतकें विलक्षण विदेशी आहे कीं, आपल्या राष्ट्रीय वाङ्मयाचा व्यासंग करण्याची आणि त्यांत भर घालण्याची प्रेरणा त्यांना मुळी अजिबात होत नाही; व वर्षानुवर्ष पदवीधरांची ही अनास्था आणि उपेक्षा सारखी वाढतच आहे. वर जे आकडे दिलेले आहेत, त्या आकड्यांतून हा शोचनीय निष्कर्ष आपल्या हातीं लागतो."

(There is no particular reason why when so many complaints about the want of suitable employment for graduates are heard on all sides, there should be so few from among them who devote themselves to literary pursuits which, in their own way, provide occupation or substantial remuneration to so many of their presumably less educated fellow-countrymen. Speaking roughly, the number of those who have edited ancient works, or brought out translations, or composed original works in all branches of literature, cannot be short of seven hundred; and out of this number the graduates are about sixty or seventy in all, that is, one to ten. The fault does not lie with the individuals so much as with the system under which they are brought up. Their education is so exclusively foreign that all incentives to study, and to add to the stock of national literature is for the most part, entirely wanting, and year after year this indifference and neglect are becoming more pronounced. This is the mournful conclusion taught by the figures which have been given above.)

रा. ब. काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांनी १८७२ सालीं 'ज्ञानप्रसारक सभे'पुढे वाचलेल्या आपल्या 'नावल व नाटक ह्यांविषयी निबंधां'त, "आतांशीं नावलांची कीड फार झाली आहे...लहान मुलेंबाळें देखील नावलें लिहून पैसे मिळवूं लागलीं आहेत," असे उद्गार काढून, नवीन पदवीधरांविषयी असा अभिप्राय प्रकट केलेला होता की,"... सरकारी नोकरीविषयीचा बेसुमार हपाप हा कांहीं आमच्या मराठ्यांना मराठी वाङ्मयाची अभिवृद्धि करून स्वतःच्या लोकांचें कल्याण करण्याच्या विशुद्ध आणि उदात्त हेतूंकडे वळावयाला मोकळीक देत नाही." (...the all engrossing fondness for Government service will not leave our Marathas free for the pure and sublime purposes of extending the literature of the vernacular and of conferring a blessing on their own people.) दादोबा पांडुरंग यांनीहि, १८७९ सालीं काढलेल्या आपल्या व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत, अशी हळहळ व्यक्त केलेली होती की, "अलीकडेस मागल्या २५ वर्षांपासून सर्व लोकांचा भर इंग्लिश भाषा शिकण्यांत फार वाढत चालल्यामुळे स्वभाषेविषयी त्याच मानाने मोठी अनास्था वाढत चालली आहे." दादोबांनी हे जे निराशेचे उद्गार काढले, त्याचें मुख्य कारण हें होतें की, मुंबई विद्यापीठाची स्थापना होईपर्यंत त्यांच्या डोळ्यांसमोर अव्वल इंग्रजी आमदानींतील नवशिक्षितांच्या ज्या दोन पिढ्या होऊन गेल्या, त्यांतील विशेषतः पुण्याच्या पाठशाळेंतून संस्कृत, मराठी आणि इंग्रजी या तिन्ही विद्यांचा संस्कार होऊन बाहेर पडलेल्या महादेवशास्त्री कोल्हटकर, प्रभृति शास्त्रीमंडळीने ज्या आस्थेने आणि उत्साहाने मातृभाषेची सेवा केली, ती आस्था आणि तो उत्साह कांही नतर विद्यापीठांतून सर्वांगपूर्ण उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या पदवीधरांत त्यांच्या दृष्टीस पडला नाही. पहिल्या दोन पिढ्यांतील बहुतेक नवशिक्षितांनीहि जरी सरकारी नोकरींतच आपलें आयुष्य घालविलें, तरी आपल्याला उपलब्ध आणि अवगत झालेलें नवें ज्ञान मराठी भाषेंत आणणें हें आपलें कर्तव्य मानून, त्यांनी ग्रंथरचनेचा उद्योगहि मोठ्या हौसेने केला. न्या. रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचें वाङ्मय जरी बव्हंशीं पोरकट आणि परपुष्ट असलें,

तरी फुलांतले रसगंध सेवन करीत हिंडणाऱ्या भ्रमरांच्या पंखांना परागकण चिकटून त्यामुळे वनस्पतींच्या फलधारणेस ज्याप्रमाणे न कळत सहाय्य घडावें, त्याप्रमाणे पाश्चात्य साहित्याचें आलोडन केलेल्या या प्रज्ञावंतांच्या लिखाणामुळे मराठीं वाङ्मयांत नवीन कल्पनांचा प्रसार व्हावयाला अप्रत्यक्ष मदत पुष्कळच झाली, यांत शंका नाही. उलट, विद्यापीठाच्या नवीन पदवीधरांनी उच्च सरकारी अधिकारपदें मिळविण्यांत आणि मंडित करण्यांत जसें एका परीने आपल्या विद्येचें सार्थक मानलें, तशीच दुसऱ्या परीनें आपल्या मनाचा आणि वाणीचा सगळा व्यापार इंग्रजी भाषेंतून चालविण्यांत आणि त्याचें प्रदर्शन करण्यांतहि त्यांना धन्यता वाटूं लागली; व "त्यांस आपल्या आईबापांशीं, बायकांशीं, बहिणींशीं, चाकरांशीं सुद्धा स्वभाषेंतून शुद्ध आणि सरळ बोलणें कठीण होऊन बसलें." जुन्या पिढींतील नवशिक्षित आणि विद्यापीठाचे नवे पदवीधर या दोघांच्या वृत्तींतील हें वैषम्य मनाला तीव्रतेने बोचल्यामुळेच बहुवा चिपळूणकरांनी 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' वर्णन करितांना नवीन विद्वानांवर अशी यथार्थ टीका केलेली होती की, ".. दहा वीस वर्षांमागें शिकलेल्या लोकांस मराठींत ग्रंथ लिहिण्याची बरीच हौस वाटत असे; पण आता ती भाषा कोणास डोळ्यांसमोरहि नको! आपले अमूल्य विचार प्रदर्शित करणे झालेच तर इंग्लिश भाषेहून हलक्या द्वारानें ते लोकांच्या मनांत शिरकविणे त्यांस अगदी आवडत नाही. पण सद्धर्मोपदेश करतांना अगर देशहिताबद्दल बोध करणें झाल्यास, असल्या अडाणी लोकांशी जेव्हा गांठ पडतेच, तेव्हा त्यास क्षणभर आपली योग्यता एकीकडे ठेवावी लागते..मराठींत ग्रंथ लिहून आपल्या इंग्रेजी विद्वत्तेस बट्टा आणणें हें तर त्यांस अगदी आवडत नाहीच; तरी प्रसंग आल्यास ते आपल्या महासनावरून मराठींतील ग्रंथावर अभिप्राय देतात. पण तेहि अडाणी लोकांच्या भाषेंत त्यांस समजतीलसे नव्हेत! तर फर्डेशाई इंग्रजींत!" या टीकेंतील उपरोध मर्मभेदक असला, तरी त्यांत अतिशयोक्तीचा अंश यत्किंचितहि नाही. विशेषतः, 'प्रार्थनासमाजां'तील उपासना सुद्धा त्या वेळीं पुष्कळदा इंग्रजींतूनच होत असत, ही गोष्ट लक्षांत घेतली असतां, या उपरोधिक टीकेबद्दल चिपळूणकरांना कोण दोष देईल?

नवीन पदवीधरांच्या या स्वभाषेविषयीच्या उपेक्षाबुद्धीची मीमांसा करितांना चिपळूणकरांनी अगदी मर्मावर बोट ठेवलें होतें. सुशिक्षित वर्ग आणि एकंदर लोकसमाज यांच्यांत जें द्वैत या वेळीं झपाट्याने उत्पन्न होत चाललेलें होतें, त्याचें असें मार्मिक वर्णन त्यांनी 'माले'च्या उद्देशांचे विवरण करितांना केलेलें होतें की, "प्राचीन काळीं रोम शहरांत 'प्याट्रिशियन्' (महाजन) आणि 'प्लीबियन्' (सामान्यजन) यांमध्ये जसा द्वंद्व भाव होता, तसाच सांप्रत काळीं विद्यालयांतून पसार झालेल्या लोकांचा व इतरांचा आहे." राज्यकर्त्यांशीं सरूपता आणि समीपता साधण्याच्या उद्योगांत कृतकृत्यता मानणारी, सामान्य लोकांपेक्षा आपले हितसंबंध कांही निराळे आहेत या भावनेच्या आहारीं गेलेली व 'अहमेव मतो महीपतेः' या अहंतामूलक भ्रमाने बहकलेली जी सुशिक्षितांची जात या वेळी पैदा झालेली होती, तिला आपला धर्म, संस्कृति, समाज आणि भाषा यांचा अगदी उबग येऊन गेलेला होता. त्यांतून उद्भूत झालेल्या आत्मविश्वासाचा अभाव हाच खरोखरी या उपेक्षाबुद्धीच्या मुळाशीं होता. या अभावाचें स्वरूप दुहेरी होतें: एक तर, मराठी भाषा ही आपल्या प्रगत विचारांचें वाहन व्हावयाला पात्र नाही, अशी या सुशिक्षितांची प्रामाणिक समजूत होती; व दुसरें असें की, आपण आपले विचार यदाकदाचित् मराठी भाषेंतून व्यक्त केलेच, तरी ते लोकांना कितपत ग्रहण करितां येतील, याबद्दलहि त्यांना जबर संशय होता. वस्तुतः, ज्या भाषेंतील ग्रंथरचनेला सतत आठ शतकांची उज्ज्वल कुलपरंपरा होती आणि ज्या राष्ट्राचे दिग्विजयी झेंडे अटकेपार फडकल्याला अद्याप पुरतें अर्धशतकहि लोटलेलें नव्हतें, ती भाषा आणि तें राष्ट्र, केवळ त्यांची स्वतंत्रता नष्ट झाली एवढ्याच एका कारणामुळे, कांही असंस्कृत आणि असमंजस दशेला पोचलें, असें होत नाही. अंशतः राष्ट्रहिताची चाड न बाळगल्यामुळे आणि अंशतः जगाच्या भौतिक प्रगतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे महाराष्ट्रावर स्वातंत्र्यनाशाची आपत्ति ओढवली. बुद्धीचा आणि कर्तृत्वाचा ऱ्हास किंवा नाश हा या राजकीय अरिष्टाच्या मुळाशीं होता, असें म्हणतां येणार नाही. चिपळूणकरांनी 'माले'चा उद्देश कथन करितांना म्हटल्याप्रमाणे, "आमच्या लोकांत कितीहि दोष असले, तरी बुद्धीचा मंदपणा हा आमचा अत्यंत तिरस्कार करणाऱ्यांनाहि आमच्या माथीं

मारवणार नाही ! चलाखपणांत आम्ही कोणत्याहि लोकांस हार जाणार नाही अशी आमची खात्री आहे; आमच्या बुद्धीचे प्रभाव जगाच्या इतिहासावर अक्षय खोदलेले आहेत. . ." त्यामुळे, स्वराज्य नाहीसें होऊन पुरतीं पंचवीस वर्षें उलटलीं नाहीत, तोंच जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, भाऊ दाजी, लोकहितवादी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, सार्वजनिक काका, मंडलिक, मोडक, भांडारकर, रानडे, तेलंग प्रभृति विद्वान् मुत्सद्दी किंवा कर्तबगार पुरुष एकामागून एक उदयाला आले; व सूर्यास्त होऊन गडद अंधार पडल्यानंतरहि आकाशांत तळपणाऱ्या तेजोगोलांनी ग्रहमालेच्या अस्तित्वाची जाणीव लोकांच्या हृदयांत जागृत ठेवावी, त्याप्रमाणे या थोर व्यक्तींनी, पारतंत्र्याच्या आपत्काळांतहि, महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांची परंपरा खंडित झालेली नाही, हें सत्य आपल्या कर्तृत्वाने जगाच्या निदर्शनाला आणून दिलें. तेव्हा, ज्या राष्ट्राच्या बुद्धीचा, कर्तृत्वाचा आणि आकांक्षांचा जोम, स्वातंत्र्याचा लोप झाल्यानंतरहि, फार काळ दबून राहिला नाही, त्या दुर्दमनीय राष्ट्रापुढे पोरकट आणि परभृत वाङ्मय ठेवण्यांत या नवीन विद्वानांच्या हातून अप्रयोजकपणा झाला, असें कां म्हणूं नये ? लोकहितवादींसारख्या ज्या एकाद दुसऱ्या लेखकाने समाजाचें विनयन करण्यासाठी म्हणून हातांत लेखणी धरली, त्याच्या त्या लेखणींतून समाजाच्या तेजोवधाला कारण होईल असें कालकूटच बव्हंशीं बाहेर पडलें. या साऱ्या प्रकाराला आत्मविश्वासाच्या अभावाशिवाय दुसरें कोणतें कारण सांगतां येईल ? जांभेकर आणि मंडलिक यांच्यासारख्या इंग्रजींतून नवीन शोधांनी भरलेले निबंध लिहिणाऱ्या ग्रंथकारांनी, स्वदेशाचा इतिहास आणि तोहि स्वभाषेंतून लिहितांना मात्र, इंग्रज ग्रंथकारांच्या ओंजळीने पाणी प्यावें, याचा अर्थ तरी दुसरा काय करणार ? फार कशाला, मराठी वाङ्मयाला ऊर्जित दशा यावयाला कळकळीच्या प्रयत्नांचीं अनेकं शतकें लोटावीं लागतील असें भाकित जेव्हा न्या. रानडे यांनी आपल्या समालोचक लेखांच्या शेवटी वर्तविलें, तेव्हा त्यांनाहि बहुधा त्या वाङ्मयाला अनेक शतकांची वैभवशाली कुलपरंपरा आहे, या गोष्टीचा विसर पडला असावा ! १८५७ सालीं मुंबई विद्यापीठाची स्थापना होऊन मराठी भाषेच्या पद्धतशीर अध्ययनाला महाविद्यालयांतून

प्रारंभ झाल्यावर १८६२ पासून १८७० पर्यंत कुंटे, मोडक, भांडारकर, पंडित, रानडे, तेलंग प्रभृति जे १०१ स्नातक विद्यापीठांतून पदव्या घेऊन बाहेर पडले, त्यांनी तरी मातृभाषेचे पांग फेडावयाला हवे होते की नाही ? पण, चिपळूणकरांनी 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' वर्णन करितांना म्हटल्याप्रमाणे, यांपैकी एकाहि "किताबवाल्याने आपला ज्ञानौघ मराठी भाषेच्या प्रवाहांत ओतला नाही." नाही म्हणावयाला मोडक, भांडारकर आणि रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें किंवा कुंटे यांचीं 'राजा शिवाजी' सारखीं काव्यें यांचा निर्देश अपवादादाखल करितां येईल. परंतु, 'प्रार्थना-समाजा'च्या महर्षींचीं धार्मिक प्रवचनें एरवीं कितीहि उद्बोधक असलीं, तरी त्यांच्यामुळे मराठी वाङ्मयाला कोणता अपूर्व लाभ झाला, असें म्हणतां येईल ? ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम किंवा रामदास या संतकवींच्या अमृतोपम वाणींतून स्रवलेल्या धर्मविचारांहून आगळें किंवा उदात्त असें त्यांच्या 'प्रलपितां'त काय आहे ? कुंटे यांचीं काव्यें हीं मराठी कवितेच्या संक्रमणाच्या मार्गावरील प्रगतीचें स्वरूप दाखवावयाला खुणेचे दगड म्हणूनच केवळ यापुढे उपयोगी पडतील. विशेषतः, या पदवी-धरांचा इंग्रजी भाषेंतून प्रकट झालेला पांडित्यप्रकर्ष पाहिला, म्हणजे तर मातृभाषेविषयीची त्यांची उपेक्षाबुद्धि मनाला तीव्रतेने जाणवल्याविना राहत नाही. कुंट्यांचा 'आर्य संस्कृतीचीं स्थित्यंतरें', भांडारकरांचा 'दक्षिणापथाचा इतिहास', रानड्यांचा 'मराठ्यांच्या सत्तेचा उदय' तेलंगांचा 'शंकराचार्य' इत्यादि इंग्रजी ग्रंथांतील शोध आणि विचार हे इतके मौलिक आणि विद्वत्तापूर्ण आहेत की, त्यांचें वाहन होण्याचें भाग्य लाभल्याबद्दल जगांतील कोणत्याहि भाषेला अभिमान वाटावा. किंबहुना, महाराष्ट्राच्या एकोणिसाव्या शतकांतील ज्ञानोपासनेचें, तत्त्वजिज्ञासेचें आणि इतिहाससंशोधनाचें सारसर्वस्व या विद्वानांच्या इंग्रजी लिखाणांतून साठविलेलें आहे, असें म्हटलें तरी शोभेल. परंतु बिचाऱ्या मराठी भाषेला मात्र हें सगळें ज्ञानधन असून नसल्यासारखेंच होऊन बसलें. धर्मांतर केलेला पुत्र कितीहि कर्तृत्ववान् निपजला, तरी त्याच्या गुणांचा फायदा जसा त्याच्या मातेला आणि घराण्याला मिळत नाही, तसाच या विख्यात पंडितांच्या बुद्धिवैभवापासून मराठी भाषेला आणि वाङ्मयाला

कोणताहि लाभ झाला नाही. आपल्या मातृभाषेविषयीं या नव्या विद्वानांना कळकळ नव्हती, असें तरी कसें म्हणावें? कारण, १८६७ सालीं मुंबई विद्यापीठांतून मराठीसारख्या लोकभाषांचें उच्चाटन होऊन त्यांच्या जागी संस्कृतादि प्राचीन अभिजात भाषांची प्रतिष्ठापना करण्यांत आल्यावर, निदान मोडक आणि रानडे या दोघांनी तरी, मराठीला विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत पुन्हा प्रवेश मिळावा, म्हणून पुष्कळच प्रयत्न केले. तेव्हा, जें लोकांना उपदेशावें, तें स्वत: मात्र आचरूं नये, ही जशी त्यांच्या इतर कांही सार्वजनिक बाबतींतील वर्तनाची तऱ्हा, तीच याहि बाबतींत अनुभवाला आली, असें म्हणणें प्राप्त आहे. त्यामुळे, १८५७ सालीं मुंबई विद्यापीठ अस्तित्वांत आल्यानंतर जे पदवीधर बाहेर पडले, त्यांतून दादोबा पांडुरंग, लोकहितवादी किंवा कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या तोडीचा एकहि लेखक पुढे आला नाही. ही स्थिति ध्यानांत घेऊनच चिपळूणकरांनी ‘प्रस्तुत मालेचा उद्देश’ या लेखाच्या शेवटीं असे उद्गार काढलेले होते की, “आमच्या या लेखांवरून मराठी भाषेची योग्यता किती आहे हें जर लोकांस कळून येईल तर आम्ही एक मोठेंच काम बजावलें असें आम्ही समजूं. आपल्या भाषेच्या अंगीं अर्थव्यंजकता, वर्णसौन्दर्य फार कमी आहे,—किंबहुना नसल्यासारखेंच आहे,—हा अलिकडील विद्वानांचा ग्रह कांही अंशीं तरी मोडून टाकण्यास जर आमचे निबंध कारण झाले, तर आमच्या हातून देशहिताचें एक मोठेंच कृत्य घडलेसें आम्ही मानूं. तसेंच विद्यालयांतून शिकलेल्या लोकांवर इतके दिवस जो उगीच बसण्याचा आरोप लोक ठेवीत असत तो उडून आमचा प्रभाव लोकांस यापुढे जर दाखविण्यांत येऊं लागला, तर हेंहि आम्हास मोठेंच भूषण झालेसें होईल.” चिपळूणकरांनी लेखणी हातांत धरण्यापूर्वी मराठी भाषा पोरकी आणि परावलंबी होती; मराठी वाङ्मय पोरकट आणि परभृत होतें. मुकुंदराजापासून मोरोपंतापर्यन्त निरनिराळ्या श्रेणींच्या वाग्भटांनी परिपुष्ट करीत आणलेल्या मराठी भाषेचा प्रौढ–प्रताप ‘निबंधमाले’ने नव्या सुशिक्षित वर्गाच्या प्रत्ययाला जाणून दिला; व तिच्याविषयी अभिरुचि आणि अभिमान त्यांच्या ठिकाणी उत्पन्न करून त्यांना तिच्या सेवेला उद्युक्त केलें. त्या दृष्टीने, ‘माला’ बंद करण्याचा निश्चय जाहीर करितांना

" ज्या उद्देशाने प्रकृत निबंधरचनेस आम्ही प्रवृत्त झालों, तो आता पुष्कळ अंशीं सिद्धीस गेला आहे, " हे चिपळूणकरांचे तिच्या शेवटल्या अंकांतील उपसंहारांत काढलेले उद्‌गार अगदी समर्पक वाटतात. त्याबरोबरच, नव्या राज्यकर्त्यांशीं एकरूप होण्याच्या लालसेने पछाडलेल्या सुशिक्षित वर्गाचा स्वार्थ आणि घमेंड यांचा दंभस्फोट आपल्या घणाघाती शैलीने करून, सामान्य लोकांचे हितसंबंध म्हणजेच खरोखरी सर्व देशाचे हितसंबंध, या महान् सत्याचीहि जाणीव त्यांनी नवीन पिढीला उत्कटतेने करून दिली.

## २१

वाङ्‌मयसेवेला प्रारंभ करितांना चिपळूणकरांच्या डोळ्यांपुढे जसे जांभेकर, दादोबा पांडुरंग, परशुरामपंत तात्या गोडबोले, लोकहितवादी आणि कृष्णशास्त्री चिपळूणकर हे वडील पिढींतील लेखक उदाहरणादाखल होते, तसेच ॲडिसन, जॉन्सन आणि मेकॉले हे इंग्रजींतील तीन धुरंधर निबंधकार आदर्श म्हणून होते. किंबहुना, त्यांच्या जीवनावर काय, विचारांवर काय किंवा शैलीवर काय, या तीन इंग्रजी लेखकांचा जितका परिणाम झालेला आहे, तितका कोणत्याहि संस्कृत किंवा मराठी लेखकाचा झालेला नाही, हें निर्विवाद. विशेष कौतुकाची गोष्ट ही की, या तीन लेखकांवर जरी त्यांची नितांत भक्ति होती, तरी त्या भक्तिभावाच्या भरांत त्यांच्या मर्यादा आणि वैगुण्यें दाखवावयाला व मेकॉलेवर तर देशदूषक म्हणून त्वेषानें टीकेचे कोरडे उडवावयालाहि ते चुकलेले नाहीत. या तीन निबंधकारांवरील त्यांची भक्ति म्हणजे खरोखरी इंग्रजी विद्येवरील, त्या विद्येने निर्माण केलेल्या साहित्यसेवेच्या आणि स्वदेशाभिमानाच्या आदर्शांवरीलच भक्ति होय. त्या भक्तीच्या ऊर्मीत त्यांनी 'माले'च्या दुसऱ्याच अंकांत असें मार्मिक विधान केलेलें होतें की, "... प्राचीन काळीं महापंडित होणें जितकें कठीण तितकेंच आता महाशंख होणें कठीण झालें आहे ! " तरी सुद्धा, इंग्रजी विद्येला केव्हा

वज्राची, केव्हा वाघिणीच्या दुधाची, तर केव्हा वारुणीची अशा ज्या निरनिराळ्या उपमा त्यांनी प्रसंगानुसार दिलेल्या आहेत, त्यांवरून त्यांची त्या विद्येवरील ही अत्युत्कटहि भक्ति किती डोळस, किती सावध होती, हें स्पष्ट दिसून येतें. हा डोळसपणा, हा 'सर्वविषयी सावधपणा' हें 'माले'चें एक स्पृहणीय वैशिष्टय होय. या डोळसपणामुळेच ॲडिसन, जॉन्सन आणि मेकॉले यांचे गुणविशेष उचलतांनाहि त्यांच्या आणि आपल्या परिस्थितींतील आणि लोकस्थितींतील फरकाचें अवधान ठेवावयाला ते कुठेहि विसरले नाहीत. चिपळूणकरांच्या प्रखर लेखनशैलीवर रुष्ट झालेल्या कांही आक्षेपकांनी जेव्हा त्यांना ॲडिसनच्या सौम्य शैलीचें अनुकरण करण्याचा उपदेश केला, तेव्हा त्यांनी 'माले'च्या चौथ्या वर्षाच्या उपसंहारांत त्यांना असें उत्तर दिलेलें होतें की,--

> "भरभराटीच्या काळांत आडिसननें आपल्या देशबंधूंच्या व विशेषतः देशभगिनींच्या मनोरंजनार्थ अनेक नाजुक विषयांवर आपलें नाजुक कलम चालविलें, व प्रसंगोपात्त विशेष महत्त्वाच्या विषयांवर लिहितांनाहि आपली लेखणी कोणास न बोचे अशी तजवीज ठेविली. पण ती गोष्ट त्याची त्यास व त्या काळास शोभून गेली. इकडे तो प्रकार कसा चालेल ? हल्लींच्या दुर्धर देशस्थितींत व आणीबाणीच्या प्रसंगीं शेंकडों अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर अवश्य विचार कर्तव्य असतां, वरील ग्रंथकाराच्या पद्धतीस अनुसरून जर इकडील पत्रकार कांचोळीवर, चंद्रकळेवर, गालावरील हनवटीवरील गोंदण्यावर, तुऱ्याच्या टिकेवर वगैरे टीका करूं लागले व नवऱ्या बायकांचे प्रीतिकलह, पोषाकाच्या पेहेरावाच्या तऱ्हा इत्यादि विषयांवर विवेचन करूं लागले, तर तें किती शोभेल बरें ? . .तर जे आमचे आक्षेपक 'स्पेक्टेटर'च्या अध्ययनाची व अनुकरणाची आम्हांस सूचना देतात त्यांनीं वरील गोष्टींचें अंमळ मनन करावें."

हें उत्तर अगदी समर्पक होतें. 'मालें'तील निबंधांवर ॲडिसन, जॉन्सन आणि मेकॉले या तिघांच्याहि शैलीची छाप प्रसंगानुसार थोडया बहुत प्रमाणांत पडलेली आहे. इंग्रजी भाषेंतील निबंधलेखनाच्या तीन अवस्था

या लेखकांच्या निबंधांतून दृष्टीस पडतात. ॲडिसनने इंग्रज लोकांना वाचावयाला शिकविलें; जॉन्सनने त्यांची विचारशक्ति जागृत केली; व मेकॉलेने इतिहासासारखे गहन विषयहि त्यांना गोडीने वाचावयाला प्रवृत्त केलें. ॲडिसनने इंग्रजी निबंधवाङ्मयाचा पाया घातला. त्याच्यापूर्वी बेकन, कौले, मिल्टन, टेंपल, ड्रायडन प्रभृति बरेच गद्य लेखक इंग्लंडांत होऊन गेलेले होते. पण, त्यांचा कल लॅटिन, ग्रीक किंवा फ्रेंच धर्तीवर गद्य लिहिण्याकडे असल्यामुळे, सामान्य वाचकांना त्यांचें तें अभ्यासजड लिखाण आपल्या आवाक्यापलीकडलें वाटत असे. ही स्थिति ॲडिसनने बदलली. तो आणि त्याचा सहकारी स्टील यांनी ज्या वेळीं 'स्पेक्टेटर' हें पत्र काढलें, त्या वेळीं इंग्लंड उत्कर्षाच्या चढणीला लागलेलें होतें. त्या समृद्धीच्या काळांत वेळ कसा घालवावा याच एका चिंतेने व्याकुळ होणाऱ्या रिकामटेकड्या सुखासीन स्त्रीपुरुषांना काव्यशास्त्रविनोदाचें व्यसन लावून ॲडिसनने त्यांच्यावर ओढवलेली अनुद्योगाची आपत्ति दूर केली. बोध मनोरंजक आणि मनोरंजन बोधप्रद करण्याचा त्याचा बाणा होता. आपल्या पत्राच्या दहाव्या अंकांत त्याने म्हटलेंच होतें की, "मी नीतिबोधांत विनोदाची गंमत आणि विनोदांत नीतिबोधाचें गांभीर्य आणण्याचा प्रयत्न करीन." (I shall endeavour to enliven morality with wit and to temper wit with morality.) त्याची ही नीतिबोधाची नाजूक कल्पना वाचली म्हणजे मम्मटाने वर्णिलेल्या 'कांतासंमिततयोपदेशयुजे' या काव्यफलाची आठवण झाल्याविना राहत नाही. त्या दृष्टीने ॲडिसनला इंग्लंडांतील सुखवस्तु साक्षर समाजाचा नर्मसचिव म्हणतां येईल. दोष दाखवून समाजाला खिजवितांना त्याने ज्याप्रमाणे रेशमी चिमटे घेतले, त्याचप्रमाणे चित्रालाप करून त्याला रिझवितांना हलक्या हाताने गुदगुल्या केल्या. इंग्रज युवतींची वेशभूषा, गल्लचूर्णे, लीलाविभ्रम इत्यादि चिल्लर विषयांवर जसे त्याने चटकदार, चुरचुरीत लेख लिहिले, तशीच सुभाषित, विनोद, पोवाडे, संगीत नाटकें, मिल्टनची कविता, सॅफोचीं प्रेमगीतें इत्यादि गंभीर विषयांची चर्चाहि त्याने व्यासंगपूर्वक केली. तात्विक विवेचन किंवा वाङ्मयाची मीमांसा विनोदसुंदर वाणीने वाचकांना रसभरित करून सादर करण्याची ॲडिसनची अप्रतिम हातोटी 'माले'तील 'विद्वत्व

आणि कवित्व ’, ‘ संपत्तीचा उपभोग ’, ‘ इतिहास ’, ‘ भाषादूषण ’, ‘ लेखनशुद्धि ’, ‘ भाषापद्धति ’, ‘ वाचन ’, ‘ भाषांतर ’, ‘ लोकभ्रम ’, ‘ गर्व ’, ‘ ग्रंथांवर टीका ’ इत्यादि पहिल्या दोन वर्षांतील निबंधांत स्पष्ट दिसून येतें. पण, ‘ वक्तृत्व ’ या निबंधापासून चिपळूणकरांच्या लेखणीला जें जॉन्सन आणि विशेषत: मेकॉले यांच्या आलंकारिक, उपरोधगर्भ, घणाघाती जहाल शैलीचें वळण लागलें, तें नंतर परिस्थिति जसजशी तापत गेली, तसतसें अधिकाधिक जलाल होत गेलें.

‘ निबंधमाले ’चें वाङ्मय स्वरूप अत्यंत रमणीय आहे. विविध विषयांच्या सुबोध विवेचनानें आणि नाना प्रकारच्या विपुल माहितीनें भरलेला इतका मनोरंजक आणि उद्‌बोधक निबंधसंग्रह मराठींत अद्याप दुसरा झालेला नाही. केवळ व्यासंगपूर्ण आणि बोधप्रद असूनहि पुन्हा इतके चित्ताकर्षक असलेले निबंध चिपळूणकरांपूर्वी मराठींत कोणीहि लिहिलेले नव्हते. त्यामुळे, मुख्यत: ‘ भाषाशोधना ’च्या सौम्य उद्देशानें निघालेल्या ‘ माले ’ने फार थोड्या अवधींत जनमनावर आपली छाप पाडून, तोंपर्यंत ‘ निर्वीरमुर्वीतलं ’ होऊन बसलेल्या भाषादूषकांच्या आणि देशदूषकांच्या काळजाचा थरकाप करून सोडला. चिपळूणकरांचा मूळ उद्देश आणि ‘माले’ने घडवून आणलेली विचारक्रांति यांमधील अंतर पाहिलें, म्हणजे ॲडिसनने आपल्या ‘ स्पेक्टेटर ’ पत्रांतील पहिल्या लेखाच्या शिरोभागीं घातलेल्या होरेसच्या सुंदर सुभाषिताचें स्मरण होतें. तें सुभाषित असें होतें की—

> One with a flash begins and ends in smoke;
> Another out of smoke brings glorious light,
> And ( without raising expectations high )
> Surprises us with dazzling miracles.

या सुभाषितांत म्हटल्याप्रमाणे खरोखरीच ‘निबंधमाले’ने, समाजाच्या कल्पनाशक्तीला आगाऊ निष्कारण न झुलवितां, विचारक्रांति घडवून आणण्याचा अद्‌भुत चमत्कार करून दाखविला. ‘निबंधमाला’ ज्या वेळीं सुरू झाली, त्या वेळीं प्रचंड उद्देशांचे आणि आयोजनांचे इतके उल्कापात महाराष्ट्रावर सारखे होत होते की, त्या धामधुमींत मराठी साहित्याच्या अंधुक, उदास क्षितिजावर

अवतरलेल्या या प्रतिपदेच्या चंद्ररेखेकडे लोकांचें लक्ष बहुधा गेलें नसेल. ॲडिसनला इंग्लंडच्या फक्त सामाजिक नीतीचीच विस्कटलेली घडी बसवावयाची होती. परंतु चिपळूणकरांना त्या वेळीं अराष्ट्रक अवस्थेंत असलेल्या हतप्रभ, हतात्म महाराष्ट्रांतून स्वातंत्र्याकांक्षी, आत्मविश्वस्त, युयुत्सु राष्ट्र उभें करावयाचें होतें. त्यामुळे आरंभीं अवलंबिलेल्या ॲडिसनच्या लालित्यपूर्ण, विनोदगर्भ शैलीवरून सुटून चिपळूणकर हे लौकरच मेकॉलेच्या आव्हानप्रद लढाऊ शैलीवर येऊन थडकले. तरी सुद्धा ॲडिसनच्या शैलींतील अनेक वाङ्मय गुणांच्या छटांनी 'माले'ला रुचिरता आणली असल्याचें आढळून येतें. कोणताहि निबंध रोचक आणि मार्मिक व्हावयाला त्यांत सुगम आणि सरस विवेचन, हृद्य किंवा रम्य भावना, उज्ज्वल किंवा चमत्कृतिपूर्ण कल्पना, अभिजात संदर्भ किंवा आकर्षक स्मृति, चटकदार वर्णन किंवा खुबीदार विनोद यांपैकी कांही ना कांही गुण अवश्य असावे लागतात. ॲडिसन आणि मेकॉले यांच्याप्रमाणे चिपळूणकरांच्या निबंधांतहि यांपैकी बहुतेक गुण एकवटलेले असल्यामुळेच खरोखरी त्यांना इंग्रजी वाङ्मयांत रमलेल्या त्या वेळच्या नवीन पिढींत मराठी भाषेविषयीं आदर आणि विश्वास उत्पन्न करितां आला. ॲडिसनप्रमाणे चिपळूणकरांचाहि प्रत्येक निबंधावर सुभाषित घालण्याचा रिवाज होता. लेखांवर सुभाषितें घालण्याच्या या आपल्या पद्धतीसंबंधीं ॲडिसनने 'स्पेक्टेटर' च्या एका अंकांत असें सूचक विधान केलेलें होतें की, मनुष्याला जशी मोहक मुद्रा तसें लेखाला मनोहर सुभाषित होय. सुभाषित हें लेखाचा विषय सुचविणारें किंवा खुलविणारें हवें. त्याने जसा लेखकाचा व्यासंग तसाच लेखाचा विषयहि सुचविला अथवा खुलविला गेला, तरच तें घातल्याचें सार्थक. नाही तर तें लेखकाच्या भारवाही विद्वत्तेचें निदर्शक होऊन लेखालाहि केवळ भारभूत होतें. ॲडिसन आणि चिपळूणकर यांनी आपल्या लेखांवर घातलेलीं सर्वच सुभाषितें अल्पाक्षररमणीय आणि अन्वर्थक आहेत. ॲडिसन सुभाषितांची निवड युरोपांतील 'संस्कृत' वाङ्मयांतून करीत असे; व चिपळूणकरांचाहि प्रघात तसाच होता. 'मालें'त मराठी सुभाषितें फार तर दहा बाराच सापडतील. जॉन्सनवरील निबंधाच्या आरंभीं हिंदी सुभाषितहि घातलेलें आहे. ॲडिसनचे निबंध जरी चिपळूणकरांच्या निबंधांइतके कल्पकतापूर्ण नसले, तरी त्यांतील गर्भित आणि सूचित

नर्मविनोद मनाला गुदगुल्या करितो. उलट, चिपळूणकरांचा विनोद "इंग्रेज लोक, मिशनरी, बाटे मंडळी व इंग्रेजीचा संस्कार झालेले नवीन विद्वान्" यांच्या कुचाळीवरच बहुधा फोफावत गेलेला असल्यामुळे, प्रथम जरी तो कितीहि हास्यप्रचुर भासला, तरी पुढे त्यांत मौज वाटेनाशी होते. विवेचनाच्या ओघांत ते एकदा आपल्या या ठरीव मंडळीपाशी येऊन थडकले, म्हणजे त्यांचें प्रतिपाद्याचें अवधान आणि औचित्याचें भान हीं दोन्हीहि सुटून त्या अप्रस्तुत टीकेनें निबंध फुगत जातो. 'माले'ला अशा प्रकारची सूज जागोजाग आलेली आहे. पण, त्या वेळीं या विषयांना अतिरिक्त महत्त्व आलेलें असल्याकारणानें, लोकजागृतीच्या दृष्टीनें ही पुनरुक्ति इष्ट आणि आवश्यक होती, असेंच म्हणावें लागेल. किंबहुना, ही जाणीव मनांत सतत वागत असल्यामुळेच, चिपळूणकरांनी हा पुनरुक्तीचा दोष उघड्या डोळ्यांनी पत्करलेला असावा. 'वक्तृत्व' या निबंधांतल्या दयानंद प्रभृतींवरील टीकेवर 'निबंधमाला-हितेच्छू'नें, घेतलेल्या आक्षेपांना उत्तर देतांना त्यांनी असें स्पष्टच विचारलेलें होतें की, "... आमच्या हिताची अतोनात कळकळ बाळगणारे असे जे महाविद्वान् व महावक्ते बाबू प्रतापचंद्र व साक्षात् जगद्गुरु दयानंदजी यांसहि हास्यरस यथास्थित पिकविल्याखेरीज आपलें व्याख्यान रंगलेंसें वाटतच नाही; तर तोच श्लाघ्य क्रम पुढे चालवण्यास आमच्या निबंधमालेसच कां आडकाठी असावी? आमच्या जुन्या लोकांत व त्यांच्या आचारांत हास्यरसाला पुष्कळ विषय आहेत हें जसें आमच्या नव्या मंडळीने जगजाहीर करून टाकिलें आहे; त्याचप्रमाणे न्यायानें म्हटलें म्हणजे नव्या मंडळीचेहि गुणदोष जगापुढे विशेष उघडपणें आणले असतां त्यांत कोणास वाईट वाटूं नये." त्यामुळे, तत्कालीन कांही व्यक्तींचा, संस्थांचा आणि वर्गांचा दंभस्फोट करितांना, आपल्या या कृतसंकल्पानुसार, चिपळूणकरांनी जाणूनबुजून कठोर आणि निंदाव्यंजक टीकेचें गरळ 'मालें'त ओतलेलें आहे. जणूं कांही, परमहंसांच्या 'मतलबसिंधु' विषयी, जगत्तारकाच्या प्रेषितांविषयी, 'सत्याची दिवटी' पाजळणारांविषयी किंवा 'शे दोनशे रुपयांच्या लालचीस भुलून दगेखोरपणाचें काम पत्करणाऱ्या अधमाधमाविषयी' लिहिण्याचा प्रसंग आला, म्हणजे त्यांच्या अंगांत जूनियसचा संचार होत असे! परंतु, त्या वेळीं सुशिक्षित समाजांत माजलेलीं दुर्मतें आणि स्वतःला

देशहितेच्छु म्हणविणारांचा दंभ ध्यानांत घेतला असतां, त्यांचा नायनाट करावयाला उपयोगी पडलेला चिपळूणकरांच्या वाणींतील हा विखार सत्कारणीं लागला, असेंच खरोखरी म्हटलें पाहिजे. तथापि, त्या विषयांचें तात्कालिक महत्त्व आज लोपलेलें असल्यामुळे, आता ती ठरीव स्वरूपाची पाल्हाळिक टीका दु:सह वाटावी, हेंहि साहजिकच आहे.

# २२

'शाळापत्रक', 'निबंधमाला' आणि 'केसरी' यांतून प्रसिद्ध झालेलें चिपळूणकरांचें संपूर्ण वाङ्मय काळजीपूर्वक वाचल्यावर एक चमत्कारिक सत्य मनाला उत्कटतेने जाणवतें. तें सत्य हें की, चिपळूणकर हे वैचारिक दृष्टीने सर्वच बाबतींत संपूर्णतया विलक्षण आधुनिक होते. या त्यांच्या सर्वांगीण आधुनिकतेला केवळ देशाभिमानाच्या ईर्ष्येमुळे प्रसंगानुसार काय मुरड किंवा मर्यादा पडलेल्या असतील, तेवढ्याच. एरवी, हर एक तात्त्विक विषयाची किंवा व्यावहारिक प्रश्नाची चर्चा करितांना त्यांनी जे विचार प्रकट केलेले आहेत, ते सर्वच आधुनिक आणि कांही बाबतींत तर अगदी मूलगामीहि आहेत. वस्तुत:, त्यांच्या मृत्यूनंतर गेल्या सत्तर वर्षांत वैयक्तिक म्हणा, जातीय म्हणा किंवा पक्षविषयक म्हणा अभिनिवेशाने ज्या टीका त्यांच्यावर आणि त्यांच्या वाङ्मयावर करण्यांत आलेल्या आहेत, त्या वाचल्यावर असा भ्रम उत्पन्न होतो की, ते एक बुरसटलेल्या जुनाट मनोवृत्तीचे पुराणमतवादी लेखक असावेत: असे कालविमुख सनातनी लेखक की, ज्यांनी सगळ्या नव्या विचारांकडे पाठ फिरवली; समाजसुधारणेच्या सगळ्या उपक्रमांना विरोध केला; सगळ्या जुन्या रूढींची तरफदारी केली आणि राष्ट्रवादाच्या उन्मादांत फक्त राजकीय स्वातंत्र्याचाच तेवढा पुरस्कार केला. पण, हा निव्वळ एक भ्रम, पद्धतशीर रीतीने पैदा, परिपुष्ट आणि प्रसृत करण्यांत आलेला निखालस खोटा आणि सर्वथैव खोडसाळ भ्रम आहे. दयानंद सरस्वती, फुले, लोकहितवादी, रानडे

प्रभृति तत्कालीन सुधारक आणि त्यांनी केलेल्या कांही चळवळी यांच्यावर जी टीका चिपळूणकरांनी प्रसंगोपात्त केली, तिच्या आधाराने हा भ्रम उत्पन्न करण्यांत आला; व त्यांचे जुन्या मताचे चहाते आणि नव्या मताचे विरोधक या दोघांनीहि ' आपापल्या परीने ' त्यांची अवास्तव प्रशंसा आणि अकारण नालस्ती करून, जणुं संगनमताने, त्या भ्रमाला सिद्धांताची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. वर उल्लेखिलेल्या चार व्यक्तींपैकी लोकहितवादी, फुले आणि रानडे यांच्या गुणदोषांची चर्चा पूर्वी येऊन गेलेलीच आहे. दयानंद सरस्वती यांना सुधारक म्हणण्यापेक्षा जीर्णोद्धारक म्हणणेंच खरोखरी अधिक समर्पक होईल. त्यांचीं मतें आणि तीं प्रतिपादन करण्याची पद्धति यांच्यावर विष्णुशास्त्री पंडित, भांडारकर प्रभृति समकालीन सुधारकांनी जी टीका केलेली आहे, तींत आणि चिपळूणकरांनी केलेल्या टीकेंत फरक असलाच, तर तो फक्त तीव्रतेचा आहे; तत्वाचा अजिबातच नाही. ' इंदुप्रकाश 'नें ता. २३ नोव्हेंबर १८७४च्या आपल्या अंकांत दयानंद सरस्वतींविषयी असा अनुभवसिद्ध अभिप्राय व्यक्त केलेला आढळतो की, " दयानंद सरस्वती यांच्या अंगीं ' दूरस्थाः पर्वता रम्याः ' याप्रमाणे दूरच्या लेखांवरून जी झाक दिसत होती, ती येथे कांहीच प्रत्ययास आली नाही. आजवर प्रत्येक भेटीमध्ये अनेक सुज्ञांच्या प्रत्ययास जें काय आलें, तें हेंच की, सर्वज्ञत्वाचा गर्व, औद्धत्य, वाचालत्व, असंबद्धप्रलापित्व, असत्यवाद, धूर्तता इत्यादि इत्यादि . . .समक्ष गेल्यास हे यद्वातद्वा बोलतात व लेखी प्रश्नांचे जबाब देण्यास टाळाटाळ करतात, असा अनुभव आम्ही स्वतः घेतला आहे. यांचीं जीं मतें आम्हास समजलीं आहेत, त्यांतलीं कांही कांही आम्हांस मान्य आहेत, व त्यांचें कदाचित् व्याख्यानद्वारा प्रतिपादन करीत असतील; परंतु त्यांचें स्थापन करणाराच्या अंगीं गांभीर्य, शांति, सभ्यता वगैरे गुणांनी युक्त असें अगाध पांडित्य असणें अवश्य आहे. या प्रकारचे गुण यांच्यांत मुळीच दिसत नाहीत. तर ते संपादन करण्यास दयानंद सरस्वतींनी प्रथम प्रयत्न करून मग अशा प्रवासास निघावें हें बरें, असें आम्ही त्यांस केवळ प्रेमभावाने सुचवितों." रानडे–पंडितांच्या मुखपत्राने दयानंद सरस्वतींना ' प्रेमभावा 'ने केलेल्या या सटीक सूचनेंत आणि चिपळूणकरांनी ' वक्तृत्व ' या निबंधांत केलेल्या त्यांच्या उपहासांत तत्त्वतः आणि वस्तुतः फरक

खरोखरी काय आहे? 'आर्य समाज' आणि त्याचे प्रवर्तक यांच्याप्रमाणेच 'प्रार्थनासमाज' आणि त्याचे प्रवर्तक यांच्यासंबंधींहि तत्कालीन सुधारकांत सुद्धा तीव्र मतभेद होते. 'मराठ्यांच्या संबंधाने चार उद्गार' या आपल्या ग्रंथांत त्या काळांतले गाजलेले निःस्पृह सुधारक राजारामशास्त्री भागवत यांनी असा अभिप्राय व्यक्त केलेला होता की, "... ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे महाराष्ट्रचूडामणींचा व मुकुंदराजांसारख्या वेदांत्यांचा व तत्प्रिय अद्वैत सिद्धांताचा प्रार्थना समाजाचे प्रतिष्ठापक द्वेष करीत होते; व त्यामुळे ख्रिस्ती लोकांचे आचार व विचार हा एक मोठा चिंतामणीच मिळाला असा भास होऊन त्या नमुन्यावर त्यांनी नवा 'नंदादीप' पाजळण्याचा खटाटोप पत्करला. आदितवारी संध्याकाळीं ख्रिस्ती लोक देवळांत जातात तर प्रार्थना समाजानेहि तोच सुमुहूर्त आपल्या प्रार्थनांना केला. ज्या हेळेवर व ज्या सुरांवर ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थना होतात, तीच हेळ व तोच सूर समाजवाल्यांनी धरला. ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनेच्या शेवटीं 'आमेन्' येतें, त्याप्रमाणे समाजवाल्यांनी 'तथास्तु'चा प्रघात घातला." चिपळूणकरांनी 'निबंधमाले'त आणि 'केसरी'त केलेल्या टीकेंत तरी यापेक्षा निराळें काय म्हटलेलें होतें? "पुरा कस लाविल्याखेरीज सोन्याचा सोनेपणा धरूं नये, तसेंच कोणी लौकिकाने मोठा, येवढ्यावरच जाऊन, त्याच्या वचनाचें जें प्रामाण्य मानायाचें, त्यापेक्षा आपण स्वतः होईल तितकी यथातथ्य परीक्षा करून नंतर कोणाचेंहि मत ग्राह्य की अग्राह्य तें ठरवावें. हें ठरविण्याचा अधिकार लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांस सारखा आहे,"— या विचारस्वातंत्र्याला आणि लोकशाहीला प्राणभूत असलेल्या तत्त्वांचें प्रतिपादन करण्यासाठीच मुळीं त्यांनी लेखणी हातीं घेतलेली होती; व त्या तत्त्वांखातर त्यानी स्वतः आपल्या प्रत्यक्ष वडिलांचा मुलाजा केला नाही किंवा नोकरीचीहि पर्वा ठेवली नाही. तेव्हा, त्यांनी, "आमच्या नव्या मंडळीने देशस्थिति सुधारण्यास ज्या अनेक तऱ्हा केल्या त्यांपैकी विधवाविवाहोत्तेजन, स्वदेशीय व्यापारोत्तेजन आणि प्रार्थनासमाज व आर्यसमाज हे दोन धर्मपंथ या चार मुख्य प्रकारो"च्या बाबतींत लोकहितवादी आणि रानडे यांचें जें वर्तन झालें, त्यावर कडक टीका केली असली, तर त्यांत काय आश्चर्य?

पण, या मंडळीवर टीका करितांना प्रकट झालेले चिपळूणकरांचे विचार हे बव्हंशीं प्रतिक्रियारूप आहेत; व म्हणून प्रतिपक्षावर प्रत्याघात करितांना ईर्ष्येच्या, आवेशाच्या आणि त्वेषाच्या भरांत केलेला कोटिक्रम किंवा युक्तिवाद हा त्यांच्या समतोल मनोवृत्तीचा आणि मतांचा निदर्शक समजणें हें अन्यायाचें होईल. उदाहरणार्थ, विधवाविवाहाच्या बाबतींत लोकहितवादी, रानडे यांच्यासारख्या त्या सुधारणेच्या पुरस्कर्त्यांनी कसोटीचा प्रसंग येतांच जें अवसानघातकीपणाचें लाजिरवाणें वर्तन केलें, त्यावर त्यांनी केलेली टीका तेवढीच फक्त ध्यानांत घेऊन, जर ते विधवा-विवाहाला प्रतिकूल होते, असा निष्कर्ष काढला, तर तो योग्य होईल काय? मग, 'लोकभ्रम' या आपल्या उत्कृष्ट निबंधांत विधवा स्त्रियांच्या दुःस्थितीविषयी, "........ या करुणास्पद विषयाविषयी क्षणभरहि विचार करतांना ज्याचे हृदय अत्यंत खेदानें व संतापानें व्याप्त होऊन जात नाही त्यास केवळ पाषाणहृदय व अधमाधम म्हणण्यास कांही हरकत नाही," इत्यादि जे अत्यंत कळकळीचे उद्‍गार त्यांनी तळतळून काढलेले आहेत, त्यांचा अन्वय कसा लावावयाचा? वादाच्या किंवा टीकेच्या भरांत ते केव्हा केव्हा अंगलट येणाराहि चुकीचा युक्तिवाद कसा बेधडक करीत असत, याचा एक मासला 'माले'च्या चौथ्या वर्षाच्या उपसंहारांतील 'गुलामगिरी'वरील टीकेंत दृष्टीस पडतो. या टीकेंत फुले यांना सूचना करितांना त्यांनी अशी बढाई मारली होती की, "...ब्राह्मण कितीहि लबाड असले व कितीहि दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे; —की ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कमरेला आहेत. त्यांच्या साह्याशिवाय इतर ज्ञातीस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मुळीच मार्ग नाही." हें विधान करितांना, "ज्ञानाचा लाभ सध्याच्या काळीं सर्वथा निष्प्रतिबंध झाला आहे, देशविशेष किंवा स्थितिविशेष आता पूर्वीप्रमाणे ज्ञानप्राप्तीस अनुकूल किंवा प्रतिकूल असा राहिला नाही," इत्यादि जीं विधानें 'मालें'त त्यांनी जागोजाग स्वतःच केलेलीं आहेत, त्यांचें भान कांही त्यांना उरलें नाही. तेव्हा, वादाच्या जोषांत अशा प्रकारचीं जीं आपल्या नेहमीच्या भूमिकेशीं सर्वथैव विसंगत अशीं विधानें चिपळूणकरांनी केलेलीं आहेत, तींच तेवढीं जमेस धरून, —आणि त्याबरोबरच विशेषतः

ज्या व्यक्तींवर त्यांनी टीका केलेली आहे, त्यांच्या सार्वजनिक चारित्र्यांतील वैगुण्यें किंवा विचारांतील प्रमाद लक्षांत न घेतां, —त्यांना प्रतिगामी ठरविण्यांत न्याय आणि प्रामाणिकपणा हीं दोन्ही नाहीत.

'शालापत्रक', 'निबंधमाला' आणि 'केसरी' यांतून प्रसिद्ध झालेल्या चिपळूणकरांच्या संपूर्ण वाङ्मयाचा जर साकल्याने विचार केला, तर भाषेच्या शुद्धलेखनापासून तों जातिभेदापर्यंत सर्वच महत्त्वाच्या विषयांवरील त्यांचीं मतें पुरोगामी आणि कांही बाबतींत तर मूलगामीहि असल्याचा निस्संदिग्ध अनुभव येतो. दयानंद सरस्वतींप्रमाणे ते जीर्णोद्धारक नव्हते किंवा न्या. रानडे यांच्याप्रमाणे धर्मिष्ठहि नव्हते. ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज इत्यादि नवीन धर्मपंथांकडून होणाऱ्या ख्रिस्तधर्मीयांच्या अनुवर्तनाइतकेंच त्यांना आर्यसमाज, थिऑसफी इत्यादि नव्या जीर्णोद्धारप्रवण धर्मपंथांकडून होणारे वैदिक धर्मांतील यजनयाजन, मंत्रतंत्र वगैरे विधिविधानांच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्नहि अगदी नापसंत होते. त्यांचा स्वदेशाभिमान हा संस्कृतिनिष्ठ खरा, पण सर्वथैव धर्मनिरपेक्ष होता. भांडारकर आणि रानडे यांच्याप्रमाणे ते कांही श्रद्धावान् आणि धर्मशील नव्हते. रसिकता हा त्यांचा एकमेव धर्म आणि स्वदेशाभिमान हा त्यांचा अनन्य बाणा होता. हिंदु धर्माविषयीची त्यांची अभिमानाची आणि आदराची भावना ही सुद्धा केवळ सांस्कृतिकच होती. राममोहन राय, दादोबा पांडुरंग, विष्णुबुवा ब्रह्मचारी, मोडक, भांडारकर, दयानंद सरस्वती, रानडे, तेलंग या धर्मशील पुरुषांप्रमाणे त्यांनीं हिंदु धर्मावर युगमानानुसार नवें भाष्य रचण्याचा, नव्या दृष्टीने त्याचें प्रतिपादन करण्याचा, त्यांतील जुन्या गोष्टींची तरफदारी करण्याचा किंवा त्याच्या सुधारणेसंबंधीं त्या वेळीं चालू असलेल्या निरनिराळ्या शास्त्रोक्त वादांत भाग घेण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. राजा राममोहन राय यांच्यापासून तो मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांच्यापर्यंत अनेक भारतीय आणि पाश्चात्य धर्मजिज्ञासूंनी वेदांत, पुनर्जन्म, प्रारब्धवाद, चातुर्वर्ण्य, आश्रमव्यवस्था इत्यादि हिंदु धर्मांतील निरनिराळ्या प्रमेयांचें आणि आचारांचें जें विवरण आणि समर्थन केलेलें आहे, त्याविषयीहि त्यांना कांही रुचि किंवा अनुकूलता वाटली असावी, असें दिसत नाही. कारण

त्यांच्या जीवनांत आणि विचारांतहि धर्माला मुळी स्थानच नव्हतें. अभिजात संस्कृत साहित्यांतील संदर्भ आणि सुभाषितें त्यांच्या वाङ्मयांत जागोजाग विपुलतेने आलेलीं आढळतात. पण वैदिक किंवा औपनिषदिक आर्ष साहित्यांतील संदर्भ किंवा सुभाषितें त्यांत प्रायः शोधूनहि सांपडणार नाहीत. कारण, 'वाघिणीचें दूध 'च खरोखरी ते मनसोक्त प्यालेले होते; गोपालनंदनाने उपनिषदें दोहून काढलेल्या गीतामृताचा एकाद दुसरा घुटकाच फार तर त्यांनी घेतला असेल नसेल! विवेकानंद, बेझंट, टिळक, गांधी, राजवाडे, केतकर, राधाकृष्णन्, विनोबा प्रभृति त्यांच्या नंतर उदयाला आलेल्या तत्त्ववेत्त्यांनी ब्राह्मण्य, चातुर्वर्ण्य आणि हिंदु समाजरचना यांचें उपपादन आणि समर्थन ज्या अभिनव दृष्टीने केलेलें आहे, ती दृष्टि तर त्यांच्या ठिकाणी नव्हतीच, पण तें उपपादनहि त्यांना रुचलें असतें, असें वाटत नाही. ख्रिस्ती मिशनरी, लोकहितवादी, फुले प्रभृतींनी ब्राह्मण जातीची जी निरर्गल, बीभत्स नालस्ती चालविलेली होती, तिची केवळ प्रतिक्रिया म्हणूनच त्यांनी स्वजातीची बाजू काय एकाद वेळीं मांडली असेल, तेवढीच. एरवी ब्राह्मण्याविषयीहि त्यांना दुरभिमान नव्हता. कारण, फुल्यांच्या टीकेला उत्तर देतांना त्यांनी असें स्पष्टच म्हटलेलें होतें की, "आमच्या ज्ञातीचे जे कांही वास्तविक दोष असतील ते सर्व आम्हास कबूल आहेत; त्यांवर पांघरूण घालण्याची किंवा ते नाहीत असें म्हणण्याची आमची बिलकूल इच्छा नाही. त्याप्रमाणेच आमच्या शूद्र देशबंधूंवर जातिभेदाच्या संबंधाने वगैरे जीं दुःखें खरोखर येत असतील, ती हलकीं करणें किंवा होतील तितकीं नाहीशीं करणें हें प्रत्येक देशहितेच्छूचें कर्तव्य होय, हेंहि आम्हास मान्य आहे; व आमची पक्की खात्री आहे की, या कामास आमच्या ज्ञातिबांधवांची विमुखता दृष्टीस पडणार नाही. इतकेंच नव्हे, तर पुष्कळ मोठ्या उत्साहाने त्यास साह्यही करतील." ब्राह्मणांचे दोष आणि पेशवाईच्या उत्तर काळांत त्यांच्या हातून घडलेले प्रमाद यांची चिपळूणकरांना पूर्ण जाणीव होती; व विशेषतः रावबाजीच्या कारकीर्दीचा त्यांच्या वाङ्मयांत जिथे जिथे म्हणून उल्लेख आलेला आहे, तिथे तिथे त्यांनी त्या प्रमादांवर कडक टीका केलेली आढळते. जातिभेदाच्याहि ते अगदी विरुद्ध होते. मृत्यूपूर्वी तीनच दिवस

ता. १४ मार्च १८८२ रोजीं 'केसरीं'त 'देशोन्नति'वर लिहिलेल्या अग्रलेखांत त्यांनी असे उद्गार काढलेले होते की—

"आमच्या देशांत जन्मभूमीचा अभिमान शिथिल होण्यास, या राष्ट्राचें विस्तीर्णत्व व जातिभेद हीं दोन मोठीं कारणें झालीं आहेत... दुसरा प्रकार जातिभेदाचा. यानें तर या राष्ट्राची फूट अतिशयितच पाडली आहे. अठरा पगड जातींस अठरा टोपकरांनी गुंडाळून टाकलें, व साऱ्यांच्या हातीं सारखीच करवंटी दिली; पण लोकांचे डोळे अजून उघडत नाहींत. शेणवी म्हणतात, आम्ही षट्कर्मी; ब्राम्हण म्हणतात, तुम्ही त्रिकर्मी, आणि वस्तुत: पाहतां या भांडणारामध्ये असे शेंकडो सांपडताल की ज्यांस एकाहि कर्माची ओळख नाहीं! येऊन जाऊन कलहकर्मांत मात्र दोघे पटाईत! पण षट्कर्माच्या व त्रिकर्माच्या वादास कंटाळून बिचारें ब्राम्हण्य तर परद्वीपस्थ झालें, आणि टेम्स व रेणा यांच्या तीरांच्या आश्रयानें जाऊन राहिलें, या गोष्टीची दोघाही पक्षकारांस शुद्ध नाही. .... ज्या पाश्चात्य लोकांनीं हा देश इतका कालपावेतों पादाक्रांत करून टाकला आहे, त्यांचे इतिहास वाचून, त्यांचा सहवास करून व त्यांच्या उलाढालींकडे सतत लक्ष पुरवून, आम्ही किती गचाळ लोक झालों आहों, याची प्रचीति आपल्या ठिकाणीं बाणली पाहिजे. ती बाणली असतां, 'लोहपरीस' न्यायानें आमचे नादान लोकही कालें करून बाणेदार होतील असा संभव आहे. त्याप्रमाणेंच ;आलीकडे सारें भरतखंड एकराष्ट्र बनलें आहे, यास्तव कालयोगें करून या अठारा धातूंची ही चांगली मूस बनून, सर्वांस साधारण जो देश, त्या विषयीं अभिमानवृत्ति सर्वांच्या हृदयांत स्फुरूं लागणें हें हीं असंभवनीय आहे, असें नाहीं. याशिवाय सांप्रत हास्यास्पद होऊन राहिलेला जो जातिभेद, त्याच्या संबंधाचा वेडगळपणाचा पीळ ही कमी कमी होत जाऊन, या देशांतील सगळ्या जाति देशबंधुत्वाच्या थोरल्या नात्यांत अंतर्भूत होऊन, बारीक सारीक क्षुद्र भेदांची मातब्बरी लोक तादृश धरणार नाहींत, व एकोप्यापासून सर्वांचें किती हित आहे, हें दिवसां दिवस अधिकाधिक समजूं लागतील, अशीही दृढतर आशा आहे."

बाह्यतः कालविमुख, कर्मठ, जरड भासणाऱ्या हिंदु धर्माच्या वस्तुतः सुधारणाभिमुख, समावेशक, लवचिक स्वरूपाचीहि त्यांना यथार्थ कल्पना होती. म्हणूनच ‘आमच्या देशाची स्थिति’ या शेवटल्या निबंधांत त्यांनी असा विश्वास व्यक्त केलेला होता की, "आमची तर अशी समजूत आजपर्यंत झाली आहे की, हवी तितकी सुधारणा होण्यास सध्यांचा हिंदु धर्म मोठासा बाधक आहे असें नाही... आमची विद्वान व लोकहितेच्छु म्हणविणारी मंडळी क्रमाक्रमानें सुधारणा करण्यास प्रवृत्त झाली असती, तर फार बरें झालें असतें असें आम्हांस वाटतें. तसेंच हिंदु धर्माच्या आड वरचेवर लपून आपला कमकुवतपणा झाकण्यास जें आमच्या पुढारी मंडळीस आजपर्यंत फावलें तेंहि फावलें नसतें! ...धर्म व व्यवहार हे कोणत्याहि देशांत परस्पर विरोधानें कधीहि राहत नाहीत. दोघांची घासाघासी होण्याची वेळ आली असतां त्या घासाघासीनेच क्रमाक्रमानें दोघांचीहि सोय निघते." त्यांचा दृष्टिकोन किती धर्मनिरपेक्ष होता, याचें एक अगदी लहानसेंच पण अत्यंत मार्मिक प्रत्यंतर ‘संपत्तीचा उपभोग’ या सुंदर निबंधांत दृष्टीस पडतें. या निबंधांत त्यांनी दानशूरत्वाचें ‘उत्कृष्ट उदाहरण’ कोणतें दाखविलें आहे म्हणाल? तर "आमच्या पारशी देशबंधूंचें!" आणि जमशेटजी टाटा हा "एकंदर मनुष्यजातीला भूषणरूप जो महात्मा त्यांच्यांत होऊन गेला" त्याचें!! मराठशाहींतील ज्या स्वराज्याविषयी त्यांना इतका जाज्वल्य अभिमान होता, त्यांतीलहि सर्व वैगुण्यांची त्यांना तितकीच तीव्र जाणीव होती. म्हणून ‘आमच्या देशाची स्थिति’ या निबंधांत मोगलाईंतील आणि पेशवाईंतील झोटिंगपाच्छाईचा उल्लेख करून त्यांनी असें समर्पक विधान शेवटीं केलेलें होतें की, "हल्लींच्या राज्यांत आम्हास जितकें स्वातंत्र्य आहे तितकें यापूर्वी स्वदेशीय राजांच्या उत्कृष्ट कारकीर्दींतही कधी नव्हतें." इंग्रजी राज्याविषयीहि त्यांची वृत्ति सावध आणि समतोल अशीच होती. ‘आमच्या देशाची स्थिति’ या निबंधाच्या सुरवातीलाच त्यांनी सांगून टाकलेलें होतें की, "...मागे जी आमच्या राज्यकर्त्यांविषयी लोकांची पूज्यबुद्धि होती व त्यांचे ठायीं जें प्रेम होतें, तें हल्ली पुष्कळच कमी झालें आहे. आम्हांस वरील दोन्हीहि गोष्टी कबूल नाहीत. मागलें अज्ञानदशेंतलें

प्रेम ही आम्हांस पसंत नाही, व अलिकडचें दुराग्रहजन्य अप्रेम ही आम्हांस मान्य नाही..आमच्या देशांत जों जों इंग्रेजी विद्येचा प्रसार होत जाईल, तों तों सुधारणा, स्वातंत्र्य, सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार! एक इंग्रेजी विद्येचें वज्र आमच्या हातांत असलें, म्हणजे मग लिटनशाही, टेंपलशाही, चाटफिल्डशाही, नूरशाही, वगैरे शंभर शाह्यांस सुद्धा आम्ही दाद देणार नाही!!" स्वकीय आणि परकीय, स्वराज्य आणि परराज्य यांच्या विषयी विचार करितांना जो हा विलक्षण डोळसपणा, जो हा 'सर्वविषयी सावधपणा' चिपळूणकरांनी प्रकट केलेला आहे, तो जसा त्यांच्या स्वतःच्या आधुनिकतेचा तसाच महाराष्ट्राच्याहि चिकित्सक प्रकृतीचा निदर्शक नाही काय?

चिपळूणकरांची ही आधुनिकता निव्वळ तात्त्विक विषयांच्या विवेचनांत तर फारच प्रांजळपणाने प्रकट झाल्याचें अनुभवाला येतें. कोणत्याहि तात्कालिक विवाद्य प्रश्नाची चर्चा करितांना त्यांच्या डोळ्यांपुढे आपल्या प्रतिपक्षाचे कोटिक्रम आणि युक्तिवाद हे उभे राहत असत; व त्यामुळे साहजिकच आपण जें काय लिहूं त्यांत त्यांना हात घालावयाला संधि मिळूं नये अशी दक्षता त्यांना घ्यावी लागत असे. निव्वळ तात्त्विक विवरण करितांना अशा प्रकारचें कोणतेंच बंधन किंवा दडपण त्यांच्या मनावर नसे. त्याबरोबरच धर्माच्या किंवा नीतीच्याहि फाजील अभिमानाच्या आहारीं ते कधी गेले नाहीत. ते अत्यंत रसिक असले, तरी आपल्या वडिलांप्रमाणे रंगेल नव्हते; व सर्वथैव प्रतिकूल सांसारिक परिस्थितींतहि त्यांचें चारित्र्य सर्वच बाबतींत अगदी निष्कलंक राहिलें. ज्या व्यक्तींचें आचरण शुद्ध असतें, त्यांच्या ठिकाणीं, त्या शुद्धतेच्या जाणिवेंतून उद्भवलेल्या अहंकारामुळेच बहुधा, आपण इतरांपेक्षा पवित्र आणि उन्नत भूमिकेवर आहोंत अशा भावनेने एक प्रकारची नैतिक रुक्षता, परुषता आणि असहिष्णुता उत्पन्न होते; व त्यामुळे जरड झालेले या नीतिबाजांचें कुरठें मन जीवनांतील नाना प्रकारच्या आनंदांचा रसास्वाद घ्यावयाला असमर्थ होऊन बसतें. चिपळूणकर सदाचरणी असले, तरी नीतिबाज मात्र मुळीच नव्हते. आपल्या वडिलांप्रमाणे त्यांनी दौलतजादा कधी केला नाही, ही गोष्ट खरी. पण, तमाशाचा फड रंगलेला असतां, मागल्या रांगेंत उभें राहून, कलगीतुऱ्याची रसरशीत

छक्कड पाहावयाला मात्र त्यांना कधी कमीपणा वाटला नाहीं. अर्थात् शिष्टंमन्यतेचाहि डौल त्यांच्या ठिकाणीं अजिबात नव्हता. वस्तुत: त्यांचें कुटुंब हें विद्वत्तेच्या आणि प्रतिष्ठेच्या दृष्टीने त्या काळांत अग्रपूजेचे अधिकारी होऊन बसलेलें; व त्यांनी स्वत:हि वयाची पंचविशी उलटण्यापूर्वीच आपल्या लेखणीचा दरारा सर्वत्र गाजविलेला. तरी सुद्धा त्यांच्या ठिकाणीं शिष्टतेचा दिमाख अगदी नव्हता. त्यामुळेच तमाशा-सारखा लोकरंजनाचा अगदी ग्रामीण प्रकारहि त्यांनी भुवया चढवून आणि नाक फेंदारून कधीं वर्ज मानला नाही. सामाजिक नीतीप्रमाणे साहित्याच्याहि बाबतींत ते ' उच्चभ्रू ' नव्हते. 'लेखनशुद्धि' या निबंधांत भाषेच्या 'स्वेच्छा-प्रचारा'चें समर्थन करितांना त्यांनी अशी सुंदर उपमा दिल्याचें आढळतें की, "...पावसाचें पाणी जसें अगदी शुद्ध असतें खरें पण अगदी बेचव लागतें, आणि निर्वाहास अगदीं उपयोगाचें नाहीं, त्याप्रमाणेंच वर कल्पिलेली शुद्ध भाषा होय; पण तेंच पाणी जमीनीवरून वाहून त्यांत तीं तीं अनेक द्रव्यें मिसळलीं असतां तें दूषित होतें खरें, पण मधुर होऊन सेवनीय होतें. त्याप्रमाणेच स्वच्छंदाने चालणाऱ्या भाषेची गोष्ट होय. वैयाकरणाच्या दृष्टीस जे तिचे दूषणप्रकार दिसतात तेच तिच्या अंगीं अर्थ-व्यंजकता, माधुर्य, चलाखपणा वगैरे गुण आणणारे असतात." मराठी भाषेच्या शुद्धीकरणाच्या अलीकडील कल्पनाहि त्यांना मान्य होण्यासारख्या नव्हत्या. अरबी आणि फारसी शब्दांच्या मराठींतील भरण्यासंबंधीं "सारी भाषाच मुळी गंगाजमनी नाही काय ?" असा मार्मिक प्रश्न विचारून त्यांनी असें सडेतोड उत्तर दिलेलें होतें की, "पूर्वी जेवढी भेसळ झाली, तेवढी सर्व भाषेचा भागच म्हणून आपण राखून ठेवली पाहिजे....पुढच्या विषयी मात्र काय खबरदारी ठेवणें ती ठेवावी." लेखनाच्या बाबतींतहि तें उच्चारा-नुसारी असावें, असेंच मत त्यांनी दिलेलें आहे. "शब्द म्हणा की वाक्य म्हणा, जसा ज्याचा उच्चार किंवा प्रयोग होत असेल तसेंच तें लिहीत जावें. हा साधा, सोपा व सयुक्तिक नियम सोडून जर आपण व्याकरणांत, अर्थात, व्युत्पत्तींत वगैरे वगैरे खोल शिरूं लागलों व भाषेस अगदी शुद्ध व पवित्र कर-ण्याचा उद्योग मांडला तर चोहोंकडे अनर्थ होऊन कोठे कांहीच थांग लागणार नाही," हे त्यांचे या प्रश्नासंबंधींचे उद्‌गार उच्चारानुसारी लेखनपद्धतीच्या

पुरस्कर्त्यांना सुद्धा चकित करून सोडतील! संस्कृत वाङ्मयांत साहित्य-समीक्षेचें शास्त्र नाही किंवा वामन-मोरोपंतादि जुन्या मराठी कवींची कविता हें संस्कृत कवितेचें रूपांतर आहे, हीं यथार्थ विधानें करितांना त्यांचा भाषाभिमान किंवा देशाभिमान आड आला नाहीं. मात्र, पुढे मोरोपंतावरील निबंधांत, कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि न्या. रानडे यांच्या जुन्या मराठी कवितेसंबंधींच्या 'दुर्मतां'वर कोरडे उडवितांना, आपल्या दुसऱ्या विधानाला मुरड घालावयाला ते चुकले नाहीत! १८५७ सालच्या बंडाविषयी त्यांनी जे विचार व्यक्त केलेले आहेत, ते वाचून तर अनेक राष्ट्रीय बाण्याच्या अलिकडील लेखकांना केवळ आश्चर्याचाच नव्हे, तर बहुधा उद्वेगाचाहि धक्का बसेल! 'केसरी'तील आपल्या 'देशोन्नति' या शेवटल्या अग्रलेखांत त्यांनी असे उद्‌गार काढलेले होते की, " .. इकडील देशांतून देशाभिमान ही मनोवृत्तीच म्हणण्या-सारखी लोकांस माहित नाहीं. रोम, ग्रीस, इंग्लंड, अमेरिका वगैरे ठिकाणीं स्वदेशप्रीति म्हणून एक अत्यंत प्रबळ मनोवृत्ति जशी आजला आढळत आहे, तशी एशिया खंडांतील कोणत्याहि देशांत आढळत नाही. सन १८५७ सालीं एकदम साठ पलटणी उठून, त्या स्वातंत्र्याचा झेंडा उभारतात. पण या झेंडयांत व इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका येथील बंडांत अतिशयित अंतर आहे. वरील तिन्ही देशांतील दंगे करांच्या बाबतीवरून झाले. आणि इकडे इ. स. १८०७ व १८५७ सालीं बंडें झालीं, त्यांस कारण देशाभिमान बिलकुल नसून, केवळ धर्माभिमान होय! 'काडतुस' या एका शब्दाने सारा बंगाल इलाखा एका क्षणांत पेटवून दिला. पण इतकी काळी फौज जी एकाएकी बिथरली, तिच्यापैकी एकाहि शिपायाच्या अंगीं ह्यामडन् किंवा वॉशिंग्टन यांच्या अंगांतला आवेश संचारला असेल असें बिलकुल म्हणवत नाही! •• आमच्या देशांत.... लोकांस अभिमानास चढवावयाची बाजू कोणती? तर यज्ञोपवीत, गोब्राह्मण इत्यादि. स्वातंत्र्य, जन्मभूमि या शब्दांत वरच्या-सारखा प्रभाव प्राच्य देशांत थोडाच आढळतो!" 'निबंधमाले'तील आपल्या शेवटच्या लेखांत त्यांनी लोकप्रभुत्व आणि स्वातंत्र्य या दोन तत्त्वांवर भर देऊन, "देशभाषेच्या द्वारें लोकांचें मन क्षुब्ध करून त्यांस सुजाण करणें" हा देशस्थिति सुधारण्याचा उपाय एकमेव

म्हणून सुचविलेला होता. त्या वेळीं राजकीय आकांक्षांच्या प्रगतीचा पल्ला 'जबाबदार राज्यपद्धती 'च्या मागणीपलिकडे गेलेला नव्हता. चिपळूणकरांनी 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत, अमेरिका आणि आयर्लंड यांचीं उदाहरणें देऊन, युद्धाचा मार्ग अव्यवहार्य आणि म्हणून त्याज्य ठरविला; व लोकप्रभुत्व आणि स्वातंत्र्य या परस्परपूरक तत्त्वांचा निर्देश करून युरोपांत यशस्वी ठरलेला विचारक्रांतीचा मार्ग सुचविला. 'लोकप्रभुत्व' —'Sovereignty of the people'—'लोकांची सार्वभौम सत्ता' ही कल्पना चिपळूणकरांना त्या काळांत आणि त्या परिस्थितींत स्फुरावी, हें त्यांच्या मनाच्या आधुनिकतेचें उत्कृष्ट प्रत्यंतर होय.

आधुनिकतेच्या दृष्टीने विचार केला, तर चिपळूणकर हे तत्कालीन इतर कोणत्याहि नेत्यापेक्षा त्यांचे एक सहकारी गोपाळ गणेश आगरकर यांना अधिक जवळ होते, असें दिसून येतें. वस्तुत:, गेलीं सत्तर वर्षें महाराष्ट्रांत असा समज प्रचलित करण्यांत आलेला आहे की, त्यांचे दुसरे सहकारी बाळ गंगाधर टिळक यांच्याशीं त्यांचें साधर्म्य असून, राष्ट्रवादाचे ऐकांतिक प्रतिपादक म्हणून टिळकांच्या बरोबरीनें नेहमी त्यांचा निर्देश केला जातो. पण हाहि केवळ एक भ्रम आहे. चिपळूणकरांचें साधर्म्यच जर कोणाशीं असेल, तर तें आगरकरांशीं ! न्या. रानडे हे त्यांच्यापेक्षा आठ वर्षांनी मोठे; व आगरकर आणि टिळक हे सहा वर्षांनी लहान. रानडे आणि टिळक हे दोघेहि युगंधर धर्मपुरुष होते,—वाटल्यास 'धर्मस्थापनेचे नर' म्हणा ! टिळक कॉलेजांत असतांना कदाचित् आगरकरांप्रमाणे अज्ञेयवादी असतीलहि. पण, ध्येयार्पित त्यागमय जीवनाला प्रारंभ केल्यानंतर, वडिलांच्या शेवटल्या दुखण्यांत घडलेल्या भगवत्गीतेच्या वाचनाचा त्यांच्या मनावरील संस्कार जागृत झाला; व जसजसे संकटाचे एकापेक्षा एक दारुण आघात त्यांच्यावर होत गेले, तसतसा तो संस्कार दृढ आणि विकसित होत जाऊन त्यांतून पुढे 'गीतारहस्य' आविर्भूत झालें. रानडे आणि टिळक हे दोघेहि धर्मपुरुष खरे; पण एक द्वैती सगुणोपासक, तर दुसरा अद्वैती निर्गुणोपासक. महाराष्ट्रांतील संतांची उपासना सगुण असली, तरी तत्त्वत:

मात्र ते अद्वैती म्हणजे शांकरमतानुयायीच होते. त्या दृष्टीने, राजारामशास्त्री भागवत यांनी जो आक्षेप 'प्रार्थनासमाजा'च्या संस्थापकांवर घेतलेला आहे, तो अगदी समर्पक ठरतो. स्वतः रानड्यांनींच असें म्हटलेलें होतें की, "उपनिषद्प्रतिपाद्य ब्रह्म शद्ध एकीकडे ठेवून भक्तिमहात्म श्रेष्ठ मानणारे जे वैष्णव साधु त्यांची परंपरा समाजांतील मंडळीनीं अधिक विकसित केली आहे." तथापि, आपल्या देशाच्या राष्ट्रीय जीवनविकासाला प्रेरक आणि धारक झालेल्या तत्त्वप्रणालि व त्याबरोबरच नव्या युगाचें आवाहन आणि आव्हान हीं दोन्ही लक्षांत घेऊन राष्ट्रीय जीवनाच्या पुनर्घटनेला पोषक असें नवें आध्यात्मिक दर्शन उत्पन्न करण्याचा प्रयत्न रानडे आणि टिळक या दोघांनीहि, आप आपल्या विशिष्ट प्रकृतिनुसार, केला. रानडे यांनी आपल्या काळांतील सुशिक्षित वर्गावर पडलेला ख्रिस्ती धर्माचा प्रभाव आणि त्या धर्माची जनसेवेची वृत्ति हीं ध्यानांत घेऊन, भागवत धर्मांतील सगुणाच्या आणि सर्वभूतहितरतीच्या तत्त्वांतून उदारमतवादाचा आविष्कार केला; तर टिळकांनी, पाश्चात्य नीतिशास्त्र आणि भौतिक विद्या यांच्या परिशीलनांतून आपल्या काळांत उद्भूत झालेली अज्ञेयवादाची ऊर्मि लक्षांत घेऊन, गीतेंतील अद्वैताच्या, निर्गुणाच्या, निष्काम कर्माच्या आणि लोकसंग्रहाच्या तत्त्वांतून लोकशाहीला उपकारक असें अभिनव कर्मयोगशास्त्र निर्माण केलें. रानडे आणि टिळक हे दोघेहि आधुनिक नव्हते. भारताच्या सनातन संस्कृतीचे ते श्रेष्ठ प्रसव आणि त्याच्या परंपरापूत आध्यात्मिक जीवनाचे नव्या दृष्टीचे भाष्यकार होते. उलट चिपळूणकर आणि आगरकर यांना अध्यात्माचा गंधहि नव्हता. दोघांचेंहि जीवन धर्मनिरपेक्ष. संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांवर जरी त्या दोघांचा नितांत प्रेमा होता, तरी त्यांची अस्मिता पोसली गेली होती मात्र 'वाघिणीच्या दुधा'वर! दोघेहि विलक्षण रसिक आणि वाङ्मयानंदाचे भोक्ते. दोघांचीहि सहृदयता अलौकिक. रानडे आणि टिळक यांचें वाङ्मय तार्किक, बुद्धिप्रधान, ज्ञानगर्भ; तर चिपळूणकर आणि आगरकर यांचें वाङ्मय आलंकारिक, भावनाप्रधान, रसगर्भ. रानडे आणि टिळक हे दोघेहि राजकारणी मुत्सद्दी; लोकाराधनेसाठी म्हणा किंवा तात्कालिक यश पदरांत पाडून घेण्यासाठी म्हणा प्रसंगीं तत्त्वाला मुरड घालावयाला दोघेहि तयार; व दोघांनी कोणतीहि संधि किंवा साधन

वर्ज मानलें नाही. "न मां कर्माणि लिंपन्ति न मे कर्मफले स्पृहा" हीच जणूं दोघांची स्वतःविषयी धारणा! त्यामुळे फडके आणि सावरकर यांना सल्ला द्यावयाला दोघांनाहि संकोच वाटला नाही. चिपळूणकर आणि आगरकर हे त्या मानाने एकमार्गी आणि तोंहि मार्ग घोपट! लवचिकपणा हा गुण दोघांच्याहि ठिकाणीं नव्हता. त्यामुळे, स्वतःच्या मतांना निष्ठेने चिकटून राहण्यांत, त्यांचें आग्रहाने आणि आवेशानें प्रतिपादन करण्यांत व तदनुसार शक्य तोंवर आचरण ठेवण्यांत दोघांनीहि आयुष्याचें सार्थक मानलें. रानडे आणि टिळक यांनी भारताच्या आणि महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि राजकीय परंपरेचा वारसा पुढे चालविला आणि परिपुष्टहि केला. इतका कीं, 'मराठ्यांच्या सत्तेचा उदय' या आपल्या ग्रंथांत रानड्यांनी महाराष्ट्रीय संतकवींच्या कामगिरीचें मर्म विशद करून मराठ्यांच्या स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नाला आध्यात्मिक अधिष्ठान असल्याचें सिद्ध केलें; तर 'गीतारहस्य' या आपल्या 'श्रीशाय जनतात्मने' समर्पण केलेल्या ग्रंथांत टिळकांनी गीतेंतील लोकसंग्रहार्थ आचरावयाच्या निष्काम कर्मयोगाच्या तत्त्वाचा मेळ आधुनिक लोकशाहीशीं घालून दाखविला. चिपळूणकर आणि आगरकर यांचें वाङ्मय आल्हाददायक आणि उद्बोधक असलें, तरी ही योग्यता त्या वाङ्मयाची नाही. रानडे आणि टिळक हे द्रष्टे आणि योद्धे होते. चिपळूणकर आणि आगरकर हे मुख्यतः रसिक साहित्यकार आणि सहृदय सुधारक. चिपळूणकर हे कितीहि देशाभिमानी असले, तरी आपल्या देशांतील निरनिराळ्या स्थित्यंतरांचा नीट मागोवा घेऊन त्याच्या भवितव्याविषयी त्यांनी स्वतः कांही कल्पना मनाशीं बांधल्या होत्या, असें वाटत नाही; व आगरकर हे कितीहि सुधारणावादी असले, तरी आपल्या देशांतील सामाजिक परिवर्तनांचें साक्षेपाने विश्लेषण करून त्याच्या पुनर्घटनेविषयी त्यांनीहि स्वतः कांही तत्त्वें संशोधिलीं होतीं, असें दिसत नाही. उलट रानडे आणि टिळक यांचें आकलन आणि दर्शन हीं दोन्हीहि अधिक मूलगामी, अधिक दृढ, अधिक विशाल होती. त्यामुळे, या देशाची प्रकृति, संस्कृति आणि नियति ध्यानांत घेऊन, त्याच्या अभ्युदयाचे निश्चित व्यवहार्य मार्ग त्यांना आंखतां आणि आक्रमितांहि आले. पण, रानडे, चिपळूणकर, आगरकर आणि टिळक यांची दृष्टि, वृत्ति आणि कृति यांत

कितीहि फरक असला, तरी पतित, परतंत्र महाराष्ट्राच्या पुनरुत्थानाला त्यांचे परिश्रम सारख्याच प्रमाणांत कारणीभूत झाले, हें आपण कृतज्ञतापूर्वक ध्यानांत ठेविलें पाहिजे.

## २३

'निबंधमाले'चा उदय हा, एका परीने, भारतीय राजकारणांतील नव्या मन्वंतराचा निदर्शक म्हणतां येईल. कारण, 'माले'च्या जन्मानंतर पुढील दहा वर्षांमध्यें, म्हणजे १८८५ सालीं राष्ट्रीय सभेची स्थापना होईपर्यन्त, केवळ भारतांतच नव्हे, तर एकंदर सर्व जगांत ज्या घडामोडी झाल्या, त्यांनी भारतांतील राजकीय चळवळींचें स्वरूप निश्चित केलें. या घडामोडींशी किंवा त्यांतून उद्भवलेल्या चळवळींशी 'माले'चा प्रत्यक्ष संबंध नाही, ही गोष्ट खरी. पण, त्यांचा परिणाम चिपळूणकरांच्या स्वातंत्र्याकांक्षी प्रतिभेवर उत्कटतेनें होऊन, 'माले'चें धोरण दिवसेंदिवस अधिकाधिक प्रखर होत गेलें, यांत मात्र शंका नाही. त्यामुळे तिच्यावर सुरवातीपासूनच मुळीं राजद्रोही आणि ख्रिस्तद्रोही असल्याचे आरोप विशेषतः 'ज्ञानोदया'दि ख्रिस्ती वृत्तपत्रांतून होऊं लागले. 'माले'च्या आठव्या अंकांत 'इतिहास' या निबंधाचा समारोप करितांना भारताचे विपर्यस्त इतिहास लिहिणाऱ्या मिल, मेकॉले, मॉरिस प्रभृति इंग्रजी ग्रंथकारांवर कडक टीका करून सत्तावन सालच्या बंडांतील महाराष्ट्रीय सेनानींच्या पराक्रमाचा जो अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख चिपळूणकरांनी केलेला होता, त्यामुळे ख्रिस्ती मिशनरींचें पित्त खवळलें; व त्यांनी मेजर कँडी यांच्या निदर्शनाला ती टीका आणून दिली. मेजरसाहेबांचा कृष्णशास्त्र्यांवर पुत्रतुल्य लोभ होता म्हणून त्यांनी शास्त्रीबुवांना पत्र लिहून अशी सूचना केली की, "तुमचेसारख्यांचे मुलाने अशा तऱ्हेचा मजकूर लिहिणें म्हणजे अतिशय शोचनीय गोष्ट आहे; तेव्हा असें पुन्हा न करण्याबद्दल तुम्ही चिरंजीवास ताकीद द्यावी." शास्त्रीबुवांनी आपल्या गुरूचें तें पत्र चिरंजिवांना दाखविलें; व 'माले'चा आठवा अंक मुद्दाम मागून घेऊन वाचला. नंतर त्यांनी मेजरबहादुरांना सामोपचाराचें उत्तर पाठवून त्यांची समजूत घातली खरी; पण त्याबरोबरच चिपळूणकरांनाहि

असा बोध केला की, " अशा तऱ्हेचा मजकूर लिहिण्यापासून तादृश काय उपयोग आहे ? तुला वाटलें तर वकिलीचा वगैरे स्वतंत्र धंदा पत्करून मग असें लिहीत जा !" स्वतः शिक्षणखात्याचे डायरेक्टर चाटफील्डसाहेब यांनीहि, त्या वर्षाच्या शेवटीं हायस्कूलची पाहणी करावयाला आल्याची संधि साधून, चिपळूणकरांना समक्ष सौम्य इषारा दिला. शाळेच्या पाहाणीचें काम आटोपल्यावर कांही प्रमुख शिक्षकांना त्यांनी मुख्याध्यापकांच्या खोलींत बोलावून व्यक्तिशः निरनिराळे प्रश्न विचारले. त्या वेळीं चिपळूण-करांशीं बोलत असतां, ओघाने 'माले'च्या आठव्या अंकाचा प्रश्न निघून, डायरेक्टरसाहेब त्यांना म्हणाले, " तुम्ही मराठींत नवीन मासिक काढतां ही फार चांगली गोष्ट आहे. परंतु तुम्ही अजून तरुण आहांत. तुमचे विचार अजून पक्व झाले नाहीत. तेव्हा कोणतेहि संबंधाने कडक लेख लिहिणें तुम्हास बरें नाही. शिवाय मेकॉले, मिल ह्यांनी जीं मतें प्रदर्शित केलीं आहेत, तीं म्हणजे सर्वांसच सर्वथैव मान्य आहेत असें कांही नाही." चाटफील्ड यांनी ज्या आपुलकीच्या भावनेने हा हितबोध चिपळूणकरांना केला, तिचा परिणाम त्यांच्याहि मनावर झाल्याविना राहिला नाही. कारण, त्या दिवसाच्या आपल्या रोजनिशींत त्यांनी या भेटीची अशी नोंद केलेली आढळते की, " प्रतिष्ठित पाहुणे.—आपल्या सभ्यतेच्या वागणुकीने त्यांनी अनुकूल ग्रह उत्पन्न केला." ( An illustrious visitor. Made a favourable impression by his polite behaviour ) पण साहेबांनी केलेला उपदेश मात्र त्यांनी अर्थातच अमलांत आणला नाही. उलट, देशांतील राजकीय परिस्थिति जसजशी विकोपाला जात चालली, तसतसा 'माले'तील टीकेलाहि जोर चढत जाऊन, तिच्या संबंधीच्या कागाळचा शास्त्रीबुवांकडे वारंवार येऊं लागल्या. तेव्हा ते एकदा वैतागानें उद्गारलेहि, " हा पोरगा एक दिवस स्वतःला गोत्यांत आणणार आहे ! " ( This boy will one day bring himself into scrape. )

शास्त्रीबुवांचे हें भाकित खरें ठरण्याचा प्रसंग दो वर्षांच्या आंतच आला. 'निबंधमाले'च्या उदयानंतर दोन महिन्यांनी डिस्राएलीच्या नेतृत्वाखाली इंग्लंडांत हुजूर पक्षाची कारकीर्द सुरू होऊन त्याच्या

विजिगीषेमुळे आशिया खंडाच्या राजकारणांत अनेक उत्पात घडून आले; व भारताच्या राज्यकारभारावरहि त्याची अत्यंत अनिष्ट प्रतिक्रिया झाली. लॉर्ड नॉर्थब्रुक हा त्या वेळीं भारताचा व्हाइसरॉय होता. त्याने हिंदी गिरण्यांना संरक्षण देण्यासाठी मँचेस्टरच्या कापडावर जकात बसविल्यामुळे त्याच्यावर नोकरीची मुदत भरण्यापूर्वीच स्वदेशीं परत जाण्याचा प्रसंग आला. त्याच्या जागेवर डिझ्राएलीने लॉर्ड लिटन याची नेमणूक केली. त्या वेळीं लिटनला घातलेल्या पत्रांत त्याने असे सूचक उद्गार काढलेले होते की, "मध्यआशियांतील राजकीय परिस्थिति अतिशय नाजूक आणि बिकट असून, त्या दृष्टीने भारताच्या व्हॉइसरॉयाच्या जागेवर चांगल्या मुत्सद्याची योजना होणेंच अवश्य आहे. या जागेचा स्वीकार जर तुम्ही केला, तर स्वदेशाची सेवा व त्याबरोबरच शाश्वत कीर्तीहि संपादन करण्याची संधि तुम्हांला मिळेल." लिटनच्या हातून पुढे घडलेल्या साऱ्या अनन्वित कृत्यांचें बीज डिझ्राएलीच्या या उद्गारांतच आहे. किंबहुना, हिंदी संस्थानें एकामागून एक खालसा करून डलहौसीने ज्याप्रमाणे जुन्या राजवटींतील सत्ताधारी वर्गाला बंड करावयाला उद्युक्त केलें, त्याप्रमाणे प्रजेचे मूलभूत हक्क एकामागून एक हिरावून घेऊन लिटनने नव्या आमदानींतील सुशिक्षित वर्गांत प्रखर असंतोष उत्पन्न केला. सत्तावन सालच्या बंडानंतर राज्यसत्तेचें जें हस्तांतर झालें, त्याच्या मुळाशीं हिंदी लोकांच्या हितरक्षणाची बुद्धि असावी, असा सुशिक्षितांचा समज झालेला होता. कारण, पार्लमेंटच्या ज्या कायद्यानुसार हें परिवर्तन घडून आलेलें होतें, त्याचें नांवच मुळी 'भारताचें राज्य अधिक चांगल्या रीतीने चालविण्याचा कायदा' (An Act for the Better Government of India) असें होतें. या राज्यक्रांतीनंतर लगेच बाहेर पडलेल्या व्हिक्टोरिया राणीच्या उदार जाहिरनाम्यामुळे ही समजूत दृढतर झाली; व हा जाहिरनामा म्हणजे आपल्या राजकीय हक्कांचा जणुं एक ताम्रपटच आपल्याला बहाल करण्यांत आलेला आहे, असें सुशिक्षितांना वाटलें. पण ही त्यांची कल्पना पुढील सोळा वर्षांत भ्रामक ठरली. राज्यकारभारांत झालेल्या या स्थित्यंतरामुळे, दादाभाई नौरोजी यांनी वेल्बी कमिशनला पाठविलेल्या पत्रांत म्हटल्याप्रमाणे, लांच-लुचपतीच्या जागीं रयतेचा रक्तशोष करणारे हजारों रुपयांचे तनखे आले,

व्यक्तिगत अरेरावीच्या जागीं कायदेशीर दडपशाही आली व वशिलेबाजीच्या जागीं वर्णभेदाचें प्रस्थ माजलें, एवढाच काय तो फरक पडला ! ईस्ट इंडिया कंपनीला दर वीस वर्षांनी तरी आपल्या कारभाराचा जाब ब्रिटिश पार्लमेंटला द्यावा लागत असे. पण हें नवीन सरकार स्वत:शिवाय कुणालाच जबाबदार नव्हतें. लिटनशाहींत या अंदाधुंदीची परमावधि झाली. उद्योगधंदे बुडविण्यांत आले; प्रजा निःशस्त्र करण्यांत आली; व वारंवार अवर्षणें पडल्यामुळे होरपळून गेलेली जमीन जें निकस अन्न देईल, त्यानें सरकारसारा आणि स्वत:चें पोट भरण्याचा दुर्धर प्रसंग रयतेवर येऊन ठेपला. सिव्हिल सर्व्हिसची वयोमर्यादा कमी करून वरिष्ठ नोकऱ्यांचें द्वार हिंदी लोकांना बंद करण्यांत आलें; व १८३३ सालच्या कायद्याला हरताळ फांसून त्यांच्यासाठी मुद्दाम कमी दर्जाचा नौकरपेशा निर्माण करण्यांत आला. बाहेरून येणाऱ्या विदेशी मालावरील संरक्षक जकाती उठवून ब्रिटिश व्यापाराला उत्तेजन देण्यांत आलें; व बाहेर जाणाऱ्या स्वदेशी मालावर प्रतिबंधक जकाती बसवून हिंदी व्यापाराचा उच्छेद करण्यांत आला. १८७६ सालीं दुष्काळाने प्रथम दक्षिण भारतांत आपलें भीषण स्वरूप प्रकट केलें. पुढे तो लवकरच सर्व देशभर पसरून १८७९ सालपर्यंत टिकला. या दुष्काळांत पन्नास लाख माणसें मृत्युमुखीं पडलीं ! पण, कोटद्यवधि लोक अशा रीतीने अन्नाला मोताद होऊन मरत असतां, राणीने सम्राज्ञीपद धारण केल्याबद्दल दिल्लीला मेजवान्या झडत होत्या; व दुष्काळाने मुलूख सारा बेचिराख होऊन गेला असतां, ब्रिटिश साम्राज्याच्या महोत्सवाचीं चिरागदानें दिल्लीला पाजळत होतीं. हिंदी जनतेवरील या दारुण आपत्तीच्या प्रसंगीं तिला सहानुभूतीचा संदेश पाठविण्याऐवजी डिस्राएलीने, मोगल बादशहांच्या पुरातन सिंहासनावर बसण्याची संधि लिटनला लाभल्याबद्दल, त्याचें उलट अभिनंदन केलें ! शेतकऱ्यांना साऱ्याची माफीच काय पण तहकुबीहि सरकारकडून मिळाली नाही; व दारिद्र्या-बरोबर कर्जबाजारीपणाहि त्यांच्या खोपटींत कायमचा येऊन बसला. आपल्या या जुलमी कारभाराविरुद्ध जनतेला चकार शब्द काढतां येऊं नये, म्हणून लिटनने अखेर हिंदी वृत्तपत्रांची मुस्कुटदाबीहि केली.

१८७४ पासून १८८० पर्यंतचा हा अर्ध तपाचा काळ भारताप्रमाणे महाराष्ट्रालाहि अतिशय धामधुमीचा गेला. १८७३ सालच्या अखेर बडोद्याचे तरुण अधिपति श्री. मल्हारराव गायकवाड यांच्यावर सरकारचा रोष होऊन त्यांच्या राज्यकारभाराची चौकशी सुरू झाली; १८७५ सालच्या आरंभीं, बडोद्याचा रेसिडेंट कर्नल फेअर याला विषप्रयोग केल्याच्या अरोपावरून, सरकारने महाराजांना पदच्युत केलें; व त्यांची सर्व खाजगी मालमत्ताहि त्याबरोबरच जप्त केली. बडोद्याच्या राज्यव्यवस्थेंत अंदाधुंदी माजलेली होती, ही गोष्ट खरी. पण, महाराजांवर सरकारची इतराजी व्हावयाला, त्यांच्या ठिकाणीं असलेल्या राज्यकर्तृत्वाच्या अभावापेक्षा त्यांच्या स्वाभिमानाचा प्रभावच अधिक कारण झाला, याची जाणीव महाराष्ट्रांत सर्वांना होती. किंबहुना, मुंबईच्या राज्यपालासमोर मांडलिकाच्या दर्जाने वागण्याचें त्यांनी नाकारलें व तसा प्रसंग येऊं नये म्हणून लॉर्ड नॉर्थब्रुक याने मुंबईस भरविलेल्या दरबारालाहि ते हजर राहिले नाहीत, इत्यादि कारणांमुळेच त्यांच्यावर पदच्युतीचा प्रसंग ओढवला, अशी लोकांची खात्री होऊन चुकलेली होती. त्यामुळे, त्यांच्यावरील या संकटाची वातमी पुण्याला येऊन पोचतांच, सार्वजनिक काकांनी एक लक्ष रुपयांच्या मदतीचें आश्वासन त्यांना तारेने दिलें; व महाराजांची चौकशी त्यांच्या योग्यतेला अनुरूप अशा निःपक्षपाती न्यायाधीशांकडून करविण्यांत यावी, अशी मागणी 'सार्वजनिक सभे'ने सरकारजवळ केली. १८३९ सालीं सातारचे तेजस्वी छत्रपति प्रतापसिंहमहाराज यांना पदच्युत करण्यांत आलें तेव्हा, किंवा पुढे दहा वर्षांनी सातारचें राज्य अजिबात खालसा करण्यांत आलें तेव्हाहिं, ज्या पुणें शहराने त्या अन्यायाबद्दल दुःखाचा एक उसासा टाकला नाही किंवा निषेधाचा एक शब्द उच्चारला नाही, त्याने या वेळीं, तशाच प्रकारच्या आपत्तींत, मल्हाररावांना मोठ्या धैर्याने साथ देऊन आपल्या त्या पातकाची जणुं निष्कृतीच केली! 'सभे'च्या मागणीप्रमाणे महाराजांची चौकशी होऊन जरी त्यांच्यावरील आरोपाचें निरसन झालें, तरी राज्याधिकाराला मात्र ते नालायक ठरून, त्यांची अखेर मद्रासला रवानगी करण्यांत आली. त्यांच्या चौकशीचें हें वावटळ निवळतें न निवळतें, तोंच १८७८ सालीं कोल्हापूरचे दत्तक बालनृपति छत्रपति शिवाजीमहाराज

यांच्या छळाची बातमी सर्व महाराष्ट्रांत पसरून, मल्हाररावांच्या पदच्युतीमुळें आधीच व्यथित झालेलीं लोकांचीं मनें त्यांच्या बंदिवासाच्या कहाणीनें विदीर्ण होऊन गेलीं. त्यांतूनच पुढे चार वर्षांनी 'केसरी-मराठा' पत्रांवरील अब्रूनुकसानीच्या खटल्याचें प्रकरण उद्भवलें. मल्हारराव महाराजांना मदत करण्याच्या बाबतींत 'सार्वजनिक सभे'ने जी तत्परता दाखविली, तिच्यामुळे सरकारचें मन 'सभे'विषयी थोडेसें कलुषित झालेलेंच होतें. किंबहुना, बडोद्याचा रेसिडेंट क. फेअर याने महाराजांवर जे अनेक आरोप केलेले होते, त्यांपैकी एक आरोप असा होता की, आपल्या हस्तकांना दक्षिणेंत पाठवून, त्यांच्याकडून महाराजांनी राजद्रोही चळवळीचा प्रसार महाराष्ट्रांत करविला. त्यामुळे, फडके यांनी बंडाचें निशाण उभारतांच, त्या बंडामागे पुण्यांतील राजकारणी मंडळी असावीत, असा सरकारचा ग्रह झाला; व १८७९ सालच्या मे महिन्यांत बुधवार आणि विश्रामबाग या पेशव्यांच्या वाड्यांना आगी लागून, त्यांच्या मुळाशीं रानडे नांवाचा इसम असल्याचा सुगावा लागतांच, सरकारने त्याचा फायदा घेऊन न्या. रानडे यांची तडकाफडकीं धुळ्याला बदली केली. या एकंदर प्रकारामुळे पुणें शहर आणि तेथील ब्राह्मणवर्ग यांच्याविषयी सरकारच्या मनांत कायमची अढी उत्पन्न होऊन, तिचे परिणाम पुढे 'निबंधमाले'लाहि थोड्या बहुत प्रमाणांत भोवले.

आपल्या डोळ्यांसमोर प्रत्यहीं घडणारे हे विपरीत प्रकार पाहून तत्कालीन सुशिक्षितांच्या मनांत कोणत्या भावना, कोणते विचार उचंबळले असतील ? १८५८ सालचा जाहिरनामा वाचून भारताच्या राज्यकारभाराला आता जबाबदार वळण लागलें, अशी ज्यांची कल्पना झाली होती, त्यांना अवघ्या दीड तपांत आपली स्वप्नसृष्टि जळून खाक झालेली पाहून,–राणीचा अंमल सुरू होण्यापूर्वीं संपन्न आणि सायुध असलेलें राष्ट्र उण्यापुऱ्या अठरा वर्षांच्या अवधींत हैराण आणि हतप्रभ झालेलें पाहून काय वाटलें असेल ? इंग्रजी राज्य हें रामराज्य असून इंग्रज लोक हे आपले उद्धारक आहेत, या १८१८ सालापासून १८७० पर्यंत सतत पन्नास वर्षें कानांवर पडत आलेल्या तत्त्वज्ञानाचा फोलपणा जर कोणत्या कारणांमुळे बहुजनसमाजाच्या अनुभवाला आला असेल, तर तो या दहा वर्षांत एकामागून एक घडून आलेल्या अनर्थांनी. विशेषतः, १८७७ सालच्या जानेवारींत 'कैसर-इ-हिंद'

ही पदवी महाराणीने धारण केल्याचा समारंभ दिल्ली येथे ज्या वेळीं दरबार भरवून करण्यांत आला, त्या वेळीं जेते आणि जित, राज्य आणि साम्राज्य व प्रजाजन आणि बंदिजन यांच्यांतील वैषम्य स्पष्ट होऊन, ब्रिटिश राज्यनीतीचें मायावी स्वरूप लोकांना कळून चुकलें. किंबहुना, मोंगलांच्या उध्वस्त राजधानींत भरलेला तो सम्राज्ञीचा दरबार म्हणजे जेतृत्वाच्या दिमाखाचें मूर्तिमंत प्रदर्शनच होतें ! राणीच्या या नव्या पदवीच्या प्रश्नावर तेव्हा पार्लमेंटांत झालेल्या वादामुळे ब्रिटिश राज्यनीतीच्या अंतरंगावर इतका विदारक प्रकाश पडला की, तिच्या निःस्वार्थीपणाच्या अवडंबरावर पुढे लोकहितवादींसारख्या लब्धप्रतिष्ठांचाहि फारसा विश्वास उरला नाही. या मन्वंतराचें वर्णन 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत चिपळूणकरांनी असें केलेलें होतें की, "सती, ठगी, बालहत्या वगैरेंबद्दल हळहळणारी व बंदोबस्त करणारी वेंटिक प्रभृति मंडळी कोणीकडे आणि खुद्द कलेक्टरास दुष्काळांत लोक मरतात येवढा उल्लेख केल्याबद्दल तावडतोब अर्धचंद्र देणारे व लक्षावधि प्रजा मरणाच्या दारीं बसली असतां दिल्लीस दिवा लावणारें वीकन्सफील्डप्रमुख महापंचायतन कोणीकडे! . . पूर्वीचा जो निदान बाह्यात्कारीं तरी बरोबरीचा संबंध होता, तो जाऊन यापुढे आम्ही राजाधिराज, संस्थानिक हे आमच्या खाली एक पायरी आणि एरवींची हिंदु प्रजा ही त्याहूनहि खालच्या पायरीची, हाच काय तो इत्यर्थ त्या दिवशीं जागजागीं कैसर–इ–हिंदच्या नांवाने खंडोगणती दारू जाळून जे हजारो रुपये खराब केले त्यांत होता. . . . यापूर्वीं सारे लोक मोगलाईस व पेशवाईस नांवें ठेवून इंग्रेजी राशियतीची जी तारीफ करीत असत, ती स्थिति आता गेली." या राजकीय मतपरिवर्तनाला पोषक अशी विचारक्रांति याच सुमारास पाश्चात्य विद्वन्मंडलांत घडून आलेली होती. विल्यम जोन्स, चार्लस विल्किन्स, हेन्री कोल्ब्रुक, मॉनियर विल्यम्स, गटे, श्लेजेल, हुंबोल्ट, विल्सन, मॅक्समुलर प्रभृति युरोपियन पंडितांनी, संस्कृत वाङ्मयाचें अध्ययन, संशोधन आणि संपादन करून, अखिल मानवजातीच्या इतिहासांत त्या वाङ्मयाला किती लोकोत्तर महत्त्व आहे, हें सर्व जगाच्या निदर्शनाला आणून दिलेलें होतें. युरोपांत झालेल्या या विचारक्रांतीची लाट भारतांत येऊन थडकतांच नवीन पिढीच्या देशाभिमानानें उचल खाल्ली; व जुन्या पिढीच्या स्वाभिमान-

शून्यतेचा उपहास होऊं लागला. मेकॉले, मिल प्रभृति इंग्रज लेखकांनी हिंदु संस्कृति आणि सारस्वत यांच्याविषयी जीं अनुदार मतें प्रदर्शित केलेलीं होतीं व ज्यांचा अनुवाद कावेबाज मिशनरी आणि घायकूत सुधारक यांनी जवळ जवळ अर्धशतक केला, त्या मतांचा फोलपणा या विचारक्रांतीमुळे निर्विवाद सिद्ध होऊन, सुधारकांना देखील स्वाभिमानी होण्याची आवश्यकता वाटूं लागली. स्वाभिमानाची ही जी ऊर्मि सांस्कृतिक पुनरुज्जीवनामुळे उत्पन्न झालेली होती, तिला प्रोत्साहक अशा राजकीय घटना याच वेळीं आशिया खंडांत घडून आलेल्या होत्या. रशियाने १८७७ सालीं, युरोपांतून तुर्कस्तानाचें उच्चाटन करण्यासाठी, त्याच्यावर स्वारी केली. या युद्धांत जरी अखेर तुर्कस्तानाचा पराभव झाला, तरी साऱ्या युरोपने दुखणाईत म्हणून धिक्कारिलेल्या त्या जुनाट मुसलमान राष्ट्रानें प्लेवनाच्या वेढ्यांत रशियाला इतके जेरीस आणलें की, त्याच्या त्या पराक्रमाचा डिंडिम तमाम दुनियेंत दुमदुमला ! याच प्रकाराची थोडीशी पुनरावृत्ति पुढे अँग्लो-अफगाण युद्धांत झालीं. भारताच्या वायव्येला, डिस्राएलीच्या सूचनेनुसार, शास्त्रीय सरहद्द निर्माण करण्याच्या लालसेने, लिटनने अफगाणिस्तानाच्या कारभारांत केलेली ढवळाढवळ अंगलट येऊन, ब्रिटिश वकील सर लुई कॅव्हगनरी याच्या नेतृत्वाखाली तिथे गेलेल्या शिबंदीची अफगाण सैन्याने कत्तल केली. रूसो–टर्किश युद्धाने जसा युरोपियनांचा दरारा धुळीला मिळविला, तशी या अँग्लो–अफगाण युद्धानें ब्रिटिशांची दहशत खिळखिळी केली. या सगळ्या प्रक्षोभक घटनांचा परिणाम चिपळूणकरांच्या प्रभावी मनावर इतका झाला की, भाषेच्या स्थितीवरून 'निबंधमाला' अखेर देशाच्या स्थितिवर येऊन थडकली !

## २४

अशा या क्रांतिकारक परिस्थितींत 'इंग्रेजी भाषा', 'डॉक्टर जॉनसन', 'मोरोपंताची कविता', 'लोकहितवादी' व 'आमच्या देशाची स्थिति'

हे मालेंतील पांच निबंध लिहिले गेलेले आहेत. त्यामुळे चिपळूणकरांच्या स्वाभिमानाची दीप्ति या निबंधांतून उत्तरोत्तर अधिकाधिक उफाळत गेलेली दिसते. इंग्रजी भाषेवरील निबंध हा विवेचनाच्या दृष्टीने अत्यंत एकांगी असून, त्यांत त्या भाषेंतील ललित वाङ्‌मयाला तर नुसता स्पर्शहि केलेला नाही. मग वर्डस्वर्थ, बायरन, शेले यांच्या काव्यांची किंवा डिकन्स, थॅकरे, इलियट यांच्या कादंबऱ्यांची माहिती त्यांत कोठून आढळणार? मेकॉलेनंतर उदयाला आलेल्या अर्नोल्ड, बेजहॉट प्रभृति निबंधकारांचा किंवा मिलनंतर उदयाला आलेल्या रस्किन, स्पेन्सर प्रभृति तत्त्वज्ञांचाहि निर्देश त्यांत सांपडत नाही. चिपळूणकरांचा इंग्रजी वाङ्‌मयाचा व्यासंग फक्त निबंध आणि इतिहास यांच्यापुरताच मर्यादित होता, असें या निबंधावरून निस्संशय म्हणतां येईल. किंबहुना, मालेच्या आठव्या अंकांत इंग्रज इतिहासकारांच्या दुर्मतध्वंसनाचें जें कार्य अपुरें राहून गेलेलें होतें, तें उरकून घेण्याच्या उद्देशानेच, जणुं कांही, त्यांनी मुद्दाम हा निबंध लिहिलेला असावा. कारण, ब्रिटिश इतिहासकारांनी आपल्या ग्रंथांतून पौरस्त्य राष्ट्रांविषयीं जीं पूर्वग्रहदूषित विधानें केलेलीं आहेत, त्यांच्या आवेशपूर्ण खंडनानेच या निबंधाचा अर्धा अधिक भाग व्यापलेला दृष्टीस पडतो. त्यामुळे 'इतिहास' या निबंधापेक्षा किती तरी अधिक खळबळ या निबंधानें उडवून दिली. इंग्रज इतिहासकारांच्या भारताकडे पहाण्याच्या विकृत दृष्टिकोनाचें अत्यंत मर्मभेदक आविष्करण मालेच्या तिसाव्या अंकांत केलेलें होतें. हा अंक बाहेर पडतांच, मेजर जेकब यांनी, 'एलिफास' या टोपण नांवाने, 'देशी वृत्तपत्रें व कारस्थानी ब्राह्मण' या शीर्षकाखाली, 'बॉंबे गॅझेट' मध्ये ता. २९ सप्टेंबर १८७६ रोजीं एक पत्र लिहून, त्यांतील चार उताऱ्यांच्या भाषांतराचा नजराणा, नवीन पदवीधरांच्या राजनिष्ठेचा नमुना म्हणून, खुद्द राज्यपालांच्या हुजुरास सादर केला. साहेबबहादुर एवढेंच करून थांबले नाहीत. त्यांच्या काकदृष्टीला 'माले'च्या या अंकांत जसा राजद्रोह दिसला, तसेंच त्याच्या मागे पुणेरी ब्राह्मणांचें कारस्थानहि पण दिसलें. या कारस्थानाची परंपरा त्यांनी आपल्या पत्रांत अशी लाविली की, 'निबंधमाले'चा संपादक ब्राह्मण, ज्या शाळेंत तो शिक्षक आहे तिचा मुख्याध्यापक ब्राह्मण, ज्या मराठी भाषेंत 'माला' निघते तिच्यांतील वृत्तपत्रांचें

प्रतिवृत्त सरकारपर्यंत पोंचविणारा अधिकारी ब्राह्मण व ज्या पुणें शहरांत हा संपादक राहतो तें पुणें शहरहि ब्राह्मणांचें इतिहासप्रसिद्ध आगर! अशा स्थितींत या ब्राह्मण शिक्षकाच्या राजद्रोहाची दाद सरकारला लागावी कशी? ही परंपरा लावण्यांत मेजरसाहेबांचा उद्देश, चिपळूणकरांबरोबरच त्यांचे वरिष्ठ, पूना हायस्कूलचे मुख्याध्यापक, महादेव मोरेश्वर कुंटे, त्यांचे वडील, रिपोर्टर ऑन दी नेटिव्ह प्रेस, कृष्णशास्त्री चिपळूणकर व पुण्यांतील एकंदर ब्राह्मणवर्ग या सर्वांनाच पर्यायाने राजद्रोही ठरवून, 'सार्वजनिक सभे'ची चळवळ दडपून टाकण्याचा सल्ला सरकारला देण्याचा होता. त्यामुळे 'मालें'त केलेला मल्हारराावमहाराजांच्या पदच्युतीचा निषेध व तुर्कांच्या पराक्रमाचा गौरव यांचा बादरायण संबंध ते 'सार्वजनिक सभे'शीं जोडावयालाहि चुकले नाहीत. शेवटीं त्यांनी सरकारला असा स्पष्ट इषारा दिला की, ब्राह्मण हा जन्मतःच कारस्थानी असून, युरोपांतील कोणत्याहि गुप्त कटांच्या जाळ्यांपेक्षा ब्राह्मणांची संघटना अधिक दृढतर आहे आणि तेच देशांतील सर्व अस्वस्थतेच्या मुळाशीं आहेत! अशा रीतीने 'बॉम्बे गॅझेट'मधून 'निबंधमाले'वर आग पाखडूनच न थांबतां मेजरमहाशयांनी तिच्या सबंध तिसाव्या अंकाचें इंग्रजी भाषांतरहि सरकारला सुपूर्त केलें. त्याबरोबर शिक्षणखात्यापासून तों सचिवालयापर्यंत सारी नोकरशाही आमूलाग्र हादरून गेली! चिपळूणकरांचे विद्यालयीन गुरु रा. ब. शंकर पांडुरंग पंडित हे या सुमारास मुंबई सरकारचे चीफ सेक्रेटरी गॉन साहेब यांच्याकडे स्वतःचे कांही हक्क मारल्याबद्दल दाद मागण्यासाठी गेले असतां, साहेबांनी रागाने तणतणतच त्यांच्याजवळ असे उद्गार काढले की, "पुण्यांतील कोणी ब्राह्मण ग्रॅज्युएट कांही वर्तमानपत्र काढतो, व त्यांत इंग्लिश लोकांविषयीं कांही वाईटसाईट मजकूर छापितो; तुम्हां ब्राह्मण लोकांना विद्या देऊन सरकारनीं ज्या मोठमोठ्या हुद्याच्या जागा दिल्या, म्हणजे त्याचें हें फळ!" साहेबांचा तो घुस्सा पाहून रावबहादुर चपापले. पण, त्यांना कांही उत्तर न देतां, त्यांनी या प्रसंगाचा उल्लेख करून, 'माले'चा तिसावा अंक आपल्याकडे पाठवून देण्याविषयी चिपळूणकरांना पत्र लिहिलें. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची तर 'एलिफास'च्या या शुंडाप्रहाराने फारच अनुकंपनीय अवस्था झाली. त्यांच्यावर सहजच असा

ठपका झाला की, केवळ पुत्रप्रेमामुळे 'मालें'तील आक्षेपार्ह मजकूर सरकारच्या नजरेस आणून देण्याच्या आपल्या कर्तव्याला ते जागले नाहीत. परंतु, शास्त्रीबुवांची पुण्याई अद्याप पुरती निःशेष झालेली नसल्यामुळे, 'एलिफास'ने एवढें थैमान केलें तरीहि, त्यांच्या प्रतिष्ठेला सरकारने ढका लावला नाही. तथापि, शाळाखात्यांत त्यांच्या हातच्या चिठीचपाटीला जो प्रमाणपत्राचा मान पूर्वी मिळत असे, तो मात्र या प्रकरणामुळे मिळेनासा झाला. चिपळूणकरांचे कनिष्ठ बंधु लक्ष्मणराव हे यानंतर कांही दिवसांनी, आपल्या वडिलांची चिठी घेऊन, चाटफील्डसाहेबांकडे नोकरी मागावयाला गेले असतां, डायरेक्टरसाहेब रागानें बिचाऱ्या अर्जदाराला म्हणाले की, "तुम्हां लोकांस सरकार विद्या शिकवितें, मोठमोठ्या नोकऱ्या देतें आणि त्याचें उसनें तुम्ही लोक त्याच सरकारची निंदा करण्यासाठी वर्तमानपत्रें लिहून फेडता! अर्जदारांचे अर्जाचे क्रमाने तुमचेहि अर्जाचा विचार होईल!" 'एलिफास'च्या या खोडसाळ पत्राला स्वतः चिपळूणकरांनी ता. ९ ऑक्टोबर १८७६ रोजीं 'ज्ञानप्रकाशां'तून इंग्रजीमध्ये छोटेसेंच पण समर्पक उत्तर दिलें; व 'माले'च्या तिसऱ्या वर्षाच्या उपसंहारांतहि त्याचा थोडासा समाचार घेतला. शिवाय, त्यांचे सहाध्यायी रा. ब. महाजनि यांनी, 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्राच्या ता. १७ आक्टोबर १८७६ च्या अंकांत 'ब्राह्मण' या सहीने पत्र लिहून, 'एलिफास'ने 'माला'कार आणि एकंदर ब्राह्मणवर्ग यांच्यावर केलेल्या आरोपांचें मार्मिक खंडन केलें. परंतु 'एलिफास'ची ही सारी कारवाई कांही अगदीच फुकट गेली नाही. कारण, १८७७ सालच्या डिसेंबरांत चाटफील्डसाहेबांनी, रत्नागिरीसारख्या गैरसोईच्या ठिकाणीं चिपळूणकरांची बदली करून, त्यांना अप्रत्यक्ष रीतीने एक प्रकारची सौम्य शिक्षा केली.

पण 'एलिफास'च्या पत्राने उत्पन्न केलेल्या या वादळाचा चिपळूणकरांच्या मनोवृत्तीवर यत्किंचितहि परिणाम झाला नाही. किंबहुना, यदा कदाचित् कांही झालाच असला, तर तो एवढाच की, सरकारी नोकरीबद्दल स्वभावतःच पराङ्मुख असलेलें त्यांचें विरागी मन या प्रकारामुळे तिच्याविषयी अजिबात विटून जाऊन, तें बंधन शक्य तितक्या लवकर तोडून टाकण्याचा विचार त्यांच्या मनांत उद्भूत झाला असावा. हिंवाळ्यांत जें बर्फ पडलें असतां

मोठाले वृक्षसुद्धा अगदी झडून वठून जातात, त्याने आच्छादिलेल्या पर्वताच्या शिखरांना मात्र उलट एक प्रकारची गंभीर शोभा येते. चिपळूणकरांच्या मनाची सुद्धा या प्रसंगीं अशीच अवस्था झाली. शिवाय, या साऱ्या वादळांत त्यांना स्वतःला अनपेक्षित वाटावें, असें खरोखरी कांहीच नव्हतें. राजद्रोहाचा आरोप हा मुळी 'निबंधमाले'च्या पांचवीलाच पुजलेला होता. 'ज्ञानोदय,' 'सत्यदीपिका' वगैरे जीं पत्र मिशनरींनी किंवा बाबा पदमनजींसारख्या त्यांच्या बगलबच्चांनी चालविलेली होती, त्यांनी 'माले'चा जन्म झाल्या दिवसापासूनच मुळीं या आरोपाचें शस्त्र तिच्यावर उचललेलें होतें. हा आरोप करण्यांत त्यांचा हेतु उघडच असा होता की, आपल्या या हांकाटीमुळे बिथरून जाऊन सरकारने 'माले'ची इतिश्री करावी. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी काढलेली 'विचारलहरी' त्यांनी पूर्वी याच उपायांनी दडपून टाकलेली होती. परंतु, जन्मतांक्षणींच सूर्यबिंबावर झेंप घालणाऱ्या मारुतीचा अपराध जसा देवांनी त्याच्या पित्याकडे पाहून पोटांत घातला, तशी सरकारने, शास्त्रीबुवांचा ऋणानुबंध लक्षांत घेऊन, 'निबंधमालें'त आरंभापासूनच आविर्भूत झालेल्या देशाभिमानाची कांहीं काळ तरी गय केली. तेव्हा, चिपळूणकरांना आपण कोणत्या परिस्थितीत वावरत आहोंत, याची पूर्ण जाणीव होती, यांत शंकाच नाही. किंबहुना, विचारस्वातंत्र्याचें धोरण त्यांनी जाणूनबुजून अंगीकारिलेलें असल्यामुळेच, तत्कालीन इतर ग्रंथकारांप्रमाणे, सरकारचा आश्रय आपल्या 'माले'ला मिळावा, असा विचार चुकूनहि कधी त्यांच्या मनाला शिवला नाही; व 'माला' सुरू झाल्यापासून तीन वर्षांच्या आंतच ते निर्वाहाची स्वतंत्र साधनें निर्माण करण्याच्या उद्योगाला लागले. अशा स्थितींत 'एलिफास'च्या पत्राचा त्यांच्या मनावर किंवा 'माले'च्या स्वरूपावर काय परिणाम होणार? तथापि, या प्रसंगामुळे त्रस्त झालेल्या आपल्या वडिलांच्या मनाला अधिक ताप होऊं नये म्हणूनच बहुधा, त्यांनी जॉन्सनच्या चरित्रासारखा सोज्वळ विषय या वर्षी निबंधासाठी निवडला. 'एलिफास'च्या टीकेचें वादळ सभोंवती घोंघावत असतां त्यांनी हा निबंध लिहिलेला असल्यामुळे, त्यांच्या मनांत त्या वेळीं घोळत असलेल्या विचारांचें त्यांत उत्कृष्ट प्रतिबिंब पडलेलें आहे. यानंतर त्यांनी लिहिलेला मोरोपंतांच्या कवितेवरील निबंध मात्र या निबंधाइतका

सरस नाही. १८७८ सालीं मुद्रणनियंत्रणाचा कायदा बंधक झाल्यामुळें त्यांनीं, पूर्वी योजून ठेविलेले इतर विषय मुद्दाम बाजूला सारून, हा निव्वळ वाङ्मयचर्चेचा विषय हातीं घेतला. 'मालें'तील विचारस्वातंत्र्याची तडफ कमी झाल्याबद्दल तक्रार करणाऱ्या एका चहात्याच्या पत्राला ता. ५ एप्रिल १८७५ रोजीं घातलेल्या उत्तरांत त्यांनी असे उद्‌गार काढलेले आढळतात कीं, "माझ्या लेखणींतील जोम आणि जिव्हाळा मला स्वतःला जरी कमी झाल्यासारखा वाटत नसला, तरी १८७८ सालच्या नव्या तिरस्करणीय कायद्याने माझ्या मनांत फार दिवस घोळत असलेल्या विषयांवर मला पाणी सोडावयाला लावलें, यांत शंका नाहीं." अर्थात् मनाच्या एक प्रकारच्या नाउमेदीच्या अवस्थेंत त्यांनी हा निबंध लिहिलेला असल्यामुळे, त्यांच्या प्रतिभेचे आत्मीय गुण त्यांत अगदीं कमी प्रमाणांत प्रकट झालेले आढळतात. रा. ब. दादोबा पांडुरंग यांचा केकावलीवरील टीकाग्रंथ वाचून, त्यांना वयाच्या पंधराव्या वर्षीच, मोरोपंताच्या कवितेची गोडी लागलेली होती. परंतु, मयूर कवीच्या वाणीवर त्यांची भक्ति जरी निरतिशय होती, तरी तिचा व्यासंग मात्र त्यांनी, परशुरामपंत तात्या गोडबोले, शंकर पांडुरंग पंडित किंवा वामन दाजी ओक यांच्याप्रमाणे, पूर्णतया केलेला होता, असें वाटत नाही. 'यशोदा-पांडुरंगी'च्या रसाळ प्रस्तावनेंत दादोबांनी मोरोपंताच्या कवितेविषयी जें मार्मिक विवेचन केलेलें होतें, त्यांतील मुद्यांचाच प्रपंच त्यांनी आपल्या या निबंधातून विस्तारपूर्वक केलेला दिसून येतो.

परंतु, चिपळूणकरांचा हा निबंध कितीहि सदोष असला, तरी त्याने तत्कालीन सुशिक्षितांच्या जुन्या मराठी कवितेकडे पाहण्याच्या दृष्टींत क्रांति घडवून आणली, यांत मात्र संशय नाही. एक तर, प्राचीन मराठी कवितेचें आणि तिच्या एका धुरीणाच्या, समाजांतील विशिष्ट वर्गाच्या उपहासाचा विषय होऊन बसलेल्या, अभियुक्त कृतींचें यथार्थ स्वरूप विशद करणारा अशा तऱ्हेचा वक्तृत्वपूर्ण निबंध पूर्वी कोणीहि लिहिलेला नव्हता; व दुसरें असें की, या निबंधाच्या रूपाने त्यांनी सुरू केलेल्या मराठी कवितेविषयीच्या चर्चेत गणेशशास्त्री लेले, बापूसाहेब कुरुंदवाडकर, जनार्दन बाळाजी मोडक, वामन दाजी ओक, काशिनाथ

पांडुरंग परब, केशवराव कानेटकर यांच्यासारख्या मार्मिक रसज्ञांनी भाग घेतल्यामुळे, जरी त्यांच्या विवेचनांतील कांही वैगुण्यें उघडकीला आलीं, तरी सतत अडीच वर्षें चाललेल्या या साहित्यसत्रामुळे जुन्या मराठी कवितेकडे लोकांचें चित्त जोराने वेधलें गेलें; व अॅडिसनच्या लेखमालेने जसें मिल्टनच्या कविकीर्तीवरील विस्मरणाचें पटल बाजूला सारून तिचें रमणीय स्वरूप व्यक्त केलें, त्याप्रमाणे चिपळूणकरांच्या या पंतावरील प्रचंड निबंधाने मराठी कवितेची थोरवी लोकांच्या निदर्शनाला आणून दिली. त्यांच्या या निबंधांतलें विवेचन जरी एकांगी आणि सदोष असलें, तरी त्याने घडवून आणलेलें हें मतपरिवर्तन इतकें महत्त्वाचें आहे की, त्यांच्या क्रांतिकारक लेखणीच्या प्रभावाचें तो एक उत्कृष्ट स्मारक समजला जाईल.

## २५

चिपळूणकरांची बदली करितांना चाटफील्डसाहेबांची अपेक्षा बहुधा अशी असावी की, रत्नागिरीसारख्या दूरच्या शांत ठिकाणीं गेल्यामुळें त्यांच्या मनोरचनेंत सरकारी नोकरीला अनुकूल असा फरक घडून येईल. परंतु, तसें कांही न होतां, उलट तिथे गेल्यावर भरपूर एकांत लाभून, त्यांना आपल्या भावी धोरणाचें स्वरूप निश्चित करितां आलें. १८७३ सालीं त्यांनी ज्या वेळीं शिक्षणखात्यांत, चाटफील्डसाहेबांच्या कृपेने, प्रवेश केला, त्या वेळी तें खातें मराठी साहित्याचें आश्रयदातें समजलें जात असे. किंबहुना साहित्यनिर्मिति आणि साहित्योत्तेजन हीं दोन्ही त्या खात्याचीं कर्तव्यें गणलीं जात असत. त्यामुळे, सदाशिव काशीनाथ छत्रे यांच्या पासून तों कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यापर्यंत प्रारंभींच्या बहुतेक लेखकांना आपली नोकरी सांभाळून, उजळ माथ्याने आणि मोकळ्या मनाने, साहित्याची सेवा करितां आली; व शिक्षणखात्यानेहि, आपल्या आश्रयदात्याच्या भूमिकेला शोभेल अशा रीतीने, त्यांच्या त्या सेवेचें चीज केलें. 'नियुक्त मेषपातृत्वाखेरीज' दुसरें कांही शिक्षकाने करितां कामा नये,

ही शिस्त अद्याप त्या खात्याला लागलेली नव्हती. त्यामुळे चिपळूणकरांनी विश्वस्त बुद्धीने त्या खात्यांतली नोकरी पत्करली. पण त्यानंतर चार वर्षांच्या आंतच शिक्षणखात्याचा दृष्टिकोन इतका कांहीं बदलून गेला कीं, १८७३ सालीं ज्या चिपळूणकरांनी 'निबंधमाला' आपल्या नांवावर निःशंक मनाने सुरू केली, त्यांना आता 'काव्येतिहाससंग्रह' काढतांना त्यावर आपलें नांव घालणें कांही सोईचें वाटलें नाही ! या परिवर्तनाबद्दल, अर्थातच, त्यांची स्वतःची प्रभावशाली प्रखर लेखणीच मुख्यतः जबाबदार होती. त्यांच्यासमोर त्या वेळीं दादोबा पांडुरंग आणि रावसाहेब मंडलिक यांनी सरकारी नोकरींतील गांजणुकीला कंटाळून राजीनामा दिल्याचीं दोन ठळक उदाहरणें जशीं होतीं, तसेंच समाजसुधारणेच्या कार्यासाठी स्वेच्छेने नोकरी सोडून मतप्रसाराच्या तळमळीनें वृत्तपत्रव्यवसायाकडे वळल्याचें विष्णुशास्त्री पंडित यांचेंहि उज्ज्वल उदाहरण होतें. उलट, सरकारचा अविश्वास आणि इतराजी हीं दोन्ही पत्करून नोकरीला निष्ठेने चिकटून राहिल्याचा व तिचीं सर्व बंधनें दक्षतेने सांभाळून देशसेवा अविश्रांत करित असल्याचा न्या. रानडे यांचाहि आदर्श खुद्द पुण्यांतच त्यांच्या डोळ्यांपुढे अहर्निश होता. रावसाहेब मंडलिक यांनी ता. २२ जुलै १८६१ रोजीं कृष्णाजीपंत नूलकर यांना पाठविलेल्या पत्रांत असे उद्गार काढलेले होते की, "आधींच खालावलेला कारकुनांचा धंदा दिवसानुदिवस अधिकाधिक खालावत आहे ... मला समाजांतून उठून गेल्याप्रमाणें वाटतें. उन्नतीचें नांव नाहीं. आमच्या आयुष्याचा दुसरा उपयोग होत नाहीं. .. माझ्या आयुष्यांतील उत्तम भाग अगदी शुष्क रीतीने गेल्याबद्दल माझा मलाच तिरस्कार वाटूं लागतो." १८६३ सालच्या जानेवारींत वकिलीच्या परीक्षेसाठी रावसाहेबांनी जेव्हा रजेचा अर्ज केला, तेव्हा मुंबई सरकारचे त्या वेळचे चीफ सेक्रेटरी रॉबर्टसन यांनी त्यांना भेटीला बोलावून खडसावलें, "तुम्हांला मी रजा देणार नाही. सरकारी नोकरी म्हणजे आपली इतर कामें करण्याची सोय झाली असें तुम्ही समजतां !" अर्थात् त्या मानी पुरुषाने लगोलग राजीनामा दिला. खुद्द चिपळूणकरांनीहि 'माले'च्या पांचव्या वर्षीच्या समारोपांत असे उद्गार काढलेले होते की, "गेल्या सहा वर्षांच्या अनुभवावरून आम्हांस एका तत्त्वाचा पक्का बोध झाला आहे की,

लोकोपयोगार्थ ज्यास ग्रंथरचना करणें असेल, किंबहुना लोककल्याणाविषयी केवळ वाग्डंबर मिरवायाचें नसून, हातून जर कांही कृति करायाची असेल, तर त्यास मुख्य गोष्ट स्वतंत्रता ही पाहिजे. पारतंत्र्याच्या व्यवसायांत ऐन उमेदीचें वय व दर एक दिवसांतील बहुतेक भाग घालवून बाकी राहिलेलें वय व काल ज्ञानसंपादनाकडे किंवा लोकहितार्थ उद्योग करण्याकडे लावून कितीसा उपयोग होणार? शिवाय, स्वातंत्र्य हें आपले विचार निर्धास्तपणें प्रगट करण्यास व हवें तें काम हातीं घेण्यासहि, अत्यंत आवश्यक होय. या स्वातंत्र्याची आलीकडील बादशाही अंमलांत तर किती जरूरी आहे, हें बहुधा कोणासहि सांगावयास नको." राजीनामा दिल्यानंतर काढलेल्या या त्यांच्या उद्गारांवरून, बदलीचा हुकूम हातीं पडल्याबरोबर चिपळूणकरांच्या विचारांना कोणती दिशा लागली असेल, याची सहज कल्पना करितां येते. हा हुकूम हातीं येण्यापूर्वींच त्यांनी आपले तरुण इतिहासप्रेमी चहाते शंकर तुकाराम शाळिग्राम त्यांच्या मदतीने दोन नवीन उपक्रम केलेले होते. १८७७ सालच्या मे महिन्यांत, त्यांचे विद्यालयबंधु जनार्दन बाळाजी मोडक आणि काशीनाथ नारायण साने हे त्यांना भेटावयाला आले असतां, 'काव्येतिहाससंग्रह' काढण्याची कल्पना निघाली; व त्यांतील बखरींचा भाग साने, मराठी कवितांचा मोडक आणि संस्कृत ग्रंथांचा चिपळूणकर यांनी संपादन करावा असें ठरून, शाळिग्राम यांच्यावर ऐतिहासिक वाङ्मयाचें संशोधन करण्याचें काम सोपविण्यांत आलें. या योजनेनुसार, १८७८ सालच्या जानेवारींत, म्हणजे चिपळूणकर रत्नागिरीला आपल्या कामावर रुजू झाले त्या महिन्यांत, 'संग्रहा'चा पहिला अंक निघाला. या नव्या मासिकावर, शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांचा 'माले'वरील रोष लक्षांत घेऊन, चिपळूणकरांनी आपलें नांव घातलेलें नव्हतें. 'काव्येतिहाससंग्रहा'च्या बरोबरच 'चित्रशाळा' स्थापन झाली. शाळिग्रामांचे एक स्नेही, फोटोझिंको हपिसांतील ड्राफ्ट्समन, बाळकृष्ण वासुदेव जोशी हे चित्रकलेंत निपुण होते. चिपळूणकर हे त्या कलेचे भोक्ते असल्यामुळे, शाळिग्राम यांच्या मध्यस्थीने, त्यांचा जोशी यांच्याशीं परिचय होऊन, त्यांच्या प्रेरणेने बाळकृष्णपंतांनी ऐतिहासिक पुरुषांचीं चित्रें काढावयाला सुरवात केली. या त्यांच्या नव्या उपक्रमांतूनच,

चिपळूणकरांनीं अवश्य तें आर्थिक साहाय्य दिल्यामुळे, ‘ चित्रशाळे ’ची स्थापना झाली. ‘काव्येतिहाससंग्रहा ’च्या तिसऱ्या अंकांत नाना फडणिसांची तसबीर प्रसिद्ध होतांच साऱ्या महाराष्ट्राचें लक्ष चिपळूणकरांच्या या नवीन उद्योगाकडे वेधलें. ‘ चित्रशाळे ’च्या नंतर एक वर्षानें किताबखाना निघाला. १८७९ सालच्या मे महिन्यांत बुधवार वाड्याला लागलेल्या आगींत सरकारी बुकडेपोची आहुति पडली. या संधीचा फायदा घेऊन आपण पुस्तकांचें नमुनेदार दुकान काढावें, अशी कल्पना चिपळूणकरांच्या मनांत आली. छापखाना आणि त्याच्या अनुषंगानें पुस्तकांचें दुकान असा जोडधंदा चालविण्यांत गोंधळेकर, गोडबोले प्रभृतींनीं मिळविलेलें यश पाहून त्यांना पुष्कळदा असें वाटत असे की, हा धंदा जर नवीन सुशिक्षितांनी हातांत घेतला, तर सरकारच्या तोंडाकडे पाहावें न लागतां, त्यांना नेकीनें उपजीविका करितां येईल. शिवाय, त्यांच्या वडिलांचीं आणि त्यांचीं स्वतःचींहि अनेक पुस्तकें विक्रीसाठीं हाताशीं होतीं; व स्वतःची खासगी शाळा काढण्याचा त्यांचा विचार या वेळीं निश्चित झालेला असल्यामुळे, अशा तऱ्हेचें दुकान काढलें असतां, त्याला गिऱ्हाइकाची वाण पडणार नाही, असेंहि त्यांना वाटलें. म्हणून शाळिग्राम यांच्या सहकारितेनें त्यांनी जुलै महिन्यांत किताबखाना उघडला. अशा रीतीनें ही नवी उद्योगपरंपरा सुरू होऊन ते निर्वाहाच्या बाबतींत अंशतः तरी निश्चित झाले.

परंतु, स्वतःच्या पायांवर उभें राहण्याचा चिपळूणकरांचा प्रयत्न जरी अशा रीतीनें यशस्वी होत चाललेला होता, तरी त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे जर हयात असते, तर त्यांना नोकरी सोडण्याचा हिय्या झाला असता की नाही, हें सांगणें कठीण आहे. त्यांनी नोकरी धरिली, ती अंशतः शास्त्रीबुवांच्या प्रेरणेनें; व तिचा उपद्रव मनाला होत असतांनाहि ते जे तिला चिकटून राहिले, तेंहि वडिलांचें मन नाराज करूं नये म्हणून. त्यांनी जर प्रथमपासूनच वकिलीसारखा स्वतंत्र व्यवसाय केला असता, तर शास्त्रीबुवांना ती गोष्ट सर्वथैव इष्ट अशीच वाटली असती. परंतु, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या एक प्रकारच्या कृपेनें मिळालेली नोकरी मुद्दाम सोडून देऊन, त्यांच्या इतराजीचा प्रसंग आपल्यावर ओढवून घेण्याचें धोरण शास्त्रीबुवांना

पसंत पडणें शक्य नव्हतें. पण, १८७८ सालच्या मे महिन्यांत त्यांना एकाएकी देवाज्ञा झाल्यामुळे, स्वतःच्या मनाप्रमाणे वागावयाला चिपळूणकर मोकळे झाले. शास्त्रीबुवांसारख्या भाग्यशाली पुरुषाच्या मायेचें छत्र शिरावर असल्यामुळे संसारांतील कोणत्याहि संकटाची झळ अशी आजपर्यंत त्यांना कधी लागलेली नव्हती. पण, आता कुटुंबाची जबाबदारी सारीच त्यांच्या अंगावर अचानक येऊन पडली; व 'दुःखं दुःखानुबंधी' या न्यायाने वडिलांच्या मृत्यूनंतर तशाच स्वरूपाचीं आणखी दोन दुःखें त्यांच्यावर कोसळून त्यांचें मन अत्यंत व्यथित आणि व्यग्र झालें. पितृनिधनानंतर तीन महिन्यांनी ता. २६ सप्टेंबर १८७८ रोजीं आपले धाकटे बंधु लक्ष्मणराव यांना घातलेल्या पत्रांत त्यांनी असे सूचक उद्‌गार काढलेले होते की, "संसारसागरांतील वादळांत आता आपण अगदी पुरते सांपडलों आहोंत. पण, त्यामुळे नाउमेद न होतां, खंबीर नावाड्यांप्रमाणे, आपण आपत्तींशीं झुंजावयाला सज्ज झालें पाहिजे." आणि खरोखरीच, घरगुती भांडणांनी मन गांजलेलें असतांनाहि, अवघ्या सहा महिन्यांच्या आंत सारी निरवानिरव करून, त्यांनी नोकरी सोडण्याचा आपला निर्धार अंमलांत आणला. परंतु या आपल्या निश्चयाची परिस्फुटता मात्र त्यांनी मुळीच होऊं दिली नाही. त्यांची कोणतीहि योजना नेहमीच फलानुमेय असे. १८७९ सालच्या जानेवारींतच बहुधा, सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन, स्वतःची शाळा स्थापन करण्याचा त्यांचा बेत नक्की झाला असावा. कारण, न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांनी, उन्हाळ्याच्या सुटीच्या प्रारंभीं, जें भाषण नंतर केलें, त्यांत, शाळा काढण्याची योजना आपण पंधरा महिन्यांपूर्वी स्वतःच्या मनाशीं निश्चित करून टाकलेली होती, असा स्पष्ट उल्लेख त्यांनी केल्याचें आढळतें. परंतु, आपलें हें हृद्‌गत पत्नीशिवाय अन्य कोणाजवळहि बोलून न दाखवितां, १८७९ सालच्या मे मध्ये ते रत्नागिरीहून, सहा महिन्यांची अर्धपगारी रजा घेऊन, पुण्यास परत आले. या सुटीच्या काळांत त्यांनी किताबखाना उघडला आणि चित्रशाळेची पुनर्घटना केली. सप्टेंबर महिन्याच्या शेवटीं त्यांनी रत्नागिरी हायस्कूलचे मुख्याध्यापक नारायण विनायक साठे यांच्याकडे आपला राजीनामा पाठवून दिला. तो वाचून साठे यांना आचंबा वाटला; व त्यांनी

चिपळूणकरांना असें पत्र घातलें की, "तुम्ही राजीनामा पाठविला आहे, तो डायरेक्टरसाहेबांकडे तसाच पाठवून देऊं काय? परंतु, कदाचित् जर तुमचा विचार फिरेल व त्याबद्दल तुम्ही मला कळवाल, तर राजीनामा मी पुढे पाठवीत नाही." पण, चिपळूणकरांनी त्यांना लगेच असें उत्तर पाठविलें की, "राजीनाम्याविषयीचा माझा फार दिवसांचा व पक्का निश्चय झालेला आहे. तो आता मी फिरवूं इच्छित नाही. तुम्ही राजीनामा कृपा करून मंजुरीकरिता पुढे पाठवून द्यावा." साठे यांच्याप्रमाणेच चिपळूणकरांच्या इतरहि आप्तेष्टांना त्यांचें हें कृत्य आवडलें नाही; व रत्नागिरी हायस्कुलांतील त्यांचे सहकारी शिक्षक गांगल यांनी त्यांना पत्र पाठवून या साहसापासून परावृत्त होण्याचा सल्लाहि दिला. त्यांच्या या पत्राला पाठविलेल्या उत्तरांत चिपळूणकरांनी आपलें मनोगत आणि भावी कार्याची रूपरेषाहि स्पष्ट शब्दांनी व्यक्त केलेली होती. ते म्हणतात—

"No wonder that my throwing up my place has called forth many a remark both here and there. In these days of helplessness and sub-serviency, Government service is looked upon in something of a heavenly light, and one deliberately giving it up must consequently be looked upon as little short of a mad man or a suicide.

But for my own part I have always thought very differently of the matter. Rather than bend the knee to tyranny, I would snap asunder the chain once and for ever. I have told you once and often on what terms I stood while here with Mr. Kunte, and I resolved to throw up my place when I received the order for Ratnagiri. But various circumstances compelled me then to leave my native place and home. But even then I cherished the hope that I would achieve my liberty the moment a suitable opportunity occurred.

It is then my supreme disgust of the drudgery of a Government school-life that led me to resign my place... I am resolved to try what might be done for public good

with the potent instrumentality of a press establishment worked by a vigorious hand.

I have said, I believe, enough to assure you that it was in no momentary freak that I resolved to bear the chain no longer."

गांगल यांनीं चिपळूणकरांना नोकरी न सोडण्याचा सल्ला दिला, हें त्यांच्या दृष्टीने योग्यच झालें. मातेला दास्यमुक्त करण्यासाठी अमृतकुंभ आणण्याच्या ईर्ष्येने गरुडाने जेव्हा देवलोकीं जावयाला भरारी मारली, तेव्हा स्वतःला केवळ पंख आहेत एवढ्याच एका कारणामुळे त्याच्याशीं आपलें सादृश्य कल्पिणाऱ्या इतर पक्ष्यांना त्याचें तें साहस जर अनुचित वाटलें असलें, तर त्यांत काय आश्चर्य ?

चिपळूणकर स्वतंत्र शाळा काढणार असल्याची बातमी बाहेर फुटतांच पुण्यांतील तत्कालीन खाजगी शिक्षणसंस्थांच्या चालकांनी साहजिकच त्यांचें सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांना असें वाटलें की, चिपळूणकरां-सारख्या लोकोत्तर पुरुषाची जोड जर आपल्या शाळेला लाभली, तर विद्यार्थिवर्गाचा ओघ तिच्याकडे आकर्षित होईल. म्हणून 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिटच्यूशन'चे चालक वामन प्रभाकर भावे यांनी आपल्या शाळेला येऊन मिळण्याची विनंती चिपळूणकरांना केली. पण, त्यांची शाळा स्वतंत्र असली, तरी ती सरकारच्या मान्यतेचें मोर्तब तिच्यावर झालेलें नव्हतें, एवढ्याच एका अर्थानें. एरवीं तिच्यांत आणि सरकारी शाळांत कोणत्याच प्रकारचा फरक नव्हता. किंबहुना, भावे यांची शाळा चालविण्याची दृष्टि इतकी धंदेवाईक होती की, अन्नछत्राचा आश्रय न मिळालेल्या भिक्षुकाने चार घरें माधुकरी मागून मध्यान्ह साजरी करावी, त्याप्रमाणे बडे बडे अधिकारी आणि मिशनरी यांचा आपल्या शाळेंत सन्मान करून, त्यांच्याकडून संपादिलेल्या प्रशस्तिपत्रांनी ते डायरेक्टरसाहेबांच्या शेऱ्याची उणीव भरून काढीत असत. चिपळूणकरांना तर असल्या लांगूलचालनाचें अगदी वावडें होतें. शिवाय, ते स्वतंत्र शाळा काढावयाला उद्युक्त झाले, ते कांही निव्वळ निर्वाहाचें साधन म्हणून नव्हे; तर, शाळाखात्याच्या शिस्तींत जखडलेल्या निस्सत्त्व शिक्षणपद्धतींत स्वत्वाचा जिव्हाळा ओतून,

तिला थोडें तरी नवीन वळण लावावें, या उद्देशानें. 'शालापत्रका'च्या १८७२ सालच्या जानेवारीच्या अंकांतील 'शिक्षकाचें काम' या आपल्या लेखांत सरकारी शिक्षणपद्धतीविषयी त्यांनी असे उद्‌गार काढलेले होते की,–

"हल्लीं विद्येचा फार फैलाव झाला व अभिरुची वाढली, असें वाटतें. पण ती भ्रांति आहे. केवळ सरकारी चाकरीच्या लोभानेंच आमचे लोक विद्या शिकतात. त्यांना विद्येचें व्यसनच काय, पण साधारण आवडही नसते.....स्वत: शिक्षकालाच आपल्या कामाची थोरवी वाटत नाहीं. मग ती इतरांना कशी वाटावी? उपाय नाहीं म्हणून शिक्षकाचें काम करावयाचें ही जी त्यांची समजूत तीच लोकांची ... शिकविण्याचे विषयही बांधलेले. धर्म, नीति वगैरेचें वारेंदेखील शिक्षणाला लागूं नये, अशी सरकारची व्यवस्था. पण, ही स्थिति बदलून शिक्षण चालू असतां शिक्षक जर विद्यार्थ्यांच्या मनांत विद्येची खरी थोरवी भरवून देऊन, तिच्या अभ्यासानें होणाऱ्या अनिर्वाच्य सुखाची त्यांना चट लावून देऊन उत्साह उत्पन्न करतील, तर शिक्षण हें ठिसूळ न बनतां तलवारीच्या पोलादासारखें कठीण व लखलखीत होऊन फार दिवस बिऱ्हाड करून ज्या अरिष्टरूपी राक्षसांनीं या देशास जेरीस आणलें त्यांचें निर्दाळण करील."

वयाच्या बाविसाव्या वर्षीं चिपळूणकरांच्या मनांत उद्‌भूत झालेले हे प्रभावी विचारच पुढे आठ वर्षांनी न्यू इंग्लिश स्कूलच्या उत्पत्तीला प्रेरक झाले, असें म्हणावयाला कोणता प्रत्यवाय आहे? किंबहुना, पहिल्या वर्षाच्या उन्हाळ्याच्या सुटीच्या प्रारंभीं त्यांनी न्यू स्कूलच्या विद्यार्थ्यांना उद्देशून जें भाषण केलें, त्यांतहि पुन्हा हेच विचार, प्रसंगानुसार थोड्या निराळ्या स्वरूपांत, आविर्भूत झालेले आढळतात. शिक्षणाविषयी ज्याचा दृष्टिकोनच असा अगदी भिन्न होता, त्याला भावे यांच्या शाळेला जाऊन मिळणें कसें शक्य होतें? भावे यांच्यापेक्षा अगदी निराळ्या भावनेने प्रेरित झालेले दक्षिण महाविद्यालयांतील दोन तरुण विद्यार्थी चिपळूणकरांना याच सुमारास मुद्दाम येऊन भेटले. हे तरुण म्हणजे गोपाळ गणेश आगरकर आणि बाळ गंगाधर टिळक. आगरकरांना लिहिण्याची

हौस जन्मजातच असल्यामुळे, मालेंतील जोरकस लेखनशैलीवर लुब्ध होऊन, त्यांनी या पूर्वीच चिपळूणकरांशीं ओळख करून घेतलेली होती. कॉलेजांत आल्यानंतर एक वर्षानें, म्हणजे १८७६ सालच्या अखेर, ते आपला राजकीय विषयावरील एक निबंध घेऊन चिपळूणकरांकडे आलेले होते. हा निबंध चिपळूणकरांना दाखविण्याचें कारण असें की, त्यांचे राजकीय विचार किंबहुना तत्कालीन शिष्टांचा दंभस्फोट करण्याची त्यांची पद्धति आगरकरांना बव्हंशीं पसंत होती. क्रियाशून्य रावबहाद्दुरें आणि खोडसाळ रेव्हरंडें यांच्याविषयी चिपळूणकरांइतकाच तिटकारा त्यांनाहि होता. ते न्या. रानडे यांच्या पंथांतले असल्याचा जो भ्रम अलीकडे बुद्धिपुरस्सर उत्पन्न करण्यांत आलेला आहे, त्याला मुळांत काडी-चाहि आधार नाही. रानडे आणि आगरकर यांच्या मनोवृत्तींत आणि मतांत साम्य थोडें, वैषम्यच एकंदरींत फार होतें. रानडे जितके सश्रद्ध तितकेच आगरकर हे नास्तिक; ते जितके सामप्रिय तितकेच हे युयुत्सु; त्यांचीं राजकीय मतें जितकीं सौम्य तितकींच यांचीं प्रखर आणि त्यांच्या उक्तिकृतींत जितकी धरसोड, तितकेच हे बोलण्याप्रमाणे चालणारे. लोकांना शहाणे करून सोडण्याच्या ईर्ष्येनें विद्यार्थिदशेंत असतांनाच आगरकर प्रेरित झालेले होते. कॉलेजांत टिळकांशीं त्यांचा स्नेह जमून आल्यानंतर, १८७९ सालच्या जुलैमध्ये सरकारी नोकरी न पत्करतां, मिशनरींप्रमाणे स्वार्थत्यागाच्या तत्त्वा-वर खाजगी शिक्षणसंस्था काढून, लोकांत ज्ञानप्रसार करावयाचा, असा संकल्प त्या दोघां तरुणांनी केला; व पुण्यांतील त्या वेळच्या एका प्रसिद्ध पुढाऱ्याला पत्र लिहून त्यांनी असें कळविलें की, " केवळ निर्वाहापुरतें वेतन घेऊन शिक्षणकार्यांत सर्व आयुष्य घालविण्याची आमची इच्छा असून, त्यासाठी अवश्य असलेला निधि उभारण्याची जर शक्यता असेल, तर शिक्षण मोफत द्यावयालाहि आम्ही तयार आहोंत. " हे पुढारी म्हणजे बहुधा न्या. रानडे असावेत. त्यांनी या तरुणांच्या उच्च हेतूंची तारीफ करून, तुम्ही स्वतः प्रत्यक्ष कांही तरी कार्य करून दाखविल्याशिवाय लोक तुम्हाला साहाय्य करणार नाहीत, असा सल्ला त्यांना दिला.

हा सल्ला इतका परस्पर होता की, आगरकर आणि टिळक यांचा निश्चय जर ठिसूळ असता, तर त्यांनी स्वतंत्र शिक्षणसंस्था काढण्याची कल्पना सोडून दिली असती. पण, ज्ञानप्रसाराच्या कार्यांत निस्स्वार्थ जीवन कंठण्याचा त्या ध्येयवादी तरुणांनी पुरा निर्धार केलेला असल्यामुळेच, या मोघम उत्तराने त्यांचा बिलकूल मनोभंग न होतां, त्यांनी नंतर समानशील अशा चिपळूणकरांची गांठ घेतली; व ते काढीत असलेल्या शाळेला मिळण्याचें नक्की ठरविलें. या योजनेबद्दल आपल्या बंधूंना लिहिलेल्या पत्रांत चिपळूणकरांनी असे उद्गार काढलेले होते की,—

"......The memorable 1st of October is fast approaching. And I shall enjoy the pleasure of kicking off my chains that day. Mr. Agarkar (going for M. A.), Mr. Tilak (going for LL. B.), Mr. Bhagwat and Mr. Karandikar (appearing for B. A.) have tendered proposals for joining me in the enterprise. This they have done of their own accord. We have settled 1st of January for the hoisting of the standard. Such a battery must carry the High School instananteously before it."

पण या तोफखान्यांतले तीन गोलंदाज, तोफ प्रत्यक्ष डागली जाण्यापूर्वींच, निरनिराळ्या कारणांमुळे गळाले. करंदीकर आणि भागवत यांना हा देश-सेवेचा मार्ग यशस्वी होण्याची शंका वाटल्यामुळे त्यांनी आधीच आपलें अंग त्यांतून काढून घेतलें; व आगरकरांना एम्. ए. च्या परीक्षेला बसावयाचें असल्यामुळे, त्यांच्यावरहि आयत्या वेळीं मागे राहण्याचा प्रसंग आला. खुद्द टिळकांच्याहि मनाची अवस्था, कदाचित् आपल्या या सहकाऱ्यांच्या वर्तना-मुळेहि असेल, थोडी डळमळीतच होती. म्हणून, ता. १५ डिसेंबर १८७९ रोजीं नव्या शाळेची जी उद्देशपत्रिका चिपळूणकरांनीं प्रसिद्ध केली, तींत कोणाच्याहि नांवाचा निर्देश न करितां, शिक्षण स्वस्त आणि सुलभ करण्याचा आपला उद्देश असल्याची अगदी सौम्य घोषणा केलेली होती. परंतु, त्यांची स्वतःची लोकप्रियता आणि त्यांच्या या नव्या उपक्रमाविषयीची लोकांची उत्सुकता इतकी विलक्षण होती की, हरि नारायण आपटे, नारायण सखाराम पानसे,

वैजनाथ काशिनाथ राजवाडे प्रभृति, पुढे वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांत कीर्ति मिळविलेले, सरकारी हायस्कुलांतील विद्यार्थी, त्यांच्या शाळेंत जाण्यासाठीं, चार महिने आधी बिचाऱ्या हायस्कूलचा निरोप घेऊन, घरीं बसलेले होते. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना, ता. १ जानेवारी १८८० रोजीं, मोरोबादादा फडणीस यांच्या वाड्यांत झाली. त्या प्रसंगीं स्वत: चिपळूणकर, टिळक आणि माधवराव नामजोशी हे तिघे हजर होते; व प्रथम इंग्रजींत थोडेंसें प्रास्ताविक भाषण करून चिपळूणकरांनी शाळेच्या कामाला सुरवात केली. पहिल्या दिवशीं शाळेंत दीडशे विद्यार्थी होते. ही संख्या सहा महिन्यांच्या आंतच पांचशेवर गेली; व सरकारी हायस्कूल हें जरी केवळ राजाश्रय असल्यामुळेच पुढे कांही वर्षें अस्तित्वांत राहिलें, तरी, चिपळूणकरांच्या भाकितानुसार, त्याचा रुबाब मात्र पार धुळीला मिळाला. तो इतका की, पूना हायस्कूलचे त्या वेळचे हंगामी मुख्याध्यापक वामन आबाजी मोडक यांनी आपल्या वार्षिक अहवालांत, हायस्कुलांतील मुलांची संख्या कमी झाल्याबद्दल न्यू स्कूलला जबाबदार धरून, तें काढणाऱ्या 'हुच्च' (vagabond) तरुणांवर आग पाखडली. चिपळूणकरांनी, आपल्या उन्हाळ्याच्या सुटीच्या आरंभीं केलेल्या भाषणांत 'निराश मत्सरग्रस्तांच्या क्षुद्र कारवाया' (The mean devices of disappointed malice) या शब्दांनी केलेली त्यांच्या त्या अप्रशस्त टीकेची संभावना अगदी समर्पक वाटते. वक्तृत्वावरील निबंधांत दयानंदप्रभृतींची कुचाळी केल्याबद्दल चिपळूणकरांचा कान धरावयाला धांवणाऱ्या मोडकांसारख्या प्रार्थनासमाजाच्या पोक्त महर्षींचा, न्यू इंग्लिश स्कूल सारख्या लोकोपयोगी संस्थेविषयी लिहितांना, इतका विवेक सुटावा, याचें कोणाला नवल वाटणार नाही ? एरवी मोठा सात्त्विक भासणारा असाहि मनुष्य, त्याच्या स्वत:च्या हितसंबंधांना ढका लागण्याची पाळी आली असतां, सारें तत्त्वज्ञान कसें गुंडाळून ठेवतो, याचा मोडकांची टीका हा एक इरसाल नमुना आहे. पण त्या खोडसाळ टीकेमुळें न्यू इंग्लिश स्कूलची लोकप्रियता उलट वाढली मात्र. मंडलिक, वर्डस्वर्थ, मिचेल प्रभृति त्या वेळच्या पुढारी, अधिकारी किंवा मिशनरी गृहस्थांनी या नव्या शाळेची मुक्तकंठाने प्रशंसा करून, स्वार्थत्यागाचें उदाहरण घालून दिल्याबद्दल तिच्या चालकांचा गौरव केला. फार कशाला,

ज्या चाटफील्डसाहेबांचा चिपळूणकरांच्या जहाल मतांमुळे त्यांच्यावर इतका राग झालेला होता, त्यांनाहि या त्यांच्या कर्तबगारीचें कौतुक केल्याशिवाय राहवलें नाही.

चिपळूणकरांचा नोकरी सोडल्यानंतर केवळ शाळा चालविण्याचाच विचार होता, असें नाही. आपले सहकारी गांगल यांना पाठविलेल्या पत्रांत त्यांनी असें स्पष्टच म्हटलेलें होतें की, "प्रभावी मुद्रणसंस्था आणि ओजस्वी लेखणी यांच्या जोरावर शक्य तितकें लोकहित करण्याचा माझा विचार आहे." आणि यांत फारसें आश्चर्यहि नाही. किंबहुना, त्यांची अभिरुचि व आतापर्यंतचा आयुष्यक्रम लक्षांत घेतला असतां, त्यांचें चित्त शाळेपेक्षाहि, अज्ञानध्वंसनाच्या कामीं केवळ वज्रच अशा, मुद्रणसंस्थेवर केंद्रित व्हावें, हें अगदी स्वाभाविकच होतें. मालेचे अंक मागसल्याबद्दल तक्रार करणाऱ्या आक्षेपकांना उत्तर देतांना त्यांनी सहाव्या वर्षाच्या समारोपांत स्वत:विषयी असे उद्गार काढलेले होते की, "गेल्या दशकांत कागदाला टांक लागल्याव्यतिरिक्त आमचे फारच थोडे दिवस गेले असतील." ज्याने सतत दहा वर्षें, नोकरीच्या बंधनाची भीड फारशी न मानतां, दुर्मतदलनाचें कार्य मोठ्या धडाडीनें केलें, त्याच्या ज्ञान-प्रसाराच्या आकांक्षेचें समाधान नुसती शाळा चालवून कसें व्हावें? लोकशिक्षणाच्या व्यापक कार्याला शाळेचा उपयोग झाला, तरी तो कितीसा होणार? मोटेच्या पाण्याने फार तर दृष्टीचा पल्ला न पोंचे इतकीहि जमीन कदाचित् भिजेल. पण, अनेक वर्षें पडीत राहिलेला वैराण प्रदेश लागवडीला आणावयाचा, म्हणजे नदीलाहि आपल्या विस्तीर्ण जलौघानें लाजवील, असा प्रचंड कालवाच खरोखरी खणला पाहिजे. शाळेच्या आवारांत शिक्षक फार तर हजार मुलांशीं बोलूं शकेल,—त्यांचीं मनें उद्बोधित आणि उद्दीपित करील. पण, शाळेच्या बाहेर जे लक्षावधि लोक अज्ञान आणि तज्जन्य दुर्मतें यांनी ग्रासलेले होते, त्यांचें उद्बोधन यापेक्षा व्यापक साधनाचा अवलंब केल्याशिवाय कसें होणार? चिपळूणकरांना या गोष्टीची जाणीव असल्यामुळे त्यांनीं, राजीनामा दिल्याबरोबर १८७९ सालच्या आक्टोबरमध्ये, 'किरण' छापखान्याचें सामान विकत घेतलें. तथापि,

छापखाना घेण्यांत त्यांचा हेतु वर्तमानपत्रें काढण्याचा होता, असें मात्र वाटत नाही. कारण, 'माले'च्या पांचव्या वर्षाच्या समारोपांत, आपल्या वाचकांशीं हितगुज करितांना, त्यांनी असे उद्गार काढलेले होते की, "इत उत्तर अध्ययन, अध्यापन, व ग्रंथरचना या तीन उद्योगांत आम्हीं कालक्षेप करणार. आमच्या चार विद्यालयबंधूंनींहि आपला अशा प्रकारचाच संकेत दोन तीन महिन्यांपूर्वी आम्हांस कळविल्यावरून ते व आम्हीं मिळून एक स्वतंत्र शाळा काढणार आहों. आमच्या एका मित्राच्या मेहरबानीनें एक मोठा छापखाना मोठ्या सोईवार रीतीनें आम्हांस मिळाला आहे. या साहित्याच्या योगानें वरील तिन्ही हेतु निर्बाधपणें चालण्यासारखे आहेत." अर्थात् छापखाना घेतांना ग्रंथरचनेचाच उद्देश त्यांच्या डोळ्यांपुढे होता, असें दिसतें. त्यांच्या बंधूंनींहि, 'निबंध-माले'चें रूपांतर 'ग्रंथमालें'त करण्याचा विचार मृत्यूच्या वेळीं त्यांच्या मनांत घोळत होता, अशी माहिती दिलेली आहे. शिवाय, वर्तमानपत्रें वाचण्याचा त्यांना असलेला कंटाळा व प्रचलित घडामोडींविषयीचें त्यांचें औदासीन्य लक्षांत घेतलें असतां, समाजाची केवळ रोजनिशीच असें वर्तमानपत्र काढण्याची कल्पना त्यांच्या मनांत उद्भूत झाली असेल, असें वाटत नाही. पण, शाळेच्या निमित्ताने ज्या नवीन व्यक्तींशीं आतां त्यांचा संबंध आलेला होता, त्या व्यक्तींनी आपल्याबरोबर त्यांनाहि वृत्तपत्रव्यवसायांत ओढलें. त्यांच्या नव्या सहकाऱ्यांपैकीं नामजोशी हे वर्तमानपत्राच्या धंद्यांत वहिवाटलेले असून, त्यांनी 'किरण' आणि 'डेक्कन स्टार' हीं मराठी-इंग्रजी पत्रें कांही दिवस मोठ्या हिमतीने चालविलेलीं होतीं. आगरकरांना लिहिण्याची हौस चिपळूणकरांपेक्षाहि कांकणभर अधिक होती असें म्हटलें तरी चालेल; व त्या उभयतांच्या लेखनाभिरुचींत फरक असा होता की, चिपळूणकरांना ज्या चिल्लर सामाजिक गोष्टींवर लिहिण्याचा मनस्वी कंटाळा होता, त्यांतहि रमण्याची आगरकरांच्या बहुढंगी लेखणीची तयारी असे. त्यामुळे, आगरकर आणि नामजोशी यांच्या योजनेनुसार, 'केसरी' आणि 'मराठा' अशीं दोन मराठी—इंग्रजी पत्रें काढण्याचा बेत नक्की झाला. टिळकांना लिहिण्याची हौस मुळीच नसल्यामुळे ते चिपळूणकरांपेक्षाहि या बाबतींत एका परीनें उदासीन होते. पण, चिपळूणकरांप्रमाणेच 'अंगीकृत

सुकृतिनः परिपालयन्ति ' असा त्यांचाहि बाणा असल्यामुळें, वर्तमानपत्रे काढण्याचें एकदां ठरल्यानंतर, चिपळूणकरांनीं, जसा ' किरण ' छापखाना आपल्या सहकाऱ्यांच्या स्वाधीन करून, शिवाय ' केसरी ' चालविण्याचीहि जबाबदारी आगरकरांच्या बरोबरीनें उचलली, तसा टिळकांनीहि 'केसरी'च्या संपादनाचा अंशतः आणि ' मराठ्या 'च्या संपादनाचा भार मुख्यतः आपल्या शिरावर घेतला. या योजनेप्रमाणे, ' किरण ' छापखान्याची पुनर्घटना ' आर्यभूषण ' या नांवाने करण्यांत येऊन, त्यांतून ता. २ जानेवारी १८८१ रोजीं ' मराठ्या 'चा व त्यानंतर ता. ४ जानेवारी रोजीं ' केसरी 'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. या पत्रांचें ध्येय ' देशस्थिति, देशभाषेंतील ग्रंथ व विलायतेंतील राज्यकारण ' यांची चर्चा करण्याचें होतें. यांपैकी पहिल्या दोन विषयांवरच बहुधा चिपळूणकरांची लेखणी चालत असे. तथापि, 'मालें'तील निबंधांतून त्यांच्या प्रतिभेच्या आत्मीय गुणांचें जें तेज प्रकट झालेलें आहे, त्याचा आढळ मात्र ' केसरीं 'तील लेखांतून होत नाही. ते लेख वाचीत असतांना, वाङ्मयाच्या निरनिराळ्या शाखांना लीलेने स्पर्श करीत संचार करणारी त्यांची विशाल प्रतिभा, वर्तमानपत्राच्या निरुंद रकान्यांतून, जणुं पंख चोरून वाट काढीत आहे, असा भास होतो. पण त्यांत नवल कसलें ? हिमगिरीवरून वेगाने कोसळत खालीं येणाऱ्या मंदाकिनीचा फेनधवल प्रवाह क्षेत्रांतील दुतर्फा बांधलेल्या घाटांतून वाहातांना अवघडल्यासारखा वाटत नाही काय ?

## २६

कदाचित् रत्नागिरीला गेल्यापासून जो शारीरिक आणि बौद्धिक थकवा चिपळूणकरांना जाणवूं लागलेला होता, त्यामुळेंहि ' केसरीं 'तील हे त्यांचे लेख इतके विस्कळित उतरलेले असतील. रत्नागिरीची हवा त्यांना मानवली नाही; व तेथे गेल्यापासून आपली शक्ति क्षीण होत असल्याची आणि शरीर सुटत चालल्याची तक्रारहि त्यांनी आपल्या बंधूंजवळ केलेली होती. या स्थितींतच

त्यांना, नोकरी सोडण्याचा संकल्प केल्यावरोबर, निरनिराळे नियोजित उद्योग एकामागून एक हातीं घ्यावे लागले. हे उद्योग चालू असतांनाच 'लोकहितवादी' आणि 'आमच्या देशाची स्थिति' हे जे 'मालें'तील शेवटले दोन प्रदीर्घ निबंध त्यांनी लिहिले, तेहि त्यांच्या पूर्वीच्या निबंधां-इतके बांधेसूद आणि तर्कशुद्ध वाटत नाहीत. त्यांपैकीं 'आमच्या देशाची स्थिति' या लेखाचा उपसंहार तर कसा तरी घाईघाईने गुंडाळलेला दिसतो. या निबंधाचे शेवटले दोन हप्ते मुळीं त्यांचें देहावसान झाल्यावरच प्रसिद्ध झाले. वयाच्या अठराव्या वर्षापासून सतत चौदा वर्षें मराठी भाषा आणि महाराष्ट्र यांच्या ऊर्जितासाठी जे अतिरिक्त परिश्रम ते अविश्रांत करीत आलेले होते, त्यामुळेच बहुधा त्यांच्यावर ऐन तारुण्यांत मृत्युमुखीं पडण्याचा प्रसंग आला असावा. या अवधींत त्यांनी 'शालापत्रका'चें संपादन चार वर्षें केलें; 'निबंधमाला' सात वर्षें चालविली; व 'चित्रशाळा', 'किताबखाना', 'न्यू इंग्लिश स्कूल', 'केसरी' वगैरे नवीन संस्था स्थापन केल्या. आकाशगंगेचा ओघ जसा अनेक एकाहून एक तेजस्वी तारकापुंजांनी संपन्न झालेला असतो, तसें त्यांचें आयुष्य अनेक एकाहून एक उज्ज्वल कृतींनी समृद्ध झालेलें होतें. पण या उज्ज्वलतेनेच अखेर त्यांची आहुति घेतली. नोकरी सोडल्यानंतर शेवटल्या दोन वर्षांत तर त्यांच्या मागचे व्याप आणि संताप हे दोन्हीहि बेसुमार वाढत जाऊन, अखेर 'माला' बंद करण्याचा निश्चय त्यांना करावा लागला. हा निश्चय त्यांनी करावयाला आणि त्यांना मरण यावयाला एकच गांठ पडली. जणुं कांही 'निबंधमाले'बरोबरच त्यांचेंहि अवतार-कार्य संपलें. ता. १६ जानेवारी १८८२ रोजीं, ते आपल्या कुटुंबांतील मंडळीबरोबर लष्करांत फोटो काढावयाला गेले असतां, त्यांना उन्हांत अधिक वेळ उभे राहावें लागल्याचें निमित्त होऊन, ते एकाएकी घेरी येऊन खाली पडले; व त्यांच्या तोंडाला दुखापत होऊन उजव्या कानांतून रक्तहि बाहेर आल्यासारखें दिसलें. त्या दिवसापासून त्यांना सारखा बारीक ताप येऊं लागला. म्हणून त्यांनी शाळेंत जाणें बंद केलें. पण त्यांचा लेखनाचा व्यवसाय मात्र नेहमीप्रमाणे चालू होता. इतकेंच नव्हे, तर 'केसरी–मराठा' पत्रांनी चेतविलेले कोल्हापूर-प्रकरण याच वेळीं कोर्टांत गेल्यामुळे त्यांच्यावर

'केसरी'च्या कामाची सर्वच जबाबदारी येऊन पडली कोल्हापूरचे दिवाण रा. ब. माधवराव बर्वे यांनी, वरिष्ठ इंग्रजी अधिकाऱ्यांच्या चिथावणीने, त्या संस्थानाचे अल्पवयी दत्तक अधिपति शिवाजीमहाराज यांना वेडे ठरवून त्यांचा जो अमानुष छळ चालविला होता, त्यामुळे छत्रपतींच्या गादीविषयी अभिमानी असलेलें महाराष्ट्रांतील लोकमत या वेळीं अत्यंत क्षुब्ध होऊन गेलेलें होतें. त्यांतच, मुंबईच्या अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांनी दिवाणाची तरफदारी आरंभिल्यामुळे, रा. ब. बर्वे यांच्यासंबंधींचा लोकांचा संशय अधिकच बळावला; व महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांतून त्यांच्याविरुद्ध टीकेची झोड उठली. महाराजांच्या जनक मातेचे वकील कोल्हापूरचे सदाशिव पांडुरंग भिडे यांनी रावबहादुरांच्या सहीची म्हणून आणलेलीं महाराजांच्या छळा-संबंधींच्या पुराव्याचीं पत्रें, न्या. रानडे, रा. ब. गोपाळराव फाटक यांच्या-सारख्या राजकारणी कायदेपंडितांचा सल्ला घेऊन, 'ज्ञानप्रकाशा'च्या पाठोपाठ 'केसरी'ने आपल्या ता. १७ जानेवारीच्या अंकांत प्रसिद्ध केलीं; व बर्वे यांना आपल्यावर फिर्याद करण्याचें आव्हान दिलें. तें आव्हान स्वीकारून त्यांनी, जानेवारीच्या शेवटल्या आठवड्यांत, सरकारच्या परवानगीने 'केसरी–मराठा' पत्रांवर अब्रुनुकसानीची फिर्याद केली. आगरकर आणि टिळक हे दोघेहि मुंबईच्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढे चालू झालेल्या या खटल्यांत गुंतल्यामुळे चिपळूणकरांना, आपल्या प्रकृतीच्या खालावलेल्या अवस्थेंतहि, 'केसरी'कडे लक्ष देणें भाग पडलें. ता. ५ मार्च रोजीं आपल्या बंधूंना पाठविलेल्या पत्रांत त्यांनी असें लिहिलेलें होतें की, "मी सध्या कांहीसा आजारीच आहे." (I am now some what ill.) तथापि त्यांनीं वैद्यकीय उपचार करण्याची काळजी मात्र मुळीच घेतली नाही. अखेर, ता. १५ मार्च रोजीं बाळकृष्णपंत जोशी प्रभृति आपल्या अंतेवासी मित्रांच्या आग्रहावरून, ते वैद्याचें औषध घ्यावयाला तयार झाले. पण, त्या दिवशीं सायंकाळीं घेतलेल्या काढ्यामुळे अंगाची फार तलखली होऊन, झोप न आल्याकारणानें त्यांनी सकाळीं शीतोपचार म्हणून कलिंगडाचा तुकडा खाल्ला. तो बाधून ता. १६ रोजीं रात्रीं एकदम त्यांची प्रकृति विकोपाला गेली. तेव्हा त्यांचे चुलते सीतारामपंत हे चिपळूणकरांचे कुटुंबवैद्य, पुण्यांतील त्या वेळचे लोकप्रिय

धन्वंतरी, सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष, रा. ब. डॉ. विश्राम रामजी घोले यांना मुद्दाम घेऊन आले. त्यांनी चिपळूणकरांना थर्मामीटर लावून पाहिलें, तों ताप १०७ अंशापर्यंत धडकलेला आणि वातानें बडबड अनावर झालेली ! डॉ. विश्राम हे प्रकृति तपाशीत असतांनाच वाताच्या लहरींत ते त्यांना उद्देशून उद्गारले, "मी तुमचें औषध घेणार नाही. मी तुम्हांस मला विष घालूं देणार नाही.—याद राखा—तुम्हांला जाब द्यावा लागेल—हा कोल्हापूरच्या महाराजांचा खटला आहे ! " ( I won't take your medicine ! I shalln't be poisoned !- Take care—you will have to answer—This is Kolhapur Maharaja's case ! ) या त्यांच्या बडबडीमुळे डॉ. विश्राम यांनी त्यांना औषध दिलें नाही; व त्यांची स्थिति भयंकर असल्याचें सीतारामपंतांना सांगून ते गेले. त्यानंतर पहाटे ५॥ वाजतां, गुरुवार ता. १७ मार्च १८८२ रोजीं, त्यांचा अंत झाला.

चिपळूणकरांच्या मृत्यूचा हा प्रसंग इतका अनपेक्षित होता की, लोकांना त्यामुळे दुःखाबरोबरच आश्चर्याचाहि धक्का बसला. ता. १४ मार्चच्या 'केसरीं'त त्यांचा 'देशोन्नति'वरील अग्रलेख प्रसिद्ध झाला होता आणि ता. २१ मार्चच्या 'केसरीं'त त्यांचे सहकारी गोपाळराव आगरकर यांनी त्यांच्यावर लिहिलेला हृदयस्पर्शी मृत्युलेख वाचण्याची पाळी लोकांवर आली. त्यांच्या निधनाच्या या अनपेक्षिततेमुळे,—आणि त्यांच्या वातांतील बडबडीमुळेहि कदाचित् असेल,–कोल्हापूर-प्रकरणाची हाय खाऊन त्यांनी आत्महत्या केली, अशी कंडी उठली; व म्हणून पोलिसांनी त्यांच्या अंत्यविधीला हरकत घेऊन त्यांना औषधोपचार करणाऱ्या डॉक्टरांचा दाखला आणण्याचा आग्रह धरला. ही कंडी अर्थातच निखालस खोटी होती, हें त्या महिन्यांतील घटनांचा नुसता कालक्रम जरी ध्यानांत घेतला, तरी कळून येईल. ता. १६ जानेवारी रोजीं चिपळूणकर एकाएकी बेशुद्ध पडून त्यांच्या आजाराला सुरुवात झाली; ता. १७ जानेवारी रोजीं 'केसरी' ने रा. ब. बर्वे यांना आव्हान दिलें; व ता. ८ फेब्रुवारी रोजीं खटल्याच्या प्राथमिक चौकशीला प्रारंभ झाला. चिपळूणकर जरी 'केसरी–मराठा' पत्रांचे प्रवर्तक असले, तरी प्रकट संपादक या नात्याने खटल्याची सर्व जबाबदारी टिळक-आगरकरांवरच

होती. म्हणूनच त्यांनी ता. ५ मार्चच्या पत्रांत आपल्या बंधूंना असें लिहिलेलें होतें की, " टिळक आणि आगरकर यांनीच मुख्यत: या खटल्याची आपल्या परीने छाननी केलेली असून, ते त्यांत पडलेले आहेत. माझा स्वतःचा त्याच्याशीं व्यक्तिशः थोडाच संबंध आहे. त्याच्या यशाबद्दल खरोखरी पुष्कळच उमेद वाटते. " ( I have personally, however, little to do in the matter. It is Messrs Tilak and Agarkar chiefly who have investigated the case for themselves and launched into it. There is, to be sure, a good prospect of its success.) खुद्द त्यांच्या ' केसरीं 'तील शेवटल्या अग्रलेखांतहि " करवीरस्थ आडनांवी ' बरव्या ' राजश्रीशीं झुंज लागल्या "चा जो उल्लेख आहे, तो त्यांच्या नेहमीच्या दर्पयुक्त पद्धतीनेच केला असल्याचें दिसून येतें. त्यांनी आपल्या ता. ५ मार्चच्या पत्रांत व्यक्त केलेली खटला जिंकण्याची उमेद मावळून तो अंगावर उलटण्याचीं चिन्हें जीं दृष्टीस पडूं लागलीं, तीं त्यांच्या मृत्यूनंतर दीड महिन्याने न्या. रानडे, रा. ब. फाटक प्रभृति बड्या संकल्पित साक्षीदारांनी टिळक-आगरकरांतर्फे साक्ष देण्याचें ऐन वेळीं नाकारल्यावर ! ही सगळी परिस्थिति लक्षांत घेतली असतां आत्महत्येची कंडी धादांत खोटी असल्याची खात्री होईल. किंबहुना, ती कंडी खोटी असल्याबद्दल त्याच वेळीं लोकांची खात्री होऊन गेलेली असल्यामुळेच खरोखरी, चिपळूणकरांच्या दूषकांनी, गेल्या सत्तर वर्षांत त्यांच्यावर केलेल्या अनेक आरोपांत, तिचा उपयोग न करण्याची सावधगिरी घेतली असावी ! खटल्याच्या त्या प्रक्षुब्ध वातावरणांत, त्यांना औषधोपचार करणाऱ्या त्यांच्या मित्रमंडळीतील एखाद्या डॉक्टराने त्यांच्या मृत्यूबद्दल दाखला देण्याचें नाकारलें असल्यास, मनुष्यस्वभावाच्या दृष्टीने, त्यांत नवल मानण्यासारखे कांहीच नाही. पण, मरणाच्या आदल्या दिवशीं रात्रीं त्यांची प्रकृति तपासणारे त्यांचे कुटुंबवैद्य रा. ब. डॉ. घोले यांनी ताबडतोब तसा दाखला दिला; व नंतर दुपारीं १२ वाजण्याच्या सुमारास त्यांचा दहनविधि योग्य समारंभाने पार पडला. त्यांच्या या आकस्मिक निधनाने अखिल महाराष्ट्राला दुःख झालें. न्या. रानडे हे त्या वेळीं मुंबईला रा. ब. शंकर पांडुरंग पंडित यांच्या बंगल्यावर कांही कामानिमित्त मुक्कामाला होते. त्यांच्या

कानांवर ही दुष्ट वार्ता पडतांच, त्यांचे डोळे अश्रूंनी भरून येऊन ते उद्‌गारले, "हातीं घेतलेलीं कामें तशीच अर्धवट टाकून देऊन त्यांनी इतक्या लवकर इहलोक सोडावयाला नको होता." (He had no business to die so soon )महाराष्ट्रांतील त्या वेळच्या ज्येष्ठ पिढीचा चिपळूणकरांच्या अकालमृत्यूविषयीचा विषाद जसा न्यायमूर्तींच्या या सूचक उद्‌गारांत व्यक्त झाला, तसा उदयोन्मुख नव्या पिढीच्या शोकाचा उमाळा हरि नारायण आपटे यांच्या ' शिष्यजनविलापां 'त उत्कटतेने उचंबळलेला आढळतो.

# २७

अशा रीतीने चिपळूणकरांची जीवितयात्रा वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी संपली. त्यांचें सर्व आयुष्य संघर्षांत गेलें आणि त्यांना मृत्यु आला, तोहि संघर्षाच्या ऐन निकरांतच ! इंग्रजी राज्य स्थापन झाल्या क्षणापासूनच परतंत्र महाराष्ट्रांत जें संक्रमण आणि जो संघर्ष एकदमच सुरू झाला, त्याचे चिपळूणकर हे जणुं प्रतीक, प्रतिनिधि आणि प्रतिपादकहि होते. ' निबंधमाला ' हा त्या संक्रमणाचा आणि संघर्षाचा एका परीने वैचारिक आलेख आहे. पाश्चात्य संस्कृतीचा सर्वव्यापी प्रभाव बुद्धीला प्रतिक्षणीं जाणवत आहे; तिचें कांही बाबतींत तरी अनुकरण करण्याची आवश्यकता मनाला पटून चुकलेली आहे;—पण त्याबरोबरच आपल्या देशाच्या पुरातन संस्कृतीचें प्रेमहि उत्कटतेने जागृत आहे; तिच्या श्रेष्ठतेवरील श्रद्धाहि अविचलित राहिलेली आहे; इतकेंच नव्हे, तर प्रतिस्पर्धी विजयी प्रबळ संस्कृतीचे कांही विशेष आत्मसात् करून ती पुनरपि आपलें सामर्थ्य जगाला दाखवूं शकेल असा विश्वासहि तिच्याविषयी वाटत आहे!—अशा प्रकारच्या ज्या संकुल, दोलाचल मनःस्थितींत महाराष्ट्रांतील एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतला विद्यापीठांतून पदवी घेऊन बाहेर पडलेला नवशिक्षित युवक होता, त्याच्या त्या मनःस्थितीचें प्रतिबिंब म्हणजेच खरोखरी 'निबंधमाला'! चिपळूणकरांचे समवयस्क

आणि समकालीन प्रतिभाशाली नेते न्या. काशिनाथ त्रिंबक तेलंग यांचेंच उदाहरण आपण घेऊं. त्यांच्यांत आणि चिपळूणकरांत कांही साम्य आहे, असें निदान प्रथमदर्शनीं तरी कोणी म्हणणार नाही; व तेलंगांनी मराठींतून फारच थोडें लिहिलेलें असल्यामुळे आजच्या महाराष्ट्राला त्यांच्या कर्तृत्वाची त्या प्रमाणांत ओळखहि उरलेली नाही. पण, भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेवरील नितांत श्रद्धा, आपल्या राष्ट्राचा बुद्धिप्रभाव पारतंत्र्यांतहि कायम असल्याचा आत्मविश्वास, तो हर एक बावतींत सिद्ध करून दाखविण्याची ईर्ष्या, महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाविषयी योग्य अभिमान हे जे आत्यंतिक राष्ट्रवादाच्या आत्मप्रत्ययाचे विशेष आपण 'निबंधमालें'त इतक्या प्रकर्षाने प्रकट झालेले पाहतों, तेच तेलंगांच्या रामायणावरील प्रबंधापासून तों इल्बर्ट बिलावरील भाषणापर्यंत सर्वच इंग्रजी वाङ्मयांत अधिक प्रामाण्याने, अधिक तार्किकतेने आणि अधिक प्रगल्भतेनेहि व्यक्त झालेले दिसत नाहीत काय? 'मराठ्यांच्या सत्तेचा उदय' हा जो ग्रंथ नंतर रानडे यांनी लिहिला, तो मूळ तेलंगांनी कल्पिलेला होता. रानड्यांनी त्याच्या प्रस्तावनेंत स्पष्टच म्हटलेलें आहे की, "माझ्या दिवंगत मित्राच्या तेजस्वी प्रतिभेचा तो महान् आविष्कार ठरला असता." (Magnum opus of his brilliant career) ते दुर्दैवाने, चिपळूणकरांप्रमाणेच, अल्पायुषी झाले आणि रानड्यांना तो मित्रसंकल्प पूर्ण करावा लागला, हा भाग वेगळा! त्याबरोबरच, आपल्या समाजाची सर्वांगीण सुधारणा तर झालीच पाहिजे; पण, ती त्याला न झिडकारितां आणि न फटकारितां, त्याचा मानभंग आणि मनोभंग न करितां, उलट त्याचा आत्मविश्वास वाढीला लावून करणें, हेंच आपलें कर्तव्य आणि जबाबदारीहि आहे, या निष्ठेने समाजाला आपल्याबरोबर घेऊन चालण्याच्या तळमळींतून, तेलंगांनी जे 'लघुतम प्रतिकारा'चें (Line of least resistance) लोकसंग्राहक तत्त्व काढलें आणि जें तत्त्व रानड्यांनी नंतर अधिक सुंदरतेने विशद केलें, तें समन्वयाचें तत्त्व आणि चिपळूणकरांनी 'आमच्या देशाची स्थिति' या शेवटल्या निबंधांत पुरस्कारिलेलें "पूर्वक्रमास अनुसरून क्रमाक्रमाने सुधारणा करण्याचें" तत्त्व यांत मूलतः आणि व्यवहारतः कांहीहि फरक नाही. सारांश, राष्ट्रवादाच्या ज्या प्रेरणा, प्रवृत्ति आणि

प्रतीति मुंबई विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या पदवीधरांच्या दुसऱ्या पिढीच्या हृदयांत त्या वेळीं आविर्भूत झालेल्या होत्या, त्या इंग्रजींतून तेलंगांच्या आणि मराठींतून चिपळूणकरांच्या लेखणींतून प्रादुर्भूत झाल्या, एवढाच फरक. मूलत: त्या प्रेरणांत, प्रवृत्तींत आणि प्रतीतींत कांहीहि भेद नाही.

किंबहुना, त्या प्रेरणांत, प्रवृत्तींत आणि प्रतीतींत जें सात्म्य, बहिरुपाधींनी उत्पन्न केलेला दर्शनी फरक बाजूला सारतांच, आपल्या मनाला जाणवतें, तें खरोखरी महाराष्ट्राला आल्हाददायक आणि अभिमानास्पद वाटावें, असेंच आहे. कारण, महाराष्ट्राच्या अस्मितेची स्वतंत्रप्रज्ञता, व्यापक राष्ट्रहितासाठी त्याग करण्याची तिची तयारी आणि तिचा 'सर्वविषयी सावधपणा' यांचा प्रत्यय त्यांत येतो. भारतीय राष्ट्रवादाच्या बाबतींत महाराष्ट्राचें स्थान आणि परिस्थिति थोडी नाजूक आणि चमत्कारिक आहे. इंग्रजी साम्राज्यशाहीशीं निकराचा अंतिम सामना देणारी शेवटली सार्वभौम सत्ता मराठ्यांची.—मराठ्यांच्या मुठींतून इंग्रजांनी भारताच्या सार्वभौमत्वाचीं सूत्रें हिसकावून घेतलीं.—तीं त्यांच्या हातांतून परत घेण्याचाहि कराल प्रयत्न,—संकुचित स्वार्थी महत्त्वाकांक्षेने कां होईना! —जो पुन्हा चाळीस वर्षांच्या आंतच, सत्तावन सालच्या बंडाच्या रूपाने, करण्यांत आला, त्यांतहि महाराष्ट्रीय वीरच अग्रेसर ! त्यामुळे, महाराष्ट्राच्या युयुत्सु, स्वातंत्र्याकांक्षी अस्मितेला, आपण मोगल बादशाहीला पालथी पाडून अखिल भारतावर अधिसत्ता गाजवूं पाहणारे इंग्रजांच्या पूर्वीचे सत्ताधीश होतों, या ऐतिहासिक सत्याचा विसर कधींहि पडला नाही, पडणें शक्यहि नाही. किंबहुना, त्याच भावनेनें उमाजी नाइकापासून तों वासुदेव बळवंतापर्यंन्त एकोणिसाव्या शतकांतील सर्व बंडखोरांनी स्वतंत्र होण्याची उतावळी, अपेशी धडपड केली. हा महाराष्ट्राचा स्वाभिमान, हा मराठी राष्ट्रवाद, अखिल भारतीय राष्ट्रीयत्वाच्या नव्या मनूंत, राष्ट्रीयत्वाच्या त्या अभिनव विशाल ध्येयांत विलीन करून घ्यावयाला हवा होता; महाराष्ट्राच्या पृथगात्मतेची ही जाणीव भारतीयत्वाच्या विराट् जाणीवेंत स्वयमेव विरघळून जाईल, अशी शिकवण त्याला द्यावयाला हवी होती. त्या शिकवणीला आणखीहि एक तितकीच महत्त्वाची बाजू होती. ती ही

की, भारतीयत्वाचा विचार करितांना, भाषाभेद आणि प्रांतभेद हे विसरणें जितकें आवश्यक होतें, तितकेंच जातिभेद आणि धर्मभेद हे विसरणेंहि आवश्यक होतें. त्याविना त्या भारतीयत्वाला दृढता आणि एकात्मता आली नसती. ही दुहेरी शिकवण जनतेला देण्याचें कार्य रानडे आणि तेलंग यांनी इंग्रजींतून व चिपळूणकरांनी मराठींतून केलें. रानडे, तेलंग आणि चिपळूणकर यांचा राष्ट्रवाद हा भेदातीत आणि विशुद्ध होता. त्यांना महाराष्ट्राचा अभिमान होता; हिंदुत्वाचाहि अभिमान होता. पण तरीहि ते प्रान्तनिरपेक्ष आणि धर्मनिरपेक्ष भारतीय राष्ट्रीयत्वाचे द्रष्टे आणि प्रतिपादक होते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मात्र रानडे आणि तेलंग यांच्यापेक्षा चिपळूणकर हे एका बाबतींत उणे आणि एका बाबतींत आगळे वाटतात. ते कितीहि देशाभिमानी आणि धर्माभिमानी असले, तरी भारतीय आध्यात्मिकतेचा दृष्टिकोन त्यांच्या ठिकाणीं अजिबातच नव्हता. कदाचित् त्यांच्या अज्ञेय-वादी वडिलांचा तो वैचारिक वारसाहि असेल. रानडे आणि तेलंग—आणि त्यांच्यानंतर टिळक—यांच्या राष्ट्रवादाला आध्यात्मिक अधिष्ठान होतें; —नव्हे, तो आध्यात्मिक श्रेष्ठतेच्या प्रत्ययांतूनच मुळीं उत्स्फूर्त आणि आविर्भूत झालेला होता. हें एक वैगुण्य सोडलें, तर चिपळूणकरांची अतुल थोरवी ही की, त्यांच्या वाङ्मयाने भारतीय राष्ट्रीयत्वाच्या नव्या युगधर्माची व्रतदीक्षा महाराष्ट्राला त्यांच्या स्वतःच्या त्यागाच्या, सेवेच्या, स्वावलंबनाच्या आणि स्वतंत्रप्रज्ञतेच्या उदाहरणाने दिली. त्या राष्ट्रवादांत जशी कोणत्याच प्रकारची आक्रमक संकुचितता आणि कलुषता नव्हती, तसाच न्यूनतेचा किंवा हीनतेचा कसलाहि गंड नव्हता. तो राष्ट्रवाद विलक्षण आत्मविश्वस्त, ऊर्जस्वल आणि उद्दाम होता.

इथेच खरोखरी चिपळूणकर आणि त्यांच्या पूर्वीचे रानडेप्रभृति नेते यांच्या मनोवृत्तींतील अगदी मूलभूत भेद प्रत्ययाला येतो. - असा क्रांतिकारी भेद की, ज्यामुळे पुढे महाराष्ट्रांतील राजकारणाला अगदी वेगळ्या, विभिन्न, परस्परविरोधी वाटा फुटल्या आणि अटीतटीचे पक्षभेद त्या वैचारिक भेदांतून उफाळले. हा भेद कोणता ? हा भेद हाच की, रानडे-प्रभृति ज्येष्ठ पिढींतल्या पुढाऱ्यांना इंग्रजी राज्य हा भारताच्या उन्नतीच्या क्रमांतील एक ईश्वरनियोजित आवश्यक टप्पा वाटला; पारतंत्र्याच्या रूपाने कां होईना लाभलेलें इंग्रजांचें प्रभुत्व आणि गुरुत्व हें भारताच्या

अनुक्रम ९४.३३

पुनरुज्जीवनाला पोषक वाटलें; तर चिपळूणकरांना तें तसें मुळीच कधी वाटलें नाही. 'आमच्या देशाची स्थिति' या आपल्या शेवटल्या निबंधांत त्यांनी असा प्रश्न सरळच विचारलेला होता की, "...आमच्या देशावर इंग्रेजांचें जें राज्य झालें आहे त्याविषयीं आमचें मत तर असें आहे की, आमचें कल्याण होण्यास त्यावांचून म्हणजे दुसरा मार्गच नव्हता असें कांही नाही. आम्ही आज तीन चार हजार वर्षे जे या देशांत नांदलों, येवढालीं राज्यें चालविलीं, कायदेकानू केले, शास्त्रें निर्माण केलीं, कला उदयास आणल्या, ऐहिक व आध्यात्म विचार केले, ते सर्व या आंग्लभौम मंडळीच्याच जिवावर काय?" इंग्रजी राज्यापासून झालेले 'बहुत लाभ' त्यांनाहि ढळढळीत दिसत होते; व इंग्रजी विद्येवर तर त्यांची विलक्षणच भक्ति होती. तरीहि, "पूर्वीची तिस्मारखानी व पेंढारशाहीसुद्धा पुरवली, पण हा इंग्रेजी चरक फार भयंकर", असे उद्गार त्यांनी काढलेले असून, या देशाच्या उद्धारासाठी कोणाच्याहि गुरुत्वाची गरज आहे, असें त्यांना कधी वाटलें नाही. रानडे प्रभृति धुरीणांना इंग्रजी अंमलामुळे या देशाला आलेलें पारतंत्र्य हा गुरुत्वगर्भ वर वाटला; तर चिपळूणकरांना ही स्वातंत्र्यनाशक 'ईश्वरदत्त पालकता' या देशांतील सर्व दैन्याचें आणि अनर्थांचें मूळ वाटली. सुखी राष्ट्राचें पहिलें लक्षण त्यांनी असें सांगितलें होतें की, "... लक्षावधि, कोटयावधि कुटुंबांचा समुच्चय जें राष्ट्र त्याची तरी चांगली स्थिति केव्हां समजायाची, तर जेव्हा कोणाहि उद्योगी व प्रामाणिक मनुष्याला उदरनिर्वाहाची पंचाईत पडूं नये तेव्हां." पण इंग्रजी राज्याने निर्माण केलेल्या 'अनिष्टप्रद शांततें'त लोक अन्नाला मोताद झाले, व्यापारधंदा अजिबात बसला आणि पौरुषहि सर्व नष्ट होऊन गेलें. पारतंत्र्यामुळे देशाला आलेलें भयानक दारिद्र्य रानडेप्रभृति विचारवंतांनाहि तितक्याच तीव्रतेने जाणवत होतें, यांत शंका नाही. तरीसुद्धा त्यांना पारतंत्र्य हें भारताच्या उन्नतीसाठी आवश्यक आणि इष्ट वाटलें. त्यामुळे 'जबाबदार राज्यपद्धति'पलिकडे त्यांची दृष्टि गेली नाही. उलट, चिपळूणकरांनी लोकप्रभुत्वांत परिणत होणाऱ्या पारतंत्र्यनिरपेक्ष विशुद्ध लोकशाही स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. इंग्रजी राज्याविषयी,—किंबहुना सर्वच प्रकारच्या पारतंत्र्याविषयी,—जी आध्यात्मिक आणि सांस्कृतिक चीड

पुढे टिळक आणि गांधी यांनी या देशांत सर्वत्र प्रसृत आणि प्रदीप्त केली, ती 'आमच्या देशाची स्थिति' या निबंधांत ओतप्रोत भरलेली आहे. त्यामुळेच खरोखरी १९०७-८ सालच्या दडपशाहींत सरकारची क्रुद्ध दृष्टि या निबंधावर पडून तो ता. ११ एप्रिल १९१० रोजीं, वर्तमानपत्राच्या नव्या कायद्यानुसार, जप्त करण्यांत आला. लोकप्रभुत्व आणि स्वातंत्र्य यांचे चिपळूणकर हे महाराष्ट्रांतील पहिले प्रतिपादक; व या उदात्त तत्त्वांनी प्रस्फूर्त अशा उद्दाम पण अनाक्रमक राष्ट्रवादाची दीक्षा त्यांनी महाराष्ट्राला दिली, हें त्यांचें ऋण केवळ अविस्मरणीय होय.

राष्ट्रवादाच्या दीक्षेइतकीच किंबहुना तिच्याहि पेक्षा एका परीने विशुद्ध आणि व्यापक अशी आणखी एक दीक्षा, आणखी एक देणगी चिपळूणकरांनी महाराष्ट्रांतील नवीन पिढीला दिली. ती दीक्षा, ती देणगी साहित्याच्या भेदातीत रसास्वादाची! त्यांच्यापूर्वी स्वभाषाभिवृद्धीचें व्रत दादोबा पांडुरंग, परशुरामपंत तात्या गोडबोले, लोकहितवादी आणि कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी इतक्या निष्ठेने आचरिलेलें होतें की, त्या बाबतींत त्यांनी महाराष्ट्राला कांही नवीन शिकविलें, असें म्हणणें अयोग्य आणि अन्यायाचें होईल. दादोबांच्या बाबतींत तर तें व्रत म्हणजे जीवनतपस्याच होऊन बसलेली होती. मराठी भाषेचे ते, लोकहितवादींनी म्हटल्याप्रमाणे, पहिले ऋषि. त्यांनी भाषेचें शास्त्र शोधिलें आणि शास्त्रांचा धर्म विवेचिला. भाषेचा मतप्रसारार्थ शस्त्रासारखा उपयोग करण्याची विद्या लोकहितवादींनी आपल्या 'शतपत्रां'च्या रूपाने चिपळूणकरांपूर्वी लोकांना दाखवून दिलेली होती. तें शस्त्र पाषाणयुगांतलें असलें, तरीहि चांगलें धारदार होतें. भाषेचा शस्त्रासारखा उपयोग करण्याची ती विद्या चिपळूणकरांनी परिणतीला नेली; व तिला कलेचें मनोज्ञ आणि मर्मभेदक स्वरूप दिलें. तेंहि खरोखरी इतकें आकर्षक आणि ओजस्वी की, देवेंद्राने आपल्या वज्राने केलेलें उन्मत्त, उत्पाती पर्वतांचें पक्षच्छेदन त्यांच्या उड्डाणाच्या भीतीपासून मुक्त झालेल्या पृथ्वीवरील लोकांनी ज्या आनंदनिर्भर नेत्रांनी पाहिलें असेल, त्याच सहर्ष विस्मयाने रावबहादुर, रेव्हरेंडें, सरस्वती यांच्यासारख्या बड्या धेंडांचा चिपळूणकरांनी केलेला तेजोभंग तत्कालीन जनतेने पाहिला असावा! त्या दृष्टीने आगरकरांनी त्यांना दिलेली व्हॉल्टेअरची उपमा अगदी यथार्थ वाटते. अर्थात्

मराठी भाषेची शास्त्र म्हणून म्हणा, कला म्हणून म्हणा, शस्त्र म्हणून म्हणा जी काय उपयुक्तता आणि महती त्या प्रारंभिक अवस्थेंतहि होती, ती दादोबा पांडुरंग, लोकहितवादी आणि कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी आपआपल्या परीने लोकांच्या निदर्शनाला आणून दिलेली होती. पण साहित्याचा रसास्वाद हा भेदातीत वृत्तीने आणि सृजनशाली शैलीनें घेण्याची समीक्षेची कला मात्र चिपळूणकरांनीच नव्या पिढीला शिकविली. आज 'निबंधमाला' वाचली जात असेल किंवा नसेलहि. पण, साहित्याची म्हणा, समाजांतील घटनांची म्हणा किंवा प्रमुख व्यक्तींची म्हणा जी समीक्षा गेलीं सत्तर वर्षें महाराष्ट्रांत रसिकतेने आणि चिकित्सक बुद्धीनें करण्यांत येत आहे, त्या समीक्षेचें शास्त्र आणि कला हीं दोन्हीहि चिपळूणकरांनी नवीन पिढीला शिकविलीं. आज जी प्रौढ, बव्हर्थ, सुश्लिष्ट आणि ऊर्जस्वल मराठी भाषा आपण सगळे लिहीत आहोंत, ती तशा शैलीने लिहिण्याची कला महाराष्ट्र चिपळूणकरांपासून शिकला. म्हणूनच, 'महाराष्ट्र वाणीचा पति' असा जो त्यांचा गौरव आगरकरांनी केलेला आहे, तो सर्वच दृष्टींनी अगदी समर्पक आणि समुचित वाटतो. दादोबांनी आपल्या आत्मचरित्रांत म्हटल्याप्रमाणे, सदाशिव काशिनाथ छत्रे यांनी आधुनिक मराठी गद्याला आरंभ केला, यांत शंकाच नाही. पण अजाण अर्भकांची करमणूक करणारा त्यांचा तो 'बाळमित्र' कुठे आणि दुर्मतध्वंसनासाठी अवतरलेली चिपळूणकरांची 'निबंधमाला' कुठे! लक्षावधि तारकांचीं नीरांजनें जरी आकाशांत तेवत असलीं, तरी त्यांच्या तेजाने रजनीचें मुख उजळलें, असें कोणीहि म्हणत नाही; तर अजराजाचें वर्णन करितांना कविकुलगुरूने म्हटल्याप्रमाणें—

नक्षत्रताराग्रहसंकुलाऽपि ज्योतिष्मती चंद्रमसेव रात्रिः ।

आपल्या सुषमेने स्थिरचरांना सुधास्नान घालणारा चंद्र हाच रजनीचा पति समजला जातो. आगरकरांनी 'महाराष्ट्र वाणीचा पति' या शब्दांनी चिपळूणकरांचा जो गौरव केलेला आहे, तो तरी याच अर्थाने. शककर्ता सम्राट् हा ज्या युगांत दिग्विजय करून जातो, त्या कालावधींत दुसरे राजे झालेले नसतात, असें नाही. पण, त्या सम्राटाच्या कर्तृत्वाचा ठसा त्याच्या काळावर इतक्या जोरकसपणाने उमटलेला असतो की, तत्कालीन इतर नृपतींचें स्मरण निःशेष होऊन, तें युग पुढे त्याच्याच नांवानें

ओळखलें जातें. ज्याच्या प्रभावशाली लेखणीने मराठी भाषेला स्वतंत्रतेचें वैभव प्राप्त करून दिलें आणि पराक्रमी लेखकांची उज्ज्वल परंपरा महाराष्ट्रांत उत्पन्न केली, त्याला जनतेने 'गद्य वाङ्मयाचा जनक' किंवा 'महाराष्ट्र वाणीचा पति' मानावें, यांत नवल काय? चिपळूणकरांच्या नंतर गेल्या अर्धशतकांत जे अनेक नामांकित लेखक उदयास आले, त्यांपैकी बहुतेकांना 'निबंधमाले'नेच साहित्य-सेवेची स्फूर्ति दिलेली होती. हरि नारायण आपटे, शिवराम महादेव परांजपे, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नरसिंह चिंतामण केळकर, विनायक लक्ष्मण भावे, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बाळकृष्ण अनंत भिडे, वामन मल्हार जोशी प्रभृति महाराष्ट्रांतील धुरंधर ग्रंथकारांना चिपळूणकरांपासूनच मातृभाषेच्या सेवेची स्फूर्ति मिळाली; व आपल्यासारखा कर्तृत्ववान् लेखक पुढे होणार नाही असे उद्गार जरी त्या महापुरुषाने अभिमानाच्या क्षणिक ऊर्मीत काढलेले असले, तरी 'शिष्यादिच्छेत्पराजयं' या न्यायाने यांपैकी बहुतेक लेखकांनी साहित्याच्या क्षेत्रांत त्यांचा पराभव केलेला आहे. शिवछत्रपतीच्या तोलाचा एकहि मुत्सद्दी त्याच्या मरणानंतर निर्माण न झाल्यामुळें मराठशाहीचा नाश झाला. परंतु, चिपळूणकरांच्या निधनानंतर त्यांच्या-पेक्षा प्रतिभाशाली लेखक महाराष्ट्रांत उदयाला आल्यामुळे मराठी भाषेचें वैभव आज वृद्धिंगत होत असून, तिचा ऱ्हास किंवा नाश होण्याची जी भीति 'माले'च्या पहिल्या अंकांत त्यांनी व्यक्त केलेली होती, ती आता नष्ट झाली आहे. हें सारें चिपळूणकरांच्या विधायक कामगिरीचें फळ! त्यांच्या वाङ्मयांत जरी कदाचित् असावी तितकी ऋजुता नसली किंवा समकालीनांना जरी त्यांच्या हातून क्वचित् अन्याय घडलेला असला, तरी महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासांत त्यांचें स्थान अढळ आणि अत्युच्च आहे. कारण जेत्यांचें बुद्धिसामर्थ्य पाहून स्तिमित झालेल्या महाराष्ट्राच्या विचार-शक्तीला 'निबंधमाले'ने चालना दिली; व त्याच्या इतिहासांत राष्ट्रवादाचा नवा मनु निर्माण केला. अशा युगप्रवर्तक ग्रंथकाराला मराठी भाषेच्या उपासकांनी गुणगौरवाचा करभार वर्षानुवर्षे कृतज्ञतेने देत राहावें, हें किती स्वाभाविक आहे!

●

क्र. नों. दि.

# आधारभूत ठळक ग्रंथ


(१) वि. कृ. चिपळूणकर—संपूर्ण वाङ्मय

(२) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र—ल. कृ. चिपळूणकर

(३) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह, भाग १, २—खं. भि. बेलसरे

(४) चिपळूणकर विषयक निबंध—बा. गं. टिळक, त्रि. का. राजवाडे, ल. रा. पांगारकर, बा. ना. देव, खं. भि. बेलसरे, न. र. फाटक, श्री. ना. बनहट्टी प्रभृति विद्वानांचे निबंध

(५) न्या. रानड्यांचें चरित्र—न. र. फाटक

(६) रा. सा. मंडलिक यांचें चरित्र—ग. रा. हवालदार

(७) लोकहितवादी यांचें चरित्र—कृ. ना. आठल्ये

(८) ना. ग. चंदावरकर यांचें चरित्र—द्वा. गो. वैद्य

(९) रा. ब. दादोबा पांडुरंग—अ. का. प्रियोळकर

(१०) प्रार्थना समाजाचा इतिहास—द्वा. गो. वैद्य

(११) मराठी गद्याचा इंग्रजी अवतार—द. वा. पोतदार

(१२) त्रिमूर्तिदर्शन—डा. वि. भा. गावंडे

(१३) विष्णुपदी—प्रा. श्री. ना. बनहट्टी, वें. शा. बलकुंदी

(१४) महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी—गं. बा. सरदार

(१५) आजकालचा महाराष्ट्र—प्रभाकर पाध्ये, श्री. रा. टिकेकर

(१६) सार्वजनिक काकांचे चरित्र—रा. ग. बोरवणकर

(१७) वा. ब. फडके यांचें चरित्र—रा. ग. बोरवणकर

(१८) बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर ३ खंड संपादक ग. गं. जांभेकर

(१९) वृत्तपत्रांचा इतिहास—वि. कृ. जोशी, रा. के. लेले

(२०) अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक-भाग १, २, ३ गं. दे. खानोलकर

शा. क्र. १९८५



(२१) ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षं--सं. भा. पां. हिवाळे

(२२) महात्मा फुले--ए. के. घोरपडे

(२३) महात्मा फुले--आ. अ. मानकर

(२४) ज्योति निबंध--लक्ष्मणशास्त्री जोशी

(२५) लोकहितवादींची शतपत्रें--श्री. रा. टिकेकर

(२६) श्रीमंत जगन्नाथ शंकरशेठ यांचें चरित्र--वि. मा. पितळे

(२७) म. ज्योतिबा फुले यांचा अल्पपरिचय--पं. सी. पाटील

(२८) मराठी राज्याची अखेर--पेशवेदप्तर--गो. स. सरदेसाई

(२९) राजा प्रतापसिंहाची रोजनिशी--पेशवेदप्तर--गो. स. सरदेसाई

(३०) महात्मा ज्योतिराव फुले--पां. ल. शहाकार

(३१) विष्णुबुवा ब्रम्हचारी यांचें चरित्र--रा. पा. आजरेकर

(३२) अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका--गं. बा. सरदार

( 33 ) Miscellaneous Writings of the late Hon'ble Mr. Justice M. G. Ranade [ 1915 ].

( 34 ) Mount Stuart Elphinstone —**Colbrooke; J. S. Cotton**

( 35 ) Speeches and Writings of Dadabhoy Naoroji

( 36 ) India in the Victorian age —**R. C. Dutt**

( 37 ) Story of Satara —**Major B. D. Basu**

( 38 ) Lord William Bentinck—**Demetrisus C. Boulger**

( 39 ) Histoty of the Missions in India and Africa —**Re. Robert Hunter**

( 40 ) The Life of John Wilson, D. D. F. R. S. —**George Smith**

( 41 ) Christianity and the Government of India —**Arthur Mayhew**

( 42 ) Men of Might in India Missions —**Helen H. Holcomb**

———